म. ग्रं. सं. ठाणें.
विषय निबंध
सं. क्र. १६९८

समाजशास्त्र

विलास संगवे

REFBK-0015140

१६६८
९५१४०
निबाह्८

# समाजशास्त्र

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ४९३८९ वि: निबंध
क्रमांक १६६८ नों. दि: १८/०२/६८

डॉ. विलास आ. संगवे
एम्. ए., पीएच्. डी.
समाजशास्त्रविभागप्रमुख
राजाराम कॉलेज, कोल्हापूर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९५१४०
REFBK-0015140

पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

© सौ. प्रेमा विलास संगवे

प्रथमावृत्ती
स्वातंत्र्यदिन
१५ ऑगस्ट १९६६

प्रकाशक :
श्री. ग. रा. भटकळ
पॉप्युलर प्रकाशन
३५ सी, ताडदेव रोड
मुंबई ३४

मुद्रक :
बापूसाहेब धों. कापसे
जनरल मॅनेजर
कोल्हापूर जिल्हा सहकारी मुद्रण
व प्रकाशन संस्था लि., कोल्हापूर

राजाराम कॉलेज, कोल्हापूर

व

कर्नाटक कॉलेज, धारवाड

या दोन ख्यातनाम संस्थांमधील

गेल्या वीस वर्षांतील

समाजशास्त्र विषयाच्या

माझ्या विद्यार्थ्यांना ......

## अनुक्रमणिका


१. समाजशास्त्राचे स्वरूप — १-१७

१. समाजशास्त्राची व्याख्या — १

२. समाजशास्त्राचा अभ्यासविषय — ५

३. समाजशास्त्राची व्याप्ती — ८

४. समाजशास्त्राच्या शाखा — ११

५. समाजशास्त्रावरील आक्षेप — १५

२. समाजशास्त्राचा इतिहास व कार्य — १८-३२

१. समाजशास्त्राचा विकास — १८

२. समाजशास्त्राचे उद्देश व उपयुक्तता — २६

३. समाजशास्त्रीय अभ्यासाची निष्पत्ती — ३०

३. समाजशास्त्र व विज्ञान — ३३-४५

१. समाजशास्त्राचे वैज्ञानिक स्वरूप — ३३

२. समाजशास्त्राची वैज्ञानिक अभ्यासपद्धती — ३७

३. समाजशास्त्र व वैज्ञानिक विचारसरणी — ४३

४. समाजशास्त्राचा इतर विज्ञानांशी संबंध — ४६-५९

१. समाजशास्त्र व अर्थशास्त्र — ४७

२. समाजशास्त्र व राज्यशास्त्र — ४८

३. समाजशास्त्र व सामाजिक मानवशास्त्र ४९
४. समाजशास्त्र व सामाजिक मानसशास्त्र ५२
५. समाजशास्त्र व समाजकार्य ५४
६. समाजशास्त्र व जीवशास्त्र ५५
७. समाजशास्त्र व इतिहास ५६
८. समाजशास्त्र व तत्त्वज्ञान ५८

५. मानव समाज ६०–७३
१. समाजाचे स्वरूप ६१
२. समाजांच्या मूलभूत गरजा ६६
३. समाजाचे प्रकार ६९
४. मानवेतर प्राण्यांचे समाज ६९
५. मानव समाजाची वैशिष्ट्ये ७१

६. समाज व पर्यावरण ७४–८४
१. पर्यावरणाचे स्वरूप व प्रकार ७४
२. भौतिक पर्यावरण ७७
३. सामाजिक पर्यावरण ८०
४. पर्यावरणाच्या प्रकारांचे बदलते महत्त्व ८२
५. पर्यावरणानुकूलन ८३

७. समाज व लोकसंख्या ८५–१०४
१. जनसंख्या व समाजरचना ८५

२. लोकसंख्येची गतिशीलता ८७

३. लोकसंख्येची रचना व विभागणी ९५

४. भारताच्या लोकसंख्येचे स्वरूप ९८

८. सामाजिक नियमने १०५-१२२

१. सामाजिक नियमनांचे स्वरूप १०५

२. सामाजिक नियमनांचे वर्गीकरण १०९

३. सामाजिक नियमनांचे परस्परसंबंध ११९

४. समाज आणि सामाजिक नियमने १२१

९. सामाजिक दर्जा १२३-१३९

१. सामाजिक दर्जाचे स्वरूप १२३

२. सामाजिक दर्जाचे एकीकरण १२६

३. सामाजिक दर्जाचे प्रकार १२८

४. सामाजिक दर्जा देण्याची पद्धत १२९

५. सामाजिक दर्जा मिळविण्याची पद्धत १३६

६. समाज आणि सामाजिक दर्जाचे प्रकार १३८

१०. सामाजिक आंतरक्रिया १४०-१५४

१. सामाजिक संबंध व आंतरक्रिया १४०

२. आंतरक्रियेचे स्वरूप व महत्त्व १४१

३. आंतरक्रियेचे प्रकार : संघर्ष १४५

४. आंतरक्रियेचे प्रकार : स्पर्धा १४९

५. आंतरक्रियेचे प्रकार : सहयोग १५२

११. समाजीकरण १५५-१६७

१. समाजीकरणाचे स्वरूप व महत्त्व १५५
२. समाजीकरणाची प्रक्रिया १५७
३. समाजीकरणाचे उद्देश १६०
४. समाजीकरण व व्यक्तित्वाचा विकास १६२
५. समाजीकरणाची साधने १६५

१२. व्यक्तिमत्त्व १६८-१८८

१. व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप १६८
२ व्यक्तिमत्त्वाचे घटक १७१
३. व्यक्तिमत्त्वाची जडणघडण १७४
४. व्यक्तिमत्त्वाचे संकलन १७८
५. व्यक्तिमत्त्वाचे विघटन १८२
६. संस्कृती व व्यक्तिमत्त्व १८५

१३. सामाजिक समूह १८९-२१०

१. सामाजिक समूहांचे स्वरूप १८९
२. सामाजिक समूहांची आवश्यकता १९३
३. सामाजिक समूहांचे वर्गीकरण १९४
४. प्राथमिक समूह २००

५. दुय्यम समूह २०६

१४. समुदाय २११–२२७

१. समुदायाची वैशिष्टये २११

२. समुदायाचे मूलाधार २१४

३. ग्राम समुदाय २१८

४. नगर समुदाय २२२

१५. सामाजिक संस्था २२८–२५२

१. सामाजिक संस्थेचे स्वरूप २२८

२. कुटुंबसंस्थेची वैशिष्टये २३१

३. कुटुंबसंस्थेची कार्ये २३७

४. कुटुंबसंस्थेचे बदलते स्वरूप २४०

५. कुटुंबसंस्थेचे भवितव्य २४६

१६. सामाजिक नियंत्रण २५३–२७१

१. सामाजिक नियंत्रणाचे स्वरूप व प्रयोजन २५३

२. सामाजिक नियंत्रणाची कार्ये व साधने २५७

३. सामाजिक नियंत्रणाचे प्रकार २६०

४. रीतिरिवाज व कायदा २६२

५. धर्म व नैतिकता २६८

५. आंतरक्रियेचे प्रकार : सहयोग १५२

११. समाजीकरण १५५-१६७

१. समाजीकरणाचे स्वरूप व महत्त्व १५५
२. समाजीकरणाची प्रक्रिया १५७
३. समाजीकरणाचे उद्देश १६०
४. समाजीकरण व व्यक्तित्वाचा विकास १६२
५. समाजीकरणाची साधने १६५

१२. व्यक्तिमत्त्व १६८-१८८

१. व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप १६८
२ व्यक्तिमत्त्वाचे घटक १७१
३. व्यक्तिमत्त्वाची जडणघडण १७४
४. व्यक्तिमत्त्वाचे संकलन १७८
५. व्यक्तिमत्त्वाचे विघटन १८२
६. संस्कृती व व्यक्तिमत्त्व १८५

१३. सामाजिक समूह १८९-२१०

१. सामाजिक समूहांचे स्वरूप १८९
२. सामाजिक समूहांची आवश्यकता १९३
३. सामाजिक समूहांचे वर्गीकरण १९४
४. प्राथमिक समूह २००

५. दुय्यम समूह २०६

१४. समुदाय २११–२२७

१. समुदायाची वैशिष्ट्ये २११

२. समुदायाचे मूलाधार २१४

३. ग्राम समुदाय २१८

४. नगर समुदाय २२२

१५. सामाजिक संस्था २२८–२५२

१. सामाजिक संस्थेचे स्वरूप २२८

२. कुटुंबसंस्थेची वैशिष्ट्ये २३१

३. कुटुंबसंस्थेची कार्ये २३७

४. कुटुंबसंस्थेचे बदलते स्वरूप २४०

५. कुटुंबसंस्थेचे भवितव्य २४६

१६. सामाजिक नियंत्रण २५३–२७१

१. सामाजिक नियंत्रणाचे स्वरूप व प्रयोजन २५३

२. सामाजिक नियंत्रणाची कार्ये व साधने २५७

३. सामाजिक नियंत्रणाचे प्रकार २६०

४. रीतिरिवाज व कायदा २६२

५. धर्म व नैतिकता २६८

१७. सामाजिक परिवर्तन २७२–२९३

१. सामाजिक परिवर्तनाचा अर्थ २७२

२. सामाजिक परिवर्तनाची कारणे २७८

३. सामाजिक परिवर्तनातील अडथळे २८५

४. सामाजिक परिवर्तनाची गती २८८

५. सामाजिक परिवर्तनाची दिशा २८९

६. सामाजिक परिवर्तनाचा उगम २९१

१८. सामाजिक नियोजन २९४–३०४

१. सामाजिक नियोजनाचे स्वरूप २९४

२. सामाजिक नियोजनातील अडचणी २९८

३. सामाजिक नियोजनाचे उद्देश व तंत्र ३००

४. सामाजिक नियोजनाची प्रगती ३०२

परिशिष्ट ३०५–३२८

१. पारिभाषिक शब्दसंग्रह : इंग्रजी – मराठी ३०५

२. पारिभाषिक शब्दसंग्रह : मराठी – इंग्रजी ३१६

३. समाजशास्त्रावरील उपयुक्त ग्रंथ ३२७

सूची ३२९–३४३

शुध्दिपत्र ३४४

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ७५१८०
ग्रंथ संग्रहालय स्थळ प्रत

# १

# समाजशास्त्राचे स्वरूप

## *१. समाजशास्त्राची व्याख्या*

समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणारे शास्त्र ते समाजशास्त्र होय अशी सर्वसाधारणपणे समाजशास्त्राची व्याख्या केली जाते. समाजाचा सांगोपांग व पद्धतशीर अभ्यास हा समाजशास्त्राचा विषय आहे. परंतु समाज एकाच प्रकारचा असत नाही. सजीव प्राण्यांचा समाज बनतो. म्हणून या जगात मानव समाजाबरोबर पशू, पक्षी, कृमी, कीटक इत्यादी प्राण्यांचे समाज देखील आहेत. परंतु या समाजांपैकी फक्त मानव समाजाचाच अभ्यास समाजशास्त्र करते. इतर प्राण्यांच्या समाजांचा अभ्यास करणारी वेगळी शास्त्रे आहेत. उदाहरणार्थ 'पशूंचे समाजशास्त्र' ( Animal Sociology ) हे सर्वसाधारण पशूंच्या व विशेषतः चिंपांझी, गोरिला यांसारख्या प्रगत अवस्थेतील पशूंच्या सामाजिक जीवनाचा व समाजरचनेचा अभ्यास करते. तेव्हां खऱ्या अर्थाने समाजशास्त्राला 'मानव समाजशास्त्र' ( Human Sociology) असे म्हणावयास हवे. पण सर्व समाजांमध्ये मानव समाजानेच वैशिष्ठ्यपूर्ण प्रगती केली असल्याने व त्याच समाजाचा फार मोठ्या प्रमाणावर अभ्यास चालू असल्यामुळे 'समाजशास्त्र' हा शब्द फक्त मानव समाजाच्या अभ्यासालाच लावला जातो व त्याच अर्थाने तो वापरला जातो.

मानव समाजाचा व्यवस्थित अभ्यास जर समाजशास्त्रामध्ये अभिप्रेत आहे तर त्या समाजाचे वैशिष्ठ्य कशात सामावलेले आहे हा प्रश्न साहजिकपणेच उद्भवतो. तसे पाहिले तर मानव हा पशूकोटीतील सस्तन प्राण्यांच्या प्रकारातील वरच्या दर्जाचा प्राणी आहे. शारीरिक गुणधर्मामुळे सस्तन प्राण्यांपैकी वानर जातीतील प्राण्यांशी त्याचे बरेचसे साम्य आहे. म्हणून मानव हा द्विहस्तक सस्तन प्राण्यांच्या ( primates ) प्रकारात मोडतो. असे असले तरी देखील मानव हा इतर पशूंपेक्षा वेगळ्या धर्तीचा अद्वितीय प्राणी आहे. ही अनन्यता त्याने निर्माण केलेल्या संस्कृतीमुळे मानवाला लाभली आहे. मानवाजवळ संस्कृती आहे व इतर प्राण्यांच्याजवळ ती नाही या एका गोष्टीमुळे मानव हा अनन्य अगर अद्वितीय प्राणी ठरला आहे. वाचा, बुद्धिमत्ता, सामाजिकता इत्यादी गोष्टी केवळ संस्कृतीमुळे मानवामध्ये इतर प्राण्यांच्या मानाने फार प्रगल्भ झाल्या आहेत. या संस्कृतीमुळेच मानवाच्या जीवनाला वेगळा अर्थ आला आहे. नाही तर तो केवळ पशू म्हणूनच समजला गेला असता. या संस्कृतीमुळे फक्त मानवालाच नव्हे तर मानव समाजाला देखील अतिशय महत्त्वाची अशी प्रभिन्नता प्राप्त झाली आहे.

तेव्हा मानव समाजाच्या अभ्यासामध्ये त्याच्या संस्कृतीचा अभ्यास अंतर्भूत केला पाहिजे हे उघड आहे. इतकेच नव्हे तर समाजाच्या एखाद्या अंगाचे संपूर्ण ज्ञान करून घेण्यासाठी त्या समाजाची संस्कृती समजावून घेणे आवश्यक आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. मनुष्य जिवंत प्राणी आहे म्हणून केवळ जीवशास्त्रीय विवेचनावरून समाजाच्या विविध अंगांचे योग्य आकलन होणार नाही. एखाद्या समाजातील कुटुंबसंस्थेची खरी कल्पना फक्त जीवशास्त्राच्या अभ्यासाच्या आधाराने येणार नाही. त्यासाठी त्या समाजाची संस्कृतीही विचारात घ्यावयास हवी. कारण कुटुंबसंस्थेशी निगडित असलेल्या विवाह, संतती, अधिकार इत्यादी बाबींविषयींच्या कल्पना संस्कृतीने ठरवून दिलेल्या असतात. कुटुंबाचे विविध प्रकार संस्कृतीतील फरकांवर अवलंबून असतात. म्हणूनच स्थानपरत्वे व कालपरत्वे कुटुंबसंस्थेच्या प्रकारांमध्ये आपणांस बदल दिसून येतो. जी गोष्ट कुटुंबसंस्थेची तीच गोष्ट समाजाच्या राजकीय, आर्थिक, धार्मिक इत्यादी संघटनांची आहे. राज्यशासन, अर्थकल्पना, धर्मसमजुती यांमध्ये वेगवेगळ्या समाजांत दिसून येणारे बदल त्या त्या समाजांतील संस्कृतीमुळे झालेले असतात. जीवशास्त्रीय दृष्ट्या समाजा–समाजामध्ये फरक नसतो. फरक असतो तो केवळ विविध समाजांच्या संस्कृतींमध्ये. याचा अर्थ असा की मानव समाजाचा अभ्यास करण्यासाठी त्या समाजाच्या संस्कृतीचा अभ्यास करणे अपरिहार्य आहे.

वरील विवेचनावरून आपणांस हे दिसून येईल की समाजशास्त्रामध्ये मानव समाजाचा अभ्यास अभिप्रेत असल्याकारणाने, समाजशास्त्रामध्ये मानवाच्या संस्कृतीचा अभ्यास हा झालाच पाहिजे. म्हणूनच समाजाचा अभ्यास करताना त्यातील संस्कृतीचे स्वरूप, उद्गम, विकास, महत्त्व इत्यादी बाबींचा सखोल अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. वेगवेगळी सामाजिक शास्त्रे ( Social Sciences ) मानवाच्या संस्कृतीचा अभ्यास करीत असतात. परंतु संस्कृतीच्या सर्व विविध बाजूंचा सांगोपांग व समग्र विचार कोणत्याही एका सामाजिक शास्त्राला संपूर्णपणे करता येणे शक्य नाही. म्हणून प्रत्येक सामाजिक शास्त्र संस्कृतीच्या एखाद्या विवक्षित भागाचाच विशेष अभ्यास करीत असते. त्याप्रमाणे समाजशास्त्रानेही आपल्या अभ्यासासाठी एक भाग निश्चित केला आहे आणि तो म्हणजे सामाजिक संबंध अगर समाजामध्ये आढळून येणारे परस्परसंबंध हा होय. मानव समाजामध्ये राहावयाचे म्हणजे व्यक्तीला इतर व्यक्तींशी संबंध ठेवलेच पाहिजेत. मानवाच्या या परस्परसंबंधांचा, अनेकविध नात्यांचा व त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा व समस्यांचा अभ्यास समाजशास्त्र करते. समाजातील व्यक्तींचे परस्परसंबंध कसे निर्माण होतात, ते कोणत्या प्रकारचे असतात, त्यांच्यापासून काय परिणाम होतात यांसारख्या बाबींचा समाजशास्त्रात विचार केला जातो. सारांश, **मानव समाजाचा आणि विशेषतः मानवांच्या परस्परसंबंधांचा किंवा मनुष्याच्या इतर मनुष्यांशी होणाऱ्या वर्तनाचा अभ्यास करणारे विज्ञान ते समाजशास्त्र होय** अशी समाजशास्त्राची व्याख्या करता येईल.

समाजशास्त्राच्या इतर व्याख्या साधारणपणे अशाच स्वरूपाच्या आहेत. **किंग्जले डेव्हिस** यांच्या मते "समाजशास्त्र हे समाजाविषयीचे सामान्य विज्ञान आहे."[1] **किम्बाल यंग** यांनी समाजशास्त्राची अशी व्याख्या केली आहे :— "समाजशास्त्र हा समाजात ( राहाणाऱ्या ) मानवाचा पद्धतशीर व व्यवस्थित अभ्यास होय; म्हणजे मानवाच्या सामूहिक जीवनाचा आणि सामूहिक जीवनाशी संलग्न असलेल्या रूढी, परंपरा, संस्था आणि आचार–विचारांच्या पद्धती यांचा अभ्यास होय."[2] **ऑग्बर्न व निमकॉफ** यांनी "समाजशास्त्र म्हणजे सामाजिक

1. "Sociology is a general science of society."
   – Kingsley Davis.
2. "Sociology is a systematic and orderly study of man in society, that is, of group life and of the customs, traditions, institutions and ways of thinking and living which are linked to group life." – Kimball Young.

मानव समाजाचा व्यवस्थित अभ्यास जर समाजशास्त्रामध्ये अभिप्रेत आहे तर त्या समाजाचे वैशिष्ठ्य कशात सामावलेले आहे हा प्रश्न साहजिकपणेच उद्भवतो. तसे पाहिले तर मानव हा पशूकोटीतील सस्तन प्राण्यांच्या प्रकारातील वरच्या दर्जाचा प्राणी आहे. शारीरिक गुणधर्मामुळे सस्तन प्राण्यांपैकी वानर जातीतील प्राण्यांशी त्याचे बरेचसे साम्य आहे. म्हणून मानव हा द्विहस्तक सस्तन प्राण्यांच्या ( primates ) प्रकारात मोडतो. असे असले तरी देखील मानव हा इतर पशूंपेक्षा वेगळ्या धर्तीचा अद्वितीय प्राणी आहे. ही अनन्यता त्याने निर्माण केलेल्या संस्कृतीमुळे मानवाला लाभली आहे. मानवाजवळ संस्कृती आहे व इतर प्राण्यांच्याजवळ ती नाही या एका गोष्टीमुळे मानव हा अनन्य अगर अद्वितीय प्राणी ठरला आहे. वाचा, बुद्धिमत्ता, सामाजिकता इत्यादी गोष्टी केवळ संस्कृतीमुळे मानवामध्ये इतर प्राण्यांच्या मानाने फार प्रगल्भ झाल्या आहेत. या संस्कृतीमुळेच मानवाच्या जीवनाला वेगळा अर्थ आला आहे. नाही तर तो केवळ पशू म्हणूनच समजला गेला असता. या संस्कृतीमुळे फक्त मानवालाच नव्हे तर मानव समाजाला देखील अतिशय महत्त्वाची अशी प्रभिन्नता प्राप्त झाली आहे.

तेव्हा मानव समाजाच्या अभ्यासामध्ये त्याच्या संस्कृतीचा अभ्यास अंतर्भूत केला पाहिजे हे उघड आहे. इतकेच नव्हे तर समाजाच्या एखाद्या अंगाचे संपूर्ण ज्ञान करून घेण्यासाठी त्या समाजाची संस्कृती समजावून घेणे आवश्यक आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. मनुष्य जिवंत प्राणी आहे म्हणून केवळ जीवशास्त्रीय विवेचनावरून समाजाच्या विविध अंगांचे योग्य आकलन होणार नाही. एखाद्या समाजातील कुटुंबसंस्थेची खरी कल्पना फक्त जीवशास्त्राच्या अभ्यासाच्या आधाराने येणार नाही. त्यासाठी त्या समाजाची संस्कृतीही विचारात घ्यावयास हवी. कारण कुटुंबसंस्थेशी निगडित असलेल्या विवाह, संतती, अधिकार इत्यादी बाबीविषयींच्या कल्पना संस्कृतीने ठरवून दिलेल्या असतात. कुटुंबाचे विविध प्रकार संस्कृतीतील फरकांवर अवलंबून असतात. म्हणूनच स्थानपरत्वे व कालपरत्वे कुटुंबसंस्थेच्या प्रकारांमध्ये आपणांस बदल दिसून येतो. जी गोष्ट कुटुंबसंस्थेची तीच गोष्ट समाजाच्या राजकीय, आर्थिक, धार्मिक इत्यादी संघटनांची आहे. राज्यशासन, अर्थकल्पना, धर्मसमजुती यांमध्ये वेगवेगळ्या समाजांत दिसून येणारे बदल त्या त्या समाजांतील संस्कृतीमुळे झालेले असतात. जीवशास्त्रीय दृष्ट्या समाजा-समाजामध्ये फरक नसतो. फरक असतो तो केवळ विविध समाजांच्या संस्कृतींमध्ये. याचा अर्थ असा की मानव समाजाचा अभ्यास करण्यासाठी त्या समाजाच्या संस्कृतीचा अभ्यास करणे अपरिहार्य आहे.

वरील विवेचनावरून आपणांस हे दिसून येईल की समाजशास्त्रामध्ये मानव समाजाचा अभ्यास अभिप्रेत असल्याकारणाने, समाजशास्त्रामध्ये मानवाच्या संस्कृतीचा अभ्यास हा झालाच पाहिजे. म्हणूनच समाजाचा अभ्यास करताना त्यातील संस्कृतीचे स्वरूप, उद्गम, विकास, महत्त्व इत्यादी बाबींचा सखोल अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. वेगवेगळी सामाजिक शास्त्रे ( Social Sciences ) मानवाच्या संस्कृतीचा अभ्यास करीत असतात. परंतु संस्कृतीच्या सर्व विविध बाजूंचा सांगोपांग व समग्र विचार कोणत्याही एका सामाजिक शास्त्राला संपूर्णपणे करता येणे शक्य नाही. म्हणून प्रत्येक सामाजिक शास्त्र संस्कृतीच्या एखाद्या विवक्षित भागाचाच विशेष अभ्यास करीत असते. त्याप्रमाणे समाजशास्त्रानेही आपल्या अभ्यासासाठी एक भाग निश्चित केला आहे आणि तो म्हणजे सामाजिक संबंध अगर समाजामध्ये आढळून येणारे परस्परसंबंध हा होय. मानव समाजामध्ये राहावयाचे म्हणजे व्यक्तीला इतर व्यक्तींशी संबंध ठेवलेच पाहिजेत. मानवाच्या या परस्परसंबंधांचा, अनेकविध नात्यांचा व त्यातून निर्माण होणाऱ्या प्रश्नांचा व समस्यांचा अभ्यास समाजशास्त्र करते. समाजातील व्यक्तींचे परस्परसंबंध कसे निर्माण होतात, ते कोणत्या प्रकारचे असतात, त्यांच्यापासून काय परिणाम होतात यांसारख्या बाबींचा समाजशास्त्रात विचार केला जातो. सारांश, **मानव समाजाचा आणि विशेषत: मानवांच्या परस्परसंबंधांचा किंवा मनुष्याच्या इतर मनुष्यांशी होणाऱ्या वर्तनाचा अभ्यास करणारे विज्ञान ते समाजशास्त्र होय** अशी समाजशास्त्राची व्याख्या करता येईल.

समाजशास्त्राच्या इतर व्याख्या साधारणपणे अशाच स्वरूपाच्या आहेत. **किंग्जले डेव्हिस** यांच्या मते "समाजशास्त्र हे समाजाविषयीचे सामान्य विज्ञान आहे."[1] **किम्बाल यंग** यांनी समाजशास्त्राची अशी व्याख्या केली आहे :— "समाजशास्त्र हा समाजात ( राहाणाऱ्या ) मानवाचा पद्धतशीर व व्यवस्थित अभ्यास होय; म्हणजे मानवाच्या सामूहिक जीवनाचा आणि सामूहिक जीवनाशी संलग्न असलेल्या रूढी, परंपरा, संस्था आणि आचार–विचारांच्या पद्धती यांचा अभ्यास होय."[2] **ऑग्बर्न व निमकॉफ** यांनी "समाजशास्त्र म्हणजे सामाजिक

1. " Sociology is a general science of society."
   – Kingsley Davis.
2. " Sociology is a systematic and orderly study of man in society, that is, of group life and of the customs, traditions, institutions and ways of thinking and living which are linked to group life." – Kimball Young.

जीवनाचा वैज्ञानिक पद्धतीने केलेला अभ्यास होय" अशी सुटसुटीत व्याख्या केली आहे.[3] **मॅकायवर** यांच्या शब्दांत "सामाजिक संबंध हा समाजशास्त्राचा अभ्यास-विषय आहे."[4] **मार्शल जोन्स** म्हणतात की "समाजशास्त्र हा मनुष्याचा इतर मनुष्यांशी असणाऱ्या संबंधांचा अभ्यास होय."[5] **मॉरिस गिन्सबर्ग** यांनी असे प्रतिपादन केले आहे की "स्थूलमानाने, मानवाच्या अन्योन्यक्रिया व परस्परसंबंध आणि त्यांची कारणे व परिणाम यांचा अभ्यास म्हणजे समाजशास्त्र होय."[6] **मेरिल व एल्डरेज** यांच्या मते "समाजशास्त्र हे मानवांच्या संबंधांचे विज्ञान आहे."[7] **हॅरी जॉन्सन** यांनी "समाजशास्त्र हे सामाजिक समूहांसंबंधीचे विज्ञान आहे" अशी समाजशास्त्राची व्याख्या केली आहे.[8] **हेन्री फेअरचाइल्ड** यांनी संपादित केलेल्या "समाजशास्त्राचा शब्दकोश" ( Dictionary of Sociology ) या ग्रंथात "समाजशास्त्र म्हणजे मानव व मानवी पर्यावरण यांच्या परस्पर संबंधाचा अभ्यास होय" अशी समाजशास्त्राची व्याख्या दिली आहे.[9] **अॅलेक्स इंकेल्स** यांच्या मते "समाजशास्त्र हा सामाजिक क्रियेच्या व्यवस्थांचा व त्यांच्या परस्परसंबंधांचा अभ्यास होय."[10]

---

3. "Sociology is the scientific study of social life."
   – Ogburn and Nimkoff.
4. "The subject-matter of Sociology is social relationships as such."
   – Robert MacIver.
5. "Sociology is the study of man - in - relationship - to - men."
   – Marshall Jones.
6. "In the broadest sense, Sociology is the study of human interactions and interrelations, their conditions and consequences."
   – Morris Ginsberg.
7. "Sociology is the science of human relationships."
   – Merrill and Eldredge.
8. "Sociology is the science that deals with social groups."
   – Harry Johnson.
9. "Sociology is the study of man and his human environment in their relations to each other."
   – Henry Fairchild.
10. **"Sociology is the study of systems of social action and of their interrelations." – Alex Inkeles.**

## २. समाजशास्त्राचा अभ्यास-विषय

समाजशास्त्राच्या या व्याख्यांची जर आपण काळजीपूर्वक छाननी केली तर आपणांस असे दिसून येईल की या व्याख्यांचा मूळ गाभा समाज असून फरक आहे तो तपशीलातील कोणत्या बाबींना जास्ती महत्त्व द्यावयाचे या विषयीचा. सर्व व्याख्यांची मध्यवर्ती कल्पना अशी आहे की, मानवांच्या परस्पर–संबंधांच्या अभ्यासाशी समाजशास्त्र निगडित आहे. मानवाच्या या परस्पर–संबंधांचे विविध रीतीने केलेले वर्णन समाजशास्त्रीय ग्रंथांतून आढळून येते आणि त्यावरून आपणांस समाजशास्त्राच्या अभ्यास-विषयाची कल्पना येते. साधारणपणे असे म्हणता येईल की, समाजशास्त्रीय ग्रंथांतून (अ) मानवाच्या सामाजिक वर्तनाचा अभ्यास, (ब) वेगवेगळ्या मानव समाजांचा व त्यांतील सामाजिक समूहांचा अभ्यास, आणि (क) अखिल मानव समाजाचा अभ्यास या तीन प्रकारच्या अभ्यासांपैकी कोणत्या तरी एका प्रकारचा अभ्यास केलेला असतो.

**(अ) मानवाच्या सामाजिक वर्तनाचा अभ्यास** : मानवाच्या परस्पर–संबंधांची कल्पना त्याच्या वर्तनावरून येते. म्हणून प्रत्यक्ष सामाजिक वर्तनाचा अभ्यास समाजशास्त्रज्ञ करतात आणि त्यावरून मानवाच्या सामाजिक संबंधांविषयी सामान्य नियम प्रतिपादन करतात. **जॉर्ज सिमेल** व **व्हॉन वीझ** हे जर्मन समाजशास्त्रज्ञ सामाजिक वर्तनाच्या अभ्यासाला विशेष महत्त्व देतात आणि त्यांचे असे मत आहे की, अशा तऱ्हेच्या अभ्यासामुळेच समाजशास्त्र हे इतर सामाजिक शास्त्रांपासून वेगळे ठरते. **सिमेल** यांनी प्रत्यक्ष सामाजिक जीवनाची पाहणी करून असा निष्कर्ष काढला की पुढारी व अनुयायी यांच्यांतील संबंध, स्पर्धात्मक संबंध, श्रेष्ठ व कनिष्ठ यांमधील संबंध अशासारखे काही मूलभूत स्वरूपाचे सामाजिक संबंध असून ते विविध प्रकारच्या सामाजिक समूहांमध्ये आढळून येतात. मग तो समूह म्हणजे चोरांची टोळी असो की धर्मप्रचारकांचा संघ असो की व्यापारविषयक संघटना असो. **व्हॉन वीझ** यांचा " संबंधांचा सिद्धान्त " (Theory of Relationship ) प्रसिद्ध आहे आणि त्यांनी व्यक्तींचे संबंध विरोधी प्रकारचे [ उदा. सहयोग (association) व वियोजन (dissociation) स्वरूपाचे ] कसे असतात याची चिकित्सा केली आहे व व्यक्तींच्या संबंधांप्रमाणेच सामाजिक समूहांच्या परस्पर–संबंधांच्या प्रक्रियांचे विवरण केले आहे.

परंतु अशा तऱ्हेने केलेल्या सामाजिक संबंधांच्या ढोबळ वर्गीकरणावरून सामाजिक वर्तनाची खरी कल्पना येत नाही. कारण एकाच धर्तीचे परस्पर-संबंध हे

वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये सारख्याच स्वरूपाचे राहात नाहीत. ‘ श्रेष्ठ व कनिष्ठ ’ यांच्यांतील संबंध हा विवक्षित प्रकारचा संबंध आहे हे जरी खरे असले तरी शाळेतील ‘ शिक्षक व विद्यार्थी यांचे संबंध,’ पितृसत्ताक कुटुंबांतील ‘ पिता व पुत्र यांचे संबंध ’ आणि सरंजामशाही पद्धतीतील ‘ जमीनदार व कूळ यांचे संबंध ’ हे सर्व एकाच स्वरूपाचे नसतात. इतकेच नव्हे तर अशा प्रकारचे संबंध परिस्थित्य–नुरूप, प्रदेशानुरूप व समूहानुरूप बदलतात. ज्या तऱ्हेचे संबंध व वर्तन कारखा–न्यात वाजवी दिसेल ते विद्यालयात योग्य ठरणार नाही. एका देशाच्या श्रेष्ठ–कनिष्ठत्वांच्या कल्पना दुसऱ्या देशात आढळणार नाहीत. एखाद्या पुढारलेल्या समाजातील वर्तन-नियम त्याच देशातील आदिवासी समाजात आढळून येणार नाहीत. तेव्हा मनुष्याच्या सामाजिक वर्तनाचा अभ्यास करताना तो ज्या समाजात अगर सामाजिक समूहात राहतो त्याचा अभ्यास करणे अपरिहार्य ठरते. म्हणून सामाजिक समूहांना महत्त्व देऊन त्यांचा विशेष अभ्यास समाजशास्त्रीय ग्रंथांतून होऊ लागला.

(ब) **वेगवेगळ्या मानव समाजांचा व त्यांतील सामाजिक समूहांचा अभ्यास:–** कोणत्याही समाजात अनेक प्रकारचे सामाजिक समूह ( Social Groups ) असतात आणि मनुष्याचे आपल्या सामाजिक समूहातील सभासदांशी विशेष संबंध असतात. विद्यालये, महाविद्यालये, विद्यापीठे यांसारख्या शैक्षणिक संस्था, खेडे, शहर, तालुका, प्रांत यांसारखे प्रादेशिक विभाग, राजकीय पक्ष, कामगार संघ, एखादा हेतू साध्य करून घेण्यासाठी कार्य करीत असलेली मंडळे वगैरे सामाजिक समूहांचे अनेक नमुने प्रत्येक समाजात दिसून येतात. त्यांच्या कार्यांमध्ये विविधता असली तरी त्यांच्या स्वरूपात समान वैशिष्टये असतात. त्यांच्या सभासदांमध्ये एकत्वाची भावना प्रक–र्षाने वास करीत असते. सभासद परस्परांना अगदी जवळचे समजतात व आपण एकसंघ आहोत असे मानतात. सभासदांच्यामधील समान विचारसरणी व वागणूक यांच्यामुळे इतर समूहांच्या सभासदांपासून आपण नक्की भिन्न आहोत अशी त्यांची खात्री असते. सहाजिकच अशा समूहांचा मनुष्याच्या वर्तनावर व त्याच्या परस्पर–संबंधांवर दूरगामी परिणाम होतात. म्हणून सामाजिक समूहांच्या अभ्यासाला विशे-षत: अलीकडील काळात-बरेच महत्त्वाचे स्थान दिले जाते व असा अभ्यास मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे.

सामाजिक समूहांच्या अभ्यासामध्ये खालील प्रकारचे दोन भेद स्पष्ट दिसून येतात : (१) समूहांचा साकल्याने केलेला अभ्यास व (२) समूहांच्या विवक्षित अंगांचा अगर वैशिष्टयांचा केलेला अभ्यास. समूहांचा साकल्याने

अभ्यास करण्याची प्रथा जुनी असून विविध प्रकारच्या समूहांचा अशा रीतीने अभ्यास झालेला आहे. आदिवासी समाजांच्या सर्वांगीण जीवनाचे तन्मयतेने वर्णन करणारे व भरपूर माहिती देणारे संशोधनपर ग्रंथ मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहेत. **रिव्हर्स, फ्रान्झ बोआस, रूथ बेनेडिक्ट, मार्गारेट मीड, इव्हान्स प्रिचर्ड, रॅडक्लिफ ब्राऊन,** यांसारख्या नावाजलेल्या सामाजिक मानवशास्त्रज्ञांनी यादृष्टीने बरेच भरीव कार्य केले आहे. आधुनिक समाजांचा सुद्धा साकल्याने अभ्यास करण्यास सुरुवात झाली आहे. त्यामध्ये विशेषतः खेडी अगर शहरे यांसारख्या लहान सामाजिक समूहांचा अभ्यास झालेला दिसून येतो. परंतु सामाजिक समूहांचा सर्वांगीण अभ्यास करणे कठीण जाते आणि बऱ्याच वेळा असे अभ्यास हे केवळ जंत्री देणारे निर्जीव ग्रंथ वाटतात. म्हणून समूहांच्या विवक्षित अंगांचा अगर वैशिष्ट्यांचा अभ्यास करण्याकडे समाजशास्त्रज्ञांची प्रवृत्ती दिसून येते. हल्ली होणारे समाजशास्त्रीय संशोधन व लिखाण मुख्यतः या स्वरूपाचे आहे. गुन्हेगारी बेकारी, वर्गविग्रह, वांशिक तेढ, ज्ञातिरचना, कुटुंबव्यवस्था, वगैरे विषयांवर अलीकडे बरेच संशोधन व लिखाण झाले आहे.

सर्वतऱ्हेच्या समाजांच्या व सामाजिक समूहांच्या अभ्यासांवरून एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होतो की, या वेगवेगळ्या समाजांमध्ये काही साम्य आहे की नाही व असल्यास, कोणत्या बाबतीत ते दिसून येते ? निरनिराळ्या समाजांतील भेदांवर भर न देता त्यांच्यामध्ये दिसून येणाऱ्या समान घटनांचा अगर विचार–सरणींचा विचार करून अखिल मानव समजाचा एकत्रित स्वरूपात अभ्यास करण्यास समाजशास्त्रात सुरवात झाली आहे.

(क) **अखिल मानव समाजाचा अभ्यासः–** सर्व मानवांचा एक समाज आहे अशी कल्पना करून त्याच्या विविध अंगांचा अभ्यास होऊ लागला. अभ्यासासाठी एखादा विषय निवडून अखिल मानव समाजामध्ये तो कोणत्या स्वरूपात आढळून येतो हे समाजशास्त्रज्ञ पाहू लागले. **विल्यम वेस्टरमार्क** यांनी "मानवाच्या विवाह-संस्थेचा इतिहास" ( History of Human Marriage ) या प्रसिद्ध ग्रंथात मानव समाजात मैथुन नियंत्रित करणाऱ्या तत्त्वाची ( principle of restricted mating ) विस्तृत चर्चा केली आहे. **एमिल डुरखाइम** या प्रसिद्ध फ्रेंच समाजशास्त्रज्ञाने आत्महत्येच्या कारणांची मीमांसा करताना आपल्या अभ्यासाचे क्षेत्र फक्त फ्रान्समध्ये झालेल्या आत्महत्यांपुरते मर्यादित ठेवले नाही. त्याचप्रमाणे 'धार्मिक भावना व आर्थिक प्रगती' यांमध्ये असणाऱ्या संबंधांची पाहणी करताना **मॅक्स वेबर** यांनी सर्व मानव समाजाचा एकत्रितपणे विचार करून धार्मिक

परंपरेच्या कार्याविषयी सर्वसाधारण नियम प्रतिपादन केले आणि या संदर्भात आधुनिक भांडवलशाही जगात इतरत्र उत्पन्न न होता प्रथम युरोपातच का उत्पन्न झाली याचे विवरण केले आहे.

काही विषयांचे स्वरूपच असे असते की त्यांच्या अभ्यासासाठी पुष्कळ समाजांचा विचार करावाच लागतो. 'युद्धाची कारणे व प्रथा' अगर 'सांस्कृतिक संपर्क' अशा विषयांचा अभ्यास करावयाचा म्हणजे अखिल मानव समाज डोळ्यांपुढे ठेऊन विविध समाजांची या दृष्टिकोणातून पाहणी करावी लागते.

याशिवाय अखिल मानव समाजाच्या विकासाची सामान्य तत्त्वे विशद करताना शास्त्रज्ञांना मानवांचा एकत्रित स्वरूपात अगर एक घटक म्हणून विचार करणे भाग पडते. कार्ल मार्क्स यांनी विरोधविकासवादावर आधारलेला सामाजिक परिवर्तनाचा सिद्धांत सर्व मानव समाजाचा एकत्रित विचार करून प्रतिपादन केला. "इतिहासाचा अभ्यास" ( Study of History ) या प्रसिद्ध ग्रंथात इतिहासकार टायनबी यांनी सर्व मानव समाजाच्या इतिहासात दिसून येणारी 'संस्कृतींचा उदय व अस्त' या विषयासंबंधींची तत्त्वे मांडली. हॉबहाऊस यांनी सांगितलेली 'मानवी विकासाची तत्त्वे' सामाजिक संस्थांच्या तौलनिक अभ्यासावर आधारलेली असून जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये मनुष्याच्या व्यक्तित्वाचा आदर वाढत्या प्रमाणात करण्याची प्रवृत्ती मानव समाजात आढळते असे दाखवून दिले.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट आहे की, मानवाच्या परस्पर-संबंधांचा विचार करताना काही समाजशास्त्रज्ञ वेगवेगळ्या मानव समाजांचा—मग ते प्रगत असोत वा अप्रगत असोत – अभ्यास करतात आणि काही समाजशास्त्रज्ञ अखिल मानव समाजाचा अभ्यास करून सर्वांना लागू पडणारी तत्त्वे प्रतिपादन करीत असतात. या दोन दृष्टिकोणातून केलेले अभ्यास परस्परपूरक होतात हे लक्षात ठेवले पाहिजे. समाजशास्त्राचा अभ्यास-विषय हल्ली अशा दोन्ही स्वरूपांचा आहे.

## ३. समाजशास्त्राची व्याप्ती

समाजशास्त्राच्या स्वरूपाचे व अभ्यास विषयाचे स्थूलमानाने आपण विवेचन केले. पण आता स्पष्ट रीतीने कोणते विषय समाजशास्त्राच्या कक्षेत येतात, कोणत्या विशिष्ट सामाजिक परिस्थितींचा समाजशास्त्रात अभ्यास केला जातो, ते पाहिले पाहिजे.

सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की सर्व तऱ्हेच्या समाजांचा व सामाजिक संबंधांचा अभ्यास समाजशास्त्र करते. मनुष्याच्या जीवनात बाह्य परिस्थितीचा त्याच्यावर परिणाम होत असतो आणि मनुष्य देखील बाह्य परिस्थितीवर या ना त्या स्वरूपात परिणाम करीत असतो. एकमेकांवर परिणाम करण्याच्या या क्रियेला संबंध असे म्हणतात. अशा सामाजिक संबंधांतूनच समाजांची निर्मिती होते. समाज निर्माण झाल्यानंतर त्यांना व्यवस्थित स्वरूप देऊन ते टिकण्यासाठी प्रयत्न केले जातात. तेव्हा समाजांतर्गत व्यवस्थेचा अभ्यास ( Study of Societies as Systems ) करण्यावर समाजशास्त्र लक्ष केंद्रित करते.

परंतु सर्वप्रकारच्या समाजांचा व सामाजिक संबंधांचा अभ्यास करावयाचा म्हणजे जवळ जवळ संपूर्ण मानवी जीवनाचे विश्लेषण केले पाहिजे. कोणत्याही एका शास्त्राला असे संपूर्ण विश्लेषण करणे अशक्य कोटीतील आहे. म्हणून सामाजिक संबंधांतील काही बाबी निवडून त्यांचाच विचार समाजशास्त्रात केला जातो. समाजात एकता कशी निर्माण होते, सजाजाचे सातत्य कसे टिकवले जाते, समाजामध्ये परिवर्तन कशा रीतीने होते, यांसारख्या मूलभूत प्रश्नांचाच समाजशास्त्र प्रामुख्याने विवेचन करते. अर्थात नक्की कोणते प्रश्न अगर विषय समाजशास्त्राच्या कक्षेत येतात हे अजून ठरलेले नाही. इतकेच नव्हे तर समाजशास्त्रात विशेषत्वाने विवेचन करावयाच्या विषयांची सीमा ग्रंथकारानुरूप बदलत असते. म्हणून काही प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञांच्या मते कोणकोणते विषय समाजशास्त्रात मोडतात ते पाहणे आवश्यक आहे.

फ्रेंच समाजशास्त्रज्ञ **एमिल डुरखाइम** यांनी समाजशास्त्राच्या विषयांचे खालीलप्रमाणे तीन विभाग पाडले आहेत.

**१. सामाजिक आकारशास्त्र अगर स्वरूपशास्त्र** ( Social Morphology ) : यात बाह्य परिस्थिती व लोकसंख्याविषयक बाबींचा समावेश होतो.

**२. सामाजिक शरीरशास्त्र** ( Social Physiology ) : सामाजिक जीवनाच्या धर्म, नीती, कायदा, अर्थव्यवस्था यांसारख्या विशिष्ट अंगांचा यात समावेश होतो. ही अंगे इतकी महत्त्वाची आहेत की त्यांच्या अभ्यासासाठी स्वतंत्र शास्त्रे निर्माण झाली आहेत.

**३. सामान्य समाजशास्त्र** (General Sociology ): विविध सामाजिक घडामोडींच्या व प्रक्रियांच्या अभ्यासावर आधारलेले सामान्य सामाजिक नियम अगर सिद्धांत शोधून काढण्याचे कार्य सामान्य समाजशास्त्र करते.

इंग्लिश समाजशास्त्रज्ञ **मॉरिस गिन्सबर्ग** यांनी समाजशास्त्रात अभ्यास करावयाच्या समस्यांची चार विभागात वाटणी केली आहे. ती अशी.

१. **सामाजिक आकारशास्त्र अगर स्वरूपशास्त्र** ( Social Morpho logy ): लोकसंख्या, समाजरचना, सामाजिक समूह, सामाजिक संस्था यांसारख्या मूलभूत विषयांचा यात समावेश होतो.

२. **सामाजिक नियंत्रण** ( Social Control ) : धर्म, नीती, कायदा यांसारख्या समाजाचे नियंत्रण करणाऱ्या साधनांचा विचार यात केला जातो.

३. **सामाजिक प्रक्रिया** ( Social Processes ) : व्यक्ती अगर समूह यांच्या परस्पर-क्रियेच्या मार्गांचे विश्लेषण या सदरात मोडते. विशेषतः सहयोग आणि संघर्ष, सामाजिक भेदीकरण व एकीकरण ( social differentiation and integration ), आणि सामाजिक विकास व ऱ्हास ( social development and decay ) या विषयांचा विचार यात केला जातो.

४. **सामाजिक विकृतीशास्त्र** : (Social Pathology) : सामाजिक विष–मायोजन ( social maladjustments ) व सामाजिक क्षोभ ( social disturbances ) यांचा अभ्यास या सदरात केला जातो.

अमेरिकेतील समाजशास्त्रज्ञ **किंग्जले डेव्हिस** यांच्या मते खालील पांच प्रमुख समस्यांचा समाजशास्त्रात अभ्यास झाला पाहिजे.

१. **समाज–रचना** (Social Structure ) : समूह, संस्था यांसारख्या समाज–व्यवस्थेच्या आवश्यक घटकांचा अभ्यास यात केला जातो.

२. **सामाजिक कार्ये** ( Social Functions ): समाज–व्यवस्था टिकण्या–साठी आवश्यक असलेल्या गरजा समाज–रचनेकडून भागविल्या जातात का ? सामाजिक संघटना व त्यांची कामे यांचा अन्योन्यसंबंध कसा आहे ? एकात बदल झाला तर दुसऱ्यात बदल होणे अनिवार्य असते का ? सामाजिक कार्यक्षमता ( social efficiency ) अगर अकार्यक्षमता म्हणजे काय ? यांसारख्या प्रश्नांचा उहापोह यात केला जातो.

३. **सामाजिक आंतरक्रिया** ( Social Interaction ) : मानवांच्या संपर्काचे स्वरूप, सामूहिक वर्तनाचे गतिमान स्वरूप, आणि सहयोग, स्पर्धा, संघर्ष, इत्यादी प्रक्रियांचे मानवी जीवनातील कार्य, अशा बाबींचा अभ्यास या सदरात केला जातो.

**४. व्यक्ती आणि समाज** ( Individual and Society ) : मनुष्याचे व्यक्तिमत्त्व समाजात कसे घडविले जाते ? समाज वेगवेगळ्या प्रकारच्या व्यक्तींचा उपयोग कशा रीतीने करून घेतो ? निरनिराळ्या सामाजिक परिस्थितींच्या योगाने कोणत्या मानसिक प्रतिक्रिया होतात ? यांसारख्या प्रश्नांचा विचार या विभागात केला जातो.

**५. सामाजिक परिवर्तन** ( Social Change ) : सामाजिक परिवर्तनाची प्रक्रिया, दिशा, कारणे, गती, गतिमापन, इत्यादी बाबींची चर्चा या सदरात केली जाते.

समाजशास्त्राच्या व्याप्तीमध्ये येणारे हे सर्व प्रश्न मूलभूत स्वरूपाचे असून बऱ्याच समाजशास्त्रज्ञांनी ते या ना त्या स्वरूपात सोडविण्याचे प्रयत्न केले आहेत. अर्थात, त्यांनी या प्रश्नांचा तात्त्विक अगर धार्मिक दृष्टिकोणातून विचार न करता वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करून आपली मते मांडली आहेत. साहजिकच अशी मते अंतिम स्वरूपाची नसतात कारण ती विवक्षित परिस्थितींच्या अभ्यासावर आधारलेली असतात. मानवाची बाह्य परिस्थिती सारखी बदलत असते आणि त्यानुसार मनुष्य आपल्या वर्तनात व सामाजिक संबंधांत सारखा बदल करीत असतो. या बदलत्या सामाजिक प्रश्नांचा अभ्यास समाजशास्त्राच्या व्याप्तीमध्ये येतो. म्हणूनच समाजशास्त्राचा अभ्यास स्थिर स्वरूपाचा ( static ) नसून गतिशील ( dynamic ) आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

## ४. *समाजशास्त्राच्या शाखा*

समाजशास्त्राच्या व्याप्तीच्या विवेचनावरून हे दिसून येते की समाजशास्त्राचे क्षेत्र अतिशय व्यापक असून बदलत्या सामाजिक परिस्थितींचा त्यात सारखा विचार करावा लागतो. शिवाय मानवाच्या सामाजिक संबंधांचा किंवा मनुष्याच्या इतर मनुष्यांशी होणाऱ्या वर्तनाचा साकल्याने अभ्यास समाजशास्त्रात करावयाचा असतो. त्यामुळे अनेक सामाजिक समस्यांशी समाजशास्त्राचा निकटचा संबंध येतो. पण हे सामाजिक प्रश्न विविध स्वरूपाचे असतात आणि त्यांचे मानवाच्या सामाजिक वर्तनावर परिस्थित्यनुरूप भिन्न भिन्न परिणाम होत असतात. सहाजिकच सर्व सामाजिक समस्यांचा एकत्रित विचार करणे अगदी कठीण जाते. म्हणून समाजशास्त्राच्या व्याप्तीमध्ये येणाऱ्या प्रश्नांचे त्यांच्या स्वरूपानुसार विशिष्ट विभाग

पडले आणि अशा विशिष्ट विभागांचा वाढत्या प्रमाणावर अभ्यास झाल्याने समाजशास्त्राच्या शाखा निर्माण झाल्या. मूळ समाजशास्त्राशी बरोबरी करू शकतील इतक्या समाजशास्त्राच्या शाखा आता वृद्धिंगत होऊ लागल्या आहेत. त्यापैकी काही प्रमुख शाखा खालील प्रमाणे आहेत.

१. **राजकीय समाजशास्त्र** ( Political Sociology ) : सामाजिक संघटनेचा एक घटक असलेल्या राज्यसंस्थेच्या वेगवेगळ्या रचना व कार्ये यांचा अभ्यास राजकीय समाजशास्त्रात केला जातो. राजकीय पक्षांच्या घटना व कार्ये, राजकीय सत्तेचा उगम व बदल, अल्पजनसत्ताक राज्य ( oligarchy ) स्थापन करण्याची वाढती प्रवृत्ती, नेतृत्वाच्या आधारभूत गोष्टी आणि राजकीय क्रांतींचे स्वरूप व कारणे अशा सारख्या प्रश्नांचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न राजकीय समाजशास्त्रात केला जातो.

२. **औद्योगिक समाजशास्त्र** ( Industrial Sociology ): वेगवेगळ्या समाज-व्यवस्थांच्या आर्थिक आणि विशेषत: औद्योगिक संघटनांचा अभ्यास औद्योगिक समाजशास्त्रात केला जातो. औद्योगिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांचे स्वरूप, मालक व मजूर यांचे परस्पर-संबंध आणि या दोघांचे राज्याशी संबंध, विज्ञान व तंत्रविद्या ( technology ) यांचे मानवी संबंधांवर होणारे परिणाम इत्यादी बाबींवर औद्योगिक समाजशास्त्राने बराच प्रकाश टाकला आहे.

३. **नागर समाजशास्त्र** ( Urban Sociology): मर्यादित जागेवर लोकसंख्या केंद्रित झाल्यामुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक व आर्थिक प्रश्नांचा विशेष अभ्यास नागर समाजशास्त्र करते. शहरांची वाढ, शहरांची व शहरी समाजांची रचना, शहरांची वैशिष्ट्ये व त्यांचे जीवनावर होणारे परिणाम, शहरी वृत्ती, आणि शहरे व ग्रामीण भाग यांचे संबंध इत्यादी प्रश्नांवर नागर समाजशास्त्रात लक्ष केंद्रित केले जाते.

४. **ग्रामीण समाजशास्त्र** ( Rural Sociology ): ग्रामीण भागातील सामाजिक संबंधांचे विशेष अध्ययन करणे हे ग्रामीण समाजशास्त्राचे मुख्य कार्य आहे. ग्रामीण समाज हा शहरी समाजाच्या मानाने अगदी वेगळा व वैशिष्ट्यपूर्ण समाज असतो. म्हणून ग्रामीण जीवनाच्या विविध अंगांची-सामाजिक संबंध, सामाजिक प्रक्रिया, सामाजिक समस्या, सामाजिक संस्था इत्यादिकांची-तपशीलवार चर्चा करून ग्रामीण समाजाच्या विकासाचे नियम ग्रामीण समाजशास्त्र प्रतिपादन

करते. नगरीय व ग्रामीण समाजशास्त्र या शास्त्रांची वाढ अलीकडील काळात फार झपाट्याने झाली आहे.

५. **धर्माचे समाजशास्त्र** ( Sociology of Religion ) : प्रत्येक समाज-व्यवस्थेत काही बाबी 'पवित्र' समजल्या जातात. अशा पवित्र बाबींचा सांगोपांग अभ्यास म्हणजे धर्माचे समाजशास्त्र होय. मुख्यतः धर्माची उत्पत्ती व स्वरूप यांविषयी विस्तृत विवरण करून समाजातील ऐक्यभाव व साहचर्य टिकविण्यासाठी धर्म काय कार्य करतो याचे विवेचन या शाखेत केले जाते. धर्माचा इतर सामाजिक संस्थांशी कसा घनिष्ठ संबंध येतो याचे दिग्दर्शन करून समाजव्यवस्थेचे सातत्य टिकविण्यासाठी आवश्यक असलेली विचारपरंपरा धर्म कशी निर्माण करतो या प्रश्नाकडे विशेष लक्ष पुरविले जाते. धर्म व समाज यांचा अन्योन्य-संबंध कळण्यास या शाखेतील अभ्यासांचा फार उपयोग झाला आहे.

६. **कुटुंबाचे समाजशास्त्र** ( Sociology of Family ) : या शाखेत वेग-वेगळ्या समाजांतील कुटुंब संस्थेचे स्वरूप, इतिहास, रचना व कार्य यांचा अभ्यास केला जातो आणि स्थलकालपरत्वे कुटुंब संस्थेत होणाऱ्या बदलांचे विवेचन केले जाते. **वेस्टरमार्क, ब्रिफॉल्ट** यांसारख्या लेखकांनी या विषयावर सुरवातीला केलेले लिखाण पुष्कळ अंशी काल्पनिक स्वरूपाचे ( speculative ) होते. पण अली-कडील काळात या विषयावर अनुभवाश्रित ( empirical ) स्वरूपाचे संशोधन करण्याकडे प्रवृत्ती दिसू लागली आहे. वेगवेगळ्या राजकीय व्यवस्थेतील कुटुंबाचे स्थान, कुटुंब व सामाजिक स्तररचना ( social stratification ) यांचे संबंध, कुटुंबातील सदस्यांमध्ये होणारी सत्तेची विभागणी, समाजीकरण (socialisation) व व्यक्तिमत्त्वाची वाढ यांसारख्या महत्त्वाच्या प्रक्रियांमध्ये कुटुंबाचे कार्य, कौटुंबिक सुखाची कारणे इत्यादी विषयांवर या शाखेतील अभ्यासकांनी भर दिला आहे.

७. **अपराधविज्ञान** ( Criminology ) : अपराध व अपराध्याचे वर्तन यांचा पद्धतशीर अभ्यास म्हणजे अपराधविज्ञान होय. हा अभ्यास कायद्याच्या अगर न्यायशास्त्राच्या किंवा विधानशास्त्राच्या ( Jurisprudence ) दृष्टिकोणातून न करता अपराध्याच्या समाजद्रोही वर्तनाच्या विकासाची क्रिया कशी घडते या वास्तववादी दृष्टिकोणातून केला जातो. अपराध का घडतात या प्रश्नाचा विचार पूर्वी जीवशास्त्रीय आणि मानसशास्त्रीय सिद्धान्तांवर आधारलेला असे. परंतु आता अपराधांची कारणे शोधताना सामाजिक परिस्थिती, संस्कृती–संघर्ष, विशेष संगती अगर साहचर्य या बाबींचा विचार अवश्यमेव केला जातो. अपराधविज्ञानातच

त्याच्याशी संबंधित असलेल्या दण्डशास्त्र ( Penology ) या विषयाचा अभ्यास केला जातो. अपराध्याला शिक्षा करण्याच्या वेगवेगळ्या मार्गांचे मनुष्यांच्या वर्तनावर होणारे परिणाम, समाजरचना आणि दण्डनीती यांचे परस्पर–संबंध, अपराध्यांची सुधारणा व पुनर्वसन करणाऱ्या योजनांची उपयुक्तता इत्यादी महत्त्वाच्या विषयांवर दण्डशास्त्रामध्ये लक्ष केंद्रित केले जाते.

८. **जीवशास्त्रीय समाजशास्त्र** ( Biological Sociology ) : अथवा **सामाजिक जीवशास्त्र** ( Social Biology ): अलीकडच्या काळात ही शाखा बरीच प्रसिद्धीस येऊ लागली आहे. या शाखेचे क्षेत्र अजून तितकेसे निश्चित झाले नाही. साधारणपणे, वंशदाय ( heredity ), परिवर्तन ( variation ), वरण (selection) आणि जनन ( reproduction ) या जीवशास्त्रीय प्रक्रियांच्या मानवांच्या लोकसंख्येवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास यात केला जातो. तसेच, मानवाचे वंश ( human races ), वंशविषयक सिद्धान्तांचे समाजावर होणारे परिणाम, जीवन–संघर्षाचे सिद्धान्त ( struggle for existence theories ) आणि युद्धे यांचा संबंध आणि त्याचप्रमाणे लोकविज्ञानाचे सिद्धान्त ( demographie theories ) विशेषतः लोकसंख्येचा आकार, घनता आदींचे होणारे सामाजिक परिणाम या बाबींचे सविस्तर विवेचन या शाखेत केले जाते.

९. **शैक्षणिक समाजशास्त्र** ( Educational Sociology ): समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून मूलभूत शैक्षणिक समस्या सोडविण्याचा प्रयत्न शैक्षणिक समाजशास्त्रात केला जातो. शिक्षणाच्या प्रक्रियेची रचना व गतिमानता, शिक्षणाचा समाजव्यवस्थेशी असणारा संबंध, शिक्षणाचा व्यक्तिमत्त्वावर होणारा परिणाम, शिक्षणविषयक तत्त्वांचा उपयोग, इत्यादी विषयांवर शैक्षणिक समाजशास्त्रात लक्ष केंद्रित केले जाते.

१०. **मानसशास्त्रीय समाजशास्त्र** ( Psychological Sociology ): सामाजिक घटनांच्या विवेचनामध्ये मानसिक बाबींच्या विचारांना महत्त्व या शाखेत दिले जाते. सामाजिक मानसशास्त्र या मानसशास्त्राच्या शाखेशी या शाखेचे बरेच साम्य आहे.

वरील महत्त्वांच्या शाखांखेरीज **कायद्याचे समाजशास्त्र** ( Sociology of Law ), **कलेचे समाजशास्त्र** ( Sociology of Art ), **ज्ञानाचे समाज–शास्त्र** ( Sociology of Knowledge ), **सामाजिक भूगोल** ( Social

Geography ), **मानव परिस्थितीविज्ञान** ( Human Ecology ), आणि **सामाजिक संख्याशास्त्र** ( Social Statistics ) या शाखांची बरीच वाढ अलीकडील काळात झाली आहे.

## ४. *समाजशास्त्रावरील आक्षेप*

समाजशास्त्राच्या स्वरूपाविषयी केलेल्या विस्तृत विवेचनावरून हे दिसून येईल की समाजशास्त्र हे विज्ञान आहे आणि त्याला अनुसरूनच समाजशास्त्राच्या व्याख्या करण्यात आल्या आहेत. " मानव समाजाचा आणि विशेषतः मानवांच्या परस्पर-संबंधांचा किंवा मनुष्याच्या इतर मनुष्यांशी होणाऱ्या वर्तनाचा अभ्यास करणारे विज्ञान ते समाजशास्त्र होय " अशी समाजशास्त्राची व्याख्या करताना समाजशास्त्र हे विज्ञान असून त्याला स्वतःचा असा वेगळा अभ्यासविषय आहे हे नमूद झाले आहे. परंतु ही भूमिका काही टीकाकारांना मान्य नाही. इतकेच नव्हे तर त्यांनी समाजशास्त्राच्या स्वरूपावर बरेच आक्षेप घेतले आहेत. समाजशास्त्राच्या स्वरूपाची सम्यक् कल्पना येण्यासाठी या आक्षेपांमध्ये कितपत तथ्य आहे हे पाहणे आवश्यक आहे.

पहिला आक्षेप असा घेतला जातो की, ज्या अर्थाने अर्थशास्त्र, इतिहास व राज्यशास्त्र हे अभ्यासाचे विशिष्ट विभाग आहेत त्या अर्थाने समाजशास्त्र हा अभ्यासाचा स्वतंत्र विभाग होऊ शकत नाही कारण वरील शास्त्रांनी प्रतिपादन केलेल्या मतांचे संकलन अगर संयोजन ( synthesis ) करण्याचे काम तेवढे समाजशास्त्र करते. परंतु हा आक्षेप सर्वथैव चुकीचा आहे. एकतर, समाजांच्या स्वरूपविषयक एकतेचा ( societies as unities ) अभ्यास समाजशास्त्रातच केला जातो. प्रत्येक समाजाची स्वतंत्र अशी व्यवस्था ( system ) असते आणि ती व्यवस्था टिकण्यासाठी वेगवेगळ्या क्षेत्रांतील सामाजिक संस्थांना एकसंघ करण्याचे प्रयत्न समाजात केले जातात. अशा प्रयत्नांचा अभ्यास मुख्यतः समाजशास्त्र करते. ही दृष्टी इतर सामाजिक विज्ञानांमध्ये ( Social Sciences ) असत नाही. दुसरी गोष्ट अशी की, समाजशास्त्र असे एकच विज्ञान आहे की ज्यामध्ये सामाजिक समूहांचा ( Social Groups ) सांगोपांग विचार केला जातो. मानवांच्या सामाजिक समूहांचे स्वरूप, रचना, वर्गीकरण यांचे विश्लेषण करून त्यामुळे मानवी वर्तनावर होणाऱ्या परिणामांचा विशेष अभ्यास फक्त समाजशास्त्रच करते. तिसरी गोष्ट अशी की काही खास विषयांची चर्चा समाजशास्त्रातच केली जाते. सामाजिक

मराठा ग्रंथ संग्रहालय. ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............... दि: ...............

स्तररचना ( social stratification ), लोकसंख्येत होणाऱ्या बदलांचे परिणाम, कुटुंब संस्थेच्या कार्याचे बदलते स्वरूप यांसारख्या विषयांचा अभ्यास इतर सामाजिक विज्ञानांतून होत नाही. सारांश, समाजशास्त्र हा अभ्यासाचा स्वतंत्र विभाग निश्चित आहे.

अर्थशास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र यांसारख्या सामाजिक विज्ञानांकडून समाजशास्त्र फार उसनवारी करते असा दुसरा आक्षेप समाजशास्त्रावर केला जातो. इतर विज्ञानांनी प्रतिपादन केलेल्या नियमांचा व त्यांनी संपादित केलेल्या ज्ञानाचा समाजशास्त्र उपयोग करून घेते हे खरे आहे. पण याबरोबर हेही लक्षात ठेवले पाहिजे की, समाजशास्त्राने केलेल्या सामाजिक घटनांच्या विश्लेषणांचा व त्याने काढलेल्या निष्कर्षांचा परिणाम इतर शास्त्रांच्या विवेचनावर हमखास झाला आहे. शिवाय, आदान–प्रदानाची ही क्रिया सर्व अभ्यास-शाखांमधून सारखी चालू असते हे विसरता कामा नये. पदार्थशास्त्र ( Physics ) व रसायनशास्त्र ( Chemistry ) यांतील शोधांचा जीवशास्त्र ( Biology ) सारखा उपयोग करून घेत असते. याचा अर्थ असा नव्हे की जीवशास्त्र हे स्वतंत्र शास्त्र होऊ शकत नाही. किंबहुना कोणत्याही विज्ञानाची वाढ ही नंतर संबंधित अभ्यासशाखांच्या ज्ञानापासून फायदा करून घेण्यावर अवलंबून असते. तेव्हा समाजशास्त्र उसनवारी करते यात काहीही गैर अगर कमीपणा आणणारे नाही. कारण ज्ञानाचे विभाग आपण आपल्या सोयीसाठी पाडले आहेत.

समाजशास्त्रावरील तिसरा आक्षेप असा आहे की, सामाजिक आशय ( social content ) असलेल्या विविध अभ्यासांचा फक्त समुच्चय ( assembl ge of miscellaneous studies) समाजशास्त्रात केला जातो; त्या विषयांचा समाजशास्त्र अभ्यास करीत नाही. पण हे म्हणणे वस्तुस्थितीला धरून नाही. असे कित्येक विषय आहेत की ज्यांचा समाजशास्त्रात झाला इतका भरपूर अभ्यास इतरत्र झालेला आढळत नाही. कुटुंब, मालमत्ता, धर्म, राज्य यासारख्या सामाजिक संस्था, सामाजिक वर्ग, राष्ट्रीय व वांशिक समूह, लोकसंख्येतील बदल व स्थानान्तरण, सामाजिक रूढी, गुन्हेगारी, आत्महत्या इत्यादी विषयांसंबंधी महत्त्वपूर्ण माहिती विस्तृत प्रमाणात समाजशास्त्राने इतर शास्त्रांना दिली हे सत्य नाकारता येणार नाही.

सारांशरूपाने असे म्हणता येईल की, वरील आक्षेपांत काही तथ्य दिसत नाही, कारण ते चुकीच्या अगर अपुऱ्या माहितीवर आधारलेले आहेत. समाज–

शास्त्राची वाढ अगदी अलीकडील काळात म्हणजे गेल्या एक शतकात झालेली असल्याने त्याच्या स्वरूपाविषयी लोकांना विशेष माहिती उपलब्ध झाली नाही. म्हणून अजनही कित्येकजण समाजशास्त्र व समाजकार्य (Sociology and Social Work ) आणि समाजशास्त्र व समाजवाद ( Sociology and Socialism ) यांची गल्लत करतात. वस्तुतः समाजशास्त्र हे समाजकार्य व समाजवाद यांपासून सर्वथैव भिन्न आहे. लोकांच्या सामाजिक समस्या सोडविणाऱ्या मार्गांचा विचार करून ते मार्ग प्रत्यक्ष व्यवहारात आणण्याचे उपाय समाजकार्यात प्रतिपादन केले जातात. अर्थात समाजशास्त्रीय ज्ञानाचा उपयोग ते मार्ग शोधून काढण्याच्या कामी केला जातो. समाजशास्त्रामध्ये मुख्यतः सैद्धान्तिक चर्चेच्या आधारे निष्कर्ष काढले जातात तर समाजकार्यामध्ये ते निष्कर्ष व्यवहारामध्ये कसे उपयोगात आणावेत याचा विचार केला जातो. तसेच समाजवाद आणि समाजसत्तावाद (Communism) ह्या आर्थिक क्षेत्रातील विचारप्रणाली अगर वाद आहेत आणि लोकांची आर्थिक सुधारणा घडवून आणण्यास योग्य अशा उपाययोजना त्यांत सांगितल्या आहेत. संस्कृतीचा एक भाग म्हणून या वादांशी समाजशास्त्राचा संबंध येतो एवढेच. पण समाजशास्त्राच्या अभ्यासाचा हा विषय नव्हे. मानवांच्या परस्पर-संबंधांविषयी किंवा त्यांच्या संपूर्ण सामाजिक जीवनाविषयी पद्धतशीरपणे ज्ञान संपादन करण्याचा प्रयत्न समाजशास्त्रातच केला जातो. म्हणून समाजशास्त्राला स्वतंत्र असे अस्तित्त्व आहे.

# २

# समाजशास्त्राचा इतिहास व कार्य

## १. *समाजशास्त्राचा विकास*

समाजशास्त्र हा अगदी नवीन विषय नाही असे एका अर्थाने म्हणता येईल. समाजाच्या अभ्यासाची सुरवात फार पुरातन कालापासून झाली आहे. मनुष्य हा विचारशील प्राणी आहे व तो समाजात समूह करून राहणारा आहे. त्यामुळे सामाजिक जीवनात उत्पन्न होणाऱ्या समस्यांना तोंड देत असता त्याने आपली मते मांडली आहेत. वेगवेगळ्या देशांतील तत्त्वज्ञांनी व धर्मोपदेशकांनी मनुष्यांच्या समाजातील वर्तनाविषयी चिंतन करून आपले विचार ग्रथित केले आहेत. ग्रीस देशातील प्रसिद्ध तत्त्वज्ञ **प्लेटो** ( इ. स. पूर्व ४२७ ते ३४७ ) याने "रिपब्लिक" या ग्रंथात व त्याचा प्रथितयश शिष्य व दार्शनिक **ॲरिस्टॉटल** ( इ. स. पूर्व ३८४ ते ३२२ ) याने "नीतिशास्त्र" व "राज्यशास्त्र" या ग्रंथांत समाज व राज्य याविषयी पद्धतशीरपणे विस्तृत विवेचन केले आहे. भारतात सामाजिक जीवनाचा विचार धार्मिक दृष्टिकोणातून अनेक ग्रंथकारांनी अगदी सुरवातीपासून केला आहे आणि उपनिषदे, सूत्रे, पुराणे इत्यादी धर्मग्रंथांतून त्याचा पडताळा पाहावयास मिळतो. तसेच **शुक्राचार्यांच्या "नीतिसार" व कौटिल्याच्या "अर्थशास्त्र"** या

ग्रंथांमध्ये राजकीय बाबींबरोबर नीती, शासन, समाज इत्यादी विषयांची चर्चा केली आहे. **मनु, नारद, पराशर, विष्णु** इत्यादी प्रसिद्ध विचारवंतांनी आपल्या 'स्मृति'ग्रंथांतून सामाजिक वर्तनाचे नियम घालून दिले आहेत.

प्राचीन व मध्ययुगीन कालातील विचारवंतांनी समाजाविषयींची आपली मते सांगितली हे खरे. पण त्यांनी वस्तुनिष्ठ दृष्टिकोण ठेवून समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास केला नाही. समाजाचे पद्धतशीरपणे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्याचे प्रयत्न करावयास पाश्चात्य विचारवंतांनी साधारणपणे इसवी सनाच्या एकोणीसाव्या शतकापासून सुरवात केली व त्यावेळी खऱ्या अर्थाने ' समाजशास्त्रा'चा उदय झाला. युरोपमधील त्यावेळची बौद्धिक व आर्थिक परिस्थिती समाजाचा अशा रीतीने अभ्यास करण्यास कारणीभूत झाली. अठराव्या शतकापर्यंत युरोपमध्ये सर्व क्षेत्रांत धर्मशासनाचे ( Church ) अतोनात वर्चस्व होते. बौद्धिक क्षेत्रात हे वर्चस्व झुगारून देऊन असलेले सर्व ज्ञान वस्तुनिष्ठ स्वरूपात संकलन करून लोकांच्या पुढे ठेवण्याचे महान कार्य युरोपमधील प्रसिद्ध विचारवंतांनी केले. त्यांच्या सहयोगाने फ्रान्समध्ये इसवी सनाच्या १७५१ ते १७८० च्या दरम्यान "विश्वकोशा"चे खंड प्रसिद्ध झाल्यापासून समाजाच्या स्वरूपाविषयी शास्त्रीय दृष्टिकोणातून चर्चा होऊ लागली. तसेच त्यावेळची युरोपातील आर्थिक परिस्थिती देखील समाजाच्या वस्तुनिष्ठ अभ्यासास साहाय्यभूत झाली. अठराव्या व एकोणीसाव्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीचे आर्थिक जीवनाबरोबर सामाजिक जीवनावरही अभूतपूर्व व दूरगामी परिणाम होऊ लागले. सामाजिक संस्थांच्या स्वरूपात व कार्यात होणारे बदल तीव्रतेने जाणवू लागले. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या सामाजिक घडामोडीचे सम्यक् आकलन करून घेण्यास विचारवंत व तत्त्वज्ञ प्रवृत्त झाले असल्यास नवल नाही. त्याशिवाय, कोणत्याही विषयाचा अभ्यास करण्यासाठी शास्त्रीय अगर वस्तुनिष्ठ पद्धत उपयोगात आणून नैसर्गिक विज्ञानांनी बरीच प्रगती साधलेली त्यावेळी दिसत होती. त्या पद्धतीचा सामाजिक घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी उपयोग करावा असे विचारवंतांना वाटत होते. तेव्हा ज्याला इंग्रजीत "*The Enlightenment*" म्हणजे "बौद्धिक पुनरुज्जीवनाचे युग" असे म्हणतात, त्या युगामध्ये समाजशास्त्राचा जन्म झाला व फ्रेंच तत्त्वज्ञ **आगुस्त काँत** याने १८३९ साली समाजशास्त्र हे स्वतंत्र विज्ञान आहे असे प्रथम प्रतिपादन केले. म्हणून काँतला समाजशास्त्राचा जनक असे म्हणतात.

व्याख्या केली आहे. अगदी साध्या अवस्थेपासून अतिशय संकीर्ण अवस्थेपर्यंत होणाऱ्या बदलाच्या प्रक्रियेला विकासवादाचे तत्त्व असे म्हणतात आणि स्पेन्सरने असे आग्रहाने प्रतिपादन केले की हे तत्त्व सर्व क्षेत्रांमध्ये दृष्टोत्पत्तीस येते. सामाजिक विकासवाद हा त्याचाच एक भाग आहे. समाजाची अवस्था देखील अशाच क्रमाने संकीर्ण होत असते. इतकेच नव्हे तर विवाह, मालमत्ता, धर्म यांसारख्या सामाजिक संस्थांची वाढ सुद्धा याच विकासवादाच्या तत्त्वानुसार झाली आहे. म्हणून विकासवाद हा जीवनाचा स्थायीभाव असून विकास होणे म्हणजे प्रगती होय असे समीकरण स्पेन्सरने मांडले. हा सामाजिक विकासवादाचा सिद्धान्त हल्ली विद्वानांना मान्य नसला तरी बराच काळ तो ग्राह्य मानला जात होता.

विकासवादाच्या तत्त्वाला धरून प्राण्यांच्या वर्गीकरणाप्रमाणे समाजांचे वर्गीकरण स्पेन्सरने केले. साधा ( simple ), संयुक्त ( compound ), दुप्पट संयुक्त (doubly compound) आणि तिप्पट संयुक्त (trebly compound) असे समाजांचे चार वर्ग प्रथम स्पेन्सरने पाडले आणि प्रत्येक वर्गामध्ये भेद व उपभेद आहेत असे दाखवून दिले. नंतर स्पेन्सरने समाजांची युयुत्सु किंवा लढाऊ ( the militant ) आणि औद्योगिक ( the industrial ) अशा दोन प्रकारांत विभागणी केली आणि लढाऊ समाजांतून औद्योगिक समाजांचा विकास झाला असे प्रतिपादन केले. शिवाय, स्पेन्सरने जीवशास्त्रातील दाखले देऊन सामाजिक जीवनाची चर्चा केली. त्याने रचना, कार्य आदी बाबतीत समाजाचे शरीराशी कसे साम्य आहे हे दाखवून दिले.

स्पेन्सरची वरील मते आता टाकाऊ ठरली आहेत. परंतु त्यामुळे समाजशास्त्राच्या इतिहासात स्पेन्सरचे महत्त्व कमी होत नाही. कारण विकासवादाच्या देणगीबरोबर इतरही काही विचार स्पेन्सरने दिले. स्पेन्सरपासून समाजशास्त्राचे तत्त्वज्ञानविषयक अगर ऐतिहासिक अभ्यासाचे स्वरूप जाऊन वर्णनात्मक आणि पद्धतशीर अभ्यासाचे स्वरूप आले. स्पेन्सरच्या प्रेरणेमुळे पुढील लिखाणांतून समाजाची रचना व कार्ये या विषयांना प्राधान्य देण्यात येऊ लागले. मानवजातिविज्ञानातील माहिती ( ethnological data ) आणि तौलनिक अभ्यासपद्धती ( comparative method ) यांचा वापर करण्याची स्पेन्सरने सुरू केलेली प्रथा पुढे दृढमूल झाली. सारांश, स्पेन्सरचा प्रभाव फक्त इंग्लंडमधील नव्हे तर फ्रान्स, जर्मनी व अमेरिका यांमधील समाजशास्त्रज्ञांवर पडला होता.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नों. दि: ........................



## एमिल डुरखाइम ( १८५८ - १९१७ ):

इंग्लंडप्रमाणे फ्रान्समध्येही समाजशास्त्राची वाढ होत होती. परंतु या वाढीला अगदी नवीन वळण लावण्याचे कार्य फ्रेंच विचारवंत एमिल डुरखाइम याने केले. त्याने इतर सामाजिक विज्ञानांहून समाजशास्त्र कसे भिन्न आहे हे दाखवून दिले आणि समाजशास्त्राच्या सैद्धान्तिक विकासाला ( theoretical development ) मोठा हातभार लावला. या क्षेत्रातील त्याची विशेष कामगिरी म्हणजे सामाजिक वस्तु अगर घटना ( social facts ) यांच्या अभ्यासाला त्याने दिलेले महत्त्व हे होय. सामाजिक वस्तूंच्या अभ्यासालाच डुरखाइम समाजशास्त्र म्हणत असे. इतर शास्त्रांत जसा वस्तूंचा ( things ) अभ्यास करतात तसा सामाजिक वस्तूंचा अभ्यास समाजशास्त्राने केला पाहिजे असा त्याचा आग्रह होता. सामाजिक वस्तूच्या अभ्यासाचा उत्कृष्ट नमुना म्हणून त्याने केलेले आत्महत्येचे विवेचन दाखविता येईल. तसेच समाजातील सर्वसामान्य मूल्यांचा ( common values of a society ) अभ्यास करण्यावर देखील त्याने विशेष भर दिला. लोकांच्या चालीरीती व नियम यावरून त्या समाजाच्या मूल्यांची कल्पना येते म्हणून त्या चालीरीती व नियम यांवर आधारलेल्या सामाजिक संस्थांचे संशोधन केले पाहिजे असे त्याने आग्रहाने प्रतिपादन केले.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात अगदी धीमेपणाने चाललेल्या समाजशास्त्रीय अभ्यासाला विसाव्या शतकात फार जोराची चालना मिळाली. या शतकातील दोन महायुद्धांचे विविध देशांतील समाजांवर दूरगामी परिणाम झाले. शिवाय लोकसंख्या, उद्योगीकरण, तंत्रज्ञान, शहरात राहण्याची प्रवृत्ती व नवीन विचारप्रवाह यांची वाढ होऊ लागल्याने वेगवेगळे सामाजिक प्रश्न निर्माण झाले. साहजिकच या सामाजिक घडामोडींचा अभ्यास सर्वत्र होऊ लागला. परंतु सर्व देशांत या अभ्यासांचे स्वरूप सारखे राहिले नाही. काही प्रमुख देशांच्या समाजशास्त्रीय अभ्यासांच्या प्रगतीवरून हे दिसून येईल.

## समाजशास्त्रीय अभ्यास : जर्मनी

विसाव्या शतकाच्या सुरवातीलाच समाजशास्त्राच्या क्षेत्रात जर्मनीमध्ये दोन परंपरा निर्माण झाल्या आणि या दोन परंपरांमधूनच बृहत् समाजशास्त्र ( macro sociology ) व सूक्ष्म समाजशास्त्र ( micro sociology ) अशी समाजशास्त्राची विभागणी करण्याची नवीन प्रवृत्ती वाढीस लागली. ऐतिहासिक दृष्टिकोणातून समाजशास्त्राचा अभ्यास करण्यावर पहिली परंपरा

भर देते. त्यामुळे कार्ल मार्क्सचा बराच प्रभाव या परंपरेवर पडला आहे. अलीकडे मात्र शहरातील उद्योगधंद्यांवर आधारलेल्या समाजाच्या ( urban industrial society ) अभ्यासावर विशेष लक्ष केंद्रित केले जाते. **मॅक्स वेबर** ( १८६४ – १९२० ) याला या परंपरेचे प्रमुख प्रतिनिधी समजण्यात येते. भांडवलशाहीचे स्वरूप, तिच्या स्थापनेची व विकासाची प्रमुख कारणे, आणि विशेषत: समाजातील धार्मिक समजुती व समाज-अर्थ–रचना ( socio-economic structure ) यांचा परस्पर-संबंध इत्यादी भांडवलशाहीविषयक महत्त्वाच्या प्रश्नांची वेबरने केलेली मूलग्राही चर्चा ऐतिहासिक दृष्टिकोणातून केलेल्या समाजशास्त्राच्या अभ्यासामध्ये आदर्श ठरली आहे. तसेच, समाजशास्त्राच्या अभ्यासाच्या रीतिविधानामध्ये ( methodology ) वेबरने मोलाची भर घातली. इतिहास व मानसशास्त्र याहून समाजशास्त्र भिन्न असले तरी समाजशास्त्राने त्या विषयांशी संबंध ठेवले पाहिजेत असे त्याने आग्रहाने प्रतिपादन केले. वेबरच्या या मताचा, आणि विशेषत: समाजशास्त्र व मानसशास्त्र यांचे घनिष्ठ संबंध प्रस्थापित करण्याचा, पाठपुरावा **टालकट पार्सन्स** यासारखे प्रसिद्ध आधुनिक समाजशास्त्रज्ञ करीत आहेत.

समाजशास्त्रीय अभ्यासाची दुसरी परंपरा त्या मानाने लहान प्रमाणावरील अभ्यासांना प्राधान्य देते, परंतु तो अभ्यास जास्ती विश्लेषणात्मक असावा यावर भर देते. सामाजिक समूहांचे प्रकार व त्यातील भिन्न तऱ्हेचे सामाजिक संबंध यांचा विशेष अभ्यास या परंपरेत केला जातो. **जार्ज सिमेल** (१८५८ – १९१८) हा या परंपरेचा प्रमुख पुरस्कर्ता होय. अन्योन्य स्वरूपाचे संबंध, लहान समूहात आढळून येणारे विविध तऱ्हेचे संबंध, श्रेष्ठ आणि कनिष्ठ यांमध्ये असणारे विविध प्रकारचे संबंध इत्यादी संबंधविषयक बाबींचे त्याने बारकाईने विश्लेषण केले. तसेच निरनिराळ्या प्रकारच्या संघर्षांचे तुलनात्मक विवेचन केले. एकूण समाजशास्त्राच्या सैद्धान्तिक बाजूची प्रगती जर्मनीमध्ये विशेष प्रमाणात झाली.

## समाजशास्त्रीय अभ्यास : अमेरिका

इतर देशांप्रमाणे अमेरिकेत देखील समाजशास्त्राच्या अभ्यासावर विकास–वादाच्या सिद्धान्ताचा प्रभाव पडला होता. **मॉर्गन, वॉर्ड, सम्नर, गिडिंग्ज** इत्यादी समाजशास्त्रज्ञांचे लिखाण संकलनात्मक व मुख्यत: विकासवादावर आधारलेले होते. परंतु लवकरच विकासवादाविरूद्ध प्रतिक्रिया दिसून येऊ लागली आणि हळहळू सामाजिक जीवनाच्या वेगवेगळ्या अंगांचा अभ्यास करण्यावर समाजशास्त्रज्ञ भर देऊ लागले. शहरामध्ये राहण्याच्या प्रवृत्तीचे आणि मोठ्या शहरातील जीवनाचे

विवेचन करण्यामध्ये अमेरिकेत पुष्कळ प्रगती झाली. शहरांप्रमाण लहान गावाचा अभ्यास देखील सूक्ष्मपणे झाला. परदेशांतून येऊन स्थायिक झालेल्यांची संख्या अमेरिकेत फार मोठी असल्याने सहाजिकच त्यांचा अभ्यास समाजशास्त्रज्ञांनी मोठ्या प्रमाणावर व विविध दृष्टिकोणांतून केला. तसेच गुन्हेगारी, वर्गविग्रह, कुटुंबरचना, वांशिक भेद आदी विशिष्ट विषयांवर भरपूर माहितीच्या आधारे संशोधन करण्यात आले. अलीकडे संस्कृतीचा व लोकमताचा साकल्याने अभ्यास करण्याकडे समाजशास्त्रज्ञांचा कल झुकू लागला आहे.

विवक्षित सामाजिक परिस्थितींचा व अंगांचा अभ्यास गेल्या २५–३० वर्षांत विपुल प्रमाणात झाला. पण त्याचबरोबर समाजशास्त्राच्या सिद्धान्तांची विशेष् चर्चा करून सामाजिक विज्ञानांना व्यवस्थित स्वरूप देण्याचे महत्त्वाचे काय अमेरिकेच्या **मॅकायव्हर, सोरोकिन, पार्सन्स व मर्टन** यांसारख्या समाजशास्त्रातील अधिकारी व्यक्तींनी केले आहे. समाजशास्त्राच्या सिद्धातांमध्ये या समकालीन प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञांनी मोलाची भर घातली आहे.

## समाजशास्त्रीय अभ्यास : इंग्लंड

इंग्लंडमध्ये **स्पेन्सर** व **हॉबहाऊस** यांची विकासवादावर आधारलेली समाज–शास्त्रीय अभ्यासाची परंपरा चालू असतानाच समाजसुधारक करीत असलेल्या सामाजिक अभ्यासाच्या ( social studies ) कामांची प्रगती होत होती. अशा अभ्यासांमध्ये मुख्यत: गरीबीविषयक ( poverty ) प्रश्नांची पाहणी ( survey ) विविध दृष्टिकोणांतून करण्यात आली. या पाहणीतून समाजशास्त्रीय सिद्धान्त जरी फारसे मिळू शकले नाहीत तरी त्यातून संशोधनाच्या तंत्रांची ( techniques of research ) मात्र वाढ झाली. विशेषत: अनुभवावर ( empiricism ) आधा–रलेल्या सिद्धान्तांनाच महत्त्व देण्यात येऊ लागले.

तसेच, इंग्लंडमध्ये सामाजिक मानवशास्त्राच्या ( Social Anthropo–logy ) अभ्यासात बरीच प्रगती झाली होती. त्याचा परिणाम समाजशास्त्रीय अभ्यासावर झाला. विशेषत: **मॅलिनोस्की** व **रॅड्क्लिफ–ब्राऊन** या प्रसिद्ध सामाजिक मानवशास्त्रज्ञांनी केलेल्या विविव जमातींच्या अभ्यासामुळे समाजशास्त्रीय अभ्यासाला एक वेगळे वळण लागले. त्यातूनच " सामाजिक रचना " ( social structure ) आणि " सामाजिक व्यवस्था " ( social system ) या प्रचलित

समाजशास्त्रीय संकल्पना ( sociological concepts ) निर्माण झाल्या आणि या संकल्पनांचा परिपोष करणारे लिखाण सध्या इंग्लंडमध्ये होत आहे. अमेरिकेतही या संकल्पनांचा प्रभाव पडला असून गेल्या १५–२० वर्षांपासून समाजशास्त्रीय संशोधनांमध्ये दोन देशांतील सहकार्य वाढले आहे.

## समाजशास्त्रीय अभ्यास भारत

सामाजिक विषयांसंबंधी लेखन करण्याची प्रथा भारतात फार जुनी आहे. परंतु त्यांचा पद्धतशीर अभ्यास व संशोधन होत नव्हते. मुंबई विद्यापीठाने १९१९ साली नगर नियोजनाचे गाढे अभ्यासक **प्रो. पेट्रिक गेडिस** यांच्या नेतृत्वाखाली पदव्युत्तर शिक्षणक्रम देण्यासाठी स्वतंत्र समाजशास्त्राच्या विभागाची स्थापना केली. तेव्हापासून समाजशास्त्राच्या अभ्यासाला भारतात सुरवात झाली. पण त्याला मूर्त स्वरूप व मानाचे स्थान मिळवून देण्याचे महत्त्वाचे कार्य १९२४ ते १९५९ पर्यंत त्या विभागाचे प्रमुख प्राध्यापक **डॉ. गो. स. धुर्ये** यांनी केले. मौलिक संशोधन, प्रभावी अध्यापन व विविध विषयावर विपुल लेखन करून डॉ. धुर्ये यांनी समाजशास्त्रीय अभ्यासाला फार मोठी चालना दिली. त्याचा परिणाम म्हणून लखनौ व कलकत्ता विद्यापीठात समाजशास्त्राच्या अभ्यासाला महत्त्व देण्यात येऊ लागले. स्वातंत्र्योत्तर काळात मात्र २५ च्या वर विद्यापीठांनी समाजशास्त्राचे स्वतंत्र विभाग सुरू केल्याने अशा अभ्यासांची प्रगती होत आहे. पाश्चात्त्य देशांच्या मानाने या संबंधात भारत जरी मागे असला तरी ज्ञातिसंस्था, धर्मसंस्था, संस्कार, सामाजिक चालीरीती आदी विषयांचा भारतात विशेष अभ्यास झाला आहे. नियोजनाच्या काळात समाजशास्त्रीय अभ्यासांना सरकारने उत्तेजन द्यावयास सुरवात केली आहे.

## २. *समाजशास्त्राचे उद्देश व उपयुक्तता*

समाजशास्त्राच्या इतिहासाचा विचार करताना समाजशास्त्राचे उद्देश कोणते आहेत याची कल्पना असणे आवश्यक आहे. मानव समाजाचे आणि त्यातील व्यक्तींच्या परस्परसंबंधांचे यथार्थ व पूर्ण आकलन करून घेण्याचा प्रयत्न करणे हा समाजशास्त्राच्या अभ्यासाचा प्रमुख उद्देश आहे. मनुष्याच्या सामूहिक जीवनामध्ये घडणाऱ्या गोष्टींच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करीत असताना कोणत्या गोष्टी घडतात व त्या तशा का घडतात याचे ज्ञान संपादन केले म्हणजे समाजाचे सम्यक् आकलन होण्यास मदत होते. समाजाच्या कोणत्याही क्षेत्रामध्ये काय खरी वस्तु-

स्थिती आहे, त्या वस्तुस्थितीमध्ये कशा रीतीने बदल होत आहे आणि या बदलां- मधून पुढे काय निष्पन्न होण्याचा संभव आहे याचे सविस्तर विवेचन करणे समाज- शास्त्राच्या अभ्यासात अभिप्रेत आहे. विविध सामाजिक घटना व संस्था यांचा या दृष्टिकोणातून अभ्यास करून त्यांच्या भावी काळातील स्वरूपाविषयी अंदाज केले पाहिजेत. एखाद्या समाजाच्या लोकसंख्येच्या विविध बाबींची पूर्वीची व आजची परिस्थिती तपासून पुढील काळात त्या समाजाची लोकसंख्या वाढेल, की कमी होईल, की स्थिर राहील आणि त्याचे समाजजीवनावर काय परिणाम होतील याची चर्चा समाजशास्त्रज्ञ करीत असतात. कुटुंबसंस्थेचा विचार करताना विवाह बालसंगोपन, संघटना आदी संबंधित विषयांचा समग्र उहापोह करून त्या संस्थेच्या भवितव्याबद्दलचे आपले निष्कर्ष समाजशास्त्रज्ञ मांडीत असतात. अशा रीतीने समाजाच्या वेगवेगळ्या अंगांचा संपूर्ण व वस्तुनिष्ठ परिचय करून देणे हे समाज- शास्त्राचे विशेष प्रयोजन आहे.

समाजाचे या स्वरूपात आकलन होणे समाजाच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. माणसे एकमेकांशी कशी वागतात याची यथार्थ कल्पना आली म्हणजे त्यांच्या वर्तनावर व्यवस्थित नियंत्रण ठेवून समाजाचे कोण- तेही उद्दिष्ट साध्य करून घेणे सोपे जाते. सामाजिक संबंधांचे खरे स्वरूप कळाले की युद्ध, गुन्हेगारी, वर्गविग्रह, वांशिक तेढ, कौटुंबिक असमाधान इत्यादी प्रचलित सामाजिक समस्या सोडविण्याचे मार्ग सापडतात. सामाजिक प्रक्रियांच्या योग्य माहितीच्या आधारावर समाजाची सुधारणा अगर पुनर्रचना करण्याचे ध्येय गाठता येते. तसेच व्यावहारिक दृष्टिकोणातून देखील समाजविषयक शास्त्रीय ज्ञान उपयोगी पडते. समाजकल्याण, जनतासंपर्क, विज्ञापन ( advertisement ), विक्रयकला ( salesmanship ), कर्मचारीवर्गनियंत्रण ( personnel management ), इत्यादी लोकांशी संबंध येणाऱ्या कार्यांमध्ये सफलता प्राप्त करून घेण्यासाठी समाजाचे आकलन होणे अगदी जरूरीचे आहे. ज्याप्रमाणे पदार्थ- विज्ञानशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र इत्यादी भौतिक शास्त्रांतील ज्ञानाचा बांधकाम, उद्योगधंदे, औषधोपचार इत्यादी क्षेत्रांतील समस्या सोडविण्यासाठी उपयोग होतो त्याप्रमाणे समाजातील अंतरक्रिया व परस्परसंबंध यांच्या ज्ञानाने गुंतागुंतीच्या सामाजिक प्रश्नांची उकल होते. साहजिकच त्यामुळे मानवाचे समाधान वाढविण्यास मदत होते.

समाजाचे वस्तुनिष्ठ स्वरूपात यथार्थ आकलन करून घेणे हा समाजशास्त्राचा प्रमुख उद्देश महत्त्वपूर्ण व उपयुक्त असला तरी तो पुरेसा आहे की नाही याविषयी

समाजशास्त्रज्ञांमध्ये विचार चालू आहे. त्यामध्ये दोन भिन्न विचारप्रवाह स्पष्ट दिसून येतात. काही समाजशास्त्रज्ञांचे असे मत आहे की मानवाच्या सामूहिक जीवनाची यथातथ्य व संपूर्ण माहिती उपलब्ध करून देणे हाच समाजशास्त्राचा मुख्य हेतु आहे. त्या माहितीचा सामाजिक धोरण ( social policy ) आणि सामाजिक नियोजन (social planning) ठरविण्याच्या कामी कसा उपयोग करून घ्यावयाचा हे काम समाजशास्त्रज्ञांनी करावयाचे नसून समाजसुधारक अगर सामाजिक कार्यकर्ते यांनी ते केले पाहिजे. या मताशी अलीकडील समाजशास्त्रज्ञ सहमत नाहीत. त्यांची अशी विचारसरणी आहे की समाजाचे नुसते वस्तुनिष्ठ ज्ञान मिळवून भागणार नाही तर त्या ज्ञानाच्या आधारावर समाजशास्त्रज्ञांनी विधायक स्वरूपाचे समाज नियंत्रणाचे धोरण स्वतः ठरवून दिले पाहिजे किंवा ते ठरविण्यास इतरांना मदत केली पाहिजे. याचा अर्थ असा की समाजशास्त्राच्या उद्देशाची कक्षा समाजाच्या आकलनापुरती मर्यादित न ठेवता ती वाढविली पाहिजे आणि समाजविषयक ज्ञानाचा उपयोग करून सामाजिक घटनांवर सर्वांच्या सहकार्याने नियंत्रण ठेवणे ( co-operative control of societal phenomena) हे समाजशास्त्राचे दुसरे उद्दिष्ट समजले पाहिजे. हे उद्दिष्ट मान्य करण्याकडे समाजशास्त्रज्ञांचा कल दिसून येत आहे आणि हल्लीची परिस्थितीही त्याला कारणीभूत झाली आहे. ज्यावेळी समाजाच्या विविध अंगांविषयी अत्यंत अपुरी, अविश्वासार्ह व त्रोटक माहिती उपलब्ध होती त्यावेळी समाजाची यथार्थ कल्पना येण्यासाठी समाजजीवनाविषयी वस्तुनिष्ठ दृष्टिकोणातून विस्तृत माहिती एकत्रित करणे आवश्यक होते. म्हणून समाजाचे यथार्थ आकलन करून घेण्याचे ध्येय समाजशास्त्राने आपल्यापुढे ठेवणे योग्य होते. परंतु गेल्या २५-३० वर्षांत परिस्थिती बरीच बदलली आहे. वेगवेगळ्या देशांतील समाजशास्त्रज्ञांच्या अविरत परिश्रमांनी समाजजीवनाच्या विविध भागांविषयी पूर्वग्रह-विरहित, विश्वासार्ह व भरपूर माहिती वस्तुनिष्ठ स्वरूपात उपलब्ध झालेली आहे व नवीन माहिती मिळविण्याचे प्रयत्न चालू आहेत. आता सामाजिक समस्या (social problems) सोडविण्यासाठी या माहितीचा उपयोग करून घेण्याची वेळ आली आहे. पहिले कारण असे की सामाजिक समस्या दिवसे दिवस उग्र स्वरूप धारण करू लागल्या आहेत आणि दुसरे म्हणजे दोन महायुद्धानंतर साऱ्या मानवी समाजाचे भवितव्य काय होईल याची चिंता विचारवंतांना लागली आहे. अशा परिस्थितीत आपल्या समाजविषयक ज्ञानाचा विधायक उपयोग करण्याची वेळ आली आहे म्हणून सामाजिक घटनांवर नियंत्रण ठेवण्याचे समाजशास्त्राचे दुसरे उद्दिष्ट मान्य होऊ लागले आहे.

एकमेकांच्या सहयोगाने सामाजिक घटनांवर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्व सर्वांना आता पटू लागले आहे. जीवनविषयक बाह्य परिस्थिती अलीकडे बदलली आहे. माणसाचे सामुदायिक जीवन हे त्याच्या व्यक्तिगत जीवनाइतके महत्त्वाचे झाले आहे. व्यापार, उद्योगधंदे, शासनव्यवस्था आदी जीवनाच्या मुख्य क्षेत्रांमध्ये सहकारीवृत्तीने कार्य करण्याची प्रवृत्ती दिसून येत आहे. ही प्रवृत्ती इतर क्षेत्रांमध्ये वाढवून सामाजिक घटनांचे नियंत्रण देखील सहकाराच्या दृष्टिकोणातून व्हावे अशी समाजशास्त्राची विचारसरणी आहे. याचा अर्थ असा की समाजापुढील प्रचलित समस्या सोडविण्याचे प्रयत्न सर्वांच्या संमतीने नियंत्रण ठेवून व्हावेत. नियंत्रणाची ही कल्पना मान्य होऊ लागल्याने अनेक व्यक्ती व संस्था सामाजिक धोरणांविषयीची आपापली मते आग्रहाने प्रतिपादू लागली आहेत आणि नेमका यातच समाजाच्या दृष्टीने धोका आहे. कारण व्यक्ती अगर संस्था यानी सुचविलेले समाजनियंत्रणाचे कार्यक्रम प्रचलित सामाजिक परिस्थितीचे अज्ञान, एकांगीपणा आणि पूर्वग्रह यांवर आधारलेले असण्याचा संभव असतो. समाजनियंत्रणामध्ये येणारे हे दोष समाजशास्त्रज्ञांनी दूर केले पाहिजेत आणि त्यांना ते अगदी शक्य आहे. कारण समाजजीवनाच्या अभ्यासाचा त्यांचा दृष्टीकोण वस्तुनिष्ठ व सत्य शोधण्याच्या स्वरूपाचा असतो. तेव्हा सामाजिक नियंत्रणाच्या कार्यक्रमामध्ये सुसूत्रता व एकवाक्यता यावी म्हणून सामाजिक घटनांच्या नियोजनाचे मार्ग सुचविणे हा समाजशास्त्राचा दुसरा उद्देश झाला आहे. हा उद्देश हल्लीच्या परिस्थितीत महत्त्वाचा असला तरी तो पहिल्या उद्देशाच्या मानाने गौण आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. समाजाचे आणि त्यातील व्यक्तींच्या परस्परसंबंधांचे यथार्थ आकलन झाल्याखेरीज सामाजिक घटनांवरील नियंत्रणाचे उपायच सांगता येणार नाहीत हे उघड आहे.

सामाजिक जीवनाच्या विविध अंगांचे सम्यक् आकलन होणे हे समाजाच्या दृष्टीने जितके हितावह आहे तितकेच ते समाजशास्त्राच्या अभ्यासकांना उपयुक्त आहे. समाजात काय वस्तुस्थिती आहे याची कल्पना आली म्हणजे मगच समाजात काय असावयास हवे हे ठरविण्याची त्यांच्यामध्ये पात्रता येते. त्याशिवाय आपला धर्म, चालीरीती, नीतिकल्पना, सामाजिक संस्था इत्यादी त्यांच्यांशी निगडित असलेल्या समाजजीवनाच्या अंगांकडे सयुक्तिक अगर सप्रमाण दृष्टिकोणातून (rational approach) बघण्याचे अवघड शिक्षण मिळते. त्यांची विचारसरणी व्यक्तिनिरपेक्ष, आलोचनात्मक व वस्तुनिष्ठ स्वरूपाची होते. समाजशास्त्राच्या अभ्यासापासून मिळणारी ही दृष्टी फार मोलाची आहे.

## ३. समाजशास्त्रीय अभ्यासाची निष्पत्ती

समाजशास्त्राच्या अभ्यासास साधारणपणे एक शतकापूर्वी सुरवात झाली व गेल्या ५०–६० वर्षांत समाजशास्त्राच्या अभ्यासाला सर्वत्र बरीच चालना मिळाली. साहजिकच असा प्रश्न उद्भवतो की समाजशास्त्राच्या अभ्यासामुळे आतापर्यंत काय विशेष निष्पन्न झाले आहे आणि पुढील काळात या अभ्यासापासून काय अपेक्षा आहेत ?

समाजशास्त्राच्या अभ्यासाच्या परिणामांचा विचार करताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की प्रचलित समाजाच्या संमिश्र संस्कृतीमध्ये कोणतीही सामाजिक परिस्थिती ( social situation ) एखाद्या विशिष्ट कारणाने निर्माण होत नसून बहुविध कारणांनी ती घडून येत असते. त्यामुळे हल्लीच्या समाजजीवनामध्ये दिसून येणारा एखादा विवक्षित बदल हा केवळ समाजशास्त्राच्या अभ्यासाचाच परिणाम आहे असे म्हणता येणार नाही. अर्थात इतर बाबींबरोबर समाजशास्त्राचा अभ्यास त्या बदलास कारणीभूत झाला असेल हे खरे. तेव्हा समाजशास्त्राच्या अभ्यासामुळे झालेले बदल पहावयाचे म्हणजे इतर काही कारणांमुळे होणाऱ्या सामाजिक परिस्थितीच्या बदलांमध्ये समाजशास्त्राच्या अभ्यासाने कितपत हातभार लावला हे पाहिले पाहिजे.

मनुष्य प्राण्याच्या पात्रतेवर विशेष भर देण्याचे महत्त्वाचे कार्य समाजशास्त्राने केले ही समाजशास्त्राच्या अभ्यासाची पहिली उल्लेखनीय निष्पत्ती होय. मनुष्य प्राण्याकडे बघण्याच्या दृष्टीकोणात अलीकडे वैशिष्टचपूर्ण बदल झाला आहे. पूर्वी वंश, जात, धर्म, वर्ग, पैसा, देश इत्यादी बाबींवरून माणसाची योग्यता ठरविली जात असे आता या बाबींवर मनुष्याची पात्रता अवलंबून असत नाही. इतकेच नव्हे तर सर्व माणसांमध्ये एक प्रकारची समान योग्यता आहे असे मान्य करण्याकडे लोकांची प्रवृत्ती दिसून येते. प्रत्येक व्यक्तीला माणूस म्हणून किंमत आहे हे तत्त्व लोकशाही राज्यव्यवस्थेने अमलात आणले आहे. मनुष्याकडे बघण्याच्या दृष्टीकोणात झालेल्या या मूलभूत बदलाची वाढ होण्यास समाजशास्त्राने फार मोलाची भर घातली आहे. मानववंशाविषयी केलेल्या विस्तृत अभ्यासावरून समाजशास्त्राने असे स्पष्टपणे दाखवून दिले आहे की मानवाच्या वंशाचा (race) त्याची बुद्धीमत्ता, नीतिकल्पना, आचार व विचारसरणी, संस्कृती इत्यादी बाबींशी कसलाही संबंध नाही; म्हणून मनुष्याचे श्रेष्ठत्व त्याच्या वंशावर अवलंबून असत नाही. मनुष्याची ज्ञाती (caste) आणि वर्ग (class) यांचा अभ्यास करून समाजशास्त्राने याच स्वरूपाचे निष्कर्ष काढले आहेत.

प्रचलित सामाजिक समस्या व त्या सोडविण्याचे उपाय याविषयी लोकांचा दृष्टिकोण अलीकडे पार बदलून गेला आहे. समाजशास्त्राच्या वाढत्या अभ्यासाचे हे दुसरे फळ आहे. समस्यांचे वस्तुनिष्ठ स्वरूपात विश्लेषण करून त्या नाहीशा करण्याचे मार्ग सुचविण्यास समाजशास्त्राने सुरवात केली व हळूहळू त्याचा उपयोग होऊ लागला. समाजातील गुन्हेगार व त्यांचे गुन्हे याविषयी संशोधन करून लोक गुन्हे करण्यास का व कसे प्रवृत्त होतात हे समाजशास्त्राने प्रथम दाखवून दिले आणि गुन्हेगारांबद्दलच्या पूर्वीच्या कल्पना बदलून टाकल्या. अशा समाजशास्त्रीय संशोधनांमुळे मिळालेल्या ज्ञानाच्या आधारावर समाजामध्ये गुन्ह्यांचे प्रमाण अगदी कमी करण्याच्या आणि गुन्हेगारांचे पुनर्वसन करण्याच्या विविध योजना अमलात आणण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. याच धर्तीवर इतर सामाजिक समस्यांची उकल करण्यास साहाय्यभूत होणारा अभ्यास समाजशास्त्रज्ञांनी केला आहे व त्याचा प्रत्यक्ष उपयोगही होत आहे. आधुनिक स्वरूपाच्या समाजकल्याणकार्याला जी सर्वत्र चालना मिळालेली दिसत आहे ती मुख्यतः समाजशास्त्रीय अभ्यासामुळेच होय.

देशाच्या साधनसंपत्तीमध्ये लोकांना महत्त्वाचे स्थान असते ही विचारसरणी मान्य होण्यास समाजशास्त्राने विशेष मदत केली ही समाजशास्त्राच्या अभ्यासाची तिसरी प्रमुख निष्पत्ती होय. समाजशास्त्राच्या अभ्यासामुळे लोकांना हे पटू लागले आहे की देशाच्या साधनसंपत्तीचा विचार करताना नैसर्गिक साधनसामुग्रीबरोबर त्या देशातील मनुष्यबळाचाही विचार केला पाहिजे. कोणत्याही देशाची संपत्ती त्या देशात असणाऱ्या पैशावर अवलंबून असते ही जुनी कल्पना आता मागे पडत असून त्याजागी मनुष्यबळ व त्याची कार्यक्षमता याच गोष्टीवर कोणत्याही देशाची संपत्ती बव्हंशी ठरत असते ही कल्पना दृढमूल होऊ लागली आहे. राष्ट्राने जर लोकांची कार्यक्षमता वाढविण्याचा प्रयत्न केला नाही तर तो मोठा दोष समजण्यात येतो. हल्लीच्या विचारसरणीमध्ये मनुष्यबळाला महत्त्व समाजशास्त्रीय अभ्यासामुळेच येऊ लागले आहे.

समाजशास्त्रीय अभ्यासाची चौथी व सर्वांत महत्त्वाची निष्पत्ती जगात दिसून येणाऱ्या विविध भेदांच्या स्वरूपाविषयीची आहे. भाषा, रीतिरिवाज, आचार इत्यादी गोष्टींवरून लोकांमध्ये निर्माण झालेले भेद शाश्वत व अपरिवर्तनीय आहेत अशी लोकांची समजूत होती. पण मानवसंस्कृतीच्या केलेल्या सखोल अभ्यासावरून समाजशास्त्राने असे पटवून दिले आहे की मानवाच्या सामूहिक जीवनाच्या पद्धतीमधून हे भेद निर्माण झाले असल्याने त्या जीवनाच्या परिस्थितीमध्ये योग्य बदल

करून ते भेद नाहीसे करता येणे शक्य आहे. तेव्हा भेदांना अवास्तव महत्त्व न देता ते नष्ट अगर कमी कसे करता येतील या गोष्टीवर लक्ष देणे आवश्यक आहे ही भूमिका अगर विचारसरणी समाजशास्त्रज्ञांनी पुढे मांडली. या भूमिकेप्रमाणे जर खरोखर प्रयत्न झाले तर जगातील बऱ्याच प्रचलित समस्या सोडविण्यास मदत होईल हे उघड आहे.

समाजशास्त्राच्या अभ्यासामुळे आतापर्यंत निष्पन्न झालेल्या या चार गोष्टींवर समाधान मानून चालणार नाही हे समाजशास्त्रज्ञांनी ओळखले आहे. कारण ही निष्पत्ती त्या मानाने थोडी असून तिचा म्हणावा तसा उपयोगही करून घेण्यात आलेला नाही. समाजातील घटनांचा याहून सविस्तरपणे अभ्यास करून त्या ज्ञानावर समाजाचे धोरण व नियोजन ठरविण्याच्या बाबतीत अजूनही बरेच कार्य करता येण्यासारखे आहे आणि त्या दृष्टीने समाजशास्त्रज्ञांचे प्रयत्न चालू आहेत. समाजशास्त्राच्या अभ्यासामुळे मानव समाजाचे आकलन होण्यामध्ये बरीच मजल मारली असली तरी समाजशास्त्राचे उद्देश अजून पूर्णतः सफळ झाले नाहीत याची समाजशास्त्राच्या अभ्यासकांना जाणीव आहे.

# ३

# समाजशास्त्र व विज्ञान

## १. *समाजशास्त्राचे वैज्ञानिक स्वरूप*

समाजशास्त्राच्या स्वरूपाविषयी विचार करताना “ मानव समाजाचा आणि विशेषत: मानवांच्या परस्पर-संबंधांचा किंवा मनुष्याच्या इतर मनुष्यांशी होणाऱ्या वर्तनाचा अभ्यास करणारे विज्ञान ते समाजशास्त्र होय ” अशी समाजशास्त्राची व्याख्या आपण केली. आता समाजशास्त्र हे कशा प्रकारचे विज्ञान आहे हे पाहणे आवश्यक आहे. कारण त्याखेरीज समाजशास्त्रीय अभ्यासाची खरी कल्पना येणार नाही.

विज्ञानाच्या अनेक व्याख्या उपलब्ध आहेत. त्यापैकी विज्ञान करीत असलेल्या कार्यावरून **कार्ल पीअर्सन** यांनी आपल्या “ विज्ञानाचे व्याकरण ” ( Grammar of Science ) या ग्रंथात केलेली विज्ञानाची व्याख्या प्रसिद्ध आहे. “ घटनांचे वर्गीकरण करणे आणि त्यांचा क्रम व सापेक्ष महत्त्व जाणणे हे विज्ञानाचे कार्य आहे. ”[1]

---

1. “ The classification of facts, the recognition of their sequence and relative significance is the function of science.” – Karl Pearson.

या व्याख्येवरून हे दिसून येईल की विज्ञानाची कल्पना कोणत्याही एका क्षेत्रापुरती मर्यादित नाही. आपल्या भोवतालच्या घटना व्यवस्थित रीतीने जाणून घेण्याचा सुबुद्ध प्रयत्न ज्यात केला जातो त्याला विज्ञान म्हणतात. मग त्या घटना कोणत्या का असेनात. विविध क्षेत्रांतील घटनांमधील नियमितता ( regularities) शोधून काढून, त्यांचे परस्पर–संबंध प्रस्थापित करून त्या घटनांबद्दलचे आपले ज्ञान वाढ–विण्याचे काम विज्ञानात केले जाते. तेव्हा कोणत्या घटनांचा अभ्यास केला जातो यावर विज्ञान अवलंबून असत नाही तर कोणत्याही घटनांचा अभ्यास कशा रीतीने केला जातो यावर तो अभ्यास विज्ञान आहे की नाही हे ठरते. सामाजिक घटनांचे सुसंबद्ध निरीक्षण व वर्गीकरण करून त्यांचे कारणकार्यसंबंध व क्रम यावर आधारलेले सामान्य नियम वैज्ञानिक पद्धतीने प्रस्थापित करणे शक्य आहे आणि समाज–शास्त्राच्या अभ्यासात तेच कार्य केले जाते म्हणून समाजशास्त्र हे विज्ञान आहे.

विज्ञान हा शब्द फार व्यापक आहे. तेव्हा विज्ञानाचे स्वरूप कळण्यासाठी विज्ञानाचे बरेच भेद केले जातात उदाहरणार्थ, नैसर्गिक विज्ञान व सामाजिक विज्ञान. भौतिक क्षेत्रांतील वस्तूंचा किंवा घटनांचा अभ्यास करणारी पदार्थशास्त्र, रसायन-शास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणिशास्त्र अशासारखी शास्त्रे नैसर्गिक विज्ञानाच्या सदरात मोडतात. माणसे निसर्गाचाच एक भाग आहेत; परंतु ते समाजात एकत्र राहिल्याने त्यांचे परस्परांशी विविध तऱ्हेचे संबंध येतात. तेव्हा अशा मानवांच्या आंतरक्रियांचे (interactions) विवेचन करून त्या आधारे मानवाच्या समाजातील वर्तनाचे सामान्य नियम प्रतिपादन करणारी अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानवशास्त्र, सामाजिक मानसशास्त्र, यांसारखी शास्त्रे सामाजिक विज्ञानाच्या कक्षेत येतात. समाजशास्त्रा-मध्ये मानव समाजाचा आणि मानवांच्या परस्परसंबंधांचा विशेष अभ्यास करण्यात येतो म्हणून समाजशास्त्र हे एक सामाजिक विज्ञान आहे.

समाजशास्त्र हे विज्ञान असल्याने विज्ञानाची ठळक वैशिष्ट्ये समाजशास्त्रा–मध्ये कमीजास्त प्रमाणात दिसून येतात. (१) विज्ञान हे नेहमी अनुभवावर आधारलेले असते. दैवी शक्तींचा विचार न करता किंवा धार्मिक दृष्टिकोणातून न बघता प्रत्यक्ष निरीक्षणामुळे मिळालेल्या ज्ञानाचे विवेचन करून बसविलेले सामान्य नियम विज्ञानात सांगितले जातात. प्रत्यक्ष सामाजिक घटनांचा अशा रीतीने केलेला अभ्यास समाजशास्त्रात आढळतो म्हणून समाजशास्त्र हे अनुभवाश्रित (empirical) विज्ञान आहे. (२) विज्ञान हे सैद्धान्तिक असते. घटनांच्या कारणकार्य-संबंधांची चर्चा करून सर्वत्र आढळून येणारे सामान्य सिद्धान्त सूत्ररूपाने विज्ञानात मांडण्यात येतात. समाजशास्त्र मानवांच्या वर्तनावर आधारलेले सिद्धान्त

प्रतिपादन करते. यास्तव समाजशास्त्र हे सैद्धान्तिक (theoretical) विज्ञान आहे. (३) विज्ञान हे संचित स्वरूपाचे असते. विज्ञानाचा ओघ सारखा चालू असतो. एकदा प्रतिपादन केलेले सिद्धान्त अगर नियम सारखे तपासून पाहिले जात असतात. त्यामुळे त्या सिद्धान्तांमध्ये दुरुस्ती करणे, त्यांची व्याप्ती वाढविणे, अगर नवीन सिद्धान्त सांगणे वगैरे क्रिया विज्ञानात केल्या जातात. समाजशास्त्रीय सिद्धान्त देखील असे एकमेकांवर आधारलेले असल्याने आणि जुन्या सिद्धान्तांच्या परीक्षणावर नवीन सिद्धान्तांचे स्वरूप ठरविण्यात येत असल्याने समाजशास्त्र हे संचित (cumulative) स्वरूपाचे विज्ञान आहे. अर्थात विज्ञानाची ही वैशिष्टये समाजशास्त्रात संपूर्णतः विकसित स्वरूपात आढळून येतात अशातला भाग नाही. परंतु या दृष्टीने समाजशास्त्राची सतत प्रगती चालू आहे हे लक्षात ठेवले पाहिजे.

वैज्ञानिक दृष्टिकोणातून समाजशास्त्राविषयी काही ठळक गोष्टी विशेष उल्लेखनीय आहेत. पहिली गोष्ट अशी की समाजशास्त्र हे वास्तविक विज्ञान ( positive science ) आहे. समाजातील व्यक्ती अगर समूह कोणते वर्तन करतात याचा वस्तुनिष्ठ दृष्टिकोणातून उहापोह समाजशास्त्रात केला जातो. माणसांनी कसे वागावे अगर वागू नये याविषयी आदेश समाजशास्त्रात दिले जात नाहीत. म्हणून समाजशास्त्र हे नीतिशास्त्र, सौंदर्यशास्त्र यासारखे आदर्शक विज्ञान ( normative science ) नाही. सामाजिक घटनांचा नैतिक दृष्टिकोणातून अभ्यास करणे समाजशास्त्राला मान्य नाही. समाजशास्त्रामध्ये समाजात वस्तुस्थिती काय आहे याचाच तेवढा विचार केला जातो, म्हणून अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, मानसशास्त्र यासारखे समाजशास्त्र हे वास्तविक विज्ञान आहे. दुसरी गोष्ट अशी की समाजशास्त्र हे साररूप विज्ञान ( synoptic science ) आहे. अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, नीतिशास्त्र आदी सामाजिक शास्त्रांमध्ये मनुष्याच्या विवक्षित क्षेत्रातील वर्तनाचाच फक्त अभ्यास केला जातो. पण समाजशास्त्रामध्ये समाजाचा एकत्रित स्वरूपात ( society as a whole ) विचार करून माणसांच्या विविध क्षेत्रांतील वर्तनाच्या अभ्यासावर आधारलेले निष्कर्ष काढले जातात. तिसरी गोष्ट अशी की समाजशास्त्र हे अयथार्थ विज्ञान ( inexact science ) आहे. नैसर्गिक विज्ञानामध्ये यथार्थता किंवा काटेकोरपणा ( exactitude ) अवश्य आढळून येतो. पदार्थशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र आदी विज्ञाने यथार्थ विज्ञानांच्या ( exact sciences ) सदरात मोडतात. सर्व सामाजिक शास्त्रे त्यामानाने कमी काटेकोर आहेत आणि समाजशास्त्रात ही अयथार्थता विशेषत्वाने जाणवते. त्याला समाजशास्त्राच्या अभ्यासाविषयीच्या खालील बाबी कारणीभूत आहेत.

**१. अभ्यासविषयाचे स्वरूप** : पदार्थशास्त्रामध्ये जड पदार्थांच्या भौतिक संबंधांचा विचार केला जातो ; तर समाजशास्त्रात मानवांच्या सामाजिक परस्परसंबंधांचा अभ्यास केला जातो. म्हणजे विविध सामाजिक समूह, संस्था, समस्या, प्रक्रिया इत्यादी स्वतःशी अगदी निगडित असलेल्या सामाजिक घटनांचा अभ्यास समाजशास्त्राला करावा लागतो. त्याच्या अभ्यासविषय बनलेल्या घटनांमध्येच समाजशास्त्रज्ञाला वावरावे लागते. म्हणून वैज्ञानिक विवेचनाकरिता आवश्यक असलेला वस्तुनिष्ठ दृष्टिकोण येण्यासाठी लागणारी अभ्यासविषयाबद्दलची अलिप्तता संपादन करणे समाजशास्त्रज्ञाला जड जाते. नैसर्गिक विज्ञानाच्या अभ्यासकाला ही अडचण भासत नाही.

**२. अभ्यासविषयाची संमिश्रता** : माणसांचे परस्परसंबंध अतिशय संमिश्र अगर जटिल असतात. माणसांचे वर्तन विविध गोष्टींवर अवलंबून असते. सामाजिक प्रक्रिया वेगवेगळ्या कारणांमुळे होत असतात. सामाजिक समस्या बऱ्याच गुंतागुंतीच्या घटनांवर आधारलेल्या असतात. उदाहरणार्थ, समाजात घडणाऱ्या गुन्ह्यांना एखाद-दुसरें कारण जबाबदार नसून कितीतरी सामाजिक घटना जबाबदार असतात. अशा परिस्थितीत समाजशास्त्राचा अभ्यासविषय असलेल्या मानवांच्या परस्परसंबंधांविषयी सामान्य नियम प्रतिपादन करणे कठीण जाते. त्यामुळे समाजशास्त्राचा काटेकोरपणा थोडा कमी होतो.

**३. अभ्यासामध्ये प्रयोगपद्धतीचा अभाव** : नैसर्गिक विज्ञानामध्ये नियंत्रित प्रयोग करण्याची सोय उपलब्ध असते आणि त्यामुळे त्यातील निष्कर्षांची परीक्षा अगर प्रचीती केव्हाही घेता येते. नैसर्गिक विज्ञानांच्या अभ्यासांचे विषयच असे आहेत की तेथे प्रयोगांच्या द्वारे ज्ञान मिळविणे कठीण जात नाही. पण समाजशास्त्राच्या अभ्यासात तशी वस्तुस्थिती नाही. समाजातील व्यक्ती, समूह अगर संस्था या आपल्यावर प्रयोग– मग ते नियंत्रित का असेनात– करून घेण्यास तयार असत नाहीत. त्यामुळे समाजशास्त्राला असेल त्या स्थितीतील मानवी वर्तनाचा अभ्यास करावा लागतो. त्यात त्याला काहीही बदल करता येत नाही.

**४. अभ्यास–विषयात असलेले हितसंबंध** (vested interests) : मानवांच्या सर्व तऱ्हेच्या परस्पर-संबंधांचे विवेचन समाजशास्त्राला करावे लागते. या संबंधांतून निर्माण होणाऱ्या कुटुंब, धर्म, शिक्षण, मालमत्ता, राज्य इत्यादी सामाजिक संस्थांचा अभ्यास समाजशास्त्रज्ञ करतात. परंतु कित्येक व्यक्ती व समूह यांना हे सामाजिक संबंध व संस्था आहे त्या स्वरूपातच राहाव्यात असे वाटत असते कारण त्यात

त्यांचा स्वार्थ गुंतलेला असतो. म्हणून हल्लीच्या सामाजिक आंतरक्रिया हितावह असणाऱ्या लोकांचा समाजशास्त्रीय अभ्यासाला नेहमी कडवा विरोध असतो. अशा परिस्थितीत वैज्ञानिक दृष्टिकोणातून सामाजिक घटनांचा अभ्यास करणे कठीण जाते.

## २. समाजशास्त्राची वैज्ञानिक अभ्यासपद्धती

समाजाचे यथार्थ व संपूर्ण आकलन करून घेणे हे समाजशास्त्राचे आद्य उद्दिष्ट आहे आणि ते आकलन समाजाविषयी आवश्यक असलेली माहिती संकलित करण्यावर अवलंबून असते. म्हणून असा प्रश्न उद्भवतो की समाजाच्या विविध अंगांविषयी लागणारी माहिती कोणत्या पद्धतीनं समाजशास्त्रात संकलित केली जाते ? समाजशास्त्र हे एक विज्ञान असल्याने विशिष्ट पद्धतीनेच माहिती गोळा करून निष्कर्ष काढावे लागतात. अभ्यासाच्या या विशिष्ट पद्धतीलाच वैज्ञानिक पद्धती असे म्हणतात आणि सहाजिकच सर्व विज्ञानांच्या अभ्यासासाठी ती पद्धत वापरण्यात येते.

अभ्यासाच्या या वैज्ञानिक पद्धतीच्या (१) समस्या-सूत्रण, (२) निरीक्षण, (३) वर्गीकरण, (४) अभ्युपगम, (५) सामान्यीकरण, व (६) पूर्वकथन अशा सहा अवस्था आहेत. तेव्हा या अवस्थांचे विवेचन केल्याखेरीज समाजशास्त्राच्या वैज्ञानिक अभ्यासपद्धतीची खरी कल्पना येणार नाही.

**१. समस्या-सूत्रण** (Formulation of the Problem) : वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करावयाचा तर आपल्या अभ्यास-विषयातील एखाद्या समस्येचे आपण सूत्रण केले पाहिजे, किंवा आपल्या अभ्यास-विषयाला रूप दिले पाहिजे. याचा अर्थ असा की ज्याचा आपण अभ्यास करू इच्छितो त्या समस्येविषयी आपल्या मनात काही तरी स्पष्ट कल्पना असली पाहिजे. म्हणजे त्या समस्येविषयी काही विवक्षित प्रश्न निश्चितपणे उपस्थित केले पाहिजेत. एकदा प्रश्नाचे स्वरूप समजले की त्या अनुरोधाने पुढील अन्वेषण ( investigation ) करणे सोपे जाते. अर्थात नंतर करण्यात येणाऱ्या अन्वेषणामुळे मूळच्या प्रश्नाचे स्वरूप नक्की होईल किंवा त्या स्वरूपात कदाचित बदल देखील होईल. काही झाले तरी अभ्यास सुकर होण्यासाठी सुरवातीला प्रश्न उपस्थित करणे आवश्यक असते, कारण त्याखेरीज अभ्यासाला खऱ्या अर्थाने प्रारंभच होणरा

नाही. जर बालगुन्हेगारांच्या समस्येचा अभ्यास करावयाचा असेल तर त्या समस्येविषयी काही प्रश्नांचे सूत्रण अगर रचना ( उदाहरणार्थ, पालकांच्या निष्काळजीपणामुळे अगर इतरांच्या वाईट संगतीमुळे मुलांच्या मनामध्ये अपराध-प्रवृत्ती निर्माण होते. ) अभ्यासकाने केली पाहिजे. मग या प्रश्नाच्या अनुरोधाने समस्येचा अभ्यास झाल्यानंतर अगोदर प्रतिपादन केलेला प्रश्न खरा ठरेल किंवा तो बदलावाही लागेल. काही चित्रपटांचा विपरीत परिणाम होऊन मुले अपराध करण्यास प्रवृत्त होतात असे अभ्यासावरून निष्पन्न झाल्यास मूळच्या प्रश्नात बदल करावा लागल. तेव्हा वैज्ञानिक अभ्यासपद्धतीची पहिली अवस्था समस्येला रूप देणारी असते.

२. **निरीक्षण** ( Observation ) : अभ्यास-विषयाच्या समस्येचे स्वरूप ठरविल्यानंतर त्या समस्येशी संबंधित अशा घटनांचे अगर घडामोडींचे यथार्थ निरीक्षण करणे ही वैज्ञानिक अभ्यासपद्धतीची दुसरी अवस्था आहे. वस्तुस्थितीकडे विशिष्ट रीतीने पाहण्याच्या प्रक्रियेला निरीक्षण म्हणतात. वस्तुस्थितीच्या महत्त्वपूर्ण बाबींचीच नोंद निरीक्षणात केली जाते. सर्वच बाबींची नोंद करण्यात काही अर्थ असत नाही. आपल्या अभ्यास–विषयाला उपयुक्त अशा बाबींचेच निरीक्षण केले जाते. तसेच निरीक्षण पूर्वग्रहमुक्त ( unprejudiced ) व निःपक्षपाती (impartial) असावे लागते. एखाद्या विषयाकडे बघण्याचा स्वतःचा दृष्टिकोण जर आधीच पक्का झाला असेल तर त्या विषयाशी संबंधित अशा घटनांचे निरीक्षण सदोष झाल्यावाचून राहणार नाही. तेव्हा निरीक्षण हे निष्पक्ष अगर वस्तुनिष्ठ असावयास हवे. अशा शास्त्रशुद्ध निरीक्षणाला विज्ञानात फार महत्त्व आहे. विज्ञानविषयक सर्व अन्वेषणांचा निरीक्षण हा पाया आहे. निरीक्षणामुळे मिळालेल्या माहितीच्या आधारावरच कोणत्याही विज्ञानाची इमारत उभारली जाते. म्हणून समाजशास्त्रात देखील मनुष्याच्या समाजजीवनाच्या निरीक्षणाला विशेष महत्त्व आहे.

समाजशास्त्राचा अभ्यासक प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष निरीक्षण ( direct or indirect observation ) करून आवश्यक ती माहिती मिळवीत असतो. स्वतः बघणे यास प्रत्यक्ष निरीक्षण म्हणतात, परंतु इतरांनी बघून लिहून ठेवलेल्या गोष्टींचा आधार घेणे यास अप्रत्यक्ष निरीक्षण म्हणतात. अर्थात कोणतीही सामाजिक घटना घडत असताना समाजशास्त्राच्या अभ्यासकाला ती जशीच्या तशी पाहावी लागते. तिच्यामध्ये त्याला काही बदल करता येत नाही, अगर तिच्यावर त्याला कसलेही नियंत्रण ठेवता येत नाही. याला उत्स्फूर्त निरीक्षण म्हणतात.

परंतु निरीक्षण हे नियंत्रित देखील असू शकते. नियंत्रित निरीक्षणालाच (controlled observation) प्रयोग (experiment) असे म्हणतात. प्रयोगामध्ये निरीक्षकाच्या इच्छेनुसार अगर त्याने निर्माण केलेल्या परिस्थितीमध्ये घटना घडत असतात. नैसर्गिक विज्ञानामध्ये प्रयोग अगर नियंत्रित निरीक्षण करणे अगदी सोपे असते. पदार्थविज्ञान अगर रसायनविज्ञान या नैसर्गिक विज्ञानांमध्ये आपणाला अभ्यास करावयाची घटना पाहिजे त्या परिस्थितीमध्ये घडवून आणता येते. परंतु सामाजिक विज्ञानामध्ये असे प्रयोग करणे अगदी कठीण असते. कारण एक तर सामाजिक विज्ञानामध्ये माणसावर प्रयोग करावे लागतात आणि इतर वस्तूंप्रमाणे अगर प्राण्यांप्रमाणे माणसांना वागविता येत नाही. दुसरी गोष्ट अशी की ज्यांच्यावर प्रयोग चालू आहे अशा माणसांच्या प्रतिक्रिया (reactions) स्वाभाविक (natural) असत नाहींत सामाजिक विज्ञानांमध्ये प्रयोगपद्धतीचा अवलंब करणे कठीण असले तरी अलीकडील काळात सामाजिक विज्ञानांच्या काही क्षेत्रात माणसांच्या संमतीने प्रयोग करण्याकडे प्रवृत्ती वाढत आहे. प्रयोगशाळा, कारखाने, शैक्षणिक संस्था यांतून असे प्रयोग हल्ली केले जातात आणि त्यावरच औद्योगिक समाजशास्त्र व शैक्षणिक समाजशास्त्र यांसारख्या समाजशास्त्राच्या शाखांची वाढ होत आहे.

३. **वर्गीकरण** (Classification) : व्यक्तींच्या अगर घटनांच्या निरीक्षणांच्या आधारावर योग्य रीतीने अभ्यास-विषयाची माहिती मिळविल्यानंतर त्या माहितीचे वर्गीकरण करणे हा वैज्ञानिक अभ्यासपद्धतीतील तिसरा टप्पा आहे. आपण मिळविलेल्या माहितीमध्ये आढळून येणाऱ्या व्यक्तींच्या अगर घटनांच्या परस्पर-संबंधांनुसार माहितीची विभागणी करणे म्हणजे वर्गीकरण होय. वर्गीकरणामध्ये संपादित माहितीची विशिष्ट पद्धतीने विभागणी केली जाते. ही विभागणी व्यक्तींच्या गुणधर्मांवर अगर घटनांच्या वैशिष्ट्यावर अवलंबून असते आणि अशी विभागणी जेव्हा होते, तेव्हाच मिळविलेल्या माहितीला व्यवस्थित अगर सुसंबद्ध स्वरूप येते. नाहीतर ती माहिती म्हणजे व्यक्तींची अगर घटनांची केवळ जंत्री होते. तसेच वर्गीकरणामुळे एकत्रित केलेल्या माहितीतील अर्थ सूचित होतो. समजा एका समूहातील व्यक्तींची त्यांचे वजन व बुद्धिमत्ता या दोन वैशिष्ट्यानुरूप विभागणी केली तर आपणास या दोन वैशिष्ट्यांमध्ये विवक्षित तऱ्हेचा संबंध आहे असे दिसून येईल. ज्यांचे वजन जास्ती आहे त्यांची बुद्धिमत्ता बेताबाताची आहे आणि ज्यांचे वजन त्यामानाने कमी आहे त्यांची बुद्धी फार तीव्र आहे असे कदाचित आढळून येईल. याचा अर्थ असा की वर्गीकरणामुळे

त्यावर खात्रीचा निष्कर्ष काढावा लागतो. या फेर तपासणीत अभ्युपगमाने केलेले विधान खरे ठरेल, अगर ते थोडे बदलावे लागेल, किंवा ते कदाचित टाकूनही द्यावे लागेल. काही निष्पन्न झाले तरी जास्ती अभ्यास आवश्यक असतो आणि त्या अभ्यासाची दिशा अभ्युपगमावर अवलंबून असते. समजा, मुलांची अपराध-प्रवृत्ती व त्यांच्या पालकांचे वर्तन यांच्या परस्पर-संबंधांचे विवरण करणारा अभ्युपगम एका सामाजिक पाहणीत आढळून आला तर तो सर्वथैव ग्राह्य मानता येणार नाही त्यासाठी त्या अभ्युपगमाची अजून प्रचीती पहावी लागेल. म्हणून त्या अनुरोधाने अजून पाहणी करावी लागेल, अशा फेर तपासणीत बाल-अपराध-प्रवृत्ती आणि पालकांचे वर्तन यांचा कितपत संबंध आहे हे स्पष्ट दिसून येईल. मुलांची अपराध-प्रवृत्ती ही पालकांच्या वर्तनापेक्षा वाईट संगतीवर जास्ती अवलंबून असते असे कदाचित निदर्शनास येईल व त्याप्रमाणे पूर्वीच्या अभ्युपगमात बदल करावा लागेल. काहीही झाले तरी कायमचे सत्य शोधून काढण्यासाठी अभ्युपगमाचा पडताळा पाहणे आवश्यक असते. याचा अर्थ असा की पूर्वीचा अभ्युपगम खरा आहे की खोटा आहे याचा प्रत्यय पाहिला पाहिजे; तो अभ्युपगम सिद्ध करण्याचाच केवळ प्रयत्न करता कामा नये. सारांश, अभ्युपगमावरून पुढील अभ्यासाची दिशा निश्चित होते व हेच अभ्युपगमाचे उपयुक्त कार्य आहे.

५. सामान्यीकरण (Generalisation) : अभ्युपगमाचा पडताळा पाहण्यासाठी केलेल्या विशेष अन्वेषणावरून असे आढळून येते की आपण अभ्यास करीत असलेल्या समाजजीवनाच्या विवक्षित घटकांमध्ये निर्णायक स्वरूपाचे संबंध आहेत आणि त्याप्रमाणे आपण निश्चित प्रतिपादन करू शकतो. कोणत्याही घटनेतील घटकांच्या परस्परसंबंधांविषयीच्या निश्चित अगर स्पष्ट प्रतिपादनाला सामान्यीकरण असे म्हणतात. आपण अंगिकारिलेल्या सामाजिक परिस्थितीच्या मर्यादित अभ्यासावरून जे ठाम निष्कर्ष काढण्यात येतात ते तशाच स्वरूपाच्या इतर सामाजिक परिस्थितीला देखील तंतोतंत लागू पडतात. याचा अर्थ असा की ते निष्कर्ष विवक्षित परिस्थितीला सदैव लागू पडण्यासारखे सामान्य स्वरूपाचे असतात. म्हणून एक निष्कर्ष समान परिस्थितीला लागू करण्याच्या प्रक्रियेला सामान्यीकरण असे म्हणतात. वैज्ञानिक अभ्यासपद्धतीमध्ये अभ्युपगमानंतर हा सामान्यीकरणाचा टप्पा येतो आणि विज्ञानाच्या कोणत्याही शाखेत ही सामान्यीकरणाची अवस्था दिसून येते. अशा सामान्यीकरणालाच विज्ञानाचे नियम अगर तत्त्वे अशी संज्ञा दिली जाते. पदार्थविज्ञान, रसायनविज्ञान आदी भौतिक विज्ञानांमध्ये प्रतिपादन केलेले नियम (उदाहरणार्थ, गुरुत्वाकर्षणाचा नियम) विशिष्ट परिस्थितीत हमखास लागू पडतात. तसेच सामाजिक विज्ञानांमध्ये सांगितलेले नियम

वजन व बुद्धीमता यांचा संबंध आपण जोडू शकलो. याचप्रमाणे कौटुंबिक परिस्थिती आणि मुलांची अपराध-प्रवृत्ती यांचा परस्पर-संबंध प्रस्थापित करता येईल. एकूण गुणाधर्मानुसार केलेल्या वर्गीकरणाच्या प्रक्रियेमुळे व्यक्तींच्या अगर घटनांच्यामध्ये असणारे संबंध स्पष्ट होऊ लागतात व ते संबंध स्पष्ट झाल्याने एकत्रित केलेल्या माहितीचा अर्थ कळू लागतो. घटनांचा अर्थबोध होणे आवश्यक असल्याने वर्गीकरण ही वैज्ञानिक पद्धतीमध्ये महत्त्वाची अवस्था समजली जाते.

४. अभ्युपगम (Hypothesis): वैज्ञानिक अभ्यास-पद्धतीमध्ये अभ्युपगम सांगणे ही चौथी आवश्यक अवस्था आहे. समस्या-सूत्रणाच्या अनुरोधाने निरीक्षण करून मिळविलेल्या माहितीचे वर्गीकरण केल्यानंतर त्यावरून दिसून येणाऱ्या परस्परसंबंधित गोष्टी अगर बाबी आपण सुचवू शकतो. अशा परस्परसंबंधांच्या विधानाला शास्त्रीय परिभाषेत अभ्युपगम असे म्हणतात. एखाद्या घटनेशी विवक्षित गोष्टी संबंधित असतात असे विधान (statement) करणे म्हणजे अभ्युपगम करणे होय. हे लक्षात ठेवले पाहिजे की अभ्युपगमामध्ये घटनेशी संबंधित असलेल्या गोष्टीविषयी अनंतिम निष्कर्ष काढलेले असतात. याचा अर्थ असा की अभ्युपगमामध्ये घटनेचे प्राथमिक (tentative) अगर संभाव्य (possible) स्पष्टीकरण अगर विवरण (explanation) असते.

अभ्युपगम जरी घटनेचे संभाव्य विवरण असले तरी देखील ते महत्वाचे असते. अभ्युपगम हा केवळ तर्क, कल्पना अगर आधाररहित मत या स्वरूपाचा असत नाही तो त्याहून जास्ती विश्वासार्ह असतो कारण अभ्युपगम हा घटनांचे निरीक्षण व वर्गीकरण या प्रक्रियांवर आधारलेला असतो. अभ्युपगमात दिलेले स्पष्टीकरण खरे किंवा योग्य ठरण्याचा संभव असतो; परंतु त्यासाठी तो अभ्युपगम परत तपासून घेण्याची गरज असते.

अभ्युपगम महत्त्वाचा असतोच. पण त्याबरोबर तो उपयुक्त कार्य करीत असतो. अभ्यासाच्या पुढील अन्वेषणाची दिशा अभ्युपगम ठरवीत असतो. अभ्युपगमात कथन केलेले विधान अनंतिम स्वरूपाचे असते. त्या विधानाची अजून माहिती गोळा करून प्रचीती अगर पडताळा (verification) पाहिल्याखेरीज ते विधान कायम स्वरूपाचे ठरणार नाही. तेव्हां अभ्युपगम परत तपासून पहावा लागतोच.

त्यावर खात्रीचा निष्कर्ष काढावा लागतो. या फेर तपासणीत अभ्युपगमाने केलेले विधान खरे ठरेल, अगर ते थोडे बदलावे लागेल, किंवा ते कदाचित टाकूनही द्यावे लागेल. काही निष्पन्न झाले तरी जास्ती अभ्यास आवश्यक असतो आणि त्या अभ्यासाची दिशा अभ्युपगमावर अवलंबून असते. समजा, मुलांची अपराध-प्रवृत्ती व त्यांच्या पालकांचे वर्तन यांच्या परस्पर-संबंधांचे विवरण करणारा अभ्युपगम एका सामाजिक पाहणीत आढळून आला तर तो सर्वथैव ग्राह्य मानता येणार नाही त्यासाठी त्या अभ्युपगमाची अजून प्रचीती पहावी लागेल. म्हणून त्या अनुरोधाने अजून पाहणी करावी लागेल, अशा फेर तपासणीत बाल-अपराध-प्रवृत्ती आणि पालकांचे वर्तन यांचा कितपत संबंध आहे हे स्पष्ट दिसून येईल. मुलांची अपराध-प्रवृत्ती ही पालकांच्या वर्तनापेक्षा वाईट संगतीवर जास्ती अवलंबून असते असे कदाचित निदर्शनास येईल व त्याप्रमाणे पूर्वीच्या अभ्युपगमात बदल करावा लागेल. काहीही झाले तरी कायमचे सत्य शोधून काढण्यासाठी अभ्युपगमाचा पडताळा पाहणे आवश्यक असते. याचा अर्थ असा की पूर्वीचा अभ्युपगम खरा आहे की खोटा आहे याचा प्रत्यय पाहिला पाहिजे; तो अभ्युपगम सिद्ध करण्याचाच केवळ प्रयत्न करता कामा नये. सारांश, अभ्युपगमावरून पुढील अभ्यासाची दिशा निश्चित होते व हेच अभ्युपगमाचे उपयुक्त कार्य आहे.

५. सामान्यीकरण (Generalisation) : अभ्युपगमाचा पडताळा पाहण्यासाठी केलेल्या विशेष अन्वेषणावरून असे आढळून येते की आपण अभ्यास करीत असलेल्या समाजजीवनाच्या विवक्षित घटकांमध्ये निर्णायक स्वरूपाचे संबंध आहेत आणि त्याप्रमाणे आपण निश्चित प्रतिपादन करू शकतो. कोणत्याही घटनेतील घटकांच्या परस्परसंबंधांविषयीच्या निश्चित अगर स्पष्ट प्रतिपादनाला सामान्यीकरण असे म्हणतात. आपण अंगिकारिलेल्या सामाजिक परिस्थितीच्या मर्यादित अभ्यासावरून जे ठाम निष्कर्ष काढण्यात येतात ते तशाच स्वरूपाच्या इतर सामाजिक परिस्थितीला देखील तंतोतंत लागू पडतात. याचा अर्थ असा की ते निष्कर्ष विवक्षित परिस्थितीला सदैव लागू पडण्यासारखे सामान्य स्वरूपाचे असतात. म्हणून एक निष्कर्ष समान परिस्थितीला लागू करण्याच्या प्रक्रियेला सामान्यीकरण असे म्हणतात. वैज्ञानिक अभ्यासपद्धतीमध्ये अभ्युपगमानंतर हा सामान्यीकरणाचा टप्पा येतो आणि विज्ञानाच्या कोणत्याही शाखेत ही सामान्यीकरणाची अवस्था दिसून येते. अशा सामान्यीकरणालाच विज्ञानाचे नियम अगर तत्त्वे अशी संज्ञा दिली जाते. पदार्थविज्ञान, रसायनविज्ञान आदी भौतिक विज्ञानांमध्ये प्रतिपादन केलेले नियम (उदाहरणार्थ, गुरुत्वाकर्षणाचा नियम) विशिष्ट परिस्थितीत हमखास लागू पडतात. तसेच सामाजिक विज्ञानांमध्ये सांगितलेले नियम

(उदाहरणार्थ, अर्थशास्त्रातील वस्तूंच्या मागणीचे अगर पुरवठ्याचे नियम) विशिष्ट परिस्थितीत ठामपणे आढळून येतात. त्याचप्रमाणे विवक्षित सामाजिक परिस्थितीमध्ये हमखास आढळून येणाऱ्या घटकांच्या परस्परसंबंधांच्या अनुरोधाने केलेल्या निश्चित प्रतिपादनाला किंवा सामान्यीकरणाला समाजशास्त्राची तत्वे असे म्हणतात.

६. पूर्वकथन (Prediction) : पूर्वकथन ही वैज्ञानिक अभ्यासपद्धतीची शेवटची अवस्था आहे. विज्ञानाचे नियम किंवा तत्त्वे विवक्षित परिस्थितीत नक्की लागू पडतात किंवा खरी ठरतात. त्यामुळे जेथे तशाच प्रकारची परिस्थिती असते तेथे ते नियम खात्रीने लागू पडणार हे उघड आहे. तेव्हा विज्ञानाच्या नियमांच्या आधारावर समान परिस्थितीत काय घडेल हे अगोदर सांगणे यास पूर्वकथन म्हणतात. विज्ञानाच्या क्षेत्रातील पूर्वकथन म्हणजे भविष्य नव्हे. ठराविक वेळी– समजा एक अगर पन्नास वर्षानंतर–काहीही झाले तरी एखादी गोष्ट हमखास घडेल असे सांगणे यास भविष्य म्हणतात. कोणत्याही परिस्थितीत भविष्य खरे ठरेल असे ठामपणे सांगितले जाते. परंतु पूर्वकथनात अशी मोकळीक असत नाही. विवक्षित परिस्थिती विद्यमान असेल तरच त्या परिस्थितीत विवक्षित घटना घडतील अगर विवक्षित संबंध अस्तित्त्वात येतील असे मर्यादित विधान पूर्वकथनात केलेले असते. जी परिस्थिती पूर्वकथनात अभिप्रेत असते ती परिस्थिती जर अस्तित्वात नसेल तर पूर्वकथनात सांगितलेल्या घटना अगर संबंध दिसून येणार नाहीत. म्हणून पूर्वकथन हे भविष्यासारखे निवेदन असत नाही. विज्ञानात भविष्याला स्थान असत नाही; पण पूर्वकथनाला मात्र असते. सामाजिक विज्ञानामध्ये पूर्वकथनाला विशेष महत्त्व देखील असते कारण त्यामुळे विवक्षित परिस्थितीवर नियंत्रण ठेवून हवे असलेले सामाजिक उद्दिष्ट साध्य करून घेता येते. जर समाजशास्त्राने असा नियम प्रतिपादन केला की विवक्षित सामाजिक परिस्थितीत लोकांची अपराध-प्रवृत्ती वाढेल, तर या नियमाच्या आधारावर आपणास असे पूर्वकथन करता येईल की जेथे ती परिस्थिती आहे तेथे अपराध-प्रवृत्ती जास्ती प्रमाणात दिसून येईल. तेव्हा ती परिस्थिती बदलून अपराध-प्रवृत्ती कमी करण्याचे सामाजिक ध्येय सहज साध्य करून घेता येईल.

अभ्यासाची ही वैज्ञानिक पद्धत सर्व विज्ञानांत वापरण्यात येते. अर्थात अभ्यासविषयाच्या स्वरूपानुसार त्यात थोडाफार बदल करावा लागतो. सामाजिक विज्ञानांत प्रयोग अगर नियंत्रित निरीक्षण करता येत नाही. परंतु निरीक्षण हे करावेच लागते. तेव्हा इतर विज्ञानांप्रमाणेच समाजशास्त्रात वैज्ञानिक पद्धतीनेच अभ्यास करण्यात येतो.

## ३. समाजशास्त्र व वैज्ञानिक विचारसरणी

जगातील विविध घटनांचे सम्यक् आकलन करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य विज्ञान करीत असते. आपल्या भोवती घडणाऱ्या घटनांबद्दलचे ज्ञान विज्ञानामुळे वाढत असते, कारण घटनांच्या निष्पक्ष व पूर्वग्रहमुक्त संपूर्ण निरीक्षणाच्या आधारे त्या घटनांमधील नियमितता व परस्परसंबंध विज्ञानात शोधून काढले जातात. प्रत्येक विज्ञान आपल्या अभ्यासविषयाबद्दचे ज्ञान वाढवून त्याच्या अनुरोधाने संबंधित प्रचलित समस्या सोडविण्याचे प्रयत्न करीत असते. समाजशास्त्र हे विज्ञान असल्याने या नियमाला अपवाद नाही. सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रांतील घटनांची वैज्ञानिक पद्धतीने माहिती करून घेऊन त्या माहितीच्या आधारे गंभीर सामाजिक समस्या सोडविण्याचे मार्ग समाजशास्त्र दाखवीत असते. परंतु या उपयुक्त कार्यात लोकांच्या भावात्मक विचारसरणीमुळे (emotionalised thinking) बरेच अडथळे निर्माण होतात. सामान्य जनतेची व पुढाऱ्यांची अशी समजूत झालेली असते की सामाजिक समस्यांची त्यांना संपूर्ण कल्पना असल्यामळे वैज्ञानिक अभ्यास-पद्धतीचा उपयोग न करता त्या समस्या सोडविता येतील. वैज्ञानिक विचारसरणी (scientific thinking) जनतेमध्ये खोलवर रुजली नसल्याने लोकांची अशी समजूत होते व समाजशास्त्राच्या प्रगतीला त्यामुळे बाधा येत आहे. लोकांमध्ये दिसून येणाऱ्या खालील विविध प्रवृत्तींमुळे (tendencies) समाजशास्त्रामध्ये वैज्ञानिक विचारसरणीचा प्रसार होण्यास अडथळे निर्माण होत आहेत.

**(१) मनुष्य नेहमी आपला समूह श्रेष्ठ समजत असतो :** मनुष्य– मग तो आदिवासी असो अगर अतिशय सुधारलेला असो–नेहमी स्वतःविषयी आणि आपल्या समूहातील अगदी जवळच्या माणसांविषयी सारखा विचार करीत असतो व काळजी घेत असतो. याचेच पुढे स्वसमूहश्रेष्ठतेमध्ये (ethnocentrism) रूपांतर होते. माणसांची अशी प्रखर भावना असते की आपला समूह अगर समाज या जगात महत्त्वपूर्ण असून आपल्या आचारनीती व विचारपरंपरा सर्वथैव योग्य आहेत. या भावनेलाच स्वसमूहश्रेष्ठता असे म्हणतात. स्वसमूहश्रेष्ठतेच्या कल्पना सर्वत्र दिसून येतात. अमेरिकेतील नव्हॅहो नावाचे आदिवासी लोक स्वतःखेरीज इतर सर्वांना तुच्छ लेखतात. आर्क्टिकच्या थंड प्रदेशातील एस्किमो लोकांचीही तशीच दृढ समजूत आहे. गोरे लोक आपणांकडून इतर लोक सुसंस्कृत वागणुकीचे धडे घ्यावयास येतात असे मानतात. ग्रीक लोक तर ग्रीकेतरांचा रानटी लोक असाच उल्लेख करतात. मुसलमानांच्या मते इस्लामधर्मानुयायी लोक पाक अगर पवित्र आणि इतर सर्व काफिर या सदरात मोडतात. शुभ्रवर्णीय लोक स्वतःला वांशिक दृष्ट्या श्रेष्ठ

समजतात आणि " नॉर्डिक " वंशीय लोक आपल्याला सर्व जग पादाक्रांत करण्याचा अधिकार आहे असे गृहीत धरतात. तेव्हा कोणत्याही संस्कृतीमध्ये स्वतःच्याच समूहाला अवास्तव महत्त्व देण्याची प्रथा दिसून येते. त्यामुळेच मनुष्य सर्व मानव-समाजाचा एकसमयावच्छेदेकरून विचार करीत नाही आणि समाजशास्त्रात तर तो विचार मुख्य असतो. म्हणून स्वसमूहश्रेष्ठत्वाची कल्पना सामाजिक क्षेत्रात वैज्ञानिक विचारसरणीच्या आड येते.

(२) **मनुष्य समस्यांकडे केवळ दोन प्रकारच्या दृष्टिकोणातूनच पाहतो :** वरील प्रवृत्तीशी निगडित अशी दुसरी एक प्रवृत्ती मानवामध्ये सर्वत्र दिसून येते. वैयक्तिक व सामाजिक समस्या आणि त्यांची संभाव्य सोडवणूक ही चांगली अगर वाईट, योग्य अगर अयोग्य, खरी अगर खोटी यांसारख्या कोणत्याही दोन परस्पर-विरोधी प्रकारांपैकी एका प्रकारानेच होत असते अशी मनुष्याची भावना असते. त्यामुळे ज्या घटना अगर व्यक्ती स्वतःला कळत नाहीत अगर आवडत नाहीत त्या वाईट अगर धोकादायक असतात असे मानण्याकडे माणसाचा कल असतो. जे स्वतःला पसंत पडते ते योग्य असे मनुष्य मानीत असतो. नेमकी हीच प्रवृत्ती वैज्ञानिक विचारसरणीच्या आड येते कारण फक्त दोन प्रकारच्या परस्परविरोधी दृष्टिकोणातूनच विज्ञान विचार करीत नाही. विज्ञानाला सर्व संभाव्य दृष्टिकोण लक्षात घ्यावे लागतात.

(३) **मनुष्य घटनांना व्यक्तिगत स्वरूप देतो :** तसेच प्रचलित सामाजिक प्रश्नांचा विचार करताना त्या प्रश्नाशी एखाद्या व्यक्तीचा संबंध जोडून देण्याची प्रवृत्ती माणसामध्ये दिसून येते. दुसऱ्या महायुद्धाच्या अनर्थाला दोस्त राष्ट्रांतील लोकांनी फक्त हेर हिटलरलाच जबाबदार धरले, तर जर्मनीतील लोकांनी विन्स्टन चर्चिलला युद्धपिपासू समजून दुसऱ्या महायुद्धाचे खापर चर्चिलवरच फोडले. अस्पृश्यतानिवारणाची समस्या महात्मा गांधींच्या प्रयत्नामुळे सुटली असे काँग्रेस-जन मानतात, तर हरिजन लोक डॉ. आंबेडकरांना त्याचे श्रेय देतात. एखाद्या प्रश्नाचे स्वरूप समजत नसले म्हणजे तो प्रश्न कोणत्या तरी व्यक्तीच्या दोषांमुळे अगर प्रमादांमुळे निर्माण झाला असला पाहिजे असे मानण्याची माणसाची प्रवृत्ती असते. यामुळेच वैज्ञानिक दृष्टिकोणातून सामाजिक प्रश्नांच्या अभ्यासात आडकाठी निर्माण होते. कारण कोणत्याही सामाजिक समस्येला एखादी व्यक्ती– मग ती किती का मोठी असेना– जबाबदार धरता येणार नाही.

(४) **मनुष्य एखादे विशिष्ट कारणच घटनांना जबाबदार असते असे गृहीत धरतो :** सामाजिक समस्या अगर घटना एखाद्या विवक्षित कारणामुळेच निर्माण

होते असे मानण्याची माणसांची प्रवृत्ती असते. यालाच विशिष्टीकरण ( parti-cularism ) असे म्हणतात. वस्तूंच्या किमती वाढतात याला सरकारी धोरणच जबाबदार असते; चित्रपटांच्या विपरीत परिणामामुळेच मुलांमध्ये अपराधप्रवृत्ती निर्माण होते ; जादा उत्पादनामुळेच व्यवसाय-चक्र ( business cycle ) अस्तित्वात येते. अशा रीतीने एखाद्या विवक्षित कारणानेच घटना घडत असतात असे गृहीत धरण्याची माणसाला सवय असते. कारण असे केल्याने घटनांची कल्पना येण्यास सामान्य माणसाला सोपे पडते. परंतु ही सवयच वैज्ञानिक दृष्टिकोणातून केल्या जाणाऱ्या सामाजिक प्रश्नांच्या अभ्यासाला मारक ठरते. सामान्य माणसे गृहीत धरतात ते कारण सामाजिक समस्येला अगर घटनेला अंशतः जबाबदार असते, पूर्णतः जबाबदार असत नाही. कारण एका कारणातून नव्हे तर विविध कारणांमधून सामाजिक घटना घडत असतात आणि सामाजिक समस्या निर्माण होत असतात. अलीकडील काळात व मुख्यतः स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय स्त्रीचा दर्जा वाढला ही सामाजिक घटना एखाद्या विशिष्ट कारणामुळेच ( उदाहरणार्थ, सरकारचे उदार धोरण अगर पाश्चात्य विचारसरणीचा प्रभाव अगर औद्योगिक क्रांतीचा परिणाम ) घडली असे मानणे वैज्ञानिक दृष्टिकोणातून विचार करता योग्य होणार नाही. कारण या विवक्षित कारणाबरोबरच इतर गोष्टीही भारतीय स्त्रीचे समाजातील स्थान वाढविण्यास कारणीभूत झाल्या. तेव्हा कोणतीही घटना अगर समस्या एकाच कारणामुळे घडत असते असे समजल्याने सामाजिक घटनांचे अगर समस्यांचे खरे आकलन होणार नाही.

अशा रीतीने माणसांमध्ये दिसून येणाऱ्या वरील विविध प्रवृत्ती सामाजिक प्रश्नांचा वैज्ञानिक दृष्टिकोणातून अभ्यास करण्यामध्ये अडचणी निर्माण करतात. वज्ञानिक विचारसरणी पूर्वग्रहविरहित व वस्तुनिष्ठ स्वरूपाची असते.समा जशास्त्रात अशी विचारसरणी उपयोगात आणणे कठीण पडते. पण समाजशास्त्र हे विज्ञान असल्याने अशी विचारसरणी अमलात आणण्याचे प्रयत्न समाजशास्त्राच्या अभ्यासकांना करावे लागतात व अशा प्रयत्नांत ते बरेच यशस्वीही झाले आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम........................ वि: ........................
क्रमांक ........................ नों: दि: ........................

# ४

# समाजशास्त्राचा इतर विज्ञानांशी संबंध

समाजशास्त्र हे एक विज्ञान असल्याने विज्ञानाची ठळक वैशिष्टये समाजशास्त्रात स्पष्टपणे दिसून येतात. सर्व विज्ञानांचा उद्देश समान असतो आणि तो म्हणजे आपल्या अभ्यासविषयाचे संपूर्ण आकलन अगर ज्ञान करून घेणे हा होय. समाजशास्त्राचाही हेतू तोच आहे. मानव समाजाचे आणि त्यातील व्यक्तींच्या परस्परसंबंधांचे यथार्थ व पूर्ण आकलन करून घेण्याचा प्रयत्न करणे हे समाजशास्त्राचे प्रमुख उद्दिष्ट आहे. तसेच, सर्व विज्ञानांची आपल्या अभ्यासविषयाबद्दलची माहिती मिळविण्याची पद्धती समान असते. ती माहिती वस्तुनिष्ठ स्वरूपात मिळविली जाते आणि त्या माहितीच्या आधारे सामान्य नियम अगर तत्त्वे प्रतिपादन करण्याचा मार्गही निश्चित केलेला असतो. अभ्यासाच्या या पद्धतीला वैज्ञानिक पद्धती असे म्हणतात. समाजशास्त्रामध्येसुद्धा हीच पद्धती वापरली जाते. तेव्हा अभ्यासाचा हेतू आणि पद्धती या दोन्ही दृष्टींनी समाजशास्त्र हे इतर विज्ञानांसारखे आहे.

अभ्यासविषयानुसार विज्ञानांमध्ये भेद केले जातात. नैसर्गिक विज्ञानांमध्ये भौतिक क्षेत्रातील वस्तूंचा अगर घटनांचा अभ्यास केला जातो तर सामाजिक विज्ञानांचा अभ्यासविषय मानवाचे सामाजिक वर्तन हा असतो. समाजात राहणारा प्राणी

या अर्थाने मानवाचा सखोल अभ्यास करणारी बरीच विज्ञाने आहेत. समाजशास्त्र हे असेच एक विज्ञान असल्याने त्याचा इतर विज्ञानांशी घनिष्ठ संबंध येतो व त्यांच्यामध्ये ज्ञानाचे आदानप्रदान चालू असते. अभ्यासविषयामुळे निगडित अस-असलेल्या प्रमुख विज्ञानांशी समाजशास्त्राचे संबंध कशा प्रकारचे आहेत हे पाहिले पाहिजे. कारण त्याखेरीज समाजशास्त्राच्या स्वरूपाविषयी यथार्थ कल्पना येणार नाही.

## १. *समाजशास्त्र व अर्थशास्त्र*

समाजशास्त्र व अर्थशास्त्र ही दोन्ही सामाजिक विज्ञाने असल्याने त्यांचा घनिष्ठ संबंध आहे. मानवी वर्तनाचा किंवा माणसांच्या आंतरक्रियांचा अभ्यास दोन्ही शास्त्रांत केला जातो. परंतु मानवी वर्तनाच्या कोणत्या भागावर अगर बाजूवर लक्ष केंद्रित करावयाचे याविषयी या दोन शास्त्रांत मूलभूत स्वरूपाचे भेद आहेत. अर्थ-शास्त्र हे माणसांच्या आर्थिक वर्तनाचा आणि प्रश्नांचा सांगोपांग अभ्यास करते. मनुष्याच्या गरजा अमर्यादित असल्याने व त्या गरजा भागविण्याची साधने त्यामानाने अपुरी असल्याने, गरजा व साधनसामुग्री यांचा मेळ घालण्याच्या प्रयत्नांना आर्थिक प्रश्न असे म्हणतात आणि ते प्रश्न सोडविण्यासाठी केलेल्या वर्तनाला आर्थिक वर्तन असे म्हणतात. तेव्हा माणसांच्या विवक्षित क्षेत्रातील वर्तनाचाच तेवढा अभ्यास अर्थशास्त्रात केला जातो. याच्या उलट माणसाच्या सर्व क्षेत्रांतील वर्तनाचा आणि परस्परसंबंधांचा सविस्तर अभ्यास समाजशास्त्र करते. उदाहरण म्हणून स्पर्धेच्या प्रक्रियेचा अभ्यास घेता येईल. अर्थशास्त्रांत ‘ स्पर्धा ’ या विषयाचा उहापोह केला जातो परंतु आर्थिक व्यवहारातील स्पर्धेपुरताच तो अभ्यास मर्यादित असतो. पण ‘ स्पर्धा ’ ही माणसांच्या परस्परसंबंधांची एक बाजू असल्याने आर्थिक क्षेत्राबरोबरच राजकीय, सामाजिक, धार्मिक वगैरे जीवनाच्या विविध क्षेत्रांत ती कशा रीतीने दिसून येते. याचे विवरण समाजशास्त्रात केले जाते. यावरून असे म्हणता येईल की अर्थशास्त्र हे एक विशिष्ट सामाजिक विज्ञान ( Special Social Science ) आहे तर समाजशास्त्र हे सामान्य सामाजिक विज्ञान (General Social Science) आहे.

अर्थशास्त्र व समाजशास्त्र यांच्यामध्ये भेद असला तरी दोन्ही शास्त्रे एक-मेकाशी विविध प्रकारांनी निगडित झाली असून दोहोंच्या अभ्यासाचे समान विषय सारखे वाढत आहेत. आर्थिक घडामोडीचा समाजजीवनावर परिणाम होतो आणि

सामाजिक विचारांचा व मूल्यांचा आर्थिक क्षेत्रावर परिणाम होतो. समाजाच्या आर्थिक क्षेत्रात दिसून येणारा बदल हा सामाजिक परिवर्तनाचाच एक भाग असतो. मालक व मजूर यांचे आर्थिक क्षेत्रात दिसून येणारे संबंध हे समाजाच्या दोन समूहांत दिसून येणाऱ्या विविध संबंधांपैकीच आहेत. कोणत्याही समाजाची अर्थव्यवस्था ( economic system ) ही त्या समाजाच्या रचनेचा ( social structure ) एक भाग असते. जीवनमान ( standard of living ), बेकारी, रोजगार, मालमत्ता, श्रमविभागणी, औद्योगिक संघटना, वगैरे आर्थिक प्रश्नांना सामाजिक बाजू असतात. भांडवलवाद, समाजवाद, साम्यवाद वगैरे आर्थिक क्षेत्रांतील विचारप्रवाहांची सामाजिक दृष्टिकोणांशी व उद्दिष्टांशी सांगड असते. राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीमध्ये आणि विशेषतः अविकसित देशांच्या आर्थिक विकासाच्या कार्यक्रमामध्ये सामाजिक बाबी महत्त्वाच्या असतात. आर्थिक व सामाजिक गोष्टींचा असा निकटचा संबंध असल्याने अर्थशास्त्र व समाजशास्त्र या दोन शास्त्रांच्या अभ्यासविषयांच्या मर्यादा निश्चित करणे अतिशय कठीण आहे. इतकेच नव्हे तर अर्थशास्त्र व समाजशास्त्र या दोन विज्ञानांची अभ्यासक्षेत्रे ( fields of study ) वाढत्या प्रमाणात परस्परव्यापक ( overlapping ) होत आहेत. अगदी अलीकडील काळात तर काही अर्थशास्त्रज्ञांनी समाजशास्त्रीय अभ्यासांत मोलाची भर घातली आहे.

## २. *समाजशास्त्र व राज्यशास्त्र*

अर्थशास्त्राप्रमाणे राज्यशास्त्राशी समाजशास्त्राचे निकटचे संबंध आहेत. मानवी वर्तनाचा किंवा माणसांच्या परस्परसंबंधांचा अभ्यास समाजशास्त्राप्रमाणे राज्यशास्त्रात केला जातो. परंतु त्या परस्परसंबंधांच्या कोणत्या बाबींवर लक्ष केंद्रित करावयाचे याविषयी दोन्ही शास्त्रांत भेद आहेत. व्यक्ती आणि शासन यांच्या परस्परसंबंधांचाच अभ्यास राज्यशास्त्रात अभिप्रेत आहे. शासनसंस्थेचा सर्व दृष्टिकोणांतून विचार राज्यशास्त्रात करावयाचा असल्याने प्रशासन, कायदा, आंतरराष्ट्रीय संबंध वगैरे शासनसंबंधित विषयांचा खास अभ्यास राज्यशास्त्र करते. परंतु समाजशास्त्राच्या अभ्यासामध्ये माणसांच्या परस्परसंबंधांच्या सर्व प्रकारांचा समावेश केला जातो. मनुष्याचे इतर मनुष्यांशी होणारे कोणतेही वर्तन समाजशास्त्रात अभ्यासिले जाते पण माणसाच्या फक्त राजकीय वर्तनाचाच विचार राज्यशास्त्रात केला जातो. त्यामुळेच राज्यशास्त्रापेक्षा समाजशास्त्राच्या अभ्यासाचे क्षेत्र अतिशय व्यापक असते. माणसाच्या वर्तनाचा एक विशिष्ट प्रकार म्हणून शासनाचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो; तर माणसाच्या सर्वसाधारण वर्तनाचा एक भाग म्हणून

शासनाचा विचार समाजशास्त्रात केला जातो. मानवी वर्तनाचा साकल्याने विचार केला असता असे दिसून येते की समाज व्यक्तींच्या वर्तनावर नियंत्रण ठेवीत असतो आणि शासनसंस्था, रूढी, नीतिनियम इत्यादी गोष्टींचा उपयोग करून नियंत्रण करण्यात येत असते. तेव्हा सामाजिक नियंत्रणाचे एक स्वरूप या दृष्टिकोणातून समाजशास्त्र शासनसंस्थेचा विचार करते. म्हणून राज्यशास्त्र हे विशिष्ट सामाजिक विज्ञान ( Special Social Science ) गणले जाते तर समाजशास्त्र हे सामान्य सामाजिक विज्ञान ( General So ial Science ) आहे.

या दोन शास्त्रांच्या स्वरूपात जरी भेद असला तरी असे कित्येक विषय आहेत की ज्यांचा सखोल विचार दोन्ही शास्त्रांत केला जातो आणि अशा समान विषयांची संख्या सारखी वाढत आहे. राजकीय संघर्षाचा एक प्रकार म्हणून युद्ध–संस्थेचा विचार राज्यशास्त्रात केला जातो, तर मानवी समूहांच्या परस्परसंबंधांचा एक प्रकार या दृष्टीने समाजशास्त्र युद्धसंस्थेचा अभ्यास करते व युद्धांच्या मानवी जीवनावर होणाऱ्या परिणामांचे विश्लेषण करते. शासनसंस्थेमार्फत घालण्यात येणाऱ्या निर्बंधांचे परिणाम राजकीय जीवनाबरोबर सामाजिक जीवनावर देखील घडत असतात म्हणून शासकीय निर्बंधांचे विवेचन समाजशास्त्राला करावे लागते. तसेच, अपराध व त्यावरील दण्डयोजना यांचा दोन्ही शास्त्रांशी संबंध येतो. राजकीय संस्थांचे सामाजिक संस्थांशी असणारे संबंध यांचा अभ्यास दोन्ही शास्त्रांना करावा लागतो तेव्हा राज्यशास्त्र व समाजशात्र या दोन विज्ञानांच्या अभ्यासविषयक क्षेत्रांची काटेकोरपणाने व कायमची विभागणी करणे अगदी कठीण आहे. त्यांचे क्षेत्र परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहे.

सारांश, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र व समाजशास्त्र यांचे संबंध अगदी जवळचे असून त्यांच्यामध्ये अभ्यासाचे बरेच विषय समान आहेत व त्यांच्यांतील सहकार्य वाढत आहे.

## ३. *समाजशास्त्र व सामाजिक मानवशास्त्र*

समाजशास्त्र व मानवशास्त्र यांचे अगदी निकटचे संबंध असून या दोन्ही विज्ञानांतील साहचर्य वाढत आहे. " मनुष्यविषयक विज्ञान म्हणजे मानवशास्त्र " आणि "मानव-समाजविषयक विज्ञान म्हणजे समाजशास्त्र" या मानवशास्त्र व समाज-शास्त्र यांच्या सुटसुटीत व्याख्यांवरून दोन्ही शास्त्रांतील परस्परसंबंधांची ठळकपणे कल्पना येते. पण त्यांची यथार्थ कल्पना मानवशास्त्राच्या स्वरूपावरून येईल.

मनुष्याचा सर्वांगीण अभ्यास मानवशास्त्रात केला जातो. मनुष्याविषयी जितक्या बाबींचा अभ्यास करता येणे शक्य आहे त्या सर्व बाबींचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न मानवशास्त्र करते. मनुष्याच्या भागविरहित किंवा संपूर्ण अभ्यासाला कोणत्याही मर्यादा मानवशास्त्र घालीत नाही. मानवशास्त्रात मनुष्याच्या अभ्यासाला कालाचे बंधन असत नाही. आधुनिक कालातील मानवापासून इतिहास-पूर्व कालातील मानवाचा आणि मनुष्यसदृश प्राण्यांचा अभ्यास मानवशास्त्र करते. कालाप्रमाणे स्थलाचेही बंधन मानवशास्त्रीय अभ्यासावर असत नाही. पृथ्वीतलावरील कोठल्याही भागातील मानवाचा अभ्यास मानवशास्त्रात केला जातो. तसेच मानवाच्या अभ्यासावर त्याच्या सांस्कृतिक दर्जाचेही बंधन लादले जात नाही. रानटी किंवा असंस्कृत मानवाप्रमाणे सुसंस्कृत मानवाचा देखील अभ्यास मानवशास्त्रात अभिप्रेत असतो. म्हणून " मनुष्य व त्याच्या कृती यांचा अभ्यास करणारे विज्ञान म्हणजे मानवशास्त्र होय " अशी मानवशास्त्राची व्याख्या केली जाते. एकूण मनुष्यप्राण्याच्या सुरवातीपासून आजपर्यंतच्या सर्व क्षेत्रांतील विकासांचा अभ्यास मानवशास्त्र करते. हे कार्य अतिशय व्यापक असल्याने अभ्यासाच्या सोयीनुसार मानवशास्त्राच्या शाखा व उपशाखा निर्माण झाल्या.

मानवशास्त्राचा अभ्यास मुख्यत: शारीरिक मानवशास्त्र व सांस्कृतिक किंवा सामाजिक मानवशास्त्र या दोन शाखांमध्ये विभागला आहे. इतर प्राण्यांप्रमाणे मनुष्य हा देखील एक सजीव प्राणी आहे म्हणून शारीरिक दृष्टया त्याचा अभ्यास केला जातो. मनुष्य-प्राण्याची उत्पत्ती, विकास, शारीरिक वैशिष्टये, वंशवार विभागणी, भौतिक परिस्थितीशी संबंध, शारीरिक परिवर्तन इत्यादी मनुष्याच्या शरीराशी संबंधित असलेल्या विषयांचा सर्वंकष अभ्यास करण्याकडे शारीरिक मानवशास्त्र ( Physical Anthropology ) लक्ष देते. तेव्हा मनुष्याच्या शरीरविषयक बाबींचा तौलनिक अभ्यास शारीरिक मानवशास्त्र या शाखेत केला जातो. मनुष्याच्या विविध कृतींचा अभ्यास ( study of the works of man ) देखील मानवशास्त्रात अभिप्रेत असल्याने त्यासाठी स्वतंत्र शाखा निर्माण झाली व तिला सांस्कृतिक किंवा सामाजिक मानवशास्त्र ( Cultural or Social Anthropology ) असे म्हणतात. या शाखेत माणसाने निर्माण केलेल्या संस्कृतीचा परिपूर्ण अभ्यास केला जातो. त्यामध्ये आर्थिक परिस्थिती, भाषा, कलाकौशल्य, तंत्रज्ञान, राज्यव्यवस्था, समाजरचना, धर्मकल्पना यांसारख्या संस्कृतीच्या विविध अंगांच्या अभ्यासाचा समावेश होतो. सांस्कृतिक किंवा सामाजिक मानवशास्त्र ही शाखा फार व्यापक असल्याकारणाने संस्कृतीच्या काही अंगांचा विशेष अभ्यास करणाऱ्या उपशाखा निघाल्या. मानवाच्या भौतिक

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र. 94980

संस्कृतीचा अभ्यास करणारे आर्थिक मानवशास्त्र ( Economic Anthropology ), त्याच्या भाषांच्या अभ्यासावरून संस्कृतीची कल्पना करणारे भाषिक मानवशास्त्र ( Linguistic Anthropology), त्याच्या विविध समूहांतील सांस्कृतिक जीवनाची माहिती करून घेणारे मनुष्यजातिशास्त्र ( Ethnology ) व त्याच्या इतिहासपूर्वकालीन जीवनाची कल्पना देणारे प्रागैतिहासिक पुरातत्त्व ( Prehistoric Archaeology ) या सामाजिक मानवशास्त्राच्या उपशाखा प्रसिद्ध आहेत.

मानवशास्त्राच्या विवेचनावरून हे स्पष्ट दिसून येते की समाजशास्त्र व सामाजिक मानवशास्त्र यात बरेचसे साम्य आहे. मानव-समाजाचे व त्यातील व्यक्तींच्या परस्परसंबंधांचे सम्यक् आकलन करून घेण्याचा प्रयत्न दोन्ही विज्ञानांत केला जातो. त्यामुळे दोघांचे अभ्यासविषय पुष्कळ अंशी समान आहेत. ही समानता अलीकडील काळात सारखी वाढते आहे कारण सामाजिक मानवशास्त्रज्ञांमध्ये आदिकालीन मानवाप्रमाणे आधुनिक मानवाचा देखील सांगोपांग अभ्यास करण्याची प्रवृत्ती वाढत्या प्रमाणात दिसून येते. आधुनिक मानव-समाजाच्या विविध अंगोपांगांचा विशेष अभ्यास गेल्या काही वर्षांत सामाजिक मानवशास्त्रामध्ये झाला आहे व ही प्रथा जास्ती प्रचारात येईल अशी चिन्हे दिसत आहेत. पूर्वी सामाजिक मानवशास्त्रामध्ये फक्त आदिकालीन मानवाचाच अभ्यास केला जात असे. पण हल्ली ती परिस्थिती राहिली नाही. तेव्हा सामाजिक मानवशास्त्रामध्ये आधुनिक मानव-समाजाचा अभ्यास अंतर्भूत होत असल्याने समाजशात्र व समजिक मानवशात्र यांतील भेद दिवसेदिवस कमी होत असून दोघांचे सहकार्य वाढत आहे व त्याचे एकमेकांवर दूरगामी परिणाम होत आहेत.

सामाजिक मानवशास्त्र हे विज्ञान अगदी अलीकडील काळात उदयास आले असून सर्व सामाजिक विज्ञानांमध्ये ते वयाने लहान आहे. असे असले तरी त्याने इतर सामाजिक विज्ञानांच्या मानाने बरीच प्रगती केली असून मानवसमाजाविषयी व विशेषत: आदिकालीन मानवसमूहांविषयी विविध तऱ्हेची महत्त्वपूर्ण माहिती पुरविली आहे. ही माहिती समाजशास्त्राच्या अभ्यासकांना अतिशय उपयोगी पडते. या माहितीच्या आधारे आधुनिक मानवसमूहांच्या प्रचलित समस्या, रचना व व्यवहार समजण्यास फार मदत होते. साहजिकच समाजशास्त्रज्ञांना आपले प्रश्न सोडविण्यास सोपे जाते. म्हणून सामाजिक मानवशास्त्राचा अभ्यास समाजशास्त्राच्या अभ्यासास पूरक ठरला आहे. त्यामुळे सामाजिक मानवशास्त्र व समाजशास्त्र यांतील निकटचे संबंध वाढत आहेत.

## ४. समाजशास्त्र व सामाजिक मानसशास्त्र

मानसशास्त्र एक महत्त्वाचे विज्ञान असून ते समाजशास्त्र व सामाजिक मानवशास्त्र यांच्याशीच नव्हे तर सर्व सामाजिक विज्ञानांशी अगदी निगडित आहे. विशेषतः मानसशास्त्राच्या विविध शाखांपैकी सामाजिक मानसशास्त्राशी समाजशास्त्राचे निकटचे संबंध आहेत. मानसशास्त्राची एक शाखा म्हणून सामाजिक मानसशास्त्राची सुरवात झाली. पण गेल्या ५० वर्षांत या शाखेने मौलिक संशोधन करून इतकी भरीव प्रगती केली की हल्ली सामाजिक मानसशास्त्र हे एक स्वतंत्र सामाजिक विज्ञान आहे असे मानण्यात येऊ लागले आहे.

समाजामध्ये वावरणाऱ्या मनुष्याच्या वर्तनाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास सामाजिक मानसशास्त्र करते. समाजातील प्रत्येक व्यक्तीच्या आचरणावर इतर व्यक्तींचा प्रत्यक्षपणे अगर अप्रत्यक्षपणे आणि व्यक्तिशः अगर समूह-रूपाने नेहमी परिणाम होत असतो. तसेच प्रत्येक व्यक्तीच्या आचरणाचा त्याच्याशी संबंधित असलेल्या व्यक्तींवर या ना त्या रूपाने परिणाम होत असतो. समाजातील व्यक्तींच्यामध्ये परस्परांवर परिणाम करण्याची जी क्रिया चालू असते तिला 'आंतरक्रिया' ( interaction ) असे म्हणतात. या आंतरक्रियेचा सर्वांगीण अभ्यास सामाजिक मानसशास्त्र करते. म्हणून "सामाजिक उद्दीपक परिस्थितीमध्ये व्यक्तींचा अनुभव व आचरण यांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणारे विज्ञान ते सामाजिक मानसशास्त्र होय" अशी सामाजिक मानसशास्त्राची व्याख्या केली आहे. [1]

मानव-समाजाचा आणि विशेषतः मानवांच्या परस्पर-संबंधांचा किंवा मनुष्याच्या इतर मनुष्यांशी होणाऱ्या वर्तनाचा अभ्यास समाजशास्त्र करते. याचा अर्थ असा की सामाजिक आंतरक्रियेच्या अभ्यासाला समाजशास्त्रात देखील महत्त्व आहे. म्हणून समाजशास्त्र व सामाजिक मानसशास्त्र या दोन्ही विज्ञानांत आंतरक्रियेच्या अभ्यासाला प्राधान्य दिले जाते. ही आंतरक्रिया खालीलप्रमाणे तीन प्रकारची असते.

१) व्यक्तींची परस्परांमधील आंतरक्रिया,
२) व्यक्तींची त्यांच्या समूहांशी होणारी आंतरक्रिया, व
३) समूहांची एकमेकांशी होणारी आंतरक्रिया.

1. "Social Psychology is the scientific study of the experience and behaviour of individuals in relation to social stimulus situations." – Sherif and Sherif.

या तिन्ही प्रकारच्या आंतरक्रियांचा सांगोपांग अभ्यास दोन्ही विज्ञानांत केला जातो. म्हणून समाजशास्त्र व सामाजिक मानसशास्त्र यांचे निकटचे संबंध प्रस्थापित झाले आहेत. अभ्यासविषयाच्या या साधर्म्यामुळे दोन्ही विज्ञानांतील सहकार्य वाढत आहे. इतकेच नव्हे तर दोन्ही विज्ञाने परस्परांना पूरक झाली आहेत व यापैकी कोणत्याही एका विज्ञानाच्या अभ्यासकाला दुसऱ्या विज्ञानाचे ज्ञान असणे आवश्यक झाले आहे. म्हणून कित्येक विद्यापीठांतून समाजशास्त्र व सामाजिक मानसशास्त्र यांचे एकत्रित शिक्षण दिले जाते. दोन्ही विज्ञानांवर अधिकृत ग्रंथ लिहिणारे विद्वान समाजशास्त्रज्ञांत व सामाजिक मानसशास्त्रज्ञांत दिसून येतात.

समाजशास्त्र व सामाजिक मानसशास्त्र ही दोन विज्ञाने जरी एकमेकांच्या इतकी जवळ आली असली तरी त्यांच्यामध्ये मूलभूत फरक आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे. दोन्ही विज्ञानांचा अभ्यासविषय सामाजिक आंतरक्रिया (social interaction) हा आहे. परंतु या आंतरक्रियेच्या विशिष्ट बाजूचाच अभ्यास या विज्ञानात केला जातो. सामाजिक मानसशास्त्रात सामाजिक आंतरक्रियेची प्रक्रिया अभ्यासिली जाते तर समाजशास्त्रात सामाजिक आंतरक्रियेचे प्रकार अभ्यासण्यावर लक्ष दिले जाते. व्यक्तीचे समाजीकरण (socialization) कसे होते, ज्या समूहांत ती वाढते अगर वावरते त्या समूहांच्या अभिवृत्ती (attitudes) व मते (opinions) कशी आत्मसात करते आणि आपला प्रभाव त्या समूहांवर कसा पाडते इत्यादी आंतरक्रियेच्या मानसिक प्रक्रिया जाणून घेण्याचा विशेष प्रयत्न सामाजिक मानसशास्त्रज्ञ करतात. म्हणून अमेरिकेतील प्रसिद्ध सामाजिक मानसशात्रज्ञ डॉ. **गार्डनर मर्फी** यांचे असे मत आहे की "व्यक्ती एखाद्या सामाजिक समूहाची कशा रीतीने सभासद होते व त्या समूहात ती कशा प्रकारे काम करते याचा अभ्यास मुख्यतः सामाजिक मानसशास्त्र करते."[1]

याचा अर्थ असा की व्यक्तीला प्राधान्य देऊन सामाजिक आंतरक्रियेचा अभ्यास सामाजिक मानसशास्त्रात केला जातो. याच्या उलट समाजशास्त्रीय अभ्यासांत समूहाला प्राधान्य देतात व समूह हा अभ्यासाचा घटक समजतात. व्यक्तींच्या आंतरक्रियांमुळे कुटुंब, कुल (clan), समुदाय (community) इत्यादी समूह आणि विवाह, मालमत्ता, धर्म आदी संस्था (institutions) निर्माण होतात आणि अशा समूहांचा व संस्थांचा अभ्यास समाजशास्त्र करते. समूहांची सुरवात

---

1. "Social Psychology is the study of the way in which the individual becomes a member of, and functions in, a social group." —Gardner Murphy.

व वाढ, त्यांचे सातत्य, त्यांचे सभासदांवरील नियंत्रण, त्यांच्यांतील परिवर्तन इत्यादी समूहविषयक बाबींच्या अभ्यासावर समाजशास्त्र भर देते. उदाहरणार्थ, दरोडे–खोरांच्या टोळीचा ( gang ) अभ्यास करताना टोळीच्या अस्तित्त्वाला पोषक अशी सामाजिक व आर्थिक कारणे, टोळी आणि शिक्षण, धर्म अशा सामाजिक संस्था यांतील संबंध, टोळी आणि कायदा व सुव्यवस्था यांच्याशी असलेला संबंध, अशा टोळयांमुळे समाजजीवनावर होणारे परिणाम इत्यादी टोळी–( समूह ) विषयक बाबींचा समाजशास्त्रज्ञ विचार करतात; तर त्या टोळीतील व्यक्तींचे स्वभावविशेष, त्यांची वैयक्तिक माहिती, त्यांची बौद्धिक पात्रता, त्यांच्यावर टोळीचा होणारा परिणाम इत्यादी व्यक्तिविषयक बाबींवर सामाजिक मानसशास्त्रज्ञ लक्ष देतात.

समाजशास्त्र व सामाजिक मानसशास्त्र यांमध्ये हा दृष्टिकोणविषयक फरक असला तरी प्रत्यक्ष अभ्यास करताना दोन्ही विज्ञानांच्या अभ्यासकांना सामूहिक व वैयक्तिक बाजूंचा विचार करावाच लागतो. कारण समूह हा व्यक्तींचाच बनलेला असतो आणि व्यक्तींना समूहाखेरीज अस्तित्त्व असत नाही. म्हणूनच समाजशास्त्र व सामाजिक मानसशास्त्र यांमध्ये बरीच समानता दिसते.

## ७. समाजशास्त्र व समाज-कार्य

समाजशास्त्र व समाज-कार्य ( Social Work ) ही एकच आहेत अशी पुष्कळ लोकांची समजूत असते. परंतु ही दोन स्वतंत्र सामाजिक विज्ञाने आहेत. समाजशास्त्र या विज्ञानात मनुष्याच्या सामाजिक वर्तनाचा विचार करताना मनुष्याच्या इतरांशी असणाऱ्या संबंधांचा अभ्यास केला जातो. मानवी वर्तनाच्या सर्व बाजू समजावून घ्याव्यात हा समाजशास्त्राचा मुख्य उद्देश आहे. समाज-कार्य या विज्ञानात व्यक्ती व तिचे पर्यावरण (environment) यांमधील संबंध कसे जास्ती प्रभावी व समाधानकारक होतील याचा विचार केला जातो. पर्यावरणामध्ये व्यक्तीच्या भोवतालच्या सामाजिक, सांस्कृतिक आदी परिस्थितीचा समावेश होतो आणि व्यक्ती अशा पर्यावरणाशी कशा प्रकारे उत्तम समरस होऊ शकेल याचा मार्ग समाज-कार्य दाखविते. म्हणून समाज-कार्य हे चिकित्सात्मक (therapeautic) किंवा परिहारक (curative) पद्धतीचे विज्ञान आहे. समाजशास्त्र व समाजकार्य या विज्ञानांची क्षेत्रे व हेतू यांमध्ये मूलभूत फरक असले तरी समाजकार्याच्या अभ्यासकांना समाजशास्त्रीय ज्ञानावर अवलंबून राहणे भाग पडते. व्यक्ती व पर्यावरण यांच्या अन्योन्य समायोजनाचे (mutual adiustment) उत्कृष्ट उपाय

सुचविण्यासाठी समाज-कार्याच्या अभ्यासकांना मानवी वर्तनाच्या प्रेरणा व प्रकार, मानवी संबंधांची गतिशीलता (dynamics of human relations), सामाजिक समस्या, समाजरचना इत्यादी समाजशास्त्रीय विषयांचे सम्यक् ज्ञान असणे आवश्यक ठरते. समाजशास्त्रीय ज्ञानावर आधारलेल्या निष्कर्षांचा समाज-कार्याची दिशा निश्चित करताना फार उपयोग होतो. म्हणून समाजशास्त्र व समाज-कार्य या दोन विज्ञानांचे निकटचे संबंध आहेत. समाज-कार्याचे विशेष शिक्षण घेणाऱ्यांना समाजशास्त्राचा अभ्यास करावा लागतो.

## ६. *समाजशास्त्र व जीवशास्त्र*

जीवशास्त्र ( Biology ) एक नैसर्गिक विज्ञान आहे. प्राण्यांची उत्पत्ती व विकास यांविषयी सविस्तर अभ्यास करणे जीवशास्त्राचे प्रमुख कार्य आहे. जीवांची उत्क्रांती, त्यांचे शारीरिक गुणधर्म, त्यांच्या शरीररचनेत होणारे बदल, पर्यावरणाचे ( environment ) त्यांच्यावर होणारे परिणाम, त्यांची आनुवंशिकता ( mechanism of heredity ) इत्यादी बाबींवर जीवशास्त्र लक्ष केंद्रित करते. जीवशास्त्राच्या दृष्टीने मनुष्य देखील एक प्राणी असल्याने इतर प्राण्यांप्रमाणे मनुष्याचा सुद्धा अभ्यास जीवशास्त्र करते. जीवशास्त्र करीत असलेल्या मनुष्य-प्राण्याच्या अभ्यासाची समाजशास्त्रीय अभ्यासाला फार मदत होते. मनुष्य हा सस्तन ( mammals ) प्राण्याच्या कोटीतील वरच्या दर्जाचा प्राणी असल्याने त्या प्राण्यांच्या शारीरिक गुणधर्मांवरून मनुष्याची शरीररचना व शारीरिक कार्ये यांची समग्र माहिती मिळते. या माहितीच्या आधारे मनुष्यांची वंशवार विभागणी करण्यास व मानवांचा वांशिक दृष्ट्या विचार करण्यास समाजशास्त्रज्ञांना सोपे जाते. तसेच सस्तन प्राण्यांना जगण्यासाठी जन्मानंतर बराच काल स्वजातीय ( same species ) प्राण्यांच्या सहकार्यावर अवलंबून रहावे लागते. सर्व सस्तन प्राण्यांचे अस्तित्व व त्यांचे परंपरागत सातत्य टिकले आहे कारण स्वजातीय प्राण्यांच्या समवेत ते नेहमी राहतात व एकमेकांना मदत करतात. म्हणून सस्तन प्राण्यांमध्ये सामाजिकता दिसून येते व त्यांना सामाजिक स्वरूपाचे प्राणी ( social species ) म्हणतात. तेव्हा प्राण्यांच्या सामाजिक जीवनाची कल्पना सस्तन प्राण्यांच्या जीवनावरून येते. मनुष्य देखील एक सस्तन कोटीतील प्राणी आहे म्हणून मनुष्याच्या सामाजिक जीवनाचा विचार करताना समाजशास्त्राच्या अभ्यासकांना जीवशास्त्राने दिलेल्या सस्तन व मानवसदृश प्राण्यांच्या सामूहिक जीवनाच्या माहितीचा अतिशय उपयोग होतो. शिवाय, जनसंख्येच्या समस्येच

अभ्यास करताना समाजशास्त्राला जीवशास्त्राची मदत होते. कारण इतर प्राण्यां-प्रमाणे मनुष्यप्राण्यांना देखील जिवंत राहण्याकरता लागणाऱ्या मूलभूत गरजा भागविण्यासाठी जनसंख्येचा प्रश्न सोडवावा लागतो. तसेच, जीवशास्त्रावर आधारलेल्या औषधीविज्ञानाबरोबर ( medicine ) समाजशास्त्राचे निकटचे संबंध आहेत. आहारयोजना, स्वास्थ्यसंरक्षण, रोगनिर्मूलन इत्यादी जीवनाशी संबंधित अशा महत्त्वाच्या वैद्यकीय बाबींचा विचार करताना मनुष्याची सामूहिक व वैयक्तिक वागणूक लक्षात घ्यावी लागते. वरील गोष्टींशिवाय, 'मानवी जीवनाच्या सातत्यामध्ये वनस्पती व पशू यांची काय मदत होते' या विषयाच्या अभ्यासात जीवशास्त्राने समाजशास्त्राला बरीच मदत केली आहे. मनुष्याला जगण्यासाठी भोवतालच्या भौगोलिक व सामाजिक परिस्थितींशी जुळते घ्यावे लागते. मनुष्य करीत असलेल्या या अभ्यनुकूलनाच्या (adaptation) अभ्यासाला मानवपरि-स्थितिविज्ञान (human ecology) असे म्हणतात आणि समाजशास्त्रात त्याला महत्त्वाचे स्थान आहे. मानव–परिस्थितिविज्ञानाची समग्र कल्पना वनस्पति–परिस्थिति विज्ञान (plant ecology) व पशु–परिस्थितिविज्ञान (animal ecology) या जीवशास्त्रांतर्गत विज्ञान शाखांच्या अभ्यासावरून येते.

या सर्व कारणांमुळे समाजशास्त्र व जीवशास्त्र यांचे घनिष्ठ संबंध आहेत.

## ७. समाजशास्त्र व इतिहास

समाजात राहणाऱ्या मनुष्याच्या जीवनाचा कालानुक्रमे अभ्यास इतिहासात केला जातो. इतिहासात फक्त राज्यविषयक घडामोडींचीच दखल घेतली जाते अशी सर्वसाधारण समजूत असते. पण ती चुकीची आहे. जीवनाच्या सर्व अंगांचा विस्तृत विचार कालाची कोठलीही मर्यादा न बाळगता इतिहासात केला जातो. इतिहास हे विज्ञान आहे की नाही याविषयी इतिहासकारांत एकमत नाही. अभ्यासविषयाशी संबंधित माहिती मिळविताना इतिहास वैज्ञानिक पद्धतीचा अवलंब करते, परंतु त्या माहितीच्या आधारे सर्वमान्य नियम ( generalisations ) प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करीत नाही. म्हणून इतिहासाला विज्ञानाच्या सदरात घालता येणार नाही असे सांगण्यात येते. तसेच **अर्नोल्ड टायन्बी** किंवा **ओस्वाल्ड स्पेंग्लर** यांच्यासारख्या इतिहासातील सर्वमान्य नियम किंवा ऐतिहासिक सिद्धांत प्रतिपादन करणाऱ्या प्रथितयश इतिहासकारांना समाजशास्त्रज्ञ किंवा तत्त्वज्ञ असे संबोधिण्यात येते. काही असले तरी सर्व सामाजिक विज्ञानांना इतिहासावर अवलंबून राहावे लागते कारण फक्त इतिहासातच विविध प्रकारची मानवी जीवनाची माहिती नमूद झालेली

असते. तेव्हा इतर सामाजिक विज्ञानांप्रमाणे समाजशास्त्राला उपयोगी अशी माहिती इतिहासात आढळते. उदाहरणार्थ, मानव-समाजाचा तौलनिक पद्धतीने ( comparative method ) अभ्यास करताना समाजशास्त्रज्ञांना विविध कालखंडांतील माहिती हवी असते आणि ती फक्त इतिहासकारच पुरवू शकतात.

इतिहासकार व समाजशास्त्रज्ञ समाजात राहणाऱ्या मानवाच्या वर्तनाचा अभ्यास करीत असले तरी त्यांच्या अभ्यासाच्या दृष्टिकोणात व स्वरूपात महत्त्वाचे फरक आहेत. ऐतिहासिक घटना कालानुक्रमे व्यवस्थित लावण्याचा प्रयत्न इतिहासकार करतात, तर त्या घटनांच्या आधारे समाजजीवनाचे सर्वमान्य नियम प्रतिपादन करण्याचा समाजशास्त्रज्ञांचा प्रधान हेतू असतो. 'राज्यक्रांती'च्या अभ्यासाच्या उदाहरणावरून हा फरक स्पष्ट होईल. इतिहासकार एखाद्या देशातील राज्यक्रांतीचे फक्त सविस्तर वर्णन करतील, तर समाजशास्त्रज्ञ अशा प्रकारच्या विविध देशांतील राज्यक्रांतीविषयी माहिती मिळवून त्याच्या आधारे राज्यक्रांतीसंबंधी सामान्य नियम सांगतील. त्यामुळे कोठल्याही देशातील राज्यक्रांतीची कल्पना येण्यास सोपे जाते. शिवाय घटनांच्या कोणत्या बाबींना महत्त्व द्यावयाचे याविषयी दोहोंत भेद आहेत. घटनांमधील अनन्य घडामोडींवर ( unique occurrences ) इतिहासकार भर देतात. पण समाजशास्त्रज्ञ मात्र अशा घटनांमधील मूलभूत समानता शोधून काढण्यावर लक्ष केंद्रित करतात. 'युद्धा'संबंधीच्या अभ्यासाच्या स्वरूपाचे उदाहरण घेता येईल. पहिले महायुद्ध, दुसरे महायुद्ध यांसारख्या मोठमोठ्या युद्धांचा विचार करताना अशा प्रत्येक युद्धाची कारणे, परिणाम व युद्धकालीन विशेष घटना यांची माहिती इतिहासकार देतात. परंतु समाजशास्त्रज्ञ पहिले महायुद्ध, दुसरे महायुद्ध यांसारख्या युद्धांचा वेगवेगळा विचार करीत नाहीत. ते सर्व युद्धांमधून दिसून येणाऱ्या समान बाबींचा अभ्यास करतात व त्यावरून 'युद्ध' ही एक सामाजिक घटना कशी आहे हे दाखविण्याचा प्रयत्न करतात. तेव्हा मानवी वर्तनाचा एक प्रकार म्हणून युद्धाकडे समाजशास्त्रज्ञ पाहतात व कोणत्या सामाजिक परिस्थितीमध्ये हा प्रकार घडतो याचा विचार करतात.

तसेच, एखाद्या देशात विशिष्ट काली घडलेल्या घटनांचा विचार इतिहासकार करतात, तर त्या घटनांशी संलग्न असलेल्या सामाजिक संबंधांचा सखोल अभ्यास समाजशास्त्रज्ञ करतात. नेपोलियनने केलेल्या युद्धांचे वर्णन करताना इतिहासकार त्या युद्धांशी संबंधित घडामोडींवरच भर देतील. पण या युद्धांचा लोकजीवनावर झालेला परिणाम, या युद्धांनी नंतरच्या काळात युरोपमध्ये राष्ट्रवादी वृत्तीच्या प्रचारात केलेले कार्य, जनतेच्या उठावात असलेले प्रचार-तंत्राचे

महत्त्व इत्यादी बाबींवर समाजशास्त्रज्ञ विशेष लक्ष देतील. एकूण, घटनांचा सांगोपांग विचार करून समाज–जीवनात त्याना असलेल्या महत्त्वाच्या स्थानांची चर्चा समाजशास्त्रज्ञ करतात. घटनांच्या अभ्यासाचे हे स्वरूप इतिहासात दिसत नाही.

## ८. *समाजशास्त्र व तत्वज्ञान*

तत्त्वज्ञानाच्या चिंतनामधून समाजशास्त्र उदयास आले. मानवी इतिहासाच्या मार्गाची कारणमीमांसा द्यावी, युरोपमध्ये एकोणिसाव्या शतकात झालेल्या अभूतपूर्व सामाजिक उलथापालथीचे विवरण करावे आणि सामाजिक नीती अगर कार्यप्रणाली (social policy) निश्चित करण्यासाठी मार्गदर्शनपर सामाजिक मते किंवा सिद्धांत (social doctrines) प्रतिपादन करावेत अशा तत्त्वज्ञान-विषयक हेतूंतून समाजशास्त्राचा जन्म झाला. नंतरच्या काळात समाजशास्त्राचे हे हेतू पुष्कळ अंशी मागे पडले कारण समाजशास्त्राला एका सामाजिक विज्ञानाचे स्वरूप आले. हल्ली तर हे हेतू कोणी मान्य करीत नाहीत. असे असले तरी अजून देखील समाजशास्त्राचे तत्त्वज्ञानाशी तीन बाबतीत संबंध आहेत.

पहिली गोष्ट अशी की ज्याप्रमाणे विज्ञानाचे तत्त्वज्ञान ( Philosophy of Science ) आहे त्याप्रमाणे समाजशास्त्राचे तत्त्वज्ञान ( Philosophy of Sociology) आहे. समाजशास्त्राच्या तत्त्वज्ञानात समाजशास्त्राच्या अभ्यास-पद्धती, संकल्पना ( concepts ), विचारसरणी आदींचे परीक्षण केले जाते. असे तात्त्विक परीक्षण समाजशास्त्राच्या अभ्यासात नेहमी करतात आणि नैसर्गिक विज्ञानाच्या अभ्यासापेक्षा समाजशास्त्राच्या अभ्यासात त्याची जास्ती जरूरी आहे.

दुसरी बाब अशी की समाजशास्त्राचे सामाजिक तत्त्वज्ञानाशी (Social philosophy) निकटचे संबंध आहेत. सामाजिक तत्त्वज्ञान अतिशय विशाल असून त्याचे ज्ञान–मीमांसा (Epistemology) व मूल्य–मीमांसा (Axiology) असे दोन मुख्य विभाग आहेत. पहिल्या विभागात ज्ञानविषयक सर्व प्रश्नांचे विवरण केलेले आढळते. मनुष्य, समाज, न्याय, सुख इत्यादी सामाजिक जीवनाशी निगडित असलेल्या मूलभूत कल्पनांचे आकलन सामाजिक तत्त्वज्ञानाच्या या शाखेत केले जाते. मूल्य-मीमांसा शाखेत सामाजिक जीवनाची अंतिम मूल्ये व ती साध्य करून घेण्याचे उपाय या महत्त्वपूर्ण प्रश्नांचा उहापोह केला जातो. मानवी मूल्यांचे हे विवेचन समाजशास्त्रज्ञांना फार उपकारक ठरते. मानवाचे सामाजिक वर्तन हा समाजशास्त्राचा

अभ्यास विषय आहे आणि हे वर्तन मानवांनी मान्य केलेल्या मूल्यांवर आधारलेले असते. तेव्हा मानवाने मान्यता दिलेल्या मूल्यांची कल्पना आल्याखेरीज त्याचे सामाजिक वर्तन कळणार नाही. यासाठी समाजशास्त्रज्ञांना मानवांच्या मूल्यांचा ( human valuations ) सामाजिक घटना किंवा वस्तुस्थिती ( social facts ) म्हणून अभ्यास करावा लागतो. साहजिकच सर्व मूल्यांचा सांगोपांग विचार करणाऱ्या सामाजिक तत्त्वज्ञानाचा परिचय असला म्हणजे समाजशास्त्रज्ञांना काही विवक्षित मूल्यांवर आधारलेले मानवाचे सामाजिक वर्तन समजण्यास सोपे जाते.

तिसरी गोष्ट अशी की समाजशास्त्र तत्त्वज्ञानाविषयक विचारांना प्रत्यक्षपणे चालना देते. प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ **डुरखाइमच्या** मते तत्त्वज्ञानविषयक प्रश्न उपस्थित करण्यास दुसऱ्या कोणत्याही विज्ञानापेक्षा समाजशास्त्र जास्ती मदत करते, कारण समाजशास्त्रीय विचारांची साहजिकपणे तत्त्वज्ञानविषयक विचारांत परिणती होते. [1] डुरखाइमच्या लिखाणातच अशा प्रकारची वाढ झाल्याचे प्रत्ययास येते. धर्म–संस्थेच्या समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून केलेल्या अभ्यासात सामाजिक परिस्थितीमुळे विचारांच्या वर्गीकरणावर ( categories of thought ) होणाऱ्या प्रभावाची चर्चा करताना डुरखाइमने शेवटी तत्त्वज्ञानाच्या ज्ञान-मीमांसाविषयक प्रश्नांची चर्चा केली आहे. समाजाचा साकल्याने अभ्यास करीत असताना समाजशास्त्रज्ञांना साहजिकच तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रातील विषय सुचतात आणि समाजशास्त्रज्ञ अशा विषयांची चर्चा देखील आपल्या ग्रंथांत करतात.

---

1 " I believe that sociology, more than any other science, has a contribution to make to the renewal of philosophical questions .... sociological reflection is bound to prolong itself by a natural progress in the form of philosophical reflection. " – Emile Durkheim.

# ५

# मानव समाज

समाजशास्त्र हे समाजाविषयीचे सामान्य विज्ञान आहे. पुष्कळ वेगवेगळ्या समाजांच्या अभ्यासावर ते आधारलेले आहे, कारण कोणत्याही एका समाजाच्या अभ्यासावर सामान्य विज्ञानाची उभारणी करता येणार नाही. शिवाय, प्रत्येक समाजाची स्वतःची अशी संस्कृती असते. तेव्हा विज्ञानाची व्यापकता ( generality ) मोठ्या प्रमाणावर येण्यासाठी विविध समाजांच्या अभ्यासाची अतिशय जरुरी असते. म्हणून सर्व प्रकारच्या समाजांचा अभ्यास समाजशास्त्र करते. आदिवासी लोकांच्या समाजाबरोबर सुधारलेल्या आधुनिक लोकांच्या समाजाचा देखील विचार समाजशास्त्र करते. स्वकीयांच्या समाजाप्रमाणे परकीयांच्या समाजांचा सुद्धा परामर्श समाजशास्त्र घेते. इतकेच नव्हे तर कृमी, कीटक, पक्षी, पशु इत्यादी मानवेतर प्राण्यांच्या समाजांची दखल समाजशास्त्र घेते. पण मुख्यतः मानव–समाजाच्या अभ्यासावर समाजशास्त्र विशेष भर देते. तेव्हा समाजशास्त्राच्या अभ्यासामध्ये मानव–समाजाविषयी यथार्थ ज्ञान असले पाहिजे. त्यासाठी समाजाचे स्वरूप, समाजाच्या मूलभूत गरजा, समाजाचे प्रकार इत्यादी आनुषंगिक तात्त्विक बाबींचा वचार केला पाहिजे.

## १. समाजाचे स्वरूप

"समाज" ही संज्ञा जेव्हा व्यापक अर्थाने वापरण्यात येते तेव्हा त्या संज्ञेमध्ये मानवांच्या परस्परांशी येणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या व स्थितीच्या संबंधांचा ( every kind and degree cf relationship ) समावेश होतो. याचा अर्थ असा की सामाजिक संबंधांच्या एकूण व्यवस्थेला किंवा पद्धतीला समाज ही संज्ञा लावण्यात येते. तेव्हा समाज म्हणजे सर्व प्रकारच्या सामाजिक संबंधांचे एक जाळे आहे. सामाजिक संबंध नेहमी बदलत असतात, म्हणून समाज देखील बदलणारा असतो.

सामाजिक सबंधांवर समाजाची संकल्पना ( concept of society ) आधारलेली असल्याने सामाजिक संबंधांचे स्वरूप समजून घेतले पाहिजे. सामाजिक संबंध हे व्यक्तींच्या परस्परांविषयीच्या अस्तित्त्वाच्या जाणीवेमधून निर्माण होतात. आपल्याशी संबंध येणाऱ्या व्यक्तींच्या आस्तित्त्वाचे भान जेव्हा असते तेव्हा त्या संबंधांना सामाजिक संबंध असे म्हणतात. सामाजिक संबंध हे मानसिक स्थितीवर अवलंबून असतात म्हणून सामाजिक संबंध हे भौतिक संबंधांहून सर्वथैव भिन्न असतात. अग्नि व त्यातून निघणारा धूर, पाणी व त्यावर चालणारी नाव, टेबल व त्यावर ठेवलेली फुलदाणी , यांचे परस्परांशी असणारे संबंध भौतिक स्वरूपाचे असतात. कारण भौतिक संबंधांमध्ये एकमेकांशी संबंध येणाऱ्या दोन किंवा अनेक निर्जीव वस्तूंपैकी कोणत्याही एका वस्तूला इतर वस्तूंच्या अस्तित्त्वाबद्दलचे भान असत नाही. भौतिक संबंधांमध्ये मानसिक बाजूचा अभाव असतो भौतिक संबंधांमध्ये वस्तूंचा एकमेकांवर परिणाम होत नाही अशातला भाग नाही. वस्तू जेव्हा जवळ येतात तेव्हा त्यांच्यामध्ये अन्योन्य परिणाम होतच असतात. परंतु त्या वस्तूंना एकमेकांच्या अस्तित्त्वाची सुतराम् कल्पना देखील असत नाही. तेव्हा परस्परांच्या अस्तित्त्वाच्या जाणीवेवर भौतिक संबंध अवलंबून असत नाहीत. पण ही जाणीव असल्याखेरीज सामाजिक संबंध निर्माण होत नाहीत. पर्यायाने समाज अस्तित्त्वात येत नाही.

संबंध येणाऱ्या व्यक्तींच्या अस्तित्त्वाचे परस्परांना भान असणे हे सामाजिक संबंधांचे प्रमुख लक्षण असल्याने विविध तऱ्हेचे सामाजिक संबंध सर्वत्र आढळून येतात. आई व मूल, पती व पत्नी, मालक व नोकर, विक्रेता व ग्राहक, उमेदवार व मतदार, गुरू व शिष्य, मित्रपरिवार, उभय संघांतील खेळाडू इत्यादिकांचे अन्योन्य संबंध सामाजिक संबंधांचेच विभिन्न प्रकार आहेत. त्यांचे आपण 'आर्थिक,' राजकीय,' 'धार्मिक,' 'व्यक्तिगत,' 'व्यक्तिनिरपेक्ष,' 'मित्रत्वाचे,' 'विरोधयुक्त' अशा

# ५

# मानव समाज

समाजशास्त्र हे समाजाविषयीचे सामान्य विज्ञान आहे. पुष्कळ वेगवेगळया समाजांच्या अभ्यासावर ते आधारलेले आहे, कारण कोणत्याही एका समाजाच्या अभ्यासावर सामान्य विज्ञानाची उभारणी करता येणार नाही. शिवाय, प्रत्येक समाजाची स्वतःची अशी संस्कृती असते. तेव्हा विज्ञानाची व्यापकता ( generality ) मोठ्या प्रमाणावर येण्यासाठी विविध समाजांच्या अभ्यासाची अतिशय जरुरी असते. म्हणून सर्व प्रकारच्या समाजांचा अभ्यास समाजशास्त्र करते. आदिवासी लोकांच्या समाजाबरोबर सुधारलेल्या आधुनिक लोकांच्या समाजाचा देखील विचार समाजशास्त्र करते. स्वकीयांच्या समाजाप्रमाणे परकीयांच्या समाजांचा सुद्धा परामर्श समाजशास्त्र घेते. इतकेच नव्हे तर कृमी, कीटक, पक्षी, पशु इत्यादी मानवेतर प्राण्यांच्या समाजांची दखल समाजशास्त्र घेते. पण मुख्यतः मानव–समाजाच्या अभ्यासावर समाजशास्त्र विशेष भर देते. तेव्हा समाजशास्त्राच्या अभ्यासामध्ये मानव–समाजाविषयी यथार्थ ज्ञान असले पाहिजे. त्यासाठी समाजाचे स्वरूप, समाजाच्या मूलभूत गरजा, समाजाचे प्रकार इत्यादी आनुषंगिक तात्त्विक बाबींचा वचार केला पाहिजे.

## १. समाजाचे स्वरूप

" समाज " ही संज्ञा जेव्हा व्यापक अर्थाने वापरण्यात येते तेव्हा त्या संज्ञेमध्ये मानवांच्या परस्परांशी येणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या व स्थितीच्या संबंधांचा ( every kind and degree of relationship ) समावेश होतो. याचा अर्थ असा की सामाजिक संबंधांच्या एकूण व्यवस्थेला किंवा पद्धतीला समाज ही संज्ञा लावण्यात येते. तेव्हा समाज म्हणजे सर्व प्रकारच्या सामाजिक संबंधांचे एक जाळे आहे. सामाजिक संबंध नेहमी बदलत असतात, म्हणून समाज देखील बदलणारा असतो.

सामाजिक सबंधांवर समाजाची संकल्पना ( concept of society ) आधारलेली असल्याने सामाजिक संबंधांचे स्वरूप समजून घेतले पाहिजे. सामाजिक संबंध हे व्यक्तींच्या परस्परांविषयीच्या अस्तित्त्वाच्या जाणीवेमधून निर्माण होतात. आपल्याशी संबंध येणाऱ्या व्यक्तींच्या आस्तित्त्वाचे भान जेव्हा असते तेव्हा त्या संबंधांना सामाजिक संबंध असे म्हणतात. सामाजिक संबंध हे मानसिक स्थितीवर अवलंबून असतात म्हणून सामाजिक संबंध हे भौतिक संबंधांहून सर्वथैव भिन्न असतात. अग्नि व त्यातून निवणारा धूर, पाणी व त्यावर चालणारी नाव, टेबल व त्यावर ठेवलेली फुलदाणी , यांचे परस्परांशी असणारे संबंध भौतिक स्वरूपाचे असतात. कारण भौतिक संबंधांमध्ये एकमेकांशी संबंध येणाऱ्या दोन किंवा अनेक निर्जीव वस्तूंपैकी कोणत्याही एका वस्तूला इतर वस्तूंच्या अस्तित्त्वा–बद्दलचे भान असत नाही. भौतिक संबंधांमध्ये मानसिक बाजूचा अभाव असतो भौतिक संबंधांमध्ये वस्तूंचा एकमेकांवर परिणाम होत नाही अशातला भाग नाही. वस्तू जेव्हा जवळ येतात तेव्हा त्यांच्यामध्ये अन्योन्य परिणाम होतच असतात. परंतु त्या वस्तूंना एकमेकांच्या अस्तित्त्वाची सुतराम् कल्पना देखील असत नाही. तेव्हा परस्परांच्या अस्तित्त्वाच्या जाणीवेवर भौतिक संबंध अवलंबून असत नाहीत. पण ही जाणीव असल्याखेरीज सामाजिक संबंध निर्माण होत नाहीत. पर्यायाने समाज अस्तित्त्वात येत नाही.

संबंध येणाऱ्या व्यक्तींच्या अस्तित्त्वाचे परस्परांना भान असणे हे सामाजिक संबंधांचे प्रमुख लक्षण असल्याने विविध तऱ्हेचे सामाजिक संबंध सर्वत्र आढळून येतात. आई व मूल, पती व पत्नी, मालक व नोकर, विक्रेता व ग्राहक, उमेदवार व मतदार, गुरू व शिष्य, मित्रपरिवार, उभय संघांतील खेळाडू इत्यादिकांचे अन्योन्य संबंध सामाजिक संबंधांचेच विभिन्न प्रकार आहेत. त्यांचे आपण 'आर्थिक,' 'राजकीय,' 'धार्मिक,' 'व्यक्तिगत,' 'व्यक्तिनिरपेक्ष,' 'मित्रत्त्वाचे,' 'विरोधयुक्त' अशा

अनेक रीतींनी वर्गीकरण करतो. विविध स्वरूपाचे सामाजिक संबंध मानवी जीवनात आढळून येतात. तेव्हा सामाजिक संबंधांचे क्षेत्र अतिशय व्यापक आहे हे उघड आहे. त्यामध्ये एकाच प्रकारचे संबंध असत नाहीत. तसेच सामाजिक संबंध हे सहकार्याचे अथवा सहकारी वृत्तीवर भर देणारेच असतात अशी कल्पना करता कामा नये. कित्येक संबंध वैरभाव किंवा संघर्ष यावर देखील आधारलेले असतात. विरुद्ध बाजूंच्या सैनिकांचे अन्योन्य संबंध हे सामाजिक संबंध आहेत कारण त्यात एकमेकांच्या अस्तित्वाची पुरेपूर जाणीव असते. पण या संबंधांत शत्रुत्वाची किंवा दुसऱ्याचा विनाश करण्याची भावना प्रमुख असते. तेव्हा तात्त्विक दृष्टचा सहकारी संबंधांप्रमाणे विनाशकारी संबंध सुद्धा सामाजिक संबंधांत मोडतात. असे असले तरी हे मान्य केले पाहिजे की सामाजिक संबंधांमध्ये सहयोगाच्या भावनेवर अधिष्ठित झालेले संबंध मोठ्या प्रमाणात दिसून येतात. सामान्यतः सामाजिक संबंधांच्या मागे एकत्वाची किंवा आपलेपणाची प्रवृत्ती आढळून येते. अशी प्रवृत्ती नसेल तर सामाजिक संबंधांमधून चिरस्थायी स्वरूपाच्या सामाजिक संस्था अगर समूह निर्माण होणार नाहीत.

सामाजिक संबंधांची कक्षा विस्तृत आहे. मानवजीवनामध्ये विविध प्रकारचे सामाजिक संबंध आढळतात. पण मानवजीवनापुरतीच सामाजिक संबंधांची मर्यादा घालता येत नाही. पशु, पक्षी, कीटक इत्यादी प्राण्यांच्या जीवनामध्ये देखील सामाजिक संबंध दिसून येतात कारण त्यांच्या वर्तनात एकमेकांच्या अस्तित्वाची जाणीव असते. मुंग्या, मधमाशा यांसारख्या अगदी लहान प्राण्यांमध्ये सामाजिक संबंधांची बरीच वाढ झालेली असते. पक्ष्यांचे थवे व जनावरांचे कळप सामाजिक संबंधांचे अस्तित्त्व प्रकर्षाने दर्शवितात. इतकेच नव्हे तर जेथे जेथे जीवन ( life ) आहे तेथे तेथे सामाजिक संबंध असतात. कारण कोणत्याही प्राण्यांना जगण्यासाठी व प्रजोत्पत्तीसाठी इतर प्राण्यांच्या आस्तित्त्वाची जाणीव ठेवून त्यांच्या संपर्कामध्ये यावे लागते. फरक इतकाच की प्राथमिक किंवा कनिष्ठ अवस्थेतील प्राण्यांमध्ये ही सामाजिक चेतना (social awareness) अगदी पुसट असते तर विकसित किंवा उच्च अवस्थेतील प्राण्यांमध्ये ती स्पष्टपणे दिसून येते. याही पुढे जाऊन असे म्हणता येईल की वेगवेगळ्या प्रकारच्या किंवा कोटीच्या ( species ) प्राण्यांमध्ये देखील सामाजिक संबंध असू शकतात. मनुष्य व त्याने पाळलेले विविध प्राणी किंवा मेंढ्या व त्यांच्यावर देखरेख करणारा कुत्रा यांच्यांतील संबंध हे सामाजिक संबंधांचेच प्रकार आहेत. अर्थात मानव-प्राण्यांच्या सामाजिक संबंधांचाच आपणास विचार करावयाचा आहे. कारण समाजशास्त्र फक्त मानवसमाजाचाच अभ्यास करते.

सामाजिक संबंध अपरिमित आहेत. इतकेच नव्हे तर विविध प्रकारच्या सामाजिक संबंधांची मनुष्याला नितांत आवश्यकता असते. सामाजिक संबंधांखेरीज मनुष्याला जगता येणे शक्य नाही. सामाजिक संबंधांवर आधारलेल्या आचरणामुळेच मनुष्याला आपल्या गरजा भागविता येतात, विकास साधता येतो व जीवनाचा आनंद उपभोगता येतो. म्हणूनच एकांतवासाची शिक्षा मनुष्याला अगदी भयप्रद वाटते. " मनुष्य हा एक सामाजिक प्राणी आहे " या ॲरिस्टाटलच्या प्रसिद्ध वचनाचा हाच अर्थबोध होतो की मनुष्याचे जीवन सामाजिक संबंधांवरच अवलंबून असते.

नुसते सामाजिक संबंध म्हणजे समाज नव्हे हे लक्षात ठेवले पाहिजे. जेव्हा सामाजिक संबंधांमध्ये एखादी व्यवस्था अगर पद्धती ( a system ) असते तेव्हाच त्या संबंधांना समाज ही संज्ञा आपण वापरू शकतो. म्हणून व्यक्तींमधील सामाजिक संबंधांच्या व्यवस्थेला समाज असे म्हणतात. सामाजिक संबंधांच्या या व्यवस्थेमुळे समाजाला एखादी निश्चित रचना ( determined structure ) प्राप्त होते. समाजाच्या विविध भागांची कार्ये ठरतात व त्यांचे परस्परांशी येणारे संबंध ठराविक स्वरूप धारण करतात. या निर्धारित रचनेमुळे ज्या व्यक्तींचा मिळून समाज झालेला असतो त्या समाजाचे असे स्वतंत्र अस्तित्त्व निर्माण होते आणि समाजाला सातत्य ( continuity ) प्राप्त होते. समाज हा एखाद्या घरासारखा असतो. दगड, विटा, चुना, लाकूड इत्यादी वस्तू मिळून घर होत असले तरी घराची विवक्षित अशी रचना असते व घराला स्वतंत्र असे अस्तित्त्व असते. त्याचप्रमाणे समाजाला देखील त्यातील व्यक्तींच्या पासून वेगळे असे स्वतंत्र अस्तित्त्व असते. तेव्हा व्यक्तींच्या सामाजिक संबंधांची सुव्यवस्थित योजना (organization) केल्यानेच समाज निर्माण होतो. साहजिकच समाजातील व्यक्तींमध्ये विवक्षित तऱ्हेचे साहचर्य (certain level of association) दिसून येते. संबंधित व्यक्तींना एकत्र आणून त्यांना एकत्रित स्वरूपात ठेवण्याचे कार्य समाज करीत असतो. त्यासाठी समाजाला नेहमी कार्यप्रवण ( active ) असावे लागते. समाज क्रियाशील नसेल तर त्याला समुच्चय ( aggregation ) म्हणावे लागेल कारण समान कारणामुळे एकत्रित आलेल्या व्यक्तींचा जमाव जेव्हा निष्क्रिय ( passive) असतो तेव्हा त्याला समुच्चय असे म्हणतात. उदाहरणार्थ, ओढयाला पूर आल्यामुळे सहजासहजी एके ठिकाणी जमलेल्या माणसांचा अगर जनावरांचा समुच्चय बनतो. समुच्चय कार्यप्रवण असत नाही. समाजाचे तसे नसते. निश्चित उद्दिष्टे साध्य करून घेण्यासाठी व्यक्तींमध्ये टिकाऊ ( enduring ) संबंध

निर्माण करून समाजाला नेहमी कार्यरत असावे लागते. तेव्हा सामाजिक संबंधांचे संघटन अगर व्यवस्थापन आणि त्यातील व्यक्तींच्या वर्तनाचे नियमन यामुळ समाजाचे स्वरूप ठरते व एक समाज इतर समाजांपासून वेगळा बनतो. म्हणून **डॉ. मॉरिस गिन्स्बर्ग** या प्रसिद्ध इंग्रज समाजशास्त्रज्ञाने समाजाची खालीलप्रमाणे व्याख्या केली आहे. " विशिष्ट संबंध व वर्तनाचे प्रकार यांनी एकत्रित बांधल्या गेलेल्या व्यक्तींचा समूह म्हणजे समाज होय. यामुळे अशा तऱ्हेचे संबंध न ठेवणाऱ्या किंवा दुसरे वर्तनाचे प्रकार आचरणाऱ्या व्यक्तींच्या पासून त्या समाजातील व्यक्ती वेगळ्या दिसतात."[1]

अमेरिकेतील समाजशास्त्रज्ञ **डॉ. किम्बाल यंग** यांनी समाजाचे वर्णन असे केले आहे. " समान सवयी, कल्पना व अभिवृत्ती असणाऱ्या म्हणजेच समान सामाजिक व सांस्कृतिक आशय असणाऱ्या, आणि विवक्षित प्रदेशात राहणाऱ्या, लोकांच्या जास्तीत जास्त स्थूल स्वरूपाच्या समूहाला समाज म्हणतात आणि असा समाज उदासीनपणा किंवा विरोध यावर आधारलेल्या अभिवृत्ती व कृती यांमुळे इतर समाजांपासून नेहमी वेगळा ठरतो. कोणत्याही एका समाजात विशिष्ट सामाजिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी लोकांचे एकमेकांशी संलग्न असे विविध प्रकारचे समूह असतात."[2] याचा अर्थ असा की प्रत्येक समाजाला विवक्षित स्थान (locus), स्थायित्व किंवा नित्यता (permanence) व इतिहास असतो.

वरील विवेचनावरून समाजाची चार ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील.

(१) **निश्चित प्रदेश** ( Definite Territory ) : समाज हा प्रादेशिक समूह असतो. काही भटके समाज एका भागात स्थायिक वसती न करता मोठ्या

1. "A Society is a collection of individuals united by certain relations or modes of behaviour which mark them off from others who do not enter into those relations or who differ from them in behaviour."

2. " A Society refers to the broadest grouping of people who have a certain common set of habits, ideas and attitudes, that is, a social and cultural content, living in a definite territory, and often set off from other societies by attitudes and actions of indifference or antagonism. Within any given society there exist all sorts of interconnected groupings of men for more specialised social purposes." — **Kimball Young.**

प्रदेशात सारखे फिरत असतात. असे असले तरी ज्या मोठ्या प्रदेशात ते फिरत असतात त्या प्रदेशाला ते आपला प्रदेश मानतात. तेव्हा प्रत्येक समाजाला स्वतःच्या कार्यक्षेत्रापुरता निश्चित प्रदेश असतो.

२) **प्रजोत्पादन** ( Sexual Reproduction ): समाजामध्ये नवीन व्यक्ती सामावून घेण्याचा प्रजोत्पादन हाच मुख्य मार्ग असतो. कोणत्याही समाजातील व्यक्तींची संतती त्याच समाजात राहते आणि सामान्यपणे याच मार्गाने त्या समाजाची सभासद-संख्या वाढत असते. पुष्कळ समाजांत सभासद मिळविण्याचे इतर मार्ग उपलब्ध असतात. गुलाम म्हणून आणलेल्या लोकांना, जिंकून आणलेल्या लोकांना, स्थायिक होऊ इच्छिणाऱ्या परदेशीयांना किंवा स्वेच्छेने येणाऱ्या इतर लोकांना समाजात सामावून घेतले जाते. परंतु अशा प्रकारे अगदी अल्प प्रमाणात समाजाची संख्या वाढत असते. तेव्हा समाजात होणाऱ्या प्रजोत्पादनावरच समाजाची सभासदसंख्या प्रामुख्याने अवलंबून असते.

३) **व्यापक संस्कृती** (Comprehensive Culture): प्रत्येक समाजात विशिष्ट विचारपरंपरा, नीतिकल्पना, जीवनविषयक दृष्टिकोण, रीति-रिवाज, आचारपद्धती इत्यादी गोष्टी आढळून येतात. थोडक्यात प्रत्येक समाजाला स्वतःची संस्कृती असते. विशेष म्हणजे समाजाची संस्कृती व्यापक असते. याचा अर्थ असा नव्हे की मानव संस्कृतीचे सर्व अंश या समाजाच्या संस्कृतीत दिसतात. परंतु सामाजिक जीवनाला आवश्यक अशा विविध गोष्टी पुरविण्यास त्या समाजाची संस्कृती समर्थ असते. समाज सांस्कृतिक दृष्ट्या स्वयंपूर्ण किंवा आत्मनिर्भर (culturally self-sufficient) असतो. या अर्थाने प्रत्येक समाजाची संस्कृती व्यापक असते. कोणत्याही समाजातील प्रत्येक व्यक्ती त्या समाजाची व्यापक संस्कृती संपूर्णपणे आत्मसात करते अशातला भाग नाही; आणि तसे करणेही सोपे नाही. परंतु त्या समाजातील प्रत्येक प्रगत व्यक्ती स्वतःचे समाजातील कार्य पार पाडण्यासाठी समाजाच्या व्यापक संस्कृतीपैकी पुरेसा भाग अवश्य संग्रहित करते.

४) **स्वतंत्रता** ( Independence ) : समाज हा स्वतंत्र समूह असतो. तो दुसऱ्या कोणत्याही समूहाचा भाग म्हणून राहात नाही. त्याची तशी धारणा असत नाही. समाज राजकीय दृष्ट्या दुसऱ्या समाजाचा अंकित झाला तरी तो स्वतःला विजेत्या समाजाचा भाग मानीत नाही. ब्रिटिशांनी हिंदुस्थानवर जवळ

जवळ दीडशे वर्षे राज्य केले. पण भारतीय समाज हा वेगळा होता. इंग्लिश समाजाचा एक भाग म्हणून भारतीय समाज कधीच ओळखला गेला नाही. तसेच दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेने जपान देश व्यापला होता, परंतु जपानी समाज हा वेगळाच होता.

समाजाच्या या चार लक्षणांवरून हे स्पष्ट होते की समाजामध्ये व्यक्तींच्या सामाजिक संबंधांची विशिष्ट व्यवस्था केलेली असते. पुष्कळ व्यक्तींच्या सर्व प्रकारच्या सामाजिक आंतरक्रिया त्यांच्या समाजामध्येच घडत असतात. त्यांच्या सर्व गरजा समाजामध्येच भागविण्याचा प्रयत्न केला जातो.

तेव्हा समाजाच्या मूलभूत गरजा कोणत्या असतात व त्या कशा भागविल्या जातात हे पाहिले पाहिजे.

## २. समाजांच्या मूलभूत गरजा

सर्व सामाजांना आपले अस्तित्व टिकविण्यासाठी काही समान गरजा भागवाव्या लागतात. नाहीतर ते समाज टिकणार नाहीत. या गरजा समाजाच्या विशिष्ट प्रकारावर अवलंबून असत नाहीत. कोणत्याही प्रकारच्या समाजाला त्या लक्षात घ्याव्याच लागतात. समाज कोणत्याही प्राण्यांचा असो आणि तो कोणत्याही परिस्थितीत असो, त्याच्या अस्तित्वासाठी काही आवश्यक गरजा भागविणे अनिवार्य असते. म्हणूनच अशा गरजांना समाजाच्या मूलभूत गरजा असे मानतात.

समाजाच्या मूलभूत गरजांचे चार प्रमुख प्रकारांत वर्गीकरण करता येईल :–

(अ) प्राण्यांच्या निर्वाहविषयक गरजा,
(ब) समाजाच्या कार्य-विभाजनासंबंधीच्या गरजा,
(क) समाजाचे दृढ ऐक्य वाढविणाऱ्या गरजा, आणि
(ड) समाजाचे सातत्य टिकविणाऱ्या गरजा.

**(अ) प्राण्यांच्या निर्वाहविषयक गरजा** (Needs for Maintenance of Population) :– समाज हा जिवंत प्राण्यांचा बनलेला असतो. जीवसंख्या (population) असल्याखेरीज समाज राहू शकत नाही. म्हणून कोणत्याही समाजाला त्यातील प्राण्यांचे अस्तित्व टिकविण्यासाठी तीन गोष्टी करणे अगदी आवश्यक असते.

...ाठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ........................ दि: ....................
क्रमांक ........................ नोंद दि: ....................


१) **जीव-पोषण--** समाजाला जीवसंख्येच्या आहाराची व पोषणाची योग्य तरतूद करावी लागते. त्यासाठी समाज आसमंतातील नैसर्गिक साधनसामुग्रीचा उपयोग करून घेतो व अशा रीतीने उपलब्ध झालेल्या उत्पादनाची सर्व जीवांसाठी विभागणी करण्याचा प्रयत्न करतो.

२) **जीव-संरक्षण--** समाजाला जीवसंख्येच्या संरक्षणाची देखील तरतूद करणे आवश्यक असते. कारण जीवांना नेहमी नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागते. तसेच त्यांना परजीवी ( parasitic ) किंवा परभक्षी ( predatory ) शत्रूंशी सामना द्यावा लागतो. यांच्यापासून जीवसंख्येचा बचाव करणे समाजाला भाग पडते.

३) **जीवोत्पादन** : या ना त्या कारणानें कमी होणारी जीवसंख्या भरून काढण्याची तरतूद करणे समाजाला आवश्यक असते. त्यासाठी नवीन जीवांचे उत्पादन, संगोपन व संवर्धन करण्याकरिता आवश्यक सोयी उपलब्ध करून द्याव्या लागतात.

समाजाच्या अस्तित्त्वासाठी आवश्यक अशा या तीन गोष्टींची तरतूद करण्याचे सर्व प्राण्यांचे मार्ग मात्र समान असत नाहीत. एकाकी राहणाऱ्या प्राणिवर्गामध्ये प्रत्येक प्राणी स्वतः या गोष्टींची तरतूद करीत असतो. तर सामाजिक जीवन जगणाऱ्या प्राणिवर्गामध्ये (social species) या तीन गोष्टींची तरतूद करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा ( mechanism ) असते. सामूहिक सहयोगावर (group co-operation) ती यंत्रणा आधारलेली असते व त्यामुळे समाज-व्यवस्था टिकून राहते. तेव्हा ही सामाजिक यंत्रणा टिकविण्यासाठी काही जादा गरजा भागविणे सामाजिक जीवन जगणाऱ्या प्राण्यांना आवश्यक असते. अर्थात एकाकी राहणाऱ्या प्राणिवर्गामध्ये अशा जादा गरजा नसतात. त्या जादा गरजा म्हणजे कार्य–विभाजनासंबंधीच्या गरजा, ऐक्यभाव वाढविणाऱ्या गरजा आणि सातत्य टिकविणाऱ्या गरजा.

**(ब) समाजाच्या कार्य–विभाजनासंबंधीच्या गरजा** ( Needs for Division of Function ) : सामाजिक जीवन जगणाऱ्या प्राणिवर्गामध्ये सामूहिक सहकार्याची प्रवृत्ती असावी लागते. समूहाच्या सभासदांमधील सहकार वाढण्यासाठीं त्यांच्यामध्ये कोणत्या तरी प्रकारची श्रम–विभागणी किंवा कार्य–विभागणी आवश्यक असते. कामाचे विशिष्टीकरण ( specialization of function ) झाल्याने समाजाच्या अस्तित्त्वासाठी लागणाऱ्या गोष्टींची

तरतूद करणे अगदी सोपे जाते. अर्थात विशिष्टीकरणाचे प्रमाण सर्व समूहांमध्ये सारखे असत नाही. गाईंच्या कळपामध्ये ते अतिशय अल्प प्रमाणात आढळून येते, तर मधमाशांच्या पोळ्यामध्ये ते अगदी मोठ्या प्रमाणात दिसून येते. समाज–व्यवस्थेचे स्वरूप ठरविताना विचारात घ्याव्या लागणाऱ्या गोष्टींमध्ये समाजात किती प्रमाणात विशिष्टीकरण आहे याची अवश्य दखल घ्यावी लागते. थोडक्यात असे म्हणता येईल की जर समाज असेल तर त्या ठिकाणी काहीतरी श्रम- विभाजन अगर कामाचे विशिष्टीकरण असते.

**(क) समाजाचे दृढ ऐक्य वाढविणाऱ्या गरजा** ( Needs for Solidarity of the Society ) : कोणत्याही समाजात सभासदांमध्ये संपर्क ( contact ) असणे आवश्यक असते. संपर्काचे प्रकार विभिन्न असू शकतात. पण त्यांतील काही प्रकार समाजाला आपल्या हिताच्या दृष्टीने मान्य करावे लागतात आणि त्याला योग्य अशी प्रेरणा ( motivation ) सभासदांमध्ये निर्माण करावी लागते. तसेच, समाजाच्या सभासदांमध्ये परस्परांविषयी सहिष्णुता असणे जरूरीचे असते. त्याचबरोबर आपल्या समाजाचे सभासद इतर समाजांच्या सभासदांपासून कोणत्या तरी प्रकाराने स्पष्टपणे ओळखता येतील याची व्यवस्था करावी लागते. या गोष्टी केल्या नाहीत तर समाजामध्ये अत्यावश्यक अशी संसक्ती किंवा मिलाफ ( cohesiveness ) उत्पन्न होणार नाही आणि समाजाबाहेरील प्राण्यांचा प्रतिकार करता येणार नाही. तेव्हा सामाजिक जीवन जगणाऱ्या प्राण्यांच्या समाजात दृढ ऐक्य असणे अगदी आवश्यक असते.

**(ड) समाजाचे सातत्य टिकविणाऱ्या गरजा** ( Needs for Continuity of the Society ) : समाज लवकर नष्ट होता कामा नये. कमीत कमी काही पिढ्या तरी तो राहिला पाहिजे. समाजाची निरंतरता राखावी लागते. म्हणजे समाजाची रचना व स्वरूप चालू राहील याची दक्षता घ्यावी लागते. तेव्हा समाजातील परस्पर-संबंधांची व्यवस्था टिकून राहण्यासाठी एखादी यंत्रणा उभारणे आवश्यक असते.

समाजाच्या प्रमुख गरजांचे वर जे चार प्रकारांत वर्णन केले आहे त्याची छाननी केल्यास असे दिसून येईल की त्या गरजांचा फक्त एक प्रकार करता येणे शक्य आहे आणि तो म्हणजे समाजाच्या टिकावासाठी ( societal survival ) लागणाऱ्या गरजा. किंबहुना त्या प्रकाराला प्राणीवर्गाच्या टिकावासाठी (survival of the species ) लागणाऱ्या गरजा असेही म्हणता येईल. कारण विशिष्ट

प्राणीवर्गाचे आस्तित्व टिकविणे हे साध्य संपादन करून घेण्यासाठी केवळ साधन म्हणून समाजाचा उपयोग केला जातो. कोणत्याही बाजूने बघितले तरी हे स्पष्ट आहे की जर समाजांना आपले अस्तित्व टिकवावयाचे असेल तर काही मूलभूत गरजा भागवाव्या लागतात आणि त्या गरजा भागविण्यासाठी समाजांना विविध तऱ्हेच्या यंत्रणा निर्माण कराव्या लागतात. समाजशास्त्राच्या अभ्यासकांना अशा यंत्रणांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे लागते.

## ३. *समाजांचे प्रकार*

कोणत्याही प्राण्यांच्या समाजांना स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी, समाज म्हणून जगण्यासाठी, काही आवश्यक गरजा भागवाव्या लागतात. पण या गरजा भागविण्याचे मार्ग मात्र सर्व समाजांचे सारखे असत नाहीत. त्यामध्ये मूलभूत भिन्नता असते. आवश्यक गरजा भागविण्याच्या भिन्न पद्धतींच्या अनुरोधाने समाजांचे दोन प्रकारांत वर्गीकरण करतात. ज्यांच्या गरजा आनुवंशिकतेच्या तंत्राप्रमाणे ( inherited mechanism ) भागविल्या जातात अशा समाजांचा एक प्रकार आणि ज्यांच्या गरजा सांस्कृतिक संचारणाप्रमाणे ( cultural transmission ) भागविल्या जातात अशा समाजांचा दुसरा प्रकार. पहिल्या प्रकारातील समाजांना जैव-सामाजिक ( bio-social ) समाज असे म्हणतात आणि त्यामध्ये सामाजिक जीवन जगणाऱ्या ( social species ) मानवेतर प्राण्यांच्या समाजांचा समावेश होतो. दुसऱ्या प्रकारातील समाजांना सामाजिक-सांस्कृतिक ( socio-cultural ) समाज असे म्हणतात आणि त्यात फक्त मानव-समाजाचाच समावेश होतो. या दोन सामान्य प्रकाराचे अनेक उपप्रकार असतात. पहिल्या प्रकारात वेगवेगळ्या प्राणी-वर्गांचे ( different species) स्वतंत्र उपप्रकार होतात. कीटकांचे समाज, पक्ष्यांचे समाज, सस्तन प्राण्यांचे समाज, असे उपप्रकार पहिल्या प्रकारात आढळतात. तर दुसऱ्या प्रकारात मानवांच्या विभिन्न संस्कृतींच्या अनुरोधाने उपप्रकार होतात. अनेक मानव समूहांच्या संस्कृतीमध्ये बरीच विविधता दिसून येते म्हणून दुसऱ्या प्रकारातील उपप्रकारांची संख्या अतिशय मोठी होऊ शकते.

## ४. *मानवेतर प्राण्यांचे समाज*

सामाजिक जीवन जगणाऱ्या मानवेतर प्राण्यांच्या समाजांचे प्रमुख लक्षण हे की त्या समाजातील प्राण्यांच्या सामाजिक प्रतिक्रिया ( social reactions )

आनुवंशिकतेवर आधारलेल्या असतात. त्यांचे समाजातील इतर प्राण्यांशी वर्तन ठराविक स्वरूपाचे असते व ते आनुवंशिकतेने आलेल्या शारीरिक गुणधर्मावर अवलंबून असते. तेव्हा हा समाज मूलतः जीवाश्रित स्वरूपाचा ( biological in character) असतो आणि याच कारणास्तव अशा प्रकारच्या समाजाला जैव-सामाजिक समाज असे संबोधण्यात येते. अर्थात जैव-सामाजिक प्रकारच्या समाजाची सम्यक् कल्पना येण्यासाठी त्या समाजातील प्राण्यांची आनुवंशिक यंत्रणा (hereditary mechanism) समजून घेतली पाहिजे.

सर्व मानवेतर प्राण्यांचे समाज हे जैव-सामाजिक प्रकारात मोडतात म्हणून ते अगदी समान असले पाहिजेत किंवा असतात असे मानता कामा नये. कारण वंशपरंपरेने बऱ्याच प्रकारचे गुणधर्म एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला देता येतात. म्हणूनच वेगवेगळ्या मानवेतर प्राण्यांच्या समाजांमध्ये भिन्नता दिसून येते. मुंग्यांचा समाज व पक्ष्यांचा समाज यांमध्ये कितीतरी फरक आहे. मुंग्यांच्या समाजात विस्तारपूर्वक श्रम-विभाजन दिसून येते, परस्परांमध्ये घनिष्ट साहचर्य आढळते आणि सर्वांनी मिळून निर्माण केलेले पर्यावरण असते. परंतु पक्ष्यांच्या समाजात सहकारावर आधारलेल्या या गोष्टी कमी प्रमाणात असतात व वैयक्तिक आचरणाला बरीच मोकळीक असते.

मानवेतर समाजांपैकी विविध प्राणिवर्गांमध्ये जरी विस्मयकारक फरक असले तरी प्रत्येक प्राणिवर्गातील प्राण्यांमध्ये समानता दिसून येते. म्हणून मानवेतर विशिष्ट प्राणिवर्गातील प्राण्यांच्या समाजांमध्ये कसलाही फरक आढळून येत नाही कारण त्या प्राण्यांच्या सामाजिक प्रतिक्रिया आनुवंशिकतेच्या यंत्रणेवर आधारलेल्या असतात. परंतु मानव–समाजामध्ये अशी समानता किंवा एकसारखेपणा (uniformity) आढळून येत नाही. सर्व मानव जरी एकाच प्राणिवर्गात मोडत असले तरी त्यांच्या सामाजिक प्रतिक्रिया मात्र स्थलकालानुरूप बदलत असतात. कारण मानवांच्या सामाजिक प्रतिक्रिया आनुवंशिकतेच्या तंत्रानुरूप ठरत नाहीत, तर त्या सांस्कृतिक संचारणावर ( cultural transmission ) अवलंबून असतात. म्हणूनच मानवप्राण्यांच्या समाजांमध्ये तफावत दिसून येते. याचा अर्थ असा नव्हे की मानव-समाजात आनुवंशिकतेला कसलेही स्थान नाही. इतर प्राण्यांप्रमाणे मानवांत देखील आनुवंशिकतेची प्रक्रिया सारखी चालू असते. फरक एवढाच की फक्त मानवप्राण्यांमध्ये आनुवंशिकतेच्या जोडीला संस्कृतीचा सुद्धा परिणाम मानवांच्या आचरणपद्धतीवर होत असतो. तेव्हा मानव समाजाची यथार्थ कल्पना येण्यासाठी त्याच्या संस्कृतीबरोबर त्याचा वांशिक वारसा देखील बघितला पाहिजे.

## ४. मानव समाजाची वैशिष्टये

प्राणिशास्त्राच्या दृष्टिकोणातून पाहता मानव-प्राणी हा सस्तन प्राण्यांच्या सदरात मोडतो व सस्तन प्राण्यांमधील द्विहस्तक सस्तन प्राण्यांपैकी तो आहे. हे सर्व प्राणी सामाजिक जीवन जगणारे आहेत. त्यामुळे सस्तन प्राण्यांच्या समाजाचे सामान्य गुणविशेष द्विहस्तक सस्तन प्राण्यांच्या समाजात आणि पर्यायाने मानव समाजात दिसून येतात. असे असले तरी सस्तन व द्विहस्तक सस्तन प्राण्यांच्या समाजातील सामान्य गुणविशेषांमध्ये होणारे फरक त्या प्राण्यांच्या शरीरक्रियांमध्ये होणाऱ्या फरकांवर अवलंबून असतात, तर मानव समाजांत मात्र ते फरक मानवांच्या संस्कृतीत होणाऱ्या फरकांवर आधारलेले असतात. म्हणून मानव समाजात, इतर प्राण्यांच्या समाजात दिसून न येणारी, विशेष लक्षणे आढळतात. त्यापैकी काही महत्त्वाची वैशिष्टचे आपण पाहू या.

पहिले लक्षण असे की मानव समाज आपल्यातील व्यक्तींना विशिष्ट कार्यासाठीं ( specific tasks ) शिक्षण देऊन तयार करतो. समाजातील विविध कामे पार पाडण्यासाठी भिन्न प्रकारच्या व्यक्ती लागतात व त्यामध्ये कामांची विभागणी किंवा श्रम-विभाजन करावे लागते. अप्रगत प्राण्यांच्या समाजात देखील श्रम-विभागणीची जरूरी असते. परंतु तेथे प्राण्यांच्या आनुवंशिकतेनें मिळालेल्या शारीरिक गुणधर्मावर कामाची वाटणी आधारलेली असते. पोळ्यातील मधमाशांमध्ये राणी या मधमाशीचे कार्य इतर मधमाशांपेक्षा वेगळे असते, कारण राणी मधमाशी व इतर मधमाशा यांमध्ये शारीरिक दृष्टचा कायम स्वरूपाचे फरक असतात. मुंग्यांच्या समाजात सुद्धा असे फरक दिसून येतात. परंतु अशा तऱ्हेचे फरक मानव समाजात असत नाहीत. शरीररचनेच्या दृष्टीने सर्व मानव-प्राणी सारखे आहेत. तेव्हा वंशपरंपरागत आलेल्या शरीर–रचनेच्या फरकांवर आधारलेले श्रम-विभाजन मानव-प्राण्यांत शक्य असत नाही. पण मानव समाजात विस्तृत स्वरूपाचे श्रम–विभाजन आवश्यक असते. विशेष म्हणजे श्रम-विभाजनाचे हे काम मानव समाजात संस्कृती करते संस्कृतीच्या साहाय्याने माणसांना विशिष्ट कार्यांसाठी प्रशिक्षण देऊन तयार करता येते. मानव समाज हे कार्य कमी जास्ती प्रमाणात नेहमी करीत असतो.

दुसरे लक्षण हे की मानव समाज कामवृत्तीचे नियमन किंवा नियंत्रण करतो. उपमानव-प्राण्यांप्रमाणेच मानव-प्राण्यांची प्रजोत्पादनाची क्रिया असते. त्यामुळे मानव–प्राण्यात कामवृत्ती नेहमी वास करीत असते, ती वर्षातील काही विवक्षित कालापुरती मर्यादित असत नाही. तसेच स्त्री–पुरुषांचा संयोग होणे आवश्यक

असते. परंतु माकड, वानर यांसारख्या मानवसदृश प्राण्यांमध्ये कामवृत्तीचे अनुकूलन ( conditioning ) केल्याचे दिसून येत नाही. विशिष्ट हेतूने कामवासनेचे नियमन त्या प्राण्यांत होत नाही. मानव समाज मात्र या गोष्टी फार काटेकोरपणाने करतो. सर्व वैषयिक वर्तनप्रकारांना ( ways of sexual behaviour ) समान न लेखता मानव समाज त्यांची मान्य, कमी मान्य, अमान्य अशी प्रतवारी ठरविते आणि तदनुरूप समाजातील व्यक्तींवर नियंत्रण ठेवतो.

तिसरे लक्षण असे की मानव समाज सांकेतिक निवेदनाची ( symbolic communication) व्यवस्था प्रस्तुत करतो व वाढवितो. द्विहस्तक सस्तन प्राण्यांमध्ये मज्जातंतुविषयक संकीर्णता ( neural complexity ) आढळून येते आणि त्यामुळे त्यांच्यामध्ये शिक्षाग्रहणक्षमता ( learning capacity ) दिसून येते. द्विहस्तक सस्तन प्राण्यांचे किंवा वानरगणांचे हे गुणविशेष मनुष्य-प्राण्यांत कितीतरी पटीने वाढलेले असतात. म्हणूनच फक्त मनुष्य-प्राणी सांकेतिक निवेदनाची एखादी व्यवस्था आणि पर्यायाने एखादी भाषा यांची हळूहळू वाढ करू शकला. मनुष्यप्राण्याने भाषेचा उपयोग सुरू केल्याने मानव समाजावर फार दूरगामी परिणाम झाले. मनुष्य आपल्या अभिवृत्ती व ज्ञान भाषेच्या माध्यमाने एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे देऊ लागला. त्यामुळे मानवाची शिक्षाग्रहणक्षमता बरीच वाढली. वानरगणामध्ये शिक्षाग्रहणक्षमता असते. पण प्रत्यक्ष परिस्थिती पाहिल्यावरच द्विहस्तक सस्तनप्राणी नवीन गोष्टी शिकू शकतात. यामुळे त्यांच्या शिक्षणाची क्षमता साहजिकच मर्यादित होते. परंतु मानव विविध गोष्टी प्रत्यक्ष न पाहता भाषेमुळे त्या जाणू शकतो व भिन्न भिन्न परिस्थितींत कसे वागावे याचे ज्ञानही घेऊ शकतो. तसेच, भाषेच्या उपयोगामुळे मानवाच्या शिक्षाग्रहणाच्या प्रक्रियेचा वेग देखील वाढतो. कारण मानवाला गोष्टी अगर घटना प्रत्यक्ष पाहण्यासाठी वेळ घालवावा लागत नाही. दुसऱ्यांच्या ज्ञानाचा त्याला फायदा होऊ शकतो. शिवाय, भाषेच्या उपयोगाने शिक्षाग्रहणाचा वेग द्रुतगतीने वाढतो एवढेच नव्हे तर शिक्षाग्रहणाचे परिमाण ( volume of learning ) सुद्धा सहस्त्रपटीने विस्तृत होते. द्विहस्तक सस्तन प्राण्यांपेक्षा किंवा वानरगणातील प्राण्यांपेक्षा रानटी टोळयांतील माणसांना कितीतरी पटीने जास्ती माहिती असते. मग प्रगत अवस्थेतील मानवांच्या शिक्षणग्रहणाचे परिमाण खूपच मोठे असेल हे उघड आहे.

सांकेतिक निवेदनाच्या या पद्धतीमुळे किंवा भाषेच्या उपयोगामुळे मानव समाजाचा फार मोठा फायदा झाला. मानव समाजाचा सांस्कृतिक वारसा टिकून राहिला कारण तो एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे जाऊ शकला. मानव समाजाच्या इतिहासात सांस्कृतिक संचारणाचा हा मार्ग बराच काल रूढ होता.

परंतु वाचिक किंवा तोंडी निवेदनाच्या या पद्धतीत स्मरणशक्तीवर ताण पडणे, सांगणारा व ऐकणारा यांची प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक असणे, असे अनेक दोष होते. भाषा लिपिबद्ध झाल्यावर मात्र हे दोष नाहीसे झाले इतकेच नव्हे तर मनुष्याला आपल्या कल्पनांचा अगर विचारांचा संग्रह करता येऊ लागला व पुढील पिढ्यांना मागील पिढ्यांतील उत्तमोत्तम विचारांचा फायदा घेता येऊ लागला. तेव्हा लेखनपद्धतीमुळे सांकेतिक निवेदनाचा प्रभावीपणा अतिशय वाढला. तो याहूनही जास्ती वाढावा यासाठी मानवाचे सारखे प्रयत्न चालले आहेत. मानवाने मुद्रण, टेलिफोन, रेडिओ यासारखे लावलेले शोध अशा प्रयत्नांचेच द्योतक आहेत. या सर्वांमुळे मानव समाजातील सांकेतिक निवेदन कमालीचे प्रभावी होत आहे.

चौथे लक्षण हे की मानव समाजाने आदर्शकाची संकल्पना ( concept of the normative ) निर्माण केली व ती वाढविली. मानवाने उपयोगात आण-लेल्या सांकेतिक निवेदनाच्या पद्धतीतूनच ही संकल्पना उत्पन्न झाली. मानवाच्या प्रत्येक परिस्थितीचे दोन घटक असतात– घटना व घटनांविषयीची अभिवृत्ती (attitude) किंवा मनोभाव (sentiment). एखाद्या घटनेविषयी कोणता मनोभाव असावा हे संस्कृतीने ठरविलेले असते आणि असे मनोभाव मानवाच्या सांस्कृतिक वारशाचा एक भाग असतो. अनेक प्रकारच्या अभिवृत्ती किंवा मनोभाव यांपैकी सर्वात प्रबल मनोभाव उचित आणि अनुचित ( what ought and ought not to be ) यासंबंधी असतात. तेव्हा संस्कृतीतील योग्यायोग्यतेच्या कल्पनानुसार लोक समाजातील कोणत्याही घटनांविषयी आणि विशेषतः त्या घटनांशी संबंधित असलेल्या व्यक्तींच्या प्रत्यक्ष आचरणाविषयी पसंती अगर नापसंती दर्शवीत असतात. उदाहरणार्थ, मनुष्य-प्राण्यांमध्ये, इतर सस्तन प्राण्यांप्रमाणे, स्त्री-पुरुषसमागमाची ( mating ) घटना घडत असते. परंतु विवाहाच्या सदरात मोडणारी किंवा विवक्षित प्रकारची स्त्री-पुरुषसमागमाची घटनाच तेवढी लोक मान्य करतात कारण फक्त तीच घटना लोकांनी आदर्श किंवा योग्य ठरविलेली असते. जीवशास्त्राच्या दृष्टीने जरी सर्व स्त्री-पुरुषसमागम सारखे असले तरी लोक त्यांना समान मानीत नाहीत. त्यांच्या-मध्ये योग्यायोग्यतेच्या दृष्टीने फरक करतात. जेवणे, झोपणे, चालणे, आदी-कोणत्याही क्रियांच्या बाबतीत उचित-अनुचित असे भेद केले जातात. अर्थात योग्या योग्यतेच्या कल्पना ज्या त्या समाजाच्या धारणेवर अवलंबून असतात. अशा रीतीने मानव समाज आदर्शकाच्या संकल्पनेनुसार आपल्यातील व्यक्तींच्या वागणुकीचे नियंत्रण करीत असतो. अशा न्यायान्यायाच्या कल्पना मानवेतर व मानवसदृश प्राण्यांत असत नाहींत. म्हणून मानव समाजाचा अभ्यास करताना केवळ घटनांचा विचार करून भागणार नाही, तर त्या घटनांकडे पाहण्याची आदर्शवादी वृत्ती देखील विचारात घेतली पाहिजे.

# ६

# समाज व पर्यावरण

## *१. पर्यावरणाचे स्वरूप व प्रकार*

मनुष्याच्या परस्पर-संबंधांचा किंवा मानवांच्या सामाजिक जीवनाचा सांगोपांग अभ्यास समाजशास्त्रात केला जातो. त्यामुळे सामाजिक जीवनावर परिणाम करणाऱ्या गोष्टींचा विचार समाजशास्त्राच्या अभ्यासकांना करावा लागतो. सामाजिक जीवनावर मानवाच्या भोवतालच्या परिस्थितीचा म्हणजे पर्यावरणाच नेहमी प्रभाव पडत असतो. म्हणून पर्यावरणाचे विवेचन करणे आवश्यक आहे.

कोणत्याही प्रकारच्या जीवनाचा सभोवतालच्या परिस्थितीशी अगदी निकटचा संबंध असतो. वनस्पति-जीवनापासून मानव--जीवनापर्यंत सर्वत्र भोवतालच्या परिस्थितीचा प्रभाव हमखास आढळून येतो. जमीनीत बीजारोपण केल्यानंतर अनुकूल परिस्थिती असेल तरच ते बीज अंकुरित होते, त्याला जमिनीवर फांद्या व पाने फुटतात व त्याच्या मुळ्या जमीनीत पसरतात. तेव्हा बीजापासून वृक्ष उत्पन्न होतो हे खरे, पण त्यासाठी अनुकूल परिस्थितीची आवश्यकता असते. विशिष्ट तऱ्हेच्या बीजांना योग्य वाढ होण्यासाठी विशिष्ट प्रकारची जमीन, हवा, पाणी, खते, मशागत इत्यादी गोष्टींची किंवा परिस्थितीची जरूरी असते. याचा अर्थ असा की वनस्पति--जीवन हे भोवतालच्या परिस्थितीवर मुख्यतः अवलंबून असते. जर परिस्थितीत फरक

झाला तर त्याचा वनस्पतीवर खात्रीने काहीतरी परिणाम होतो. वनस्पती व भोवतालची परिस्थिती यांचा एकमेकांशी इतका महत्त्वपूर्ण संबंध आहे की वनस्पति-विज्ञानाची (Botany) वनस्पति-परिस्थितिविज्ञान (Plant Ecology) या नावाची वेगळी शाखा त्याचा विशेष अभ्यास करते. जी गोष्ट वनस्पति-जीवनाची तीच प्राणि-जीवनाची देखील आहे. वनस्पतींच्या प्रमाणे पशु-पक्षी जमीनीला चिकटलेले असत नाहीत पण त्यांना सुद्धा भोवतालच्या परिस्थितीवर अवलंबून राहावेच लागते. विशिष्ट प्रकारच्या जनावरांना विशिष्ट प्रकारचे हवामान, वातावरण, खाद्य-पदार्थ इत्यादी गोष्टींची अथवा परिस्थितीची आवश्यकता असते. पशु-परिस्थिति-विज्ञान (Animal Ecology) ही प्राणिविज्ञानाची (Zoology) शाखा जनावरे व परिस्थिती यांच्या परस्परसंबंधांवर लक्ष केंद्रित करते. मानवप्राण्याची सुद्धा हीच गत आहे. मनुष्यावर त्याच्या भोवतालच्या परिस्थितीचा नेहमी प्रभाव पडत असतो. अर्थातच मानव-प्राणी एका पर्यावरणातून दुसऱ्या पर्यावरणात जाऊ शकतात, किंवा त्या पर्यावरणात आपणास हवा असलेला बदलही करून घेऊ शकतात. असे असले तरी मनुष्यप्राणी पर्यावरणाच्या प्रभावापासून संपूर्णपणे अलिप्त राहू शकत नाहीत. मानव-जीवनावर देखील सभोवतालच्या परिस्थितीचा किंवा पर्यावरणाचा सतत परिणाम होत असतो आणि या परिणामांचा अभ्यास मानव- किंवा समाज-परिस्थितिविज्ञान (Human or Social Ecology) या समाज-शास्त्राच्या शाखेत केला जातो. जीवन आणि पर्यावरण यांचा असा अगदी घनिष्ठ संबंध आहे

वरील विवेचनावरून पर्यावरणाच्या स्वरूपाची कल्पना येते. व्यक्तीच्या भोवताली विविध तऱ्हेची परिस्थिती असते. पण त्या परिस्थितीमधील सर्व बाबींचा व्यक्तीवर परिणाम होईलच असे नाही. त्यापैकी ज्या बाबींचा परिणाम होतो त्यांना त्या व्यक्तीचे पर्यावरण म्हणतात. जी गोष्ट व्यक्तीची तीच गोष्ट समाजाची. म्हणून " ज्या शक्ती, स्थिती किंवा प्रेरणा अगर उद्दीपने सजीव वस्तूवर बाहेरून प्रभाव पाडतात त्यांना पर्यावरण अशी संज्ञा आहे" अशी पर्यावरणाची व्याख्या **डॉ. किम्बाल यंग** यांनी केली आहे. [1] तसेच " आपल्यावर परिणाम करणारी कोणतीही बाह्य शक्ती म्हणजे पर्यावरण होय " असे पर्यावरणाचे लक्षण **डॉ. रॉस** यांनी सांगितले आहे. [2] अर्थात हा परिणाम

1. " By environment we mean those forces, situations, or stimuli which influence the organism from outside."
   – Kimball Young.
2. " Environment is any external force which influences us. "– Ross.

चांगलाच असेल अशातला भाग नाही. आपल्या दृष्टिकोणातून प्रभाव अनुकूल असेल किंवा तो प्रतिकूलही असेल. तसेच तो प्रभाव प्रत्यक्ष पडेल किंवा अप्रत्यक्ष पडेल. कसेही असले तरी ज्या गोष्टींचा प्राण्यांच्या जीवनावर या ना त्या स्वरूपात परिणाम होतो त्या गोष्टी पर्यावरण या संज्ञेत समाविष्ट केल्या जातात.

पर्यावरणाच्या स्वरूपावरून असे म्हणता येईल की व्यक्तीला एक पर्यावरण नसून आंतर-पर्यावरण ( internal environment ) व बाह्य-पर्यावरण ( external environment ) अशी दोन पर्यावरणे असतात. द्रवपदार्थ ( liquid media ), लस किंवा लसिका ( lymph ) आणि रुधिररस ( blood plasma ) यांमध्येच शरीरातील जीवपेशी (body cells) असतात व कार्य करतात. हे जीवनरस असल्याखेरीज जीवपेशी जिवंत राहू शकत नाहीत. म्हणून या जीवनरसांचा आंतर-पर्यावरणामध्ये समावेश होतो. शरीराच्या बाहेरील सर्व परिस्थितींचा बाह्य-पर्यावरणामध्ये अंतर्भाव होतो. मनुष्याच्या सामाजिक जीवनाचा अभ्यास हे समाजशास्त्राचे क्षेत्र असल्याने समाजशास्त्रात मुख्यत: बाह्य-पर्यावरणाचा विचार केला जातो.

मनुष्याचे पर्यावरण विशाल असल्याने त्याचे समाजशास्त्रज्ञांनी विविध प्रकारे वर्गीकरण केले आहे. **डॉ. रॉबर्ट मॅकायवर** यांनी पर्यावरणाचे भौतिक पर्यावरण ( Physical Environment ), आर्थिक पर्यावरण ( Economic Environment ) व सामाजिक पर्यावरण ( Social Environment ) असे तीन भेद केले आहेत. तर **प्रो मार्शल जोन्स** यांनी भौतिक पर्यावरण, सांस्कृतिक पर्यावरण ( Cultural Environment ) व सामाजिक पर्यावरण असे पर्यावरणाचे तीन विभाग पाडले आहेत. तसेच **प्रा. एल. एल. बर्नार्ड** यांच्या मते भौतिक पर्यावरण, जीवविषयक पर्यावरण ( Biological Environment ), सामाजिक पर्यावरण आणि संमिश्र किंवा संस्थास्वरूप पर्यावरण ( Composite or Institutionalised Environment ) असे पर्यावरणाचे चार प्रकार आहेत. याच धर्तीवर **प्रा. पी. गिस्बर्ट** यांनी नैसर्गिक (Natural), कृत्रिम (Artificial), सामजिक ( Social ) व मानसिक ( Psychological ) अशा चार प्रकारांत पर्यावरणाची विभागणी केली आहे. **डॉ. किम्बाल यंग** यांनी भौगोलिक ( Geographical ) आणि सामाजिक-सांस्कृतिक ( Social-Cultural ) असे पर्यावरणाचे दोन विभाग मानले आहेत.

स्थूलमानाने पर्यावरणाचे दोन भेद करता येतात. ते म्हणजे भौतिक पर्यावरण ( Physical Environment ) आणि सामाजिक पर्यावरण ( Social Environment ). या दोन्ही पर्यावरणाविषयी थोडे विस्ताराने विवेचन करणे आवश्यक आहे.

## २. *भौतिक पर्यावरण*

भौतिक पर्यावरणामध्ये भौगोलिक परिस्थितीचा समावेश होतो. त्यामध्ये मुख्यतः भूप्रकृती, हवामान, पर्जन्यमान, नैसर्गिक साधनसामुग्री ( उदा. झाडे, पशु, खनिज पदार्थ, इत्यादी ), जमीन यांसारख्या भौगोलिक बाबी येतात. या बाबींचा मनुष्याच्या वैयक्तिक व सामूहिक जीवनावर अतिशय महत्त्वाचा परिणाम होतो. मनुष्याचा सामाजिक विकास पुष्कळ अंशी भौगोलिक परिस्थितीच्या स्वरूपावर अवलंबून असतो. साधारणपणे कोणत्याही समाजाच्या लोकसंख्येचे प्रमाण, लोकसंख्येची प्रदेशवार विभागणी, आर्थिक व सामाजिक घडामोडी इत्यादी गोष्टी त्या समाजाच्या भोवतालच्या भौगोलिक परिस्थितीला अनुसरून ठरत असतात.

भूप्रकृती (topography) विविध रीतीने मानव जीवनावर प्रभाव पाडीत असते. भूप्रदेशाचा आकार, त्याचा विस्तार, त्याचा उंचसखलपणा, त्यातील जलसंपत्ती, त्याच्याशी संलग्न असलेला समुद्रकिनारा इत्यादी गोष्टींचा भूप्रकृतीमध्ये अंतर्भाव होतो व या गोष्टींचा त्या प्रदेशातील समाजावर हमखास परिणाम होत असतो. जर भूप्रदेश सखल असेल व त्यात विशाल नद्या वाहात असतील तर तेथील समाजाला वेगळेच स्वरूप प्राप्त होते नद्यामुळे जमिनीची सुपीकता वाढते, अन्नधान्याची निश्चिती होते, जास्ती लोकसंख्येचा निभाव लागू शकतो, त्यांच्यातील दळणवळण वाढू लागते आणि लोकांची आर्थिक व सांस्कृतिक बाबतीत देवाणघेवाण सुरू होते. त्यामुळे जगातील पुरातन संस्कृतींची केंद्रे नद्यांच्या खोऱ्यात असलेली आढळून येतात. यांगत्सिकियांग, गंगा, यमुना, सिधु, नील, टैग्रिस, युफ्रेटिस आदी नद्यांच्या सुपीक खोऱ्यांतच विशाल समाज वसती करू शकले व भरीव सांस्कृतिक प्रगती साधू शकले अशा इतिहास साक्ष देतो आहे तसेच भूप्रदेश जर डोंगराळ असेल, अगर सपाट असेल, किंवा समुद्रकिनाऱ्यालगतचा असेल, तर त्याचा परिणाम तेथे राहणाऱ्या लोकांच्या जीवनावर झाल्याखेरीज राहात नाही. डोंगराळ भागातील समाज लहान असतात तर सपाट प्रदेशातील समाजाची लोकसंख्या जास्ती असू शकते. शिवाय लोकांच्या गुणधर्मांत व वागणूकीत देखील फरक दिसून येतो. समुद्र–

किनाऱ्यालगतच्या लोकांना दर्यावर्दी होण्याची व साहस करून दाखविण्याची संधी मिळते आणि त्यायोगे त्यांचे सामाजिक जीवन इतरांपेक्षा वेगळे बनते.

हवामान व ऋतु यांचे माणसांच्या सवयी व कर्तृत्व यांवर विशेष परिणाम होत असतात. हवामानानुसार पृथ्वीचे शीत, समशीतोष्ण व उष्ण असे मुख्यतः तीन विभाग पडतात आणि प्रत्येक विभागाचे मनुष्यांच्या वसाहतींवर व सामाजिक प्रगतीवर वेगवेगळे परिणाम होतो शीत कटिबंधात जगण्यासाठी खडतर परिश्रम करावे लागत असल्याने तेथे मानव-वसती अगदी तुरळक आढळून येते आणि कडाक्याच्या थंडीमध्ये माणसाला काम करावयास उत्साहही असत नाही. साहजिकच तेथे सामाजिक विकास झालेला पाहावयास मिळत नाही. उष्ण कटिबंधाच्या प्रदेशांत, आणि विशेषतः जास्त आर्द्रता नसलेल्या ठिकाणी, मानवप्राणी मोठ्या संख्येने एकत्र राहतात; पण तीव्र उष्णतेमुळे माणसाच्या हातून जास्ती काम होत नसल्याने तेथील समाज विशेष प्रगती करू शकत नाहीत. याच्या उलट समशीतोष्ण कटिबंधात मात्र सर्वत्र माणसांची गर्दी दिसून येते. शारीरिक व बौद्धिक कामे करण्यास तेथील हवा फार उपयोगी पडते. म्हणून याच भागात भरीव सामाजिक प्रगती झाल्याचे आढळून येते.

हवामानाप्रमाणे पर्जन्यमानाचा देखील जीवनावर प्रभाव पडत असतो. पर्जन्यमानात ठिकठिकाणी तफावत दिसून येते. पाऊसपाणी भरपूर असलेल्या प्रदेशात इतर प्रदेशांच्या मानाने जास्ती जनसंख्या आढळून येते. ऑस्ट्रेलियाचा मध्यभाग, तिबेट व मंगोलियाचा काही भाग, सहारा वाळवंट आदी भागांत दर वर्षी सरासरी १० इंचापेक्षा कमी पाऊस पडतो. म्हणून या विभागांत मानवांच्या वसाहती फार लहान आहेत व त्यांनी विशेष प्रगतीही केलेली दिसत नाही. शिवाय हवामान व पर्जन्यमान या दोहोंवर शेतीची स्थिती व पिकांचे प्रकार अवलंबून असतात आणि त्यानुसार मानवाच्या सामाजिक जीवनाचे स्वरूप ठरत असते.

वेगवेगळ्या भौगोलिक विभागांत असलेल्या विविध तऱ्हेच्या नैसर्गिक साधनसामुग्रीचा मानवाच्या सामाजिक जीवनावर ठळकपणे ठसा उमटलेला दिसून येतो. कोणत्याही समाजाला उपलब्ध असलेल्या नैसर्गिक साधनसंपत्तीवर त्या समाजाचा प्रमुख व्यवसाय अवलंबून असतो. शिकार, मासेमारी, पशुपालन, शेती, जंगलकाम, खाणकाम इत्यादी व्यवसायांचे प्रकार वेगवेगळ्या समाजांत प्रामुख्याने आढळून येतात. कारण विवक्षित भौगोलिक परिस्थितीत ते ठराविक व्यवसाय करण्याखेरीज

गत्यंतरच नसते. गवताळ प्रदेशात पशुपालनालाच वाव असतो आणि डोंगराळ भागात जंगलकाम अगर खाणकाम विशेष सुलभ असते. तेव्हा नैसर्गिक साधनसंपत्ती समाजाचा व्यवसाय ठरविते आणि व्यवसायावर सामाजिक जीवनाच्या कित्येक बाबी आधारलेल्या असतात. मनुष्याच्या उपजीविकेच्या साधनांचा व पद्धतींचा त्याच्या विचारसरणीवर व आचरणावर प्रभाव पडत असतो. जीवनविषयक दृष्टिकोण, धर्म, विवाह, राज्यशासन, रूढी, नीती इत्यादी बाबींचे स्वरूप समाजातील प्रमुख व्यवसायावर अवलंबून असते. यामुळेच शेतकऱ्यांचे सामाजिक जीवन इतर व्यावसायिकांच्या सामाजिक जीवनापासून अगदी भिन्न आढळून येते. म्हणून नैसर्गिक साधनसंपत्ती व सामाजिक जीवन यांचा घनिष्ठ संबंध आहे.

भौतिक पर्यावरणामध्ये जमीनीचे प्रमाण व तिची सुपीकता या गोष्टींना बरेच महत्त्व आहे. जमीनीपासूनच अन्न, वस्त्र व निवारा या मूलभूत गरजा मानवाला भागविता येतात. मानवाच्या व्यवसायांना लागणारी साधनसामुग्री जमीनीपासूनच उपलब्ध होते. जमीनीच्या प्रकारावर धान्योत्पादन, फलोत्पादन, पशुपालन इत्यादी व्यवसाय अवलंबून असतात आणि व्यवसायानुसार लोकांचे सामाजिक जीवन बदलत असते.

अशा रीतीने मनुष्याच्या भौतिक पर्यावरणाचा त्याच्या सामाजिक जीवनावर सतत परिणाम होत असतो हे खरे असले तरी केवळ भौगोलिक परिस्थितीवरच मनुष्याचे सामाजिक वर्तन सर्वस्वी अवलंबून असते असे म्हणता येणार नाही. नाहीतर एका प्रकारच्या भौगोलिक पर्यावरणामध्ये विविध प्रकारचे सामाजिक आचरण आढळून आले नसते. जगातील महान धर्मांचा उदय वेगवेगळ्या भौतिक पर्यावरणांच्या प्रदेशात झालेला आहे. प्रदेशाच्या उंचीवर अगर हवामानावर त्या प्रदेशांतील लोकांचे विवाहाचे प्रकार मर्यादित झाले नाहीत. सर्व प्रकारच्या उंचसखल प्रदेशात व हवामानात एकपत्नीत्वाची प्रथा प्रचलित आहे. एकाच भौतिक पर्यावरणातील कृषिप्रधान देश उद्योगप्रधान झाले आहेत. तेव्हा सामाजिक आचरणाचा विचार करताना मनुष्याच्या भौतिक पर्यावरणाबरोबरच त्याच्या संस्कृतीचा देखील विचार करणे आवश्यक आहे. या संस्कृतीमुळेच भौतिक पर्यावरणामध्ये बदल करण्याची किंवा त्यावर मात करण्याची शक्ती मानवाला मिळते. विज्ञानाचा उपयोग केल्याने भौतिक पर्यावरणावर थोड्याफार प्रमाणात ताबा ठेवण्याची शक्ती आधुनिक मानवाला मिळाली

आहे. म्हणूनच मनुष्याच्या जीवनात भौतिक पर्यावरणाचे महत्त्व आधुनिक काळात पूर्वीच्या काळाच्या मानाने कमी झाल्याचे दिसून येते. असे असले तरी मानवी जीवनातून भौतिक पर्यावरणाचे स्थान अजिबात नष्ट केव्हाही होणार नाही. कारण कितीही वैज्ञानिक प्रगती झाली तरी पाहिजे तेथे वाटेल ती धान्ये पिकविता येणार नाहीत किंवा हवे ते उद्योगधंदे सुरू करता येणार नाहीत.

थोडक्यात असे म्हणता येईल की भौतिक परिस्थिती मानवांच्या कर्तृत्वाला मर्यादा घालते आणि त्याचबरोबर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यास ठी मानवांना वाव देते. म्हणून मानवी जीवनात भौगोलिक परिस्थितीच्या परिणामांना महत्त्वाचे स्थान आहे. भौतिक पर्यावरणाच्या प्रभावाचे मूल्यमापन करण्याचा प्रयत्न आधुनिक काळात फ्रान्समधील ले प्ले ( Le Play ) या समाजशास्त्रज्ञाने मुख्यत: केला आणि त्याला मूर्त स्वरूप अमेरिकेतील समाजशास्त्रज्ञ **एल्सवर्थ हंटिंग्टन** ( Hunt-i gton ) यांनी दिले. मनुष्याच्या सामाजिक जीवनात भौतिक परिस्थितीचे महत्त्व मान्य करणारे बरेच समाजशास्त्रज्ञ हल्ली आहेत आणि त्यांना " भौगोलिक-वादाचे पुरस्कर्ते " (Geographical School) असे संबोधिले जाते.

## ३. *सामाजिक पर्यावरण*

सामाजिक पर्यावरण हा पर्यावरणाचा दुसरा प्रकार आहे ज्याप्रमाणे बाह्य भौगोलिक परिस्थितीचा मनुष्याच्या जीवनावर परिणाम होतो त्याप्रमाणे मनुष्य ज्या माणसांमध्ये वावरतो त्यांचा देखील त्याच्या जीवनावर प्रभाव पडतो. म्हणून भौतिक पर्यावरणाप्रमाणे सामाजिक पर्यावरण असते आणि लोक व मानव-निर्मित गोष्टी यांचा सामाजिक पर्यावरणामध्ये समावेश होतो. मनुष्य मूर्त व अमूर्त (material and immaterial) अशा दोन्ही प्रकारच्या गोष्टी अगर वस्तू निर्माण करतो व या सर्व वस्तू सामाजिक पर्यावरणात मोडतात.

मनुष्याचा ज्या लोकांशी या ना त्या रीतीने संबंध येतो त्या सर्वांचा त्याच्या जीवनावर काही तरी परिणाम होत असतो. ज्या लोकांत माणूस वावरतो त्यांची संख्या किती आहे, ते कशा प्रकारचे आहेत, इत्यादी गोष्टींवर त्या लोकांकडून होणारा परिणाम अवलंबून असतो. ग्रामीण भागात अगदी थोड्या लोकांशी तर नागर भागात बऱ्याच लोकांशी मनुष्याचा संबंध येतो. साहजिकच या दोन विभागांमध्ये मनुष्याच्या जीवनावर वेगवेगळा परिणाम होतो. त्याचप्रमाणे संबंध येणारे लोक सुज्ञ अगर अडाणी, सद्वर्तनी अगर दुर्वर्तनी, सुष्ट अगर दुष्ट अशा विविध

प्रकारचे असतात. त्यामुळे त्या लोकांचा होणारा परिणाम अगदी भिन्न असतो. साधुसंतांच्या सहवासात असणाऱ्या माणसावर होणारा परिणाम आणि गुंडांच्या सान्निध्यात असणाऱ्या माणसावर होणारा परिणाम यात कितीतरी फरक असतो.

मानव-निर्मित गोष्टींचा देखील मानवाच्या जीवनावर प्रभाव पडत असतो म्हणून त्यांचा सामाजिक पर्यावरणात अंतर्भाव केला जातो. मानवानें निर्माण केलेल्या भौतिक किंवा मूर्त वस्तू (material artifacts) आणि अभौतिक किंवा अमूर्त वस्तू (immaterial mentifacts) मिळून मानवाची संस्कृती होते. अशा मनुष्यकृत वस्तूंच्या पर्यावरणाला सांस्कृतिक पर्यावरण असे म्हणतात व सामाजिक पर्यावरणामध्ये सांस्कृतिक पर्यावरणाला फार महत्त्वाचे स्थान आहे. घरे-दारे, कपडालत्ता, यंत्रसामुग्री, अन्नधान्य इत्यादी भौतिक वस्तू मानवी जीवनाशी अगदी निगडित असतात व त्या मानवावर आपला प्रभाव पाडीत असतात हे स्पष्ट आहे. त्याचबरोबर रीति-रिवाज, प्रथा, परंपरा, रूढी, विचार, नीतिकल्पना, तत्त्वज्ञान, धर्म, राज्यसंस्था, अर्थव्यवस्था आदी संस्कृतीतील अभौतिक किंवा अमूर्त गोष्टी मनुष्याचे जीवन नेहमी प्रभावित करीत असतात. मनुष्य ज्या समाजात जन्मतो अगर वावरतो त्या समाजाच्या संस्कृतीपासून तो अलिप्त राहू शकत नाही. मनुष्याचे सर्व क्षेत्रांतील सामाजिक जीवन त्याच्या समाजाच्या संस्कृतीवर अवलंबून असते. संस्कृतीचा प्रत्येक भाग मनुष्याच्या जीवनावर दूरगामी परिणाम करीत असतो. उदाहरणार्थ, कोणत्याही समाजाचे जीवन व स्वरूप त्याच्या अर्थव्यवस्थेवर निर्धारित असते. इसवी सनाच्या अठराव्या शतकातील औद्योगिक क्रांतीनंतर उत्पादनाच्या पद्धतीत झालेल्या बदलामुळे अर्थव्यवस्थेत फरक पडला आणि त्यायोगे समाजाची वर्गरचना, शासनव्यवस्था, कायदापद्धती, लोकसंख्येची विभागणी, रीतिरिवाज, विचारसरणी इत्यादी बाबींत विशेष रूपांतर झालेले दिसून येते. म्हणूनच प्रसिद्ध विचारवंत **कार्ल मार्क्स** यांने असे प्रतिपादन केले आहे की आर्थिक परि-स्थिती सामाजिक परिवर्तनाचे मूळ कारण आहे. यालाच कार्ल मार्क्सचा "इतिहासा-विषयीचा भौतिकतावादाचा सिद्धांत" (materialistic interpretation of history) असे म्हणतात. मानवांच्या कुटुंब, राज्य, धर्म अशा सामाजिक संस्थांचे आणि कला, साहित्य, विज्ञान आदी संस्कृतीच्या प्रमुख प्रकारांचे स्वरूप व कार्य मुख्यतः आर्थिक घटनांवर आधारलेले असते अशी कार्ल मार्क्सची विचारसरणी आहे. ही जरी संपूर्णपणे मान्य झाली नाही तरी कोणत्याही मानवसमूहाच्या अर्थ-व्यवस्थेचा त्याच्या सामाजिक जीवनावर महत्त्वपूर्ण ठसा उमटत असतो हे नाकारता

येणार नाही. आधुनिक काळात मानव-समूहांच्या अर्थव्यवस्थेत मूलगामी फरक झाल्याने मानवांचे सामाजिक जीवन अगदी ढवळून निघाले आहे आणि काही ठिकाणी ते पार बदलून गेले आहे. मानवी जीवन वैयक्तिक स्वरूपाचे न राहता सामुदायिक स्वरूपाचे झाले आहे. म्हणून कित्येकदा आर्थिक पर्यावरण हा मानवाच्या पर्यावरणाचा स्वतंत्र प्रकार समजला जातो. जी गोष्ट अर्थव्यवस्थेची तीच संस्कृतीच्या इतर अंगांची आहे. अशा रीतीने संस्कृतीत सामावलेल्या भौतिक व अभौतिक वस्तूंचा मानवांच्या जीवनावर अविरत प्रभाव पडत असतो. संस्कृतीच्या विविध भागांमध्ये अलीकडील काळात झपाट्याने बदल होत आहे आणि त्यामुळे मानवी जीवनामध्ये बरेच परिवर्तन झाल्याचे दिसत आहे.

तेव्हा भौतिक व सामाजिक या दोन्ही पर्यावरणाचा विचार केल्याखेरीज मानवी जीवनाविषयी खरी कल्पना येणार नाही.

## ४. पर्यावरणाच्या प्रकारांचे बदलते महत्त्व

भौतिक व सामाजिक अशा दोन्ही प्रकारच्या पर्यावरणांचे स्वरूप आपण पाहिले. तसेच त्यांचा मानवाच्या सामाजिक जीवनावर स्थूलमानाने काय परिणाम होतो तेही बघितले. पर्यावरणाचा वेगवेगळ्या मानवसमूहांवर समान परिणाम होत नाही. त्याचप्रमाणे कालमानानुसार पर्यावरणाचा मानवी जीवनावर होणारा परिणाम बदलत असतो. प्रचलित मानव समाजाचा विचार करता असे दिसून येते की अलीकडील काळात भौतिक पर्यावरणाचे महत्त्व त्यामानाने कमी होत आहे. भौगोलिक परिस्थितीचा मानवी जीवनावर आता होणारा परिणाम अप्रत्यक्ष असतो कारण हवामान, पाऊसपाणी, वन्य प्राणी इत्यादी भोवतालच्या भौगोलिक परिस्थितीपासून उपद्रव होऊ नये म्हणून मानवाने कितीतरी साधने व उपाय शोधून काढून त्यांचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू केला आहे. उदाहरणार्थ, हवामानातील ऋतुपरत्वे किंवा अन्य कारणांनी होणारे फरक मानवास आता फारसे जाणवत नाहीत कारण विविध पोषाख, विशिष्ट अन्नपदार्थ, विवक्षित औषधे, उष्णतामान नियंत्रित करण्याच्या पद्धती, कसल्याही हवेत उपयोगी पडतील अशी वाहतुकीची साधने इत्यादी गोष्टी मानवाने निर्माण केल्या आहेत. साहजिकच हल्ली कोणत्याही प्रकारच्या हवामानात मनुष्य आपले दैनंदिन व्यवहार निर्वेधपणे करू शकतो. म्हणून भौतिक पर्यावरणाच्या मानवी जीवनावर पडणाऱ्या प्रभावाचे लोकांच्या जीवनात पूर्वी इतके महत्त्वाचे स्थान राहिले नाही.

सामाजिक पर्यावरणाचे मात्र तसे नाही. सामाजिक पर्यावरणाचा मानवी जीवनावर जाणवणारा परिणाम कायम आहे, किंबहुना सामाजिक पर्यावरणाचा भाग असलेल्या सांस्कृतिक पर्यावरणाचा परिणाम सारखा वाढतच आहे. ज्या लोकांमध्ये आपण लहानपणी नेहमी वावरतो त्यांचा आपल्यावर विशेष प्रभाव पडतो, इतकेच नव्हे तर पुढील आयुष्यात देखील तो प्रभाव कायम राहतो. तेव्हा भोवतालच्या लोकांचा मानवावर पडणारा प्रभाव कमी झाला नाही व होणार नाही. पण मानवाने निर्माण केलेल्या भौतिक व अभौतिक वस्तूंचा मानवी जीवनावरील परिणाम कमी न होता उलट वाढत आहे. नियतकालिके, पुस्तके, बोलपट, रेडियो, टेलिव्हिजन यासारखी बहुजनसमाजावर परिणाम करणारी साधने मानवी संस्कृतीने उत्पन्न केली. या साधनांचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होत आहे व ती साधने जास्ती प्रभावी ठरत आहेत. त्याशिवाय ज्या लोकांचा आपणांवर परिणाम होतो त्या लोकांची विचारसरणी व सामाजिक मूल्ये यांवर देखील अशा साधनांचा परिणाम होत असतो. म्हणून लोकांना व त्यांनी निर्माण केलेल्या वस्तूंना मानवी जीवनात असलेले महत्त्व पूर्वीच्या मानाने कितीतरी पटीने वाढले आहे.

## ५. *पर्यावरणानुकूलन*

सजीव प्राण्यांना आणि विशेषतः पशूंना व मानवांना भोवतालच्या परिस्थितीशी किंवा पर्यावरणाशी मिळते घ्यावे लागते. त्याखेरीज त्यांना जिवंत राहणेच शक्य नसते. पर्यावरणाशी अनुरूप होण्याच्या या प्रक्रियेला ( process of making suitable) अनुकूलन (adaptation) असे म्हणतात. तेव्हा प्रत्येक प्राण्याला हे पर्यावरणानुकूलन साध्य करून घ्यावे लागते. अर्थात ही अनुकूलनीयता (adaptability) संपादन करण्याचे मार्ग समान असत नाहीत. त्यामध्ये मुख्यतः दोन प्रकार आहेत. क्रियाशून्य अनुकूलन (passive adaptation) आणि क्रियाप्रवण अनुकूलन (active adaptation).

पर्यावरणाशी अनुरूप होण्याच्या प्रक्रियेमध्ये पर्यावरणात कसलाही बदल न करता स्वतःच्या शरीरात योग्य तो बदल करून घेण्याच्या अनुकूलनीयतेच्या पद्धतीला क्रियाशून्य अनुकूलन असे म्हणतात. विशेषतः पशूंच्या बाबतीत या प्रकारचे अनुकूलन घडत असते. पशूंनी जर असा बदल केला नाही तर त्यांना नामशेष होण्याखेरीज गत्यंतर नसते. बऱ्याच तऱ्हेच्या पशूंच्या बाबतीत अशी स्थिती झालेली आहे. पर्यावरणात बदल झाल्यानंतर त्याला अनुसरून स्वतःच्या शरीराचा आकार,

रचना आणि सवयी यांमध्ये जे पशू योग्य तो बदल करू शकले तेच जिवंत राहू शकले व इतरांचे अस्तित्त्व संपुष्टात आले. असे नष्ट झालेले कितीतरी पशूंच्या सारखे प्राणी उत्खननात आढळून येतात. तेव्हा पर्यावरणामध्ये इष्ट तो बदल करून घेण्याची क्रिया या प्रकारच्या अनुकूलनात घडत नाही. म्हणून क्रियाशून्य अनुकूलन ही संज्ञा या प्रकाराला दिली आहे.

प्राणी आणि पर्यावरण यांच्या परस्पर–संबंधांत पर्यावरणामध्ये पाहिजे ते बदल करून घेऊन पर्यावरण प्राण्यांच्या जीवनासाठी अनुरूप करून घेण्याची प्रक्रिया म्हणजे क्रियाप्रवण अनुकूलन होय. फक्त मानवांच्या बाबतीतच हे अनुकूलन संभवते कारण पर्यावरणामध्ये स्वतःला अनुरूप असा फरक करण्याची पात्रता व शक्ती मानवातच आढळते. पर्यावरणाच्या प्रभावामुळे दबून जाऊन मानव पर्यावरणाच्या सर्वस्वी आधीन होत नाही किंवा स्वतःच्या शारीरिक रचनेत बदल करीत नाही, तर तो विविध साधने निर्माण करून पर्यावरणाच्या प्रभावावर ताबा मिळवितो. अशा रीतीने कोणत्याही पर्यावरणात मानव स्वतःला अनुरूप अशी व्यवस्था निर्माण करतो व स्वतःच्या इच्छेनुसार जीवन व्यतीत करतो. कडक थंडीच्या प्रदेशात विशेष तऱ्हेचा पोषाख वापरून मानव स्वतःचे संरक्षण करतो, त्यासाठी त्याला स्वतःच्या शरीरावर जाड केसांचे आवरण वाढवावे लागत नाही. निसर्गनिर्मित गुहेत राहून तो कशीतरी कालक्रमणा करीत नाही तर सर्व सुखसोयींनी सुसज्ज अशी घरे बांधून व्यवस्थित जीवन जगण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा क्रियाप्रवण अनुकूलन हे मानवाचे खास वैशिष्ट्य आहे व ते इतर प्राण्यांमध्यें दिसून येत नाही. भोवतालच्या परिस्थितीला संपूर्णपणे शरण न जाता त्या परिस्थितीवर मात कशी करता येईल या गोष्टीकडे मानव लक्ष देतो व हळूहळू परिस्थितीवर वर्चस्व प्रस्थापित करतो. मानव पर्यावरणानुकूलन करतो असे जेव्हा आपण म्हणतो तेव्हा हे क्रियाशील अनुकूलनच आपल्याला अभिप्रेत असते.

# १

# समाज व लोकसंख्या

## १. जनसंख्या व समाजरचना

कोणत्याही समाजाचे स्वरूप त्या समाजातील लोकांच्या लक्षणांवर अवलंबून असते कारण समाज हा लोकांचा बनलेला असतो. लोकांखेरीज समाज अस्तित्वातच येऊ शकत नाही. लोक थोडे असोत वा जास्ती असोत, रानटी असोत वा सुधारलेले असोत, शहरात, खेडयात, सखल प्रदेशात वा डोंगराळ भागात राहणारे असोत, जेव्हा त्यांच्यांतील परस्पर-संबंधांची सुव्यवस्थित योजना केलेली असते तेव्हा त्या लोकांचा समाज निर्माण होतो. म्हणून समाजाचा अभ्यास करताना त्या समाजातील लोकसंख्याविषयक प्रश्नांची देखील दखल घेणे आवश्यक असते. अगदी अलीकडील काळात विविध समाजांची लोकसंख्याविषयक अधिकृत माहिती भरपूर प्रमाणात उपलब्ध होऊ लागल्याने लोकसंख्येचा वैज्ञानिक दृष्टिकोणातून अभ्यास करणारे "लोकविज्ञान" (Damography) या नावाचे वेगळे सामाजिक विज्ञान मान्यता मिळवू लागले आहे. साहाजिकच समाजशास्त्र व लोकविज्ञान यांचे संबंध वाढत आहेत आणि समाजातील संख्याविषयक बाबींचा विशेष अभ्यास करणारी "सामाजिक संख्याशास्त्र" (Social Statistics) या नांवाने ओळखली जाणारी समाजशास्त्राची शाखा अस्तित्वात आली आहे. तेव्हा समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी लोक व समाज यांचे परस्परसंबंध समजून घेणे अगदी अगत्याचे झाले आहे.

समाजामध्ये लोकसंख्येच्या परिमाणाला ( quantity of population ) विशेष महत्त्व असते. समाजाचा विस्तार लोकसंख्येच्या परिमाणावर अवलंबून असतो. थोडी लोकसंख्या असणारे लहान समाज व जास्ती लोकसंख्या असणारे मोठे समाज यांमध्ये कितीतरी तफावत दिसून येते. समाजाला स्वतःच्या अस्तित्त्वासाठी लोकांची गरज असते म्हणून काही वेळेला लोकसंख्या वाढविण्याकडे अगर काही वेळेला ती मर्यादित करण्याकडे समाज लक्ष देत असतो. कित्येक वेळेला शत्रूपासून जीवित रक्षण करण्यासाठी समाजाला जास्ती लोकांची आवश्यकता असते म्हणून लोकसंख्या वाढविण्याकडे समाज भर देतो. यासाठीच घर " मुलाबाळांनी समृद्ध होवो " असा आशिर्वाद लग्नसमयी देण्याची प्रथा रूढ झाली आहे. काही वेळेला लोकसंख्येच्या वाढीवर समाजाची प्रगती निर्धारित असते. विशेषतः नवीन वसाहतीमधील समाजात हे प्रकर्षाने दिसून येते. मोठ्या प्रमाणात उत्पादन करण्याला प्राधान्य देणाऱ्या आधुनिक अर्थव्यवस्थेत वाढते उत्पादन खपविण्यासाठी पर्यायाने वाढत्या लोकसंख्येची जरूरी भासते म्हणून लोकसंख्येच्या परिमाणाला समाजात वेगळेच महत्त्व प्राप्त झाले आहे.

लोकसंख्येच्या परिमाणाप्रमाणे लोकसंख्येच्या स्वरूपाचे ( quality of popul tion ) समाजावर परिणाम होत असतात. तरुण लोकांचे प्रमाण अधिक असणाऱ्या समाजांचे प्रश्न म्हाताऱ्या लोकांचे प्रमाग जास्त असणाऱ्या समाजापेक्षा सर्वथैव भिन्न असतात. तसेच लोकसंख्येत पुरुषांचे प्रमाण जास्त असणारे समाज व स्त्रियांचे प्रमाण जास्त असणारे समाज यांचे स्वरूप व समस्या अगदी वेगळ्या असतात.

जनसंख्येच्या प्रदेशवार विभागणीनुसार सामाजिक संबंध व वर्तन यांमध्ये फरक पडत असतात. मुख्यत्त्वेकरून ग्रामीण भागांत राहणाऱ्या लोकांच्या वागणुकीच्या पद्धती शहरी विभागांत सतत वास्तव्य करणाऱ्या लोकांच्या पद्धतींपेक्षा कितीतरी भिन्न असतात. अलीकडील काळात नागरीकरणाची झपाट्याने वाढ होत असल्याने नागरी पर्यावरणात राहणाऱ्या लोकांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे लोकांच्या समाज-रचनेत महत्त्वाचे बदल झाल्याचे आढळून येत आहे. उद्योगीकरणामुळे विशाल शहरे अस्तित्त्वात येऊ लागल्याने त्यात राहणाऱ्या सामाजिक समूहांचे स्वरूप बदलू लागले आहे. त्याचप्रमाणे सपाट प्रदेशात राहणारे लोक व डोंगराळ भागात राहणारे लोक आणि समुद्रकिनारी जीवन व्यतीत करणारे लोक व अंतर्गत प्रदेशात जंगलात राहणारे लोक यांमध्ये कित्येक सामाजिक बाबतीत तफावत दिसून येते.

सारांश, लोकसंख्या व समाज यांचा घनिष्ठ संबंध आहे. कोणत्याही लोकांना जगण्यासाठी समाजव्यवस्थेची जरूरी असते. एकेकटयाने राहून लोक आपला निर्वाह करू शकत नाहीत. ज्याप्रमाणे लोकांना समाजाची गरज असते त्याप्रमाणे समाजाला देखील लोकांची गरज असते. म्हणून लोकांची संख्या वाढविण्याकडे समाजाची प्रवृत्ती असते. पण असे करीत असताना समाजव्यवस्था अबाधित राहण्यासाठी समाज नेहमी प्रयत्नशील असतो. जर लोकसंख्येच्या भरमसाट वाढीमुळे समाजव्यवस्थेला धोका पोचत असेल तर त्या वाढीला पायबंद घालण्यासाठी समाजाला विविध उपाय योजावे लागतात. तसेच लोकसंख्येचा वाढता ऱ्हास थांबविण्यासाठी देखील समाजाला जागरूकतेने प्रयत्न करावे लागतात. नाहीतर सारी समाजव्यवस्थाच ढासळून पडण्याचा संभव असतो. म्हणून एखाद्या समाजातील लोकसंख्याविषयक बाबींचे समग्र आकलन झाल्याखेरीज त्या समाजाची सम्यक् कल्पना येणार नाही. तेव्हा लोकसंख्याविषयक प्रश्नांची पाहणी आपण आता करू या.

## २. *लोकसंख्येची गतिशीलता*

लोकसंख्येचा अभ्यास करताना प्रामुख्याने खालील चार गोष्टींवर लक्ष केंद्रित करतात.

१) एखाद्या प्रदेशातील लोकांची संख्या निश्चित करणे,
२) त्या संख्येमध्ये होणारा बदल– वाढ अगर ऱ्हास-ठरविणे,
३) त्या बदलाची कारणमीमांसा देणे, आणि
४) या आधारावर लोकसंख्येच्या भावी कालातील प्रवृत्तींचा अंदाज करणे.

याचा अर्थ असा की लोकसंख्येमध्ये जे बदल होत असतात त्यांचा सांगोपांग अभ्यास करून त्या बदलाची काही प्रक्रिया आहे किंवा काय हे ठरवावे लागते. लोकसंख्येच्या परिमाणामध्ये बदल होण्याच्या प्रक्रियेला लोकसंख्येची गतिशीलता ( dynamics of population ) असे म्हणतात. ही गतिशीलता (अ) जन्म–संख्या ( fertility ), (ब) मृत्यु–संख्या ( mortality ), व (क) स्थानान्तरण–संख्या ( migration ) या तीन परिवर्तनशील घटकांवर ( variables ) अवलंबून असते. एखाद्या समाजाच्या विवक्षित काळापूर्वीच्या लोकसंख्येच्या आकड्यांमध्ये जर त्या कालातील जन्मसंख्येच्या व मृत्युसंख्येच्या आकड्यांतील फरक आणि उत्प्रवासी ( emigrants ) [ किंवा परठिकाणी वास्तव्य करण्या साठी गेलेले लोक ] व आप्रवासी ( immigrants ) [ किंवा परठिकाणाहून

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ................ दि: ................
क्रमांक ..........

वास्तव्य करण्यासाठी आलेले लोक ] यांच्या आकडयांतील फरक मिळविले म्हणजे त्या समाजाच्या त्या कालांतरच्या लोकसंख्येचा नक्की आकडा काढता येतो. अस्थिर अशा या तीन घटकांमुळे लोकसंख्येत सारखा बदल होत असतो. म्हणून कोणत्याही समाजाच्या लोकसंख्येची गतिशीलता ठरविताना या तीन घटकांचा विचार करावा लागतो. भारतामध्ये स्थानान्तरण करणाऱ्या लोकांची संख्या इतर देशांच्या मानाने अगदी अल्प असते. तेव्हा जन्म–संख्या व मृत्यु–संख्या या दोन घटकांवरच भारताच्या लोकसंख्येची गतिशीलता मुख्यत्त्वेकरून ठरविली जाते.

(अ) जन्म-संख्या :

कोणत्याही समाजाच्या लोकसंख्येत जी वाढ होत असते ती त्या समाजातील लोकांची जननक्षमता किंवा त्या लोकांतील जन्म–संख्या ( fertility ) यावर मुख्यत्त्वे अवलंबून असते. ही जननक्षमता जनन-प्रमाण किंवा जन्म-दर ( birth rate ) काढून ठरविण्यात येते. एखाद्या समाजामध्ये एक वर्षाच्या कालावधीत दर हजार लोकांमागे जन्मणाऱ्या मुलांच्या संख्येवरून त्या समाजातील लोकांचे जनन–प्रमाण काढतात. अर्थात समाजातील लोकसंख्येच्या स्त्री-पुरुषांच्या प्रमाणावर (sex composition) व लोकांच्या वयानुसार केलेल्या विभागणीवर किंवा वयस्संघटनेवर ( age composition ) जनन प्रमाण अवलंबून असते. ज्या समाजात पुरुषांच्या मानाने स्त्रियांचे प्रमाण अधिक असते तेथे जनन-प्रमाण इतर समाजाच्या मानाने जास्ती असते. शिवाय स्त्रियांच्या प्रमाणाबरोबर विवाहित स्त्रियांचे प्रमाण देखील विचारात घ्यावे लागते. तसेच ज्या लोकांमध्ये अल्पवयीन व वृद्ध यांपेक्षा तरुणांची संख्या अधिक असते तेथेही जनन–प्रमाण जास्ती असलेले आढळून येते. साहजिकच गर्भधारणेच्या वयोमर्यादेतील विवाहित स्त्रियांची संख्या अधिक असणाऱ्या समाजात जनन-प्रमाण जास्ती असते.

मानवी समाजाच्या जन्मसंख्येचा केवळ जीवशास्त्रीय दृष्टिकोणातून विचार करून चालणार नाही. मानवेतर प्राण्यांमध्ये प्रजनन ( procreation ) ही शारीरिक सहजप्रवृत्तींवर अधिष्ठित झालेले असते आणि त्यावर कसलेही निर्बंध घातले जात नाहीत. पण मानवी समाजाची तशी स्थिती नाही. फक्त शारीरिक सहजप्रवृत्तींच्या आहारी जाऊन मानव–प्राण्यांमध्ये प्रजनन होत नाही तर प्रजननावर सामाजिक नियंत्रण अवश्य घातले जाते. मानवाने फार पूर्वीपासून प्रजनन व कामवासनातृप्ती यांमध्ये भेद केला आहे असे मानवशास्त्रीय व ऐतिहासिक पुराव्यावरून सिद्ध होते. ज्या प्रमाणात प्रजननाची शारीरिक क्षमता असते त्या प्रमाणात प्रत्यक्ष प्रजनन कोणत्याही समाजात होत नाही. कारण मानव संस्कृती या

गोष्टीला कधीही अनुकूल असत नाही. समाज जन्म-संख्या मर्यादित करण्याचा सदैव प्रयत्न करीत असतो. त्यासाठी समाज खालील प्रमाणे विविध तऱ्हेचे उपाय अनुसरत असतो आणि ते पाळले जावेत अशी खबरदारी घेत असतो.

१ **स्त्री-पुरुष-संपर्क** निर्बंध : समाजातील स्त्री-पुरुषांनी परस्परांशी कशा प्रकारचा संपर्क ठेवावा याचे नियम केलेले असतात. कित्येक वेळेला पडदा व इतर पद्धतींमुळे स्त्रियांना पुरुषांपासून अलग केले जाते आणि विवक्षित पुरुषांशीच त्यांचा संपर्क येऊ दिला जातो. समाजात संपत्ती, जात, धर्म व वर्ग यांमुळे निर्माण झालेल्या भेदांमुळे विविध समूहांतील स्त्री-पुरुषांमधील संपर्क आपोआपच मर्यादित होतो. या निर्बंधांमुळे साहजिकच जन्म-संख्येवर परिणाम होतो.

२. **स्त्री-पुरुषसमागम–निर्बंध** : समाजात कोणत्या व्यक्तींमध्ये मैथुन व्हावे याविषयी कडक दंडक घातलेले असतात. स्त्रीपुरुषसंपर्काच्या मानाने कितीतरी कमी प्रमाणात स्त्रीपुरुषसमागमाला मुभा असते. नात्यानात्यातील स्त्रीपुरुषसंपर्क जरी मान्य असला तरी कित्येक नात्यांतील लोकांचे लैंगिक संबंध त्याज्य ठरविले जातात. विवाहबाह्य समागमावर संपूर्ण बंदी घातलेली असते. एकपत्नीव्रताची सक्ती केली जाते. अपत्यहीनतेमुळे घटस्फोस्ट मिळतोच अशातला भाग नाही. फक्त विवाहांतर्गत समागमच मान्य असतात, पण विवाहाच्या वेळचे स्त्रीचे वय वाढले असल्याने अशा समागमांचा कालावधी कमी होतो. म्हणून स्त्रीपुरुष–संपर्कावरील निर्बंधापेक्षा स्त्रीपुरुषसमागमावरील निर्बंधांमुळे जन्मसंख्या मर्यादित होण्यास जास्ती मदत होते.

३. **संतति-नियमन** : पूर्वीच्या काळी ब्रह्मचर्य पाळून आणि भोगत्याग ( abstinence ) करून जन्मसंख्येवर नियंत्रण घालण्याचा प्रयत्न करण्यात येत असे. पण अलीकडील काळात कृत्रिम साधनांचा उपयोग आणि निर्बीजीकरण या मार्गांनी संततिप्रतिबंध साधण्याला महत्त्व दिले जाते. कारण या पद्धतींनी गर्भ–धारणेचा संभव टाळून संभोगसुख मात्र मिळविता येते. वैयक्तिक सुखाला प्राधान्य देणाऱ्या आधुनिक संस्कृतीमध्ये संततिनियमनाच्या या मार्गांचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होत आहे आणि अशा रीतीने जन्मसंख्या निश्चितपणे मर्यादित होत आहे.

४. **गर्भपात** : गर्भधारणा झाल्यानंतर बालकाचा जन्म टाळण्यासाठी गर्भस्रा-वाचा मार्ग अवलंबिण्यात येतो. साधारणपणे सर्व समाजांत काही विवक्षित परिस्थि-तींत गर्भपाताला मान्यता दिलेली असते आणि इतर परिस्थितींत त्याज्य ठरविलेला

वास्तव्य करण्यासाठी आलेले लोक ] यांच्या आकडयांतील फरक मिळविले म्हणजे त्या समाजाच्या त्या कालानंतरच्या लोकसंख्येचा नक्की आकडा काढता येतो. अस्थिर अशा या तीन घटकांमुळे लोकसंख्येत सारखा बदल होत असतो म्हणून कोणत्याही समाजाच्या लोकसंख्येची गतिशीलता ठरविताना या तीन घटकांचा विचार करावा लागतो. भारतामध्ये स्थानान्तरण करणाऱ्या लोकांची संख्या इतर देशांच्या मानाने अगदी अल्प असते. तेव्हा जन्म–संख्या व मृत्यु–संख्या या दोन घटकांवरच भारताच्या लोकसंख्येची गतिशीलता मुख्यत्वेकरून ठरविला जाते.

(अ) जन्म-संख्या :

कोणत्याही समाजाच्या लोकसंख्येत जी वाढ होत असते ती त्या समाजातील लोकांची जननक्षमता किंवा त्या लोकांतील जन्म–संख्या ( fertility ) यावर मुख्यत्वे अवलंबून असते. ही जननक्षमता जनन-प्रमाण किंवा जन्म-दर ( birth rate ) काढून ठरविण्यात येते. एखाद्या समाजामध्ये एक वर्षाच्या कालावधीत दर हजार लोकांमागे जन्मणाऱ्या मुलांच्या संख्येवरून त्या समाजातील लोकांचे जनन–प्रमाण काढतात. अर्थात समाजातील लोकसंख्येच्या स्त्री-पुरुषांच्या प्रमाणावर (sex composition) व लोकांच्या वयानुसार केलेल्या विभागणीवर किंवा वयस्संघटनेवर ( age composition ) जनन प्रमाण अवलंबून असते. ज्या समाजात पुरुषांच्या मानाने स्त्रियांचे प्रमाण अधिक असते तेथे जनन-प्रमाण इतर समाजाच्या मानाने जास्ती असते. शिवाय स्त्रियांच्या प्रमाणाबरोबर विवाहित स्त्रियांचे प्रमाण देखील विचारात घ्यावे लागते. तसेच ज्या लोकांमध्ये अल्पवयीन व वृद्ध यांपेक्षा तरुणांची संख्या अधिक असते तेथेही जनन–प्रमाण जास्ती असलेले आढळून येते. साहजिकच गर्भधारणेच्या वयोमर्यादेतील विवाहित स्त्रियांची संख्या अधिक असणाऱ्या समाजात जनन-प्रमाण जास्ती असते.

मानवी समाजाच्या जन्मसंख्येचा केवळ जीवशास्त्रीय दृष्टिकोणातून विचार करून चालणार नाही. मानवेतर प्राण्यांमध्ये प्रजनन ( procreation ) ही शारीरिक सहजप्रवृत्तींवर अधिष्ठित झालेले असते आणि त्यावर कसलेही निर्बंध घातले जात नाहीत. पण मानवी समाजाची तशी स्थिती नाही. फक्त शारीरिक सहजप्रवृत्तींच्या आहारी जाऊन मानव–प्राण्यांमध्ये प्रजनन होत नाही तर प्रजननावर सामाजिक नियंत्रण अवश्य घातले जाते. मानवाने फार पूर्वीपासून प्रजनन व कामवासनातृप्ती यांमध्ये भेद केला आहे असे मानवशास्त्रीय व ऐतिहासिक पुराव्यावरून सिद्ध होते. ज्या प्रमाणात प्रजननाची शारीरिक क्षमता असते त्या प्रमाणात प्रत्यक्ष प्रजनन कोणेत्याही समाजात होत नाही. कारण मानव संस्कृती या

गोष्टीला कधीही अनुकूल असत नाही. समाज जन्म-संख्या मर्यादित करण्याचा सदैव प्रयत्न करीत असतो. त्यासाठी समाज खालील प्रमाणे विविध तऱ्हेचे उपाय अनुसरत असतो आणि ते पाळले जावेत अशी खबरदारी घेत असतो.

१ **स्त्री-पुरुष-संपर्क** निर्बंध : समाजातील स्त्री-पुरुषांनी परस्परांशी कशा प्रकारचा संपर्क ठेवावा याचे नियम केलेले असतात. कित्येक वेळेला पडदा व इतर पद्धतींमुळे स्त्रियांना पुरुषांपासून अलग केले जाते आणि विवक्षित पुरुषांशीच त्यांचा संपर्क येऊ दिला जातो. समाजात संपत्ती, जात, धर्म व वर्ग यांमुळे निर्माण झालेल्या भेदांमुळे विविध समूहांतील स्त्री-पुरुषांमधील संपर्क आपोआपच मर्यादित होतो. या निर्बंधांमुळे साहजिकच जन्म-संख्येवर परिणाम होतो.

२. **स्त्री-पुरुषसमागम–निर्बंध** : समाजात कोणत्या व्यक्तींमध्ये मैथुन व्हावे याविषयी कडक दंडक घातलेले असतात. स्त्रीपुरुषसंपर्काच्या मानाने कितीतरी कमी प्रमाणात स्त्रीपुरुषसमागमाला मुभा असते. नात्यानात्यातील स्त्रीपुरुषसंपर्क जरी मान्य असला तरी कित्येक नात्यांतील लोकांचे लैंगिक संबंध त्याज्य ठरविले जातात. विवाहबाह्य समागमावर संपूर्ण बंदी घातलेली असते. एकपत्नीव्रताची सक्ती केली जाते. अपत्यहीनतेमुळे घटस्फोस्ट मिळतोच अशातला भाग नाही. फक्त विवाहांतर्गत समागमच मान्य असतात, पण विवाहाच्या वेळचे स्त्रीचे वय वाढले असल्याने अशा समागमांचा कालावधी कमी होतो. म्हणून स्त्रीपुरुष–संपर्कावरील निर्बंधांपेक्षा स्त्रीपुरुषसमागमावरील निर्बंधांमुळे जन्मसंख्या मर्यादित होण्यास जास्ती मदत होते.

३. **संतति-नियमन** : पूर्वीच्या काळी ब्रह्मचर्य पाळून आणि भोगत्याग ( abstinence ) करून जन्मसंख्येवर नियंत्रण घालण्याचा प्रयत्न करण्यात येत असे. पण अलीकडील काळात कृत्रिम साधनांचा उपयोग आणि निर्बीजीकरण या मार्गांनी संततिप्रतिबंध साधण्याला महत्त्व दिले जाते. कारण या पद्धतींनी गर्भ–धारणेचा संभव टाळून संभोगसुख मात्र मिळविता येते. वैयक्तिक सुखाला प्राधान्य देणाऱ्या आधुनिक संस्कृतीमध्ये संततिनियमनाच्या या मार्गांचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होत आहे आणि अशा रीतीने जन्मसंख्या निश्चितपणे मर्यादित होत आहे.

४. **गर्भपात** : गर्भधारणा झाल्यानंतर बालकाचा जन्म टाळण्यासाठी गर्भस्रावाचा मार्ग अवलंबिण्यात येतो. साधारणपणे सर्व समाजांत काही विवक्षित परिस्थितींत गर्भपाताला मान्यता दिलेली असते आणि इतर परिस्थितींत त्याज्य ठरविलेला

असतो. समाजाची मान्यता असो वा नसो गर्भपाताच्या मार्गाचा उपयोग होत असल्याचे आढळून येते व त्याचा जन्मसंख्येवर परिणाम होतो. अलीकडील काळात काही पुढारलेल्या देशांनी वाढत्या लोकसंख्येला पायबंद घालण्यासाठी गर्भपाताच्या मार्गाला कायदेशीर मान्यता दिली आहे.

५. **बालहत्या** : नवजात बालकाची हत्या करून लोकसंख्या मर्यादित करण्याचा उपाय सुधारलेल्या आधुनिक समाजांत सर्वथैव वर्ज्य समजला जातो. पण पुष्कळ आदिवासींच्या समाजात मात्र ठराविक परिस्थितीत बालहत्येला मान्यता किंवा प्रोत्साहन दिले जाते. बहुप्रसव (plural birth) झाले असेल किंवा स्त्रीने एका वेळेला एकापेक्षा जास्त मुलांना जन्म दिला असेल, स्त्री–अपत्य नकोसे वाटत असेल, अनौरस संतती टाळावयाची असेल, कुटुंबाचा विस्तार मर्यादित ठेवावयाचा असेल आणि विकृत किंवा रोगपीडित मुले नकोशी असतील तर अशा परिस्थितींत बालहत्येची मुभा काही समाजात ठेवलेली असते. जाणूनबुजून जरी बालहत्या केली नाही तरी कित्येक समाजांत लहान मुलांचे संगोपन नीट न होऊन बालमृत्यूचे प्रमाण वाढते. या गोष्टीला बालहत्येचा दुसरा प्रकार असे म्हणता येईल.

ज्याप्रमाणे वरील उपायांनी प्रजनन मर्यादित करण्याचा प्रयत्न समाज करीत असतो त्याचप्रमाणे प्रजननाला विवक्षित पद्धतींनी उत्तेजन देण्याचे कार्य देखील समाज नेहमी करीत असतो. लोकांनी विवाहबद्ध होऊन विवाहांतर्गत प्रजोत्पादन करावे अशी समाजाची धारणा असते. वैवाहिक स्थितीला समाज विशेष महत्त्व देतो. उदाहरणार्थ, कित्येक समाजांत विवाहितांनाच मान दिला जातो; त्यांनाच जमीन जुमला घेता येतो, जबाबदारीच्या जागा स्वीकारता येतात, धर्मकृत्ये करता येतात आणि मोक्षमार्गही फक्त विवाहितांनाच खुला असतो. शिवाय लोकांना स्वतःच्या आत्म्याला मुक्ती मिळावी, वृद्धापकाळांची तरतूद व्हावी, आर्थिक व्यवहारात हातभार लागावा, प्रेम व ममता संपादन करता यावी या व इतर कारणांसाठी संततीची आवश्यकता भासते. अशा रीतींनी लोकांच्या प्रजनन–विषयक वृत्तींना वळण देण्याचे कार्य समाज करीत असतो.

सारांश, कोणताही समाज विविध उपायांनी जन्म-संख्येचे नियमन करीत असतो विवक्षित रीतींनीच जन्मसंख्या वाढावी असा समाजाचा अट्टाहास असतो. तसेच जन्मसंख्येचे प्रमाण अनिर्बंधपणे वाढू नये इकडेही समाज लक्ष देत असतो. अर्थात जन्मसंख्येचे प्रमाण सर्व समाजात सारखे असत नाही. सामाजिक

परिस्थितीनुसार ते बदलत असते. अलीकडील काळात औद्योगिक प्रगती साधलेल्या पाश्चिमात्य समाजांत जन्मसंख्येचे प्रमाण घटत असलेले आढळून येते; तर आर्थिक दृष्ट्या अविकसित किंवा मागासलेल्या आग्नेय आशियातील समाजांत जन्मसंख्येचे प्रमाण कमी न होता वाढतच असल्याचे दृष्टोत्पत्तीस येते.

**(ब) मृत्यु-संख्या :**

कोणत्याही समाजाची लोकसंख्या स्थलांतरण व मरण किंवा मृत्युसंख्या ( mortality ) या दोन मार्गांनी कमी होत असते. त्यापैकी स्थलांतरणाचा मार्ग अतिशय मर्यादित स्वरूपाचा असतो. तेव्हा लोकसंख्येत ऱ्हास होण्याचे प्रमुख कारण म्हणजे अधिक लोक मृत्यू पावणे हे होय. लोकसंख्येच्या ऱ्हासाची कल्पना येण्यासाठी मृत्यु-प्रमाण किंवा मृत्यु-दर (death rate ) काढतात. जनन-दर काढण्याच्या पद्धतीप्रमाणेच मृत्यु-दर काढण्यात येतो. एखाद्या समाजात एक वर्षाच्या कालावधीत दर हजार लोकांमागे मरण पावलेल्या व्यक्तींच्या संख्येवरून त्या समाजातील लोकांचे मृत्युप्रमाण काढण्यात येते. जनन-प्रमाणाप्रमाणे मृत्यु-प्रमाण देखील लोकांच्या वयस्संघटनेवर ( age composition ) अवलंबून असते. लोकांच्या वयोरचनेनुसार मृत्युप्रमाण बदलत असते. साहजिकच ज्या समाजात 'वृद्धां'ची संख्या 'तरुणां'च्या संख्येच्या मानाने जास्ती असते, त्या समाजात उच्च मृत्युदर ( high death rate ) आढळून येतो. अर्थात अशा वेळी इतर गोष्टींत फरक पडत नाही असे गृहीत धरले जाते. कारण मृत्यूचे प्रमाण हे काही फक्त वयोमानावर आधारलेले असत नाही. स्वच्छता, आरोग्य, आहार, दुष्काळ, रोगराई, युद्ध इत्यादी गोष्टींच्या स्वरूपावर समाजातील मृत्यु-प्रमाण अवलंबून असते.

सर्व लोकांना मृत्यु जरी अटळ असला तरी तो येण्याचे वय व मार्ग सर्व समाजांत सारखे असत नाहीत. समाजाच्या संस्कृतीवर या बाबी पुष्कळशा अवलंबून असतात. वैद्यकीय ज्ञानात वाढ झाली म्हणजे मृत्यु-दर हळूहळू कमी होण्यावर फार परिणाम होतो. तसेच सार्वजनिक स्वच्छता व आरोग्य यांमध्ये सुधारणा झाल्याने मृत्यूची नेहमीची कारणे नष्ट होऊन मृत्यु-दर कमी कमी होऊ लागतो. गेल्या शतकात वैद्यकीय ज्ञानाची एवढी प्रगती झाली आणि सार्वजनिक आरोग्य सुधारण्याचे एवढे प्रयत्न झाले की बहुतेक समाजांतून मृत्यु-दर बऱ्याच प्रमाणात कमी झाला व ही प्रक्रिया अजूनही चालू आहे. आरोग्यरक्षण व आरोग्य-संवर्धन या बाबतींत झालेल्या असामान्य प्रगतीबरोबरच औद्योगिक क्षेत्रात झालेल्या क्रांतीने देखील मृत्यूचे प्रमाण कमी होण्याला हातभार लावला आहे. औद्योगिक क्रांतीमुळे उत्पादनक्षमता वाढल्याने उद्योगधंद्यांचे व शेतीचे उत्पादन वाढले, लोकांचे राहणी-

मान सुधारले, स्वास्थ्यरक्षणाची साधने उपलब्ध झाली व पर्यायाने शारीरिक ताण कमी होऊन मृत्यु-दर कमी होण्याला मदत झाली. तसेच तांत्रिक ज्ञानाच्या क्षेत्रात झालेल्या अभूतपूर्व प्रगतीमुळे दळणवळणाची साधनें वाढल्याने दुष्काळाचे भय नाहीसे झाले व वरचेवर येणाऱ्या दुष्काळांमुळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण कितीतरी घटले. एकूण जनन-दराप्रमाणे मृत्यु-दर देखील समाजाच्या विशिष्ट सांस्कृतिक परिस्थितीवर अवलंबून असतो. ज्या समाजात वैद्यकीय ज्ञान, आरोग्यरक्षणाचे उपाय, राहणीमान व तंत्रज्ञान या गोष्टी भरपूर प्रमाणात वाढलेल्या आढळून येतात त्या समाजात मृत्युदर क्रमशः खाली जात असल्याचे निदर्शनास येते. या कारणांमुळे पुष्कळशा समाजांतून आणि विशेषतः सुधारलेल्या पाश्चिमात्य देशांतील समाजांतून मृत्यूचे प्रमाण कितीतरी प्रमाणात कमी झाल्याचे व लोकांचे आयुर्मान वाढल्याचे दृष्टोत्पत्तीस येत आहे. उदाहरणार्थ, अमेरिकेत लोकांच्या आयुर्मानाचे सरासरी प्रमाण १९०० साली ४९.२५ वर्षे होते. ते १९५७ साली ६७.५० वर्षा-पर्यंत वाढले.

## (क) स्थानान्तरण संख्या :

एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात वास्तव करण्यासाठी जाण्याच्या लोकांच्या प्रवृत्तीमुळे देखील समाजाच्या लोकसंख्येत बदल होत असतो. एखाद्या समाजात परठिकाणाहून वास्तव्य करण्यासाठी आलेल्या लोकांना आप्रवासी ( immi-grants ) असे म्हणतात, तर तो समाज सोडून परठिकाणी वास्तव्य करण्या-साठी गेलेल्या लोकांना उत्प्रवासी (emigrants) असे म्हणतात. साहजिकच, आप्रवासी व्यक्तींमुळे लोकसंख्येत वाढ होते आणि उत्प्रवासी व्यक्तींमुळे लोकसंख्या कमी होते. तेव्हा लोकसंख्येच्या गतिशीलतेचा विचार करताना स्थानान्तरणाची प्रक्रिया अवश्य लक्षात घ्यावी लागते. लोकसंख्येचा नक्की आकडा ठरविताना जन्म व मृत्युसंख्येच्या आकड्याबरोबर स्थानान्तरणसंख्येचा सुद्धा विचार करावा लागतो. म्हणजे एखाद्या समाजाची विशिष्ट कालानंतरची लोकसंख्या निश्चित करताना ज्याप्रमाणे त्या काळातील जन्म व मृत्युसंख्येच्या आकड्यांतील फरक लक्षात घ्यावा लागतो त्याचप्रमाणे त्या काळातील आप्रवासी व उत्प्रवासी यांच्या संख्येतील फरक देखील विचारात घ्यावा लागतो.

मानवाच्या स्थानांतरणाचे पद्धतशीर आकलन करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. स्थानान्तरणाला अनेक गोष्टी कारणीभूत होत असतात. आर्थिक उन्नती, धार्मिक छळापासून मुक्तता, वांशिक व राजकीय भेदभावापासून सुटका असे काही हेतू मनात असल्याखेरीज मनुष्य स्थलांतर करीत नाही. तसेच विशेष

परिस्थितीला तोंड देण्यासाठी मनुष्य स्थलांतर करीत असतो. स्थानान्तरणाची दोन्ही कारणे वाजवी व परस्परावलंबी आहेत. स्थानान्तरणाच्या हेतूंची कल्पना येण्यासाठी त्यावेळची परिस्थिती समजावून घ्यावी लागते आणि परिस्थितीच्या प्रभावामुळे स्थानान्तरणाचे हेतू ठरत असतात. म्हणून स्थानान्तरणाचा अभ्यास करताना फक्त हेतू अगर परिस्थिती यांचा अलगपणे विचार करून भागत नाही तर हेतू व परिस्थिती या दोन्ही कारणांचा मिळूनच विचार करावा लागतो. असा विचार करणे सोपे असत नाही. कारण या दोन्ही कारणांचा विविध समाजांशी व प्रदेशांशी संबंध येतो. कोणत्याही स्थानान्तरणाला दोन प्रदेश व दोन समाज या बाजू असतात; आणि या दोन बाजूंमध्ये इतकी विभिन्नता सामावलेली आहे की स्थानान्तरणाचे सर्वमान्य सिद्धान्त अगर नियम प्रस्थापित करणे अशक्य असते. म्हणून समाजशास्त्रज्ञ स्थानान्तरणाच्या विवक्षित घटनाच विशद करून सांगण्याचा प्रयत्न करीत असतात. एखाद्या स्थानान्तरणाच्या घटनेमधील भावनेचा प्रश्न, खर्चाचे प्रमाण, राजकीय अडथळे, वांशिक दृष्टिकोण, लोकसंख्येचे दडपण, विशिष्ट परिस्थिती इत्यादी बाबींचा उहापोह करून त्या घटनेचे सम्यक् आकलन करून घेत असतात.

तेव्हा प्रजनन आणि मरण याप्रमाणे स्थानान्तरण देखील लोकांच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाच्या स्वरूपावर अवलंबून असते. यासाठीच या तिन्ही गोष्टींचा लोकसंख्येच्या प्रश्नाच्या अनुषंगाने समाजशास्त्रात अभ्यास करावा लागतो.

सारांश, कोणत्याही समाजाच्या लोकसंख्येची गतिशीलता त्या समाजातील जन्म-सख्या, मृत्यु-संख्या व स्थानान्तरण-संख्या या तीन घटकांवर अवलंबून असते. हे तिन्ही घटक परिवर्तनशील आहेत. त्यामध्ये नेहमी बदल होत असतो. विशेष म्हणजे समाजातील प्रचलित चालीरीती व सांस्कृतिक घडामोडी यांचा या तिन्ही घटकांवर नेहमी परिणाम होत असतो. तेव्हा लोकसंख्येच्या गतिशीलतेच्या संदर्भात या तीन घटकांचा विचार करताना सामाजिक परिस्थितीचा देखील सांगोपांग विचार केला पाहिजे. तसेच, या तीन घटकांपैकी पहिले दोन घटक लोकसंख्येत बदल होण्याच्या दृष्टीने जास्ती महत्त्वाचे आहेत. कारण स्थानान्तरण हे सर्वसाधारण परिस्थितीमध्ये अगदी अल्प प्रमाणात होत असते व अलीकडील काळात तर त्यावर पुष्कळ देशांनी बरेच नियंत्रण घातले आहे. युद्धे, दुष्काळ, धर्मच्छल यासारख्या विशेष परिस्थितीत स्थानान्तरण मोठ्या प्रमाणावर होत असते आणि अशा सारखी असामान्य परिस्थिती अलीकडे दिसून येत नाही. तेव्हा स्थानान्तरणाची व्याप्ती मर्यादित असल्या कारणाने लोकसंख्येच्या वाढीत होणारा बदल मुख्यत्त्वे

जनन–दर व मृत्यु-दर यांमध्ये आढळून येणाऱ्या फरकाच्या प्रमाणावर अवलंबून असतो. ज्या समाजात उच्च जनन–दर ( high birth rate ) व निम्न मृत्युदर ( low death rate ) आढळून येतात त्या समाजाची लोकसंख्या झपाट्याने वाढत असते. याच्या उलट ज्या समाजात निम्न जनन दर व उच्च मृत्युदर प्रचलित आहेत त्या समाजाची लोकसंख्या द्रुतगतीने ऱ्हास पावत असते. साहजिकच जेथे जननदर व मृत्युदर यांचा समतोल आढळून येतो, तेथे लोकसंख्या स्थिर ( stationary ) असते. तसेच एखाद्या समाजात उच्च जननदर असून सुद्धा जर अतिशय उच्च मृत्युदर असेल तर त्या समाजातील लोकसंख्यावाढीचा वेग कमी होईल एवढेच नव्हे तर लोकसंख्या देखील कमी होऊ लागेल. शिवाय, निम्न जनन-दर असताना जर मृत्युदर देखील निम्न असेल तर लोकसंख्यावाढीला पूरक परिस्थिती निर्माण होत असते. परंतु उच्च जननदर तसाच राहून मृत्युदर मात्र बऱ्याच निम्न पातळीवर आणला तर थोड्या कालावधीत लोकसंख्या अतिशय वेगाने वाढत राहते.

जननदर व मृत्युदर आणि लोकसंख्येतील बदल यांच्या परस्पर–संबंधांनुसार जगातील विविध समाजांची तीन प्रमुख गटांत विभागणी करण्यात येते.

(१) **गट-अ** : निम्न जननदर व निम्न मृत्युदर असलेले लोक या गटात मोडतात. जगातील एक–पंचमांश लोकांमध्ये ही परिस्थिती आढळून येते. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी आदी पश्चिम युरोपमधील देश, अमेरिका, कानडा, ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड या देशांतील समाज या सदरात येतात. जननदर व मृत्युदर दोन्हीही निम्न असल्याकारणाने या समाजांची लोकसंख्यावाढ अगदी अल्प प्रमाणात होत असते.

(२) **गट ब** : उच्च जननदर व साधारण ( moderate ) मृत्युदर असलेले लोक या गटात मोडतात. साहजिकच या समाजाच्या लोकसंख्यावाढीचे प्रमाण जास्ती असते. जगातील एक–पंचमांश लोकांमध्ये ही परिस्थिती दिसून येते. स्पेन, पोलंड, युगोस्लाव्हिया, रशिया आदी पूर्व व आग्नेय युरोपमधील देश, गोऱ्या लोकांची दक्षिण अफ्रिका, जपान आणि दक्षिण अमेरिकेतील ब्राझिल, अर्जेंटिना व युराग्वे या देशांतील समाज या सदरात येतात.

(३) **गट–क** : उच्च जननदर व उच्च मृत्युदर असलेले लोक या गटात मोडतात. जगातील गट अ व गट ब व्यतिरिक्त राहिलेल्या तीन-पंचमांश लोकांमध्ये ही परिस्थिती आढळून येते. भारत, चीन आदी आग्नेय आशियातील देश, आफ्रि-

केतील देश आणि दक्षिण अमेरिकेतील दक्षिणेकडील देश यांमधील समाज या सदरात येतात. जननदर व मृत्युदर दोन्हीही उच्च असल्याकारणाने या समाजांतील लोकसंख्या-वाढीचे प्रमाण मृत्युदरातील फरकानुसार बदलत असते. उच्च जनन-दर कायम राहून जर मृत्युदर कमी कमी होऊ लागेल तर लोकसंख्यावाढीचे प्रमाण बरेच वाढते. भारतात हल्ली ही परिस्थिती दिसून येते. वैद्यकीय व इतर उपायांनी भारताचा मृत्युदर कमी होत आहे पण उच्च जनन–दर मात्र कमी होत नाही. त्यामुळे भारताची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे

## ३. *लोकसंख्येची रचना व विभागणी*

समाजाची खरी कल्पना येण्यासाठी त्या समाजाची नुसती लोकसंख्या व तिच्यात होणारे बदल या गोष्टीच केवळ पाहून चालणार नाही. तर समाजातील लोकांची रचना–लोकविज्ञानाच्या दृष्टिकोणातून–पाहिली पाहिजे. समाजातील लोकांची वयस्संघटना कशी आहे, लोकांमध्ये स्त्री–पुरुषांचे प्रमाण किती आहे, लोकांची वैवाहिक स्थित्यनुसार कशी विभागणी झाली आहे, लोकांची प्रदेशानुसार कशी वाटणी झाली आहे, लोकांची वसती नगरपरत्त्वे व ग्रामपरत्त्वे कशी झाली आहे इत्यादी गोष्टी देखील समाजाचे सम्यक् आकलन होण्यासाठी विचारात घेतल्या पाहिजेत.

समाजातील लोकांच्या वयस्संघटनेला (age composition of people) विशेष महत्त्व असते. समाजामध्ये सधारणपणे सर्व वयाचे लोक आढळून येतात. वयोमानानुसार मुले, तरुण व वृद्ध अशा तीन गटांतून लोकांची विभागणी करतात आणि या तिन्ही गटांतील लोकांचे प्रमाण सर्व काली व सर्व समाजांतून सारखे असत नाही. प्रत्येक समाजातील लोकांची वयस्संघटना इतरापासून थोडी फार का होईना पण भिन्न असते एवढेच नव्हे तर ती वयस्संघटनाही त्या समाजात त्याच स्वरूपात कायमची राहात नाही. वयस्संघटनेमध्ये दिसून येणाऱ्या या बदलांना जन्मसंख्या, मृत्युसंख्या, स्थानान्तरणसंख्या, युद्ध, दुष्काळ, रोगराई यासारख्या गोष्टी कारणीभूत होतात. कारणे कोणती का असेनात, विवक्षित वयस्संघटनेचा सामाजिक व सांस्कृतिक जीवनाच्या स्वरूपावर दूरगामी परिणाम झाल्याखेरीज राहात नाही. उदाहरणार्थ, २५ वर्षाखालील लोकांचे प्रमाण अधिक असलेल्या समाजांत जन्मसंख्येचे प्रमाण वाढत जाते, जास्ती सैन्यबलाची शक्यता निर्माण होते, बालसंगोपन व शिक्षणविषयक गोष्टींना विशेष प्राधान्य दिले जाते आणि तरुणांच्या वागणुकीवर

लक्ष ठेवावे लागते. याच्या उलट ५० किंवा ६० वर्षांवरील लोकांचे प्रमाण अधिक असलेल्या समाजात जन्मसंख्येचे प्रमाण कमी असते, सैन्यबल उभे करण्याची पात्रता कमी असते, आणि वृद्धांना निवृत्ति-वेतन देण्यासाठी किंवा त्यांचे पोषण करण्यासाठी बालसंगोपन किंवा शिक्षण यापेक्षा कितीतरी जास्ती पैसा खर्च करावा लागतो.

लोकसंख्येची रचना कळण्यासाठी लोकांमधील स्त्री–पुरुष प्रमाण ( sex ratio ) पाहिले पाहिजे. समाजात दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची किती संख्या असते यावरून स्त्री–पुरुषप्रमाण काढतात. मनुष्यप्राण्यामध्ये मुलींपेक्षा मुले जास्ती जन्माला येतात; साधारणपणे १०५ मुलांमागे १०० मुली जन्माला येतात. पण बालमृत्यूचे प्रमाण मुलींपेक्षा मुलांत जास्ती आढळून येते. म्हणून मानव प्राण्यामध्ये स्त्री–पुरुषप्रमाण सामान्यतः समान असते. परंतु हे समान स्त्री–पुरुष प्रमाण कित्येक कारणांनी टिकत नाही. ज्या अनेक समाजांत मुलींपेक्षा मुलांना जास्ती महत्त्व दिले जाते त्या समाजांत मुलींची आबाळ किंवा हत्या होऊन स्त्रियांपेक्षा पुरुषांचे प्रमाण बरेच वाढते. तसेच युद्धमान समाजांतील पुरुष जास्ती कामाला येतात म्हणून त्या समाजांत पुरुषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण जास्ती दिसून येते. शिवाय, मोठमोठ्या शहरांत किंवा नवीन वसाहतीच्या प्रदेशांत पुरुषांचे प्रमाण जास्ती आढळते तर ग्रामीण भागांत किंवा पूर्वापार वसती असलेल्या प्रदेशांत स्त्रियांचे प्रमाण जास्ती आढळून येते. म्हणून स्त्री-पुरुषप्रमाण सर्व समाजांत सारखे असत नाही आणि एखाद्या समाजाचे स्त्री–पुरुषप्रमाण सर्व काळ सारखे राहात नाहीं. विशेष म्हणजे स्त्रीपुरुषप्रमाणाचा सामाजिक जीवनावर हमखास परिणाम होतो. स्त्रियांचे प्रमाण अत्यधिक असलेल्या लोकांचे सामाजिक जीवन पुरुषांचे प्रमाण अत्यधिक असलेल्या लोकांपेक्षा भिन्न असणार हे उघड आहे. उदाहरणार्थ, एखाद्या समाजात पुरुषांचे प्रमाण अगदी जास्त असेल तर तेथे विवाहित पुरुषांचे प्रमाण कमी सापडेल व विवाहित स्त्रियांचे प्रमाण जास्ती आढळून येईल. स्त्रीपुरुषप्रमाणाचा लग्नप्रकारावरही परिणाम होण्याचा संभव असतो. स्त्रियांचे प्रमाण जास्त असलेल्या समाजात बहुपत्नीत्वाची प्रथा आणि पुरुषांचे प्रमाण जास्ती असलेल्या समाजांत बहुभर्तृत्वाची प्रथा अस्तित्वात येण्याची शक्यता असते. अर्थात हे होईलच असे ठामपणे सांगता येणार नाहीं. कारण लग्नप्रकार हा समाजांतील फक्त स्त्रीपुरुषप्रमाणावरच अवलंबून असत नाही.

लोकांची वैवाहिक स्थिती ( marital status ) हे समाजाच्या लोकसंख्येच्या रचनेचे विशेष लक्षण आहे. लोकांपैकी कितीजण अविवाहित आहेत, कितीजण विवाहित आहेत, आणि कितीजणांची विवाहित अवस्था संपुष्टात येऊन ते

विधुर, विधवा, किंवा घटस्फोटित म्हणून राहात आहेत या गोष्टींची नोंद केली म्हणजे लोकांची वैवाहिक स्थिती समजून येते. या गोष्टींना सामाजिक जीवनाच्या दृष्टिकोणातून अतिशय महत्त्व आहे कारण यावरून समाजात विवाह करून कुटुंबसंस्थेत राहण्याची प्रवृत्ती लोकांमध्ये किती प्रमाणात आहे याची कल्पना येते. साधारणपणे लोकांमध्ये ही प्रवृत्ती मोठ्या प्रमाणात दिसून येते. ही प्रवृत्ती अगदी आवश्यक आहे. लग्नसंस्थेवर कुटुंबसंस्था आधारलेली असते आणि कुटुंबसंस्थेच्या स्थैर्यावर समाजाचे स्थैर्य अवलंबून असते. लोकांच्या जीवनाला व व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला कुटुंबामुळे प्रभावी वळण लागते. लोकांना कित्येक प्रकारच्या सुखसोयी कुटुंबात राहिल्यामुळे उपलब्ध होतात. इतरांपेक्षा विवाहित लोकांचे आयुष्यमान जास्ती असते व त्यांचे जीवन नियमित होते. म्हणून समाजाची योग्य कल्पना येण्यासाठी त्या समाजातील लोकांची वैवाहिक स्थिती विचारात घेणे आवश्यक असते.

समाजाच्या विविध भूभागांत झालेल्या लोकांच्या वाटणीला लोकसंख्येची विभागणी ( distribution of population ) असे म्हणतात. लोकसंख्येचे एकाच जागी केंद्रीकरण ( concentration ) झालेले असत नाही तर ती सर्व भूभागांत पसरलेली असते. यालाच लोकसंख्येची प्रदेशवार विभागणी ( regional distribution ) असे म्हणतात. अर्थात सर्व भूभागांत लोकसंख्येची समान वाटणी झालेली असत नाही. काही भागांत लोकसंख्या दाट असते तर काही भागांत ती बरीच विरळ असते. लोकसंख्या व भूभाग यांचे परस्परप्रमाण ठरविण्यासाठी लोकसंख्येची घनता ( density of population ) या कल्पनेचा उपयोग करतात. दर चौरस मैलामागे किती लोक राहतात यावरून लोकसंख्येची घनता ठरवितात. लोकसंख्येच्या घनतेच्या आकड्यावरून लोकसंख्येच्या विभागणीचे आकलन होते. भारताच्या लोकसंख्येची विभागवार (zone-wise) आणि राज्यवार (state-wise) विभागणी केली असून त्यातील लोकसंख्येच्या घनतेचे आकडे उपलब्ध आहेत. लोकसंख्येच्या प्रदेशवार विभागणीचे सामाजिक जीवनाच्या दृष्टीने आगळे महत्त्व आहे. लोकसंख्येची घनता जास्त असलेल्या प्रदेशातील सामाजिक जीवन लोकसंख्येची घनता अगदी कमी असलेल्या प्रदेशातील सामाजिक जीवनापासून भिन्न असणार हे उघड आहे. तेव्हा सामाजिक जीवनाचे स्वरूप कळण्यासाठी लोकसंख्येच्या प्रदेशवार विभागणीची माहिती करून घेतली पाहिजे.

लोकसंख्येच्या विभागणीचा दुसरा प्रकार म्हणजे ग्रामीण व नागर भागांत झालेली विभागणी ( rural–urban disribution ) हा होय. लोक ग्रामीण

किंवा नागर भागात वसती करून राहतात. पण सगळेच लोक त्या त्या भागात कायमचे राहात नाहीत; व पुष्कळसे लोक स्थानान्तरण करीत असतात. मुख्यत: खेड्यातून शहराकडे येण्याची व तेथे कायमची वसती करण्याची प्रवृत्ती लोकांमध्ये दिसून येते. आर्थिक उन्नती साधावी, स्वत:ला आचार-स्वातंत्र्य मिळावे, ग्रामीण जीवनापासून सुटका व्हावी इत्यादी कारणांसाठी लोकांचा शहराकडे जाण्याचा ओढा असतो. अलीकडील काळात ही नागरीकरणाची प्रक्रिया ( process of urbanization ) जगातील सर्व भागांत वाढत असल्याचे आढळून येते. वाढते नागरीकरण हे आधुनिक समाजाचे एक महत्त्वपूर्ण लक्षण बनले आहे व त्याचे सामाजिक जीवनावर दूरगामी परिणाम होत आहेत. विचारसरणी, दृष्टिकोण, परस्परसंबंध, उपजीविकेचे मार्ग, चालीरीती, वागणुकीच्या पद्धती इत्यादी बाबतींत ग्रामीण व नागर लोक यांमध्ये मूलभूत फरक असतात आणि या बाबींचा ग्रामीण व नागर समाज-रचनेवर इतका परिणाम झालेला आहे की ग्रामीण व नागर समाजव्यवस्था या एकमेकाहून अगदी भिन्न झाल्या आहेत. तेव्हा लोकांचे सामाजिक जीवन समजण्यासाठी त्यांची ग्रामीण व नागर भागांत झालेली विभागणी कळून घेणे आवश्यक आहे.

## ४. *भारताच्या लोकसंख्येचे स्वरूप*

आतापर्यंत आपण लोकसंख्येचा समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून उहापोह केला आणि लोकसंख्येची गतिशीलता, रचना व विभागणी या लोकसंख्याविषयक बाबीं-चाही विचार केला. लोकसंख्या व समाज यांचा आपल्या देशात कशा प्रकारचा संबंध आहे हे कळण्यासाठी भारताच्या लोकसंख्येचे स्वरूप पाहिले पाहिजे.

### लोकसंख्या :

१९६१ च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या ४३·९२ कोटी आहे. लोक-संख्येच्या बाबतीत जगात भारताचा दुसरा क्रमांक आहे. १९६० च्या आकडेवारी-प्रमाणे जगाची लोकसंख्या २९० कोटी असून चीनची ६६ कोटी ९० लाख, भारताची अंदाजे ४० कोटी ३० लाख, रशियाची २० कोटी ९० लाख व अमेरिकेची १७ कोटी ८० लाख अशी लोकसंख्या होती. याचा अर्थ असा की जगाच्या लोकसंख्येपैकी शेकडा १५ टक्के लोक भारतात राहतात. भारताची लोकसंख्या इतकी मोठी आहे की ती रशियाच्या लोकसंख्येच्या जवळ जवळ दुप्पट, अमेरिकेच्या लोकसंख्येच्या जवळ जवळ अडीच पट आणि इंग्लंडच्या लोकसंख्येच्या जवळ जवळ सात पट आहे.

भारताची लोकसंख्या जास्ती आहे पण भारताच्या वाट्याला भूभाग मात्र कमी आला आहे. जगाच्या भूभागापैकी फक्त २.२ टक्के भूभाग भारतात आहे पण जगाच्या लोकसंख्येपैकी १५ टक्के लोक भारतात आहेत. म्हणजे भूभाग कमी आणि लोकसंख्या जास्ती अशी भारताची परिस्थिती आहे. याच्या अगदी उलट परिस्थिती रशिया व अमेरिका या देशात आहे. रशिया व अमेरिका यांची एकूण लोकसंख्या भारताच्या लोकसंख्येपेक्षा कमी भरते पण त्या देशांनी व्यापलेला भूभाग भारताच्या भूभागापेक्षा जवळ जवळ दहा पटींनी मोठा आहे.

## लोकसंख्येतील वाढ :

भारताची लोकसंख्या जास्ती आहे एवढेच नव्हे तर ती सारखी वाढत आहे. गेल्या ६० वर्षांत झालेली लोकसंख्यावाढ खाली दिली आहे.

| जनगणना वर्ष | लोकसंख्या कोटी | पूर्वीच्या दहा वर्षांतील फरक टक्के |
|---|---|---|
| १९०१ | २३.६२ | – |
| १९११ | २५.२१ | + ५.७३ |
| १९२१ | २५.१३ | – ०.३१ |
| १९३१ | २७.९० | + ११.०१ |
| १९४१ | ३१.८७ | + १४.२२ |
| १९५१ | ३६.११ | + १३.३१ |
| १९६१ | ४३.९२ | + २१.५० |

वरील तक्त्यावरून हे दिसून येईल की गेल्या ६० वर्षांत भारताच्या लोकसंख्येत ८४.०० टक्क्यांनी वाढ झाली. विशेष म्हणजे ही वाढ द्रुतगतीने होत आहे. १९०१–१९२१ या पहिल्या वीस वर्षांत फक्त ५.३५ टक्के वाढ झाली, पण १९२१–१९४१ या पुढील वीस वर्षांत ( १९२१ च्या लोकसंख्येवर ) २६.७९ टक्क्यांनी वाढ झाली, तर त्याच्या पुढील १९४१–१९६१ या वीस वर्षांत ( १९४१ च्या लोकसंख्येवर ) ३७.६७ टक्क्यांनी वाढ झाली. त्यातल्यात्यात १९५१–६१ या दहा वर्षांत २१.५० टक्क्यांनी लोकसंख्यावाढ झाली. पूर्वीच्या कोणत्याही दशकात एवढ्या मोठ्या प्रमाणावर लोकसंख्यावाढ झाली नव्हती. १९५१–१९६१ या दहा वर्षांत भारताची लोकसंख्या जवळ जवळ ८ कोटींनी वाढली. युरोपमधील रशिया व्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही देशाच्या लोकसंख्येपेक्षा भारताच्या

१९५१–६१ मधील लोकसंख्यावाढ जास्ती आहे. साधारणपणे दर वर्षी ८० लाख लोकांची भर भारताच्या लोकसंख्येत १९५१–१९६१ या दहा वर्षांत पडली. सारांश, १९०१–१९२१ पर्यंत जवळ जवळ स्थिर असलेली भारताची लोकसंख्या पुढील दशकांतून चढत्या क्रमाने वाढत गेली आणि १९५१–१९६१ या दहा वर्षांत तर भारताच्या लोकसंख्येत विलक्षण वाढ ( phenomenal increase ) झाली.

## जननप्रमाण व मृत्युप्रमाण :

भारताची लोकसंख्यावाढ नैसर्गिक रीतीने होत आहे. परदेशांतून स्थायिक होण्यासाठी येथे आलेल्या लोकांमुळे ही वाढ झालेली नाही कारण अशा लोकांची संख्या अतिशय अल्प आहे. लोकसंख्यावाढ ही जननदर व मृत्युदर या दोन घटकांच्या स्वरूपावर अवलंबून असते. गेल्या ६० वर्षांत भारतात जननाचे व मृत्यूचे प्रमाण खालील प्रमाणे होते.

| दशक | | जननदर (दर हजारी) | | मृत्युदर (दर हजारी) |
|---|---|---|---|---|
| १९०१–१० | – | ४८.१ | – | ४२.६ |
| १९११-२० | – | ४९.२ | – | ४८.६ |
| १९२१–३० | – | ४६.४ | – | ३६.३ |
| १९३१–४० | – | ४५.२ | – | ३१.२ |
| १९४१–५० | – | ३९.९ | – | २७.४ |
| १९५१–६० | – | ४१.७ | – | २२.८ |

वरील तक्त्यावरून हे दिसून येईल की भारताचा जननदर उच्च असून तो फारसा कमी होत नाही. पण त्याचबरोबर उच्च असलेला मृत्युदर मात्र आरोग्ययोजना व रोगराईविरुद्ध केलेले विविध उपाय या कारणांनी क्रमशः कमी होत आहे आणि १९६१ साली तो बराच कमी झाला आहे. तसेच बालमृत्यूचे प्रमाण देखील झपाट्याने घटत आहे. १९०१ साली बालमृत्यूचे प्रमाण दर हजारी २३२ होते, ते १९५१ साली ११६ झाले व १९६१ साली ते फक्त ९८ आहे. तेव्हा उच्च जननदर व निम्न मृत्युदर या दोन कारणांनी भारताची लोकसंख्यावाढ झाली आहे. मृत्युदर अजून कमी होण्याची चिन्हे आहेत. साहजिकच जननदर कमी झाल्याखेरीज भारताची लोकसंख्यावाढ कमी होणार नाही.

९५१८०

### वयस्संघटना :

भारताच्या लोकसंख्येची वयानुसार बाल वर्ग ( १४ वर्षांपर्यंत ), तरुण किंवा प्रौढ वर्ग ( १५ ते ५४ वर्षापर्यंत ) आणि वृद्ध वर्ग ( ५५ वर्षांपेक्षा अधिक ) अशा तीन गटांत विभागणी केली आहे. या गटांतील लोकसंख्येचे प्रमाण खाली दिले आहे.

| वयोगट | | एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण | |
|---|---|---|---|
| | | १९५१ जनगणना | १९६१ जनगणना |
| **१. बाल वर्ग** | | ३८ ३ | ४१·० |
| i ) बालके व लहान मुले | ( ० ते ४ ) | १३ ५ | १५·० |
| ii ) मुले व मुली | ( ५ ते १४ ) | २४ ८ | २६·० |
| **२. तरुण किंवा प्रौढ वर्ग** | | ५३·४ | ५१·१ |
| i ) तरुण स्त्रीपुरुष | ( १५ ते २४ ) | १७·४ | १६·७ |
| ,, | ( २५ ते ३४ ) | १५·६ | १५·४ |
| ii ) मध्यमवयीन स्त्रीपुरुष | ( ३५ ते ४४ ) | ११·९ | ११·० |
| ,, | ( ४५ ते ५४ ) | ८·५ | ८·० |
| **३. वृद्ध वर्ग** | | ८ ३ | ७·९ |
| | ( ५५ ते ६४ ) | ५·१ | ४·८ |
| | ( ६५ ते ७४ ) | २·२ | २·१ |
| | ( ७५ च्या वर) | १·० | १·० |
| | एकूण | १००·० | १००·० |

वरील तक्त्यावरून हे दिसून येईल की भारताच्या लोकसंख्येत वृद्धांचे प्रमाण कमी आहे. अमेरिकेसारख्या काही पाश्चिमात्य देशांतून वृद्धांचे प्रमाण जास्ती आढळून येते. साहजिकच वयस्संघटनेतील या फरकामुळे भारत व अमेरिका यांच्या समाजजीवनावर वेगवेगळा परिणाम झालेला दिसून येतो.

१९५१–६१ मधील लोकसंख्यावाढ जास्ती आहे. साधारणपणे दर वर्षी ८० लाख लोकांची भर भारताच्या लोकसंख्येत १९५१–१९६१ या दहा वर्षांत पडली. सारांश, १९०१–१९२१ पर्यंत जवळ जवळ स्थिर असलेली भारताची लोकसंख्या पुढील दशकांतून चढत्या क्रमाने वाढत गेली आणि १९५१–१९६१ या दहा वर्षांत तर भारताच्या लोकसंख्येत विलक्षण वाढ ( phenomenal increase ) झाली.

## जननप्रमाण व मृत्युप्रमाण :

भारताची लोकसंख्यावाढ नैसर्गिक रीतीने होत आहे. परदेशांतून स्थायिक होण्यासाठी येथे आलेल्या लोकांमुळे ही वाढ झालेली नाही कारण अशा लोकांची संख्या अतिशय अल्प आहे. लोकसंख्यावाढ ही जननदर व मृत्युदर या दोन घटकांच्या स्वरूपावर अवलंबून असते. गेल्या ६० वर्षांत भारतात जननाचे व मृत्यूचे प्रमाण खालील प्रमाणे होते.

| दशक | | जननदर (दर हजारी) | | मृत्युदर (दर हजारी) |
|---|---|---|---|---|
| १९०१–१० | – | ४८.१ | – | ४२.६ |
| १९११-२० | – | ४९.२ | – | ४८.६ |
| १९२१–३० | – | ४६.४ | – | ३६.३ |
| १९३१–४० | – | ४५.२ | – | ३१.२ |
| १९४१–५० | – | ३९.९ | – | २७.४ |
| १९५१–६० | – | ४१.७ | – | २२.८ |

वरील तक्त्यावरून हे दिसून येईल की भारताचा जननदर उच्च असून तो फारसा कमी होत नाही. पण त्याचबरोबर उच्च असलेला मृत्युदर मात्र आरोग्ययोजना व रोगराईविरुद्ध केलेले विविध उपाय या कारणांनी क्रमशः कमी होत आहे आणि १९६१ साली तो बराच कमी झाला आहे. तसेच बालमृत्यूचे प्रमाण देखील झपाट्याने घटत आहे. १९०१ साली बालमृत्यूचे प्रमाण दर हजारी २३२ होते, ते १९५१ साली ११६ झाले व १९६१ साली ते फक्त ९८ आहे. तेव्हा उच्च जननदर व निम्न मृत्युदर या दोन कारणांनी भारताची लोकसंख्यावाढ झाली आहे. मृत्युदर अजून कमी होण्याची चिन्हे आहेत. साहजिकच जननदर कमीं झाल्याखेरीज भारताची लोकसंख्यावाढ कमी होणार नाही.

क्र. क्र. ९५९१८०



## वयस्संघटना :

भारताच्या लोकसंख्येची वयानुसार बाल वर्ग ( १४ वर्षांपर्यंत ), तरुण किंवा प्रौढ वर्ग ( १५ ते ५४ वर्षापर्यंत ) आणि वृद्ध वर्ग ( ५५ वर्षांपेक्षा अधिक ) अशा तीन गटांत विभागणी केली आहे. या गटांतील लोकसंख्येचे प्रमाण खाली दिले आहे.

| वयोगट | | एकूण लोकसंख्येशी शेकडा प्रमाण | |
|---|---|---|---|
| | | १९५१ जनगणना | १९६१ जनगणना |
| **१. बाल वर्ग** | | **३८ ३** | **४१·०** |
| i ) बालके व लहान मुले | ( ० ते ४ ) | १३ ५ | १५·० |
| ii ) मुले व मुली | ( ५ ते १४ ) | २४ ८ | २६·० |
| **२. तरुण किंवा प्रौढ वर्ग** | | **५३·४** | **५१·१** |
| i ) तरुण स्त्रीपुरुष | ( १५ ते २४ ) | १७·४ | १६·७ |
| " | ( २५ ते ३४ ) | १५·६ | १५·४ |
| ii ) मध्यमवयीन स्त्रीपुरुष | ( ३५ ते ४४ ) | ११·९ | ११·० |
| " | ( ४५ ते ५४ ) | ८·५ | ८·० |
| **३. वृद्ध वर्ग** | | **८ ३** | **७·९** |
| | ( ५५ ते ६४ ) | ५·१ | ४·८ |
| | ( ६५ ते ७४ ) | २·२ | २·१ |
| | ( ७५ च्या वर) | १·० | १·० |
| | एकूण | १००·० | १००·० |

वरील तक्त्यावरून हे दिसून येईल की भारताच्या लोकसंख्येत वृद्धांचे प्रमाण कमी आहे. अमेरिकेसारख्या काही पाश्चिमात्य देशांतून वृद्धांचे प्रमाण जास्ती आढळून येते. साहजिकच वयस्संघटनेतील या फरकामुळे भारत व अमेरिका यांच्या समाजजीवनावर वेगवेगळा परिणाम झालेला दिसून येतो.

**स्त्रीपुरुषप्रमाण :**

१९६१ च्या जनगणनेनुसार भारताची एकूण लोकसंख्या ४३.९२ कोटी आहे. त्यापैकी पुरुषांची संख्या २२.६३ कोटी आणि स्त्रियांची संख्या २१.२९ कोटी आहे. म्हणजे १९६१ साली स्त्रियांपेक्षा १.३४ कोटी पुरुष जास्ती होते. दर हजार पुरुषांमागे स्त्रियांची संख्या ९४१ आहे. १९०१ साली हेच प्रमाण ९७२ होते. याचा अर्थ असा की भारताच्या लोकसंख्येत स्त्रियांचे प्रमाण कमी होत आहे.

तसेच सर्व भारतभर हे प्रमाण सारखे नाही. भारताच्या विविध राज्यांत व केंद्रशासित प्रदेशांत दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण १९६१ साली असे होते.

| राज्ये | | केंद्रशासित प्रदेश | |
|---|---|---|---|
| १. आंध्रप्रदेश | ९८१ | १. अंदमान व निकोबार बेटे | ६१७ |
| २. आसाम | ८७६ | २. दिल्ली | ७८५ |
| ३. बिहार | ९९४ | ३. हिमाचल प्रदेश | ९२३ |
| ४. गुजराथ | ९४० | ४. लखदिव, मिनिकाय अमिनदिव बेटं | १,०२० |
| ५. जम्मू व काश्मीर | ८७८ | ५. मणिपूर | १,०१५ |
| ६. केरळ | १,०२२ | ६. त्रिपुरा | ९३२ |
| ७. मध्यप्रदेश | ९५३ | ७. दादरा व नगरहवेली | ९६३ |
| ८. मद्रास | ९९२ | ८. गोवा, दमण व दीव | १,०७० |
| ९. महाराष्ट्र | ९३६ | ९. नेफा | ८९४ |
| १०. म्हैसूर | ९५९ | १०. नागालँड | ९३३ |
| ११. ओरिसा | १,००१ | ११. पाँडिचेरी | १,०१३ |
| १२. पंजाब | ८६४ | | |
| १३. राजस्थान | ९०८ | | |
| १४. उत्तरप्रदेश | ९०९ | | |
| १५. प. बंगाल | ८७८ | | |

वरील तक्त्यावरून हे दिसून येईल की केरळ, ओरिसा, लखदिव बेटे, मणिपूर, गोवा व पांडेचेरी या भागांत स्त्रियांची संख्या पुरुषांच्यापेक्षा जास्ती आहे, तर आसाम, काश्मीर, पंजाब, प. बंगाल, अंदमान बेटें व नेफा या भागांत स्त्रियांचे प्रमाण बरेच कमी आहे.

तसेच ग्रामीण व नागर भागांत स्त्रीपुरुषप्रमाणात बरीच तफावत दिसून येते. सर्व भारतात १९६१ च्या जनगणनेनुसार दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे

प्रमाण ९४१ आहे. पण भारताच्या ग्रामीण भागात ( ५,६७,१६९ खेड्यांमध्ये ) हे प्रमाण ९६३ पडते तर नागर भागात (२,६९० शहरांमध्ये) हे प्रमाण ८४५ पडते. कामधंद्यानिमित्त पुरुष आपली खेडी सोडून शहरात वसती करतात व अधूनमधून आपल्या खेड्याकडे जाऊन येत असतात. म्हणून शहरांत पुरुषांचे प्रमाण अधिक व स्त्रियांचे प्रमाण कमी दिसून येते. अर्थात मोठमोठ्या व विशेषत: औद्योगिक शहरांतून स्त्रीपुरुषांच्या प्रमाणातील ही तफावत फार जाणवते. उदाहरणार्थ, दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण १९६१ च्या जनगणनेनुसार प्रमुख औद्योगिक शहरांतून असे आहे. कलकत्ता– ६१२; हौरा– ६३०; बृहन्मुंबई– ६६३; कानपूर– ७३९; दिल्ली– ७७७; अमृतसर– ७८९; अहमदाबाद–८०४; भोपाळ–८०७; बंगलोर– ८७४ व मद्रास– ९०१.

## प्रदेशवार विभागणी :

१९६१ च्या जनगणनेनुसार भारताची ४३·९२ कोटी लोकसंख्या ११,७८,९९५ चौरस मैलाच्या क्षेत्रफळात पसरली आहे. यावरून लोकसंख्येची घनता किंवा दर चौरस मैलाला लोकसंख्येचे प्रमाण ३७३ पडते. १९५१ साली घनतेचे प्रमाण ३०३ होते. १९५१–६१ या दशकात लोकसंख्येची विलक्षण वाढ झाल्याने घनतेचे प्रमाणही वाढले आहे. अमेरिकेची घनता फक्त ५६ आहे, तर जपानची ५८१ आहे.

भारताच्या लोकसंख्येची प्रदेशवार विभागणी व घनता खालील प्रमाणे आहे.

| घटक | क्षेत्रफळ चौरस मैल | लोकसंख्या | घनता |
|---|---|---|---|
| **राज्ये** | | | |
| १. आंध्रप्रदेश | १,०६,२८६ | ३.५९ कोटी | ३३९ |
| २. आसाम | ४७,०९१ | १·१८ ,, | २५२ |
| ३. बिहार | ६७,१९६ | ४·६४ ,, | ६९१ |
| ४. गुजराथ | ७२,२४५ | २·०६ ,, | २८६ |
| ५. जम्मू व काश्मीर | ८६,०२३ | ०·३५ ,, | — |
| ६. केरळ | १५,००२ | १.६९ ,, | १,१२७ |
| ७. मध्यप्रदेश | १,७१,२१७ | ३·२३ ,, | १८९ |
| ८. मद्रास | ५०,३३१ | ३·३६ ,, | ६६९ |
| ९. महाराष्ट्र | १,१८,७१७ | ३·९५ ,, | ३३३ |
| १०. म्हैसूर | ७४,२१० | २·३५ ,, | ३१८ |
| ११. ओरिसा | ६०,१६४ | १·७५ ,, | २९२ |
| १२. पंजाब | ४७,१०८ | २·०३ ,, | ४३० |

| घटक | क्षेत्रफळ चौरस मैल | लोकसंख्या | | घनता |
|---|---|---|---|---|
| १३. राजस्थान | १,३२,१५२ | २·०१ | ,, | १५३ |
| १४. उत्तरप्रदेश | १,१३,६५४ | ७·३७ | ,, | ६४९ |
| १५. प. बंगाल | ३३,८२९ | ३·४९ | ,, | १,०३२ |
| विभाग ( Zone ) | | | | |
| १. उत्तर विभाग | १,९०,८७५ | ४·८० | ,, | २५२ |
| २. मध्य विभाग | २,८४,८७१ | १०·६१ | ,, | ३७३ |
| ३. पूर्व विभाग | २,६१,४९२ | ११·३५ | ,, | ४३४ |
| ४. पश्चिम विभाग | १,९१,१५१ | ६·०२ | ,, | ३१५ |
| ५. दक्षिण विभाग | २,४६,०२५ | ११·०५ | ,, | ४४९ |

वरील तक्त्यावरून हे दिसून येईल की भारताची लोकसंख्या सगळीकडे समप्रमाणात पसरलेली नाही. देशाच्या दक्षिण व मध्य विभागांत ती जास्ती आहे तर अगदी उत्तर विभागात ती कमी आहे. राज्यांच्या दृष्टीने बघितले तर असे आढळून येईल की केरळ व पश्चिम बंगाल या राज्यांत खूप दाट लोकवस्ती आहे, तर राजस्थान, मध्यप्रदेश व आसाम या राज्यांत ती विरळ आहे.

## ग्रामीण व नागर लोकसंख्या :

भारत हा खेड्यांचा देश असल्याने व अजून उद्योगीकरणाची वाढ व्हावयाची असल्याने भारताच्या लोकसंख्येचा फार मोठा भाग ग्रामीण भागात दिसून येतो. १९५१ साली भारतातील ग्रामीण लोकसंख्या ८२·६५ टक्के व नागर लोकसंख्या १७·३५ टक्के होती. १९६१ साली भारतातील ग्रामीण लोकसंख्या ८२·०३ टक्के व शहरी लोकसंख्या १७·९७ टक्के आहे. नागर लोकसंख्येत वाढ झाली असली तर ती फारच थोडी आहे. तसेच नागरीकरणाची वाढ सर्व राज्यांतून सारख्या प्रमाणात झाली नसल्याने राज्यांतील एकूण लोकसंख्येपैकी शहरांत राहणाऱ्या लोकांच्या प्रमाणात बरीच तफावत दिसून येते. सर्व राज्यांपैकी महाराष्ट्रात शहरी लोकांचे प्रमाण सर्वांत जास्ती आहे. महाराष्ट्रात हे प्रमाण २८·२२ टक्के आहे तर ते ओरिसात ६·३२ टक्के, आसामात ७·६९ टक्के, बिहारात ८·४३ टक्के, उत्तर–प्रदेशात १२·८५ टक्के, मध्यप्रदेशात १४·२९ टक्के, केरळात १५·११ टक्के, राजस्थानात १६·२८ टक्के, काश्मीरात १६·६६ टक्के, आंध्रप्रदेशात १७·४४ टक्के, पंजाबात २०·१३ टक्के, म्हैसूरात २२·३३ टक्के, पश्चिम बंगालात २४·४५ टक्के, गुजरातेत २५·७७ टक्के व मद्रासमध्ये २६·६९ टक्के आहे.

# ८

# सामाजिक नियमने

## १. सामाजिक नियमनांचे स्वरूप

मनुष्याच्या सामाजिक वर्तनाचा सांगोपांग अभ्यास समाजशास्त्रात केला जातो. मनुष्य समाजात कसा वागतो, तो तसा का वागतो, त्याच्या वागण्यावर काही बंधने असतात काय, ती बंधने कशा स्वरूपाची असतात, त्या बंधनांचा सामाजिक आशय कोणता असतो, त्या बंधनांचे समाजावर व त्यातील व्यक्तींवर कोणते परिणाम होतात वगैरे बाबींचे विवेचन केल्याखेरीज मनुष्याच्या सामाजिक वर्तनाचे सम्यक् आकलन होणार नाही. मनुष्याचे सामाजिक वर्तन हे समाजाने घालून दिलेल्या नियमनांवर ( norms ) अवलंबून असते. म्हणून नियमनाची संकल्पना ( the concept of norm) ही समाजशास्त्रातील एक मध्यवर्ती संकल्पना आहे. तेव्हा या संकल्पनेचा थोडा विस्तारपूर्वक विचार करणे आवश्यक आहे.

आपल्या वागणुकीच्या काही पद्धती अशा आहेत की त्या आपण स्वयंप्रेरणेने (automatically) आचरीत असतो. पादत्राणे घालताना आपण उजव्या पायात प्रथम पादत्राण घालतो व मग डाव्या पायात घालतो. याच पद्धतीने पादत्राणे घातली पाहिजेत असा समाजाचा दण्डक असत नाही. परंतु याच्या उलट, वागणुकीचे असे कित्येक प्रकार आहेत की ज्यांच्याबाबतीत समाजाने काही नियम केलेले असतात. ओळखीच्या व्यक्तींना अभिवादन करावे, वडीलधाऱ्या मंडळींना आदर

दाखवावा, पवित्र वस्तूंचे पावित्र्य बिघडवू नये, अशा तऱ्हेचे अनेक नियम समाजातील व्यक्तींच्या वागणुकींच्या पद्धतीबाबत प्रचलित असतात. या नियमांना नियमन (norms) असे म्हणतात. " वर्तनावर काही मर्यादा घालणारा व मनात बाळगलेला अमूर्त किंवा भावात्मक नमुना किंवा आदर्श म्हणजे नियमन होय " अशी नियमनाची व्याख्या प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ **हॅरी जॉन्सन** यांनी केली आहे. [1].

नियमने केवळ मनात ठेवली जात नाहीत तर नियमनांना अनुसरून प्रत्यक्ष आचरण केले जाते व तसे करणे योग्य आहे अशी मनाची भावना असते. प्रत्येक व्यक्तीला आपले वर्तन नियमनांना धरून असणे आवश्यक आहे असे वाटत असते व त्याप्रमाणे तीं नियमने आचरणात आणण्याचा प्रत्येक व्यक्ती प्रयत्न करीत असते. म्हणजे व्यक्तीला नियमने मान्य असतात व व्यक्तीचे वर्तन नियमनांना अनुसरून होत असते.

नियमने व्यक्तिगत (private) व सामाजिक (social) अशा दोन प्रकारची असतात. व्यक्तिगत नियमने वैयक्तिक स्वरूपाची असतात. तीं ज्या त्या व्यक्तीपुरती मर्यादित असतात व त्यांचा इतरांशी प्रत्यक्ष संबंध येत नाही. व्यक्तीने नववर्षदिनी केलेले संकल्प या सदरात मोडतात. याच्या उलट सामाजिक नियमने सार्वजनिक स्वरूपाची असतात. तीं समाजात मान्यता पावलेली असतात व सर्वांना लागू पडतात. हीं नियमने समाजाने मान्य किंवा स्वीकृत केलेली असतात. याचा अर्थ असा की समाजात या नियमनांचे उल्लंघन करणाऱ्यांना काही तरी शिक्षा भोगावी लागते आणि या नियमनांना अनुरूप वर्तन करणाऱ्यांची वाहवा होते. सामाजिक नियमने लोकांच्या वर्तनामध्ये उचित वर्तन व अनुचित वर्तन असा स्पष्ट भेद करतात आणि त्यानुसार लोकांना वागण्याला भाग पाडतात. कारण अनुचित वर्तन करणाऱ्यांना शासन केले जाते. तेव्हा सामाजिक नियमने लोकांच्या वर्तनाला मर्यादा घालतात. अर्थात हीं नियमने सर्व समाजांत सारखी असत नाहीत. समाजाची सांस्कृतिक मूल्ये, नीतितत्त्वे, विचारसरणी, सौंदर्यकल्पना इत्यादी बाबींवर सामाजिक नियमने आधारलेली असतात. सारांश, सामाजिक नियमने नियंत्रणात्मक असतात. अशा नियमनांचा उपयोग करून समाज आपल्या लोकांच्या वर्तनावर ताबा ठेवतो व त्यायोगें समाजविषयक गरजा (societal needs) भागविण्याचा प्रयत्न करतो.

---

1. " A norm is an abstract pattern, held in the mind, that sets certain limits for behaviour. "

— Harry Johnson

समाजाने मान्य केलेली नियमने तीं सामाजिक नियमने होत. म्हणून समाजशास्त्रात फक्त सामाजिक नियमनांच्या अभ्यासावरच लक्ष केंद्रित केले जाते. सामाजिक नियमनांचा साकल्याने विचार केला तर सामाजिक नियमनांची ठळक लक्षणे स्पष्ट होतात. सामाजिक नियमनांचे प्रमुख लक्षण हे की प्रत्येक मानवीं समाजात तीं हमखास दिसून येतात. समाजाच्या योग्यायोग्यतेच्या स्वतःच्या कल्पना असतात आणि त्यांच्या अनुरोधाने लोकांच्या वर्तनात उचित वर्तन व अनुचित वर्तन असा भेद केला जातो. अर्थात सामाजिक नियमनांचा उपयोग करून हा भेद लोकांच्या निदर्शनास आणला जातो व लोकांनी काय करणे आवश्यक आहे हे सांगितले जाते. असे असले तरी देखील समाजातील सर्व लोकांचे या नियमनांना अनुसरून तंतोतंत वर्तन होतेच अशातला भाग नाही. म्हणून प्रत्येक समाजात आपणांस दोन प्रकारच्या व्यवस्था आढळून येतात, लोकांनी काय करणे आवश्यक आहे हे विशद करणारी आदर्शवादी किंवा नियमनात्मक व्यवस्था ( normative order ) आणि लोक काय करतात यावर आधारलेली प्रत्यक्ष वस्तुस्थिती ( factual order ). या दोन व्यवस्थांच्या परस्परसंबंधांचा विचार केल्यावर असे दिसून येते की त्यांच्यामध्ये संपूर्ण समानता असत नाही व तसेच त्यांच्यामध्ये संपूर्ण तफावतही असत नाही. पण आदर्शवादी व्यवस्था प्रत्यक्ष वस्तुस्थितीचे स्वरूप ठरवीत असते. कारण नियमने नियंत्रणात्मक असतात व तीं प्रत्यक्ष आचरणात आणली जातात तेव्हा आदर्शवादी व्यवस्था ज्या प्रकारची असेल त्या प्रकारची प्रत्यक्ष वस्तुस्थिती साधारणपणे असते. तसेच, ज्याप्रमाणे आदर्शवादी व्यवस्था प्रत्यक्ष वस्तुस्थिती ठरवीत असते त्याप्रमाणे प्रत्यक्ष वस्तुस्थिती देखील आदर्शवादी व्यवस्थेवर परिणाम करीत असते व त्यात इष्ट तो बदल घडवून आणीत असते. प्रत्यक्ष परिस्थिती विचारात घेऊन जर नियमने केली नाहीत तर नियमनांचा काही उपयोग होत नाही. उदाहरणार्थ, प्रत्येक पुरुषाने तीन बायका केल्या पाहिजेत हा नियम समाजात पुरुषांपेक्षा स्त्रियांचे प्रमाण कमी असल्यास कधींच सर्वांना पाळता येणार नाही. अशा परिस्थितीत त्या नियमनात काही अर्थ राहात नाही. तेव्हा प्रत्यक्ष वस्तुस्थितीशी सुसंगत ठरतील अशींच नियमनें असावी लागतात. या जगात परिस्थिती तशीच कायम राहात नाही. तिच्यात सारखा बदल होत असतो. साहजिकच परिस्थितीशी सुसंवाद राखण्यासाठी समाजाच्या आदर्शवादी व्यवस्थेत थोडाफार बदल करावा लागतो. सारांश, आदर्शवादी व्यवस्था व प्रत्यक्ष वस्तुस्थिती एकमेकांवर आधारलेल्या असल्याने या दोन्ही गोष्टी समजून घेतल्याखेरीज कोणत्याही समाजाचे सम्यक् आकलन होणार नाही.

सामाजिक नियमने समाजाच्या मूलभूत गरजा भागवितात हे सामाजिक नियमनांचे दुसरे लक्षण होय. मानवी समाजाला आपले अस्तित्व टिकविण्यासाठी

व पर्यायाने मानव-प्राण्यांचे अस्तित्त्व अबाधित राखण्यासाठी प्राण्यांच्या निर्वाह-विषयक गरजा, कार्यविभाजनासंबंधीच्या गरजा, दृढ ऐक्य वाढविणाऱ्या गरजा व सातत्य टिकविणाऱ्या गरजा अशा चार प्रकारच्या मूलभूत गरजा भागविणे आवश्यक असते. लोकांना आनिर्बंध वर्तनाची परवानगी दिली तर या मूलभूत गरजा भागविता येणार नाहीत. तेव्हा लोकांच्या वर्तनावर नियंत्रणे घालणे जरूरीचे होते. समाजाच्या अस्तित्त्वासाठी केवळ नैसर्गिक साधनसंपत्तीवर ताबा मिळवून चालणार नाही तर लोकांच्या वागणुकीवर सुद्धा मर्यादा घालाव्या लागतात. सामाजिक नियमनांच्या रूपाने या मर्यादा घातल्या जातात. मानवाने आपल्या विचारशक्तीच्या व शिक्षाग्रहणक्षमतेच्या जोरावर नियमनात्मक किंवा आदर्शवादी व्यवस्था (normative order) निर्माण केली व समाजाच्या अस्तित्त्वापासूनच ती व्यवस्था प्रचलित आहे. या नियमनात्मक व्यवस्थेमुळेच समाजातील लोकांचे परस्पर सहकार्य वाढीला लागले, समाजात एकजिनसीपणा उत्पन्न झाला व जीवनसंघर्षामध्ये समाजाला आपले अस्तित्त्व टिकविणे शक्य झाले. म्हणून समाजातील लोकांच्या वर्तनावर मर्यादा घालण्याचे महत्त्वाचे कार्य करून सामाजिक नियमने समाजाच्या मूलभूत गरजा भागवीत असतात. अशा रीतीने नियमनात्मक व्यवस्था समाजाची आवश्यक बाब झाली आहे. नियमनविरहित समाज आढळून येत नाही.

सामाजिक नियमने लोकांकडून आत्मसात केली जातात हे सामाजिक नियमनांचे तिसरे लक्षण होय. समाजाच्या सुरवातीपासून नियमने अस्तित्त्वात असल्यामुळे तीं मानवी जीवनातील अविभाज्य घटक बनली आहेत. म्हणून समाजातील लोकांना त्या समाजात प्रचलित असलेली नियमने पाळावीत किंवा पाळू नयेत अशा प्रकारच्या बाह्य स्वरूपाच्या नियमांसारखी वाटत नाहीत. तर तीं नियमने लोकांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग बनतात आणि लोकांच्या वर्तनातून त्यांचा स्वयंप्रेरणेने आविष्कार होतो. अशा रीतीने नियमने लोकांच्या व्यक्तिमत्त्वात पूर्णपणे मिसळून गेल्याने तीं लोकांच्या योग्यायोग्यतेच्या कल्पनांना वळण लावीत असतात आणि त्यांची सदसद्विवेकबुद्धी बनवीत असतात. म्हणून व्यक्तिमत्त्वाच्या व समाजाच्या कित्येक समस्या लोक नियमनांपासून दूर गेल्याने निर्माण होतात.

सामाजिक नियमने स्थिति ( situation ) सापेक्ष असतात हे त्यांचे चौथे लक्षण होय. समाजातील सर्व लोकांना व सर्व स्थितींत नियमने सारख्याच रीतीने लागू होत नाहीत. लोकांचे वय, लिंग, व्यवसाय, सामाजिक दर्जा इत्यादी गोष्टींतील फरक लक्षात घेऊन ज्या त्या स्थितीला अनुरूप होतील अशी नियमनांची रचना केलेली असते. वयस्कर माणसांच्या वागणुकीचे नियम लहान मुलांना लागू

पडत नाहीत. स्त्रियांच्या बाबतीत जे वर्तन योग्य समजले जाते ते पुरुषांच्या बाबतीतहि नेहमी योग्य समजले जाईल असे नाही. लष्करी पेशातील व इतर पेशांतील लोकांकडून सर्वच बाबतींत समान आचरणाची अपेक्षा असत नाही. राज्यकर्त्यांना आपला सामाजिक दर्जा लक्षात घेऊन जबाबदारीची जाणीव ठेवून वर्तन करावे लागते; प्रजाजनांनी आपल्या वागण्यात तितकी जाणीव दाखविली नाही तरी चालू शकते. विवाहित व्यक्तींच्याकडून वागणुकीत ज्या अपेक्षा केल्या जातात त्या अविवाहित व्यक्तींच्या वर्तनात नसल्या तरी चालतात. म्हणून नियमने ज्या स्थितीला उद्देशून केलेली असतात त्या स्थितीला अनुरूप अशा वर्तनाची अपेक्षा केली जाते.

## २. सामाजिक नियमनांचे वर्गीकरण

सामाजिक नियमनांचे यथार्थ आकलन होण्यासाठी त्यांचे विविध प्रकार कोणते आहेत ते बघितले पाहिजे. वेगवेगळ्या लक्षणांवरून सामाजिक नियमनांचे विभिन्न प्रकार करता येतात. नियमनांना असलेल्या मान्यतेच्या भिन्नतेवरून त्यांचे प्रकार पाडता येतात. काही नियमनांचे उल्लंघन केल्यास जबर शिक्षा देण्यात येते तर इतर नियमने न पाळल्यास फक्त नापसंती दर्शविण्यात येते. तसेच, नियमनांना समाजात किती महत्त्व देण्यात येते या लक्षणावरून त्यांचे प्रकार करण्यात येतात. काही नियमनांना उदाहरणार्थ, धर्म, विवाह, राज्य याबाबतींतील नियमनांना समाजात अतिशय महत्त्व दिले जाते तर कित्येक नियमने ( उदाहरणार्थ, पोशाख, खाद्यपदार्थ या बाबतींतील ) त्यामानाने गौण समजली जातात. शिवाय, नियमने समाजात अजाणतेपणाने प्रचारात येतात की तीं मुद्दाम कायदा करून अस्तित्वात आणली जातात या लक्षणावरूनही त्यांचे प्रकार पाडण्यात येतात. त्याचप्रमाणे, नियमनांच्या पालनामध्ये स्वयंस्फूर्ती (spontaneity) किती असते, नियमनांच्या परिवर्तनामध्ये द्रुतता (rapidity) किती असते, इत्यादी कसोट्या लावून देखील नियमनांचे प्रकार करता येतात. अर्थात नियमनांचे हे विविध प्रकार एकमेकांशी बरेच संबंधित असल्याकारणाने नियमनांचे पद्धतशीर वर्गीकरण करणे अगदी कठीण जाते. म्हणून समाजशास्त्रज्ञ सामाजिक नियमनांची स्थूल गटांमध्ये ( broad classes) विभागणी करतात. सामान्यतः

(१) लोकरूढी (Folkways),
(२) लोकनीती (Mores) व
(३) कायदा (Law)

असे तीन प्रमुख विभाग समाजशास्त्रज्ञ पाडतात. काही वेळेला (अ) प्रथा व शिष्टाचार ( convention and etiquette ), आणि (ब) फॅशन व छंद ( fashion and fad ) असेही प्रकार केले जातात.

(१) लोकरूढी ( Folkways ) :

लोकांच्या दैनंदिन जीवनातील वागणुकीच्या पद्धतींच्या बाबतींतील नियमनांना लोकरूढी म्हणतात. लोकांमध्ये सर्वमान्य झालेले वर्तनविषयक रीतिरिवाज व परंपरा म्हणजे लोकरूढी होत. संभाषण, भोजन, अभिवादन, वेषभूषा, प्रसाधन इत्यादी नेहमीच्या वागणुकीच्या गोष्टींबाबत सर्वमान्य नियम प्रचलित असतात व लोक ते प्रत्यक्ष आचरणात आणतात. संभाषण करताना कोणाशी कसे बोलावे, किती बोलावे, काय बोलावे, कोणते शब्द वापरावेत, ते कसे उच्चारावेत, आवाज किती मोठा करावा या सारख्या बाबतींत समाजाचे दण्डक असतात. तसेच भोजनाच्या बाबतीत कोणते खाद्य व पेय पदार्थ घ्यावेत, ते कसे तयार करावेत, ते केव्हा केव्हा घ्यावेत, ते कसे घ्यावेत, ते घेत असताना कसे वागावे, ते इतरांना कसे द्यावेत इत्यादी गोष्टींविषयी लोकांचे आचारनियम असतात. शिवाय, वेषभूषा करताना लोकांनी कोणते कपडे करावेत, कोणत्या कापडाचे, रंगाचे, शिलाईचे करावेत, किती कपडे करावेत, ते कसे व केव्हा वापरावेत इत्यादी गोष्टींविषयी समाजाच्या विशिष्ट प्रथा असतात व त्या पाळल्या जातात. तीच गोष्ट अभिवादन (greetings) व प्रसाधन ( decoration ) या बाबतीतही दिसून येते. तेव्हा अशा प्रकारच्या नेहमीच्या आचरणातील रीतिरिवाज लोकरूढीच्या सदरात मोडतात.

लोकरूढीचा साकल्याने विचार केला तर त्यांच्या स्वरूपाविषयी काही ठळक गोष्टी आपल्या प्रत्ययास येतात.

( i ) **सामूहिक आवृत्ती** ( Mass Repetition ):– एखादा वर्तन-प्रकार जेव्हा समाजातील पुष्कळ लोक नेहमी आचरणात आणतात तेव्हा त्या वर्तन-प्रकाराला किंवा रीतिरिवाजाला लोकरूढीचे स्वरूप येते. समाजातील अगदी मर्यादित लोकांच्या–मग ते किती का मोठे असेनात–चालीरीतींना लोकरूढी म्हणता येणार नाही. लोकसमूहाने प्रत्यक्ष व्यवहारात सतत उपयोगात आणलेल्या वागणुकीच्या पद्धतींतून लोकरूढी निर्माण होतात. तेव्हा लोकरूढी या सामूहिक घटना ( mass phenomena ) आहेत, वैयक्तिक किंवा मर्यादित घटना नव्हेत. सामूहिक स्वरूपामुळे लोकरूढी या इतर आचारांच्या मानाने स्थायी किंवा टिकाऊ ( durable ) असतात. या सर्व बाबींमुळ लोकरूढी या समाजातील प्रमाणभूत

किंवा समस्वरूपी वागणुकीच्या पद्धती ( standardised practices ) होतात. लोकरूढींच्या योगाने समाजातील व्यक्तींच्या आचारांत व विचारांत साधारणपणे समानता दिसून येते.

( ii ) **नियोजनविरहित आरंभ** (Unplanned Origin) : लोकरूढींचा आरंभ अगदी अस्पष्ट (obscure) रीतीने होत असतो. कोणी तरी एखादा वागणुकीचा नवा प्रकार ( उदाहरणार्थ, वेषभूषेचा प्रकार, केशरचनेचा प्रकार ) सहजपणे सुरू करतो. जर कालांतराने तो प्रकार लोकप्रिय झाला व त्याला सामूहिक घटनेचे स्वरूप आले तर त्याचे लोकरूढीत रूपांतर होते. तेव्हा लोकरूढींची विचारपूर्वक योजनाबद्ध रीतीने सुरुवात होत नाही. म्हणून लोकरूढी या पूर्वसंकल्पित (premeditated) असत नाहीत.

( iii ) **अनौपचारिक अमलबजावणी** ( Informal Enforcement ): लोकरूढींना समाजात विशेष महत्त्व असत नाही. त्यांच्या आचरणाच्या बाबतीत लोकांच्या मनात भावनांची तितकीशी तीव्रता दिसून येत नाही. म्हणून लोकरूढी विशिष्ट परिस्थितींत आवश्यक कर्तव्यांच्या सदरात मोडत असल्या तरी त्या संपूर्ण–पणे अनिवार्य ( absolutely obligatory ) समजल्या जात नाहीत. लोकरूढींना त्या मानाने कमी महत्त्व देण्याकडे लोकांचा कल असल्याने लोकरूढींची अमलबजावणी काटेकोरपणाने होत नाही. त्यांची अमलबजावणी नेहमी अनौपचारिकपणेच होत असते. सर्व लोकरूढी पाळल्याच पाहिजेत असे कायदेशीर बंधन लोकांवर असत नाही म्हणून लोकरूढींचे उल्लंघन करणाऱ्यांवर औपचारिक इलाज करून त्यांना शिक्षा देता येत नाही. एखाद्याने विशिष्ट समारंभाला योग्य असा पोशाख केला नाही तर त्याला जास्तीत जास्त प्रवेश नाकारता येतो पण त्याच्यावर कायदेशीर इलाज करता येत नाही. पण कायदेशीर नसलेल्या इतर मार्गांनी लोकरूढी प्रचारात येत असतात व त्यांचे आचरण अनिर्बंधपणे चालू असते. लोकरूढींचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींची लोक थट्टा करतात, त्यांच्याशी संबंध ठेवण्याचे टाळतात व त्यांना समाजबहिष्कृतही करतात. अशा अनौपचारिक सामाजिक नियंत्रणांचा उपयोग करून लोकरूढींचे उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा केली जाते. अशा रीतीने अनौपचा–रिकपणे लोकरूढींची अमलबजावणी होत असली तरी ती अमलबजावणी परिणाम–कारक होत असते यात शंका नाही. एखाद्या व्यक्तीने काही लोकरूढींचे पालन केले नाही तरी चालेल. पण त्या व्यक्तीला सर्व लोकरूढींचे उल्लंघन करणे शक्य होणार नाही. त्या व्यक्तीने जर तसे केले तर तिला सर्व सामाजिक संपर्कांना मुकावे लागेल. कारण अशा प्रकारच्या व्यक्तीशी समाजातील लोक संबंध ठेवणार नाहीत.

( iv ) **समूह–मर्यादा** ( Group Limitation ) : लोकरूढींचे क्षेत्र विशिष्ट समूहापुरते मर्यादित असते. एखाद्या समाजात ज्या लोकरूढी प्रचलित असतात त्यांचे वर्चस्व त्याच समाजात अबाधित असते, इतर समाजांत त्यांना कसलीच मान्यता असत नाही. कारण प्रत्येक समाजाच्या लोकरूढी वेगवेगळ्या असतात. तसेच, लोक आपल्या समाजातील व्यक्तींना लोकरूढींचे पालन करावयास लावतील, पण इतर समाजांतील व्यक्तींना आपल्या लोकरूढी पाळण्याची सक्ती करू शकत नाहीत. एखाद्या समाजात बाहेरून आलेल्या किंवा त्या समाजाचा सभासद नसलेल्या व्यक्तीने जर अगदी वेगळा पोषाख केला तर त्याविरुद्ध लोक–रूढींच्या अनौपचारिक अमलबजावणीचा कसलाही उपयोग होणार नाही.

समाजात लोकरूढींना विशिष्ट महत्त्व असते. लोकरूढींच्या योगाने लोकांच्या जीवनात सुरळीतपणा येतो व त्यांच्या वागण्यात नियमितता येते. लोकरूढी नेहमी प्रचारात असल्याने त्या लोकांच्या अंगवळणी पडतात व लोकरूढींतील आचार व विचार यांना लोकांच्या जीवनात स्थायी स्वरूप प्राप्त होते. अशा रीतीने लोकरूढी या लोकांच्या जीवनातील एक आवश्यक बाब बनतात व त्यानुसार लोकांचे आचरण होत असते. यामुळेच लोकांच्या जीवनात स्थैर्य व व्यवस्थितपणा निर्माण होतो व त्यांच्या आचार–विचारांत समानता दिसून येते. तेव्हा लोकरूढींमुळे मानवी जीव–नाची सुरवात झालेली आढळून येते आणि अजूनही मानवी जीवनात लोकरूढी प्रभावी आहेत व त्या तशाच राहतील.

लोकाचार व लोकरूढी यांचा समाजजीवनावर होणाऱ्या परिणामांचे महत्त्व विशद करून सांगणारा " लोकरूढी " ( Folkways ) या नांवाचा बृहद्ग्रंथ अमेरिकेतील प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ **डॉ. विल्यम् जी. सम्नर** यांनी १९०६ साली लिहिला. तेव्हापासून सामाजिक नियमनांच्या अभ्यासाला चालना मिळाली व समा–जातील त्यांच्या महत्त्वपूर्ण कार्याची लोकांना कल्पना आली.

### (२) लोकनीती ( Mores ) :

समाजात सर्व नियमनांना समान महत्त्व दिले जात नाही. ज्या नियमनांना कमी महत्त्व दिले जाते, ज्यांच्याविषयी भावनांची तीव्रता कमी असते, व ज्यांच्या आचरणाच्या बाबतीत तितकासा काटेकोरपणा अपेक्षिला जात नाही, तीं नियमने " लोकरूढी " या गटात मोडतात. पण लोकरूढी जेव्हा जास्ती बंधनकारक होतात तेव्हा त्या " लोकनीती " या सदरात येतात. या गटातील नियमनांना या विषयाचे आद्य लेखक डॉ. डब्ल्यू. जी. सम्नर यांनी " Mores " हा शब्द प्रथम वापरला

व आता तो रूढ झाला आहे. लॅटिन भाषेतील " mos " म्हणजे लोकाचार या शब्दाचे बहुवचनी रूप म्हणजे " mores " हा शब्द होय. एकपत्नीत्व पाळावे, मानवहत्या किंवा नरमांसभक्षण करू नये, खाजगी मालमत्तेचा आदर करावा, इत्यादी भारतीय समाजातील प्रचलित नियमने " लोकनीती " या सदरात येतात.

विशेष बंधनकारक लोकरूढींना " लोकनीती " म्हणतात. म्हणजे काही लोकरूढींचे लोकनीतीमध्ये रूपांतर होते. पण हे रूपांतर होण्यासाठी त्यांच्यामध्ये समाजकल्याणाची भावना उत्पन्न होणे ( addition of welfare element ) आणि त्यांना समाज–मान्यता मिळणे ( group sanction ) या दोन गोष्टी घडणे आवश्यक असते. बराच काल लोकरूढी प्रचारात राहिल्यानंतर समाजातील लोकांत अशी जाणीव निर्माण होते की समाजाच्या कल्याणाच्या दृष्टीने काही लोकरूढी अगदी योग्य व आवश्यक आहेत आणि त्यांचे पालन झाले नाही तर समाजात अनर्थ ओढवेल. काही लोकरूढी कल्याणकारी आहेत अशी जाणीव निर्माण होऊन खात्री पटली की त्या लोकरूढींना समाजाची संपूर्ण मान्यता मिळते. अशी मान्यता मिळाली म्हणजे त्या लोकरूढी लोकनीती या सदरात येतात व लोकनीती-प्रणीत आचरण करणे सक्तीचे होते. उदाहरणार्थ, परिचित व्यक्तींना अभिवादन करावे, वडीलधाऱ्या मंडळींना आदर दाखवावा, विशिष्ट पोषाख करावा, पुरुषांनी स्त्रीदाक्षिण्य दाखवावे इत्यादी आचारपरंपरा या लोकरूढींच्या सदरात मोडतात. लोकरूढींचे पालन झाले नाही तरी चालते, त्यापासून समाजाला काही धोका पोहचत नाही. म्हणून त्यांचे पालन न करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध कडक उपाययोजना केली जात नाही. पण लोकनीतीची तशी स्थिती असत नाही. एकपत्नीत्व पाळावे, कुटुंबांतर्गत व्यभिचार ( incest ) करू नये, दुसऱ्याच्या मालमत्तेवर आक्रमण करू नये यांसारख्या लोकनीतींच्या बाबतीत समाजातील लोकांची अशी खात्री असते की समाजाच्या कल्याणासाठी व समाजव्यवस्था अबाधित राहण्यासाठी त्यांचे तंतोतंत पालन करणे लोकांचे अवश्य कर्तव्य आहे. म्हणून लोकनीतींचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींना शिक्षा भोगावीच लागते. तेव्हा या दोन गोष्टी लक्षात घेऊन **डॉ. सम्मर** यांनी लोकनीतींची खालीलप्रमाणे व्याख्या केली आहे. " लोकांच्या रीती व परंपरा या समाजकल्याणाला उपयोगी आहेत असा निश्चय जेव्हा त्यांच्याविषयी होतो आणि त्यांना अनुरूप असे वर्तन करण्याची सक्ती जेव्हा व्यक्तीवर होते तेव्हा त्यांना लोकनीती म्हणतात. " [1]

1. " Mores are the popular habits and traditions, when they include a judgment that they are conducive to societal welfare and when they exert a coercion on an individual to conform to them. " – Sumner.

लोकनीतींना समाजाची मान्यता असल्याकारणाने असे दिसून येते की समाजात लोकनीती सर्वांना समान ( uniform ) असतात, त्या सर्वांना अवश्यकरणीय किंवा आज्ञात्मक ( imperative ) असतात अणि त्या मानाने अपरिवर्तनीय ( invariable ) असतात.

लोकनीती समाजात निश्चयात्मक ( positive ) व निषेधात्मक (negative ) अशा दोन्ही रीतींनी सांगितलेल्या असतात. स्त्रियांच्या चारित्र्याच्या बाबतीत या दोन्ही रीतींनी लोकनीती प्रचारात आहेत. स्त्रियांनी पातिव्रत्य पाळावे अशा निश्चयात्मक रीतीने आणि स्त्रियांनी व्यभिचार करू नये अशा निषेधात्मक रीतीने पति-पत्नींच्या वैषयिक वर्तनासंबंधीच्या लोकनीती सांगितलेल्या असतात. निषेधात्मक रीतीने सांगितलेल्या लोकनीती वर्ज्यवस्तु किंवा निषिद्धवस्तु (taboos) होतात. साधारणपणे नकारात्मक पद्धतीने आचारपरंपरा सांगण्याची प्रथा असल्याकारणाने निषेधक रीतीने सांगितलेल्या लोकनीतींचा भरणा अधिक असतो.

लोकनीतींचे विशिष्ट व सामान्य असे दोन प्रकार असतात. विवक्षित परिस्थितींतील दोन व्यक्तींच्या परस्परसंबंधांविषयीच्या लोकनीतींचा विशिष्ट लोकनीतींच्या प्रकारात समावेश होतो. पती व पत्नी, गुरु व शिष्य, वैद्य व रोगी, बालक व पाल्य अशासारख्या दोन व्यक्तींच्या वर्तनासंबंधीच्या लोकनीती पहिल्या प्रकारात मोडतात. याच्या उलट कित्येक लोकनीती सार्वत्रिक स्वरूपाच्या, विविध तऱ्हेच्या परस्परसंबंधांविषयीच्या व विविध परिस्थितींत लागू पडणाऱ्या असतात. मनुष्याने प्रामाणिकपणा दाखवावा, धैर्य सोडू नये, उद्योगशील रहावे, सच्चारित्र्य पाळावे इत्यादी लोकनीती विवक्षित व्यक्तीशी अगर परिस्थितीशी मर्यादित असत नाहीत, तर त्या सार्वजनिक व सार्वकालिक स्वरूपाच्या असतात. अशा लोकनीती सामान्य लोकनीतींच्या प्रकारात येतात. तेव्हा कोणत्याही समाजात विवक्षित वर्तनाची अपेक्षा करणाऱ्या विशिष्ट लोकनीती आणि कोणत्याही परिस्थितीत समान वर्तनाची अपेक्षा करणाऱ्या सामान्य लोकनीती अशा दोन प्रकारच्या लोकनीती प्रचारात असतात.

लोकनीतींच्या स्वरूपावरून हे स्पष्टपणे दिसून येते की त्यांना समाजजीवनात बरेच महत्त्व आहे. परंपरागत रीतीने प्रचलित असलेल्या लोकनीती समाजाला स्थैर्य प्राप्त करून देतात अशी लोकांची दृढ श्रद्धा असल्याने व या श्रद्धेच्या वातावरणात लोक लहानपणापासून वावरत असल्याने लोक सहजगत्या किंवा स्वयंस्फूर्तीने लोकनीतींना अनुरूप वर्तन करीत असतात. लोकनीतींच्या योग्यायोग्यतेची शहानिशा लोक कधीही करीत नाहीत व लोकनीतींची आवश्यकता सिद्ध

करून दाखविण्याची केव्हाही जरूरी भासत नाही. लोकनीती या सर्वथैव योग्य व अतिशय आवश्यक आहेत. अशीच समाजातील सर्व लोकांची भावना असते व त्या लोकनीती प्रत्यक्ष आचरणात आणण्याचा लोक कटाक्षाने प्रयत्न करीत असतात. तेव्हा लोकनीतींच्या योगाने समाजातील लोकांमध्ये संघटन (cohesion) निर्माण होण्यास व समाजव्यवस्था चालू राहण्यास मदत होत असते. म्हणून लोकनीती समाजात महत्त्वपूर्ण कार्य करीत असतात.

समाजात लोकनीतींचे सामर्थ्य फार मोठे असते. लोकनीती समाजजीवनाला हवे तसे वळण लावू शकतात व लोकांवर पाहिजे तेवढे नियंत्रण ठेवू शकतात. लोकनीतींच्या सामर्थ्याची कल्पना येण्यासाठी **डॉ. डब्ल्यू. जी. सम्नर** यांनी आपल्या " लोकरूढी " या प्रसिद्ध पुस्तकातील एका प्रकरणाला " लोकनीती कोणतीही बाब योग्य बनवू शकतात व कोणत्याही बाबीची निंदा थांबवू शकतात " ( " The Mores Can Make Anytbing Right and Prevent the Condemnation of Anything " ) असे अर्थपूर्ण शीर्षक दिले आहे. अर्थात लोकनीतींचे हे सामर्थ्य कसे वापरावयाचे ते ज्या त्या समाजावर अवलंबून असते. पूर्वीच्या काळी अनेक समाजांतील लोकनीतींनी गुलामगिरीच्या पद्धतीला मान्यता दिली होती. हुकूमशाही ( dictatorship ) वर्चस्वाखालील समाजांतील लोकनीती या लोकशाहीप्रणीत आचार-विचारांचे उच्चाटण करतात. लोकनीती या बीभत्स वाटणाऱ्या कुटुंबांतर्गत व्यभिचाराला ( incest ) देखील उचित वर्तनाच्या सदरात बसवू शकतात. प्राचीन काली इजिप्त देशात राजकुलातील रक्ताची शुद्धता राखण्यासाठी भावा–बहिणीमध्येच लग्नसंबंध व्हावेत असा लोकनीतींचा दण्डक होता. काही लोकनीतींनी नरमांसभक्षणाला सुद्धा मान्यता दिली आहे. चीनमधील काही आदिवासी जमातीमधून ठार केलेल्या शत्रूंच्या पोटांतील यकृते खाण्याची प्रथा चालू आहे. कित्येक लोकनीतींनी मनुष्यहत्येला देखील परवानगी दिलेली आहे. एस्किमो लोकात वृद्ध माणसांना ठार मारले तरी चालते, प्राचीन स्पार्टा शहरात बालहत्येला कसलाही प्रतिबंध नव्हता, आणि हल्लीच्या काळात आपल्यावर हल्ला करणाऱ्यांचा वध करणे व युद्धात शत्रूपक्षाच्या लोकांचा जीव घेणे या गोष्टी उचित समजल्या जातात.

## ( ३ ) कायदा ( Law )

सर्व सामाजिक नियमने प्रारंभीच्या स्वरूपात कायम राहात नाहीत. त्यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोण बदलत असतो व त्यानुसार नियमनांना कमी अधिक महत्त्व दिले जाते. ज्या नियमनांना कमी महत्त्व दिले जाते व जीं तितकीशी

बंधनकारक असत नाहीत तीं नियमने " लोकरूढी " या गटात मोडतात. काही लोकरूढींचे " लोकनीतींच्या " मध्ये रूपांतर होते. अर्थात ज्या लोकरूढी समाजाला उपकारक वाटतात व ज्यांना समाज-मान्यता मिळते त्यांना लोकनीती असे म्हणतात. साहजिकच लोकरूढींच्यापेक्षा लोकनीती या विशेष बंधनकारक असतात. असे असले तरी लोकनीती या लोकरूढींच्या प्रमाणे लोकमतावरच अवलंबून असतात. लोकनीतींना अनुरूप असे वर्तन करण्याची सक्ती समाजातील व्यक्तींवर होत असते. पण अशा रीतीने लोकनीतींची अमलबजावणी करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असत नाही. लोकमताचे दडपण एवढे प्रभावी असते की समाजातील व्यक्ती लोकनीतींचे उल्लंघन करीत नाहीत. नाही तर त्यांना समाजातील सर्व लोकांच्या रोषाला बळी पडावे लागते व एकाकी जीवन कंठण्याची पाळी येते.

लोकनीतींचे कायद्यात रूपांतर होत असते. " जेव्हा लोकनीतींच्या अमल–बजावणीसाठी एखादी खास संघटना अस्तित्वात येते तेव्हा त्या लोकनीतींना कायदे असे म्हणतात "[1] अशी कायद्याची व्याख्या डॉ. किंग्जले डेव्हिस यांनी केली आहे. लोकनीती या अनौपचारिक रीतीने समाजात प्रचलित असतात व त्या परंपरागत रीतीने चालत आलेल्या असतात. लोकनीतींच्या मागे कोणतीही विशिष्ट संघटना असत नाही, पण लोकमत असते. लोकमताच्या प्रभावामुळे लोकनीतींचे पालन होत असते. लोकनीतींचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींना औपचारिकपणे शिक्षा होत नाही तर निंदा, उपहास, तिरस्कार, बहिष्कार यासारख्या अनौपचारिक रीतींनी शिक्षा होते. साहजिकच अशी अनौपचारिक शिक्षा देण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असत नाही. याच्या उलट औपचारिक रीतीने कायदे केले जातात व ते प्रचारात आणले जातात. कायद्यांच्या मागे समाजाच्या राजकीय सत्तेची म्हणजे राज्याची संघटना असते. कायदे करण्यासाठी विधानसभा, लोकसभा यासारखी स्वतंत्र कायदामंडळे असतात. त्यांनाच कायदे करण्याचा अधिकार असतो. तसेच केलेल्या कायद्यांचे पालन होते की नाही हे पाहण्यासाठी व्यवस्था केलेली असते व त्यांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींना औपचारिकपणे शिक्षा होते व त्यांना ती शिक्षा हमखास भोगावी लागते. कायद्यांच्या या औपचारिक अमलबजावणीसाठी पोलिस, न्यायाधीश आदी अधिकाऱ्यांची योजना केलेली असते व न्यायदानाची विशिष्ट पद्धत अवलंबिलेली असते.

लोकनीतींचे कायद्यांत रूपांतर होत असले तरी समाजातील सर्व लोकनीतींचे कायद्यांत रूपांतर केले जात नाही. साधारणपणे ज्या लोकनीती समाजात जास्ती

1. " When mores come to have some special organization for their enforcement, we call them laws. " –Kingsley Davis.

महत्त्वाच्या व प्रभावी असतात त्यांच्या अमलबजावणीसाठी यंत्रणा निर्माण करून त्याचे कायद्यांत रूपांतर केले जाते. साहजिकच कोणत्याही समाजात लोकनीतींची संख्या कायद्यांच्या संख्येपेक्षा जास्ती असते आणि कायद्यांच्या मानाने लोकनीतींनी नियंत्रण केलेल्या वर्तनप्रकारांचे क्षेत्र अधिक विस्तृत असते.

लोकनीतींचे कायद्यांत रूपांतर होत असते. त्याकरिता लोकनीतींच्या अमल–बजावणीसाठी एखादी खास संघटना अस्तित्वात येणे आवश्यक असते. पण ही संघटना एकदम अस्तित्वात येत नाही व तिचे स्वरूप सर्व समाजांत सारखे असत नाही. या संघटनेच्या स्वरूपातील फरकावर कायद्याचे प्रकार अवलंबून असतात. स्थूलमानाने प्रथागत कायदा ( customary law ) किंवा सामान्य कायदा (common law) आणि अधिनियमित कायदा (enacted law) असे कायद्याचे दोन प्रकार कायद्याच्या विकासाच्या दृष्टिकोणातून होतात. ज्या समाजात फक्त परंपरागत चालत आलेल्या लोकनीतींची अमलबजावणी औपचारिक रीतीने होते तेथे प्रथागत कायदा असतो आणि ज्या समाजात औपचारिक रीतीने नवीन कायदे करतात तेथे अधिनियमित कायदा असतो. अर्थात प्रथागत कायदा नेहमी अलिखित असतो आणि अधिनियमित कायदा लिखित असतो. बऱ्याच आदिवासी लोकांच्या व शेतकऱ्यांच्या समाजांतून पहिल्या प्रकारचा म्हणजे प्रथागत कायदा अस्तित्वात असतो. अशा समाजांतून वडीलधाऱ्या मंडळींची एक समिती ( a council of elders ) असते. या समितीला न्यायविषयक अधिकार असतात आणि समाजा–तील प्रचलित लोकनीतींच्या विरुद्ध आचरण करणाऱ्यांना ही समिती त्यांचा गुन्हा शाबूत झाल्यावर शिक्षा देते. अर्थात ही समिती नवीन नियम अगर कायदे तयार करीत नाही आणि प्रचलित असलेल्या लोकनीती लिखित स्वरूपात आढळत नाहीत. विविध मानवी समाजांतून सुरवातीच्या अवस्थेत जे कायदे होते ते या प्रकारचे म्हणजे प्रथागत कायदेच होते. पण जेव्हा संमिश्र समाज (complex societies ) अस्तित्वात येतात तेव्हा प्रथागत कायदे समाजात सुव्यवस्था निर्माण करू शकत नाहीत. समाजात मोठ्या प्रमाणावर आर्थिक बाबतीत कार्यविभाजन ( specialization ) आणि राजकीय बाबतीत स्वतंत्र सत्ता स्थापन झाल्यानंतर केवळ परंपरागत लोकनीतींच्या साहाय्याने लोकांचे विविध परस्परसंबंध नियंत्रित करता येत नाहीत. त्यासाठी नवीन नियम किंवा कायदे करावे लागतात व या कामाकरिता स्वतंत्र कायदेमंडळ असावे लागते. म्हणून संमिश्र समाजात औपचारिक रीतीने नवीन कायदे करणारी यंत्रणा स्थापन होते व अधि–नियमित कायदे अस्तित्वात येतात. अधिनियमित कायदे विशिष्ट परिस्थितींना उद्देशून तयार करावे लागत असल्याने ते अगदी निश्चित स्वरूपाचे (definite)

असावे लागतात. कायदे लिहून ठेवले म्हणजे ही निश्चितता येते. म्हणून अधिनियमित कायदे नेहमी लिखित असतात. साहजिकच लेखनकला अवगत झाल्यानंतर कायद्याचा संपूर्ण विकास होणे शक्य होते. कारण लेखनकलेमुळे कायद्यांत केलेल्या तरतुदी नंतरच्या कालात केव्हाही समजू शकतात व कायद्यांच्या आधारे न्यायालयांनी वेळोवेळी दिलेले निर्णय सुरक्षित राहू शकतात. अलीकडील काळात संमिश्र समाजांची संख्या सारखी वाढत असल्याने अधिनियमित कायदे जास्ती प्रमाणात आढळून येतात.

आधुनिक समाजात कायद्याला महत्त्वपूर्ण स्थान आहे. कायदा हा अगदी जाणून बुजून केलेला असतो व जास्ती स्पष्टपणे सांगितलेला असतो. लोकरूढी किंवा लोकनीती यांची तशी स्थिती असत नाही. तसेच कायद्याच्या मागे निश्चित विचारसरणी असते व तो विशेष योजनापूर्वक केलेला असतो. समाजातील विशिष्ट परिस्थिती लक्षात घेऊन कायद्याचे स्वरूप व व्याप्ती ठरविण्यात येते. संमिश्र समाजांत कायद्याची आवश्यकता असते एवढेच नव्हे तर कायद्यामुळेच संमिश्र समाज अस्तित्वात येणे शक्य होते. समाजात लोकनीतींना निश्चित स्वरूप देणे, त्यांची व्याप्ती ठरविणे व औपचारिक रीतीने त्यांची अमलबजावणी करण्यासाठी यंत्रणा निर्माण करणे हो महत्त्वपूर्ण कार्ये कायदे करीत असतात. या कार्यांची हल्लीच्या समाजात नितांत आवश्यकता आहे. कारण समाजात दळणवळणाच्या साधनांत वाढ झाल्याने, संस्कृती जास्ती व्यापक बनत चालल्याने आणि विविध हेतू व समूह निर्माण होत असल्याने पूर्वीच्या लहान लहान समाजांतील एकात्मता नष्ट होत जाऊन त्या जागी मोठे गतिशील ( dynamic ) व धर्मनिरपेक्ष (secularised) समाज अलीकडील काळात अस्तित्वात आले आहेत आणि त्यांना एकत्रित ठेवणे कायद्यामुळे शक्य होते. तसेच, कायदे हेतुपुरस्सर केलेले असल्याने झपाट्याने बदलणाऱ्या परिस्थितीशी अनुकूल असे कायदे करणे सोपे जाते. हे काम लोकरूढींच्या मार्फत होणार नाही कारण लोकरूढी मुद्दाम अस्तित्वात आणल्या जात नाहीत. म्हणून गतिशील समाजांत अधिनियमित कायदे करून नवीन व बदलल्या परिस्थितीशी अनुकूलन ( adaptation ) साधले जाते. रेल्वे, मोटारी व विमाने प्रचारात आल्याने निर्माण झालेल्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी समाजांनी वाहतूकविषयक कायदे पास केले व त्यांची कडक अमलबजावणी केली. शिवाय, सामाजिक सुधारणा व सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे कायदा हे एक प्रभावी साधन आहे. कारण कायदा हा योजनापूर्वक केलेला असल्याने त्याच्या साहाय्याने सामाजिक संबंधांना हवे तसे वळण देणे सोपे जाते.

## ३. सामाजिक नियमनांचे परस्परसंबंध

सामाजिक नियमनांची लोकरूढी, लोकनीती व कायदे या तीन गटांत आपण विभागणी केली. आता या गटांतील नियमनांचे परस्परसंबंध कसे असतात ते पाहिले पाहिजे. सर्व सामाजिक नियमनांचा जर साकल्याने विचार केला तर असे दिसून येते की कोणत्याही समाजात लोकरूढी, लोकनीती व कायदे या नियमनांच्या समूहांचे परस्परांशी अगदी पद्धतशीर संबंध असतात आणि म्हणूनच समाजरचनेचे सम्यक् आकलन करून घेण्यासाठी त्या समाजाच्या नियमनात्मक व्यवस्थेचा अभ्यास करणे श्रेयस्कर ठरते.

नियमनांच्या परस्परसंबंधांविषयी असा सामान्य नियम (principle) प्रत्ययास येतो की प्रत्यक्ष व्यवहारात वापर होत असलेल्या नियमनांमध्ये ठराविक मर्यादेपर्यंत परस्परावलंबन व विशिष्ट व्यवस्था अस्तित्वात येते. सामाजिक नियमनांमध्ये बसत असलेल्या अन्योन्याश्रयाचे स्वरूप " संस्था " या संकल्पनेवरून (concept of institution) दिसून येते. लोकरूढी, लोकनीती व कायदे या सामाजिक नियमनांना एकत्र सम्मिलित करून संस्था निर्माण होते. लोकरूढी, लोकनीती व कायदे यांसारखी सामाजिक नियमने नसतील तर संस्था अस्तित्वात येऊ शकत नाही. अर्थात विशिष्ट हेतूला किंवा कार्याला पूरक अशीच सामाजिक नियमने एकत्रित केली जातात व या प्रक्रियेतून संस्था उदयास येते. म्हणून " एक किंवा अधिक कार्यांच्या भोवती रचलेल्या व एकजीव झालेल्या लोकरूढी, लोकनीती व कायदे यांचा संच किंवा साचा म्हणजे संस्था होय. " अशी ' संस्था ' या संकल्पनेची व्याख्या **डॉ. किंग्जले डेव्हिस** यांनी केली आहे.[1] विवक्षित कार्यांच्या पूर्तीसाठी सामाजिक नियमनांचा साचा तयार झाला म्हणजे त्या साच्याला संस्था असे म्हणतात. साहजिकच संस्थेला निश्चित आकार ( structure ) प्राप्त होतो आणि त्यामुळे संस्था समाजासाठी व त्यातील व्यक्तींसाठी महत्त्वपूर्ण कार्ये चांगल्या रीतीने करू शकते. विवाह या संस्थेच्या उदाहरणावरून सामाजिक नियमनांच्या रचनेची व कार्यांची कल्पना येईल. विवाहासंबंधी सर्व प्रकारची नियमने प्रत्येक समाजात आढळून येतात. स्त्री-पुरुषांचा समागम कोणत्या योग्य पद्धतीने व्हावा हे दर्शविणाऱ्या वाङ्निश्चय, मंगलाक्षता, लाजाहोम, अश्मारोहण, गृहप्रवेश, मधुचंद्र इत्यादी लोकरूढी विवाहाच्या

1. " An institution can be defined as a set of interwoven folkways, mores and laws built around one or more functions. " – Kingsley Davis.

बाबतीत प्रचलित असतात. तसेच, विवाहपूर्व पवित्रता, वैवाहिक निष्ठा, प्रतिज्ञापालन, कुटुंबियांचे संरक्षण व संवर्धन यासारख्या लोकनीती देखील विवाहसंबंधांत दिसून येतात. त्याचप्रमाणे कोणत्या व्यक्तीशी लग्न करावे, किती व्यक्तींशी लग्न करता येते, विवाहसमयी वय किती असावे, विवाहाला समाजाची मान्यता कशी मिळवावी, विवाहोच्छेद कोणत्या परिस्थितींत करता येतो इत्यादी बाबतींत कायदे केलेले असतात. विवाहाच्या बाबतींतील लोकरूढी, लोकनीती व कायदे या सर्व प्रकारची सामाजिक नियमने असतात. एवढेच नव्हे तर त्या नियमनांना कार्याच्या दृष्टीने निश्चित आकार ( definite structure ) दिलेला असतो. विवाहविषयक नियमनांना निश्चित आकार मिळाला म्हणजे त्या नियमनांच्या एकजीव साच्याला विवाहसंस्था असे म्हणतात आणि साहजिकच विवाहाला एकूण समाजाच्या दृष्टीने विशिष्ट अर्थ प्राप्त होतो. अशी विवाहसंस्था समाजात प्रचलित असल्यानंतर ती समाजाच्या व व्यक्तीच्या दृष्टीने विवक्षित कार्ये करीत असते. प्रजोत्पादन आणि शिशुसंगोपन व शिशुसंवर्धन यासारखी समाजोपयोगी कार्ये आणि कामवासनातृप्ती व प्रेमसंपादन यांसारखी व्यक्तीच्या दृष्टीने हितकारक अशी कार्ये विवाहसंस्था करते. जी गोष्ट विवाहसंस्थेची तीच मालमत्ता, राज्य, धर्म आदी इतर संस्थांची असते. या प्रत्येक संस्थेमध्ये परस्परसंबंधित अशा लोकरूढी, लोकनीती व कायदे यांचा संघटित स्वरूपाचा स्वतंत्र असा साचा असतो आणि प्रत्येक संस्थेच्या योगाने समाजाच्या व त्यातील व्यक्तींच्या दृष्टीने उपकारक अशी कार्ये होत असतात.

समाजातील प्रत्येक संस्था समाजासाठी व व्यक्तींसाठी आवश्यक कार्ये करीत असल्याने कोणत्याही समाजातील प्रमुख संस्था व त्यांचे अन्योन्यसंबंध यांचे सम्यक् आकलन झाल्याखेरीज त्या समाजाच्या सामाजिक रचनेची खरी कल्पना येणार नाही. समाजाच्या विवाह, धर्म, राज्य, मालमत्ता आदी मूलभूत अशा संस्थांचे स्वरूप व कार्य कोणत्या प्रकारचे आहे आणि त्या संस्था एकमेकींवर कशा रीतीने अवलंबून आहेत याविषयी संपूर्ण जाणीव झाली की त्या समाजाच्या सामाजिक रचनेची ठळक वैशिष्टये समजून येतात. म्हणून समाजरचनेचे संपूर्ण आकलन होण्यासाठी विविध संस्था ज्यावर आधारलेल्या आहेत त्या सामाजिक नियमनांचा अभ्यास केला पाहिजे. पण साधारणपणे असे दिसून येते की अर्थशास्त्रज्ञ, राज्यशास्त्रज्ञ यांसारखे तज्ञ लोक समाजातील एखाद्या संस्थेचाच विशेष अभ्यास करतात. त्यामुळे समाजाच्या त्या विशिष्ट संघटनेचे ज्ञान होते हे खरे. परंतु एखाद्या संस्थेच्या अशा विशेष अभ्यासामुळे त्या समाजाचे संपूर्ण चित्र आपल्या नजरेस येत नाही. पण समाजाचे असे संपूर्ण आकलन होणे किंवा समाजाच्या नियमना-

त्मक व्यवस्थेची सांगोपांग जाणीव होणे समाजरचना कळण्याच्या दृष्टीने आवश्यक असते. समाज जेव्हा मोठे व संमिश्र असतात तेव्हा त्यांची नियमनात्मक व्यवस्था कळणे कठीण असले तरी देखील ती व्यवस्था जाणून घेणे अगदी जरूरीचे वाटते. कारण अलीकडील काळातील बरेच समाज अशा मोठ्या संख्येचे व संमिश्र स्वरूपाचे होऊ लागले आहेत. हे आवश्यक कार्य काही सामाजिक विज्ञानांच्या अभ्यासकांनी अंगावर घेणे जरूरीचे आहे. सामाजिक मानवशास्त्रज्ञ ( Social Anthropologists ) असा दृष्टिकोण समोर ठेवून अभ्यास करतात. पण ते मुख्यतः आदिवासी लोकांच्या लहान समाजांचा अभ्यास करीत असल्याने त्यांचे कार्य त्या मानाने सोपे असते. समाजशास्त्रज्ञ ( Sociologists ) मात्र कोणत्याही समाजाची नियमनात्मक व्यवस्था एकत्रित स्वरूपात जाणून घेण्याचे अवघड पण जरूरीचे कार्य करीत असतात.

## ४. *समाज आणि सामाजिक नियमने*

समाजाच्या दृष्टीने सामाजिक नियमनांचे अतिशय महत्त्व आहे. सामाजिक नियमनांच्या स्वरूपावरून हे स्पष्ट होते की तीं अगदी विभिन्न व व्यापक असतात. समाजजीवनाचा असा एकही भाग नाही की ज्या बाबतीत सामाजिक नियमने नाहीत. तसेच सामाजिक नियमनांचे अस्तित्व हे मानवी समाजाचे वैशिष्ट्यपूर्ण लक्षण आहे. कारण मानवेतर प्राण्यांच्या समाजांत नियमनात्मक व्यवस्था असत नाही. विशेष म्हणजे सामाजिक जीवन जगण्याच्या प्रयत्नांतून सामाजिक नियमने निर्माण होत असतात आणि त्यांच्याविषयी संपूर्ण माहिती समाजातील सर्व लोकांना करून दिली जात असते. समाजातील प्रचलित नियमनांपैकी बरीचशी नियमने लोक आत्मसात करीत असतात व अशा रीतीने तीं माणसांच्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग बनतात. प्रत्येक व्यक्ती समाजातील प्रचलित नियमनांचे संपूणपणे पालन करीत नसली तरी व्यक्तीच्या आचार-विचारांवर नियमनांचा खात्रीने परिणाम होत असतो आणि तो परिणाम एवढा प्रभावी असतो की मुख्यतः नियमनांच्या साहाय्याने कोणत्याही व्यक्तीचे वर्तन नियंत्रित करून ते समाजातील इतर व्यक्तींच्या वर्तनाशी सुसंगत करता येते. तेव्हा समाजातील सर्व व्यक्तींच्या वर्तनावर हमखास होणाऱ्या सामाजिक नियमनांच्या प्रभावामुळे समाजरचना सुसंबद्ध होते आणि हवे तसे सामाजिक जीवन चालू राहण्यास मदत होते.

सामाजिक नियमनांचे समाजाच्या दृष्टीने एवढे महत्त्व असल्याने समाजाचा अभ्यास करण्याच्या विविध पद्धतींमध्ये सामाजिक नियमनांच्या विश्लेषणद्वारे

समाजाचा अभ्यास करण्याची पद्धत विशेष मान्यता पावू लागली आहे. कोणत्याही समाजातील प्रचलित लोकरूढी, लोकनीती, कायदे व संस्था यांची यथार्थ माहिती करून घेतली म्हणजे त्या समाजाच्या नियमनात्मक व्यवस्थेचे सम्यक् आकलन होते आणि त्यामुळे त्या समाजाबद्दल बरेच ज्ञान होते. म्हणून समाजशास्त्रात मानवी समाजाचा वैज्ञानिक दृष्टिकोणातून अभ्यास करताना सामाजिक नियमनांचा अभ्यास करणे ही एक अत्यंत जरूरीची गोष्ट ठरते.

समाजशास्त्रज्ञांना सामाजिक नियमनांचा सांगोपांग अभ्यास करणे अगदी अपरिहार्य असते. असा अभ्यास करताना ते कोणत्याही समाजातील विविध नियमनांची जंत्री करीत नाहीत तर त्या समाजाची नियमनात्मक व्यवस्था जाणून घेण्याचा प्रयत्न करतात. समाजात मूलभूत नियमने कोणती आहेत, त्यांचे अन्योन्य-संबंध कसे आहेत, त्यांचे समाजजीवनावर कोणते परिणाम होतात, नियमनांमधील विरोध असलेच तर कोणत्या उपायांनी दूर केले जातात, नियमनांना एकत्रित करणाऱ्या प्रमुख संस्था कोणत्या आहेत इत्यादी नियमनविषयक प्रश्नांचा उहापोह समाजशास्त्रज्ञ करतात. त्यामुळे समाजशास्त्रज्ञांना समाजाच्या नियमनात्मक व्यवस्थेचे संपूर्ण आकलन होते.

सारांश, सामाजिक नियमने व त्यांच्यावर आधारलेल्या संस्था यांचे विश्लेषण करून समाजाचा अभ्यास करण्याची पद्धत ( normative approach ) समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून विशेष महत्त्वाची समजली जाऊ लागली आहे आणि समाजशास्त्रज्ञांमध्ये ही पद्धत रूढ होऊ लागली आहे.

# ९

# सामाजिक दर्जा

## १. सामाजिक दर्जाचे स्वरूप

सामाजिक वर्तनाचा विस्तृत अभ्यास समाजशास्त्र करते. समाजातील व्यक्तींचे परस्परांशी होणारे वर्तन अनेक गोष्टींवर अवलंबून असते. समाजात प्रचलित असलेली सामाजिक नियमने लोकांच्या वर्तनाचे स्वरूप ठरवीत असतात. सामाजिक नियमनांना अनुरूप असे वर्तन लोक करीत असतात आणि लोकांनी तसे वागावे अशी दक्षता समाज घेत असतो. ज्याप्रमाणे समाजातील कोणत्याही व्यक्तीचे वर्तन हे त्या समाजातील नियमनांवर अवलंबून असते त्याप्रमाणे समाजातील कोणत्याही व्यक्तीचे वर्तन हे त्या व्यक्तीचा सामाजिक दर्जा ( social status ) काय आहे या गोष्टीवर देखील अवलंबून असते. समाजातील कोणतीही व्यक्ती स्त्री आहे की पुरुष आहे, ती किती वयाची आहे, कोणत्या कुटुंबातील आहे, विवाहाच्या बाबतीत कोणत्या अवस्थेत आहे, त्याचप्रमाणे ती कोणत्या गुणांनी युक्त आहे, कोणता व्यवसाय करते, कोणत्या समूहाची सभासद आहे, इत्यादी गोष्टींना अनुसरून त्या व्यक्तीचे वर्तन होत असते. कारण प्रत्येक स्थानावरील व अवस्थेतील व्यक्तींनी कसे वागावे याविषयी समाजाने दण्डक घातलेले असतात व त्याबरहुकूम लोकांचे वर्तन व्हावे अशी समाजाची अपेक्षा असते. म्हणन सामाजिक दर्जाच्या अभ्यासाला समाजशास्त्रात विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

"कोणत्याही व्यक्तीला समाजव्यवस्थेत विवक्षित काली जे स्थान असते त्या स्थानाला दर्जा असे म्हणतात" अशी दर्जा या शब्दाची व्याख्या प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ **डॉ. राल्फ लिंटन** यांनी केली आहे.[1] समाजात असलेले व्यक्तीचे स्थान म्हणजे त्या व्यक्तीचा दर्जा होय. व्यक्तीचे लिंग, वय, कुल, वैवाहिक स्थिती, गुणवत्ता, व्यवसाय इत्यादी गोष्टींच्या योगाने त्या व्यक्तीचे समाजातील स्थान ठरत असते. प्रत्येक व्यक्तीला समाजात स्थान असते. म्हणून त्या व्यक्तीला समाजात विशिष्ट दर्जा असतो. या ठिकाणी दर्जा हा शब्द प्रतिष्ठा (prestige) या अर्थाने वापरलेला नाही. नेहमीच्या बोलण्यात सर्वसाधारणपणे समाजात काही स्थानांचा दर्जा उच्च प्रतीचा असतो अगर कमी प्रतीचा असतो असे म्हटले जाते. पण समाजशास्त्रीय लिखाणात हा अर्थ अभिप्रेत नसतो. समाजाच्या विविध प्रकारच्या व्यवस्थेत असलेल्या प्रत्येक स्थानाला दर्जा हा शब्द वापरण्यात येतो. समाजाच्या अर्थव्यवस्थेत दुकानाच्या मालकाला जसे स्थान असते तसे दुकानाच्या नोकराला देखील स्थान असल्याने दोघांनाही आपापला दर्जा असतो. समाजाच्या धर्म, राज्य, शिक्षण इत्यादी प्रकारच्या व्यवस्थेत कितीतरी स्थाने असतात आणि त्या प्रत्येक स्थानाला दर्जा हा शब्द लावण्यात येतो. समाजातील व्यक्ती अशा स्थानांपैकी बऱ्याच स्थानांवर एका वेळी असते म्हणून त्या व्यक्तीला विविध प्रकारचे दर्जे (statuses) असू शकतात. एखादी व्यक्ती कारखान्यात मजूर, राजकीय पक्षात कार्यकर्ता, शिक्षणसंस्थेत विद्यार्थी, कुटुंबात बायकोचा पती, मुलांचा पिता, वडिलांचा पुत्र व भावंडांचा भ्राता, धर्मसंघटनेत साधक, अशा विविध प्रकारच्या स्थानांवर एकाच वेळी राहू शकते. म्हणून त्या व्यक्तीला विविध स्थानांना अनुसरून विविध दर्जे असतात. समाजातील प्रत्येक व्यक्तीची अशी स्थिती असते.

समाजात अस्तित्त्वात असलेली विविध प्रकारची स्थाने लोकांना सहजपणे ओळखता यावीत म्हणून समाजाने काही बाह्य प्रतीकांची किंवा चिन्हांची (external symbols) सोय केलेली असते. सैन्यदलामध्ये वेगवेगळ्या स्थानांवर असलेल्या लोकांच्या पोषाखात थोड्याफार प्रमाणात हमखास फरक असतो. पुरुष आणि स्त्रिया यांचा पोषाख भिन्न असतो. पुष्कळ समाजांतून विवाहित आणि अविवाहित, तरुण आणि वृद्ध, राजघराण्यांतील व इतर लोक, धर्मगुरु व शिष्य यांचे पोषाख वेगवेगळे असतात. केशभूषा, डागडागिने, कपड्यांचा रंग, कपड्यांचे प्रकार, बिल्ले, खूणा, चिन्हे इत्यादी गोष्टींचा उपयोग करून विविध स्थानांचा वेगळेपणा समाजात स्पष्ट केला जातो. या बाह्य प्रतीकांचा कांही लोकांकडून दुरुपयोग

---

1 " Status is the place in a particular system which a certain individual occupies at a particular time." -- Ralph Linton.

होणे शक्य असते. पण असा गैर उपयोग करून जनतेला फसविणे निंद्य समजले जाते व फसविणाऱ्यांना शासन होईल अशी खबरदारी समाज घेत असतो.

समाजात प्रत्येक स्थानाला काही विशिष्ट हक्क किंवा अधिकार ( rights ) आणि कर्तव्ये किंवा बंधने ( obligations ) असतात. या हक्कांचे व कर्तव्यांचे स्वरूप व मर्यादा समाजाच्या नियमनात्मक व्यवस्थेने ( normative system ) घालून दिलेल्या असतात आणि त्यानुसार लोकांनी आपले वर्तन ठेवावे अशी समाजाची अपेक्षा असते. समाजाने निर्धारित केलेल्या मर्यादांच्या कक्षेमध्ये आपल्या वर्तनात योग्य वाटेल तो फेरफार करण्याची मुभा लोकांना असते. पण कोणत्याही परिस्थितीत त्या मर्यादांचे उल्लंघन करणाऱ्यांना शासन करण्याची तरतूद समाज करीत असतो. कोणत्याही स्थानाशी निगडित असलेले हक्क व कर्तव्ये यांचे स्वरूप परस्परावलंबी असते. एखाद्या स्थानावर असलेल्या व्यक्तीने दुसऱ्या स्थानावर असलेल्या व्यक्तीकडून विशिष्ट तऱ्हेच्या वर्तनाची अपेक्षा करणे हा त्याचा हक्क असतो आणि त्या दुसऱ्या स्थानावर असलेल्या व्यक्तीनेही त्या अपेक्षांना अनुरूप असे वर्तन करणे हे त्याचे कर्तव्य असते. मालकाने मजूराकडून विशिष्ट तऱ्हेच्या कामाची अपेक्षा करणे हा मालकाचा हक्क असतो आणि मजूराने तशा तऱ्हेचे काम मालकासाठी करणे हे मजूराचे कर्तव्य असते. तसेच मजूराने मालकाकडून विशिष्ट तऱ्हेच्या मोबदल्याची अपेक्षा करणे हा मजूराचा हक्क असतो आणि मालकाने तशा तऱ्हेचा मोबदला मजूराला देणे हे मालकाचे कर्तव्य असते. जी गोष्ट मालक व मजूर या स्थानांची तीच इतर स्थानांची देखील असते. म्हणून प्रत्येक स्थान किंवा दर्जा याच्याशी विशिष्ट हक्क आणि कर्तव्ये निगडित असतात.

प्रत्येक सामाजिक दर्जाशी संबंधित असलेल्या हक्कांचे व कर्तव्यांचे त्या दर्जावर असलेल्या व्यक्तीकडून पालन होणे आवश्यक असते. जर हक्क व कर्तव्ये यांचे पालन झाले नाही तर त्या स्थानाला किंवा दर्जाला काही अर्थ राहणार नाही. हक्क व कर्तव्ये आचरणात आणण्याच्या क्रियेला भूमिका ( role ) किंवा सामाजिक भूमिका ( social role ) असे म्हणतात. तेव्हा कोणत्याही दर्जाची क्रियाशील बाजू ( dynamic aspect ) म्हणजे भूमिका होय. म्हणून "विशिष्ट सामाजिक स्थानाशी अनुरूप असा वर्तन–प्रकार म्हणजे भूमिका होय" अशी भूमिकेची किंवा सामाजिक भूमिकेची व्याख्या **लिओनार्ड ब्रूम व फिलिप सेल्झ्निक या समाजशास्त्रज्ञांनी** केली आहे.[1] जेव्हा एखाद्या दर्जावर असलेली व्यक्ती त्या

---

1. "A role– sometimes called social role– is a pattern of behaviour associated with a distinctive social position."
– Leonard Broom and Philip Selznick.

दर्जामध्ये समाविष्ट केलेले हक्क व कर्तव्ये प्रत्यक्ष आचरणात आणते तेव्हा ती व्यक्ती आपली भूमिका पार पाडते असे होते. जसे व्यक्तीला अनेक स्थाने अगर दर्जे असतात तसेच त्या व्यक्तीला अनेक भूमिका देखील असतात. व्यक्तीला जसे पित्याचे स्थान असते तसे त्याला पित्याची भूमिका सुद्धा पार पाडावयाची असते. प्रत्येक स्थानावरील व्यक्तीने आपली भूमिका योग्य रीतीने पार पाडावी अशी समाजाची अपेक्षा असते. नाहीतर समाजव्यवस्था टिकणार नाही. म्हणून सामाजिक दर्जा व सामाजिक भूमिका या गोष्टी अगदी अभिन्न आहेत. त्या एकमेकापासून अलग करता येणार नाहीत. भूमिकेशिवाय दर्जा असू शकत नाही आणि दर्जा असल्याखेरीज भूमिका असत नाही.

## २. सामाजिक दर्जांचे एकीकरण

समाजातील कोणतीही व्यक्ती एकाच वेळी अनेक स्थानांवर असते व त्या स्थानांशी निगडित असलेल्या हक्कांचे व कर्तव्यांचे प्रत्यक्ष पालन करीत असते. म्हणून प्रत्येक व्यक्तीला अनेक दर्जे व अनेक भूमिका असतात. असे असले तरी त्या दर्जांचे व भूमिकांचे संकलन किंवा एकीकरण ( integration ) केलेले असते आणि अशा तऱ्हेचे एकीकरण व्यक्तीच्या व समाजाच्या दृष्टीने अगदी आवश्यक असते.

व्यक्तीला त्याच्या स्थानांच्या संख्येप्रमाणे अनेक दर्जे असतात. पण कित्येकदा आपण त्या व्यक्तीला समाजात विवक्षित दर्जा ( the status ) आहे असे म्हणतो. व्यक्तीच्या अनेक दर्जांचे एकत्रित स्वरूप ( the sum total ) म्हणजे त्या व्यक्तीचा विवक्षित दर्जा होय अशा अर्थाने आपण विवक्षित दर्जा हा शब्द वापरतो. विशेष म्हणजे संपूर्ण समाजाच्या दृष्टीने--किंवा समाजात त्याला काय स्थान आहे यावरून- कोणत्याही व्यक्तीचा विवक्षित दर्जा ठरत असतो. उदाहरणार्थ, श्रीयुत काळे यांचा त्यांच्या समाजातील विवक्षित दर्जा म्हणजे एक नागरिक, राजकीय कार्यकर्ता, वकील, धर्मोपदेशक, सौ. काळेंचा नवरा, इत्यादी नात्यांनी असलेल्या त्यांच्या दर्जांचे एकीकरण होय. श्रीयुत काळे यांच्या या विवक्षित दर्जाला समाजातील व्यक्तींची सर्वसाधारण मान्यता असते. जी गोष्ट दर्जांची तीच भूमिकांची असते. कोणत्याही व्यक्तीला अनेक स्थानांशी निगडित असलेल्या हक्कांचे व कर्तव्यांचे पालन करावे लागत असल्याने तिला अनेक भूमिका असतात. तसेच त्या व्यक्तीला समाजात विवक्षित भूमिका ( the role ) देखील असते. व्यक्तीच्या अनेक भूमिकांचे एकत्रित स्वरूप ( the sum total )

म्हणजे तिची विवक्षित भूमिका होय. समाजासाठी एखादी व्यक्ती काय करते या गोष्टीवर तिची विवक्षित भूमिका निश्चित होते. समाजोपयोगी कर्तव्ये पार पाडणाऱ्या व्यक्तीची भूमिका समाजात विशेष महत्त्वाची मानली जाते.

व्यक्ती ज्या अनेक स्थानांवर असते व ज्या अनेक भूमिका पार पाडते त्यांचा तिचे व्यक्तिमत्त्व ( personality ) घडविण्यामध्ये बराच महत्त्वाचा वाटा असतो. प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या गरजा भागविण्यासाठी व काही गोष्टी साध्य करून घेण्यासाठी कामे करणे आवश्यक असते. पण त्यासाठी लागणारा वेळ, शक्ती, साधने इत्यादी गोष्टी त्या व्यक्तीजवळ पुरेशा प्रमाणात असत नाहीत. म्हणून ती व्यक्ती ज्या अनेक स्थानांवर असते त्या स्थानांचे एकमेकाशी संकलन ( integration ) होणे अगदी जरूरीचे असते. नाहीतर त्या व्यक्तीला मानसिक स्थैर्य व समाधान लाभणार नाही आणि तिच्या व्यक्तिमत्त्वाची व्यवस्थित वाढ होणार नाही.

ज्याप्रमाणे व्यक्तीच्या दृष्टीने तिच्या सर्व दर्जांचे व्यवस्थितपणे एकीकरण व्हावयास हवे त्याचप्रमाणे समाजातील विविध स्थानांचे परस्परांशी योग्य रीतीने संकलन झाले पाहिजे. असे एकीकरण केले नाही तर समाजाला आपले अस्तित्व टिकविता येणार नाही. साधारणपणे समाजाच्या आर्थिक, राजकीय, कुटुंबविषयक, धार्मिक इत्यादी क्षेत्रांतील विविध स्थाने एकमेकांना पूरक ठरतील अशी दृष्टी ठेवून निर्माण केली जातात. साहजिकच त्या स्थानांवर असलेल्या व्यक्तींनी आपले हक्क व कर्तव्ये यांची योग्य अमलबजावणी केली म्हणजे समाजाचे सातत्य चालू राहते. म्हणून समाजातील विविध स्थानांचे व्यवस्थित एकीकरण होऊन त्याच स्वरूपात तीं स्थाने टिकतील अशी खबरदारी समाज घेतो. तेव्हा समाजातील विविध स्थाने व त्यांचे परस्परसंबंध सहसा बदलत नाहीत. त्या स्थानांवर येणाऱ्या व्यक्तींच्या मध्ये मुख्यतः बदल होत असतो. पण त्याचा समाजजीवनावर विशेष परिणाम होत नाही कारण समाजातील स्थानांचे पूर्वीचेच स्वरूप कायम असते. उदाहरणार्थ, समाजाच्या अर्थव्यवस्थेत मालक व मजूर हीं स्थाने व त्यांच्या भूमिका समाजानें ठरवून दिलेल्या असतात, मग मालक व मजूर म्हणून येणाऱ्या व्यक्ती कोणत्याही असल्या तरी चालते. हॉकी सारख्या सामूहिक खेळात प्रत्येक स्थान व त्या स्थानावर असणाऱ्या व्यक्तीने करावयाचे कार्य या गोष्टी निश्चित केल्या जातात, मग त्या स्थानांवर कोणत्याही व्यक्ती आल्या तरी खेळ चालू राहतो. सारांश, समाजजीवन सुरळितपणे चालू राहण्यासाठी समाजातील विविध स्थानांचे व्यवस्थित एकीकरण होणे आवश्यक असते.

## ३. सामाजिक दर्जांचे प्रकार

कोणत्याही समाजव्यवस्थेत विविध क्षेत्रांतील अनेक स्थाने निर्माण केलेली असतात आणि या स्थानांवर असलेल्या समाजातील व्यक्तींनी आपापल्या भूमिका उत्तम रीतीने पार पाडाव्यात अशी समाजाची अपेक्षा असते. समाजाच्या दृष्टीने हे कार्य अतिशय महत्त्वाचे समजले जाते. कारण अगदी चांगल्या रीतीने समाजातील व्यक्ती आपल्या स्थानांशी समरस होऊन कार्य करण्यावर समाजव्यवस्था सुरळितपणे चालू राहणे अवलंबून असते. तेव्हा विविध स्थानांवर योग्य रीतीने काम करणारींच माणसे कशी येतील हा प्रश्न सोडविणे समाजाला आवश्यक असते. पण हा प्रश्न सोडविणे समाजाला अतिशय कठीण असते. कोणत्याही व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वाची व कर्तृत्वाची घडण होण्यास जन्मापासून सुरवात होत असते. म्हणून व्यक्तिला विशिष्ट स्थानांना अनुरूप असे शिक्षण आधीच लहान वयात दिले तर त्या व्यक्तीला त्या स्थानांवरील आपल्या जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडण्यास बरीच मदत होते. पण पुढे कोणत्या स्थानांवर राहण्यास कोणत्या व्यक्ती योग्य ठरतील हे त्या व्यक्तींच्या लहानपणीच सांगणे सोपे नसते. कारण कोणत्याही दोन व्यक्ती–अगदी जुळी भावंडे सुद्धा–संपूर्णत: एकसारख्या असत नाहीत व त्यांच्या गुणांमध्ये कितीतरी तफावत दिसून येते. एखाद्या व्यक्तीला जे स्थान योग्य ठरेल ते दुसऱ्या व्यक्तीला ठरेलच हे आधी सांगता येणार नाही. व्यक्तीमध्ये असलेले निसर्गदत्त कौशल्य तिच्या लहानपणीच दिसून येत नाही. तर त्या कौशल्याचा प्रत्यय येण्यास कितीतरी अवधी लागतो. तेव्हा व्यक्तींना पुढे द्यावयाची स्थाने त्यांच्या लहानपणीच ठरवून त्याप्रमाणे त्यांना शिक्षण द्यावयाचे की व्यक्तींच्या अंगभूत गुणांचा आविष्कार झाला म्हणजे त्यानुसार त्यांना स्थाने द्यावयाची हा कूटप्रश्न समाजापुढे उभा असतो. पहिल्या पद्धतीने प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला तर समाजाला गुणी लोकांचा भरपूर उपयोग करून घेता येणार नाही आणि दुसऱ्या पद्धतीने प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला तर लहानपणापासून शिक्षण देण्यामुळे होणारे फायदे समाजाला मिळणार नाहीत. अशा परिस्थितीत (अ) व्यक्तीला मिळालेली स्थाने किंवा दर्जे ( ascribed statuses ) आणि (ब) व्यक्तीने मिळविलेली स्थाने किंवा दर्जे ( achieved statuses ) असे समाजिक दर्जांचे दोन प्रकार करून हा कूटप्रश्न समाजाने सोडविला आहे. व्यक्तींना मिळालेले दर्जे हे समाजाने व्यक्तींच्या अंगभूत गुणांचा विचार न करता दिलेले असतात. हे दर्जे व्यक्तींच्या जन्मापासून त्यांना मिळालेले असतात म्हणून अशा मिळणाऱ्या दर्जांची कल्पना करून त्यानुसार व्यक्तींना शिक्षण देता येते. याच्या उलट व्यक्तीने मिळविलेले दर्जे व्यक्तींच्या विशेष गुणसमुच्चयावर अवलंबून असतात. असे दर्जे व्यक्तींच्या

अनुक्रम ........ चि: ..............



जन्मापासून दिले जात नाहीत तर व्यक्तींना स्वतःच्या कर्तृत्वांनी इतरांशी स्पर्धा करून मिळवावे लागतात.

प्रत्येक समाजात या दोन प्रकारचे दर्जे असतात. दोहोंपैकी एकाच प्रकारच्या दर्जाची सोय केलेले समाज आढळत नाहीत. अर्थात या दोहोंपैकी कोणत्या प्रकारचे दर्जे समाजात जास्ती असतात हे ज्या त्या समाजव्यवस्थेवर अवलंबून असते. साधारणपणे असे दिसून येते की सर्व तऱ्हेच्या समाजव्यवस्थेमध्ये पहिल्या प्रकारच्या म्हणजे व्यक्तीला जन्मापासून मिळणाऱ्या दर्जांची संख्या अधिक असते आणि समाजाच्या सामूहिक जीवनाला लागणारी दैनंदिन कार्ये याच प्रकारच्या दर्जांच्या किंवा स्थानांच्या साहाय्याने पार पाडली जातात.

सामाजिक दर्जांचे हे दोन प्रकार प्रत्येक समाजात प्रचलित असतात. तेव्हा दर्जा मिळणे किंवा देणे ( the ascription of status ) आणि दर्जा मिळविणे ( the achievement of status ) या दोन प्रकारच्या पद्धतींचा थोडक्या विस्ताराने विचार करणे आवश्यक आहे.

## ४. *सामाजिक दर्जा देण्याची पद्धत*

सर्व समाजांतून व्यक्तींना दर्जा देण्यासाठी काही प्रमुख गोष्टी मूलभूत समजल्या जातात. मूल जन्मल्याबरोबर कळतील अशाच गोष्टी दर्जा देण्यासाठी निवडल्या जातात. कारण त्यामुळे व्यक्तींना पुढील आयुष्यात मिळणाऱ्या दर्जाचे कार्य चांगल्या रीतीनें पार पाडण्यासाठी लागणारे शिक्षण देण्यास लवकर सुरुवात करणे शक्य होते. अशा गोष्टींपैकी लिंग, वय व आप्तसंबंध या प्रमुख गोष्टी व्यक्तींना सामाजिक दर्जा देण्यासाठी सर्वत्र उपयोगात आणल्या जातात. याखेरीज इतर काही गोष्टीही सामाजिक दर्जा देण्यासाठी आधारभूत मानल्या जातात. अर्थात या सर्व गोष्टी व्यक्तींच्या जन्मावर व शरीरविषयक ( biological ) बाबींवर आधारलेल्या आहेत. अशाच गोष्टी विचारात घेऊन व्यक्तींना आपला सामाजिक दर्जा मिळत असतो. यामध्ये व्यक्तींच्या गुणवैशिष्ट्यांचा विचार केला जात नाही.

### (अ) लिंग

सर्व समाजांतून लिंगभेदानुसार दर्जांची वाटणी करून ते दर्जे लिंगभेदाप्रमाणे व्यक्तींना देण्याची पद्धत अगदी महत्त्वाची समजली जाते. लिंग ही निश्चित स्वरू-

पाची शारीरिक गोष्ट ( physiological fact ) असते. व्यक्तीच्या जन्माच्या वेळीच व्यक्तीचे लिंग कळून येते आणि आयुष्यभर ते तसेच राहते. या गोष्टीचा आधार घेऊनच माणसांची पुरुष व स्त्री या दोन कधीही न बदलणाऱ्या वर्गांमध्ये विभागणी केली गेली आहे. जननक्रियेच्या दृष्टीने पुरुष व स्त्रिया यांच्यामध्ये शारीरिक गुणधर्म व प्रक्रिया या बाबतीत फरक असतात. या कारणांमुळे लिंगभेदाच्या आधारावर व्यक्तींना कायमचे दर्जे देणे अतिशय सुलभ होते. म्हणून प्रत्येक समाजात व्यक्तींना निश्चित स्वरूपाचे दर्जे देण्यासाठी लिंगभेदाचा उपयोग करतात.

स्त्री व पुरुष यांच्या शारीरिक गुणधर्मानुसार व क्षमतेनुसार त्यांनी करावयाच्या व्यवसायांची व कामांची विभागणी केली जाते व त्यानुसार त्यांना आर्थिक क्षेत्रात विविध दर्जे मिळतात. बऱ्याचशा सस्तन प्राण्यांप्रमाणे मनुष्य प्राण्यातील स्त्रीच्या सर्व शरीराची रचना जननक्रियेला पोषक अशीच असते. स्त्रीलाच आपल्या उदरात गर्भ वागवावा लागतो आणि मूल जन्मल्यानंतर त्याचे बराच काल संगोपन व संवर्धन करावे लागते. म्हणून जननक्रिया व तदनुषंगिक कार्ये संभाळून करता येतील अशीच कामे स्त्रियांना देण्याची पद्धत आहे. घराची देखरेख करणे, स्वयंपाक करणे, बागकाम पाहणे, शिवणकाम करणे, भरतकाम करणे, या सारखीच कामे स्त्रियांना देतात. कारण बालसंगोपन व बालसंवर्धन या कार्याशी जुळतील अशीच हीं कामे आहेत. याच्या उलट पुरुषाचे शरीर सामर्थ्यवान असते आणि मोकळेपणाने कोणतेही काम पुरुष करू शकतो. परिस्थितीशी सामना देण्याची ताकद पुरुषामध्ये असते. म्हणून लढाई करणे, शिकार करणे, मासे पकडणे, जनावरे पाळणे यासारखी कामे पुरुषांनाच देतात. स्त्रियांच्या शरीरांना तीं मानवत नाहीत

अशा रीतीने स्त्री व पुरुष यांमध्ये कार्यविभागणी होत असली तरी प्रत्यक्ष व्यवहारात कोणत्याही दोन समाजांत या बाबतीत संपूर्णपणे समान परिस्थिती आढळून येत नाही. समाजाच्या विशिष्ट संस्कृतीचा श्रमविभाजनावर परिणाम झालेला दिसून येतो. काही समाजांत शारीरिक कष्टाची कामे स्त्रिया करतात तर घरकाम, स्वयंपाक व मुलांची देखरेख करणे यासारखी कामे पुरुषांना दिली जातात. काही समाजांत घरे बांधणे, जादूटोणा करणे, शिकार करणे यासारखी कामे स्त्रिया करताना दिसून येतात. परंतु अशा तऱ्हेची उदाहरणे फार थोड्या समाजांत आढळून येतात.

तेव्हा साधारणपणे सर्व समाजांमधून प्रत्येक महत्त्वाचे काम स्त्रियासाठी अगर पुरुषासाठी निश्चित राखून ठेवलेले असते. जेव्हा स्त्रिया व पुरुष यांना एखाद्या

व्यवसायात एकत्र काम करावे लागते तेव्हा देखील त्यांच्या वेगवेगळया कामांची स्पष्टपणे आखणी झालेली असते. उदाहरणार्थ, मादागास्कर देशातील भात पिकविणाऱ्या समाजात स्त्रिया व पुरुष शेतीच्या व्यवसायात मिळून काम करतात. पण शेतीच्या विविध कामांची त्यांच्यामध्ये निश्चित वाटणी झालेली असते. पुरुष जमिनीची मशागत करतात तर स्त्रिया रोपे बदलण्याचे काम करतात. स्त्रिया तोडणी झालेला भात खळयावर नेतात तर पुरुष मळणी करतात. भात सडून शिजविण्याचे काम स्त्रिया करतात. अशा मागासलेल्या समाजाप्रमाणे आधुनिक पुढारलेल्या समाजात स्त्री–पुरुषांच्या विविध कामांची स्पष्टपणे विस्तृत वाटणी झालेली दिसत नाही हे मात्र खरे आहे. पूर्वी पुरुषांची म्हणून समजली गेलेली अनेक कामे अलीकडील काळात स्त्रियांनी करावयास सुरूवात केली आहे. असे असले तरी देखील लिंगभेदानुसार श्रमविभागणीची पद्धत अजून सुद्धा प्रचलित आहे. खाणीमधून जमिनीखाली काम करणे, पोलादाच्या कारखान्यात काम करणे यासारखी कामे करावयास स्त्रियांना अजूनही मज्जाव आहे. डॉक्टरकी, वकिली, ज्ञानदान आदी पेशांत स्त्रिया काम करताना दिसतात पण या पेशांत त्यांच्या शारीरिक अडचणीमुळे त्यांना पुरुषांच्या बरोबरीने कामे करता येत नाहीत. सारांश, लिंगभेदानुसार समाजात दर्जा देण्याची पद्धत नष्ट होईल असे वाटत नाही.

## ( ब ) वय

लिंगभेदाप्रमाणे वयोमानातील फरकांचा दर्जे देण्यासाठी सर्वत्र उपयोग केला जातो. कारण सर्व व्यक्तींना–ती जर जिवंत राहिली तर–वाढ होणे, पूर्णता येणे व उतरती कळा लागणे या वयोमानाच्या तीन अवस्थांमधून जावे लागते. साहजिकच वयोमानानुसार दर्जे ठरविता येतात व प्रत्येक दर्जाचे काम चांगल्या रीतीने पार पाडता यावे म्हणून व्यक्तींना अगदी लहानपणापासून आवश्यक ते शिक्षण देता येते.

लिंगाप्रमाणे वय देखील निश्चित स्वरूपाची सहज ओळखता येणारी शारीरिक गोष्ट आहे. म्हणून व्यक्तींना दर्जा देतांना वयाचा सर्व समाजांतून उपयोग केला जातो. परंतु लिंगाप्रमाणे वय काही स्थिर असत नाही. व्यक्तीचे वय सारखे बदलत असते. त्यामुळे व्यक्तीला आयुष्यभर नुसत्या वयाच्या आधारावर एकच कायमचा दर्जा देता येत नाही. पण वय बदलत असले तरी कोणत्याही दोन व्यक्तींच्या वयांतील अंतर कायम राहात असल्याने त्यांच्या वयांतील अंतराच्या आधारावर त्या व्यक्तींना कायम स्वरूपाचे दर्जे देता येतात. बाप व मुलगा, वडीलभाऊ व लहानभाऊ, समूहांतील प्रवर व अवर सभासद ( senior and junior member ) या विशिष्ट व्यक्तींच्या मधील वयाचे अंतर बदलत नाही. म्हणून त्यांना परस्परांशी वागताना आयुष्यभर तोच दर्जा ठेवता येतो.

लिंग व वय या दर्जा देण्याच्या आधारभूत गोष्टींमध्ये एक महत्त्वाचा फरक आहे. लिंग हे द्विधाकरण ( dichotomy ) आहे तर वय हे सातत्यक (continuum) आहे. लिंगाचे दोनच प्रकार संभवतात म्हणून लिंगभेदानुसार दर्जाची दोन भागांतच विभागणी करता येते. स्त्रियांचा दर्जा व पुरुषांचा दर्जा ठरविला म्हणजे काम भागते. पण वय हे सातत्यक असल्याने वयाची अनेक भागांत विभागणी करता येते व त्यानुसार व्यक्तींना अनेक दर्जे देता येतात. वयाची कितीही भागांत विभागणी करता येणे शक्य असले तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र वयाचे शैशव, बालपण, तारुण्य, वृद्धता अशा सारखे थोडे स्थूल विभागच समाजात मान्य होतात व या विभागणीप्रमाणे व्यक्तींना त्या दर्जांमधून जावे लागते. अर्थात कितीही स्थूलमानाने वयाचे विभाग पाडले तरी ते विभाग परस्परव्यापी (overlapping) असतात आणि वयाचे विभागांतील वर्गीकरण इच्छाधीन (arbitrary) होते. शिवाय सर्व वयोगटांना समान महत्त्व दिले जात नाही. कोणत्या वयोगटाला किती महत्त्व द्यावयाचे हे समाजाच्या संस्कृतीवर अवलंबून असते. जपान व चीन देशांतील प्राचीन समाजात व्यक्तीच्या वयावर बऱ्याच गोष्टी अवलंबून असत आणि वृद्ध लोकांना अतिशय महत्त्व दिले जात असे. पण पाश्चिमात्य देशांतील आधुनिक समाजांतून याच्या अगदी उलट परिस्थिती आढळून येते.

वयोमानानुसार मिळणारा दर्जा अगदी शुद्ध स्वरूपात कोठेही पहावयास मिळत नाही. वयोमानानुसार मिळणाऱ्या दर्जांवर इतर गोष्टींनी मिळणाऱ्या दर्जांची बंधने पडत असतात. साधारणपणे वयोमानाने मिळणारा दर्जा लिंगभेदानुसार मिळणाऱ्या दर्जामुळे हमखास मर्यादित होतो. कोणत्याही समाजात समान वयाच्या स्त्रियांना व पुरुषांना वेगवेगळी वागणूक मिळते. तसेच वयोमानानुसार मिळणारा दर्जा कुलामुळे मिळणाऱ्या दर्जामुळे देखील मर्यादित होतो. चीनी व जपानी लोकांमध्ये वयोमानावर अधारलेला दर्जा व कुटुंबातील परस्परसंबंधांवर आधारलेला दर्जा यांची स्पष्ट सांगड घातलेली दिसून येते. त्या लोकांमध्ये पुत्रधर्माला किंवा पिता–पुत्र यांच्या संबंधाला विशेष महत्त्व दिले जाते. म्हणून सत्तर वर्षांचा वृद्ध देखील आपल्या वडलांना सुख देण्यासाठी काहीही करावयास तयार असतो, अगदी लहान मुलासारखे वागावयास सुद्धा तो कचरत नाही.

सामान्यतः प्रत्येक समाजात स्तनंधयावस्था ( infancy ), बाल्यावस्था ( childhood ), प्रौढावस्था ( adulthood) व वृद्धावस्था ( old age ) या चार वयोगटांना ( age periods ) मान्यता मिळालेली असते. या खेरीज काही समाजांतून जन्माला येणाऱ्या जीवांना आणि मेलेल्या जीवांना देखील मान्यता दिलेली

असते. मेलेल्या पूर्वजांचे आत्मेच परत आपल्या कुटुंबात जन्माला येतात अशी कित्येक आदिवासी व इतर लोकांची समजूत असते. पुनर्जन्मावरती विश्वास असणाऱ्यांना यात काही अशक्य वाटत नाही. जन्माला येणाऱ्या मुलांविषयी विचार केला जातो इतकेच नव्हे तर अशा मुलांचा परस्परांशी वाङ्निश्चय करण्याची पद्धत देखील रूढ आहे.

जन्माला येणाऱ्या जीवांच्या अवस्थेतून जिवंत माणसांच्या अवस्थेत जन्माच्या क्रियेने प्रवेश होतो. म्हणून त्या क्रियेच्या वेळी समारंभ साजरा करण्याच्या व काही निर्बंध पाळण्याच्या प्रथा सर्वत्र प्रचलित आहेत. चीनी, ग्रीक व इतर अनेक लोकांमध्ये नवजात अर्भकाला त्याच्या पित्याने समारंभपूर्वक मान्यता दिल्याखेरीज त्याला समाजाचे सभासदत्व मिळत नाही.

स्तनंधयावस्थेतून बाल्यावस्थेत जाण्याची क्रिया नेहमी सुलभ असते आणि समाजाच्या दृष्टीने या बदलाला सहसा महत्त्व दिले जात नाही.

पण बाल्यावस्थेतून प्रौढावस्थेत होणाऱ्या रूपांतराला मात्र समाजात महत्त्व दिले जाते. कारण या रूपांतरामुळे व्यक्तीच्या शरीरात जलद गतीने बदल होत त व ते बदल स्पष्टपणे ओळखता येतात. तसेच व्यक्तीच्या जीवनात देखील या वेळी बदल होतात. बाल्यावस्थेत जीवन व संस्कृती समजावून घेण्याची असलेली वृत्ती प्रौढावस्थेत बदलते. या अवस्थेत जीवनाच्या विविध क्षेत्रांत प्रत्यक्ष सहभागी होऊन कार्य करण्यास सुरवात होते. म्हणून प्रौढावस्थेत पदार्पण करण्याच्या घटनेला लोकरूढींनी व कायद्यांनी मान्यता दिली जाते आणि अशी मान्यता देण्याची पद्धत सर्व समाजांतून विस्तृत प्रमाणावर रूढ झालेली आहे. काही समाजांतून तर यौवनारंभविधी ( puberty rites ) मोठ्या समारंभपूर्वक साजरे करण्याची प्रथा पडलेली आहे व अशा समारंभानंतर व्यक्तीच्या बदललेल्या दर्जाला समाजाची मान्यता मिळते. प्रौढावस्थेत प्रवेश केल्याबरोबर लगेच लग्न करण्याची पद्धत काही समाजांतून आढळून येते, तर इतर समाजांत लग्न थोडे उशीरा केले तरी चालते. यौवनारंभविधीच्या प्रमाणे लग्नविधी देखील प्रौढावस्थेत पदार्पण केल्याचे निदर्शक समजले जातात व लग्न झालेल्या व्यक्तीला समाजात विशिष्ट स्थान प्राप्त होते.

प्रौढावस्थेनंतर वृद्धावस्थेत होणारे रूपांतर अगदी न कळत होत असते आणि हे रूपांतर होण्याचा काल प्रत्येक व्यक्तीच्या शरीरावर अवलंबून असतो. शिवाय बाल्यावस्थेतून प्रौढावस्थेत प्रवेश करावयास व्यक्ती अगदी उत्सुक असते, पण वृद्धावस्थेत ती नाइलाजाने जात असते. तसेच, बाल्यावस्थेतून प्रौढावस्थेत

येणाऱ्या लोकांचे स्वागत करावयास समाज नेहमी तयार असतो. कारण समाजाच्या स्वास्थ्यरक्षणासाठी व अभिवृद्धीसाठी प्रौढ लोकांचा भरपूर उपयोग होतो. म्हणून बाल्यावस्थेतून प्रौढावस्थेत होणारा प्रवेश जसा समारंभपूर्वक साजरा केला जातो तसा प्रौढावस्थेतून वृद्धावस्थेत होणारा प्रवेश साजरा केला जात नाही. असे असले तरी कित्येक समाजांतून वृद्धावस्था ही एक निश्चित अवस्था समजली जाते व त्या अवस्थेला सामाजिक मान्यता देखील मिळते. उदाहरणार्थ, जपानमध्ये पित्याने आपल्या घरातील सत्ता औपचारिकपणे मुलाच्या हवाली करून स्वेच्छेने निवृत्त होण्याची पद्धत आहे. हिंदू धर्मातील वानप्रस्थाश्रमाची कल्पना अशीच आहे. विशेष म्हणजे वृद्धावस्थेत गेलेल्या लोकांकडे पाहण्याचा सर्व समाजांचा दृष्टिकोण सारखा असत नाही. काही समाजांतून–विशेषत: आदिवासी समाजांतून-वृद्धांना वाईट वागणूक मिळते, कष्टाची कामे सक्तीने करावी लागतात व कित्येकदा त्यांना टाकूनही दिले जाते. याच्या उलट कित्येक समाजांतून वृद्धांना नितांत आदर दाखविला जातो व त्यांना मानाचे स्थान दिले जाते. वृद्धांकडे पाहण्याच्या दृष्टिकोणातील फरक समाजाच्या जीवनपद्धतीवर अवलंबून असतो. लूटमार किंवा युद्धे करून उदरनिर्वाह करणाऱ्या समाजात वृद्ध लोक कुचकामी असतात म्हणून त्यांच्याकडे तिरस्काराने पाहिले जाते व त्यांची अवहेलना होते. पण एका जागी स्थायिक झालेल्या व स्थिर स्वरूपाचे व्यवसाय करणाऱ्या समाजात वृद्धांना सत्ता व प्रतिष्ठा प्राप्त होते आणि मोठ्या जबाबदाऱ्यांच्या जागांवर त्यांची नेमणूक होते. वयाबरोबर माणसांचा अनुभव देखील वाढत जातो आणि संमिश्र संस्कृतीत ( complex culture ) अनुभवाची गरज असते. म्हणून वृद्धांना मान दिला जातो. केवळ ते वयाने मोठे असतात म्हणून त्यांना मान दिला जात नाही.

जिवंत व्यक्तींच्या प्रमाणे मेलेल्या व्यक्तींना देखील समाजात स्थान देण्याची प्रवृत्ती दिसून येते. समाजातील जिवंत व्यक्ती मृत झालेल्या व्यक्तींच्या मधूनच जन्माला आलेल्या असतात आणि सर्व जिवंत व्यक्तींना मृत व्हावेच लागते. म्हणून समाजात मेलेल्या व्यक्तींना स्थान दिले जाते. पाश्चिमात्य देशांतील आधुनिक समाजांत मृत व्यक्तींना समाजाचे सभासद मानत नाहीत पण त्यांची स्मारके करतात व त्यांच्या कर्तृत्वाचे स्मरण करतात. व्यक्ती मृत झाल्या म्हणून त्यांना स्थान मिळत नाही तर व्यक्तीच्या कर्तृत्वाला मान दिला जातो. पण इतर समाजांतून–विशेषत: पूर्वजांची पूजा करणाऱ्या आदिवासी लोकांच्या समाजांतून – मृत व्यक्तींना जिवंत व्यक्तींच्या सारखे स्थान दिले जाते. जेव्हा व्यक्ती मरते तेव्हा ती समाज सोडून जाते असे मानले जात नाही तर ती बाल्यावस्थेतून प्रौढावस्थेत जाण्याप्रमाणे एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत गेली असे मानले जाते. अशा मृत व्यक्तींचा विभाग

समाजाचा एक अविभाज्य भाग समजला जातो, मृत व्यक्तींना समाजातील महत्त्वाच्या घटनांची माहिती वारंवार दिली जाते व त्यांना समाजाच्या सर्व समारंभांना बोलाविले जाते. मृत व्यक्ती देखील समाजाच्या विविध घटनांमध्ये विशेष लक्ष घालतात व समाजाच्या आचार–विचारांचे रक्षण करण्यास मदत करतात असे मानले जाते. सारांश, मृत व्यक्ती अदृश्यपणे सर्वत्र उपस्थित असतात व समाजाच्या घडामोडींवर बारकाइने सतत लक्ष ठेवतात म्हणून त्यांना समाजात विशिष्ट स्थान दिले जाते.

## (क) आप्तसंबंध

लिंग व वय या शारीरिक गोष्टींच्या आधारे व्यक्तींना जसे विशिष्ट दर्जे समाजात मिळतात त्याप्रमाणे आप्तसंबंधांवर (kinship) किंवा शारीरिक संबंधांवर ( biological relationships ) आधारलेले दर्जे मिळण्याची पद्धत सर्व समाजांतून दिसून येते. माता-पिता, भावंडे व इतर नातेवाईक हे व्यक्तीचे आप्तसंबंध गणले जातात. केवळ जन्मामुळे व्यक्तीचे आपल्या आई–वडीलाशी संबंध प्रस्थापित होतात आणि या संबंधांमुळे भावंडे व आई-वडीलांचे नातेवाईक यांच्याशी संबंध निर्माण होतात. अशा प्रकारच्या संबंधांना आप्तसंबंध असे म्हणतात. तेव्हा व्यक्तीला समाजात स्थान किंवा दर्जा देताना तो व्यक्तीच्या आप्तसंबंधांच्या आधारे दिला जातो. आप्तांपैकी कुटुंबाचा किंवा आई-वडिलांचा दर्जा मुलाला देण्याची प्रथा सर्व समाजांत पूर्वीपासून रूढ आहे.

आई–वडिलांचा दर्जा मुलाला आपोआप मिळण्याची ही पद्धत समाजाच्या दृष्टीने अगदी उपयुक्त वाटते. कुटुंब ही सामाजिक संस्था जगात सर्वत्र हमखास आढळून येते. कुटुंबात मुलाचा आई–वडिलांशी अतिशय निकटचा संबंध येतो. आई–वडिलांमुळेच मुलाच्या समाजीकरणास ( socialization ) सुरुवात होते. आई–वडिलांच्यावरच मुलाची सगळी जबाबदारी पडलेली असते. तेव्हा मुलाचा आई–वडिलांशी असा घनिष्ठ व महत्त्वाचा संबंध सुरवातीपासूनच असतो म्हणून मुलाचा दर्जा इतर नातेवाइकांशी संबंधित न ठेवता फक्त आई–वडिलांवरच अवलंबून ठेवतात. त्यामुळे आई–वडिलांचे विविध क्षेत्रांतील दर्जे आपाततः मुलाला मिळतात. आई–वडील ज्या देशाचे नागरिक असतात ते नागरिकत्व मुलाला मिळते. आई–वडिलांचा धर्म हाच मुलाचा धर्म समजला जातो. आई–वडील ज्या समाजाचे सभासद असतात त्या समाजाचे सभासदत्व मुलाला मिळते. आई–वडील ज्या जातीत ( caste ) किंवा वर्गात ( class ) मोडतात तीच जात मुलाची होते व त्याच वर्गात मुलाला सामावून घेतात. आई–वडील ज्या वंशाचे ( race )

येणाऱ्या लोकांचे स्वागत करावयास समाज नेहमी तयार असतो. कारण समाजाच्या स्वास्थ्यरक्षणासाठी व अभिवृद्धीसाठी प्रौढ लोकांचा भरपूर उपयोग होतो. म्हणून बाल्यावस्थेतून प्रौढावस्थेत होणारा प्रवेश जसा समारंभपूर्वक साजरा केला जातो तसा प्रौढावस्थेतून वृद्धावस्थेत होणारा प्रवेश साजरा केला जात नाही. असे असले तरी कित्येक समाजांतून वृद्धावस्था ही एक निश्चित अवस्था समजली जाते व त्या अवस्थेला सामाजिक मान्यता देखील मिळते. उदाहरणार्थ, जपानमध्ये पित्याने आपल्या घरातील सत्ता औपचारिकपणे मुलाच्या हवाली करून स्वेच्छेने निवृत्त होण्याची पद्धत आहे. हिंदू धर्मातील वानप्रस्थाश्रमाची कल्पना अशीच आहे. विशेष म्हणजे वृद्धावस्थेत गेलेल्या लोकांकडे पाहण्याचा सर्व समाजांचा दृष्टिकोण सारखा असत नाही. काही समाजांतून–विशेषतः आदिवासी समाजांतून-वृद्धांना वाईट वागणूक मिळते, कष्टाची कामे सक्तीने करावी लागतात व कित्येकदा त्यांना टाकूनही दिले जाते. याच्या उलट कित्येक समाजांतून वृद्धांना नितांत आदर दाखविला जातो व त्यांना मानाचे स्थान दिले जाते. वृद्धांकडे पाहण्याच्या दृष्टिकोणातील फरक समाजाच्या जीवनपद्धतीवर अवलंबून असतो. लूटमार किंवा युद्धे करून उदरनिर्वाह करणाऱ्या समाजात वृद्ध लोक कुचकामी असतात म्हणून त्यांच्याकडे तिरस्काराने पाहिले जाते व त्यांची अवहेलना होते. पण एका जागी स्थायिक झालेल्या व स्थिर स्वरूपाचे व्यवसाय करणाऱ्या समाजात वृद्धांना सत्ता व प्रतिष्ठा प्राप्त होते आणि मोठ्या जबाबदाऱ्यांच्या जागांवर त्यांची नेमणूक होते. वयाबरोबर माणसांचा अनुभव देखील वाढत जातो आणि संमिश्र संस्कृतीत ( complex culture ) अनुभवाची गरज असते. म्हणून वृद्धांना मान दिला जातो. केवळ ते वयाने मोठे असतात म्हणून त्यांना मान दिला जात नाही.

जिवंत व्यक्तींच्या प्रमाणे मेलेल्या व्यक्तींना देखील समाजात स्थान देण्याची प्रवृत्ती दिसून येते. समाजातील जिवंत व्यक्ती मृत झालेल्या व्यक्तींच्या मधूनच जन्माला आलेल्या असतात आणि सर्व जिवंत व्यक्तींना मृत व्हावेच लागते. म्हणून समाजात मेलेल्या व्यक्तींना स्थान दिले जाते. पाश्चिमात्य देशांतील आधुनिक समाजांत मृत व्यक्तींना समाजाचे सभासद मानत नाहीत पण त्यांची स्मारके करतात व त्यांच्या कर्तृत्वाचे स्मरण करतात. व्यक्ती मृत झाल्या म्हणून त्यांना स्थान मिळत नाही तर व्यक्तीच्या कर्तृत्वाला मान दिला जातो. पण इतर समाजांतून–विशेषतः पूर्वजांची पूजा करणाऱ्या आदिवासी लोकांच्या समाजांतून – मृत व्यक्तींना जिवंत व्यक्तींच्या सारखे स्थान दिले जाते. जेव्हा व्यक्ती मरते तेव्हा ती समाज सोडून जाते असे मानले जात नाही तर ती बाल्यावस्थेतून प्रौढावस्थेत जाण्याप्रमाणे एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत गेली असे मानले जाते. अशा मृत व्यक्तींचा विभाग

समाजाचा एक अविभाज्य भाग समजला जातो, मृत व्यक्तींना समाजातील महत्त्वाच्या घटनांची माहिती वारंवार दिली जाते व त्यांना समाजाच्या सर्व समारंभांना बोलाविले जाते. मृत व्यक्ती देखील समाजाच्या विविध घटनांमध्ये विशेष लक्ष घालतात व समाजाच्या आचार–विचारांचे रक्षण करण्यास मदत करतात असे मानले जाते. सारांश, मृत व्यक्ती अदृश्यपणे सर्वत्र उपस्थित असतात व समाजाच्या घडामोडींवर बारकाइने सतत लक्ष ठेवतात म्हणून त्यांना समाजात विशिष्ट स्थान दिले जाते.

### (क) आप्तसंबंध

लिंग व वय या शारीरिक गोष्टींच्या आधारे व्यक्तींना जसे विशिष्ट दर्जे समाजात मिळतात त्याप्रमाणें आप्तसंबंधांवर (kinship) किंवा शारीरिक संबंधांवर ( biological relationships ) आधारलेले दर्जे मिळण्याची पद्धत सर्व समाजांतून दिसून येते. माता-पिता, भावंडे व इतर नातेवाईक हे व्यक्तीचे आप्तसंबंध गणले जातात. केवळ जन्मामुळे व्यक्तीचे आपल्या आई–वडीलाशी संबंध प्रस्थापित होतात आणि या संबंधांमुळे भावंडे व आई-वडीलांचे नातेवाईक यांच्याशी संबंध निर्माण होतात. अशा प्रकारच्या संबंधांना आप्तसंबंध असे म्हणतात. तेव्हा व्यक्तीला समाजात स्थान किंवा दर्जा देताना तो व्यक्तीच्या आप्तसंबंधांच्या आधारे दिला जातो. आप्तांपैकी कुटुंबाचा किंवा आई-वडिलांचा दर्जा मुलाला देण्याची प्रथा सर्व समाजांत पूर्वीपासून रूढ आहे.

आई–वडिलांचा दर्जा मुलाला आपोआप मिळण्याची ही पद्धत समाजाच्या दृष्टीने अगदी उपयुक्त वाटते. कुटुंब ही सामाजिक संस्था जगात सर्वत्र हमखास आढळून येते. कुटुंबात मुलाचा आई–वडिलांशी अतिशय निकटचा संबंध येतो. आई–वडिलांमुळेच मुलाच्या समाजीकरणास ( socialization ) सुरुवात होते. आई–वडिलांच्यावरच मुलाची सगळी जबाबदारी पडलेली असते. तेव्हा मुलाचा आई–वडिलांशी असा घनिष्ठ व महत्त्वाचा संबंध सुरवातीपासूनच असतो म्हणून मुलाचा दर्जा इतर नातेवाइकांशी संबंधित न ठेवता फक्त आई–वडिलांवरच अवलंबून ठेवतात. त्यामुळे आई–वडिलांचे विविध क्षेत्रांतील दर्जे आपातत: मुलाला मिळतात. आई–वडील ज्या देशाचे नागरिक असतात ते नागरिकत्व मुलाला मिळते. आई–वडिलांचा धर्म हाच मुलाचा धर्म समजला जातो. आई–वडील ज्या समाजाचे सभासद असतात त्या समाजाचे सभासदत्व मुलाला मिळते. आई–वडील ज्या जातीत ( caste ) किंवा वर्गात ( class ) मोडतात तीच जात मुलाची होते व त्याच वर्गात मुलाला सामावून घेतात. आई–वडील ज्या वंशाचे ( race )

येणाऱ्या लोकांचे स्वागत करावयास समाज नेहमी तयार असतो. कारण समाजाच्या स्वास्थ्यरक्षणासाठी व अभिवृद्धीसाठी प्रौढ लोकांचा भरपूर उपयोग होतो. म्हणून बाल्यावस्थेतून प्रौढावस्थेत होणारा प्रवेश जसा समारंभपूर्वक साजरा केला जातो तसा प्रौढावस्थेतून वृद्धावस्थेत होणारा प्रवेश साजरा केला जात नाही. असे असले तरी कित्येक समाजांतून वृद्धावस्था ही एक निश्चित अवस्था समजली जाते व त्या अवस्थेला सामाजिक मान्यता देखील मिळते. उदाहरणार्थ, जपानमध्ये पित्याने आपल्या घरातील सत्ता औपचारिकपणे मुलाच्या हवाली करून स्वेच्छेने निवृत्त होण्याची पद्धत आहे. हिंदू धर्मातील वानप्रस्थाश्रमाची कल्पना अशीच आहे. विशेष म्हणजे वृद्धावस्थेत गेलेल्या लोकांकडे पाहण्याचा सर्व समाजांचा दृष्टिकोण सारखा असत नाही. काही समाजांतून–विशेषतः आदिवासी समाजांतून-वृद्धांना वाईट वागणूक मिळते, कष्टाची कामे सक्तीने करावी लागतात व कित्येकदा त्यांना टाकूनही दिले जाते. याच्या उलट कित्येक समाजांतून वृद्धांना नितांत आदर दाखविला जातो व त्यांना मानाचे स्थान दिले जाते. वृद्धांकडे पाहण्याच्या दृष्टिकोणातील फरक समाजाच्या जीवनपद्धतीवर अवलंबून असतो. लूटमार किंवा युद्धे करून उदरनिर्वाह करणाऱ्या समाजात वृद्ध लोक कुचकामी असतात म्हणून त्यांच्याकडे तिरस्काराने पाहिले जाते व त्यांची अवहेलना होते. पण एका जागी स्थायिक झालेल्या व स्थिर स्वरूपाचे व्यवसाय करणाऱ्या समाजात वृद्धांना सत्ता व प्रतिष्ठा प्राप्त होते आणि मोठ्या जबाबदाऱ्याच्या जागांवर त्यांची नेमणूक होते. वयाबरोबर माणसांचा अनुभव देखील वाढत जातो आणि संमिश्र संस्कृतीत ( complex culture ) अनुभवाची गरज असते. म्हणून वृद्धांना मान दिला जातो. केवळ ते वयाने मोठे असतात म्हणून त्यांना मान दिला जात नाही.

जिवंत व्यक्तींच्या प्रमाणे मेलेल्या व्यक्तींना देखील समाजात स्थान देण्याची प्रवृत्ती दिसून येते. समाजातील जिवंत व्यक्ती मृत झालेल्या व्यक्तींच्या मधूनच जन्माला आलेल्या असतात आणि सर्व जिवंत व्यक्तींना मृत व्हावेच लागते. म्हणून समाजात मेलेल्या व्यक्तींना स्थान दिले जाते. पाश्चिमात्य देशांतील आधुनिक समाजांत मृत व्यक्तींना समाजाचे सभासद मानत नाहीत पण त्यांची स्मारके करतात व त्यांच्या कर्तृत्वाचे स्मरण करतात. व्यक्ती मृत झाल्या म्हणून त्यांना स्थान मिळत नाही तर व्यक्तीच्या कर्तृत्वाला मान दिला जातो. पण इतर समाजांतून–विशेषतः पूर्वजांची पूजा करणाऱ्या आदिवासी लोकांच्या समाजांतून – मृत व्यक्तींना जिवंत व्यक्तींच्या सारखे स्थान दिले जाते. जेव्हा व्यक्ती मरते तेव्हा ती समाज सोडून जाते असे मानले जात नाही तर ती बाल्यावस्थेतून प्रौढावस्थेत जाण्याप्रमाणे एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत गेली असे मानले जाते. अशा मृत व्यक्तींचा विभाग

समाजाचा एक अविभाज्य भाग समजला जातो, मृत व्यक्तींना समाजातील महत्त्वाच्या घटनांची माहिती वारंवार दिली जाते व त्यांना समाजाच्या सर्व समारंभांना बोलाविले जाते. मृत व्यक्ती देखील समाजाच्या विविध घटनांमध्ये विशेष लक्ष घालतात व समाजाच्या आचार-विचारांचे रक्षण करण्यास मदत करतात असे मानले जाते. सारांश, मृत व्यक्ती अदृश्यपणे सर्वत्र उपस्थित असतात व समाजाच्या घडामोडींवर बारकाइने सतत लक्ष ठेवतात म्हणून त्यांना समाजात विशिष्ट स्थान दिले जाते.

## (क) आप्तसंबंध

लिंग व वय या शारीरिक गोष्टींच्या आधारे व्यक्तींना जसे विशिष्ट दर्जे समाजात मिळतात त्याप्रमाणे आप्तसंबंधांवर (kinship) किंवा शारीरिक संबंधांवर (biological relationships) आधारलेले दर्जे मिळण्याची पद्धत सर्व समाजांतून दिसून येते. माता-पिता, भावंडे व इतर नातेवाईक हे व्यक्तीचे आप्तसंबंध गणले जातात. केवळ जन्मामुळे व्यक्तीचे आपल्या आई-वडीलाशी संबंध प्रस्थापित होतात आणि या संबंधांमुळे भावंडे व आई-वडीलांचे नातेवाईक यांच्याशी संबंध निर्माण होतात. अशा प्रकारच्या संबंधांना आप्तसंबंध असे म्हणतात. तेव्हा व्यक्तीला समाजात स्थान किंवा दर्जा देताना तो व्यक्तीच्या आप्तसंबंधांच्या आधारे दिला जातो. आप्तांपैकी कुटुंबाचा किंवा आई-वडिलांचा दर्जा मुलाला देण्याची प्रथा सर्व समाजांत पूर्वीपासून रूढ आहे.

आई-वडिलांचा दर्जा मुलाला आपोआप मिळण्याची ही पद्धत समाजाच्या दृष्टीने अगदी उपयुक्त वाटते. कुटुंब ही सामाजिक संस्था जगात सर्वत्र हमखास आढळून येते. कुटुंबात मुलाचा आई-वडिलांशी अतिशय निकटचा संबंध येतो. आई-वडिलांमुळेच मुलाच्या समाजीकरणास (socialization) सुरुवात होते. आई-वडिलांच्यावरच मुलाची सगळी जबाबदारी पडलेली असते. तेव्हा मुलाचा आई-वडिलांशी असा घनिष्ठ व महत्त्वाचा संबंध सुरवातीपासूनच असतो म्हणून मुलाचा दर्जा इतर नातेवाइकांशी संबंधित न ठेवता फक्त आई-वडिलांवरच अवलंबून ठेवतात. त्यामुळे आई-वडिलांचे विविध क्षेत्रांतील दर्जे आपाततः मुलाला मिळतात. आई-वडील ज्या देशाचे नागरिक असतात ते नागरिकत्व मुलाला मिळते. आई-वडिलांचा धर्म हाच मुलाचा धर्म समजला जातो. आई-वडील ज्या समाजाचे सभासद असतात त्या समाजाचे सभासदत्व मुलाला मिळते. आई-वडील ज्या जातीत (caste) किंवा वर्गात (class) मोडतात तीच जात मुलाची होते व त्याच वर्गात मुलाला सामावून घेतात. आई-वडील ज्या वंशाचे (race)

असतात त्या वंशाची शारीरिक वैशिष्टये मुलात जन्मापासून असल्याने मुलाची आई–वडिलांच्या वांशिक समूहातच ( racial group ) गणना केली जाते. आई–वडिलांपासून मिळणाऱ्या अशा दर्जांमध्ये बदल करून घेण्याची सवलत नसलेल्या समाजात आई–वडिलांच्या समाजातील दर्जामुळे होणारे फायदे व तोटे जन्मभर मुलाच्या वाटयास येतात.

आप्तसंबंधांवर आधारलेला दर्जा व्यक्तीला मिळाला म्हणजे त्या व्यक्तीला त्याबरोबर काही हक्क प्राप्त होतात व काही कर्तव्येही पार पाडावी लागतात. व्यक्तीला कुटुंबात मुलगा अगर मुलगी म्हणून स्थान मिळते. आई-वडिलांकडून रक्षण, शिक्षण आदी गोष्टी मिळण्याचे हक्क जसे मुलाला मिळतात तसे आई-वडि–लांसाठी काही गोष्टीही त्याला कराव्या लागतात. कुटुंबाचे संबंध आईवडिलांपुरतेच मर्यादित असत नाहीत. मुलाच्या आईवडिलांचे नातेवाईक हे मुलाचेही नातेवाईक होतात. मुलाला काका, काकी, मामा, मामी, आत्या, चुलत भावंडे, आते भावंडे, मामे भावंडे, आजा, आजी, भाचा, भाची, पुतण्या, पुतणी असे अनेक नातेवाईक असू शकतात आणि या विविध नातेवाइकांशी वागताना मुलाने कोणत्या हक्कांची अपेक्षा करावयाची व मुलाने कोणती कर्तव्ये पार पाडावयाची याविषयी समाजाने दण्डक घालून दिलेले असतात. अर्थात या दण्डकांचे स्वरूप सर्व समाजांत सारखे असत नाही. काही समाजांत अगदी जवळच्याच नातेवाइकांना महत्त्व दिले जाते तर काही समाजांत मामा, आत्या यासारख्या विशिष्ट नातेवाइकांनाच महत्त्व दिले जाते. काही समाजांत आईकडील नातेवाइकांशी संबंध जास्त येतात तर काही समाजांत वडिलांकडील नातेवाइकांशी संबंध जास्ती येतात. आप्तसंबंधांवर आधा–रलेल्या विविध दर्जांशी संबंधित असलेल्या हक्कांचे व कर्तव्यांचे स्वरूप व मर्यादा यांमध्ये जरी समाजानुसार फरक असले तरी प्रत्येक दर्जाशी काही हक्क व कर्तव्ये निगडित असतात ही गोष्ट जगातील सर्व समाजांत आढळून येते.

## ७. सामाजिक दर्जा मिळविण्याची पध्दत

कोणत्याही समाजव्यवस्थेत व्यक्तींच्या जन्मापासून त्यांना काही दर्जे मिळालेले असतात व हे दर्जे देतांना व्यक्तींच्या अंगभूत गुणांचा विचार केला जात नाही. पण समाजव्यवस्थेत असे आपोआप मिळणारे दर्जेच फक्त असत नाहीत. त्याबरोबरच व्यक्तींना आपल्या विशेष कर्तृत्वावर समाजव्यवस्थेत अनेक दर्जे मिळविता येतात. अशा संपादित करता येणाऱ्या दर्जांच्या बाबतींत बरेच प्रश्न उदभवतात. कोणत्या समाजव्यवस्थेत व्यक्तींना विशेष कर्तृत्व दाखविण्यास किती

प्रमाणात वाव असतो ? कर्तृत्वाला समाजाची मान्यता मिळण्याची कोणती पद्धत असते ? कोणत्या गोष्टीत विशेष प्राविण्य दाखविले म्हणजे व्यक्तींना असे दर्जे मिळविता येतात ? व्यक्तींनी स्वतःचे विशेष कर्तृत्व प्रगट करून दाखविल्यानंतर त्यांना काही अडचणी न येता व्यवस्थितपणे असे दर्जे संपादित करता येतात का ?

कोणत्याही समाजव्यवस्थेत अशीं अनेक स्थाने किंवा दर्जे असतात की त्यांच्याशी निगडित असलेली कर्तव्ये यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या खास गुणांची नितांत आवश्यकता असते. अशा गुणांचा प्रभाव व्यक्तींच्या लहानपणी दिसून येत नाही. म्हणून व्यक्तींना असे दर्जे प्रौढ वयातच मिळवावे लागतात. तसेच अशा गुणांची असलेली देणगी व्यक्तींना प्रस्थापित करून दाखवावी लागत असल्याने इतरांशी स्पर्धा करूनच व्यक्तींना असे दर्जे संपादित करावे लागतात. अशा रीतीने दर्जे मिळविण्याच्या पद्धतीला प्रोत्साहान देणे समाजव्यवस्थेला आवश्यक असते. नाहीतर असामान्य गुण असलेले लोक अयोग्य मार्गांनी महत्त्वाचे दर्जे मिळविण्याचे प्रयत्न करतात व स्वतःच्या किंवा आपल्या जवळच्या लोकांच्या हातांत अधिकार राहातील अशी खटपट करतात. समाजव्यवस्थेला या गोष्टी घातक असतात.

समाजव्यवस्थेत दर्जे मिळविता येण्याच्या बाबतीत किती वाव असतो हे समाजाच्या परिस्थितीवर अवलंबून असते. आदिवासी समाजांत अगदी मर्यादित प्रमाणात असा वाव असतो. अदिवासी लोकांमध्ये युद्धकलेला आणि शिकार करणे, लूटमार करणे, खोल समुद्रात मासेमारी करणे यासारख्या धोक्याच्या व्यवसायांना जास्ती महत्त्व दिले जाते. म्हणून या क्षेत्रांतच वर्चस्व प्रस्थापित करणाऱ्यांना दर्जे मिळविता येतात व अशी क्षेत्र थोडी असतात. याच्या उलट आधुनिक सुधारलेल्या समाजांत बऱ्याच क्षेत्रांत कर्तृत्व प्रस्थापित करून दाखविण्यास व्यक्तींना संधी असते. आधुनिक समाजात आर्थिक क्षेत्र कितीतरी विस्तृत झाले आहे आणि या क्षेत्रात कोणतेही काम करण्यास कोणासही हल्ली परवानगी असते. म्हणून आर्थिक क्षेत्रात स्वतःच्या कर्तृत्वावर उच्च प्रतीची अनेक स्थाने संपादित करण्याची संधी व्यक्तींना मिळते. तसेच श्रमविभाजनाचे तत्त्व मोठ्या प्रमाणावर विविध क्षेत्रांत हल्ली वापरण्यात येत असल्याने व्यक्तींना आपल्या विशिष्ट गुणांचे श्रेष्ठत्त्व व उपयुक्तता दाखवून दर्जे मिळविणे शक्य होते. शिवाय आधुनिक काळात नागरीकरणाची वाढ झाल्याने व शहरात विविध व्यवसायांची व उपक्रमांची गर्दी झाल्याने शहरातून व्यक्तींना आपल्या विशेष गुणांना अनुरूप अशी विविध स्थाने किंवा दर्जे मिळणे सुलभ होते. विशेष म्हणजे आधुनिक काळात सामाजिक परिवर्तन ( social change ) अतिशय द्रुत गतीने होत असल्याने नवीन स्थाने किंवा दर्जे सतत

असतात त्या वंशाची शारीरिक वैशिष्टये मुलात जन्मापासून असल्याने मुलाची आई–वडिलांच्या वांशिक समूहातच ( racial group ) गणना केली जाते. आई–वडिलांपासून मिळणाऱ्या अशा दर्जामध्ये बदल करून घेण्याची सवलत नसलेल्या समाजात आई–वडिलांच्या समाजातील दर्जामुळे होणारे फायदे व तोटे जन्मभर मुलाच्या वाट्यास येतात.

आप्तसंबंधांवर आधारलेला दर्जा व्यक्तीला मिळाला म्हणजे त्या व्यक्तीला त्याबरोबर काही हक्क प्राप्त होतात व काही कर्तव्येही पार पाडावी लागतात. व्यक्तीला कुटुंबात मुलगा अगर मुलगी म्हणून स्थान मिळते. आई-वडिलांकडून रक्षण, शिक्षण आदी गोष्टी मिळण्याचे हक्क जसे मुलाला मिळतात तसे आई-वडि–लांसाठी काही गोष्टीही त्याला कराव्या लागतात. कुटुंबाचे संबंध आईवडिलांपुरतेच मर्यादित असत नाहीत. मुलाच्या आईवडिलांचे नातेवाईक हे मुलाचेही नातेवाईक होतात. मुलाला काका, काकी, मामा, मामी, आत्या, चुलत भावंडे, आते भावंडे, मामे भावंडे, आजा, आजी, भाचा, भाची, पुतण्या, पुतणी असे अनेक नातेवाईक असू शकतात आणि या विविध नातेवाइकांशी वागताना मुलाने कोणत्या हक्कांची अपेक्षा करावयाची व मुलाने कोणती कर्तव्ये पार पाडावयाची याविषयी समाजाने दण्डक घालून दिलेले असतात. अर्थात या दण्डकांचे स्वरूप सर्व समाजांत सारखे असत नाही. काही समाजांत अगदी जवळच्याच नातेवाइकांना महत्त्व दिले जाते तर काही समाजांत मामा, आत्या यासारख्या विशिष्ट नातेवाइकांनाच महत्त्व दिले जाते. काही समाजांत आईकडील नातेवाइकांशी संबंध जास्त येतात तर काही समाजांत वडिलांकडील नातेवाइकांशी संबंध जास्ती येतात. आप्तसंबंधांवर आधा–रलेल्या विविध दर्जांशी संबंधित असलेल्या हक्कांचे व कर्तव्यांचे स्वरूप व मर्यादा यांमध्ये जरी समाजानुसार फरक असले तरी प्रत्येक दर्जाशी काही हक्क व कर्तव्ये निगडित असतात ही गोष्ट जगातील सर्व समाजांत आढळून येते.

## *५. सामाजिक दर्जा मिळविण्याची पध्दत*

कोणत्याही समाजव्यवस्थेत व्यक्तींच्या जन्मापासून त्यांना काही दर्जे मिळालेले असतात व हे दर्जे देतांना व्यक्तींच्या अंगभूत गुणांचा विचार केला जात नाही. पण समाजव्यवस्थेत असे आपोआप मिळणारे दर्जेच फक्त असत नाहीत. त्याबरोबरच व्यक्तींना आपल्या विशेष कर्तृत्वावर समाजव्यवस्थेत अनेक दर्जे मिळविता येतात. अशा संपादित करता येणाऱ्या दर्जांच्या बाबतीत बरेच प्रश्न उदभवतात. कोणत्या समाजव्यवस्थेत व्यक्तींना विशेष कर्तृत्व दाखविण्यास किती

प्रमाणात वाव असतो ? कर्तृत्वाला समाजाची मान्यता मिळण्याची कोणती पद्धत असते ? कोणत्या गोष्टीत विशेष प्राविण्य दाखविले म्हणजे व्यक्तींना असे दर्जे मिळविता येतात ? व्यक्तींनी स्वतःचे विशेष कर्तृत्व प्रगट करून दाखविल्यानंतर त्यांना काही अडचणी न येता व्यवस्थितपणे असे दर्जे संपादित करता येतात का ?

कोणत्याही समाजव्यवस्थेत अशीं अनेक स्थाने किंवा दर्जे असतात की त्यांच्याशी निगडित असलेली कर्तव्ये यशस्वीपणे पार पाडण्यासाठी विशिष्ट प्रकारच्या खास गुणांची नितांत आवश्यकता असते. अशा गुणांचा प्रभाव व्यक्तींच्या लहानपणी दिसून येत नाही. म्हणून व्यक्तींना असे दर्जे प्रौढ वयातच मिळवावे लागतात. तसेच अशा गुणांची असलेली देणगी व्यक्तींना प्रस्थापित करून दाखवावी लागत असल्याने इतरांशी स्पर्धा करूनच व्यक्तींना असे दर्जे संपादित करावे लागतात. अशा रीतीने दर्जे मिळविण्याच्या पद्धतीला प्रोत्साहान देणे समाजव्यवस्थेला आवश्यक असते. नाहीतर असामान्य गुण असलेले लोक अयोग्य मार्गांनी महत्त्वाचे दर्जे मिळविण्याचे प्रयत्न करतात व स्वतःच्या किंवा आपल्या जवळच्या लोकांच्या हातांत अधिकार राहातील अशी खटपट करतात. समाजव्यवस्थेला या गोष्टी घातक असतात.

समाजव्यवस्थेत दर्जे मिळविता येण्याच्या बाबतीत किती वाव असतो हे समाजाच्या परिस्थितीवर अवलंबून असते. आदिवासी समाजांत अगदी मर्यादित प्रमाणात असा वाव असतो. अदिवासी लोकांमध्ये युद्धकलेला आणि शिकार करणे, लूटमार करणे, खोल समुद्रात मासेमारी करणे यासारख्या धोक्याच्या व्यवसायांना जास्ती महत्त्व दिले जाते. म्हणून या क्षेत्रांतच वर्चस्व प्रस्थापित करणाऱ्यांना दर्जे मिळविता येतात व अशी क्षेत्र थोडी असतात. याच्या उलट आधुनिक सुधारलेल्या समाजांत बऱ्याच क्षेत्रांत कर्तृत्व प्रस्थापित करून दाखविण्यास व्यक्तींना संधी असते. आधुनिक समाजात आर्थिक क्षेत्र कितीतरी विस्तृत झाले आहे आणि या क्षेत्रात कोणतेही काम करण्यास कोणासही हल्ली परवानगी असते. म्हणून आर्थिक क्षेत्रात स्वतःच्या कर्तृत्वावर उच्च प्रतीची अनेक स्थाने संपादित करण्याची संधी व्यक्तींना मिळते. तसेच श्रमविभाजनाचे तत्त्व मोठ्या प्रमाणावर विविध क्षेत्रांत हल्ली वापरण्यात येत असल्याने व्यक्तींना आपल्या विशिष्ट गुणांचे श्रेष्ठत्व व उपयुक्तता दाखवून दर्जे मिळविणे शक्य होते. शिवाय आधुनिक काळात नागरीकरणाची वाढ झाल्याने व शहरात विविध व्यवसायांची व उपक्रमांची गर्दी झाल्याने शहरातून व्यक्तींना आपल्या विशेष गुणांना अनुरूप अशी विविध स्थाने किंवा दर्जे मिळणे सुलभ होते. विशेष म्हणजे आधुनिक काळात सामाजिक परिवर्तन ( social change ) अतिशय द्रुत गतीने होत असल्याने नवीन स्थाने किंवा दर्जे सतत

निर्माण होत असतात. अशी वेळोवेळी निर्माण होणारी स्थाने अगदी नवीन स्वरूपाची असतात म्हणून समाजातील व्यक्तींना तीं स्थाने जन्मापासून आपोआप देण्याची व्यवस्था करता येत नाही. साहजिकच असे नवीन दर्जे व्यक्तींना स्वतःच्या कर्तृत्वावर मिळविण्यास खुले ठेवावे लागतात. या सर्व कारणांनी आधुनिक सुधारलेल्या समाजांत सर्व गुणी व्यक्तींना अनेक दर्जे मिळविण्यासाठी भरपूर वाव असतो.

समाजव्यवस्थेत संपादित करता येण्यासारखे दर्जे मिळविण्यासाठी विशिष्ट गुणांची आवश्यकता असते. अशा गुणांमध्ये बुद्धिमत्तेला वरचे स्थान दिले जाते. विविध क्षेत्रांत प्राविण्य मिळविण्यासाठी असामान्य बुद्धिमत्तेची जरूरी असते आणि केवळ शिक्षणाने अशी बुद्धिमत्ता येत नसते. तेव्हा प्रखर बुद्धिवैभव असणाऱ्या व्यक्तींना बरीच वरची स्थाने मिळू शकतात. तसेच ज्या गोष्टींना लोकमान्यता असते अशा गोष्टींमध्ये नैपुण्य असावे लागते. साहित्य, संगीत, नृत्य, नाटच, क्रीडा आदी क्षेत्रांना विशेष लोकमान्यता मिळालेली आहे. म्हणून या क्षेत्रांतील वरची स्थाने निपुणता प्रस्थापित करणाऱ्यांना मिळतात. शिवाय कित्येक स्थाने मिळविण्यासाठी बरेच शिक्षण संपादन केलेले असावे लागते. विशेषतः डॉक्टर, इंजिनियर यासारख्यांच्या व्यवसायासाठी दीर्घ व महागड्या शिक्षणाची आवश्यकता असते आणि असे विशिष्ट शिक्षण कुटुंबांतून किंवा लहान संस्थांतून देता येत नाही. साहजिकच अशा तऱ्हेने शिक्षण घेतलेल्या व्यक्तींना वरची स्थाने मिळविता येतात.

## ६. समाज आणि सामाजिक दर्जांचे प्रकार

समाजात काही दर्जे व्यक्तीला आपोआप मिळतात तर काही दर्जे व्यक्तीला मिळवावे लागतात. सामाजिक दर्जांचे हे दोन प्रकार प्रत्येक समाजात आढळून येतात. तसेच तात्त्विक दृष्ट्या जरी हे दोन प्रकारचे दर्जे एकमेकांपासून अगदी भिन्न असले तरी त्यांच्या समाजातील कार्यांच्या दृष्टीनें ते एकमेकांना पूरक ठरतात. म्हणून या दोन्ही प्रकारचे दर्जे समाजाला आवश्यक असतात.

या दोन प्रकारच्या दर्जांपैकी दिलेले दर्जे व्यक्तीच्या आयुष्यात प्रथम येतात. लिंग, वय, आप्तसंबंध, धर्म, वंश, जात इत्यादी गोष्टींच्या आधारे व्यक्तीला जन्मापासून काही दर्जे मिळतात आणि अशा दर्जांवर व्यक्तीच्या जीवनाचे स्वरूप अवलंबून असते. अशा दर्जांनी घालून दिलेल्या चाकोरीच्या बाहेर व्यक्तीला जाता येत नाही. साहजिकच त्यामुळे व्यक्तीच्या मिळविता येणाऱ्या दर्जांना मर्यादा पडतात. उदाहरणार्थ, व्यक्ती स्त्री असेल, वयाने लहान असेल, विशिष्ट वंशाची किंवा जातीची असेल तर

तिला समाजातील काही स्थाने मिळविता येणार नाहीत. म्हणून कोणत्याही समाजात व्यक्तीला दिल्या जाणाऱ्या दर्जांच्या स्वरूपावर व्यक्तीला मिळविता येणाऱ्या दर्जांचे स्वरूप अवलंबून असते.

या दोन प्रकारच्या दर्जांना समाजात विशिष्ट महत्त्व असते. कारण ते समाजजीवनात महत्त्वाचे कार्य करीत असतात. दिलेल्या दर्जांमुळे व्यक्तीला स्थैर्य प्राप्त होते. व्यक्तीला जन्मापासून शारीरिक गोष्टींच्या आधारे असे दर्जे मिळत असतात. त्यासाठी व्यक्तीला इतरांशी स्पर्धा करावी लागत नाही. अशी स्थैर्याची भावना व्यक्तीला अगदी आवश्यक असते. नाहीतर जीवनात प्रत्येक गोष्ट मिळण्यासाठी स्पर्धा करावी लागल्यास व्यक्तीला शांती किंवा स्थैर्य मिळणार नाही. म्हणून प्रत्येक क्षेत्रात स्पर्धेची तीव्रता कमी करण्याचा व्यक्तीचा प्रयत्न चाललेला असतो. आपापसांतील स्पर्धा कमी करण्यासाठी श्रमिक किंवा समव्यवसायी लोक आपली स्वतंत्र संघटना करीत असतात. परदेशी मालापासून संरक्षण मिळण्यासाठी उद्योगपती संरक्षक करांची मागणी करीत असतात. तेव्हा व्यक्तीच्या जीवनात स्थैर्य येण्यास मिळणा-या दर्जांची बरीच मदत होते. पण समाजात सर्व दर्जे याच प्रकारचे असून चालणार नाही. सर्व दर्जे आपोआप मिळू लागले तर कोणी परिश्रम करणार नाहीत. सतत परिश्रम केल्याखेरीज व्यक्तीची उन्नती होणार नाही. म्हणून समाजात काही दर्जे स्वतःच्या परिश्रमांनी व इतरांशी स्पर्धा करून मिळविण्यासाठी ठेवावे लागतात. तेव्हा व्यक्तींना सतत कार्यरत ठेवण्याचे महत्त्वाचे कार्य मिळविता येणाऱ्या दर्जांमुळे साध्य होते. सारांश, या दोन प्रकारच्या दर्जांना असलेल्या महत्त्वामुळे समाजाला त्यांची तरतूद करावी लागते. साधारणपणे कोणत्याही समाजात दिल्या जाणा-या दर्जांची स्थूल रूपरेषा आखलेली असते आणि त्याखेरीज व्यक्तींना अनेक विशिष्ट दर्जे मिळविण्यासाठी मोकळीक ठेवलेली असते.

# १०

# सामाजिक आंतरक्रिया

## *१. सामाजिक संबंध व आंतरक्रिया*

समाजशास्त्रात मानव समाजाचा सांगोपांग अभ्यास केला जातो. समाजाच्या अभ्यासात व्यक्तींच्या परस्परसंबंधांच्या किंवा सामाजिक संबंधांच्या अभ्यासावर विशेष लक्ष केंद्रित केले जाते. समाजातील व्यक्तींच्यामध्ये विविध तऱ्हेचे संबंध असतात. नात्यागोत्याचे संबंध, मालक व मजूर यांचे संबंध, पुढारी व अनुयायी यांचे संबंध, मित्रांचे संबंध, शत्रूंचे संबंध असे अनेक प्रकारचे संबंध समाजात आढळून येतात. समाजातील हे संबंध विस्कळित किंवा असंबद्ध असत नाहीत तर त्यांमध्ये विशिष्ट संघटना किंवा व्यवस्था असते. तेव्हा सामाजिक संबंधांमध्ये आढळून येणाऱ्या संघटनेचा किंवा व्यवस्थापनेचा अभ्यास समाजशास्त्रज्ञ करीत असतात. त्यासाठी समाजशास्त्राच्या अभ्यासकांना सामाजिक संबंधांचे विश्लेषण व वर्गीकरण करावे लागते.

पण सामाजिक संबंधांच्या विश्लेषणाचे काम सकृद्दर्शनी वाटते तितके सोपे असत नाही. कारण सामाजिक संबंध जटिल ( complicated ) स्वरूपाचे असतात. ते सामाजिक नियमनांवर व सामाजिक दर्जांवर आधारलेले असतात. जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती एकमेकांच्या संपर्कामध्ये येतात तेव्हा त्यांच्यांतील संबंध हे त्यांचे पारस्परिक हक्क व कर्तव्ये आणि अन्योन्य दर्जे यावर अवलंबून

असतात. शिवाय, सामाजिक संबंध हे केवळ दोन किंवा अधिक व्यक्ती यांमध्येच असतात असे नाही तर ते दोन किंवा अधिक समूहांमध्ये देखील असतात. राष्ट्रे, वर्ग (classes), घराणीं ( families ), पक्ष ( parties ) अशा विविध प्रकारच्या सामाजिक समूहांचे एकमेकांशी मैत्रीचे, शत्रुत्त्वाचे, वैरभावाचे, स्पर्धेचे, असे अनेक तऱ्हेचे संबंध असू शकतात. समूहांच्या अन्योन्य संबंधानुसार त्या समूहांतील व्यक्तींचे पारस्परिक संबंध ठरत असतात. तसेच, कोणत्याही समाजात प्रचलित संबंध अगणित असतात. आई-बाप व चार भावंडे असलेल्या कुटुंबातील संबंधांची मोजणी केली तर ती पंधरा भरते.[1] कुटुंबाच्या बाहेर कितीतरी संबंध असू शकतात. म्हणून समाजात असू शकणाऱ्या संबंधांना मर्यादा असत नाही.

सामाजिक संबंधांच्या विश्लेषणात अनेक अडचणी असल्या तरी संबंधांचा अभ्यास करून त्यांचे महत्त्वाच्या बाबींच्या आधारे सर्वसामान्य प्रकारांत वर्गीकरण करणे आवश्यक असते. असे वर्गीकरण केल्याखेरीज संबंधांच्या स्वरूपाची यथार्थ कल्पना येणार नाही. तेव्हां सामाजिक संबंधांत स्पष्टपणे दिसून येणाऱ्या आंतरक्रियेच्या प्रकारावरून (kind of interaction) सामाजिक संबंधांचे वर्गीकरण सामान्यतः करतात. संघर्ष, स्पर्धा किंवा प्रतियोगिता आणि सहयोग किंवा सहकार हे आंतरक्रियांचे प्रमुख प्रकार आहेत. त्यांचे स्वरूप समजावून घेतल्याखेरीज सामाजिक संबंधांचे व समाजाचे सम्यक् आकलन होणार नाही. पण त्याआधी आंतरक्रियांचे स्वरूप पाहिले पाहिजे.

## २. *आंतरक्रियेचे स्वरूप व महत्त्व*

दोन किंवा अधिक व्यक्ती अगर व्यक्तींचे समूह यांतील अन्योन्य संपर्काला ( reciprocal contact ) आंतरक्रिया म्हणतात. आंतरक्रियेत परस्परांच्या संपर्कामध्ये येणाऱ्या व्यक्तींमध्ये आघात व प्रत्याघात ( stimulus and response ) अशी क्रिया होत असते. जेव्हा एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीच्या

---

[1]

| | |
|---|---|
| १. बाप – थोरला मुलगा | ९. नवरा – बायको |
| २. बाप – धाकटा मुलगा | १०. थोरला भाऊ – धाकटा भाऊ |
| ३. बाप – थोरली मुलगी | ११. थोरला भाऊ – थोरली बहीण |
| ४. बाप – धाकटी मुलगी | १२. थोरला भाऊ – धाकटी बहीण |
| ५. आई – थोरला मुलगा | १३. धाकटा भाऊ – थोरली बहीण |
| ६. आई – धाकटा मुलगा | १४. धाकटा भाऊ – धाकटी बहीण |
| ७. आई – थोरली मुलगी | १५. थोरली बहीण – धाकटी बहीण |
| ८. आई – धाकटी मुलगी | |

संपर्कात येते तेव्हा त्या व्यक्तीचा दुसऱ्या व्यक्तीचे विचार, भावना व कृती यांवर परिणाम होतो. एवढेच नव्हे तर दुसऱ्या व्यक्तीचा देखील पहिल्या व्यक्तीचे विचार, भावना व कृती यांवर परिणाम होत असतो. अशी अन्योन्य परिणामाची क्रिया म्हणजेच आंतरक्रिया होय. व्यक्तींमध्ये जशी आंतरक्रिया होत असते तशी ती व्यक्तींच्या समूहांमध्ये देखील होत असते. कारण समूहातील व्यक्ती विशिष्ट हेतूंनी प्रेरित होऊन एकत्र येत असल्याने त्या समूह म्हणून वर्तन करीत असतात आणि अशा रीतीने कोणत्याही समूहाचा संपर्कामध्ये येणाऱ्या इतर समूहांवर परिणाम होणे अगदी अपरिहार्य असते.

आंतरक्रिया संपर्कावर आधारलेली असल्याने कोणत्या घटकांमध्ये संपर्क येतो त्यावरून आंतरक्रियेचे प्रकार होतात. असे आंतरक्रियेचे तीन प्रकार आहेत.

(अ) **व्यक्ती - व्यक्तीमधील आंतरक्रिया :–** व्यक्तीचा इतर व्यक्तींशी संपर्क आसल्यामुळे ही आंतरक्रिया घडते. आई व मूल, गुरु व शिष्य, नेता व अनुयायी यांच्यांतील आंतरक्रिया या प्रकारात मोडतात.

**(ब) व्यक्ती आणि समूह किंवा समूह आणि व्यक्ती यांमधील आंतरक्रिया:–** व्यक्तीचा समूहाशी संपर्क येत असतो आणि समूहाचा व्यक्तींशी संपर्क येत असतो. त्यामुळे त्यांच्यामध्ये आघात–प्रत्याघाताची क्रिया चालू असते. व्यक्तीला समूहाने घालून दिलेले नियम कितपत मान्य असतात यांवर व्यक्तीचे समूहाशी संबंध आधारलेले असतात व त्यानुसार व्यक्तीचे वर्तन घडत असते. तसेच समूहाचे देखील त्यातील व्यक्तींशी संबंध येत असतात व त्यांच्याकडून विशिष्ट वर्तन घडेल अशी दक्षता समूह घेत असतात. तेव्हा व्यक्ती व समूह यांचा परस्परांच्या क्रियांवर परिणाम होत असतो.

**(क) समूहा–समूहांतील आंतरक्रिया :** व्यक्तीचा जसा इतर व्यक्तींशी संपर्क येत असतो. तसा समूहाचा इतर समूहांशी संपर्क येत असतो. साहजिकच संपर्कात येणाऱ्या समूहांचा एकमेकांवर परिणाम होत असल्याने त्यांच्यामध्ये आंतरक्रिया चालू असते. दोन राष्ट्रांचे परस्परांशी संबंध येतात; मग ते संबंध मित्रत्वाचे असतील किंवा शत्रुत्वाचे असतील. जी गोष्ट राष्ट्रांची तीच इतर समूहांची असते.

तसेच संपर्काच्या स्वरूपानुसार देखील आंतरक्रियेचे (१) प्रत्यक्ष आंतरक्रिया आणि (२) सांकेतिक आंतरक्रिया असे दोन प्रकार होतात.

(१) **प्रत्यक्ष आंतरक्रिया** ( Direct Interaction ) : जेव्हा व्यक्तींचा साक्षात संपर्क येतो तेव्हा प्रत्यक्ष आंतरक्रिया घडते. परस्परांना मारणाऱ्या व्यक्ती, किंवा एकमेकांना चावणाऱ्या व्यक्ती, किंवा सर्वजण एकत्रित येऊन काम करणाऱ्या व्यक्ती यांच्यामध्ये प्रत्यक्ष आंतरक्रिया घडत असते. कारण त्यांच्यामध्ये कोणत्या तरी स्वरूपाचा साक्षात शारीरिक संपर्क आलेला असतो.

(२) **सांकेतिक आंतरक्रिया** ( Symbolic Interaction ) : बोललेल्या किंवा लिहिलेल्या भाषेच्या साहाय्याने किंवा अन्य प्रकारच्या माध्यमांच्या उपयोगाने संपर्क येऊन घडणारी आंतरक्रिया म्हणजे सांकेतिक आंतरक्रिया होय. यालाच संदेश-व्यवहार किंवा परस्परसंचार ( communication ) असेही म्हणतात. सामूहिक जीवनात ( group life ) संदेशव्यवहाराला बरेच महत्त्व असते. कारण समूहातील सर्व व्यक्तींचा परस्परांशी साक्षात संबंध येणे कठीण असते. आधुनिक युगात समूहातील व्यक्तींचे एकमेकांशी प्रत्यक्ष बोलण्याचे किंवा संपर्क ठेवण्याचे संबंध फार थोडे येतात. याच्या उलट वाङ्मय, दूरध्वनी, बोलपट, रेडिओ, टेलिव्हिजन यांसारख्या माध्यमांच्या साहाय्याने व्यक्तींचे परस्परांशी संबंध येत असतात. म्हणून समाजातील बरीचशी आंतरक्रिया सांकेतिक स्वरूपाची असते.

आंतरक्रियेच्या प्रकारांचा विचार करताना केवळ संपर्काच्या स्वरूपाचा विचार करून चालणार नाही. तर संपर्काच्या मागच्या भावनांचा अगर हेतूंचा विचार देखील केला पाहिजे. संपर्क प्रत्यक्ष असला किंवा सांकेतिक असला तरी त्या संपर्काच्या मागे असलेल्या भावनेच्या किंवा हेतूच्या अनुरोधाने व्यक्तींचे वर्तन घडत असते. दोन शत्रू आणि दोन प्रेमिक यांचा परस्परांशी साक्षात संपर्क येत असला तरी त्यांचे एकमेकांशी समान वर्तन असत नाही कारण त्यांचे संपर्कामध्ये येण्याचे हेतू भिन्न असतात. साक्षात अगर सांकेतिक संपर्कामध्ये येणाऱ्या व्यक्तीच्या भावना लक्षात घेऊनच माणसाचे वर्तन होत असते. एखाद्या स्त्रीला फुलांचा गुच्छ मिळाल्यावर होणारे वर्तन आणि तो गुच्छ कोणी दिला व का दिला हे कळल्यावर होणारे वर्तन यांत कितीतरी फरक असतो. म्हणून सामाजिक संबंधांचे किंवा सामाजिक वर्तनाचे विश्लेषण करताना आंतरक्रियेच्या मागील हेतू विचारात घेणे आवश्यक असते.

सामाजिक संपर्काचे किंवा आंतरक्रियेचे व्यक्तीच्या दृष्टीने अतिशय महत्त्व आहे. या संपर्काच्या महत्त्वाची कल्पना असा संपर्क नसला तर व्यक्तीची काय स्थिती होते यावरून येते. संपूर्ण विविक्ती किंवा संपर्कराहित्य ( absolute isolation ) कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत घडूच शकत नाही. एखाद्या

व्यक्तीचा इतर व्यक्तींशी कसल्याही प्रकारचा संपर्क नाही हे म्हणणे कल्पनात्मक ( hypothetical ) असते; वस्तुस्थितीला धरून असत नाही. कारण, इतर व्यक्तींचा संपर्क असल्याखेरीज कोणतीही व्यक्ती जिवंत राहू शकणार नाही. मनुष्य प्राण्याच्या अर्भकाला जन्मल्यानंतर पाच-सहा वर्षे तरी मात्यापित्याच्या किंवा इतर व्यक्तींच्या आश्रयाची नितांत आवश्यकता असते. तसा आश्रय मिळाला नाही तर अर्भक वाचू शकत नाही. तसा आश्रय द्यावा अशी मातापित्याची सहजप्रवृत्ती असते आणि विशेष म्हणजे तशा आशयाची सामाजिक नियमने सर्वत्र प्रचलित असतात. तेव्हा नवजात अर्भकाचे संगोपन व संवर्धन सर्वस्वी इतर व्यक्तींवर अवलंबून असल्याने व्यक्तीला जगण्यासाठी सामाजिक संपर्काची जरूरी असते. शिवाय, मानवी स्वभावाची वाढ होण्यासाठी देखील व्यक्तीला इतर व्यक्तींच्या संपर्काची आवश्यकता असते. मनुष्य प्राण्याची मुले अगदी लहानपणी जनावरांनी जंगलात पळवून नेल्याने फक्त जनावरांच्या संगतीत जिवंत राहिल्याची अनेक उदाहरणे आढळून आली आहेत. पण तीं मुले केवळ जनावरांसारखी जिवंत राहिली. मानवी सहवासाचा कसलाही संपर्क या मुलांना न लाभल्याने मानव प्राण्याची भाषा, सवयी, आचार-विचार इत्यादी गोष्टींचा गंधही त्यांच्यामध्ये दिसून आला नाही. मानवी स्वभावाची ही वैशिष्टये मानवांच्या संपर्कानेच माणसांना आत्मसात करता येतात. तेव्हा कोणत्याही व्यक्तीमध्ये मानवी स्वभावाचा विकास इतर व्यक्तींच्या संपर्काखेरीज होऊच शकत नाही.

व्यक्तीला जिवंत राहण्यासाठी व मानवी स्वभावाची वाढ होण्यासाठी सामाजिक संबंधांची अत्यंत जरूरी असते. सामाजिक संबंधांपासूनच माणसांना समाधान लाभत असते. सामाजिक संबंधांपासून वंचित होणे ही कोणत्याही व्यक्तीला मोठी शिक्षा वाटत असते. म्हणून गुन्हेगाराला शिक्षा देण्यासाठी त्याला विविध प्रकारे सामाजिक संपर्कापासून अलग करण्याची प्रथा सर्व समाजांतून दिसून येते. हद्दपारीची शिक्षा झालेल्या व्यक्तीला समाजातून कायमचे दूर घालवून दिले जाते. त्या व्यक्तीला इतरांशी कसलाही सामाजिक संबंध अजिबात ठेवता येत नाही. यासाठी हद्दपार होणे हे मृत्युसमान समजले जाते. एकांतवासाची किंवा तुरुंगवासाची शिक्षा माणसाला संपर्करहित करण्याकरिता दिली जाते. तसेच व्यक्तीला धर्मबहिष्कृत आणि जातिबहिष्कृत करण्याची शिक्षा देणे म्हणजे त्या व्यक्तीला विशिष्ट प्रकारच्या सामाजिक संबंधांपासून वंचित करणे होय. तेव्हा या शिक्षा देण्याच्या पद्धतीवरून मानवी जीवनातील सामाजिक संबंधांचे महत्त्व कळून येते.

सारांश, सामाजिक आंतरक्रियेमुळेच माणसांचे अस्तित्त्व शक्य होते, त्यांचे व्यक्तित्व विकास पावते, त्याला आपली उद्दिष्टे साध्य करून घेणे शक्य होते, त्याचे जीवन सुखावह होते आणि समाजात संसक्ती ( cohesion ) निर्माण होण्यास मदत होते.

## ३. *आंतरक्रियेचे प्रकार : संघर्ष*

सामाजिक किंवा सामूहिक जीवनासाठी आंतरक्रियेची अतिशय जरूरी असते. माणसा–माणसांत आंतरक्रिया घडल्याखेरीज सामाजिक जीवन अस्तित्वात येऊच शकत नाही. माणसांना एकमेकांच्या नुसते जवळ ठेवले तर आंतरक्रियेचा मार्ग मोकळा होईल. पण फक्त मार्ग असून भागत नाही तर आंतरक्रिया प्रत्यक्ष घडावी लागते. अशी आंतरक्रिया घडत गेल्यानंतरच समाजाची किंवा समूहाची घडण होत असते. तेव्हा सामाजिक आंतरक्रिया समाजाच्या अस्तित्वासाठी आवश्यक असते.

समाजातील व्यक्तींमध्ये विविध मार्गांनी संपर्क येऊन निरनिराळया प्रमाणांत आघात-प्रत्याघात होऊन अनेक प्रकारांनी सामाजिक आंतरक्रिया होत असते. सामाजिक आंतरक्रियेचे बहुविध प्रकार जरी संभवत असले तरी कोणत्याही समाजात व्यक्तींच्या आंतरक्रिया काही थोडचा मूलभूत प्रकारांनीच होत असतात. समान उद्दिष्टे साध्य करून घेण्यासाठी एकत्र येऊन काम करणाऱ्या लोकांमध्ये होणाऱ्या आंतरक्रियेला किंवा त्यांच्या वर्तनाला ‘ सहकारिता ’ असे म्हणतात. जेव्हा, लोक इतरांचे वाईट व्हावे म्हणून एकमेकांविरुद्ध वर्तन करतात तेव्हा त्यांच्यामधील आंतरक्रियेला ‘संघर्ष ’ हे नांव दिले जाते. अशा तऱ्हेचे आंतरक्रियेचे मूलभूत प्रकार सर्व समाजांत प्रचलित असतात. अशा मूलभूत प्रकारच्या आंतरक्रियांना ‘सामाजिक प्रक्रिया’ ( social process ) असे म्हणतात. त्यापैकी संघर्ष (conflict ), स्पर्धा किंवा प्रतियोगिता ( competition ) आणि सहकारिता किंवा सहयोग ( co–operation ) हे तीन आंतरक्रियेचे प्रमुख प्रकार आहेत.

**“ ज्या प्रक्रियेमध्ये दोन किंवा अधिक व्यक्ती किंवा व्यक्तींचे समूह एकमेकांच्या उद्दिष्टांचे प्रत्यक्ष अवरोधन करण्याचा प्रयत्न करतात, एकमेकांचे हेतू सफल होऊ नयेत म्हणून प्रयत्नशील असतात आणि विरुद्ध पक्षाची हानी किंवा नाश करण्यास**

उद्युक्त होतात त्या प्रक्रियेला संघर्ष असे म्हणतात." [1] संघर्षाच्या या व्याख्येवरून हे स्पष्ट होते की प्रतिस्पर्धी लोकांचे हेतू निष्फळ करणे हा संघर्षाचा मूळ उद्देश असतो. काही विवक्षित वस्तू मिळविणे हा देखील संघर्षाचा उद्देश असतो. पण विवक्षित वस्तू संपादन करणे हा संघर्षाचा दुय्यम उद्देश असतो. तेव्हा प्रतिस्पर्ध्याचा नाश करणे ही संघर्षाची मूळ प्रेरणा असते. संघर्ष संघटित किंवा असंघटित स्वरूपाचा असतो. तसेच संघर्ष हा क्षणिक (transitory) असू शकतो किंवा तो बराच काळ (enduring) टिकू शकतो. युद्धे, वांशिक दंगली, औद्योगिक कलह इत्यादी संघर्षाची उदाहरणे आहेत.

संघर्ष ही प्रक्रिया असल्याने त्यात बऱ्याच गोष्टी क्रमवार घडत असल्याचे दिसून येते. काही व्यक्ती किंवा व्यक्तींचे समूह यांच्याजवळ परिमित किंवा मर्या-दित असलेल्या वस्तू असतात. ही वस्तुस्थिती इतरांना पसंत नसते. ते अशा वस्तू मिळविण्यासाठी त्या व्यक्तींना किंवा समूहांना विरोध करण्यास सुरवात करतात. या विरोधातून झगडा निर्माण होऊन त्याचे पर्यवसान कोणत्यातरी पक्षाची हानी किंवा नाश होण्यात होते. अशा क्रमाने जेव्हा गोष्टी असतात. तेव्हा संघर्षाची प्रक्रिया अस्तित्वात येते.अर्थात ही संघर्षाची प्रक्रिया जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात दिसून येते. समाजात दिसून येणारी युद्धे, वांशिक दंगली, औद्योगिक कलह, वर्ग-विग्रह वगैरे घटना संघर्षाच्या प्रक्रियेची उदाहरणे होत.

संघर्षाची व्याप्ती ( extent of conflict ) मर्यादित नाही. मानवांच्या परस्पर-संबंधांमध्ये संघर्षाची प्रक्रिया कोणत्या ना कोणत्या स्वरूपात सदैव चालू असते. विशिष्ट बाबतींत दिसून येणारा आंशिक संघर्ष (partial conflict) असो की सर्व बाबतींत दिसून येणारा समग्र संघर्ष ( total conflict ) असो संघर्षाची प्रक्रिया सर्वत्र आढळून येते. भौतिक (physical), बौद्धिक ( intellectual ), अध्यात्मिक ( spiritual ) इत्यादी क्षेत्रांत संघर्षाचे अस्तित्व प्रत्ययास येते. संघर्ष टाळावा असे स्पष्ट मत जरी विचारवंतांनी प्रतिपादन केलेले असले तरी संघर्ष कोणत्याही समाजात नाहीसा झालेला आढळून येत नाही. याच्या उलट संघर्ष हे मानवी समाजाचे स्थिर लक्षण ( constant feature ) झालेले आहे.

---

1. " Conflict is a process in which two or more persons or groups of persons seek actively to thwart each other's purposes, to prevent satisfaction of each other's interests, even to the extent of injuring or destroying the other." - Dictionary of Sociology.

समाजाचे स्थिर लक्षण बनलेल्या संघर्षाचे मूळ कारण (basis of conflict) समाजाच्या संघटनेत आढळून येते. प्रत्येक समाजाची विशिष्ट संस्कृती असते आणि त्या संस्कृतीवर आधारलेली विशिष्ट उद्दिष्टे देखील असतात. त्यामुळे कोणत्याही समाजाची उद्दिष्टे इतर समाजाहून वेगळी असतात. साहजिकच समान उद्दिष्टे असलेले लोक एकमेकांच्या जास्ती जवळ येतात व तशाच स्थितीत राहण्याचा सतत प्रयत्न करतात. समाजातील लोक समाजाची उद्दिष्टे व संस्कृती यांच्याशी संपूर्णपणे समरस होत असल्याने त्यांना इतर समाजांतील लोकांची संस्कृती आवडेनाशी होते. इतकेच नव्हे तर इतर समाजांच्या संस्कृतीपेक्षा आपल्या समाजाची संस्कृतीच श्रेष्ठ आहे अशी भावना बळावते. या भावनेला स्वसमूहश्रेष्ठतावाद ( ethnocentrism ) असे म्हणतात. स्वसमूहश्रेष्ठतेची ही भावना प्रत्येक समाजात व सामाजिक समूहात हमखास दिसून येत असल्याने त्यांच्यात संघर्ष निर्माण होणे अटळ असते. शिवाय सामाजिक समूहाला संस्थापित स्वरूप ( corporate character ) असल्याने संघर्ष टिकून राहतो व तीव्रतर बनत जातो. प्रत्येक सामाजिक समूहाला वेगळे नाव असते, समान नेतृत्व असते व विशेष रचना असते. यामुळे समूहातील सर्व लोक समूहाशी सर्व बाबतींत एकरूप होतात व समूहाशी एकनिष्ठ राहणे आपले कर्तव्य आहे अशी धारणा नेहमी बाळगतात. कुल, जमात, नगर-राज्य, धर्म, राष्ट्र यासारख्या कोणत्याही सामाजिक समूहात ही सामाजिक वैशिष्टये आढळून येत असल्याने त्यांच्यामध्ये स्वसमूहश्रेष्ठतावाद आढळतो व पर्यायाने संघर्ष प्रत्ययास येतो. उदाहरणार्थ, कोणत्याही राष्ट्राला निश्चित स्वरूपाचे संघटित अस्तित्व ( definite organised entity ) असते आणि ते अस्तित्व कोणत्याही परिस्थितीत टिकविले पाहिजे अशी राष्ट्रातील लोकांची प्रबळ भावना असते. शिवाय प्रत्येक राष्ट्राच्या स्वतःच्या वैभवाच्या व भवितव्याच्या कल्पना असतात व लोकांच्या संपूर्ण पाठिंब्याच्या जोरावर त्या कल्पना प्रत्यक्षात उतरविण्याचा प्रयत्न प्रत्येक राष्ट्र करीत असते. असे करीत असताना इतर राष्ट्रांचा विरोध होतो आणि त्याचे राष्ट्राराष्ट्रांतील युद्धांत रूपांतर होते. या जगात वेगवेगळी स्वतंत्र राष्ट्रे अस्तित्वात असतात म्हणून त्यांच्यामध्ये संघर्ष होणे अपरिहार्य आहे. कारण त्यांच्यामागे स्वसमूहश्रेष्ठतावादाची भावना असते.

कोणताही समाज आपल्या व्यक्तींमधील संघर्षाचा लोप किंवा निरास ( elimination of conflict ) व्हावा म्हणून प्रयत्नशील असतो. कारण समाजाची कार्यक्षमता ( societal efficiency ) समाजातील लोकांच्या सहयोगावर अवलंबून असते आणि संघर्षाच्या अस्तित्वामुळे लोकांमधील सहकाराचे प्रमाण आपोआपच कमी होते. समाजातील सर्व लोकांनी सगळ्या बाबतींत समान उद्दिष्टे

बाळगली तर समाजातून संघर्षाचे निरसन करता यते. पण लोकांची अंतिम मूल्ये जरी समान असली तरी काही उद्दिष्टे अगदी व्यक्तिगत स्वरूपाची असतात. जीवनावश्यक वस्तू, सुखोपभोगाच्या वस्तू, सामाजिक मानमान्यता इत्यादी वैयक्तिक गरजेच्या गोष्टींविषयी लोकांची उद्दिष्टे वेगवेगळी असतात. अशी उद्दिष्टे कोणत्याही मार्गाने साध्य करून घ्यावीत असा लोकांचा आग्रह असतो. परंतु ही विविध व्यक्तिगत उद्दिष्टें सफल करण्यासाठी लागणारी साधने मात्र लोकांच्या जवळ अगदी मर्यादित प्रमाणात असल्याने दुसऱ्यांच्या उद्दिष्टांच्या आड येऊन स्वतःची उद्दिष्टे साध्य करण्याकडे लोकांची प्रवृत्ती होते. यामुळे साहजिकच लोकांमध्ये संघर्ष निर्माण होतो. अशा संघर्षामधून अंतर्गत यादवी माजू नये किंवा लोकांना शारीरिक इजा होऊ नये याविषयी समाज खबरदारी घेत असला तरी नोकरीवरून कमी करणे, असुरक्षित परिस्थिती निर्माण करणे यासारख्या विविध उपायांनी समाजात संघर्ष चालूच राहतो. राजकीय, आर्थिक, कौटुंबिक, शैक्षणिक आदी क्षेत्रांत या ना त्या स्वरूपात संघर्ष सदैव चालू असल्याचे आढळून येते. सारांश, संघर्ष हा सामाजिक जीवनाचा एक अनिवार्य भाग असतो. संघर्षाला अनुकूल अशी परिस्थिती कोणत्याही समाजात अस्तित्वात असते आणि तशी परिस्थिती चालू ठेवण्याखेरीज समाजाला गत्यंतर नसते. समाजातील विविध स्थाने किंवा दर्जे वेगवेगळ्या लोकांना समाजाने द्यावे लागतात; आणि या परिस्थितीतूनच लोकांमध्ये द्वेषाच्या किंवा तिरस्काराच्या भावना निर्माण होण्यास मदत होते. समाजातील एखाद्या व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीवर सत्ता गाजविण्याचा अधिकार समाज देतो आणि यातून सत्तेचा दुरुपयोग करण्याची व शस्त्रबळाने त्याचा प्रतिकार करण्याची संधी निर्माण होते. साहजिकच अशा परिस्थितीचे रूपांतर संघर्षात होते. तेव्हा समाजातून सर्व प्रकारच्या संघर्षाचा कायमचा लोप करणे केव्हाही शक्य असत नाही.

संघर्षाचा संपूर्ण निरास करणे शक्य नसले तरी संघर्षाला प्रतिबंध ( prevention of conflict ) घालण्यासाठी किंवा संघर्षाची तीव्रता कमी करण्यासाठी समाजात उपाय योजिले जातात. विनोदाच्या साहाय्याने तंग वातावरण कमी करून संघर्षाचे शारीरिक अत्याचारात रूपांतर होऊ दिले जात नाही. समूहातील विविध स्थानांवर असलेल्या व्यक्तींमध्ये सामाजिक अंतर ( social distance ) ठेवण्याची प्रथा पाळून संघर्षाचे प्रसंग टाळले जातात. समाजातील अनेक पक्षोपपक्षांच्या लोकांना उच्च भावनारज्जूंनी बांधून ठेवण्याचा व त्यांच्या परस्परविरुद्ध हितांमध्ये समन्वय साधण्याचा कसोशीने प्रयत्न केला जातो. समाजात परिवर्तनाची प्रक्रिया नेहमी चालू असल्याने संघर्षाच्या प्रचलित परिस्थितीला लोकांनी जास्ती महत्त्व देऊ नये असे आग्रहाने प्रतिपादिले जाते. परस्पर वैमनस्याचा

उद्रेक विघातक मार्गांनी होऊ नये म्हणून लोकांवर विविध बंधने घातली जातात.

संघर्षाचा निरोध करणारे हे उपाय नेहमी प्रभावी ठरतातच अशातला भाग नाही. किंबहुना काही वेळेला या उपायांनी संघर्षाचे निराकरण होण्याऐवजी संघर्षाची वाढ होत असते. शिवाय व्यक्तींची उद्दिष्टे काही प्रमाणात परस्परविरोधी असल्याने संघर्षाला अनुकूल अशी परिस्थिती समाजात नेहमी अस्तित्वात असते. संघर्ष हा मानवी समाजाचा एक अपरिहार्य भाग आहे.

## ४. *आंतरक्रियेचे प्रकार : स्पर्धा*

" मर्यादित वस्तूंवर मालकी मिळविण्यासाठी किंवा त्यांचा उपयोग करण्यास मिळण्यासाठी होणाऱ्या झगड्याला स्पर्धा किंवा प्रतियोगिता असे म्हणतात." [1] या जगात कित्येक वस्तू -- मग त्या मूर्त ( material goods ) असोत वा अमूर्त ( immaterial goods ) असोत — भरपूर प्रमाणात आढळून येत नाहीत. धन-धान्य, घर-दार, यांसारख्या भौतिक किंवा मूर्त वस्तू आणि सामाजिक प्रतिष्ठा, दर्जा, मानमान्यता यांसारख्या अमूर्त वस्तू लोकांच्या मागणीच्या मानाने कमी प्रमाणात उपलब्ध असल्याने त्या संपादन करण्यासाठी झगडा होत असतो. या झगड्याला स्पर्धा असे नाव देण्यात येते. या झगड्याचा मूळ उद्देश वस्तूंचा ताबा मिळविणे किंवा त्यांचा वापर करता येणे हा असतो. अशा झगड्यामुळे स्पर्धेची प्रक्रिया ( process of competition ) निर्माण होते.

स्पर्धा ही प्रक्रिया असल्याने त्यात बऱ्याच गोष्टी क्रमवार घडत असतात. काही वस्तू अगदी मर्यादित प्रमाणात उपलब्ध असतात. अनेक व्यक्तींना किंवा व्यक्तींच्या समूहांना त्या वस्तू हव्यात असे वाटू लागते. त्या वस्तूंवर स्वामित्व मिळविण्यासाठी किंवा त्यांचा वापर करता येण्यासाठी व्यक्तींमध्ये किंवा समूहांमध्ये झगडा सुरू होतो. या झगड्याचे पर्यवसान एखादी व्यक्ती किंवा समूह यशस्वी होण्यात होते. यशस्वी व्यक्तीला किंवा समूहाला इच्छित वस्तू मिळतात व इतरांना त्या मिळत नाहीत. स्पर्धेमध्ये विवक्षित क्रमाने गोष्टी घडतात म्हणून स्पर्धा ही एक प्रक्रिया होते. मर्यादित वस्तूंचा उपभोग एके वेळी एखाद्या व्यक्तीला किंवा समूहालाच घेता येतो; इतरांना घेता येत नाही म्हणून व्यक्तींमध्ये किंवा समूहांमध्ये विरोध निर्माण होऊन विरोधाचे झगड्यात रूपांतर होते हे स्पर्धेचे सार होय.

---

1. " Competition is the struggle for the possession or use of limited goods." – Dictionary of Sociology.

स्पर्धा विशिष्ट नियमानुसार घडत असते. कोणत्याही क्षेत्रातील स्पर्धेला विशिष्ट नियम लागू केलेले असतात आणि त्या नियमांना अनुसरूनच प्रतिस्पर्ध्यांना आपले वर्तन ठेवावे लागते. स्पर्धेच्या या नियमांना समाजाची मान्यता असते व नियमपालनाला नेहमी जास्त महत्त्व दिले जाते. उदाहरणार्थ, धाकदपटशाचा किंवा फसवाफसवीचा उपयोग करून स्पर्धेमधील इच्छित वस्तू साध्य करून घेऊ नयेत असे नियम असतात. या नियमांचे उल्लंघन झाले म्हणजे स्पर्धेचे संघर्षात रूपांतर होते. कारण प्रतिस्पर्ध्याचा नाश करण्याचे उद्दिष्ट संघर्षात असते तर प्रतिस्पर्ध्यावर ताण करून इच्छित वस्तू मिळविण्याचे मर्यादित उद्दिष्ट स्पर्धेमध्ये असते. म्हणून स्पर्धा नेहमी नियमबद्ध किंवा नियंत्रित असते. " अनियंत्रित स्पर्धा " हा पुष्कळदा वापरला जाणारा शब्दप्रयोग चूक आहे कारण स्पर्धा केव्हाही अनियंत्रित असूच शकत नाही.

स्पर्धेची व्याप्ती ( extent of competition ) सीमित असत नाही. कोणत्याही कार्यक्षेत्रात स्पर्धा आढळून येते. आर्थिक क्षेत्रात तर ती प्रामुख्याने दिसून येते. राजकीय, शैक्षणिक, वैज्ञानिक, सामाजिक आदी क्षेत्रांत देखील स्पर्धेचे अस्तित्व स्पष्टपणे प्रत्ययास येते. तेव्हा स्पर्धा ही जीवनात नेहमी दिसून येणारी गोष्ट आहे. स्पर्धेचे अस्तित्व सर्वत्र जाणवत असले तरी स्पर्धा केव्हाही संपूर्णपणे अनियंत्रित असत नाही. कोणत्याही समाजात सर्व वस्तू स्पर्धेच्या मार्गानेच मिळ–वाव्या लागतात अशी परिस्थिती असत नाही. तर प्रत्येक समाज स्पर्धेच्या मार्गाने मिळवावयाच्या वस्तू व त्यासाठी उपयोगात आणावयाची साधने यांविषयी निश्चित नियम घालून देत असतो. म्हणून कोणत्याही समाजव्यवस्थेत स्पर्धा अनिवार्य गोष्ट असली तरी स्पर्धेची व्याप्ती, तिची तीव्रता व तिचे प्रकार या गोष्टी सर्व तऱ्हेच्या समाजव्यवस्थेत समान असत नाहीत. अमेरिकेत आढळून येणारी स्पर्धा रशियातील स्पर्धेपेक्षा कितीतरी भिन्न आहे.

व्यक्तींच्या व समाजाच्या दृष्टींनी स्पर्धेचे अतिशय महत्त्व आहे. स्पर्धा अत्यंत गतिशील आहे. स्पर्धेमुळे व्यक्तींना अगर समूहांना नवीन साधनांची वाढ करण्या–साठी नेहमी प्रोत्साहन मिळत असते. म्हणून स्पर्धेच्या अभावी अशा साधनांची वाढ होण्यास वाव मिळत नाही. तसेच स्पर्धेमुळे लोकांच्या आशा–आकांक्षा वृद्धिंगत होत असल्याने लोकांना नवीन गोष्टी साध्य करून घेण्यास सदैव उत्तेजन मिळत असते. संमिश्र व बदलत्या समाजांतून स्पर्धेचे हे कार्य मोठ्या प्रमाणावर चालू असते. कारण अशा समाजांतूनच नवीन गोष्टी निर्माण होत असतात व त्या मिळविण्यासाठी स्पर्धेचा मार्ग मोकळा असतो. किंबहुना स्पर्धेमुळेच मानवाला आपली प्रगती करून

घेता येणे शक्य झाले असे समजले जाते. तेव्हा आधुनिक संस्कृतीचा आवश्यक भाग म्हणून स्पर्धेला बरेच मानाचे स्थान अनेक समाजांतून मिळाले आहे.

स्पर्धेमध्ये जसे गुण आहेत तसे दोषही आहेत. स्पर्धा नियंत्रित किंवा नियमबद्ध असते. फसवाफसवी करू नये, करारनामे मोडू नयेत, धाकदपटशा दाखवून विध्वंसक कृत्ये करू नयेत यासारखे नियम स्पर्धेमध्ये पाळणे अगदी आवश्यक असते. परंतु कित्येकदा प्रतिस्पर्धी व्यक्ती किंवा गट अशा नियमांचे उल्लंघन करतात इतकेच नव्हे तर सामाजिक उद्दिष्टांना व मूल्यांना बाधा आणण्यास कचरत नाहीत. यामुळे समाजात कृत्रिम परिस्थिती निर्माण होऊन त्यातून भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण उत्पन्न होते. प्रतिस्पर्धी स्वतःच्या फायद्याकडेच तेवढे लक्ष देतात आणि इतरांचा केवळ साधनांसारखा उपयोग करून घेतात. स्पर्धेमध्ये लोकांच्या भावनेला काहीही स्थान असत नाही. अमर्यादित स्पर्धेचे निश्चितपणे एकाधिकारात ( monopoly ) रूपांतर होते. असे झाले म्हणजे काही प्रबल लोकांच्या हातांत अपरिमित सत्ता केंद्रित होते व त्याचा दुर्बलांना हमखास उपसर्ग पोहोचतो. अशा रीतीने स्पर्धेमुळे असमानता वाढीस लागते. शिवाय अलीकडील काळात स्पर्धेचे स्वरूप पार बदलून गेले आहे. पूर्वी व्यक्तींमध्ये किंवा लहान समूहांमध्ये स्पर्धा होत असे तर हल्ली मोठमोठ्या कंपन्यामध्ये किंवा भांडवलदार व मजूर, बहुसंख्य व अल्पसंख्य लोक यांसारख्या विशाल व व्यक्तिनिरपेक्ष ( impersonal ) समूहांमध्ये स्पर्धा चालू असते. त्यामुळे अशा समूहांच्या अधिकारात असलेली प्रचंड सत्ता प्रतिस्पर्धी व्यक्तींच्याविरूद्ध वापरली जात नाही तर ती व्यक्तींचा विचार न करता इतर प्रतिस्पर्धी समूहांविरुद्ध उपयोगात आणली जाते. साहजिकच व्यक्तिनिरपेक्ष समूहांविरूद्ध वापरलेली सत्ता अधिक विध्वंसक रूप धारण करू शकते. एखाद्या मजूराविरुद्ध सत्ता वापरली न जाता ती मजूरवर्गाविरुद्ध किंवा मजूरांच्या समूहांविरुद्ध वापरली जात असल्याने भांडवलदार ती सत्ता कशाही रीतीने वापरू शकतो. तेव्हा अलीकडील काळात स्पर्धेची प्रक्रिया व्यक्तिगत न राहता व्यक्तिनिरपेक्ष बनत चालल्याने आणि प्रतिस्पर्ध्यांच्या हातांत अमर्याद सत्ता केंद्रित झाल्याने स्पर्धेचे हळूहळू संघर्षात रूपांतर होऊ लागले आहे.

स्पर्धेचे हे गुणावगुण लक्षात घेऊन कोणताही समाज संपूर्ण स्पर्धेला वाव देत नाही. स्पर्धेचे उच्चाटन न करता ती या ना त्या स्वरूपांत मर्यादित करण्याचे प्रयत्न समाज करीत असतात. परदेशी मालाच्या स्पर्धेपासून वाचण्यासाठी संरक्षक कर लादले जातात. मजूर लोक भांडवलदारांशी व्यक्तिशः न भांडता आपल्या संघाच्या बतीने सर्व मजूरांचे हितसंबंध सुरक्षित राहावेत अशा खटपटी केल्या जातात

स्पर्धेची व्याप्ती कमी करण्यासाठी गोऱ्या लोकांकडून काळ्या लोकांना कमी प्रतीचे स्थान दिले जाते. तेव्हा प्रत्येक समाजव्यवस्थेत स्पर्धा काढून न टाकता ती मर्यादित करण्यावर लक्ष दिले जाते. स्पर्धा ठेवून स्पर्धेच्या दोषांची तीव्रता कमी करण्याची दक्षता घेतली जाते. स्पर्धेमुळे लोकांना विशिष्ट सामाजिक दर्जा मिळविता येतो. समाजात मिळविता येणारे व आपोआप मिळणारे असे दोन प्रकारचे दर्जे असावे लागतात. कोणत्याही समाजात फक्त एकाच पद्धतीचा सामाजिक दर्जाचा प्रकार अस्तित्वात असत नाही तर दोन्ही प्रकार अस्तित्वात असतात. याचा अर्थ असा की स्पर्धेचे संपूर्ण निराकरण करण्यास कोणताही समाज तयार होत नाही.

संघर्ष व स्पर्धा या समाजातील विघटनात्मक प्रक्रिया ( disintegrative processes) आहेत. कारण या प्रक्रियांमुळे समाजातील विविध घटक एकमेकां-पासून दूर होतात. या प्रक्रियांमुळे लोकांमधील अंतर कमी होण्याच्या ऐवजी वाढत जाते. फक्त अशाच प्रक्रिया चालू राहणे समाजाच्या सातत्याच्या व ऐक्याच्या दृष्टींनी विघातक असते. म्हणून विघटनात्मक प्रक्रियांबरोबरच समाजातील घट-कांना एकत्रित आणणाऱ्या संघटनात्मक प्रक्रिया (integrative processes) देखील समाजात असणे आवश्यक असते. संघटनात्मक प्रक्रियांमुळे संघर्षाची तीव्रता कमी होण्यास आणि नियमबद्ध रीतीने स्पर्धा चालू राहण्यास मदत होते. अशा संघटनात्मक प्रक्रियांमध्ये सहयोगाच्या प्रक्रियेला महत्त्वाचे स्थान आहे.

## ७. आंतरक्रियेचे प्रकार : सहयोग

" ज्या समाजिक आंतरक्रियेच्या प्रकारात व्यक्ती किंवा समूह समान उद्दिष्टे किंवा हेतू साध्य करून घेण्यासाठी सर्वसाधारणपणे संघटित पद्धतीने आपल्या कार्यांचे एकत्रीकरण करतात किंवा परस्परांच्या मदतीने एकत्र कार्य करतात त्या आंतरक्रियेच्या प्रकाराला सहकारिता किंवा सहयोग असे म्हणतात."[1] लोकांनी स्वेच्छेने केलेल्या परिश्रमांच्या एकीकरणामुळे सहयोग निर्माण होतो. जर लोकांवर सक्ती करून त्यांच्या परिश्रमांचे एकीकरण साधले तर त्याला समन्वय ( co-ordination ) म्हणतात. अशा परिस्थितीला सहयोग म्हणता येणार नाही कारण त्यात स्वयंप्रेरणेचा अभाव असतो.

---

1 " Co-operation is any form of social interaction in which personalities or groups combine their activities, or work together with mutual aid, in a more or less organized way, for the promotion of common ends or objectives. "

– Dictionary of Sociology.

सहयोगाची व्याप्ती मर्यादित नाही. कोणत्याही कार्यक्षेत्रात सहकारितेची प्रक्रिया असू शकते. समान हेतूंच्या पूर्तीसाठी जेव्हा काही व्यक्ती स्वयंप्रेरणेने एकत्र येऊन कार्य करतात तेव्हा सहयोग निर्माण होतो. असा सहयोग आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आदी कोणत्याही क्षेत्रात निर्माण करणे शक्य असते. इतकेच नव्हे तर एकदा एका क्षेत्रात सहयोगाची प्रवृत्ती निर्माण झाली तर तिचे लोण इतर क्षेत्रांत पसरावयास वेळ लागत नाही.

सहयोगाच्या प्रक्रियेचे समाजात अतिशय महत्त्व आहे कारण ही संघटनात्मक प्रक्रिया आहे. समान ध्येयपूर्तीसाठी समाजातील विविध घटक सहयोगामुळे एकत्रित येऊन काम करीत असल्याने समाजाचे एकीकरण होण्यास त्याची बरीच मदत होते. साहजिकच सहयोगाची समाजाला अत्यंत आवश्यकता असते. सहयोगामुळे समान गुणधर्म असलेले लोकच तेवढे एकत्रित येऊ शकतात अशातला भाग नाही. समान गुणधर्म नसलेले लोक देखील एकत्रित येऊन काम करू शकतात. विविध गुणवत्तेचे, भाषेचे, धर्माचे, चालीरीतीचे, वंशाचे किंवा इतर बाबतींत फरक असलेले लोक समान उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी सहयोगाच्या भूमिकेवरून एकत्रित कार्य करू शकतात. अशा वेळी लोक समान ध्येयपूर्तीच्या कामाला जास्ती महत्त्व देतात व आपल्यातील इतर फरकांना गौण लेखतात. म्हणून विभेदन ( differentiation ) सहकारितेच्या आड येऊ शकत नाही. किंबहुना विभिन्न गुणधर्माच्या लोकांचा सहयोग विशेष फलदायी ठरतो कारण समान ध्येय साध्य करण्यासाठी असे लोक वैशिष्टयपूर्ण कामगिरी बजावू शकतात. उदाहरणार्थ, विद्यापीठात किंवा मोठ्या कारखान्यात अगर व्यवसायात अनेक तऱ्हेच्या लोकांची गरज असते.

लोकशाहीमध्ये संघटनात्मक प्रक्रिया म्हणून सहकारितेला विशेष महत्त्व आहे. लोकशाहीत विविध बाबतींत लोकांना स्वतंत्रता लाभत असल्याने त्यांच्यातील विभेदन वाढत जाते. अनेक तऱ्हेचे भेद असलेल्या लोकांना लोकशाहीत एकत्रित ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सहयोगामुळे शक्य होते. कारण सहयोगाच्या प्रवृत्तीमुळे लोकशाहीच्या उद्दिष्टांना लोक जास्ती महत्त्व देतात.

लोकांच्या दैनंदिन जीवनात देखील सहयोगाला विशेष स्थान आहे. लोकांनी एकत्रित येऊन काम करण्याची प्रवृत्ती ठेवल्यांखेरीज त्यांची समान उद्दिष्टे साध्य होणार नाहीत.

स्पर्धेची व्याप्ती कमी करण्यासाठी गोऱ्या लोकांकडून काळ्या लोकांना कमी प्रतीचे स्थान दिले जाते. तेव्हा प्रत्येक समाजव्यवस्थेत स्पर्धा काढून न टाकता ती मर्यादित करण्यावर लक्ष दिले जाते. स्पर्धा ठेवून स्पर्धेच्या दोषांची तीव्रता कमी करण्याची दक्षता घेतली जाते. स्पर्धेमुळे लोकांना विशिष्ट सामाजिक दर्जा मिळविता येतो. समाजात मिळविता येणारे व आपोआप मिळणारे असे दोन प्रकारचे दर्जे असावे लागतात. कोणत्याही समाजात फक्त एकाच पद्धतीचा सामाजिक दर्जाचा प्रकार अस्तित्वात असत नाही तर दोन्ही प्रकार अस्तित्वात असतात. याचा अर्थ असा की स्पर्धेचे संपूर्ण निराकरण करण्यास कोणताही समाज तयार होत नाही.

संघर्ष व स्पर्धा या समाजातील विघटनात्मक प्रक्रिया ( disintegrative processes) आहेत. कारण या प्रक्रियांमुळे समाजातील विविध घटक एकमेकां-पासून दूर होतात. या प्रक्रियांमुळे लोकांमधील अंतर कमी होण्याच्या ऐवजी वाढत जाते. फक्त अशाच प्रक्रिया चालू राहणे समाजाच्या सातत्याच्या व ऐक्याच्या दृष्टींनी विघातक असते. म्हणून विघटनात्मक प्रक्रियांबरोबरच समाजातील घट-कांना एकत्रित आणणाऱ्या संघटनात्मक प्रक्रिया (integrative processes) देखील समाजात असणे आवश्यक असते. संघटनात्मक प्रक्रियांमुळे संघर्षाची तीव्रता कमी होण्यास आणि नियमबद्ध रीतीने स्पर्धा चालू राहण्यास मदत होते. अशा संघटनात्मक प्रक्रियांमध्ये सहयोगाच्या प्रक्रियेला महत्त्वाचे स्थान आहे.

## ७. *आंतरक्रियेचे प्रकार : सहयोग*

" ज्या समाजिक आंतरक्रियेच्या प्रकारात व्यक्ती किंवा समूह समान उद्दिष्टे किंवा हेतू साध्य करून घेण्यासाठी सर्वसाधारणपणे संघटित पद्धतीने आपल्या कार्यांचे एकत्रीकरण करतात किंवा परस्परांच्या मदतीने एकत्र कार्य करतात त्या आंतरक्रियेच्या प्रकाराला सहकारिता किंवा सहयोग असे म्हणतात."[1] लोकांनी स्वेच्छेने केलेल्या परिश्रमांच्या एकीकरणामुळे सहयोग निर्माण होतो. जर लोकांवर सक्ती करून त्यांच्या परिश्रमांचे एकीकरण साधले तर त्याला समन्वय ( co-ordination ) म्हणतात. अशा परिस्थितीला सहयोग म्हणता येणार नाही कारण त्यात स्वयंप्रेरणेचा अभाव असतो.

---

1 " Co-operation is any form of social interaction in which personalities or groups combine their activities, or work together with mutual aid, in a more or less organized way, for the promotion of common ends or objectives. "

– Dictionary of Sociology.

सहयोगाची व्याप्ती मर्यादित नाही. कोणत्याही कार्यक्षेत्रात सहकारितेची प्रक्रिया असू शकते. समान हेतूंच्या पूर्तीसाठी जेव्हा काही व्यक्ती स्वयंप्रेरणेने एकत्र येऊन कार्य करतात तेव्हा सहयोग निर्माण होतो. असा सहयोग आर्थिक, राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आदी कोणत्याही क्षेत्रात निर्माण करणे शक्य असते. इतकेच नव्हे तर एकदा एका क्षेत्रात सहयोगाची प्रवृत्ती निर्माण झाली तर तिचे लोण इतर क्षेत्रांत पसरावयास वेळ लागत नाही.

सहयोगाच्या प्रक्रियेचे समाजात अतिशय महत्त्व आहे कारण ही संघटनात्मक प्रक्रिया आहे. समान ध्येयपूर्तीसाठी समाजातील विविध घटक सहयोगामुळे एकत्रित येऊन काम करीत असल्याने समाजाचे एकीकरण होण्यास त्याची बरीच मदत होते. साहजिकच सहयोगाची समाजाला अत्यंत आवश्यकता असते. सहयोगामुळे समान गुणधर्म असलेले लोकच तेवढे एकत्रित येऊ शकतात अशातला भाग नाही. समान गुणधर्म नसलेले लोक देखील एकत्रित येऊन काम करू शकतात. विविध गुणवत्तेचे, भाषेचे, धर्माचे, चालीरीतीचे, वंशाचे किंवा इतर बाबतींत फरक असलेले लोक समान उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी सहयोगाच्या भूमिकेवरून एकत्रित कार्य करू शकतात. अशा वेळी लोक समान ध्येयपूर्तीच्या कामाला जास्ती महत्त्व देतात व आपल्यातील इतर फरकांना गौण लेखतात. म्हणून विभेदन ( differentiation ) सहकारितेच्या आड येऊ शकत नाही. किंबहुना विभिन्न गुणधर्माच्या लोकांचा सहयोग विशेष फलदायी ठरतो कारण समान ध्येय साध्य करण्यासाठी असे लोक वैशिष्टयपूर्ण कामगिरी बजावू शकतात. उदाहरणार्थ, विद्यापीठात किंवा मोठ्या कारखान्यात अगर व्यवसायात अनेक तऱ्हेच्या लोकांची गरज असते.

लोकशाहीमध्ये संघटनात्मक प्रक्रिया म्हणून सहकारितेला विशेष महत्त्व आहे. लोकशाहीत विविध बाबतींत लोकांना स्वतंत्रता लाभत असल्याने त्यांच्यातील विभेदन वाढत जाते. अनेक तऱ्हेचे भेद असलेल्या लोकांना लोकशाहीत एकत्रित ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सहयोगामुळे शक्य होते. कारण सहयोगाच्या प्रवृत्तीमुळे लोकशाहीच्या उद्दिष्टांना लोक जास्ती महत्त्व देतात.

लोकांच्या दैनंदिन जीवनात देखील सहयोगाला विशेष स्थान आहे. लोकांनी एकत्रित येऊन काम करण्याची प्रवृत्ती ठेवल्यांखेरीज त्यांची समान उद्दिष्टे साध्य होणार नाहीत.

सारांश, संघर्ष, स्पर्धा व सहयोग हे सामाजिक आंतरक्रियेचे तीन्ही प्रकार मानवी समाजात सदैव आढळून येतात. तसेच हे तिन्ही प्रकार एकमेकांवर अवलंबून असतात. कोणत्याही समाज व्यवस्थेत हे तीन्ही प्रकार एकमेकांमध्ये गुंतलेल्या स्वरूपात दिसून येतात. किंबहुना कोणत्याही प्रत्यक्ष सामाजिक घटनेत हे प्रकार संमिश्र अवस्थेत आढळून येतात. एखाद्या सहकारी समूहाच्या सभासदांमध्ये सहयोग प्रवृत्ती प्रकर्षाने वास करीत असली तरी त्यांच्यामध्ये सुप्त रीतीने संघर्षाची बीजे देखील वास करीत असतात. दोन समूहांत स्पर्धा चालू असली तरी प्रत्येक समूहातील व्यक्तींमध्ये सहकारिता असते.

तेव्हा मानवाच्या सामाजिक वर्तनाचा अभ्यास करताना सामाजिक आंतरक्रियांचा अभ्यास करणे अपरिहार्य असते. आंतरक्रियेचे स्वरूप कळल्याखेरीज कोणत्याही सामाजिक घटनेचे सम्यक् आकलन होत नाही.

# ११

# समाजीकरण

## १. *समाजीकरणाचे स्वरूप व महत्त्व*

मानवाचे लहान मूल अतिशय अनुकूलनीय ( adaptable ) असल्याने कोणत्याही रीतीने वागण्यास ते सहज शिकू शकते. परंतु मुलाच्या पर्यावरणाचा अत्यंत महत्त्वाचा भाग असलेल्या माणसांच्या वागण्याच्या पद्धती मात्र अगदी ठराविक व समस्वरूपी ( standardized ) असतात. लहान मुलाला खाण्यापिण्याच्या बाबतीत अगदी सुरवातीला कसल्याही आवडीनिवडी असत नाहीत. मूल कोणतेही पेय पिण्यास शिकू शकते व कोणताही खाद्यपदार्थ खावयास शिकू शकते. पण ज्या परिवारात त्याचा जन्म झालेला असतो आणि ज्या लोकांवर त्याला संपूर्णपणे अवलंबून राहावे लागते त्या माणसांच्या खाण्यापिण्याच्या बाबतींतील सवयी मात्र मर्यादित व कायमस्वरूपाच्या असतात. उदाहरणार्थ, एखाद्या समाजातील माणसे विशिष्ट प्राण्यांचेच दूध प्राशन करतात किंवा विशिष्ट प्रकारचेच मांसाशन करतात. अर्थात मोठ्या माणसांच्या या सवयी लहान मुलांना जडतात आणि त्यानुसार मुलांच्या आवडीनिवडी निर्माण होतात व पुढील आयुष्यभर जवळ जवळ कायम राहातात. जी गोष्ट खाण्यापिण्याची तीच कोणत्याही आचार–विचारांची. समाजातील माणसांचे जे विविध आचार–विचार असतात ते सर्व लहान मुले शिकतात व त्याप्रमाणे वागतात. व्यक्तीच्या लहानपणापासून सुरू झालेली ही शिकण्याची क्रिया तिच्या बालपणी व प्रौढपणी देखील चालू असते. या शिकण्याच्या

क्रियेमुळेच मुलाला समाजातील लोकांच्या भाषा, भावना, धर्मसमजुती, योग्या-योग्यतेच्या कल्पना, आशा-आकांक्षा इत्यादी मानवप्राण्याच्या वैशिष्टचपूर्ण गोष्टी अवगत होतात व ते मूल ज्याला आपण मनुष्य प्राणी म्हणतो तसे होते. शिकण्याच्या या प्रक्रियेलाच समाजीकरण असे म्हणतात. तेव्हा नवजात अर्भकांना सामाजिक प्राणी घडविणारी किंवा बनविणारी प्रक्रिया म्हणजे समाजीकरण होय. या प्रक्रियेमुळेच मानव प्राण्याच्या मुलाला समाजव्यवस्थेत स्थान मिळते व समाजाची संस्कृती आत्मसात करता येते. म्हणूनच समाजीकरणाच्या योगाने मानवशरीरधारी प्राण्याचे मनुष्य प्राण्यामध्ये रूपांतरकरण ( transmutation ) होते. याचा अर्थ असा की जन्मत: पशूंच्या प्रमाणे गरजा व प्रेरणा असलेल्या मानवी व्यक्तीला समाजमान्य पद्धतीने वागण्याचे अगदी लहानपणापासून शिकविल्यामुळे ती व्यक्ती समाजप्रणीत आचारविचारांनुसार आचरण करते इतकेच नव्हे तर ते आचारविचार त्या व्यक्तीच्या व्यक्तीमत्त्वाचे अविभाज्य भाग बनतात. जेव्हा सामाजिक आचार–विचार व मूल्ये व्यक्ती आत्मसात करतात तेव्हाच त्यांना मानवप्राणी अशी संज्ञा दिली जाते आणि व्यक्तीमध्ये सामाजिक आचार–विचार व मूल्ये निर्माण करण्याच्या या प्रक्रियेला समाजीकरण असे म्हणतात.

समाजाच्या दृष्टीने समाजीकरणाचे अतिशय महत्त्व आहे. समाजीकरणामुळेच समाजाचे सातत्य पिढचान्‌पिढचा चालू राहते आणि संस्कृती टिकून राहते. समाजीकरणाच्या मार्गानेच संस्कृतीचे संक्रमण ( transmission of culture ) होते व समाजाच्या संघटित जीवनक्रमामध्ये व्यक्तींना योग्यरीतीने सामावून घेतले जाते. व्यक्तीच्या अगदी लहानपणापासून समाजीकरणाला सुरवात होत असते. त्यामुळे व्यक्ती बालपणीच सामूहिक जीवनात भाग घेण्याला आणि सामाजिक मूल्ये व विचारसरणी काही प्रमाणांत आत्मसात करण्याला शिकते. व्यक्तीच्या प्रौढपणी देखील समाजीकरण चालूच असते. प्रौढपणात व्यक्तीला नवनवीन सामाजिक संघटना व संस्था यामध्ये भाग घ्यावा लागत असल्याने कित्येक गोष्टी शिकावयास मिळतात व अशा गोष्टींचा त्या व्यक्तींच्या जीवनावर परिणाम होतो. प्रौढपणीच्या समाजीकरणातच व्यक्तीला मातृ–पितृपदाची कल्पना येते आणि कौटुंबिक जबाब–दारीची जाणीव होते. अशा रीतीने समाजीकरणामुळे समाजाचा गाडा चालू राहण्यास मदत होते.

समाजाप्रमाणे व्यक्तीच्या दृष्टीने देखील समाजीकरणाचे महत्त्व आहे. समा–जीकरणामुळेच कोणत्याही व्यक्तीला मानव समाजाची संस्कृती आत्मसात करण्यास संधी मिळते व त्यामुळे त्या व्यक्तीला मानवाचे व्यक्तिमत्त्व येते. समाजीकरणाच्या

योगाने मानवशरीर असलेल्याचे ज्याला मानव प्राणी म्हणतात त्यामध्ये रूपांतर होते. समाजीकरणामुळे व्यक्तीला आपल्या स्वत्वाची जाणीव होते आणि सुप्त शक्तींची वाढ करून वैयक्तिक विकासाची संधी मिळते.

समाजीकरणाचे हे महत्त्व लक्षात घेऊन मानवाचा अभ्यास करणारी सर्व विज्ञाने समाजीकरणाचा सांगोपांग अभ्यास करतात. जीवशास्त्र, समाजशास्त्र, मानसशास्त्र व मानवशास्त्र हीं शास्त्रे समाजीकरणाच्या प्रक्रियेचे आपापल्या दृष्टि–कोणातून अध्ययन करीत आहेत. त्यामुळे समाजीकरणाच्या प्रक्रियेविषयी बरीच माहिती उपलब्ध झाली आहे. तरी पण समाजीकरणाच्या प्रक्रियेचे संपूर्ण ज्ञान आपणास अवगत आहे असे म्हणता येणार नाही.

## २. *समाजीकरणाची प्रक्रिया*

समाजीकरणाची प्रक्रिया मनुष्याच्या जैव स्वरूपावर ( biological nature ) आधारलेली आहे. मनुष्यांच्या जैव स्वरूपामुळे समाजीकरण शक्य होते तसेच ते आवश्यकही होते. उदाहरणार्थ, मनुष्याला शिकण्याची व भाषेचा वापर करण्याची जन्मजात क्षमता ( inborn capacity ) नसेल तर त्याचे समाजीकरण होऊ शकणार नाही. शिवाय समाजीकरण झाल्याखेरीज या जन्मजात क्षमतेचा विकासही होणार नाही. म्हणून मनुष्य प्राण्याचे समाजीकरण ज्या प्रमुख जैव लक्षणांवर ( biologicial characteristics ) आधारलेले असते त्यांचा विचार करणे आवश्यक आहे.

**१. प्रेरणा :–** पहिले लक्षण हे की मनुष्याला निश्चित स्वरूपाच्या जीवसंबंधी प्रेरणा ( biological drives ) असतात. ज्या इंद्रियजन्य ताणामुळे (organic tension) मनुष्याला अस्वस्थता (discomfort) भासते त्याला प्रेरणा असे म्हणतात. प्रेरणेमध्ये आवेग (impulse) असतो पण त्यामुळे विवक्षित उद्दिष्टे साध्य करून घेणाऱ्या वर्तनाला चालना मिळत नाही. प्रेरणा कार्य (activity) करण्यासाठी माणसाला प्रवृत्त करते पण कोणते कार्य करावयाचे ते निश्चित करत नाही. भूक, कामवासना यासारख्या जीवसंबंधी प्रेरणांमुळे मनुष्य कार्यप्रवृत्त होतो; पण कार्याची नक्की दिशा आपोआप ठरली जात नाही. प्रेरणांच्या समाधानासाठी कराव्या लागणाऱ्या कार्याची दिशा समाज ठरवीत असतो. तेव्हा जीवसंबंधी प्रेरणांच्या स्वरूपामुळे समाजीकरण शक्य होते व आवश्यकही होते.

**२. परावलंबनः–** प्रत्येक प्राण्याला स्वतःच्या रक्षणासाठी व वाढीसाठी लहानपणी इतरांवर काही काल अवलंबून राहावे लागते. मनुष्य प्राण्यांच्या बाबतीत हा परावलंबनाचा काल इतर प्राण्याच्या मानाने कितीतरी दीर्घ असतो. शिवाय सामूहिक जीवनाला आवश्यक असलेले सामाजिक व तांत्रिक ज्ञान शिकण्यासाठी दिवसेदिवस जास्ती अवधी लागत असल्याने मनुष्याचा परावलंबनाचा कालावधी बराच वाढलेला आहे. या परावलंबनाच्या कालात मनुष्य प्राणी शारीरिक दृष्टचा असाहाय्य व सामाजिक दृष्टचा असमर्थ असतो. म्हणून मुलांचे संरक्षण करण्याची व त्यांना शिक्षण देण्याची जबाबदारी इतरांवर टाकावी लागते. याचा अर्थ असा की परावलंबनाच्या परिस्थितीमुळे समाजीकरणाची शक्यता व आवश्यकता निर्माण होते.

**३. शिक्षणक्षमता :–** मनुष्य प्राण्याला शिक्षण ग्रहण करण्याची क्षमता नसेल तर मनुष्याचा लहानपणीचा परावलंबनाचा दीर्घ कालावधी फुकट जाईल. सर्व माणसांची बुद्धी जरी सारखी नसली तरी इतर प्राण्यांच्या मानाने मनुष्य प्राण्याची बुद्धिमत्ता खचित वरच्या दर्जाची असते. श्रेष्ठ बुद्धिसामर्थ्याची ही देणगी जन्मजात असते. म्हणून मनुष्य प्राणी इतर प्राण्यांपेक्षा जास्ती शिक्षण घेऊ शकतो आणि अध्ययनाचा काल कितीही लांबवू शकतो. चिंपांझी, गोरिला यासारख्या मानवसदृश वानरांची लहान मुले मानवांच्या लहान मुलांप्रमाणे शिकतात व काही बाबतींत जास्ती सुद्धा शिकतात; पण त्यांचा शिक्षणग्रहणाचा वेग पुढे कमी कमी होत जातो. मानवांच्या मुलांचे तसे होत नाही. तेव्हा मनुष्य प्राण्याच्या शिक्षणक्षमतेमुळे समाजीकरण झपाटयाने होऊ शकते व त्याची आवश्यकताही असते.

**४. भाषाक्षमताः–** मनुष्याच्या शिक्षणक्षमतेचा त्याच्या भाषाक्षमतेशी प्रत्यक्ष संबंध आहे. इतर प्राण्यांना नुसती बुद्धी असते; पण मनुष्य प्राण्याला वरच्या दर्जाची बुद्धी असते व शिवाय भाषा शिकण्याचे सामर्थ्य असते. भाषा अवगत असल्यामुळे माणसाला ज्ञानाचा संचय करता येतो, ज्ञानाची देवाणघेवाण करता येते व ज्ञान पुढील पिढयांना देता येते. अशा रीतीने ज्ञान वैयक्तिक मालकीचे न राहता सामूहिक मालकीचे होते. तसेच भाषेमुळे भावना व्यक्त करता येतात व चेतविता पण येतात. शिवाय भाषेमुळे ज्ञानाप्रमाणेच आपली मूल्ये व अभिवृत्ती ( attitudes ) इतरांना सांगता येतात. तेव्हा भाषेच्या साहाय्याने ज्ञान व अभिवृत्ती यांचा प्रसार होत असल्याने मानवी समाजाच्या निर्मितीमध्ये भाषेला प्रमुख घटकाचे ( key factor ) स्थान आहे. मानवांच्या आंतरक्रियांवर समाज आधारलेला असतो आणि भाषेच्या उपयोगामुळे मानवांच्या

आंतरक्रियांचे क्षेत्र कितीतरी विस्तृत होते. तेव्हा मनुष्याला भाषा अवगत करून घेण्याची जन्मजात शक्ती असल्यामुळे मनुष्याचे समाजीकरण सोपे होते व समाजाच्या दृष्टीने ती शक्ती अत्यावश्यक असते.

मनुष्याच्या जैव लक्षणांवरून हे स्पष्ट होते की मनुष्याजवळ शिकण्याचे अफाट सामर्थ्य आहे आणि या शक्तीवरच समाजीकरणाची प्रक्रिया आधारलेली आहे. शिक्षणामुळे समाजीकरण साध्य होते. अर्थात काही शिक्षण चांगले असते तर काही वाईट असते. शिक्षण चांगले कोणते व वाईट कोणते हे समाज ठरवीत असतो. विशिष्ट हेतूने दिलेले व विशिष्ट प्रकारचे दिलेले शिक्षण म्हणजे समाजीकरण होय. व्यक्तींना त्यांच्या दर्जाला अनुरूप असे वर्तन करण्याची पात्रता येण्यासाठी लागणारे शिक्षण समाजीकरणामुळे मिळते. काही विशिष्ट परिस्थितीतच समाजीकरणासाठी दिलेले शिक्षण यशस्वी होते. पहिली गोष्ट अशी की शिक्षणामुळे व्यक्तीला जुने व नवे यामध्ये विभेद ( discrimination ) करता आला पाहिजे. ज्याचे समाजीकरण होत आहे अशा व्यक्तीला प्रचलित असलेले वर्तन प्रकार ( behaviour patterns ) व नवीन माहिती झालेले वर्तनप्रकार यांमध्ये विवेकशक्ती किंवा तारतम्य वापरून फरक करता आला पाहिजे. असे झाले म्हणजे त्या व्यक्तीला नवीन बाबींविषयी आपल्या प्रतिक्रिया योग्य रीतीने व्यक्त करता येणे शक्य होते. दुसरी गोष्ट अशी की शिक्षणात बक्षीस व शिक्षा ( reward and punishment ) या दोन्ही बाबींचा समावेश झाला पाहिजे. ज्याचे समाजीकरण होत आहे अशा मुलाने जर 'बरोबर' कृती केली तर त्याला त्याचे पारितोषिक मिळाले पाहिजे व त्याने जर ' चूक ' कृती केली तर त्याला बक्षीस मिळता कामा नये किंवा त्याला शिक्षा झाली पाहिजे. अर्थात पुरस्कार किंवा शिक्षा मूर्त स्वरूपातच दिली पाहिजे अशातला भाग नाही. लहान मुलाला दिलेली शाबासकी कोणत्याही वस्तूच्या बक्षिसापेक्षा जास्त मोलाची वाटते. बक्षीस व शिक्षा देण्याच्या या पद्धतीमुळे मान्य वर्तन–प्रकारांच्या आचरणाला बळकटी येते. असे झाल्याखेरीज समाजीकरण प्रभावी होत नाही. तिसरी गोष्ट ही की शिक्षणामुळे नैराश्यभावना वाढता कामा नये. समाजीकरणात व्यक्तीचा बऱ्याच प्रमाणात आशाभंग होत असतो. उदाहरणार्थ, व्यक्तीच्या कृतीला विरोध केला, त्याला त्याच्या सुखापासून वंचित केले, किंवा त्याला हवे असलेले दिले नाही तर त्याचा खचित आशाभंग होतो. लहान मुलाच्या बाबतीत हा आशाभंग जास्ती तीव्र असतो कारण आपल्याला शिकविणारी माणसे असे का वागतात हे त्याला समजत नाही. अशा आशाभंगामुळे किंवा नैराश्यभावनेमुळे व्यक्तीच्या मनात आक्रमक भावना निर्माण होतात व काही वेळेला संताप किंवा चीड उत्पन्न होते.

साहजिकच समाजीकरणाला अशा वेळी बाधा येते. म्हणून समाजीकरणाचे शिक्षण चालू असताना व्यक्तीच्या नैराश्यभावनेवर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते. सारांश, समाजीकरण यशस्वी व्हावयाचे असेल तर त्यासाठी दिल्या जाणाऱ्या शिक्षणाने व्यक्तीला विभेद करता आला पाहिजे, व्यक्तीला त्याच्या कृतीप्रमाणे बक्षीस किंवा शिक्षा मिळाली पाहिजे आणि व्यक्तीची नैराश्यभावना प्रबल होणार नाही अशी खबरदारी घेतली पाहिजे.

## ३. समाजीकरणाचे उद्देश

समूहाचा सभासद होण्याकरिता मुलाने कोणत्या गोष्टी अवगत करून घेतल्या पाहिजेत आणि स्वतःच्या सुप्त शक्तींचा विकास साधण्यासाठी व स्थिर समाधान मिळण्यासाठी त्याने काय केले पाहिजे हे समाजीकरणाच्या साहाय्याने समाज मुलाला शिकवीत असतो. कोणत्याही व्यक्तीला सामूहिक जीवनात भाग घेण्याची क्षमता जन्मापासून असत नाही. इतर व्यक्तींचे अस्तित्व लक्षात घेऊन त्यांच्या वर्तनाशी आपल्या वागणुकीचा समन्वय कसा साधावयाचा हे व्यक्तीला शिकावे लागते. समाजीकरणाच्या योगाने आवश्यक असे हे शिक्षण दिले जाते. तेव्हा सामूहिक जीवन व वैयक्तिक विकास साध्य होण्यासाठी कराव्या लागणाऱ्या सामाजिक नियंत्रणाचा एक प्रकार म्हणजे समाजीकरण होय असे म्हणता येईल. समाजीकरणामुळे समाजाच्या व व्यक्तींच्या दृष्टींनी आवश्यक अशा बऱ्याच गोष्टी सफल होतात.

१. समाजीकरणामुळे मूलभूत शिस्तीचे किंवा अनुशासनाचे (discipines) संस्कार मनावर बिंबविले जातात. कोणत्याही बाबतीत नियमबद्धता कशी आणावी ते शिकविले जाते. शिस्तशीर वर्तनावर नेहमी भर दिला जातो. आयुष्यातील ध्येये साध्य करून घेण्यासाठी शिस्तीची आवश्यकता सारखी प्रतिपादन केली जाते. बेशिस्त वर्तनामुळे केवळ तात्कालिक गरजा भागल्या जातात आणि तात्पुरते समाधान मिळते या गोष्टीची जाणीव दिली जाते. तेव्हा भावी परिणाम सुखकारक होण्यासाठी व स्थिर समाधान मिळण्यासाठी शिस्त अंगी बाणण्याचे अविरत प्रयत्न समाजीकरणामुळे केले जातात. अर्थात सर्व व्यक्ती समान प्रमाणात शिस्त आत्मसात करतात अशातला भाग नाही. पण व्यक्तींनी शिस्तीच्या चाकोरीच्या बाहेर जाऊ नये अशी अपेक्षा केली जाते आणि शिस्त कमी प्रमाणात का होईना आत्मसात झालेली दिसून येते.

२. समाजीकरणामुळे उत्कृष्ट आकांक्षा ( aspirations ) हळूहळू मनावर ठसविल्या जातात. शिस्त व आकांक्षा यांचा निकटचा संबंध आहे. कोणत्याही व्यक्तीला शिस्त त्रासदायक व नकोशी असते पण आकांक्षापूर्तीसाठी शिस्त अत्यावश्यक असल्याने व्यक्तीला शिस्त सुसह्य वाटू लागते व व्यक्ती शिस्त आत्मसात करण्याचा प्रयत्न करू लागते. अर्थात कोणत्या आकांक्षा व्यक्तींनी मनात बाळगाव्या व त्या साध्य करून घेण्यासाठी सतत प्रयत्नशील राहावे हे समाज ठरवीत असतो. साधारणपणे सामाजिक मूल्ये जतन करण्याच्या सामान्य आकांक्षाबरोबरच काही विशिष्ट आकांक्षा देखील लोकांच्या समोर समाज ठेवीत असतो. धर्माचे जास्ती महत्त्व असलेला समाज सर्वांनी धर्मरक्षण करावे ही आकांक्षा लोकांच्या मनावर ठसवतो, पण त्याचबरोबर काही लोकांना धर्मोपदेशक होण्याची आकांक्षा बाळगण्यास उद्युक्त करतो. ज्या समाजाची अर्थव्यवस्था प्रगल्भ तंत्रज्ञानावर आधारलेली असते तो समाज आपण शास्त्रज्ञ व तंत्रज्ञ व्हावे अशी आकांक्षा समाजातील काही लोकांच्या तरी मनात निर्माण करीत असतो. अशा आकांक्षापासून आर्थिक फायदा जरी होत नसला तरी त्या आकांक्षा आदर्श समजाव्यात व त्यांच्या पूर्ततेसाठी अविरत परिश्रम घ्यावेत अशी प्रबळ धारणा समाजीकरणामुळे निर्माण होत असते.

३. समाजीकरणामुळे लोकांना सामाजिक भूमिका ( roles ) व त्यांना आवश्यक असणाऱ्या अभिवृत्ती ( attitudes ) यांचे ज्ञान होते. समाजातील कोणतीही भूमिका करताना इतरांशी कसे संबंध ठेवावेत हे समजून घ्यावे लागते. तसेच समाजातील विशेष भूमिकांसाठी (specialized roles) विवक्षित गुणांची जरूरी असते. पुढाऱ्यांना आवश्यक असणारे गुण व तंत्रज्ञांना लागणारे गुण यांत कितीतरी फरक असतो. त्याचप्रमाणे प्रत्येक भूमिकेला योग्य अशा अभिवृत्ती व भावना असाव्या लागतात. विद्यार्थ्यांनी जिज्ञासा बाळगावी, तर शिक्षकांनी ज्ञानदानाची वृत्ती ठेवावी. अधिकाऱ्याने जबाबदारीची जाणीव ठेवावी तर अधिकाऱ्याच्या खालच्या लोकांनी आज्ञाधारकता बाळगावी. तेव्हा प्रत्येक व्यक्तीने आपल्या वर्तनाचा इतरांशी कसा समन्वय साधावा व विवक्षित परिस्थितीत कसे वागावे हे ज्ञान सर्वांच्या दृष्टीने अतिशय आवश्यक असते व ते समाजीकरणामुळे मिळते. .

४. समाजीकरणामुळे विविध कौशल्यांचे ( skills )ज्ञान होते. मोठेपणी कराव्या लागणाऱ्या अनेक गोष्टींना आवश्यक असलेल्या कौशल्यांची माहिती समाजीकरणामुळे होत असते. जीवनाच्या सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक

आदी क्षेत्रांत प्रभावीपणे भाग घेण्यासाठी लागणारी निपुणता समाजीकरणामुळेच येत असल्याकारणाने समाजाच्या व व्यक्तींच्या दृष्टींनी समाजीकरणाला वेगळे महत्त्व आहे.

सारांश, समाजीकरण समाजाला लाभदायक असते. विशेष म्हणजे समाजीकरणामुळे व्यक्तित्वाचा विकास होतो. तेव्हा समाजीकरण व व्यक्तित्वाची जडणघडण याविषयी जास्ती विचार करणे आवश्यक आहे.

## ४. *समाजीकरण व व्यक्तित्वाचा विकास*

कोणत्याही माणसाचे व्यक्तित्व संक्रामण ( transmission ) व पर्यावरण ( environment ) या दोन गोष्टींवर अवलंबून असते. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीला देण्याच्या क्रियेला संक्रामण असे म्हणतात आणि माणसाच्या बाबतीत हे संक्रामण दोन वेगवेगळ्या प्रकाराने होत असते. पहिल्या प्रकाराला आनुवंशिक ( hereditary ) संक्रामण व दुसऱ्या प्रकाराला सामाजिक ( social ) संक्रामण अशी नांवे आहेत. आनुवंशिक संक्रामण मानवांच्या प्रजोत्पादनाच्या यंत्रणेतून ( mechanism of human reproduction ) होत असते व जननशास्त्र ( genetics ) या जीवशास्त्राच्या स्वतंत्र शाखेत आनुवंशिक संक्रामणाचा विशेष अभ्यास केला जातो. सामाजिक संक्रामण मानवांच्या अध्ययनाचा व सांस्कृतिक प्रकटनाच्या यंत्रणेतून ( mechanism of learning and symbolic communication ) होत असते व समाजीकरणाचा अभ्यास ( study of socialization ) या सामाजिक विज्ञानाच्या शाखेत सामाजिक संक्रामणाचा अभ्यास केला जातो. आनुवंशिक संक्रामण व सामाजिक संक्रामण यापैकी कोणत्याही एका प्रकारच्या संक्रामणाने मनुष्य प्राणी बनलेला असत नाही तर तो दोन्ही प्रकारच्या संक्रामणांनी बनलेला असतो. माणसामध्ये दिसून येणाऱ्या दोन्ही प्रकारच्या संक्रामणाच्या प्रक्रिया एकमेकींवर अवलंबून असतात.

मनुष्य हा आनुवंशिक व सामाजिक या दोन प्रकारच्या संक्रामणाच्या गतिशील प्रक्रियांनी बनलेला असतो. तसेच तो भौगोलिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा विविध प्रकारच्या पर्यावरणांनी देखील बनलेला असतो. पर्यावरण असल्याखेरीज माणसामध्ये आनुवंशिक अगर सामाजिक संक्रामण होऊच शकणार नाही. म्हणून प्रत्येक मनुष्याचे व्यक्तित्व संक्रामण व पर्यावरण या दोन गोष्टींनी बनलेले असते. तेव्हा कोणत्याही माणसाच्या व्यक्तित्वाचा विचार करताना त्याच्या दोन प्रकारच्या

संक्रामणाच्या प्रक्रिया व अनेक प्रकारची पर्यावरणे या गोष्टी अवश्य विचारात घेतल्या पाहिजेत. या दोन गोष्टींपैकी कोणती अधिक महत्त्वाची आहे हा प्रश्न बरे–चदा उपस्थित केला जातो. पण असा प्रश्न उपस्थित करणे मुळातच गैर आहे. कारण दोन्ही गोष्टी व्यक्तीच्या विकासाला आवश्यक असतात.

संक्रामण व पर्यावरण व्यक्तीच्या विकासाला आवश्यक असल्याने माणसाच्या व्यक्तित्वाचा अभ्यास करताना या दोन्ही गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. या गोष्टींमध्ये सामाजिक संक्रामण घडवून आणणाऱ्या समाजीकरणाच्या प्रक्रियेला विशेष स्थान आहे. समाजीकरणामुळेच माणसाला मानवांप्रमाणे वर्तन करण्याच्या क्रिया कळतात व मानवांची मनोवृत्ती लाभते. मानवी शरीर असल्यामुळे या क्रिया माणसाला आपोआप अवगत होतात असे घडत नाही. माणसाचे समाजीकरण झाल्याखेरीज त्याला माणसांसारखे वागताच येत नाही. मानवांच्या सहवासाला संपूर्णपणे मुकलेल्या आणि पशूंच्या संपर्कात किंवा अगदी अलगपणे वाढलेल्या मुलांच्या उदाहरणांवरून मानवी वर्तनाच्या व मनोवृत्तीच्या आविष्काराला समाजी–करणाची किती जरूरी आहे हे प्रत्ययास येते. पहिले उदाहरण हिंदुस्तानातील "लांडग्याची मुले" ( wolf children ) म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कमला व अमला या दोन मुलींचे आहे. रेव्हरंड जे. ए. एल. सिंग यांना मिदनापूर जवळील एका लांडग्यांच्या गुहेत (wolf den) अदमासे आठ वर्षांची कमला व दीड वर्षाची अमला या दोन मुली सापडल्या. सापडल्यानंतर थोड्याच दिवसांत अमला निवर्तली. कमला माणसांच्या सहवासात नऊ वर्षे राहिली व वयाच्या सतराव्या वर्षी निवर्तली. या कालातील कमलेच्या वागणुकीचा सविस्तर वृत्तांत रेव्हरंड सिंग यांनी आपल्या १९४२ साली प्रसिद्ध झालेल्या " Wolf Children and Feral Man " या पुस्तकात दिला आहे. कमला सापडली त्यावेळी ती अगदी जनावरासारखी वागत असे. कमला कच्चे न शिजविलेले मास खात असे, जनावरासारखे चार पायांवर चालत असे व त्यांच्याचसारखे आरडत ओरडत असे. माणसांच्या सहवासात राहू लागल्यापासून इतर मुलांप्रमाणे शिजविलेले अन्न खाणे, ताठ चालणे, बोलणे, खेळणे आदी गोष्टी कमला करू लागली. माणसांच्या मुलांसारखे ती वागू लागली. अर्थात माणसांच्या सहवासामुळे व संस्कारामुळे कमलेमध्ये फरक पडला. दुसरे उदाहरण अमेरिकेतील पेन्सिल्व्हे–नियामधील १९३८ साली उघडकीस आलेल्या अंदाजे ६ वर्षे वयाच्या ॲन नावाच्या मुलीचे आहे. अनैतिक संबंधापासून झालेल्या ॲनला सहाव्या महिन्यापासून घराच्या वरच्या मजल्यावरील एका स्वतंत्र खोलीत ठेवण्यात आले होते. माणसांच्या संपर्का-पासून अलिप्त ठेवलेल्या ॲनकडे जिवंत ठेवण्यापलिकडे कसलेच लक्ष दिले नव्हते. सहाव्या वर्षी ॲनला अलिप्त खोलीतून बाहेर काढले. त्यावेळी ॲन अतिशय अशक्त

होती आणि आंधळी व बहिरी असेल असे वाटत होते. तिला चालणे, बोलणे, भावना व्यक्त करणे इत्यादी गोष्टी अवगत नव्हत्या. तिच्या वयाच्या इतर मुलांप्रमाणे अॅन काहीही करू शकत नसे. नंतर अॅनला व्यंग असलेल्या मुलांच्या शाळेत ( school for defectives ) घातले. साडेचार वर्षांनंतर अॅन निवर्तली. या अवधीत अॅनने कितीतरी प्रगती केल्याचे आढळून आले. तिला चालणे, बोलणे, खेळणे, पळणे, ओळखणे, भावना व्यक्त करणे, स्वतःहून काही करणे, इतरांत मिळून मिसळून वागणे इत्यादी गोष्टी येऊ लागल्या. जर अॅन पूर्वीप्रमाणे अलिप्त राहिली असती तर तिला एवढी प्रगती करता आली नसती व ती माणसासारखी झाली नसती. अॅनसारखेच इझाबेल या मुलीचे उदाहरण आहे. अनैतिक संबंधापासून झालेल्या इझाबेलला व तिच्या बहिऱ्या व मुक्या आईला अमेरिकेतील ओहियो गावात एका अंधाऱ्या खोलीत पूर्ण बंदिस्त करून ठेवले होते. इतर व्यक्तींच्या संपर्कापासून अलिप्त राहिलेल्या इझाबेलची वयाच्या सहाव्या वर्षी सुटका झाली. त्यावेळी तिला बोलता येत नव्हते, इतरांशी कसे वागावे हे कळत नव्हते व तिची अगदी लहान मुलासारखी अवस्था होती. सुटका झाल्यानंतर इझाबेलला एका बालमानसशास्त्रज्ञाच्या हवाली करण्यात आले व पुढे तिला शाळेत पाठविण्यात आले. सुटकेनंतर इझाबेलने अतिशय प्रगती केली आणि शाळेतील विविध कार्यक्रमांमध्ये इतर मुलांप्रमाणे ती भाग घेऊ लागली.

या व अशा तऱ्हेच्या इतर उदाहरणांवरून हे स्पष्ट होते की व्यक्तित्वाच्या विकासामध्ये समाजीकरणाचा महत्त्वपूर्ण वाटा आहे. बोलणे, ताठ चालणे, भावना व्यक्त करणे, मिळून मिसळून वागणे अशा प्रकारच्या मानवी वर्तनाच्या अनेक गोष्टी मनुष्यप्राण्यामध्ये जन्मतःच असतात अशी जी लोकांची समजूत असते ती खरी नाही हे या उदाहरणांवरून सिद्ध होते. मनुष्य प्राण्याला मानवी वर्तनाच्या गोष्टी इतरांनी शिकविल्याखेरीज किंवा इतरांनी केलेल्या पाहिल्याखेरीज येत नाहीत. ज्यांना आपण मानवी मनाची विशेष लक्षणे समजतो ती लक्षणे देखील माणसांमध्ये इतर माणसांच्या संपर्कामुळे आलेली असतात. तसेच प्रत्येक माणसाला शिक्षणाची क्षमता असते. कमी किंवा अधिक प्रमाणात मनुष्य शिकू शकतो पण त्यासाठी सामाजिक संपर्काची नितांत आवश्यकता असते. कमला, अॅन व इझाबेल शारीरिक दृष्ट्या इतर मनुष्यप्राण्याप्रमाणेच होत्या. पण मानवी संपर्काच्या अभावी त्यांच्यामध्ये मानवांची विशेष लक्षणे ( human traits ) दिसून येत नव्हती. इतर मानवांच्या संपर्कात आल्यानंतर मात्र त्यांच्यांत फरक पडू लागला व मानवांची लक्षणे त्यांच्यांत येऊ लागली. तेव्हा माणसांमध्ये असलेल्या शिकण्याच्या क्षमतेची वाढ झाल्याखेरीज मानवाची विशेष लक्षणे प्राप्त होत नाहीत व समाजीकरणाच्या

प्रक्रियेमुळेच माणूस शिकू शकतो. म्हणून प्रत्येक मनुष्यप्राण्याला मानवाची मनोवृत्ती ( human mentality ) येण्यासाठी व मानवासारखे वर्तन ( human behaviour ) होण्यासाठी समाजीकरणाची जरूरी असते. अशा प्रकारे समाजीकरणामुळे व्यक्तित्वाचा विकास शक्य होतो.

## ४. समाजीकरणाची साधने

समाजीकरणाच्या योगाने मुलावर संस्कार होत असल्यामुळे कोणतेही मूल पुढे समाजाचा उपयुक्त सभासद होऊ शकते आणि समाजात वावरण्याची व काम करण्याची त्याला पात्रता येते. समाजीकरणाचे हे अनन्यसाधारण महत्त्व लक्षात घेऊन समाज समाजीकरणाचे कार्य केवळ योगायोगाच्या गोष्टींवर अवलंबून ठेवीत नाही. समाजात समाजीकरणाचे कार्य वाटेल तसे होऊ दिले जात नाही तर ते विवक्षित संस्थांच्या मार्फतच होईल अशी दक्षता घेतली जाते. साहजिकच अशा संस्थांचे स्वरूप व कार्य यावर समाज नेहमी नियंत्रण ठेवीत असतो.

कोणत्याही समाजात अधिकारी व्यक्ती आणि समानतेचे नाते असलेल्या व्यक्ती अशा दोन अगदी विभिन्न प्रकारच्या व्यक्तींच्या मार्फत मुलांना संस्कृतीचे विविध स्वरूपाचे ज्ञान देऊन त्यांचे समाजीकरण करण्याचे कार्य चालू असते. मुलांवर सत्ता गाजवू शकणाऱ्या नात्यागोत्यातील वडीलधाऱ्या लोकांचा अधिकारी व्यक्तींच्या सदरात ( authoritarian agency ) समावेश होतो. समानतेचे नाते असलेल्या व्यक्तींच्या सदरात ( equalitarian agency ) मुले ज्यांच्याशी अगदी मोकळेपणाने व समतेच्या भूमिकेवरून वागू शकतात अशा समानधर्मी व्यक्तींचा समावेश होतो. साहजिकच समानतेचे नाते असलेल्या व्यक्ती समवयस्क असतात आणि त्या नात्यागोत्यातीलच असल्या पाहिजेत असा तला भाग असत नाही. या दोन प्रकारच्या व्यक्तींच्याकडून मुलांना मिळणाऱ्या शिक्षणाचे स्वरूप वेगवेगळे असते व त्यांचे परिणाम देखील वेगळे होतात.

समाजीकरणामध्ये आई–बाप, नात्यातील वडीलधारी मंडळी, पालक, शिक्षक अशा अधिकारी व्यक्तींचा वाटा हमखास आढळून येतो आणि त्यांचा उपयोग करून घेणे अगदी आवश्यक असते. समाजात वावरताना लागणाऱ्या आचार–प्रकारांचे ज्ञान मुलामध्ये उपजत नसल्याने व कित्येक आचार–प्रकार शरीरधर्माच्या ( biological inclination ) विरुद्ध असल्याने ते आचार–प्रकार शिकविण्याचे काम मोठे जोखमीचे असते. तसेच नुसते ज्ञान देऊन भागत नाही तर त्याप्रमाणे

मुलांचे वर्तन होते की नाही यावर लक्ष ठेवावे लागते आणि कित्येकदा योग्य वर्तन करून घेण्यासाठी व ते अंगवळणी पडण्यासाठी सक्ती करावी लागते. अशी सक्ती केल्याखेरीज मुलांना प्रौढपणी अंगावर पडणाऱ्या जबाबदाऱ्या पेलण्याची शक्ती येत नाही. तेव्हा असे ज्ञान देणाऱ्यांमध्ये तेवढी पात्रता असली पाहिजे व त्याप्रमाणे वर्तन करून घेण्याची सत्ता असली पाहिजे. म्हणून अधिकारी व्यक्तींचा समाजीकरणासाठी उपयोग करून घेणे आवश्यक असते. अशा अधिकारी व्यक्तींमध्ये मातापित्यांना विशेष महत्त्व दिले जाते. कारण कुटुंबसंस्था सर्वत्र प्रचलित असल्याने मुलांचा लहानपणापासून आई–वडिलांशी अतिशय निकटचा संपर्क असतो. त्यामुळे आई–वडील मुलांना लागणारे आचार–प्रकारांचे ज्ञान सुरवातीपासून देऊ शकतात. शिवाय मुलांना जन्म देणे व त्यांचे संगोपन करणे ही कामे ज्या व्यक्तींची असतात त्याच व्यक्तींवर मुलांच्या समाजीकरणाची जबाबदारी टाकणे समाजाच्या दृष्टीने आवश्यक नसले तरी सोईस्कर असते. सारांश, कोणतीही अधिकारी व्यक्ती समाजाचा प्रतिनिधी म्हणून मुलांच्या समाजीकरणाचे कार्य करीत असते.

अधिकारी व्यक्तींच्याप्रमाणे समानधर्मी व्यक्तींच्याकडून देखील समाजीकरणाचे कार्य सर्वच समाजांतून चालू असल्याचे आढळून येते. अर्थात निश्चित योजनापूर्वक किंवा औपचारिकपणे हे कार्य चालत नाही. वय, लिंग, जात, दर्जा आदी गोष्टी समान असणाऱ्या व्यक्तींमध्ये साहजिकच समतेचे संबंध प्रस्थापित होतात व त्या एकमेकांवर प्रभाव पाडू शकतात. उदाहरणार्थ, समवयस्क मुले समाजीकरणाच्या समान अवस्थेत असल्याने त्यांचा इतरांकडे बघण्याचा दृष्टिकोण व आचारविचार साधारणपणे समान असतात. त्यामुळे समवयस्क लोक एकमेकांना चांगल्या रीतीने ओळखू शकतात व त्यांच्यामध्ये पारस्परिकता ( reciprocity ) निर्माण होऊ शकते. जी गोष्ट समवयस्क लोकांची तीच समलिंगी, समजातीय व समानदर्जा असणाऱ्या व्यक्तींची असते. अशा समानधर्मी व्यक्तींकडून मिळणारे ज्ञान अधिकारी व्यक्तींकडून मिळू शकत नाही. [बारीक सारीक लोकाचार, शब्दांचे विशिष्ट अर्थ, वेगवेगळे नाद व वेड ( fads and crazes ), आनंद उपभोगण्याचे गुप्त मार्ग, निषिद्ध गोष्टींचे ज्ञान इत्यादी संस्कृतीच्या अनौपचारिक बाबींविषयीची ( informal aspects of culture ) माहिती साधारणपणे समानधर्मी व्यक्तींकडूनच लोकांना मिळत असते. कित्येकदा काही गोष्टींचे ज्ञान मुलांना वेळीच देणे सामाजिक दृष्ट्या आवश्यक असते पण समाज ते ज्ञान देत नाही. उदाहरणार्थ, आधुनिक समाजात मुलांना लग्न होईपर्यंत लैंगिक संबंधाचे कसलेही ज्ञान आवश्यक असले तरी देखील उघडपणे देता येत नाही; पण असे ज्ञान मुले समवयस्क मुलांकडून मिळवीत असतात. अर्थात मुलांना समवयस्क मुलांकडून मिळणारे एकूण ज्ञान

त्यांना अधिकारी व्यक्तींकडून मिळणाऱ्या ज्ञानापेक्षा कितीतरी कमी असते. तेव्हा समानधर्मी व्यक्तींकडून लोकांना वर्तनप्रकारांचे ज्ञान मिळत असल्याने त्यांच्या कडूनही अधिकारी व्यक्तींच्याप्रमाणे समाजीकरणाचे कार्य चालू असते.

सारांश, अधिकारी आणि समानधर्मी अशा दोन प्रकारच्या व्यक्तींकडून मुलांच्या समाजीकरणाचे कार्य घडत असते. समाजीकरणाच्या प्रक्रियेत जे ज्ञान देताना अनुशासन व जबाबदारी ( discipline and responsibility ) या बाबींची नितांत जाणीव ठेवावी लागते ते ज्ञान फक्त अधिकारी किंवा सत्ताधारी व्यक्तींच्या कडूनच देण्यात यावे अशी सामान्यतः सोय केलेली असते. इतर बाबतींतील ज्ञान समानधर्मी व्यक्तींकडून मिळत असते. तेव्हा समाजीकरणाच्या गतिशील प्रक्रियेत लिंग, वय व आप्तसंबंध या गोष्टींच्या आधारे मिळालेल्या दर्जाचा उपयोग केला जातो. तसेच अधिकारी व्यक्तींच्या कडून केले जाणारे मुलांच्या समाजीकरणाचे कार्य -- विशेषतः शैशवावस्थेनंतरचे समाजीकरणाचे कार्य -- संमिश्र व परिवर्तनशील अशा आधुनिक समाजात स्वतंत्र स्वरूपाच्या शैक्षणिक संघटनेकडे दिले जाते.

# १२

# व्यक्तिमत्त्व

## १. व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप

नेहमीच्या व्यवहारात ज्या अर्थाने व्यक्तिमत्त्व हा शब्द वापरला जातो त्या अर्थाने तो शब्द समाजशास्त्रीय अभ्यासात उपयोगात आणीत नाहीत. नेहमीच्या व्यवहारात एखाद्याच्या व्यक्तिमत्त्वाचा जेव्हा उल्लेख करण्यात येतो तेव्हा त्याच्या वागण्यातील 'गोडवा' किंवा इतरांवर पडणारी 'छाप' अगर 'प्रभाव' या बाबी मुख्यतः बोलणाऱ्याच्या मनात अभिप्रेत असतात. दुसऱ्यांवर प्रभाव पाड-ण्याच्या गुणधर्माला अनुलक्षून व्यक्तिमत्त्व हा शब्द रोजच्या व्यवहारात वापरला जातो. परंतु समाजशास्त्रात व्यक्तिमत्त्व हा शब्द या अर्थाने कधीच वापरत नाहीत. व्यक्तिमत्त्वाच्या कल्पनेत सामाजिक आशयाला जास्ती महत्त्व असते. सामाजिक अनुभूतीतून व्यक्तिमत्त्व निर्माण होत असते. म्हणून समाजशास्त्रीय अभ्यासात सामाजिक बाबींच्या संदर्भातच व्यक्तिमत्त्व हा शब्द वापरला जातो.

इंग्रजी भाषेत व्यक्तिमत्त्वाला "पर्सनॅलिटी" ( personality ) हा शब्द वापरतात. या शब्दाच्या व्युत्पत्तीवरून देखील व्यक्तिमत्त्वाच्या सामाजिक आशयाचा अर्थबोध होतो. पर्सनॅलिटी हा शब्द इंग्रजी भाषेत 'पर्सोना' ( persona ) या लॅटिन भाषेतील शब्दावरून आला आहे. रंगभूमीवरील नट आपली भूमिका पार

पाडण्याच्या वेळी जे मुखवटे वापरीत असत त्यांना 'पर्सोना' म्हणत. जेव्हा नटाला एक भूमिका बदलून दुसरी करावी लागे तेव्हा तो पहिला 'पर्सोना' अगर मुखवटा बदलून दुसऱ्या भूमिकेला योग्य आसा 'पर्सोना' अगर मुखवटा घालीत असे. अशा रीतीने दुसरी भूमिका करताना तो नट दुसरी व्यक्ती होण्याचा व वेगळे 'व्यक्तिमत्त्व' अगर 'पर्सनॅलिटी' दाखविण्याचा प्रयत्न करत असे. तेव्हा 'पर्सनॅ-लिटी' हा शब्द, एखादी भूमिका करण्यासाठी योग्य रूप घेणाच्या पद्धतीला लावण्यात येऊ लागला. पुढे रंगभूमीपुरता 'पर्सनॅलिटी' हा शद्व मर्यादित न राहता व्यक्तीला कोठेही पार पाडाव्या लागणाऱ्या सामाजिक भूमिकांसाठी तो वापरण्यात येऊ लागला. म्हणून 'पर्सनॅलिटी' या शद्वात अभिप्रेत असलेल्या सामाजिक आशयाला अनुलक्षूनच तो शद्व समाजशास्त्रीय लिखाणात रूढ झाला.

तेव्हा "समहातील व्यक्तीच्या भूमिकेचे स्वरूप ठरविणाऱ्या लक्षणांचे संकलन व संघटन म्हणजे व्यक्तिमत्त्व होय" अशी व्यक्तिमत्त्वाची व्याख्या समाजशास्त्रीय दृष्टिकोणातून **पार्क व बर्गेस** यांनी केली आहे.[1]

तसेच "सामाजिक विज्ञानांचा ज्ञानकोश" (Encyclopaedia of Social Sciences) या ग्रंथात "वागणुकीच्या ज्या पैलूंमुळे कोणत्याही व्यक्तीचा समाजात अर्थबोध होतो व ती व्यक्ती समाजातील इतर व्यक्तींपासून भिन्न ठरते त्या वर्तनाच्या पैलूंची समष्टी म्हणजे व्यक्तिमत्त्व होय" अशी व्यक्तिमत्त्वाची व्याख्या दिली आहे.[2] शिवाय **लुंडबर्ग, श्राग व लार्सेन** या समाजशास्त्रज्ञांनी व्यक्तिमत्त्वाची अशी व्याख्या केली आहे– "व्यक्तीच्या अभिवृत्ती, वर्तनविशेष व लक्षणे यांच्या कमी–जास्ती प्रमाणातील संघटित स्वरूपाच्या समष्टीला व्यक्तिमत्त्व असे म्हणतात."[3]

1. "Personality is the sum and organization of those traits which determine the role of the individual in the group."
   – Park and Burgess.

2. "Personality is the totality ofthose aspects of behaviour which give meaning to an individual in society and differentiate him from other members in the community."
   – Encyclopaedia of Social Sciences.

3. "Personality may be defined as the more or less organized totality of attitudes, habits and traits of the individual."
   – Lundberg, Schrag and Larsen.

व्यक्तिमत्त्वाच्या या व्याख्यांवरून हे दिसून येते की व्यक्ती ज्या स्थितीमध्ये समाजात वावरते किंवा भाग घेते त्या स्थितीवर व्यक्तिमत्त्वाची समाजशास्त्रीय कल्पना आधारलेली आहे. अगदी लहानपणापासून व्यक्तीचे सामाजिक संबंध प्रस्थापित होत असतात व त्यामुळे समाजाच्या विशाल संस्कृतीचे काही पैलू व्यक्तीला मिळत असतात. अशा रीतीने प्रामाणिकपणा, महत्त्वाकांक्षा, आक्रमकता यासारखी लक्षणे व्यक्तीमध्ये दिसून येतात. व्यक्तीच्या सामाजिक संबंधांमुळे अशी लक्षणे व्यक्तीला मिळत असतात. याशिवाय व्यक्तीमध्ये आनुवंशिकतेमुळे जन्मापासून काही लक्षणे असतात. तेव्हा व्यक्तीच्या जन्मजात व संपादित लक्षणाचा समुच्चय म्हणजे त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व होय. अर्थात व्यक्तिमत्त्वाचा भाग होणारी लक्षणे तात्कालिक स्वरूपाची असत नाहीत, तर ती लक्षणे कायम किंवा निरंतर स्वरूपाची असतात. व्यक्तीमध्ये ती लक्षणे त्यामानाने बराच काल दिसून येतात. उदाहरणार्थ, व्यक्तीची स्वभावविषयक लक्षणे ( temperamental traits ) साधारणपणे त्याच स्वरूपात जन्मभर दिसून येतात, त्यात सहसा बदल होत नाही.

जन्मजात व संपादित अशा दोन्ही स्वरूपाची लक्षणे मिळून व्यक्तिमत्त्व बनत असले तरी विशेष महत्त्वाची गोष्ट ही की व्यक्तिमत्त्व-लक्षणांपैकी बहुभाग लक्षणे सामाजिक स्वरूपाची असतात. लक्षणांचा आशय सामाजिक असतो व सामाजिक संबंधांतून ती निर्माण होतात. लज्जाभाव, मैत्रीभाव, अहंभाव यासारखी अनेक व्यक्तिमत्त्व-लक्षणे व्यक्तींच्या परस्पर-संबंधांमुळे उत्पन्न होत असतात. म्हणून व्यक्तिमत्त्व-लक्षणे मुख्यतः सामाजिक बाबींवर आधारलेली असतात.

कोणत्याही व्यक्तीची आनुवंशिक व संपादित लक्षणे मिळून त्या व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व बनत असते. म्हणून हे लक्षात ठेवले पाहिजे की प्रत्येक व्यक्तीला व्यक्तिमत्त्व असते. एखाद्या व्यक्तीला जास्ती व्यक्तिमत्त्व व दुसऱ्या व्यक्तीला कमी व्यक्तिमत्त्व असे कधीही होत नाही. पण नेहमीच्या व्यवहारात ही महत्त्वाची गोष्ट दृष्टिआड केली जाते. रोजच्या व्यवहारात व्यक्तिमत्त्व ही निश्चित स्वरूपाची देणगी आहे असे समजले जाते व त्या अनुरोधाने लोकांजवळ कमी–जास्ती प्रमाणात व्यक्तिमत्त्व असते असे मानले जाते. एखाद्या स्वरूपवान व आकर्षक मुलीला "जास्ती" व्यक्तिमत्त्व आहे व ही लक्षणे नसणाऱ्या मुलीला "कमी" व्यक्तिमत्त्व आहे असे म्हटले जाते. पण शास्त्रीय दृष्ट्या असे म्हणणे अगदी चूक आहे कारण सर्व व्यक्तींना समान प्रमाणात व्यक्तिमत्त्व असते. तेव्हा लोकांच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रमाणात ( degree ) कधीही फरक असत नाही. फरक असतो तो व्यक्तिमत्त्वाच्या स्वरूपात ( kind ). म्हणून एखाद्या व्यक्तीला व्यक्तिमत्त्व नाही अगर व्यक्तिमत्त्व कमी आहे असे केव्हाही होत नाही.

व्यक्तिमत्त्वाचा आशय जरी सामाजिक असला तरी व्यक्तिमत्त्वाला मानसिक बाजू असते आणि ती बाजू महत्त्वाची असते. समाजात समाजीकरणाची प्रक्रिया नेहमी चालू असते आणि या प्रक्रियेमुळे नवीन जन्मलेल्या मनुष्यप्राण्याचे सामाजिक व्यक्तीत रूपांतर केले जाते. असे रूपांतर झाल्याने त्या व्यक्तीला समाजातील लोक व त्यांच्या चालीरीती समजू शकतात आणि समाजातील लोकांना ती व्यक्ती समजू शकते. समाजीकरणाची ही प्रक्रिया यशस्वी होण्यासाठी व्यक्तीला दोन गोष्टी कराव्या लागतात. पहिली गोष्ट म्हणजे व्यक्तीला समाजाचे ज्ञान करून घ्यावे लागते. याचा अर्थ असा की समाजातील व्यक्तींकडून कोणत्या अभिवृत्तींची ( attitudes ) व चालीरीतींची अपेक्षा समाज करतो याचे ज्ञान व्यक्तीला असावे लागते. दुसरी गोष्ट म्हणजे या ज्ञानाचे व्यक्तीने व्यवस्थितपणे संघटन करावे लागते. तसे संघटन केले नाही तर समाजाच्या अपेक्षेप्रमाणे व्यक्तीला समाजात वावरता येणार नाही व आपले कार्य पार पाडता येणार नाही. जेव्हा या दोन्ही गोष्टी साध्य होतात तेव्हा मनुष्यप्राण्याच्या समाजीकरणाची प्रक्रिया पूर्ण होते आणि या प्रक्रियेमुळे मनुष्यप्राणी समाजाच्या अभिवृद्धीला हातभार लावू शकतो व त्याचबरोबर स्वतःच्याही गरजा सुव्यवस्थितपणे भागवू शकतो. म्हणून समाजातील प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या अभिवृत्ती व कृती यांचे संघटन करावे लागते किंवा त्यांचा मेळ बसवावा लागतो. अर्थात ही बाब व्यक्तिगत असते व त्यात मानसिक बाजू महत्त्वाची असते. तेव्हा व्यक्तिमत्त्वाच्या कल्पनेमध्ये व्यक्तीच्या अभिवृत्ती व कृती यांचे संघटन अभिप्रेत असते. हे संघटन अप्रकट ( covert ) स्वरूपाचे असते आणि त्या संघटनेचे ज्ञान व्यक्तीने केलेल्या प्रकट ( overt ) कृतींच्या साहाय्याने आपणास होते. म्हणून व्यक्तिमत्त्व हा शब्द मानसिक घटना ( psychic phenomenon ) सूचित करणारा आहे.

## २. व्यक्तिमत्त्वाचे घटक

मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वावर बऱ्याच गोष्टी परिणाम करीत असतात. त्यात मनुष्याच्या सामाजिक अभिवृत्ती ( social attitudes ), त्याची सामाजिक मूल्य ( social values ) व त्यांची सामाजिक अनुभूतीतून निर्माण झालेली स्वतःबद्दलची जाणीव ( social self ) या गोष्टी प्रमुख आहेत.

कृती करण्याची प्रवृत्ती म्हणजे अभिवृत्ती होय. कृती कोणत्याही वस्तूला उद्देशून करता येते. ती वस्तू कृती करणाऱ्या व्यक्तीशी संबंधित असू शकेल किंवा इतर व्यक्तींशी निगडित असू शकेल. म्हणून मनुष्याला जशा इतर व्यक्तींविषयी अभिवृत्ती

असतात तशाच त्याला स्वत:विषयी देखील अभिवृत्ती असतात. तेव्हा मनुष्याच्या पर्यावरणातील विविध व्यक्ती, समूह, संकल्पना इत्यादी मूर्त व अमूर्त गोष्टींशी मनुष्याच्या अभिवृत्ती संबंधित असतात. अशा गोष्टींशी संबंधित असलेल्या अभि- वृत्तींमध्ये मनुष्याच्या स्वत:विषयीच्या अभिवृत्तींना महत्त्वाचे स्थान असते. विशेष म्हणजे मनुष्याच्या अभिवृत्ती त्याच्या संस्कृतीतून निर्माण होत असतात; समाजातील इतर व्यक्तींकडून त्याला त्या मिळत असतात. म्हणून अभिवृत्ती ही कृती करण्याची इतरांकडून मिळविलेली प्रवृत्ती असते. ज्याप्रमाणे वर्तनाचे प्रकार मनुष्य इतरां- कडून शिकतो त्याचप्रमाणे तो अभिवृत्ती देखील समाजातील इतर व्यक्तींकडून मिळवीत असतो. सामाजिक संबंधांतून मनुष्याच्या अभिवृत्ती तयार होत असतात. उदाहरणार्थ, गौरवर्णीयांची मुले अगदी लहान वयात निग्रो किंवा कृष्णवर्णीय मुलांच्याबरोबर मजेत खेळत असतात. परंतु निग्रोंची मुले चांगली असत नाहीत, त्यांच्यांशी फारसे मिसळू नये इत्यादी गोष्टी जेव्हा गौरवर्णीय मुलांच्या निदर्शनास इतरांकडून आणून दिल्या जातात तेव्हा त्यांचा निग्रो मुलांकडे पाहण्याचा दृष्टिकोण बदलतो व त्यांच्याविषयी विशिष्ट अभिवृत्ती निर्माण होतात. तेव्हा मनुष्यांच्या सामाजिक संबंधांतूनच त्यांच्या अभिवृत्ती तयार होत असतात व त्या- बरहुकूम त्यांचे वर्तन घडत असते. अभिवृत्ती या उपजत किंवा आनुवंशिक असत नाहीत. म्हणून सामाजिक अभिवृत्तींचा व्यक्तिमत्त्वावर हमखास प्रभाव पडत असतो.

मनुष्याच्या सामाजिक अभिवृत्तींच्या प्रमाणे त्याच्या सामाजिक मूल्यांचा देखील त्याच्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम होत असतो. सामाजिक अभिवृत्ती व सामा- जिक मूल्ये यांचे संबंध निकटचे असून पारस्परिक स्वरूपाचे आहेत. सामाजिक अभिवृत्तींचे उद्देश (goals) म्हणजे सामाजिक मूल्ये होत. म्हणून सामाजिक अभि- वृत्ती व सामाजिक मूल्ये एकत्रित आढळून येतात. सामाजिक अभिवृत्तींना सामाजिक मूल्यांची गरज असते आणि सामाजिक मूल्ये सामाजिक अभिवृत्तींशिवाय असूच शकत नाहीत. कोणत्याही वस्तूविषयी मनुष्याला स्पष्ट अगर अस्पष्ट अशी सामाजिक अभिवृत्ती असते आणि या सामाजिक अभिवृत्तीतूनच सामाजिक मूल्य निर्माण होते. तेव्हा सामाजिक मूल्यांचा मानवांच्या पूर्ववृत्तींशी (predispositions) संबंध असत नाही असे कधीही होत नाही. किंबहुना मानवांच्या परस्परसंबंधांतूनच सामाजिक मूल्ये उत्पन्न होतात आणि अशा मूल्यांना अनुरूप असेच वर्तन आपल्याकडून घडावे अशी माणसांची इच्छा असते. अर्थात सामाजिक मूल्यांचे स्वरूप समाजानुसार बदलत असते. हल्लीच्या पाश्चिमात्य देशांतील समाजांत संपत्ती, ऐषआराम, सर सौंदर्याभिलाषा अशा तऱ्हेची सामाजिक मूल्ये दिसून येतात तर भारतातील समाजात

मोक्ष, आत्मिक सुख, परोपकार यांसारखी सामाजिक मूल्ये प्रकर्षाने आढळून येतात. सामाजिक मूल्ये कोणतीही असली तरी प्रत्येक मूल्याला अनुरूप अशा अभिवृत्ती लोकांमध्ये वास करीत असतात. अशा रीतीने कोणत्याही समाजात सामाजिक मूल्ये आणि सामाजिक अभिवृत्ती एकत्रित दिसून येतात. शिवाय, ज्याप्रमाणे मनुष्याला प्रचलित सामाजिक अभिवृत्तींचे ज्ञान होते त्याचप्रमाणे त्याला सामाजिक मूल्यांचेही ज्ञान होते. समाजातील इतर लोकांशी संपर्क आल्यामुळे मनुष्याला साामजिक अभिवृत्ती व सामाजिक मूल्ये अवगत होतात. इतकेच नव्हे तर अशी सामाजिक मूल्ये प्राप्त करून घेणे हे आपले उद्दिष्ट अगर ध्येय आहे असे पुष्कळ लोक मानतात आणि त्या मूल्यांना अनुरूप असे वर्तन ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न करतात. साहजिकच सामाजिक मूल्यांचा व्यक्तिमत्त्वावर परिणाम झाल्याखेरीज राहात नाही. म्हणूनच सामाजिक मूल्यांमध्ये जेथे फरक आढळून येतो तेथे व्यक्तिमत्त्वामध्ये देखील हमखास फरक दिसून येतो.

सामाजिक अभिवृत्ती व सामाजिक मूल्ये याबरोबर मनुष्याच्या स्वतःविषयीच्या कल्पना त्याच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पाडीत असतात. मनुष्याचा 'स्व' किंवा 'आत्मा' हा सामाजिक अनुभूतीतून निर्माण होतो. मुलाला जन्मतः 'स्व' ची भावना असत नाही. ज्याप्रमाणे मोठ्या कुत्र्यांची लक्षणे लहान कुत्र्यांमध्ये हमखास दिसून येतात त्याप्रमाणे मनुष्यप्राण्याची परिस्थिती असत नाही. समाजीकरणाच्या प्रक्रियेमुळे मनुष्याला स्वतःविषयीची जाणीव निर्माण होते. मनुष्याच्या इतर माणसांशी येणाऱ्या संपर्कामुळे त्याला त्याच्या 'स्व' ची किंवा 'आत्म्या' ची कल्पना येऊ लागते. स्वतःच्या आत्म्याची कल्पना येणे ही मानवी प्राण्याचे खास वैशिष्टच आहे. मनुष्येतर प्राण्यांमध्ये 'स्व' बद्दलची ही जाणीव आढळून येत नाही. पशु, पक्षी अगर इतर प्राणी या बाबतीत काही विचार करत असतील असे वाटत नाही. मनुष्यप्राणी स्वतःविषयी काही तरी कल्पना करू शकतो म्हणून तो इतर प्राण्यांच्या मानाने श्रेष्ठ आहे. समाजीकरणाच्या प्रक्रियेमुळे निर्माण होणारी ही स्वतःविषयीची जाणीव सामाजिक संपर्कामुळे सदैव वाढत जाते आणि मनुष्य स्वतःचा इतरांच्या दृष्टिकोणातून विचार करून इतरांना योग्य वाटेल अशा प्रकारचे वर्तन करण्याचा प्रयत्न करू लागतो. अगदी लहानपणी मूल इतर लोकांविषयी विचार देखील करीत नाही. पण मूल जसजसे वाढू लागते तसतसे मुलाला इतरांच्या अस्तित्वाची जाणीव होऊ लागते एवढेच नव्हे तर इतरांची मर्जी संपादन केली पाहिजे हे जाणवू लागते. प्रथम घरातील माणसांनी आपल्याला चांगले म्हणावे असे त्याला वाटू लागते. नंतर इतर लोकांशी संबंध येऊ लागला म्हणजे त्यांनीही आपल्याला बरे म्हणावे असे मुलाला वाटू लागते. अशा रीतीने मनुष्याची आपल्या 'स्व' बद्दलची

जाणीव वाढत जाते व त्या जाणीवेचा मनुष्याच्या वर्तनावर हमखास परिणाम होतो. मनुष्य स्वतःला कितीही स्वतंत्र समजत असला तरी त्याला स्वतःविषयीच्या इतरांच्या मतांची पर्वा करावीच लागते. तेव्हा मनुष्याचे वर्तन त्याच्या ' स्व ' बद्दलच्या जाणीवेवर अवलंबून असते आणि ही जाणीव सामाजिक परिस्थितीतून निर्माण होत असते. म्हणून ' स्व ' चे सामाजिक स्वरूप महत्त्वाचे असते आणि साहजिकच ' स्व ' च्या सामाजिक स्वरूपाचा मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव पडत असतो.

## ३. व्यक्तिमत्त्वाची जडणघडण

समाजीकरणाच्या प्रक्रियेतून व्यक्तिमत्त्व विकसित होत असते. म्हणून व्यक्तिमत्त्वाची रचना एकदम होत नाही तर त्याची हळूहळू उभारणी होते. व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होण्यासाठी बऱ्याच गोष्टी कारणीभूत होतात. त्यापैकी मनुष्याची (अ) शारीरिक लक्षणे, (ब) वैयक्तिक अनुभव व (क) सांस्कृतिक अनुभव या तीन गोष्टी प्रमुख होत.

### (अ) शारीरिक लक्षणे

मनुष्याच्या बऱ्याच शारीरिक लक्षणांचा त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणामध्ये विशेष भाग असतो. पुष्कळशी शारीरिक लक्षणे जन्मजात असल्याकारणाने व त्यांत पुढे फारसा फरक पडत नसल्याने मनुष्याच्या वागणुकीवर व कर्तृत्वावर त्यांचा परिणाम झाल्याखेरीज राहात नाही. साहजिकच व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप अशा शारीरिक लक्षणांवर अवलंबून असते. मनुष्याची मूलभूत बुद्धी ( basic intelligence ) अगर त्याची मानसिक पात्रता ( mental ability ) या शारीरिक लक्षणांचा मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वावर दूरगामी परिणाम होतो. ज्ञान आकलन करून घेण्याची व समस्या सोडविण्याची क्षमता बुद्धीच्या तीव्रतेवर अवलंबून असते. अतिशय मंदबुद्धीच्या माणसाचे व्यक्तिमत्त्व खऱ्या अर्थाने विकसित होणार नाही हे उघड आहे. मनुष्याच्या बुद्धीप्रमाणे त्याचा स्वभावधर्म किंवा प्रकृतिधर्म ( temperament ) देखील माणसाच्या कर्तृत्वाला मर्यादा घालीत असतो व पर्यायाने त्याचे व्यक्तिमत्त्व घडवीत असतो. मनुष्य किती प्रमाणात काम करू शकेल व ते कसे करू शकेल या गोष्टी मनुष्याची प्रकृती ठरवीत असते. काही लोकांत उपजत उत्साह जास्ती असतो. त्यामुळे असे लोक कामही जास्ती करू शकतात. काम करण्याच्या पद्धतीत सुद्धा लोकांमध्ये फरक असतो. काम

करण्याची शक्ती समान प्रमाणात असलेल्या लोकांची काम करण्याची पद्धत समान असते अशातला भाग नाही. काही लोक भावनावश होऊन किंवा कामात रस घेऊन काम करतात तर काही लोक तेच काम निर्विकार मनाने करतात. साहजिकच मनुष्यांच्या स्वभावधर्मानुसार त्याच्या व्यक्तिमत्त्वांत फरक पडत जातो. तसेच व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत मनुष्याची बुद्धी व त्याचा स्वभाव याप्रमाणे त्याचा शरीरबांधा ( body build ) या लक्षणाला विशेष स्थान आहे. शरीरबांध्यामध्ये वैद्यकीय किंवा इतर उपायांनी अगदी अल्प प्रमाणात फरक पाडता येतो. त्यामुळे मनुष्याचा शरीरबांधा जवळ जवळ त्याच स्वरूपात कायम राहातो. परतु समाज मात्र शरीरबांध्यांच्या प्रकारांत योग्यायोग्यतेच्या दृष्टीने भेदभाव करतो. पाश्चिमात्य देशातील समाजांत कमी उंचीच्या पुरुषांना व लठ्ठ स्त्रियांना त्यामानाने कमी लेखले जाते. काही आदिवासी समाजांत अशक्त माणसांना निकृष्ट समजले जाते. साहजिकच समाजाच्या दृष्टीने शरीरबांध्यात कमतरता असलेल्या लोकांत न्यून-गंडाची भावना निर्माण होते. अशी न्यूनता झाकण्यासाठी इतर बाबतींत आपली श्रेष्ठता दाखविण्याचा हे लोक प्रयत्न करतात किंवा न्यून्यगंडाच्या भावनेने सारखे पछाडलेले राहातात. कोणत्याही परिस्थितीत त्याचा व्यक्तिमत्त्वाच्या उभारणीवर परिणाम झाल्याखेरीज राहात नाही. तेव्हा शारीरिक लक्षणांचा किंवा गुणधर्माचा मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या रचनेत मोठा वाटा असतो. शरीरलक्षणांनुसार व्यक्ति-मत्त्वाच्या विकासाला आपोआप मर्यादा पडतात.

### (ब) वैयक्तिक अनुभव

प्रत्येक मनुष्याचे जीवन स्वतंत्र असते. त्याला जीवनात लहानपणापासून वेगवेगळे अनुभव येत असतात आणि या बऱ्या-वाईट अनुभवांचा त्याच्या व्यक्ति-मत्त्वाच्या विकासावर सारखा परिणाम होत असतो. अर्थात ज्या प्रकारचा अनुभव मनुष्याच्या वाटचाला येतो त्याप्रमाणे त्याचे व्यक्तिमत्त्व घडत जाते. मुलाचे आई-बाप शांत, जागरूक व बालहितदक्ष असतील तर ज्या प्रकारचे मुलाला वळण लागेल त्या प्रकारचे वळण ज्या मुलाचे आई-वडील रागीट, निष्काळजी व मुलाकडे दुर्लक्ष करणारे असतील त्या मुलाला लागणार नाही. मात्या-पित्यांच्या स्वभावांचा, सवयींचा व वागणुकींचा मुलांच्या मनावर व वर्तनावर परिणाम होतो व पर्यायाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासात फरक पडत जातो. वडील जर भांडखोर व दुर्व्यसनी असतील तर मुलांमध्ये कलहप्रियता व व्यसनलोलुपता निर्माण होईल व त्यानुसार त्यांचे व्यक्तिमत्त्व बनत जाईल. जी गोष्ट माता-पित्यांची, तीच गोष्ट लहानपणचे खेळगडी, शाळेतील सवंगडी, शिक्षक, मित्र इत्यादिकांची आहे. अशा संबंधित लोकांचा मनुष्याला जसा अनुभव येतो तसे त्याचे व्यक्तिमत्त्व बदलत

जाते. एखाद्या मोठ्या कुटुंबात जन्माला आलेल्या एकुलत्या एक मुलाचे सर्वांकडून होणाऱ्या लाडामुळे व वाजवीपेक्षा जास्ती घेतल्या जाणाऱ्या काळजीमुळे निर्माण होणारे व्यक्तिमत्त्व बरीच मुले असणाऱ्या कुटुंबातील मुलाच्या व्यक्तिमत्त्वापेक्षा निराळे असणार हे उघड आहे. इतकेच नव्हे तर प्रचलित चालीरीतीप्रमाणे ज्या कुटुंबात फक्त वडील मुलालाच विशेष चांगली वागणूक मिळते. त्या कुटुंबात वडील मुलाचे व्यक्तिमत्त्व इतर मुलांच्या व्यक्तिमत्त्वापेक्षा साहजिकपण वेगळे बनत जाते.

मनुष्याच्या जीवनात येणाऱ्या सामान्य अनुभवांचा जसा त्याच्या व्यक्ती–मत्त्वावर परिणाम होतो तसा त्याच्या जीवनात घडून येणाऱ्या असामान्य घटनांचा देखील परिणाम होत असतो. अशा असामान्य घटना जर आघातजन्य ( traumatic ) किंवा भीतिदायक असतील तर त्यांचा व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर सखोल व चिरंतन परिणाम झाल्याखेरीज राहात नाही. अगदी लहानपणी मनात अंधाराची भीती बसणे, राक्षसाची किंवा आडदांड पुरुषाची धास्ती घेणे, कोणीतरी जबर–दस्तीने पळवून नेणे, घरी अगर शाळेत प्रमाणाबाहेर घोर शिक्षा होणे, अपघात, आग, वावटळ आदी अकस्मात घडणाऱ्या बाबींमुळे होणारे नुकसान पाहून धडकी भरणे इत्यादी वैयक्तिक अनुभवांचा मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर दूरगामी परिणाम होत असतो.

तेव्हा मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या वाढींचा विचार करताना त्याच्या जीव–नात घडलेल्या व घडणाऱ्या विविध घटना अवश्य लक्षात घेतल्या पाहिजेत. व्यक्ति-मत्त्व–विकासाची प्रक्रिया आयुष्यभर चालू आसल्याने अशा घटना सदैव विचारात घ्याव्या लागतात. अर्थात एखाद्या घटनेचा सर्व लोकांवर सारखा परिणाम होत नाही. आग, अपघात अगर नैसर्गिक प्रकोप पाहून कामावर तात्काळ परिणाम होईल तर कोणावर चिरकालिक होईल. म्हणून प्रत्येक मनुष्याचा अनुभव हा वेगळा असतो व त्यानुसार त्याचे व्यक्तिमत्त्व बनत असते.

### (क) सांस्कृतिक अनुभव

मनुष्याला येणारे अनुभव व त्यापासून मिळणारे ज्ञान व शिक्षण यांवर त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप अवलंबून असते. सामान्य मनुष्याला सर्वसाधारणपणे येणारे अनुभव त्याच्या समाजाच्या संस्कृतीवर अधिष्ठित झालेले असतात आणि मनुष्याला जन्मापासून ते अनुभव येत असतात. समाजाच्या संस्कृतीत असलेले वागणुकीचे नियम मनुष्यांनी सदैव आचरणात आणावे अशी समाजाची अपेक्षा असते आणि लोकांनी त्याप्रमाणे सातत्याने वर्तन करावे म्हणून नियमांनुसार

वागणाऱ्यांचा गौरव केला जातो व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा दिली जाते. अर्थात सर्व संस्कृतींमध्ये येणारे अनुभव अगर वागणुकीचे नियम समान असत नाहीत. प्रत्येक संस्कृतीत भोजन, वेषभूषा, केशभूषा, आवडीनिवडी, आभरणे, अभिवादन, शिक्षण, व्यवसाय, धर्मकल्पना, हसणे, बोलणे, झोपणे इत्यादी बाबीं–विषयी विविध नियम मान्य झालेले असतात व ते लोकांच्या आचरणात लहान–पणापासून येतील अशी खबरदारी घेतली जाते. साहजिकच अगदी बालपणापासून संस्कृतीतील वागणुकीच्या या पद्धती प्रत्येक मनुष्याला आत्मसात कराव्या लागत असल्याने त्यानुसार त्याचे व्यक्तिमत्त्व बव्हंशी बनत असते.

मनुष्यप्राणी संस्कारक्षम असल्याने अनुभवांचा त्यावर नेहमी परिणाम होत असतो. परिणाम करणारे हे अनुभव संस्कृतीमुळे घडत असतात. संस्कृतीचा किंवा संस्कृतिजन्य अनुभवांचा प्रत्येक मनुष्यावर सर्वतोपरी परिणाम होत असतो आणि ही क्रिया मनुष्याच्या जीवनभर सारखी चालू असते. म्हणून संस्कृतिजन्य अनुभवांचा मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमध्ये अतिशय महत्त्वाचा वाटा असतो. साहजिकच विभिन्न संस्कृती असलेल्या लोकांचे संस्कृतिजन्य अनुभव वेगवेगळे अस–ल्याने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या वैशिष्टचांत देखील फरक पडणे अपरिहार्य असते. तेव्हा विविध संस्कृतींतील फरकांनुसार त्यातील लोकांच्या व्यक्तिमत्त्वांत सुद्धा फरक आढळून येतात.

सारांश, मनुष्याची शारीरिक लक्षणे, त्याचे वैयक्तिक अनुभव व त्याचे संस्कृतिजन्य अनुभव त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत हातभार लावीत अस–तात. या तीन प्रमुख गोष्टींवर व्यक्तिमत्त्वाचा विकास अवलंबून असतो. विशेष म्हणजे या तीन्ही गोष्टी संपूर्णपणे अलग नसून एकमेकांशी संलग्न झालेल्या आहेत. या तिन्ही गोष्टी एकत्र गुंफलेल्या स्वरूपात आढळतात व एकमेकांवर परिणाम करीत असतात. शारीरिक असमर्थता ( उदा. मनोविकृती ) असलेल्या लोकांवर संस्कृतिजन्य अनुभवांचा परिणाम होऊ शकत नसल्याने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा इतरां–प्रमाणे विकास होत नाही. पण मनोदौर्बल्य जर अल्प प्रमाणात असेल व संस्कृतीमुळे प्रत्येकाला स्वास्थ्य व शांतता लाभत असेल तर त्या दौर्बल्याचा व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विपरीत परिणाम होत नाही. तसेच संस्कृतिजन्य अनुभवांना काही वेळेला वैयक्तिक अनुभवाच्या मर्यादा पडत असल्याने संस्कृतिजन्य अनुभवांचा व्यक्तिमत्त्व–विकासात व्हावा तसा परिणाम होत नाही. उदाहरणार्थ, एखाद्या मुलाचे आई–वडील जुन्या प्रकारच्या शिक्षणपद्धतीचे पुरस्कर्ते असतील तर त्या

जाते. एखाद्या मोठ्या कुटुंबात जन्माला आलेल्या एकुलत्या एक मुलाचे सर्वांकडून होणाऱ्या लाडामुळे व वाजवीपेक्षा जास्ती घेतल्या जाणाऱ्या काळजीमुळे निर्माण होणारे व्यक्तिमत्त्व बरीच मुले असणाऱ्या कुटुंबातील मुलाच्या व्यक्तिमत्त्वापेक्षा निराळे असणार हे उघड आहे. इतकेच नव्हे तर प्रचलित चालीरीतीप्रमाणे ज्या कुटुंबात फक्त वडील मुलालाच विशेष चांगली वागणूक मिळते. त्या कुटुंबात वडील मुलाचे व्यक्तिमत्त्व इतर मुलांच्या व्यक्तिमत्त्वापेक्षा साहजिकपण वेगळे बनत जाते.

मनुष्याच्या जीवनात येणाऱ्या सामान्य अनुभवांचा जसा त्याच्या व्यक्ती–मत्त्वावर परिणाम होतो तसा त्याच्या जीवनात घडून येणाऱ्या असामान्य घटनांचा देखील परिणाम होत असतो. अशा असामान्य घटना जर आघातजन्य ( traumatic) किंवा भीतिदायक असतील तर त्यांचा व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर सखोल व चिरंतन परिणाम झाल्याखेरीज राहात नाही. अगदी लहानपणी मनात अंधाराची भीती बसणे, राक्षसाची किंवा आडदांड पुरुषाची धास्ती घेणे, कोणीतरी जबर–दस्तीने पळवून नेणे, घरी अगर शाळेत प्रमाणाबाहेर घोर शिक्षा होणे, अपघात, आग, वावटळ आदी अकस्मात घडणाऱ्या बाबींमुळे होणारे नुकसान पाहून धडकी भरणे इत्यादी वैयक्तिक अनुभवांचा मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर दूरगामी परिणाम होत असतो.

तेव्हा मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या वाढीचा विचार करताना त्याच्या जीव–नात घडलेल्या व घडणाऱ्या विविध घटना अवश्य लक्षात घेतल्या पाहिजेत. व्यक्ति-मत्त्व–विकासाची प्रक्रिया आयुष्यभर चालू आसल्याने अशा घटना सदैव विचारात घ्याव्या लागतात. अर्थात एखाद्या घटनेचा सर्व लोकांवर सारखा परिणाम होत नाही. आग, अपघात अगर नैसर्गिक प्रकोप पाहून कामावर तात्काळ परिणाम होईल तर कोणावर चिरकालिक होईल. म्हणून प्रत्येक मनुष्याचा अनुभव हा वेगळा असतो व त्यानुसार त्याचे व्यक्तिमत्त्व बनत असते.

### (क) सांस्कृतिक अनुभव

मनुष्याला येणारे अनुभव व त्यापासून मिळणारे ज्ञान व शिक्षण यांवर त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप अवलंबून असते. सामान्य मनुष्याला सर्वसाधारणपणे येणारे अनुभव त्याच्या समाजाच्या संस्कृतीवर अधिष्ठित झालेले असतात आणि मनुष्याला जन्मापासून ते अनुभव येत असतात. समाजाच्या संस्कृतीत असलेले वागणुकीचे नियम मनुष्यांनी सदैव आचरणात आणावे अशी समाजाची अपेक्षा असते आणि लोकांनी त्याप्रमाणे सातत्याने वर्तन करावे म्हणून नियमांनुसार

वागणाऱ्यांचा गौरव केला जातो व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा दिली जाते. अर्थात सर्व संस्कृतींमध्ये येणारे अनुभव अगर वागणुकीचे नियम समान असत नाहीत. प्रत्येक संस्कृतीत भोजन, वेषभूषा, केशभूषा, आवडीनिवडी, आभरणे, अभिवादन, शिक्षण, व्यवसाय, धर्मकल्पना, हसणे, बोलणे, झोपणे इत्यादी बाबीं-विषयी विविध नियम मान्य झालेले असतात व ते लोकांच्या आचरणात लहान-पणापासून येतील अशी खबरदारी घेतली जाते. साहजिकच अगदी बालपणापासून संस्कृतीतील वागणुकीच्या या पद्धती प्रत्येक मनुष्याला आत्मसात कराव्या लागत असल्याने त्यानुसार त्याचे व्यक्तिमत्त्व बव्हंशी बनत असते.

मनुष्यप्राणी संस्कारक्षम असल्याने अनुभवांचा त्यावर नेहमी परिणाम होत असतो. परिणाम करणारे हे अनुभव संस्कृतीमुळे घडत असतात. संस्कृतीचा किंवा संस्कृतिजन्य अनुभवांचा प्रत्येक मनुष्यावर सर्वतोपरी परिणाम होत असतो आणि ही क्रिया मनुष्याच्या जीवनभर सारखी चालू असते. म्हणून संस्कृतिजन्य अनुभवांचा मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीमध्ये अतिशय महत्त्वाचा वाटा असतो. साहजिकच विभिन्न संस्कृती असलेल्या लोकांचे संस्कृतिजन्य अनुभव वेगवेगळे अस-ल्याने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या वैशिष्टयांत देखील फरक पडणे अपरिहार्य असते. तेव्हा विविध संस्कृतींतील फरकांनुसार त्यातील लोकांच्या व्यक्तिमत्त्वांत सुद्धा फरक आढळून येतात.

सारांश, मनुष्याची शारीरिक लक्षणे, त्याचे वैयक्तिक अनुभव व त्याचे संस्कृतिजन्य अनुभव त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत हातभार लावीत अस-तात. या तीन प्रमुख गोष्टींवर व्यक्तिमत्त्वाचा विकास अवलंबून असतो. विशेष म्हणजे या तीन्ही गोष्टी संपूर्णपणे अलग नसून एकमेकांशी संलग्न झालेल्या आहेत. या तिन्ही गोष्टी एकत्र गुंफलेल्या स्वरूपात आढळतात व एकमेकांवर परिणाम करीत असतात. शारीरिक असमर्थता ( उदा. मनोविकृती ) असलेल्या लोकांवर संस्कृतिजन्य अनुभवांचा परिणाम होऊ शकत नसल्याने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा इतरां-प्रमाणे विकास होत नाही. पण मनोदौर्बल्य जर अल्प प्रमाणात असेल व संस्कृतीमुळे प्रत्येकाला स्वास्थ्य व शांतता लाभत असेल तर त्या दौर्बल्याचा व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विपरीत परिणाम होत नाही. तसेच संस्कृतिजन्य अनुभवांना काही वेळेला वैयक्तिक अनुभवाच्या मर्यादा पडत असल्याने संस्कृतिजन्य अनुभवांचा व्यक्तिमत्त्व-विकासात व्हावा तसा परिणाम होत नाही. उदाहरणार्थ, एखाद्या मुलाचे आई-वडील जुन्या प्रकारच्या शिक्षणपद्धतीचे पुरस्कर्ते असतील तर त्या

मुलावर प्रचलित असलेल्या नव्या शिक्षणपद्धतीचे संस्कार होणार नाहीत व यामानाने त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास इतरांपासून वेगळा होईल.

## ४. *व्यक्तिमत्त्वाचे संकलन*

व्यक्तिमत्त्वाचा विचार करताना मनुष्याच्या सामाजिक अभिवृत्ती आणि सामाजिक मूल्ये अवश्य लक्षात घेतली पाहिजेत कारण या गोष्टींचा मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वावर हमखास परिणाम होत असतो. तसेच मनुष्याच्या स्वत:बद्दलच्या कल्पना देखील विचारात घ्याव्या लागतात कारण व्यक्तिमत्त्वाच्या स्वरूपात मानसिक बाजू अतिशय महत्त्वाची असते. मनुष्याला स्वत:च्या अभिवृत्ती व कृती यांचा नेहमी मेळ बसवावा लागतो व स्वत:च्या वागण्यात सर्वसाधारणपणे एकरूपता (unity) असावी लागते व ती एकरूपता टिकवावीही लागते. मनुष्यांचा अशी एकरूपता आणण्याचा प्रयत्न सदैव चालू असतो. त्यासाठी नवीन उपस्थित होणाऱ्या सामाजिक गोष्टींचा मनुष्य अंगीकार (assimilation) तरी करतो किंवा त्यांचा परित्याग ( rejection ) तरी करतो. अर्थात स्वत:विषयीच्या कल्पनेशी व सामाजिक मूल्यांशी सुसंगत ठरतील अशा नवीन सामाजिक गोष्टींचाच तेवढा अंगीकार केला जातो व इतर गोष्टींचा परित्याग केला जातो. सामाजिक परिस्थितीमध्ये नेहमी बदल होत असल्याकारणाने नवीन गोष्टींचा अंगीकार करावयाचा की परित्याग करावयाचा याविषयी मनुष्याच्या मनात सारखा संघर्ष चालू असतो आणि या क्रियेतूनच मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होत असतो. असा विकास होत असताना मनुष्याला सामाजिक अभिवृत्ती व कृती यांचे स्वत:बद्दलच्या कल्पनेशी संकलन (integration) करावे लागते. हे संकलन योग्य रीतीने झाले म्हणजे मनुष्याची व्यक्तिगत एकरूपता ( personal unity ) प्रस्थापित होते. ' स्व ' बद्दलची अशी एकरूपता निर्माण होण्यासाठी

(अ) शारीरिक सातत्य ( physical continuity ),
(ब) स्मृती ( memory ),
(क) उद्देशांचा उत्क्रम ( hierarchy of ends ),
(ड) सामाजिक नियमने ( social norms ) व
(इ) सामाजिक दर्जा ( social status )

या गोष्टी कारणीभूत होतात.

## (अ) शारीरिक सातत्य

व्यक्तिमत्त्वाच्या अस्तित्वासाठी शरीराची आवश्यकता असते. सामाजिक अभिवृत्ती व मूल्ये यांतील बदलांमुळे व्यक्तिमत्त्वात फरक पडला तरी व्यक्तिमत्त्व ज्यावर आधारलेले असते ते शरीर कायम असते. शरीरामुळे व्यक्तिमत्त्वाला स्थान ( locus ) मिळते. शिवाय शारीरिक लक्षणांना समाजात विशिष्ट अर्थ दिला जातो आणि त्या दृष्टिकोणातून मनुष्य स्वतःच्या शारीरिक लक्षणांकडे पाहू लागतो. लिंग, वय व वंश या लक्षणांचा सामाजिक दर्जा देताना उपयोग केला जातो. सौंदर्य, शक्ती, शरीरस्वास्थ्य इत्यादी लक्षणांचा सामाजिक संबंधांवर परिणाम होतो. साहजिकच या लक्षणांचा मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वावर देखील पर्यायाने परिणाम होतो. तसेच या लक्षणांपैकी पुष्कळ लक्षणांत अगदी अल्प प्रमाणात बदल होत असल्याने या लक्षणांमुळे येणाऱ्या स्वतःविषयीच्या कल्पनेला स्थिरता प्राप्त होते.

## (ब) स्मृती

मनुष्याच्या स्मृतीची चयनात्मकता ( selectivity ) व व्याप्ती या गोष्टींचा व्यक्तिमत्त्व-संकलनाला फार उपयोग होतो. स्मृतीमुळे घडलेल्या घटना कालानुक्रमे लावल्या जातात व या स्थितीत त्या घटना आपल्यापुढे उपस्थित असतात. अर्थात कोणत्या गोष्टींची स्मृती जतन केली जाते ते मनुष्याच्या त्या गोष्टींशी असणाऱ्या संबंधांवर अवलंबून असते. विशिष्ट सामाजिक परिस्थितीतील महत्त्वाच्या गोष्टींची तेवढी स्मृती ठेवली जाते. ज्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत असे वाटते त्या गोष्टींचीच स्मृती ठेवली जाते आणि साधारणपणे आपल्याला अनुकूल अगर उपयुक्त अशा गोष्टींचीच मनुष्य स्मृती ठेवतो. अनुकूल नसलेल्या ( काही अपवाद वगळून, गोष्टी मनुष्य विसरून जाण्याचा प्रयत्न करीत असतो. उदाहरणार्थ, शेतकऱ्याला त्याच्या शेतीविषयक गोष्टींचेच इतर गोष्टींच्या मानाने विशेष स्मरण असते. तेव्हा चयनात्मक स्मृतीच्या साहाय्याने मनुष्य आपल्या अनुभवांचे संघटन करतो आणि गतकालानुसार स्वतःविषयीची कल्पना निर्माण करतो. साहजिकच व्यक्तिमत्त्व-संकलनाला चयनात्मक स्मृतीची ( selective memory ) फार मदत होते.

## (क) उद्देशांचा उत्क्रम

व्यक्तिमत्त्व-संकलनासाठी मनुष्याला आपल्या विविध उद्देशांचा उत्क्रम ठरविणें किंवा उद्देशांमध्ये तारतम्य करणे अतिशय आवश्यक असते. काही उद्देश महत्त्वाचे असतात असे समजून ते उद्देश साध्य करून घेण्यासाठी मनुष्याची सारखी खटपट चालू असते. या खटपटीमध्ये सामाजिक बाजू प्रमुख असते. कोणते उद्देश

मनुष्याने आपल्यापुढे ठेवावेत हे तो समाजापासून शिकत असतो. स्वतःच्या शारीरिक गरजा ( उदा. अन्न, वस्त्र इत्यादी ) भागविणे यासारखे व्यक्तिगत स्वरूपाचे उद्देश देखील समाजाच्या प्रथेनुसार साध्य केले जातात. जेवण करावयाचे म्हणजे मनुष्य वाटेल ते खात नाही, तर समाजात जे खाद्यपदार्थ रूढ आहेत त्यांचेच तेवढे सेवन करतो. शिवाय, निश्चित केलेल्या उद्देशांचा परस्परांशी मेळ कसा बसवावयाचा ही गोष्ट देखील समाजातील प्रचलित वातावरणावर ( social milieu ) अवलंबून असते. प्रत्येक मनुष्याला अनेक उद्देश साध्य करून घ्यावयाचे असतात; पण त्यासाठी लागणारी साधनसामुग्री मात्र त्याच्याजवळ मर्यादित प्रमाणात असते. साहजिकच विविध उद्देशांचा उत्क्रम लावून त्यानुसार अपुऱ्या साधनसामुग्रीची वाटणी करून मनात ठरविलेल्या अग्रक्रमाप्रमाणे उद्देश साध्य करून घेणे मनुष्याला भाग पडते. तेव्हा विविध उद्देशांचा उत्क्रम ठरविणे ही अतिशय आवश्यक गोष्ट असते आणि तितकीच ती महत्त्वाचीपण असते. कारण मनुष्याने केलेल्या विविध उद्देशांच्या संघटनेवरती त्याची व्यक्तिगत एकरूपता अवलंबून असते. वेगवेगळ्या उद्देशांचा अग्रक्रम स्पष्टपणे लावला पाहिजे. कोणते उद्देश प्रथम साध्य करून घ्यावयाचे व ते कोणत्या क्रमाने घ्यावयाचे याविषयी निश्चित कल्पना मनुष्याला असली पाहिजे. साधारणपणे समाजधारणेला आवश्यक असलेल्या चरम मूल्यांना ( ultimate values ) मनुष्य नेहमी अग्रस्थान देतो आणि त्यानंतर वैयक्तिक उद्देशांचा क्रम लावतो. अशा रीतीने विविध उद्देशांमध्ये व्यवस्थितपणे तारतम्य निश्चित केले म्हणजे मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या संकलनाला मदत होते. नाहीतर व्यक्तिमत्त्वाचे विघटन ( personality disorganization ) होणे अपरिहार्य असते. ज्या मनुष्याला स्वतःच्या उद्देशांत सोपानात्मक क्रमपरंपरा ठरविता येत नाही त्याचे व्यक्तिमत्त्व विघटित स्वरूपाचे असते. तेव्हा मनुष्याने आपल्या अनेक उद्देशांपैकी कोणत्या उद्देशांना किती महत्त्व द्यावयाचे हे निश्चित ठरवून त्याप्रमाणे उद्देशांचा उत्क्रम लावणे महत्त्वाचे असते. अर्थात हा उद्देशांचा उत्क्रम नेहमी त्याच स्वरूपात कायम राहात नाही तर सामाजिक परिस्थित्यनुसार त्यात वेळोवेळी बदल होतो. थोडक्यात, मनुष्याचे उद्देश आणि उद्देशांचा उत्क्रम या दोन्ही बाबी सामाजिक परिस्थितीवर अवलंबून असतात.

### ( ड ) सामाजिक नियमने

प्रचलित सामाजिक नियमनांचे पालन करणे ही गोष्ट व्यक्तिगत एकरूपता निर्माण करण्यास हातभार लावते. कोणत्याही समाजात नियमनांची विशिष्ट व्यवस्था अस्तित्वात असते आणि त्या व्यवस्थेनुसार प्रत्येकाने आपले आचरण ठेवावे अशी समाजाची अपेक्षा असते. तेव्हा सामाजिक नियमनांनी घालून दिलेल्या

नैतिक उद्दिष्टांचे पालन करण्याचा प्रयत्न मनुष्य करीत असतो. पण तसे करीत असताना मनुष्याला नैतिक उद्दिष्टांचा इतर उद्दिष्टांशी मेळ बसवावा लागतो. केवळ नैतिक उद्दिष्टांचे संपूर्ण पालन करून भागत नाही कारण अशाने इतर उद्दिष्टे साध्य करून घेता येणार नाहीत. तसेच नैतिक उद्दिष्टांचे संपूर्ण उल्लंघन करून भागत नाही कारण अशा मनुष्याच्या इतरांशी येणाऱ्या संबंधांत बिघाड उत्पन्न होतो. नैतिक उद्दिष्टांचा इतर उद्दिष्टांशी व्यवस्थित मेळ बसणे व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला पोषक असते. म्हणून नैतिक उद्दिष्टांचा अंतर्भाव असलेल्या सामाजिक नियमनांचे पालन करणे व्यक्तिमत्त्वाच्या संकलनाच्या दृष्टीने नितांत आवश्यक असते.

### (इ) सामाजिक दर्जा

मनुष्य ज्या सामाजिक स्थानांवर ( positions ) असतो व जी कार्ये ( roles ) पार पाडीत असतो त्यावर त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे संकलन अवलंबून असते. मनुष्याच्या सामाजिक दर्जाचा त्याच्या व्यक्तिमत्त्वाशी इतका निकटचा संबंध आहे की सामाजिक दर्जातील बदलानुसार मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वात देखील फरक पडत जातो. सौम्य व भित्रा वाटणारा मनुष्य देखील अधिकाराच्या जागेवर गेल्या-नंतर आक्रमक व निश्चयी बनतो. लग्न झाल्यानंतर मुलीच्या वागणुकीत व विचार-प्रणालीत झपाट्याने बदल होतो. खुनी मनुष्याची स्थिती सुद्धा अशीच बदलत असते. मनुष्याच्या एका स्थानात बदल झाला तरी त्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या स्वरू-पात उल्लेखनीय फरक पडतो. साहजिकच मनुष्याच्या सर्व सामाजिक स्थानांच्या व्यवस्थेचा त्याचे व्यक्तिमत्त्व ठरविण्यामध्ये बराच मोठा भाग असतो हे लक्षात ठेवले पाहिजे. किंबहुना मनुष्य ज्या अनेक स्थानांवर असतो त्यांतून त्याचे व्यक्ति-मत्त्व घडविले जात असते. तेव्हा एखादा मनुष्य ज्या स्थानांवर आहे त्यांची माहिती असली तर त्यावरून त्याच्या व्यक्तिमत्त्वाची त्याला प्रत्यक्ष न पाहता सहज कल्पना करता येते. अर्थात अशाने त्याच्या व्यक्तिमत्त्वाची संपूर्ण कल्पना करता येणार नाही हे उघड आहे कारण व्यक्तिमत्त्वाच्या उभारणीला या खेरीज बऱ्याच गोष्टी कार-णीभूत होतात. असे असले तरी सामाजिक दर्जाचा व्यक्तिमत्त्वाच्या विकासात महत्त्वाचा भाग असतो. प्रत्येक सामाजिक दर्जाला अनुरूप अशा कृती केल्या पाहि-जेत अशी लोकांची अपेक्षा असते. त्यामुळे मनुष्य ज्या विविध स्थानांवर असतो त्या स्थानांना योग्य असे वर्तन करण्याची जबाबदारी त्याच्यावर असते. तेव्हा मनुष्याने आपल्या विविध स्थानांचे स्वतःसाठी संकलन करणे आवश्यक असते. असे संकलन करणे मनुष्याला सोपे जावे अशी खबरदारी प्रत्येक समाजव्यवस्थेत घेतली जाते. ज्या स्थानांवर राहून परस्परांशी विसंगत कृती कराव्या लागणार नाहीत

अशीच स्थाने मनुष्याला मिळावीत अशी सर्वसाधारण व्यवस्था प्रत्येक समाजात केलेली असते. तेव्हा मनुष्य एकाच वेळी ज्या विविध स्थानांवर असतो त्या स्थानां-मध्ये सुसंगतता असावी असा प्रयत्न केला जातो. तसेच मनुष्याला एकामागून एक मिळणाऱ्या स्थानांमध्ये देखील सुसंगतता असावी अशी दक्षता घेतली जाते. यामुळे मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाचे संकलन साधणे कितीतरी सुलभ जाते.

सारांश, व्यक्तिमत्त्वाच्या विकासामध्ये मनुष्याच्या मनोव्यापारांना विशेष महत्त्व असते. आपल्या मनोव्यापारांना संघटित केल्याखेरीज जीवनाला आवश्यक असणारी कार्यक्षमता मनुष्याला येत नाही. मनुष्याच्या स्वतःविषयीच्या कल्पनेत त्याचे मनोव्यापार संघटित झालेले असतात आणि सामाजिक परिस्थितीतून मनुष्य स्वतःविषयीची कल्पना करून घेतो व ती टिकविण्याचा प्रयत्न करतो. तेव्हा व्यक्तिमत्त्वामध्ये मनुष्याची स्वतःबद्दलची कल्पना प्रमुख असते. मनुष्याची स्वतःबद्दलची कल्पना व त्याच्या कृती यांमध्ये सुसंवादित्व प्रस्थापित झाले म्हणजे व्यक्तिमत्त्वाचे संकलन किंवा व्यक्तिगत एकरूपता निर्माण होते. अशी एकरूपता निर्माण करण्या-मध्ये शारीरिक सातत्य, स्मृतीची चयनात्मकता, उद्देशांचा उत्क्रम, सामाजिक नियमनांचे पालन व सामाजिक दर्जांचे स्वरूप या गोष्टींची मदत होते. अर्थात ही एकरूपता जशी साध्य होईल तसे मनुष्याचे व्यक्तिमत्त्व बनत जाते. साहजिकच संकलनाच्या प्रमाणातील फरकांवर मनुष्यांच्या व्यक्तिमत्त्वातील फरक अवलंबून असतात.

## ७. *व्यक्तिमत्त्वाचे विघटन*

मनुष्याला स्वतःच्या अभिवृत्ती व मूल्ये आणि स्वतःच्या कृती यांचा स्वतः-बद्दलच्या कल्पनेशी नेहमी मेळ बसवावा लागतो. असा मेळ प्रस्थापित झाला म्हणजे व्यक्तिमत्त्वाचे संकलन किंवा व्यक्तिगत एकरूपता निर्माण होते. अशा तऱ्हेचे सर्व दृष्टींनी परिपूर्ण सुसंवादित्व कोठेही आढळत नसले तरी सर्वसामान्य लोक मात्र आपल्या आचरणांत हा मेळ येईल असा प्रयत्न करीत असतात. असे सुसंवादित्व साध्य करून घेण्यात असफल झालेल्या मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाचे विघटन होते. व्यक्तिमत्त्वाच्या संकलनाप्रमाणे व्यक्तिमत्त्वाचे विघटन देखील बऱ्याच प्रमाणांत सामाजिक परिस्थितीवर अवलंबून असते. व्यक्तिमत्त्वाच्या संक-लनाला किंवा विघटनाला शारीरिक गोष्टी कारणीभूत होत असतात. पण मुख्यतः सामाजिक जीवनातील घटनाच व्यक्तिमत्त्वाच्या संकलनाला किंवा विघटनाला जबाबदार असतात.

भोवतालच्या सामाजिक परिस्थितीशी यशस्वीपणे अभ्यनुकूलन (adaptation) करून घेण्यात असमर्थ ठरलेल्या मनुष्यांची– किंवा विघटित व्यक्तिमत्त्वांच्या लोकांची -- अनेक उदाहरणे पहावयास मिळतात. भग्न कुटुंबातील (broken family) मुलांना मृत्यु किंवा घटस्फोट यामुळे नवीन संबंध आलेल्या मातेशी किंवा पित्याशी किंवा दोघांशी जुळवून घेणे कित्येकदा शक्य होत नसल्याने अशी मुले मानसिक दृष्ट्या दुर्बळ होतात. अलीकडील काळातील स्त्रीला पत्नीची परंपरागत कर्तव्ये पार पाडणे आणि नौकरी अगर व्यवसाय सांभाळणे या दोन्ही गोष्टी एकाच वेळी चांगल्या रीतीने करणे जमत नसल्याने वाढत्या मानसिक संघर्षाला बळी पडावे लागते. निराशेच्या गर्तेत सापडलेला मनुष्य जिवाला काही तरी विरंगुळा वाटावा म्हणून दारुसारख्या व्यसनांच्या आधीन होतो किंवा गुन्हेगारी करण्यास प्रवृत्त होतो.

व्यक्तिमत्त्वाच्या विघटनेचे सामान्य उदाहरण म्हणून मानसिक विकृती असलेल्या मनुष्याचे देता येईल. मानसिक बिघाड होण्याला शारीरिक कारणांबरोबर सामाजिक कारणे देखील जबाबदार असतात. म्हणून मानसिक विकृतीचा सामाजिक दृष्टिकोणातून विचार करणे आवश्यक आहे. सामाजिक जीवनात लोकांचे परस्परांशी वर्तन कशा प्रकारचे होईल या गोष्टीचे आपण आधीच भाकीत करू शकतो. किंबहुना लोकांच्या वर्तनाच्या पूर्वकथनीयतेवर (predictability) सामाजिक जीवन अवलंबून असते. पूर्वकथनीयता याचा अर्थ मर्यादित आहे. मनुष्य–प्राणी या नात्याने लोक कोणकोणत्या गोष्टी करतील याविषयी अचूक निवेदन करणे म्हणजे पूर्वकथनीयता नव्हे. तर लोकांची उद्दिष्टे कोणती असतात आणि त्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी कोणत्या गोष्टी लोक करतात याविषयी अगाऊ कल्पना असणे म्हणजे पूर्वकथनीयता होय. साधारणपणे सर्वसामान्य लोकांविषयी असे पूर्वकथन आपण करू शकतो. कारण त्यांच्या समाजीकरणाच्या स्वरूपाची आणि त्यांच्या सामाजिक परिस्थितीची आपणांस कल्पना असते. परंतु मानसिक बिघाड झालेल्या माणसांविषयी असे पूर्वकथन आपण करू शकत नाही, कारण त्यांचे वर्तन लोकांच्या सर्वसाधारण अपेक्षेप्रमाणे घडत नाही. मानसिक विकृती झालेल्या मनुष्यांच्या उद्दिष्टांचीच जिथे कल्पना असत नाही तिथे त्यांच्या वर्तनाची कल्पना देणे कठीण असते. तेव्हा लोकांच्या वर्तनाच्या पूर्वकथनीयतेवर मानसिक विकृतीची कल्पना आधारलेली असल्याने मानसिक विकृतीचा आशय सामाजिक असतो हे उघड आहे.

मानसिक विकृतीचा आशय सामाजिक असल्याने मानसिक बिघाड झालेल्या लोकांचे प्रमाण व बिघाडाचे स्वरूप सामाजिक परिस्थित्यनुसार बदलत असते.

मानसिक विकृतीने पछाडलेल्या लोकांचे प्रमाण त्यांच्या समाजाचे स्वरूप, त्यांचे समाजातील स्थान व त्यांच्या जीवनातील विशिष्ट अनुभव या गोष्टींवर अवलंबून असते. अमेरिकेतील प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ **डॉ. बी. मॅलिनोस्की** यांनी ट्रोब्रिआंड बेटावरील रहिवासी, अ‍ॅम्फलेट बेटावरील रहिवासी व न्यू गिनी बेटावरील मैलू नावाचे रहिवासी या तीन आदिवासी जमातींच्या अभ्यासावरून असा निष्कर्ष काढला आहे की या लोकांतील मज्जाविकृतीचे ( neurosis ) स्वरूप व प्रमाण त्यांच्या समाजरचनेवर अवलंबून असते. ट्रोब्रिआंड बेटावरील रहिवाशामध्ये त्यांच्या कुटुंबसंस्थेच्या सुव्यवस्थित रचनेमुळे मज्जाविकृतीने पछाडलेले लोक फार थोड्या प्रमाणात आटळून येतात. परंतु ट्रोब्रिआंड बेटापासून दक्षिणेस फक्त तीस मैलांवर असलेल्या अ‍ॅम्फलेट बेटावरील रहिवाशांचे भाषा व वंश याबाबतीत जरी ट्रोब्रि-आंडच्या रहिवाशांशी साम्य असले तरी त्यांच्या समाजरचनेत बरेच फरक दिसून येतात. अ‍ॅम्फलेटच्या रहिवाशांत वैषयिक नीतिनियमांचे ( sexual mores ) फार काटेकोरपणे पालन केले जाते, विवाहपूर्व संभोगाला सपूर्ण मज्जाव घातला जातो व कुटुंबसंस्थेचे नियंत्रण अतिशय कडक असते. म्हणून अ‍ॅम्फलेटच्या रहिवाशांत मज्जाविकृतीला बळी पडलेले बरेच लोक आढळून येतात. तसेच न्यू गिनी बेटावरील मैलू रहिवाशांची समाजरचना ट्रोब्रिआंडच्या रहिवाशांच्या समाजरचनेपेक्षा लोकांवर फार कडक नियंत्रणे घालणारी असल्याने मैलू लोकांत मज्जाविकृतीचे प्रमाण कितीतरी पटीने अधिक आहे. तसेच **इ. फॅरिस** या मानवशास्त्रज्ञाने असे दाखवून दिले आहे की कांगो देशातील बंटू लोकांची समाजरचना साधी व संकलित स्वरूपाची असल्याने त्यांच्यात मानस-विकृती झालेले लोक सर्वसाधारणपणे आढळून येत नाहीत. तेव्हा या व इतर समाजांच्या केलेल्या तुलनात्मक अभ्यासांवरून असे स्पष्ट प्रतीत होते की विविध समाजांतील लोकांची उद्दिष्टे व वर्तन यांमध्ये बरीच तफावत आढळून येते. विविध उद्देशांमध्ये व नियमनांमध्ये सुसंबद्धता समान प्रमाणात सर्व समाजांत असत नाही. अशी सुसंबद्धता नसली की मानसिक संघर्ष निर्माण होणे व त्यातून मज्जाविकृती निर्माण होणे अपरिहार्य असते. साहजिकच विविध समाजांतील लोकांच्या मज्जाविकृतीचे स्वरूप व फैलाव यामध्ये फरक दिसून येतो. सारांश, मानसिक विकृतीचे प्रमाण व समाजाचे स्वरूप यांचा निकटचा संबंध आहे. इतकेच नव्हे तर कोणत्याही समाजा-तील लोकांचे मानसिक विकृतीला बळी पडण्याचे प्रमाण त्यांच्या समाजातील स्थानांवर ( positions ) अवलंबून असते. जर समाजातील सर्व लोकांनी विशिष्ट उद्दिष्टे साध्य करून घेणे इष्ट व शक्य आहे असे सांगून एखाद्या वर्गातील लोकांवर त्यांना ती उद्दिष्टे साध्य होऊ नयेत म्हणून बंधने घातली तर त्या वर्गातील लोकांमध्ये आशाभंग होऊन त्यांच्यात मानसिक विकृतीचे प्रमाण

वाढण्याची शक्यता असते. अमेरिकेत गोऱ्या व काळचा लोकांची ध्येये समान असतात पण तीं हस्तगत करून घेण्याची संधी मात्र व्यवहारात काळचा लोकांना मिळत नाही. म्हणून व्यक्तींचे समाजातील स्थान व व्यक्तींना येणारे जीवनातील अनुभव यावर त्यांच्यातील मानसिक विकृतीचे प्रमाण आधारलेले असते.

तेव्हा मानसिक विकृतीला सामाजिक आशय असतो आणि विशेष म्हणजे सामाजिक कारणांमुळे अशी विकृती उद्‌भवत असते. अर्थात मानसिक विकृतीला शारीरिक गोष्टीही कारणीभूत होत असतात. म्हणून मानसिक विकृतींना सामाजिक व शारीरिक अशा दोन्ही गोष्टी जबाबदार असतात.

## ६. *संस्कृती व व्यक्तिमत्त्व*

व्यक्तिमत्त्वाची कल्पना साधी नसून ती संमिश्र स्वरूपाची आहे. कारण व्यक्तिमत्त्वाच्या उभारणीत शारीरिक व सामाजिक अशा दोन्ही बाजू महत्त्वाच्या असतात. या सर्व बाजूंचा विचार करता असे दिसून येते की (अ) सार्वत्रिक ( universal ) स्वरूपाच्या, (ब) सामुदायिक ( communal ) स्वरूपाच्या, (क) कार्याधिष्टित (role) स्वरूपाच्या व (ड) व्यक्तिवैशिष्टचाच्या (idiosyncratic) स्वरूपाच्या गोष्टी व्यक्तिमत्त्वाच्या निर्मितीला मूलतः कारणीभूत होतात. म्हणून त्यांना व्यक्तिमत्त्वाच्या निर्धारक गोष्टी ( determinants of personality ) असे म्हणतात.

### (अ) सार्वत्रिक स्वरूपाच्या निर्धारक गोष्टी :
( Universal Determinants )

सर्व माणसे मनुष्यप्राण्याच्या सदरात मोडत असल्याने त्यांच्यामध्ये जन्मापासूनच कित्येक समान गोष्टी आढळून येतात. प्रत्येक मनुष्य–प्राण्याजवळ विवक्षित शारीरिक व मानसिक साधनसामुग्री असते. प्रत्येक मनुष्य हा सामाजिक प्राणी असल्याने समूह करून राहण्याची त्याची प्रवृत्ती असते. तसेच प्रत्येक मनुष्य हा सांस्कृतिक प्राणी असल्याने संस्कृतीची निर्मिती व संक्रामण ( transmission ) करणे त्यास शक्य असते. शिवाय प्रत्येक प्राणी विशिष्ट भौगोलिक परिस्थितीत राहात असल्याने त्या परिस्थितीतील सामान्य गुणधर्म त्याच्यात दिसून येतात. तेव्हा सार्वत्रिक स्वरूपाच्या या गोष्टी सर्व मनुष्यप्राण्यांमध्ये उपजत आढळत असल्याने सर्व माणसांमध्ये व्यक्तिमत्त्वाची काही समान लक्षणे दिसून येतात.

मानसिक विकृतीने एछाडलेल्या लोकांचे प्रमाण त्यांच्या समाजाचे स्वरूप, त्यांचे समाजातील स्थान व त्यांच्या जीवनातील विशिष्ट अनुभव या गोष्टींवर अवलंबून असते. अमेरिकेतील प्रसिद्ध मानवशास्त्रज्ञ **डॉ. बी. मॅलिनोस्की** यांनी ट्रोब्रिआंड बेटावरील रहिवासी, ॲम्फलेट बेटावरील रहिवासी व न्यू गिनी बेटावरील मैलू नावाचे रहिवासी या तीन आदिवासी जमातींच्या अभ्यासावरून असा निष्कर्ष काढला आहे की या लोकांतील मज्जाविकृतीचे ( neurosis ) स्वरूप व प्रमाण त्यांच्या समाजरचनेवर अवलंबून असते. ट्रोब्रिआंड बेटावरील रहिवाशामध्ये त्यांच्या कुटुंबसंस्थेच्या सुव्यवस्थित रचनेमुळे मज्जाविकृतीने पछाडलेले लोक फार थोडचा प्रमाणात आढळून येतात. परंतु ट्रोब्रिआंड बेटापासून दक्षिणेस फक्त तीस मैलांवर असलेल्या ॲम्फलेट बेटावरील रहिवाशांचे भाषा व वंश याबाबतीत जरी ट्रोब्रिआंडच्या रहिवाशांशी साम्य असले तरी त्यांच्या समाजरचनेत बरेच फरक दिसून येतात. ॲम्फलेटच्या रहिवाशांत वैषयिक नीतिनियमांचे ( sexual mores ) फार काटेकोरपणे पालन केले जाते, विवाहपूर्व संभोगाला सपूर्ण मज्जाव घातला जातो व कुटुंबसंस्थेचे नियंत्रण अतिशय कडक असते. म्हणून ॲम्फलेटच्या रहिवाशांत मज्जाविकृतीला बळी पडलेले बरेच लोक आढळून येतात. तसेच न्यू गिनी बेटावरील मैलू रहिवाशांची समाजरचना ट्रोब्रिआंडच्या रहिवाशांच्या समाजरचनेपेक्षा लोकांवर फार कडक नियंत्रणे घालणारी असल्याने मैलू लोकांत मज्जाविकृतीचे प्रमाण कितीतरी पटीने अधिक आहे. तसेच **इ. फॅरिस** या मानवशास्त्रज्ञाने असे दाखवून दिले आहे की कांगो देशातील बंटू लोकांची समाजरचना साधी व संकलित स्वरूपाची असल्याने त्यांच्यात मानस-विकृती झालेले लोक सर्वसाधारणपणे आढळून येत नाहीत. तेव्हा या व इतर समाजांच्या केलेल्या तुलनात्मक अभ्यासांवरून असे स्पष्ट प्रतीत होते की विविध समाजांतील लोकांची उद्दिष्टे व वर्तन यांमध्ये बरीच तफावत आढळून येते. विविध उद्देशांमध्ये व नियमनांमध्ये सुसंबद्धता समान प्रमाणात सर्व समाजांत असत नाही. अशी सुसंबद्धता नसली की मानसिक संघर्ष निर्माण होणे व त्यातून मज्जाविकृती निर्माण होणे अपरिहार्य असते. साहजिकच विविध समाजांतील लोकांच्या मज्जाविकृतीचे स्वरूप व फैलाव यामध्ये फरक दिसून येतो. सारांश, मानसिक विकृतीचे प्रमाण व समाजाचे स्वरूप यांचा निकटचा संबंध आहे. इतकेच नव्हे तर कोणत्याही समाजातील लोकांचे मानसिक विकृतीला बळी पडण्याचे प्रमाण त्यांच्या समाजातील स्थानांवर ( positions ) अवलंबून असते. जर समाजातील सर्व लोकांनी विशिष्ट उद्दिष्टे साध्य करून घेणे इष्ट व शक्य आहे असे सांगून एखाद्या वर्गातील लोकांवर त्यांना ती उद्दिष्टे साध्य होऊ नयेत म्हणून बंधने घातली तर त्या वर्गातील लोकांमध्ये आशाभंग होऊन त्यांच्यात मानसिक विकृतीचे प्रमाण

वाढण्याची शक्यता असते. अमेरिकेत गोऱ्या व काळ्या लोकांची ध्येये समान असतात पण तीं हस्तगत करून घेण्याची संधी मात्र व्यवहारात काळ्या लोकांना मिळत नाही. म्हणून व्यक्तींचे समाजातील स्थान व व्यक्तींना येणारे जीवनातील अनुभव यावर त्यांच्यातील मानसिक विकृतीचे प्रमाण आधारलेले असते.

तेव्हा मानसिक विकृतीला सामाजिक आशय असतो आणि विशेष म्हणजे सामाजिक कारणांमुळे अशी विकृती उद्‌भवत असते. अर्थात मानसिक विकृतीला शारीरिक गोष्टीही कारणीभूत होत असतात. म्हणून मानसिक विकृतींना सामाजिक व शारीरिक अशा दोन्ही गोष्टी जबाबदार असतात.

## ६. *संस्कृती व व्यक्तिमत्व*

व्यक्तिमत्त्वाची कल्पना साधी नसून ती संमिश्र स्वरूपाची आहे. कारण व्यक्तिमत्त्वाच्या उभारणीत शारीरिक व सामाजिक अशा दोन्ही बाजू महत्त्वाच्या असतात. या सर्व बाजूंचा विचार करता असे दिसून येते की (अ) सार्वत्रिक ( universal ) स्वरूपाच्या, (ब) सामुदायिक ( communal ) स्वरूपाच्या, (क) कार्याधिष्टित (role) स्वरूपाच्या व (ड) व्यक्तिवैशिष्टयाच्या (idiosy-ncratic) स्वरूपाच्या गोष्टी व्यक्तिमत्त्वाच्या निर्मितीला मूलतः कारणीभूत होतात. म्हणून त्यांना व्यक्तिमत्त्वाच्या निर्धारक गोष्टी ( determinants of personality ) असे म्हणतात.

### (अ) सार्वत्रिक स्वरूपाच्या निर्धारक गोष्टी :
### ( Universal Determinants )

सर्व माणसे मनुष्यप्राण्याच्या सदरात मोडत असल्याने त्यांच्यामध्ये जन्मापासूनच कित्येक समान गोष्टी आढळून येतात. प्रत्येक मनुष्य–प्राण्याजवळ विवक्षित शारीरिक व मानसिक साधनसामुग्री असते. प्रत्येक मनुष्य हा सामाजिक प्राणी असल्याने समूह करून राहण्याची त्याची प्रवृत्ती असते. तसेच प्रत्येक मनुष्य हा सांस्कृतिक प्राणी असल्याने संस्कृतीची निर्मिती व संक्रामण ( transmission ) करणे त्यास शक्य असते. शिवाय प्रत्येक प्राणी विशिष्ट भौगोलिक परिस्थितीत राहात असल्याने त्या परिस्थितीतील सामान्य गुणधर्म त्याच्यात दिसून येतात. तेव्हा सार्वत्रिक स्वरूपाच्या या गोष्टी सर्व मनुष्यप्राण्यांमध्ये उपजत आढळत असल्याने सर्व माणसांमध्ये व्यक्तिमत्त्वाची काही समान लक्षणे दिसून येतात.

### (ब) सामुदायिक स्वरूपाच्या निर्धारक गोष्टी :
### ( Communal Determinants )

एखाद्या समुदायात किंवा समाजात राहाणाऱ्या लोकांमध्ये समान लक्षणे दिसून येतात. याचा अर्थ असा की एखाद्या समाजातील लोकांची लक्षणे दुसऱ्या समाजातील लोकांच्या लक्षणांहून भिन्न असतात. इंग्लिश समाजातील लोकांची व्यक्तिमत्त्वलक्षणे सर्व इंग्लिश लोकांत दिसून येतात एवढेच नव्हे तर ती लक्षणे फ्रेंच किंवा भारतीय समाजातील लोकांच्या लक्षणांपेक्षा थोडयाफार प्रमाणात वेगळी असतात. कोणत्याही समाजातील सर्व लोकांची मूल्ये समान असतात, त्यांची उद्दिष्टे समान असतात, त्यांची विचारसरणी समान असते व ते लोकांकडून समान वर्तनाची अपेक्षा करीत असतात. यामुळे साहजिकच एखाद्या समाजात राहणाऱ्या लोकांमध्ये समान व्यक्तिमत्त्वलक्षणे आढळून येतात.

### (क) कार्याधिष्ठित स्वरूपाच्या निर्धारक गोष्टी :
### ( Role Determinants )

प्रत्येक समाजात लोकांना वय, लिंग, वैवाहिक स्थिती, कुटुंब यांसारख्या गोष्टींच्या आधारावर स्थाने ( positions ) दिली जातात. इतकेच नव्हे तर प्रत्येक स्थानावर असलेल्या व्यक्तीकडून विशिष्ट तऱ्हेच्या कार्याची समाज अपेक्षा करीत असतो. साहजिकच समान स्थानांवर असलेल्या लोकांना समान प्रकारची कार्ये समाजात करावी लागत असल्याने त्यांच्यात काही विशिष्ट व्यक्तिमत्त्वलक्षणे प्रकर्षाने वास करीत असल्याचे प्रत्ययास येते. अर्थात समाजातील विविध स्थाने व त्यांच्याशी संबंधित असलेली कार्ये संस्कृतीने ठरवून दिलेली असतात. तेव्हा कोणत्याही समाजात समान कार्ये करणाऱ्या लोकांमध्ये समान व्यक्तिमत्त्वलक्षणे आढळून येतात.

### (ड) व्यक्तिवैशिष्ट्याच्या स्वरूपाच्या गोष्टी :
### ( Idiosyncratic Determinants )

प्रत्येक व्यक्तीचा जीवनातील अनुभव अनन्य (unique) स्वरूपाचा असतो आणि प्रत्येक व्यक्तीवर समाजाच्या संस्कृतीचा परिणाम वेगवेगळ्या प्रकाराने होत असतो. एकाच कुटुंबातील सर्व माणसांकडून समाज समान कार्याची अपेक्षा कधीही करीत नाही. कुटुंबातील वडील मुलाचे अपेक्षित कार्य इतर मुलांनी

करावयाच्या कार्यापेक्षा वेगळे असते. म्हणून संस्कृतीचा परिणाम प्रत्येक व्यक्तीवर वेगवेगळ्या प्रमाणात होत असल्याने, प्रत्येक व्यक्तीची स्थाने समान प्रकारची नसल्याने आणि प्रत्येक स्थानावर असलेल्या व्यक्तीकडून अपेक्षित कार्य त्याच स्वरूपात घडत नसल्याने व्यक्तिवैशिष्टयावर देखील व्यक्तिमत्त्वाची काही लक्षणे अवलंबून असतात.

सारांश, मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वावर परिणाम करणाऱ्या निर्धारक गोष्टींची कक्षा अतिशय विशाल आहे. या गोष्टींपैकी काही गोष्टी सर्व मनुष्यप्राण्यांना समान असतात, काही गोष्टी एखाद्या समाजातील सर्व व्यक्तींना लागू पडणाऱ्या असतात, काही गोष्टी एखाद्या समाजातील विशिष्ट स्थानांवर असणाऱ्या किंवा विशिष्ट कार्य करणाऱ्या व्यक्तींमध्ये दिसून येतात, तर काही गोष्टी व्यक्तिवैशिष्टयावर अवलंबून असतात. विशेष म्हणजे या सर्व गोष्टी सांस्कृतिक स्वरूपाच्या आहेत. म्हणून संस्कृतीचा व्यक्तिमत्त्वाच्या उभारणीवर हमखास परिणाम होतो. साहजिकच विविध संस्कृतींतील लोकांच्या व्यक्तिमत्त्वात फरक स्पष्टपणे प्रतीत होतो. प्रत्येक संस्कृतीची मूल्ये व नियमने वेगवेगळी असतात आणि त्या मूल्यांना व नियमनांना अनुसरून लोकांचे वर्तन घडत असते. प्रत्येक संस्कृतीत काही वर्तनप्रकारांना ( patterns of behaviour ) विशेष महत्त्व दिले जाते आणि ते प्रकार प्रत्यक्ष आचरणात आणणाऱ्यांना मान दिला जातो. अर्थात काही लोक या नियमन–प्रणीत वर्तन–प्रकारांचे उल्लंघन करतात. पण अशा नियमनबाह्य वर्तन करणारांची संख्या कोणत्याही समाजात अगदी मोजकी असते. समाजातील बहुसंख्य लोक केव्हाही नियमनांना धरूनच वागत असतात कारण असे वागण्यामुळे इतरांचा रोष पत्करावा लागत नसल्याने जीवन सुरळितपणे व्यतीत करणे सोपे जाते. तेव्हा बहुसंख्य लोकांचे व्यक्तिमत्त्व घडविण्यास संस्कृती कारणीभूत होत असल्यान संस्कृती व व्यक्तिमत्त्व यामध्ये निकटचे संबंध प्रस्थापित होतात.

मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाचे स्वरूप त्याच्यावर होणाऱ्या भोवतालच्या संस्कृतीच्या परिणामावर अवलंबून असते हे खरे पण संस्कृती व व्यक्तिमत्त्व याच्या संबंधामध्ये मनुष्य अगदी निष्क्रिय असतो किंवा संस्कृतीचे होणारे सर्व परिणाम मुकाटयाने ग्रहण करणारा असतो असा याचा अर्थ होत नाही. तसेच संस्कृती प्रत्येक मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वावर सर्वथैव समान रीतीनें परिणाम करीत असते असाही याचा अर्थ होत नाही. म्हणून संस्कृती व व्यक्तिमत्त्व यांचा संबंध कितीतरी जटिल ( complicated ) आहे. स्वभाव, बुद्धिमत्ता, शारीरिक वैशिष्टये इत्यादी उपजत लक्षणांमध्ये मनुष्या–मनुष्यांत भिन्नता असल्या कारणाने

प्रत्येक मनुष्याची संस्कृतिग्रहणक्षमता समान असत नाही. शिवाय मनुष्याला संस्कृतीची ओळख करून देणाऱ्या व संस्कृती शिकविणाऱ्या समूहांचे स्वरूपात देखील अतिशय भिन्नता असते. उदाहरणार्थ, प्रत्येक कुटुंब आपापल्या परीने संस्कृतीतील वेषभूषेपासून धर्मकल्पनेपर्यंतच्या सर्व लहान–मोठ्या गोष्टींचा अर्थ लावीत असते व त्यानुसार आपल्यातील व्यक्तींच्या आचरणावर परिणाम करीत असते. तसेच कोणत्याही संस्कृतीतील वर्तनप्रकार त्याच स्वरूपात कायम राहात नाहीत. संस्कृतीमध्ये विविध उपसंस्कृती निर्माण होण्याची शक्यता असते आणि त्याप्रमाणे वर्तनप्रकारांत बदल होण्याचा संभव असतो.

तेव्हा व्यक्तिमत्त्वाचा अभ्यास करतांना मनुष्याच्या संस्कृतीच्या अंगांचा व संक्रामणाच्या साधनांचा आणि शरीरविषयक बाबींचा साकल्याने विचार केला पाहिजे. प्रत्येक मनुष्यामध्ये शरीरविषयक व संस्कृतीविषयक गोष्टींचे मिश्रण विशिष्ट प्रमाणात होत असल्याने प्रत्येक मनुष्याचे व्यक्तिमत्त्व अनन्य ( unique ) असते. त्यामुळे व्यक्तिमत्त्वामध्ये अनंत बदल संभवतात आणि कोणत्याही दोन माणसांचे व्यक्तिमत्त्व संपूर्णपणे एकमेकासारखे असत नाही.

# १३

# सामाजिक समूह

## १. सामाजिक समूहांचे स्वरूप

मनुष्याला इतरांपासून अलग, एकटे राहाणे आवडत नाही. तो नेहमी समूह करून राहतो. म्हणूनच मनुष्याला समूह करून राहणारा प्राणी ( group animal ) किंवा सामाजिक प्राणी ( social animal ) असे म्हणतात. कोणत्याही मानवी समाजात कितीतरी सामाजिक समूह ( social groups ) असतात आणि मनुष्याचा अनेक सामाजिक समूहांशी संबंध येत असतो. तेव्हा मानवी समाजाचा अभ्यास करताना किंवा मानवांच्या परस्पर-संबधांचा अभ्यास करताना सामाजिक समूहांचा अभ्यास करणे अपरिहार्य असते. कोणत्याही समाजातील सामाजिक समूहांचा विचार केल्याखेरीज त्या समाजाची समाज-रचना ( social structure ) अवगत होणार नाही. सामाजिक समूहांची संख्या ( number ), आकार ( size ) व वैशिष्टचे यासारख्या महत्त्वाच्या गोष्टींवर समाजाची रचना अवलंबून असते. म्हणूनच समाजशास्त्राच्या अभ्यासात सामाजिक समहांच्या अभ्यासाला महत्त्वपूर्ण स्थान आहे.

सर्वसाधारणपणे कोणत्याहीं वस्तूच्या एकमेकांशी अगदी निकट असलेल्या अनेक घटकांच्या समुच्चयाला समूह ही संज्ञा दिली जाते. या अर्थाने जंगलात एकमेकांच्या जवळ असलेल्या वृक्षांचा मिळून समूह होतो, गावात एकमेकांच्या

समीप असलेल्या घरांचा मिळून समूह होतो आणि बंदरात एकत्रित असलेल्या बोटींचा मिळून समूह होतो. परंतु हे नुसते समूह झाले. यांना सामाजिक समूह म्हणता येत नाही कारण त्यांतील एकत्रित असलेल्या घटकांमध्ये कसलीही आंतरक्रिया (interaction) असत नाही. जेव्हा कोणत्याही समूहातील घटकांमध्ये कोणत्या ना कोणत्या प्रकारची आंतरक्रिया चालू असते तेव्हा त्या समूहाला सामाजिक समूह ही संज्ञा प्राप्त होते. पक्ष्यांचा थवा किंवा पशूंचा कळप यामधील घटकांमध्ये आंतरक्रिया सारखी चालू असते. म्हणून पक्ष्यांचे थवे किंवा पशूंचे कळप हे सामाजिक समूहाच्या सदरात येतात. साहाजिकच माणसांचे समूह हे सामाजिक समूह होत. मानवांच्या समूहांत आंतरक्रिया चालू असतात इतकेच नव्हे तर त्या आंतरक्रियांचे नियंत्रण देखील केलेले असते. आंतरक्रिया सतत चालू राहाण्यासाठी समान हेतूंची किंवा उद्दिष्टांची आवश्यकता असते. उद्दिष्टे समान असली म्हणजे ती साध्य करून घेण्यासाठी कराव्या लागणाऱ्या कामात देखील समानता येते. म्हणून समान उद्दिष्टांच्या पूर्तीसाठी एकत्रित येऊन समान कार्ये करणाऱ्या माणसांचा सामाजिक समूह बनतो.

याच दृष्टिकोणातून समाजशास्त्रज्ञांनी सामाजिक समूहाच्या व्याख्या केल्या आहेत. **मेरिल आणि एल्डरेज** यांनी सामाजिक समूहाची अशी व्याख्या केली आहे. "बऱ्याच कालपर्यंत एकमेकांशीं दळणवळण अगर संपर्क ठेवणाऱ्या आणि समान उद्दिष्टानुसार कार्य करणाऱ्या दोन अगर अधिक व्यक्तींना सामाजिक समूह अशी संज्ञा देता येईल." [1] तसेंच "ज्या व्यक्तींच्या समुच्चयातील लोकांमध्ये एकमेकांशी निश्चित स्वरूपाचे संबंध असतात आणि ज्या समुच्चया–विषयी व त्याच्या प्रतीकांविषयी प्रत्येक व्यक्तीला जाणीव असते त्या समुच्चयाला सामाजिक समूह असे म्हणतात" अशी सामाजिक समूहाची व्याख्या इंग्लंडमधील समाजशास्त्रज्ञ **डॉ. टी. बी. बॉटमोर** यांनी केली आहे. [2] शिवाय **ऑग्बर्न व निमकॉफ** या समाजशास्त्रज्ञांनी "जेव्हा दोन किंवा अधिक व्यक्ती एकत्रित येतात

1. "The social group may be defined as two or more persons who are in communication over an appreciable period of time and who act in accordance with a common function or purpose." – Merrill and Eldredge.

2. "A social group may be defined as an aggregate of individuals in which (i) definite relations exist between the individuals comprising it, and (ii) each individual is conscious of the group itself and its symbols."
– T. B. Bottomore.

आणि एकमेकांवर प्रभाव पाडतात तेव्हा त्या व्यक्तींचा सामाजिक समूह अस्तित्वात येतो " असे सामाजिक समूहाचे वर्णन केले आहे.[1] **ब्रूम व स्लेझ्निक** या अमेरिकेतील समाजशास्त्रज्ञांचे असे मत आहे की "जेव्हा व्यक्ती विशिष्ट सामाजिक संबंधांनी एकत्रित बांधल्या जातात आणि अशा संबंधांमुळे इतरांपासून वेगळ्या समजल्या जातात तेव्हा त्या व्यक्तींचा संचय म्हणजे ( सामाजिक ) समूह होय. "[2]

सामाजिक समूहाच्या व्याख्यांवरून असे स्पष्ट दिसून येते की सामाजिक समूह अस्तित्वात येण्यासाठी काही गोष्टी आवश्यक असतात. सामाजिक समूहाच्या निर्मितीमध्ये व्यक्तींच्या मानसिक अवस्थेला फार महत्त्व असते. ज्या व्यक्तींचा मिळून समूह बनतो त्या व्यक्तींच्यामध्ये मानसिक दृष्ट्या एकात्मता असावी लागते. आपणांमध्ये काही बाबतींत समानता आहे, आपणांना समान उद्दिष्टे गाठावयाची आहेत व ती उद्दिष्टे साध्य करून घेण्यासाठी समान कार्यामध्ये आपणांना भाग घ्यावयाचा आहे याची समूहातील व्यक्तींना तीव्र जाणीव असली पाहिजे. अशी जाणीव असल्याखेरीज व्यक्ती एकत्रित येऊन त्यांच्यामध्ये आंतरक्रिया होणार नाहीत व आंतरक्रिया झाल्याखेरीज समूह अस्तित्वात येणार नाहीत. तसेच, समान हेतूंच्या जाणीवेबरोबरच ज्या व्यक्तींचा मिळून समूह बनतो त्यांच्यामध्ये टिकाऊ स्वरूपाचा संपर्क ( durable contact ) असला पाहिजे. स्थायी स्वरूपाच्या संपर्कामुळे आंतरक्रिया सतत चालू राहण्यास मदत होते व त्यातूनच समूहाची निर्मिती होते. शिवाय, ज्या व्यक्तींचा मिळून समूह होतो त्या समूहाला कसली तरी रचना ( structure ) किंवा संघटना ( organization ) असणे आवश्यक असते. ही रचना समूहातील व्यक्तींना मान्य असावी लागते. अशी रचना असली म्हणजे समूहातील व्यक्तींना आपले समान हेतू साध्य करून घेणे सोपे जाते आणि रचनेमुळेच समूहाचे वेगळे अस्तित्व ( entity ) कायम राखणे शक्य होते. तसेच, समान हेतूंच्या पूर्तीसाठी आपणास एकत्रित स्वरूपात कार्य करावयाचे आहे अशी मानसिक भूमिका किंवा जाणीव समूहातील व्यक्तींच्यामध्ये असली पाहिजे. या गोष्टी असल्याखेरीज समूहाला वेगळे अस्तित्व येत नाही, व्यक्ती समूहाशी

---

1. " Whenever two or more individuals come together and influence one another, they may be said to coustitute a social group." – Ogburn and Nimkoff.

2. " The word group refers to any collection of persons who are bound together by a distinctive set of social relations... and set apart from others by their relationship."
– Broom and Selznick.

समरस होऊ शकत नाहीत आणि समूहातील व्यक्तींमध्ये आपण इतरांपासून काही प्रमाणात का होईना पण भिन्न आहोत ही भावना निर्माण होत नाही. या गोष्टींच्या अस्तित्वामुळे कुटुंब, ग्राम, राजकीय पक्ष, कामगार सभा, खेळाडूंचा संघ, सांस्कृतिक मंडळ या प्रकारच्या समूहांना सामाजिक समूह असे म्हणतात. साहजिकच या आवश्यक गोष्टी ज्या समुच्चयात आढळून येत नाहीत त्यांना खऱ्या अर्थाने समूह अशी संज्ञा लावता येणार नाही. त्यांना समूह–कल्प ( quasi–group ) म्हणता येईल. ज्या समुच्चयामधील लोकांत आपल्या वेगळचा अस्तित्वाविषयी जाणीव असत नाही किंवा जाणीव अगदी कमी प्रमाणात असते आणि ज्या समुच्चयाला रचना किंवा संघटना असत नाही त्या ममुच्चयाला समूह–कल्प असे म्हणतात. उच्च, मध्यम, कनिष्ठ या प्रकारच्या वर्गाचे लोक, समान दर्जाचे लोक, समवयस्क लोक, समलिंगी लोक, यांचे समुच्चय समूह-कल्पाची उदाहरणे म्हणून देता येतील. अर्थात आवश्यक गोष्टी घडल्यानंतर समूह–कल्पाचे समूहात केव्हाही रूपांतर होऊ शकते. सामाजिक वर्गातून मजूर पक्षासारखे राजकीय पक्ष निर्माण होतात आणि समलिंगी लोकांतून स्त्रियांची किंवा पुरुषांची स्वतंत्र मंडळे आस्तित्वात येतात.

सामाजिक समूहाच्या स्वरूपाचा विचार करताना त्याची काही अंगे ( aspects ) लक्षात ठेवली पाहिजेत. सामाजिक समूहाचे विशेष अंग हे की सामाजिक समूहाची सीमा ( extent ) मर्यादित असत नाही. सामाजिक समूहाच्या निर्मितीस कमीत कमी दोन लोकांची आवश्यकता असते. दोन मित्रांच्या जोडीचा सामाजिक समूह होऊ शकतो. पण सामाजिक समूहात जास्तीत जास्त किती लोक असावेत हे ठरलेले असत नाही. राष्ट्रासारख्या विशाल सामाजिक समूहात कोटचावधी लोक अससात. तेव्हा सामाजिक समूहाचा विस्तार ठराविक असत नाही. तसेच, सामाजिक समूहाची गतिशीलता ( dynamic nature ) हे त्याचे महत्त्वपूर्ण अंग आहे. सामाजिक समूह सहसा स्थिर ( static ) असत नाही तर तो गतिमान असतो. त्याच्या कार्यात आणि रचनेत नेहमी बदल होत असतात. काही बदल द्रुतगतीने होतात तर काही बदल इतके हळू होतात की ते समूहातील सदस्यांच्या लक्षात देखील येत नाहीत. बदलणाऱ्या कार्यांच्या स्वरूपावर बदल होण्याची गती अवलंबून असते. समूहाच्या कार्यात बदल होऊ लागला की साहजिकच बदलती कार्ये पार पाडण्यासाठी समूहाच्या रचनेत सुद्धा बदल करणे अपरिहार्य असते. शिवाय, सामाजिक समूह आपल्या सदस्यांवर या ना त्या स्वरूपात नियंत्रण ठेवत असतो हे सामाजिक समूहाचे वैशिष्टचपूर्ण अंग आहे. सामाजिक समूहांनी घातलेली कांही नियंत्रणे जाचक असतात तर काही सौम्य असतात आणि काही नियंत्रणांचा परिणाम विस्तृत प्रमाणात होतो तर काहीचा

अगदी अल्प प्रमाणात होतो. कसेही असले तरी नियंत्रणे समूहातील सदस्यांच्या वर्तनाला विशिष्ट वळण लावण्याचा प्रयत्न करीत असतात. अशी नियंत्रणे धर्म, शिक्षण यासारख्या संस्था, कायदे आणि लोकमत या साधनांच्या द्वारे समूहातील सदस्यांवर घातली जातात.

## २. *सामाजिक समूहांची आवश्यकता*

मनुष्य हा समूह करून राहणारा प्राणी आहे. मनुष्याचे सर्व जीवन विविध सामाजिक समूहांत व्यक्तीत होत असते. त्याला अशा समूहांची अतिशय आवश्यकता असते कारण मनुष्याला उपकारक अशी अनेक कार्ये सामाजिक समूह पार पाडीत असतात.

मानवाच्या विकासाला समूहांची सर्वतोपरी मदत होत असते. एक असाहाय्य लहानगा प्राणी म्हणून मनुष्य जन्माला येत असला तरी विकसित मानव होण्याची जैविक क्षमता ( biological potentiality ) त्याच्याजवळ असते. परंतु या जैविक क्षमतेचा विकास कुटुंबासारख्या अनेक समूहांशी संपर्क साधल्यानेच होत असतो. जर समूह-संपर्क साधून या जैविक क्षमतेचा विकास द्रुतगतीने साधला नाही तर मानवी अर्भकाचे मनुष्य-प्राण्यात रूपांतर होत नाही. समूह-संपर्काविना मानवी अर्भकाची स्थिती जनावरांसारखी किंवा उपमानवांसारखी (anthropoids) होते आणि ही गोष्ट बऱ्याच उदाहरणांवरून सिद्ध झाली आहे. अगदी लहानपणी जनावरांनी पळवून नेलेल्या व जनावरांच्या संगतीत राहिलेल्या मानवी अर्भकांची वाढ मनुष्यप्राण्यासारखी न होता जनावरासारखी होते असे आढळून आले आहे. तसेच लहानपणापासून सामाजिक संपर्क नसलेल्या व अगदी अलिप्तपणे राहिलेल्या मानवी अर्भकांची वाढ देखील इतर मुलांसारखी होत नाही असे दिसून आले आहे. अशा अर्भकांना जर पुढे सामाजिक संपर्काचा लाभ झाला तर त्यांच्यात बदल होऊन ती मुले इतर मुलांसारखी प्रगती करू शकतात असे प्रत्ययास आले आहे. याचा अर्थ असा की मानवाला आपल्या जवळील जैविक क्षमतेचा विकास केल्याखेरीज मनुष्यप्राणी बनता येत नाही आणि या निसर्गदत्त क्षमतेचा विकास आपोआप होत नाही तर तो सामाजिक संपर्कानेच होतो. म्हणून मनुष्य-स्वभावाच्या विकासासाठी ( development of human nature ) सामाजिक संपर्काची नितांत आवश्यकता आहे.

मनुष्य हा इतर मनुष्यांच्या संगतीत आला म्हणजे तो खऱ्या अर्थाने मानव होतो; त्याला इतर मानवांत मिसळता येते आणि इतर मानव देखील त्याला आपल्यासारखा प्राणी समजतात. मनुष्याचे मानवीकरण ( humanisation ) झाल्याखेरीज तो मानवप्राणी या सदरात सर्वार्थाने येऊ शकत नाही. मनुष्याच्या जीवनात अत्यंत महत्त्वाची असलेली ही मानवीकरणाची प्रक्रिया सामाजिक समूहांच्या साहाय्याने संपन्न होत असते. म्हणून सामाजिक समूह हे मानवीकरणाचे प्रत्यक्ष साधन ( actual agent of humanisation ) आहे. विशिष्ट हेतूंच्या पूर्तीसाठी सामाजिक समूह अस्तित्वात येत असल्याने आपल्यातील लोकांकडून विविध नियंत्रणांच्या द्वारे योग्य ते वर्तन घडेल अशी खबरदारी सामाजिक समूह घेत असतात. त्यामुळे सामाजिक समूहांचा लोकांच्या वागणुकीवर विशेष परिणाम होत असतो. कुटुंब, विद्यालय, धर्म-संघ, कामगार संभा, राजकीय पक्ष यासारख्या सामाजिक समूहांकडून आपल्या लोकांच्या वर्तनाला वळण लावण्याचे काम सदैव चालू असते व हे कार्य जास्तीत जास्त परिणामकारक करण्याची त्यांची खटपट असते. म्हणून सामाजिक समूह हे मानवीकरणाचे प्रभावी साधन आहे. यासाठी सामाजिक समूहाची अतिशय आवश्यकता आहे.

## ३. सामाजिक समूहांचे वर्गीकरण

सामाजिक समूहांची लोकांना नितांत आवश्यकता असल्याने कोणत्याही समाजात ते दिसून येतात. त्यांची संख्या ठराविक असत नाही. अनेक कारणांनी त्यांच्या संख्येत बदल होत असतो. नवीन समूहांची जशी भर पडत असते तसे काही समूह नामशेष देखील होत असतात. तसेच समूहांचे स्वरूप, रचना, कार्यक्षेत्र इत्यादी बाबतींत सुद्धा बदल होत असतात. अनेक गोष्टींत समूहा-समूहांमध्ये फरक आढळून येतात. यामुळे समूहांचे वर्गीकरण करणे सोपे नाही आणि कोणत्याही एका निकषावर सर्व समूहांचे समाधानकारक वर्गीकरण करता येणार नाही. म्हणून विविध कसोटचा वापरून समूहांचे वर्गीकरण केले जाते. त्यापैकी प्रमुख निकषानुसार सामाजिक समूहांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण केले जाते.

### १. आकार

जर्मनीतील प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ **जार्ज सिमेल** यांनी समूहांच्या आकाराच्या ( size ) आधारावर त्यांचे वर्गीकरण केले आहे. समूहाचा आकार समूहातील सदस्यांच्या संख्येवर अवलंबून असतो आणि समूहाच्या आकाराचा समूहाच्या

रचनेवर व सदस्यांच्या आंतरक्रियांवर परिणाम होतो. म्हणून समूहाच्या अभ्यासात समूहाच्या आकाराला बरेच महत्त्व आहे. समूहांच्या आकारांवरून समाजजीवनाची कल्पना येण्यास मदत होते. समाजात कुटुंबासारखे लहान आणि राष्ट्रासारखे मोठे समूह आढळून येतात. समूहाच्या विस्ताराला मर्यादा असत नाहीत.

## २. इच्छा

अमेरिकेतील समाजशास्त्रज्ञ **लेस्टर वार्ड** आणि **एफ. एच. गिडिंग्ज** यांनी समूहाचे सदस्य होण्यास इच्छा किंवा संमती या गोष्टींची जरूरी असते किंवा नाही या निकषावर (अ) **ऐच्छिक समूह** (voluntary groups) आणि (ब) **अनिवार्य समूह** (involuntary groups) अशा दोन वर्गांत समूहांची विभागणी केली आहे. कित्येक समूहांचे सदस्य होणे हे व्यक्तींच्या इच्छेवर अवलंबून असते. अशा समूहांना ऐच्छिक समूह असे म्हणतात. राजकीय पक्ष, कामगार संघ, संगीत सभा, भाषाप्रेमी मंडळ यासारखे समूह ऐच्छिक स्वरूपाचे असतात. यांचे सदस्यत्व पत्करण्याची किंवा टिकविण्याची सक्ती असत नाही. परंतु कुटुंब, वंश (race) यासारख्या समूहाचे सदस्य होण्यास संमतीचा प्रश्नच उद्भवत नाही. ज्या कुटुंबात अगर वंशात मनुष्याचा जन्म झालेला असतो त्याच कुटुंबाचा अगर वंशाचा तो सदस्य होतो. कोणत्या कुटुंबाचा अगर वंशाचा आपण सदस्य होऊ हे मनुष्याच्या मर्जीवर आधारलेले असत नाही. म्हणून अशा समूहांना अनिवार्य समूह अशी संज्ञा दिली जाते.

## ३. हितसंबंध

आपले हितसंबंध (interest) सुरक्षित राहावेत किंवा वाढावेत यासाठी मनुष्य समूहांची स्थापना करीत असतो. मनुष्याचे हितसंबंध मर्यादित असत नाहीत व त्यांचा विस्तार (range) देखील मोठा असतो. तेव्हा कोणत्या हितसंबंधांना अनुलक्षून समूहांची निर्मिती केली आहे या निकषावर समूहांचे (अ) **विशिष्ट हितसंबंधित समूह** (specific interest groups) व (ब) **समावेशक हितसंबंधित समूह** ( inclusive interest groups ) अशा दोन विभागांत वर्गीकरण केले जाते. मंडळासारख्या (associations) समूहांची रचना विवक्षित हितांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी झालेली असते. क्रीडा मंडळे, नाटय परिषदा, साहित्य सभा यासारखे समूह विशिष्ट हेतूपूर्तीसाठी कार्य करीत असल्याने ते पहिल्या विभागात मोडतात. याच्या उलट समुदाय ( community ) सारखे समूह विशिष्ट व मर्यादित हितसंबंधांना अनुलक्षून कार्य करीत नाहीत तर ते आपल्या सदस्यांच्या सर्व प्रकारच्या हितसंबंधांकडे लक्ष देत असतात. मनुष्याचे सर्व जीवन समुदायात

व्यतीत होत असल्याने समुदाय विवक्षित हितापुरते मर्यादित असत नाहीत. म्हणून ग्राम, ( village community ) नगर ( city community ), राष्ट्र ( nation community ), यासारखे समुदाय दुसऱ्या विभागात मोडतात.

### ४. कालावधी

समूहांच्या अस्तित्वाला कालमर्यादा असत नाही. काही समूह अल्पकालिक असतात तर काही शाश्वत स्वरूपाचे असतात. तेव्हा समूहाची समयमर्यादा किती असते या कसोटीवरून समूहांचे (अ) **अस्थायी समूह** ( temporary groups ) आणि (ब) **स्थायी समूह** ( permanent groups ) अशा दोन विभागांत वर्गीकरण केले जाते. झुंड किंवा जमाव ( crowd ) यासारखे समूह तात्पुरत्या स्वरूपाचे किंवा अल्पकालीन असल्याने ते अस्थायी समूहांच्या सदरात येतात. याच्या उलट वर्ग ( class ), समुदाय ( community ) यासारखे समूह क्षणजीवी असत नाहीत तर जवळ जवळ कायमच्या स्वरूपाचे असतात कारण त्यांना आपल्या सदस्यांच्या हितसंबंधांकडे सदैव लक्ष द्यावे लागते. म्हणून असे समूह दुसऱ्या विभागात मोडतात. स्थायी समूहांचे हितसंबंध कायम टिकणारे असतात.

### ५. संघटना

समूहाच्या निर्मितीसाठी रचना ( structure ) किंवा संघटना ( organization ) याची आवश्यकता असते. समूहाला संघटना नसेल तर सदस्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवून आपले हेतू साध्य करून घेणे समूहाला शक्य होणार नाही. समूहाला संघटना आवश्यक असली तरी तिचे प्रमाण ( degree ) ठराविक असत नाही. तेव्हा संघटनेचे प्रमाण या निकषावर समूहांचे (अ) **विशेष संघटित समूह** ( highly organized groups ) आणि (ब) **बहुतांशी असंघटित समूह** ( largely unorganized groups ) असे दोन विभाग पाडले जातात. कारखाना ( factory ), राज्यशासन ( Government ) यासारखे सुग्रथित समूह पहिल्या विभागात मोडतात. याच्या उलट जवळ जवळ संघटनाविरहित असलेले झुंड किंवा जमाव, वर्ग ( class ) यासारखे समूह दुसऱ्या विभागात येतात.

### ६. व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोण

सामाजिक समूहांचे व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोणातून देखील वर्गीकरण केले जाते आणि असे वर्गीकरण समाजजीवनाची कल्पना येण्यासाठी विशेष महत्त्वाचे समजले

जाते. समूहातील सदस्यांचा आपल्या व इतर समूहांकडे पाहण्याचा व्यक्तिसापेक्ष असा विशिष्ट दृष्टिकोण असतो. प्रत्येक मनुष्य ज्या समूहांचा सदस्य असतो त्या समूहांकडे आपलेपणाच्या दृष्टीने पाहात असतो व त्या समूहांचा अभिमान बाळगत असतो. आपल्या कुटुंबाचे, जातीचे, धर्माचे, पक्षाचे, धंद्याचे लोक यांनी बनलेल्या समूहांकडे मनुष्य सहानुभूतीच्या व सहकार्याच्या दृष्टिकोणातून पाहात असतो. मनुष्यांचा हा विशिष्ट दृष्टिकोण सदस्य नसलेल्या इतर समूहांकडे पाहण्याचा असत नाही. एवढेच नव्हे तर याच्या अगदी उलट दृष्टिकोण इतर समूहांविषयी असतो. म्हणून मनुष्याच्या अशा व्यक्तिगत दृष्टिकोणाच्या आधारावर समूहाचे (अ) **अंतःसमूह** ( in-group ) किंवा **आमचा समूह** ( we-group ) आणि (ब) **बहिःसमूह** ( out-group ) किंवा **इतरांचा समूह** ( others group )अशा दोन विभागांत वर्गीकरण केले जाते. अमेरिकेतील प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ **विल्यम सम्नर** यांनी १९०६ साली आपल्या " Folkways " ( लोकाचार ) या ग्रंथात हे वर्गीकरण प्रथम उपयोगात आणले आणि तेव्हापासून ते सर्वमान्य झाले आहे.

ज्या समूहातील सदस्यांमध्ये एखाद्या व्यक्तीची गणना होते आणि ज्या समूहातील सदस्यांमध्ये प्रातिनिधिक सामाजिक संबंध ( typical social relations ) आढळून येतात तो समूह त्या व्यक्तीच्या दृष्टीने अंतःसमूह होतो. या अर्थाने मनुष्य ज्या कुटुंबाचा सदस्य असतो ते कुटुंब त्याचे अंतःसमूह बनते. जी गोष्ट कुटुंबाची तीच गोष्ट जात, धर्म, वंश, धंदा इत्यादी बाबींवर आधारलेल्या समूहांची असते. अंतःसमूहातील सदस्यांमध्ये आपलेपणाचे, मित्रत्वाचे, सहानुभूतीचे, सहकार्याचे, निष्ठेचे आणि ऐक्यभावनेचे सामाजिक संबंध असतात तसेच, आपण इतरांचे संरक्षण केले पाहिजे अशी निश्चित स्वरूपाची कर्तव्यभावना ( sense of obligation ) प्रत्येक व्यक्ती अंतःसमूहातील इतर सदस्यांविषयी बाळगीत असते. शिवाय, अंतःसमूहातील व्यक्ती परस्परांविषयीच्या प्रेमभावना उघडपणे व्यक्त करतात आणि एकमेकांशी अगदी घरोब्याचे किंवा मोकळेपणाचे संबंध ठेवतात. कित्येकदा अंतःसमूहातील सदस्यांची भाषा समान असते व उच्चारपद्धती विशिष्ट धर्तीची असते. सारांश, प्रत्येक व्यक्ती आपल्या अंतःसमूहाशी समरस झालेली असते. अर्थात हे समरस होण्याचे प्रमाण अंतःसमूहांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. ज्या अंतःसमूहात व्यक्तीच्या प्रमुख गरजा भागविल्या जातात व हितसंबंध सुरक्षित राखले जातात त्या अंतःसमूहांशी व्यक्ती जास्ती प्रमाणात समरस होते. हिंदू समाजात जातीसारख्या अंतःसमूहात व्यक्तीला पुष्कळसे समाधान लाभत असल्याने प्रत्येक व्यक्ती जातीशी बऱ्याच प्रमाणात समरस झालेली दिसून येते. परंतु पाश्चिमात्य समाजात लोक वर्गासारख्या अंतःसमूहात त्या प्रमाणात समरस झालेले आढळून येत नाहीत.

जे लोक एखाद्या व्यक्तीच्या अंत:समूहात समाविष्ट होऊं शकत नाहीत त्या लोकांचा त्या व्यक्तीच्या दृष्टीने बहि:समूह बनतो. या अर्थाने व्यक्तीच्या कुटुंबात नसलेल्या लोकांची कुटुंबे त्या व्यक्तीच्या दृष्टीने बहि:समूह होतात. याच अर्थाने हिंदुधर्मीय लोकांच्या दृष्टीने इस्लाम, बौद्ध अगर अन्य धर्मीय लोक बहि:समूह या सदरात येतात. जी गोष्ट जातीची व धर्माची, तीच गोष्ट भाषा, वंश, राज्य, धंदा आदी बाबींवर आधारलेल्या समूहांची असते. बहि:समूहातील लोकांना बाहेरचे, परके अगर शत्रू असे समजले जाते आणि त्यांना टाळण्याचे किंवा त्यांची कुचेष्टा करण्याचे प्रयत्न केले जातात. बहि:समूहातील लोकांशी सहकार्याचे, सहानुभूतीचे अगर निष्ठेचे संबंध असत नाहीत. इतकेच नव्हे तर त्यांच्याविषयी तिरस्काराची अगर पक्षपाताची भावना असते.

अंत:समूहातील लोकांच्या बहि:समूहातील लोकांविषयी दुरावलेल्या भावना असतात हे खरे. पण या दुरावलेल्या भावनांची तीव्रता सर्व काळी सारखी असत नाही. सर्वसाधारण परिस्थितीत या भावना त्या मानाने कमी तीव्र असतात व कित्येकदा मर्यादित असतात. परंतु आणीबाणीच्या काळी किंवा युद्धकाळी त्या भावना अतिशय तीव्र होतात. युद्धकाळी शत्रूपक्षाच्या लोकांचा बहि:समूह बनत असल्याने त्यांच्याशी केलेले कसलेही शत्रुत्वाचे वर्तन क्षम्य ठरते इतकेच नव्हे तर त्यांना कैद करणे, गुलाम बनविणे, ठार करणे यासारख्या गोष्टी करणाऱ्या अंत:समूहातील लोकांचा गौरव केला जातो.

अंत:समूहातील लोकांच्या बहि:समूहातील लोकांविषयी असणाऱ्या भावना सार्वत्रिक स्वरूपाच्या आहेत. त्या विशिष्ट समाजांतच आढळून येतात असे नाही. तर त्या मागासलेल्या आणि पुढारलेल्या अशा सर्व थराच्या समाजांत हमखास दिसून यतात कारण त्या भावना स्वसमूहश्रेष्ठतावादावर ( ethnocentrism ) आधारलेल्या असतात. प्रत्येक समूहातील लोकांना असे वाटत असते की आपली संस्कृती इतरांपेक्षा उच्च दर्जाची आहे. आपण इतरांपेक्षा श्रेष्ठ आहोत आणि आमचा समूह अगदी महत्त्वाचा आहे. त्यालाच स्वसमूहश्रेष्ठतावाद असे म्हणतात आणि तो सर्व समाजांत आढळून येतो म्हणून अंत:समूहाचे बहि:समूहाशी असणारे विरोधात्मक संबंध कोणत्याही समाजरचनेत प्रकर्षाने आढळून येतात.

समूहांचे अंत:समूह व बहि:समूह या दोन प्रकारांत केलेले वर्गीकरण समाजशास्त्रीय दृष्ट्या सामाजिक समस्यांचे आकलन होण्यासाठी अतिशय महत्त्वाचे आहे. या वर्गीकरणामुळे समाजात संघर्ष उत्पन्न करणाऱ्या परिस्थितींची कल्पना

येण्यास मदत होते इतकेच नव्हे तर व्यक्तीचे समाजीकरण, सामाजिक व सांस्कृतिक परिवर्तन, सामाजिक नियंत्रण व सामाजिक विकृती यासारख्या समाजशास्त्रीय प्रश्नांचे सम्यक् आकलन होण्यास मदत होते.

अंत:समूह व बहि:समूह यांचा विचार करताना हे लक्षात ठेवले पाहिजे की समूहांचे हे वर्गीकरण समूहांच्या रचनेतील फरकांवर आधारलेले नसून ते व्यक्तींच्या समूहांकडे पाहण्याच्या दृष्टिकोणातील फरकांवर आधारलेले आहे.

## ७. संपर्क व निकटता

समूहातील सदस्यांमध्ये असलेले संपर्काचे स्वरूप ( type of contact ) व निकटतेचे प्रमाण ( degree of intimacy ) या कसोटीवरून समूहांचे ( अ ) **प्राथमिक समूह** ( primary groups ) आणि (ब) **दुय्यम समूह** ( secondary groups ) अशा दोन विभागांत वर्गीकरण केले जाते. ज्या समूहांतील सदस्यांमध्ये प्रत्यक्ष व समोरासमोरचे संपर्क ( direct and face-to-face contact ) आढळून येतात व बरेच निकटतेचे संबंध दिसून येतात त्या समूहांना प्राथमिक समूह असे म्हणतात. अर्थात असे समूह आकाराने लहान असतात. कुटुंब, खेळातील **सवंगड्यांचा** समूह ( play group ), शेजारी शेजारी राहणाऱ्या लोकांचा समूह ( neighbourhood group ), जिवलग मित्रांचा समूह ( friendship group) व खेडे ही प्राथमिक समूहांची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. प्राथमिक समूहातील सदस्यांमध्ये सहकार्याची व आत्मीयतेची भावना ( we-feeling ) मोठ्या प्रमाणावर दिसून येते. प्राथमिक समूहाच्या उलट परिस्थिती दुय्यम समूहात आढळून येते. दुय्यम समूहातील सदस्यांमध्ये प्रत्यक्ष व समोरासमोरचे संपर्क आढळून येत नाहीत व त्यांच्यामध्ये निकटतेचे प्रमाण अतिशय कमी असते. तसेच दुय्यम समूह आकाराने फार मोठे असतात. शहर, राष्ट्र, राजकीय पक्ष, शिक्षण मंडळे, सांस्कृतिक संघ यासारखे समूह दुय्यम समूहाच्या सदरात येतात. अलीकडील काळात अशा समूहांची संख्या सारखी वाढते आहे. साहजिकच दुय्यम समूह व्यक्तिनिरपेक्ष ( impersonal ) स्वरूपाचे असतात.

निकटतेच्या प्रमाणातील या फरकावरून प्राथमिक समूहांना "निकटवर्ती समूह" व दुय्यम समूहांना "दूरवर्ती समूह" असेही म्हणतात.

अमेरिकेतील प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ **चार्लस् कूले** यांनी १९०९ साली प्रसिद्ध केलेल्या "सामाजिक संघटना ( Social Organization )" या ग्रंथात प्रथम या धर्तीवर समूहांचे वर्गीकरण केले. अर्थात चार्लस् कूले यांनी "प्राथमिक समूह" हाच शब्दप्रयोग तेवढा वापरला होता. इतर ग्रंथकारांनी "दुय्यम

समूह" ( secondary groups ) हा शब्दप्रयोग वापरला. **चार्लस् कूले** यांनी केलेले समूहांचे द्विधाकरण तेव्हापासून सर्वमान्य झाले आहे.

सामाजिक समूहांचे प्राथमिक समूह व दुय्यम समूह या दोन विभागांत केलेले वर्गीकरण सर्व प्रकारच्या समाजांत आढळून येते. सहज प्रत्ययास येणारे हे वर्गीकरण आहे. इतकेच नव्हे तर ते मूलभूत स्वरूपाचे ( fundamental ) आहे. त्यामुळे समूहांच्या रचनेतील फरक स्पष्टपणे दिसून येतो. तेव्हा हे वर्गीकरण अत्यंत महत्त्वाचे असल्याने प्राथमिक व दुय्यम समूहांचा विस्ताराने विचार केला पाहिजे.

## ४. *प्राथमिक समूह*

प्राथमिक समूह या संकल्पनेचे प्रणेते **चार्लस् कूले** यांनी प्राथमिक समूहाचे खालीलप्रमाणे वर्णन केले आहे. "ज्या समूहांमध्ये घनिष्ठ असा समोरासमोरचा संपर्क व सहयोग ही वैशिष्टये आहेत ते समूह प्राथमिक समूह होत असे मी समजतो. ते समूह अनेक दृष्टींनी प्राथमिक असतात. पण व्यक्तीचे सामाजिक स्वरूप व ध्येये बनविण्यात ते आधारभूत असतात. याच अर्थाने ते मुख्यतः प्राथमिक आहेत. निकट संपर्काचा मानसिकदृष्टया असा परिणाम होतो की समूहातील व्यक्तित्वांचे सर्वसाधारण समष्टिमध्ये एकरूपीकरण होत असल्यामुळे प्रत्येक व्यक्ती स्वतःला अनेक कारणांसाठी समूहाच्या सर्वसामान्य जीवनात व उद्देशात आपण विलीन झालो आहे असे समजू लागते. अशा समष्टित्वाचे अतिशय सोप्या रीतीने वर्णन "आम्ही" या शब्दाने करता येईल कारण समष्टित्वामध्ये असलेल्या एकप्रकारच्या सहानुभूतीची व परस्पर तादात्म्याची सहज अभिव्यक्ती "आम्ही" या शब्दाने होते."[1]

[1] "By primary groups I mean those characterised by intimate face-to-face association and co-operation. They are primary in several senses, but chiefly in that they are fundamental in forming the social nature and ideals of the individual. The result of intimate association, psychologically, is a certain fusion of individualities in a common whole, so that one's very self, for many purposes at least, is the common life and purpose of the group. Perhaps the simplest way of describing this wholeness is by saying that it is a "we"; it involves a sort of sympathy and mutual identification for which "we" is the natural expression." —Charles Cooley.

या वर्णनावरून हे स्पष्ट दिसून येते की प्राथमिक समूहामध्ये सदस्यांचे परस्परांशी समोरासमोरचे संपर्क प्रस्थापित होतात. अशा संपर्कामुळे सदस्यांत अत्यंत निकटतेचे संबंध निर्माण होतात. एकमेकांचा प्रत्यक्ष संपर्क व विशेष निकटता या लक्षणांमुळे प्राथमिक समूहातील सदस्यांमध्ये "मम–भावना" किंवा आपलेपणाची भावना ("we-feeling") प्रकर्षाने आढळून येते. प्राथमिक समूहातील प्रत्येक सदस्याचे समूहाशी तादात्म्य झालेले असल्याने सर्व सदस्यांमध्ये प्रबल ऐक्यवृत्ती दिसून येते. अशा रीतीने एकतेच्या सूत्राच्या आधारावर प्राथमिक समूहातील सदस्यांचे व्यवहार चालू असतात. अशी परिस्थिती इतर समूहांत आढळून येत नसल्याने समाजजीवनाच्या अभ्यासाच्या दृष्टीने प्राथमिक समूहाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. म्हणून

(अ) प्राथमिक समूहांच्या आवश्यक भौतिक गोष्टी,
(ब) प्राथमिक संबंधांची वैशिष्टये,
(क) प्राथमिक समूहांचे अस्तित्व, व
(ड) प्राथमिक समूहांचे समाजातील कार्य

या बाबींचा सविस्तर उहापोह करणे जरूरीचे आहे.

## (अ) प्राथमिक समूहांच्या आवश्यक भौतिक गोष्टी

प्राथमिक समूहांच्या निर्मितीसाठी (१) सदस्यांमधील भौतिक सान्निध्य ( physical proximity of group members) (२) समूहाचा लघु आकार ( smallness of the group) आणि (३) सदस्यांमधील संबंधांचे सातत्य (continuation of relationship) या तीन गोष्टी अतिशय आवश्यक असतात. या तिन्ही गोष्टींची प्राथमिक समूह अस्तित्वात येण्यास सारखीच आवश्यकता आहे आणि या तिन्ही गोष्टी एकमेकांशी निगडित आहेत. विशेष म्हणजे या तिन्ही गोष्टी भौतिक स्वरूपाच्या आहेत. त्या बाह्य स्थिती दाखविणाऱ्या आहेत. या गोष्टी जर असतील तर प्राथमिक समूहाला पोषक असे सामाजिक वातावरण तयार होण्यास खूप मदत होईल. या तीन गोष्टी असल्या म्हणजे विशिष्ट सामाजिक वातावरण हमखास निर्माण होईल अशातला भाग नाही. पण एवढे मात्र खरे की इतर परिस्थितींत, म्हणजे या तीन गोष्टी नसल्यावर ते विशिष्ट सामाजिक वातावरण निर्माण होणार नाही.

**( १ ) सभासदांमधील भौतिक सान्निध्य :** सदस्यांमध्ये विशेष निकटता असणे हे प्राथमिक समूहाचे आधारभूत लक्षण आहे. निकटता प्रस्थापित होण्यासाठी

घनिष्ठ संपर्काची आवश्यकता असते. सदस्यांमध्ये समोरासमोरचे किंवा प्रत्यक्ष संबंध असले म्हणजे घनिष्ठ संपर्क निर्माण होण्यास मदत होते आणि सदस्यांच्या भौतिक किंवा क्षेत्रीय ( spatial ) सान्निध्यावर प्रत्यक्ष संबंध अवलंबून असतात. जर सदस्य राहणे, जेवणे, खेळणे, हिंडणे, फिरणे, अभ्यास करणे, विचार विनिमय करणे वगैरे गोष्टी एकत्रित स्वरूपात करतील तर त्यांच्यात प्रत्यक्ष संबंध येऊन निकटता प्रस्थापित होईल. म्हणून प्राथमिक समूहाच्या निर्मितीला सभासदांमधील भौतिक सान्निध्य आवश्यक असते.

(२) **समूहाचा लघु आकार** : सदस्यांमधील भौतिक सान्निध्याबरोबर सदस्यांची संख्या देखील लहान असणे आवश्यक असते.समूह आकाराने लहान असल्या खेरीज सदस्यांचे एकमेकांशी प्रत्यक्ष संबंध येणार नाहीत व प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित झाल्या खेरीज निकटता निर्माण होणार नाही. लहान समूहात सर्व सदस्य परस्परांना वैयक्तिकपणे ओळखू शकतात व सामुदायिक कार्यक्रमांत भाग घेऊ शकतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये निकटता त्या मानाने लवकर निर्माण होते. म्हणून निकटतेच्या वाढीसाठी समूह लहान असणे अगत्याचे असते. जितका समूह लहान असतो, तितकी सदस्यांमधील निकटता जास्ती प्रमाणात असते. तेव्हा प्राथमिक समूहाच्या निर्मितीला सदस्यांची संख्या कमी असणे पोषक ठरते.

(३) **सदस्यांमधील संबंधांचे सातत्य** : सदस्यांमध्ये निकटता कायम स्वरूपाची होण्यासाठी सदस्यांमधील संबंध निरंतर टिकले पाहिजेत. निकटतेचे प्रमाण सदस्यांमधील संबंधांच्या विपुलतेवर व तीव्रतेवर अवलंबून असते आणि असे संबंध येण्यासाठी दीर्घ कालावधी ( long duration ) लागत असतो. बराच काळ एकत्रित राहणाऱ्या समूहाच्या सदस्यांमध्ये घनिष्ठ संपर्क स्थापित होऊन निकटता वाढीस लागते.

तेव्हा भौतिक सान्निध्य, लहान संख्या व दीर्घ कालावधी या गोष्टी सदस्यांमधील निकटतेच्या वाढीला अतिशय उपकारक असतात. म्हणून या गोष्टी प्राथमिक समूहाच्या निर्मितीला आवश्यक आहेत. काही वेळेला या तीन गोष्टींपैकी एखादीच गोष्ट असणे शक्य आहे. पण अशा वेळी प्राथमिक समूहाची तितकीशी वाढ होत नाही. म्हणून प्राथमिक समूहाच्या निर्मितीस व वाढीस या तिन्ही गोष्टी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असणे आवश्यक आहे.

## (ब) प्राथमिक संबंधांची वैशिष्टये

वरील तिन्ही भौतिक गोष्टी उपलब्ध असल्यानंतर समूहातील सदस्यांमध्ये विशेष प्रकारचे संबंध निर्माण होतात. प्राथमिक समूहाच्या सदस्यांमधील परस्पर-

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.



संबंधांना प्राथमिक संबंध ( primary relationship ) असे म्हणतात. या संबंधांची विशिष्ट लक्षणे समजून घेतल्याखेरीज प्राथमिक समूहाचे सम्यक् आकलन होणार नाही. प्राथमिक संबंधांची प्रमुख लक्षणे अशी आहेत.

१. **प्राथमिक संबंधांत उद्देशांची अनन्यता** (identity of ends) **आढळून येते** : परिपूर्ण अवस्थेतील प्राथमिक संबंधांत सदस्यांच्या उद्देशांमध्ये विविध तऱ्हेने अभिन्नता असते. सदस्यांच्या इच्छा व अभिवृत्ती ( attitudes ) यांमध्ये कमालीचे साम्य असते. त्यामुळे समान हेतूपूर्तीसाठी सदस्य प्रयत्न करीत असतात आणि मतभेद न होता एकत्र राहू शकतात. जिवलग मित्रांचा समूह एकत्रित टिकू शकतो कारण त्या मित्रांचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोण समान असतो. सदस्यांमध्ये उद्देशांचे तादात्म्य तर असतेच पण त्याशिवाय प्रत्येक सदस्य इतर सदस्यांचे कल्याण करण्याचे ध्येय बाळगून त्यानुसार आचरण करण्याचा प्रयत्न करीत असतो. मित्र-परिवार किंवा कुटुंब या प्राथमिक समूहात ही वृत्ती नेहमी आढळून येते. एक मित्र दुसऱ्या मित्राला अदूरदर्शी वागणुकीपासून परावृत्त करीत असतो. आपल्या मुलांचे संगोपन होण्यासाठी आई स्वतःच्या प्रकृतीची हेळसांळ झाली तरी तिकडे लक्ष देत नाही.

२. **प्राथमिक संबंध हे साध्य** ( end ) **असते** : समूहातील सदस्य प्राथमिक संबंधाला विशिष्ट ध्येयपूर्तीचे एक साधन समजत नाही तर प्राथमिक संबंध हेच एक साध्य आहे असेच मानतो. प्राथमिक संबंधाला स्वतःचे असे विशिष्ट महत्त्व आहे अशी त्याची धारणा असते. आर्थिक फायदा मिळविण्याच्या हेतूने एकत्रित आलेल्या मित्रांचे किंवा धनलाभाच्या आशेने विवाहबद्ध झालेल्या व्यक्तींचे संबंध आदर्श दृष्टिकोणातून विचार करता प्राथमिक संबंध म्हणता येणार नाहीत. कारण या ठिकाणी संबंध साधनरूप ठरतात. आदर्श प्राथमिक संबंध साधनरूप असत नाहीत.

३. **प्राथमिक संबंध व्यक्तिसंबद्ध** (personal) **असतात** : प्राथमिक समूहात एका सदस्याचा इतर सदस्यांशी ' विशिष्ट व्यक्ती ' म्हणून संबंध येतो. जर त्या विशिष्ट व्यक्ती समूहात नसतील तर ते संबंध सुद्धा राहात नाहीत. म्हणून प्राथमिक संबंध व्यक्तिसंबद्ध किंवा व्यक्तिगत स्वरूपाचे असतात. व्यक्तिगत व व्यक्तिनिरपेक्ष ( impersonal ) संबंध यांतील फरकाला मानवी व्यवहारात अतिशय महत्त्व आहे. व्यक्तिगत संबंध विशिष्ट व्यक्तींशी निगडित झालेले असतात. ते संबंध संक्रमणीय ( transferable ) असत नाहीत. ते संबंध एका व्यक्तीवरून दुसऱ्या व्यक्तीवर प्रस्थापित करता येत नाहीत. व्यक्तिनिरपेक्ष संबंध याच्या उलट म्हणजे

संक्रमणीय असतात. ते एका व्यक्तीवरून दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीवर बदलता येतात. कारखान्यातील मालक व मजूर यांचे संबंध व्यक्तिनिरपेक्ष असतात, मालक बदलला तरी ते चालू राहतात. पण पिता-पुत्र, जिवलग मित्र यांतील संबंध व्यक्तिगत असतात, कारण ते व्यक्तिसंबद्ध असतात.

४. **प्राथमिक संबंध समावेशक असतात** : प्राथमिक संबंध व्यक्तिगत असतात इतकेच नव्हे तर ते विशिष्ट व्यक्तीच्या जीवनाच्या विविध अंगांशी संबंधित असतात. व्यक्तीच्या विवक्षित कार्यापुरते ते मर्यादित असत नाहीत. विशिष्ट व्यक्तीशी अतिशय जवळचे व दीर्घकाळाचे संबंध येत असल्याने प्राथमिक संबंध त्या व्यक्तीच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाशी निगडित झालेले असतात. ते समावेशक स्वरूपाचे असतात. म्हणून प्राथमिक संबंध इतर सामाजिक संबंधांपेक्षा भिन्न स्वरूपाचे असतात कारण इतर सामाजिक संबंध व्यक्तिमत्त्वाच्या काही भागाशीच निगडित असतात.

५. **प्राथमिक संबंध स्वतःप्रेरित** ( spontaneous ) **असतात** : विशुद्ध प्राथमिक संबंध सहज स्वरूपाचे असतात. ते स्वतःप्रेरित किंवा स्वतःस्फूर्त असतात. ते व्यक्तींच्या इच्छेवर अवलंबून असतात. एखाद्या कराराप्रमाणे (contract) त्या संबंधांवर बंधने असत नाहीत. म्हणून प्राथमिक संबंधांमध्ये संपूर्ण सहजता, स्वाभाविकता किंवा अकृत्रिमता असते.

६. **प्राथमिक संबंधांत अनौपचारिक नियंत्रणशक्ती असते** : प्राथमिक संबंध अतिशय निकटतेचे व समावेशक स्वरूपाचे असल्याने ते संबंधित व्यक्तींवर मोठ्या प्रमाणात पण अनौपचारिकपणे नियंत्रण ठेवू शकतात. कुटुंबासारख्या प्राथमिक समूहाचे त्याच्या सदस्यांमधील परस्पर-संबंधांवर संपूर्ण नियंत्रण असते आणि विशेष म्हणजे हे नियंत्रण सर्व सदस्यांनी स्वेच्छेने मान्य केलेले असते. विवाह-संबंधांमुळे व्यक्तींच्या वर्तनावर अनेक बंधने पडत असली तरी त्या व्यक्तींना विवाह-संबंध त्रासदायक वाटत नाहीत. संबंधित व्यक्तींना त्रासदायक वाटणाऱ्या विवाह-संबंधांना संपूर्ण स्वरूपाचे प्राथमिक संबंध म्हणता येणार नाही. तेव्हा कोणत्याही प्राथमिक संबंधात नियंत्रणशक्ती अभिप्रेत असते. म्हणून काही वेळेला खेडेगावासारख्या प्राथमिक समूहातील नियंत्रण चुकविण्याकरिता मनुष्य शहरासारख्या दुय्यम समूहात राहावयास जातो.

### (क) प्राथमिक समूहांचे अस्तित्व

प्राथमिक समूहाच्या निर्मितीला आवश्यक अशा भौतिक गोष्टींच्या विवरणावरून आणि प्राथमिक समूहात असणाऱ्या प्राथमिक संबंधांच्या वैशिष्ट्यांच्या

विवेचनावरून असा प्रश्न उपस्थित होतो की या प्रकारचे प्राथमिक समूह प्रत्यक्षात आढळून येतात की नाही ? प्राथमिक संबंधांची वर सांगितलेली वैशिष्ट्ये आदर्श स्थितीतील प्राथमिक संबंधांची आहेत आणि त्या आदर्श स्थितीला पोहोचलेले प्राथमिक संबंध कोठे पहावयास मिळत नाहीत. त्या आदर्श स्थितीप्रत जाण्याचा प्रयत्न मात्र चालू असतो हे दृष्टोत्पत्तीस येते.

प्राथमिक संबंधांची सर्व वैशिष्टचे पूर्णांशाने प्रचलित असलेले प्राथमिक समूह प्रत्यक्षात आढळून येणे फार कठिण आहे कारण असे समूह खऱ्या अर्थाने कोणत्याही प्रकारच्या सामाजिक बंधनापासून मुक्त असतात. असे समूह संपूर्णपणे ऐच्छिक स्वरूपाचे असतात. केवळ मैत्रीसाठी एकत्र आलेल्या दोन मित्रांचा समूह अगर केवळ प्रेमाखातर एकत्र आलेल्या दोन प्रेमिकांचा समूह या सदरात मोडतात. कोणतीही जबाबदारी अगर कसलीही बंधने अभिप्रेत नसलेल्या अशा प्राथमिक संबंधांवर आधारलेले समूह निर्माण करण्यास समाज केव्हाही संमती देत नाही. कारण आवश्यक अशा सामाजिक कार्यांचे सातत्य राहण्यासाठी व्यक्तींवर समाजाला नियंत्रणे ठेवावी लागतात व पर्यायाने व्यक्तींच्या परस्परसंबंधांवर बंधने लादावी लागतात. समाजहिताला पोषक ठरेल अशा रीतीनेच मित्रांचे अगर प्रेमिकांचे परस्परसंबंध राहतील अशी दक्षता समाज घेत असतो. व्यक्तींच्या अनिर्बंध वागणुकीला समाज कधीही परवानगी देत नाही. तेव्हा समाजसंघटनेच्या नियंत्रणांमुळे आदर्श स्थितीतील प्राथमिक संबंध प्रत्यक्षात दिसून येत नाहीत.

संघटित समाजाचा प्राथमिक संबंधांच्या परिपूर्ण विकासाला विरोध असला तरी प्राथमिक संबंधांच्या आंशिक अस्तित्वाला समाजाचा विरोध असत नाही. इतकेच नव्हे तर थोडयाफार प्रमाणात प्राथमिक संबंध आवश्यक आहेत अशी समाजाची धारणा असते व त्यानुसार प्राथमिक संबंधांना महत्त्व दिले जाते. कारण व्यक्तींच्या एकमेकांशी असलेल्या संबंधांवरच समाजाची उभारणी झालेली असते. तसेच व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी निकटच्या व व्यक्तिगत स्वरूपाच्या संबंधांची अत्यंत जरूरी असते. समाजीकरणाची प्रक्रिया सुलभतेने पार पडण्यासाठी प्राथमिक संबंधांची वैशिष्टचे बऱ्याच प्रमाणात आढळून येणाऱ्या लहान समूहांची आवश्यकता असते. म्हणून कुटुंब, खेळातील सवंगडयाचा समूह, शेजारी शेजारी राहणाऱ्या लोकांचा समूह यासारखे प्राथमिक समूह प्रत्येक समाजात आढळून येतात. अशा प्राथमिक समूहातच माणसाचे जीवन बहुतांशी व्यतीत होत असल्यामुळे सामाजिक दृष्टिकोणावर भर देऊन त्यांना संपूर्ण संघटित रूप दिले जाते. तेव्हा अशा स्वरूपातील प्राथमिक समूहांचे अस्तित्व सर्व समाजांत दिसून येते.

### (ड) प्राथमिक समूहांचे समाजातील कार्य

कोणत्याही समाजात प्राथमिक समूहाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. प्राथमिक समूहातच व्यक्तीला मानवी स्वभावाची प्राप्ती होते आणि समाजाच्या ध्येयधोरणाची कल्पना येते. व्यक्तीला समाजाचा सभासद होण्याची पात्रता प्राथमिक समूहात राहिल्यानेच येत असते. प्राथमिक समूह हे समाजीकरणाचे प्रमुख साधन आहे. ऐतिहासिक कालापासून मनुष्याचे पुष्कळसे जीवन प्राथमिक समूहातच व्यतीत झाले आहे आणि कितीतरी काल मनुष्याला प्राथमिक संबंधांखेरीज इतर संबंधांची फारशी माहिती नव्हती असे दिसून येते. अजूनही सुधारणेपासून दूर असलेल्या व स्थिर स्वरूपाच्या आदिवासी व ग्रामीण समाजांतील लोकांच्या जीवनांत प्राथमिक समूहांना महत्त्वाचे स्थान आहे. परिवर्तनीय आधुनिक नागर समाजांतील लोकांच्या जीवनात साधारणपणे प्राथमिक समूहांना त्या मानाने कमी महत्त्व दिले जात असले तरी कुटुंबासारख्या प्राथमिक समूहांना अजूनही महत्त्वपूर्ण स्थान दिले जाते.

## ५. दुय्यम समूह

प्राथमिक समूहाच्या अगदी उलट परिस्थिती दुय्यम समूहात आढळून येते. खालील बाबतींत या दोन प्रकारच्या समूहांतील फरक स्पष्टपणे दिसून येतो.

१. **संबंध** : प्राथमिक समूहातील सदस्यांमध्ये प्रत्यक्ष संबंध ( direct relationships ) असतात. त्यातील सदस्यांमध्ये समोरासमोरचे ( face-to-face ) संबंध येत असतात. जेवणे, खेळणे, अभ्यास करणे, यासारख्या कित्येक गोष्टी सदस्यांकडून मिळूनच केल्या जातात. म्हणून सदस्यांमध्ये निकटता ( intimacy ) जास्त प्रमाणात आढळून येते. साहजिकच प्राथमिक समूहातील सदस्यांचे परस्परसंबंध व्यक्तिगत ( personal ) स्वरूपाचे असतात. दुय्यम समूहात मात्र सदस्यांमध्ये अप्रत्यक्ष संबंध ( indirect relationships ) असतात व त्यांच्यात निकटता फार कमी असते. म्हणून दुय्यम समूहातील सदस्यांचे परस्परसंबंध व्यक्तिनिरपेक्ष ( impersonal ) स्वरूपाचे असतात. पण याचा अर्थ असा नव्हे की दुय्यम समूहातील सदस्यांमध्ये सहकार्य ( co-operation ) असत नाही. त्यांच्यामध्ये देखील सहकार्य असते पण ते अप्रत्यक्ष स्वरूपाचे असते एवढेच.

२. **आकार** : प्राथमिक समूह आकाराने लहान असतात तर दुय्यम समूह आकाराने विशाल असतात. प्राथमिक समूहातील सदस्यांमध्ये प्रत्यक्ष स्वरूपाचे

संबंध असतात व परस्परांमधील निकटतेचे प्रमाण जास्ती असते. या गोष्टी साध्य होण्यासाठी प्राथमिक समूह लहान आकाराचे असणे आवश्यक असते. पण या गोष्टींचा दुय्यम समूहात अभाव असल्याने दुय्यम समूह लहान असले पाहिजेत असे बंधन असत नाही. म्हणून दुय्यम समूहाच्या सदस्यांची संख्या अमर्यादित असते.

३. **सान्निध्य** : प्राथमिक समूहातील सदस्यांमध्ये भौतिक सान्निध्य ( physical proximity) असते. सदस्य एकमेकांपासून फार दूरच्या अंतरावर असत नाहीत. त्यांच्यामध्ये क्षेत्रीय सान्निध्य ( spatial proximity ) असते. प्राथमिक समूहाच्या सदस्यांमध्ये परस्पर–संबंध प्रत्यक्ष स्वरूपाचे व विशेष निकट–तेचे असल्याने त्यांच्यामध्ये क्षेत्रीय सान्निध्य असणे आवश्यक असते. पण दुय्यम समूहाच्या सदस्यांमध्ये अन्योन्य संबंध अप्रत्यक्ष स्वरूपाचे असतात व त्यांच्यामध्ये तेवढी निकटता असत नाही तसेच दुय्यम समूहाच्या सदस्यांची संख्या देखील विशाल असते. म्हणून दुय्यम समूहाच्या सदस्यांमध्ये क्षेत्रीय सान्निध्य असण्याची जरूरी असत नाही. इतकेच नव्हे तर ते सदस्य जगभर विखुरलेले असले तरी चालते.

४. **सदस्यत्व** : दुय्यम समूहाचे सदस्यत्व ऐच्छिक स्वरूपाचे असते. एखाद्या दुय्यम समूहाचे सभासदत्व पत्करावयाचे की नाही हे व्यक्तीच्या मनावर अवलंबून असते. पण कुटुंबासारख्या प्राथमिक समूहाचे सदस्यत्व त्या मानाने इच्छाधीन असत नाही. तेव्हा सदस्य होण्यासाठी समूहाची निवड करण्याचे स्वातंत्र्य दुय्यम समूहांच्या बाबतीत जास्ती प्रमाणात आढळून येते.

५. **दृष्टिकोण** : प्राथमिक समूहातील प्रत्येक सदस्याचा इतर सदस्यांकडे बघण्याचा विशिष्ट दृष्टिकोण असतो. प्राथमिक संबंध एक साध्य ( end ) आहे या भावनेने प्रत्येक सदस्य इतरांशी वागत असतो. परंतु याच्या उलट दृष्टिकोण दुय्यम समूहाच्या सदस्यांमध्ये आढळून येतो. तेथे प्रत्येक सदस्य इतर सदस्यांशी येणारे संबंध साध्य ( ends ) आहेत असे न मानता ते साधनरूप ( means to an end ) आहेत असे समजतो. उदाहरणार्थ, मालक व मजूर, विक्रेता व ग्राहक यांचे परस्पर–संबंध साधनरूप स्वरूपाचे असतात. त्यात आपल्याला कसा जास्ती फायदा मिळेल ही वृत्ती प्रामुख्याने दिसून येते. प्राथमिक समूहाच्या सदस्यांमध्ये मात्र केवळ फायद्याकडे लक्ष देण्याचा दृष्टिकोण असत नाही. म्हणून प्राथमिक समूहातील सदस्यांचे प्रतिनिवेशन ( substitution ) होऊ

शकत नाही. त्यातील आधीचे सदस्य बदलून त्या जागी इतरांची स्थापना करणे अतिशय कठीण असते. कुटुंबातील लोक, मित्रगण यासारखे प्राथमिक समूहातील सदस्य कारखान्यातील मजूर, राजकीय पक्षाचे लोक यासारख्या दुय्यम समूहातील सदस्याप्रमाणे वाटेल तसे बदलता येत नाहीत.

६. **करार-प्राधान्य :** दुय्यम समूहातील सदस्यांचे परस्पर-संबंध कराराच्या कल्पनेवर आधारलेले असतात. ज्या व्यक्तींचा करार झालेला असतो त्यांचे संबंध हेतुपुर:सर व विचारपूर्वक प्रस्थापित केलेले असतात आणि त्यांचे हक्क व कर्तव्ये यांची स्पष्ट नोंद केलेली असते किंवा त्यांचे स्वरूप गृहीत धरलेले असते. अशा कराराला दुय्यम समूहात प्राधान्य दिलेले असते. म्हणून प्रत्येक सदस्याची वैयक्तिक जबाबदारी करारातील कलमांनुसार मर्यादित झालेली असते. पण प्राथमिक समूहातील सदस्यांच्या परस्पर-संबंधात कराराची भावना असत नाही व सदस्यांची वैयक्तिक जबाबदारी अमर्यादित असते. कुटुंबातील पती-पत्नी, पिता-पुत्र यांच्या परस्पराविषयीच्या जबाबदारीला कसलीच मर्यादा असत नाही.

७. **व्यवहारसाधने :** ( means of communication ) सदस्यांच्या एकमेकांशी संपर्क ठेवण्याच्या पद्धतींमध्ये या दोन प्रकारच्या समूहांत फरक असतो. प्राथमिक समूहाचे सदस्य परस्परांशी वैयक्तिक संपर्क ठेवतात कारण प्राथमिक समूह लहान आकाराचे असतात व त्यांतील सदस्यांचे संबंध समोरासमोरचे किंवा प्रत्यक्ष स्वरूपाचे असतात. दुय्यम समूहातील सदस्यांचे एकमेकांशी समोरासमोरचे संपर्क क्वचितच येतात. त्यांची परस्परांची व्यवहार-साधने छापखाना, टेलिफोन, रेडिओ यांसारखी यांत्रिक स्वरूपाची असतात.

८. **व्यक्तिमत्त्वावरील परिणाम :** मनुष्य दुय्यम समूहाचा सदस्य काही विशिष्ट कारणांसाठीच होतो आणि त्या कारणापुरताच त्याचा त्या समूहाशी संबंध येतो. साहजिकच दुय्यम समूहाचा मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या अगदी थोड्या बाजूंवर परिणाम होतो. याच्या उलट प्राथमिक समूहाचा मनुष्याच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वावर परिणाम होतो. कुटुंबासारख्या प्राथमिक समूहात मनुष्याचा लहानपणापासून बराचसा काळ जात असल्याने आणि मुलाचे बहुतांश जीवन व्यतीत होत असल्यानें कुटुंबाचा मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध बाजूंवर परिणाम होतो.

प्राथमिक व दुय्यम या दोन्ही प्रकारचे समूह पूर्वीच्या काळापासून प्रत्येक समाजात प्रचलित आहेत. पण अलीकडील काळात मात्र दुय्यम समूहांना जास्त

प्राधान्य दिले जाते. आधुनिक युगाच्या पूर्वी समाज अगदी लहान आकारांचे असत, त्यातील लोकांची संख्या फार नसे, ते लोक साधरणपणे एकत्र किंवा जवळ जवळ राहात असत आणि त्यांचे एकंदर जीवन अतिशय साधे असे. अशा वेळी प्राथमिक समूह लोकांच्या गरजा भागविण्यास समर्थ असल्याने समाजात दुय्यम समूहांची जरूर भासत नव्हती. परंतु औद्योगिक क्रांती-नंतरच्या आधुनिक युगात सर्व मनुच पालटला. समाजाचा आकार विशाल झाला, त्यातील लोकांची संख्या आतोनात वाढली, ते लोक एकत्र न राहता विखुरलेले आढळून येऊ लागले, त्यांच्या आशाआकांक्षा व आवडी–निवडी विविध प्रकारच्या बनल्या आणि प्रगत तंत्रज्ञानाचा जीवनाच्या अनेक क्षेत्रांत वाढता उपयोग होऊ लागला. साहजिकच वेगवेगळ्या दुय्यम समूहांची आवश्यकता निर्माण झाली. म्हणून आधुनिक काळात राजकीय, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, औद्योगिक, सांस्कृतिक आदी क्षेत्रांत अनेक दुय्यम समूह अस्तित्वात आले. जसजसे जीवन संमिश्र बनत आहे व लोकांची उद्दिष्टे वाढत आहेत तसतशी विविध तऱ्हेच्या दुय्यम समहांची संख्या वाढतच आहे. शिवाय दुय्यम समूहांच्या संख्येबरोबर सामान्य माणसाच्या जीवनात त्यांचे महत्त्व देखील सारखे वाढत आहे. आधुनिक जीवन – पद्धतीत मनुष्याचा बराचसा काळ निरनिराळ्या दुय्यम समूहांत व्यतीत होत असतो. कुटुंबासारख्या प्राथमिक समूहात मनुष्य त्यामानाने फार थोडा काळ घालवितो. म्हणून सामान्य माणसाचा दुय्यम समूहांकडे जास्त कल झुकत चालला आहे व त्यांचा मनुष्याच्या जीवनावर वाढता परिणाम दिसून येत आहे.

अलीकडील काळात दुय्यम समूहांची संख्या व महत्त्व यांत सारखी वाढ होत आहे. इतकेच नव्हे तर प्राथमिक समूहांच्या सदस्यांमध्ये असते तशी निकटता दुय्यम समूहांच्या सदस्यांमध्ये सुद्धा निर्माण करून दुय्यम समूह जास्त कार्यक्षम करण्याकडे विशेष लक्ष पुरविले जात आहे. उदाहरणार्थ, व्यापारी अगर औद्योगिक कंपनीच्या सर्व थरांतील नोकरवर्गामध्ये संघ-भाव ( esprit de corps ) उत्पन्न करून त्यांच्या मनात कंपनीविषयी प्राथमिक समूहाबाबत असते तशी निष्ठा ( loyalty ) निर्माण करण्याकडे सतत प्रयत्न चाललेले असतात. शैक्षणिक अगर धार्मिक क्षेत्रातील दुय्यम समूहांच्या सदस्यांमध्ये परस्परांविषयी आत्मीयतेची व सहकार्याची भावना दृढमूल करून सदस्यांना आपल्या शिक्षणसंस्थेविषयी अगर धर्म-संस्थेविषयी प्राथमिक समहात दिसून येणारी ममत्वाची भावना निर्माण केली जाते व आपल्या कुटुंबियांसाठी करतो तसा कोणताही त्याग करावयास उद्युक्त केले जाते. राष्ट्र एक दुय्यम समूह आहे व राष्ट्रातील नागरिकांचे परस्परांशी व्यक्तिनिरपेक्ष

स्वरूपाचे संबंध असतात. असे असले तरी नागरिकांत विविध मार्गांनी राष्ट्रप्रीती व राष्ट्रनिष्ठा निर्माण केल्या जातात व राष्ट्राविषयी आत्मीयता उत्पन्न केली जाते. याच रीतीने कामगारसभा किंवा सैन्यदल यासारख्या दुय्यम समूहातील सदस्यांमध्ये एकत्वाची भावना निर्माण करून ती सदैव जोपासली जाते. तेव्हा कोणत्याही प्रकारच्या दुय्यम समूहाच्या सदस्यांमध्ये समूहाविषयी प्राथमिक समूहासारखी निष्ठा व एकात्मता उत्पन्न करण्याची प्रबल प्रवृत्ती अलीकडील काळात दिसून येते. थोड-क्यात, हल्ली दुय्यम समूहाकडून लोकांचे जितके जीवन नियंत्रित केले जाते तितके पूर्वी कधीही केले जात नसे.

आधुनिक समाजात दुय्यम समूहांना जास्ती प्रभावी करण्याचे प्रयत्न होत असले तरी प्राथमिक समूहांचे सामाजिक जीवनातील महत्त्व काही कमी होत नाही व ते होणारही नाही. सामाजिक जीवनाला या दोन्ही प्रकारच्या समूहांची आवश्यकता असते. विशेष म्हणजे हे दोन्ही प्रकारचे समूह परस्परविरोधी नसून अन्योन्यपोषक (symbiotic) आहेत. कोणत्याही समूहाचे सातत्य टिकण्यासाठी त्या समूहातील सदस्यांमध्ये एकात्मता व निष्ठा या अभिवृत्ती असाव्या लागतात. या अभिवृत्ती सदस्यांमध्ये आपोआप उत्पन्न होत नाहीत तर सदस्यांच्या अगदी निकटच्या परस्परसंबंधांतून त्या निर्माण होत असतात. असे निकटचे परस्परसंबंध प्राथमिक समूहातच आढळतात व तेथे वाढीस लागतात. तेव्हा दुय्यम समूहांना लागणाऱ्या अभिवृत्ती प्राथमिक समूहांत उत्पन्न होत असल्याने दुय्यम समूहांच्या अस्तित्वाला व कार्याला प्राथमिक समूहाची अत्यंत जरूरी असते. प्राथमिक समूहांतच मनुष्य इतरांच्या भावनांशी समरस होण्यास व सर्वांच्या इच्छेनुसार वागण्यास शिकत असतो. मनुष्याचा लहानपणीचा काळ प्राथमिक समूहांतच व्यतीत होत असल्याने आत्मीयतेच्या भावना व तदनुषंगिक गुण मनुष्याच्या बालपणी दृढमूल होतात आणि पुढे प्राथमिक समूहांतील प्रत्यक्ष व टिकाऊ व्यक्तिगत संबंधांमुळे त्या भावना वृद्धिंगत पावतात. अशा भावनांची सामाजिक जीवनात आवश्यकता असते. म्हणूनच कुटुंब किंवा खेळगड्यांचा समूह अशासारख्या प्राथमिक समूहांना समाजजीवनाचे आधारभूत समूह असे मानले जाते. अशा प्राथमिक समूहाखेरीज मोठमोठे दुय्यम समूह टिकणार नाहीत कारण कोणत्याही समूहाच्या अस्तित्वाला व सातत्याला आवश्यक असणाऱ्या अभिवृत्ती प्राथमिक समूहातच निर्माण होतात. अशा रीतीने हे दोन प्रकारचे समूह परस्परपोषक असल्याने दोघांचीही प्रत्येक समाजाला नितांत आवश्यकता असते.

# १४

# समुदाय

## १. समुदायाची वैशिष्ट्ये

समुदाय ( community ) हा एक सामाजिक समूह असून विविध प्रकारच्या सामाजिक समूहांमध्ये " समावेशक हितसंबंधित समूह " ( inclusive interest groups ) या सदरात समुदायाची गणना केली जाते हे आपण पाहिले. तसेच समुदाय " अस्थायी समूहा " सारखे ( temporary groups ) क्षणजीवी किंवा अल्पकालीन असत नाहीत तर ' स्थायी समूहा " सारखे ( permanent groups ) जवळ जवळ कायम स्वरूपाचे असतात हेही आपण पाहिले. समुदाय आपल्या सदस्यांच्या सर्व प्रकारच्या हितसंबंधांकडे सदैव लक्ष देत असल्याने कोणत्याही समाजात त्यांना महत्त्वाचे स्थान असते आणि मनुष्यांच्या सामाजिक जीवनावर त्यांचा विशेष परिणाम होत असतो. म्हणून समाजशास्त्रात समुदायांचा अगत्यपूर्वक अभ्यास केला जातो.

ज्या समूहामध्ये लोकांचे सामाजिक जीवन संपूर्णपणे व्यतीत होऊ शकते त्या समूहाला समुदाय ही संज्ञा लावण्यात येते. खेडेगाव, शहर, प्रांत, देश यासारख्या विभागांत राहणाऱ्या लोकांचा समुदाय बनतो कारण प्रत्येक विभागातील लोकांचे सामाजिक जीवन त्या विभागात सामावलेले असते. अशा रीतीने कोणत्याही विभागातील लोकांचे परस्परांशी सामाजिक संबंध सदैव येत असल्याने त्यांच्या-

मध्ये समान चालीरीती, परंपरा व उद्दिष्टे प्रस्थापित होतात आणि त्यांच्यामध्ये एकत्वाची भावना निर्माण होते. समुदायातील लोक समान तऱ्हेचे जीवन व्यतीत करीत असतात. म्हणून प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ डॉ. मॅकआयव्हर यांनी समुदायाची खालील प्रमाणे व्याख्या केली आहे. "जेव्हा कोणत्याही, लहान अगर मोठ्या, समहाचे सदस्य अशा रीतीने एकत्र राहातात की त्यांच्यामध्ये एखादाच विशिष्ट हितसंबंध समान असत नाही तर सामान्य जीवनाला लागणारे मूलभूत हितसंबंध समान असतात, तेव्हा त्या समूहाला समुदाय असे म्हणतात." [1]

या व्याख्येवरून समुदायाची काही ठळक लक्षणे दिसून येतात. समुदायाचे विशेष लक्षण हे की कोणत्याही समुदायाच्या सदस्यांचे समग्र जीवन त्या समुदा-यातच व्यतीत होऊ शकते. समुदाय आणि मंडळ ( association ) यामधील हा मुख्य फरक आहे. व्यापारी मंडळ, संगीत सभा, सांस्कृतिक समिती यासारख्या मंडळांच्या कक्षेत राहून सदस्यांना आपले समग्र जीवन घालविता येत नाही; पण टोळी ( tribe ), ग्राम किंवा शहर यासारख्या समुदायात ते शक्य होते. म्हणून कोणत्याही समुदायातील सदस्यांचे सर्व सामाजिक संबंध त्या समुदायातच सामावलेले असतात आणि समुदाय ओळखण्याची ही मूलभूत कसोटी आहे. समुदायाचे दुसरे लक्षण हे की समुदाय स्वयंपूर्ण ( self-sufficient ) असल्याची आवश्यकता नसते. काही समुदाय सर्व-समावेशक (all-inclusive) स्वरूपाचे आणि इतरांपासून स्वतंत्र राहू शकतील असे असतात. आदिवासी लोकांच्या टोळ्यासारखे समुदाय अशा तऱ्हेचे असतात. टोळीतील सदस्यांची संख्या अगदी मर्यादित-शंभराच्या आसपास-असल्याने आणि टोळीला जंगलातील अगर डोंगराळ भागातील वसतिमुळे इतरांपासून अलग राहावे लागत असल्याने टोळीला स्वयंपूर्ण बनणे भाग पडत असे. परंतु आधुनिक काळातील विशाल समुदायांना सर्व दृष्टींनी स्वयंपूर्णता मिळविणे शक्य होत नाही. विविध समुदायांमध्ये आर्थिक, राजकीय आदी बाबतींत परस्परावलंबन ठेवल्याखेरीज भागतच नाही आणि ही परस्परावलंबनाची प्रवृत्ती सारखी वाढत आहे. म्हणून स्वयंपूर्णता ही समुदायाची नितांत आवश्यक बाब असत नाही. तसेच समुदायाच्या आकाराला मर्यादा असत नाही हे समुदायाचे तिसरे लक्षण होय. लहान, मोठ्या अशा सर्व आकारांचे समुदाय असतात. इतकेच नव्हे तर लहान समुदाय मोठ्या समुदायाचे विभाग म्हणून राहू शकतात. शहर

1. " Wherever the members of any group, small or large, live together in such a way that they share, not this or that particular interest, but the basic conditions of common life, we call that group a community. " — Robert MacIver.

प्रदेशाचा एक विभाग असतो, प्रदेश राष्ट्राचा एक विभाग असतो आणि राष्ट्र जगाचा एक भाग असते. शहर, प्रदेश, राष्ट्र व जग हे समुदायाचे लहान-मोठे प्रकार आहेत. एखाद्या मोठ्या समुदायात अनेक लहान समुदाय सामावलेले असू शकतात. कारण समुदाय आकारावर आधारलेला असत नाही तर तो समान जीवनाच्या कल्पनेवर आधारलेला असतो. खेडेगाव अगर शहर याप्रमाणे राष्ट्र देखील समुदाय होऊ शकते. म्हणून समुदायाचा आकार ठराविक असत नाही.

समुदायाच्या आकाराला मर्यादा नसली तरी आधुनिक काळात अखिल विश्वालाच एक समुदाय कल्पिण्याची प्रवृत्ती वाढू लागली आहे आणि तसे समजण्याची आवश्यकताही निर्माण झाली आहे. अप्रगत आदिवासी लोकांच्या जीवनांत सर्व दृष्टींनी स्वयंपूर्ण असे समुदाय अस्तित्वात होते. आधुनिक काळातील विशाल राष्ट्र–समुदाय मात्र स्वयंपूर्णतेच्या मार्गावर आहेत असे दिसून येते. पण राष्ट्र–समुदाय देखील समग्रपणे स्वयंपूर्ण होऊ शकणार नाहीत कारण जगातील विविध राष्ट्रांत परस्परावलंबनाची वृत्ती अनेक रीतींनी बळावत चालली आहे. दळणवळणाच्या व सदेशव्यवहाराच्या साधनांत त्याचप्रमाणे तंत्रविद्येत अभूतपूर्व क्रांती झाल्याने राष्ट्रे एकमेकांच्या खूपच जवळ आली आहेत. औद्योगिक क्रांती झाल्याने आर्थिक क्षेत्रात विविध राष्ट्रांना अन्योन्याश्रय घेण्याखेरीज गत्यंतरच उरले नाही. सांस्कृतिक क्षेत्रात सुद्धा अशीच परिस्थिती निर्माण झाली आहे राजकीय व इतर स्वरूपाचे कितीही अडथळे निर्माण केले तरी एका राष्ट्रातील वैज्ञानिक, कलाविषयक व इतर विचारप्रवाह अन्य राष्ट्रांत पसरल्याखेरीज राहात नाहीत. अशा रीतीने कोणत्याही राष्ट्रसमुदायाला इतर राष्ट्रांवर अवलंबून राहावेच लागते. तेव्हा एखाद्या राष्ट्र–समुदायाची स्वयंपूर्णता प्रस्थापित होणं कधीही शक्य नसल्याने या विश्वातील सर्व राष्ट्रांचा मिळून एक समुदाय समजावा अशी विचारसरणी प्रबल होत आहे.

समुदायाची कक्षा उत्तरोत्तर विस्तृत करण्याकडे मनुष्याचा कल स्पष्टपणे दिसून येत असला व सर्व विश्वालाच त्या कक्षेत सामावून घेण्याची धडपड चाललेली असली तरी लहान लहान समुदाय अजून देखील आपले अस्तित्व टिकवून आहेत हे नाकारता येणार नाही. ग्रामसमुदायासारख्या लहान समुदायांच्या स्वरूपात थोडाफार फरक पडला हे खरे. पण अशा लहान आकाराच्या समुदायांना राष्ट्रासारख विशाल आकाराचे समुदाय नष्ट करू शकले नाहीत हे उघड सत्य आहे. ही वस्तुस्थिती मानवजातीला अगदी उपकारक झाली आहे. कारण सुसंस्कारित किंवा सभ्य मानवांना ( civilized beings ) लहान व विशाल अशा दोन्ही प्रकारच्या समुदायांची

जरूरी असते. मोठ्या समुदायांमुळे भरीव अर्थव्यवस्था निर्माण होते, स्थिरता उत्पन्न होते, विकासाची संधी उपलब्ध होते, विविधतापूर्ण संस्कृतीला प्रोत्साहन मिळते, शांतता व संरक्षण प्राप्त होते आणि जीवनोपयोगी विविध शोध लावण्यास मदत होते. तसेच लहान समुदायांमुळे एकमेकांविषयीची आत्मीयता वाढते व निकटचा संपर्क मिळत गेल्याने मानसिक समाधान मिळण्यास मदत होते. म्हणून सर्व दृष्टींनी जीवन समृद्ध होण्यासाठी लहान व मोठ्या अशा दोन्ही प्रकारच्या समुदायांची आवश्यकता असते.

## २. समुदायाचे मूलाधार

समान जीवन व्यतीत करणाऱ्या लहान अगर मोठ्या सामाजिक समूहाचा समूदाय बनत असतो. समुदायातील सदस्यांचे समग्र जीवन समुदायातच सामावलेले आढळून येते. यामुळे समुदायातील सदस्य मध्ये सामाजिक दृष्टचा सुसंगतता ( social coherence ) असलेली दिसून येते. समुदायाच्या सदस्यांमध्ये हम-खास वसत असलेल्या या विशिष्ट संबंधांचे ( अ ) स्थानीयता ( locality) आणि ( ब ) समुदाय–भावना ( community sentiment ) हे दोन मूलाधार ( bases ) आहेत. समुदायाची उभारणी या मूलाधारांवर होत असल्याने त्यांच्या-विषयी विशेष माहिती असणे आवश्यक आहे.

### ( अ ) स्थानीयता

समुदायाचा वसतिस्थानामुळे भूभागाशी संबंध येतो प्रत्येक समुदाय कोणत्या तरी भूप्रदेशावर वसलेला असतो भटक्या लोकांच्या समुदायाचे ( nomad community ) वसतिस्थान नेहमी बदलत असले तरी विशिष्ट वेळी समुदायाचे सर्व सदस्य एखाद्या विवक्षित प्रदेशावर एकत्रित राहातात. भटक्या लोकांचे समुदाय फार थोडे असतात. पुष्कळसे समुदाय एका जागी कायम वसती करून राहणारे असतात. आधुनिक काळात दळणवळणाच्या व संदेशव्यवहाराच्या साधनांत खूप वाढ झाल्यामुळे समुदायाचा आकार वाढला आहे. असे असले तरी समुदायाचा वसतिस्थानाशी असलेला संबंध तुटला नाही; वसतिस्थानाचा आकार मात्र मोठा झाला. समुदायाच्या दृष्टीने समान वसतिस्थानाला किंवा स्थानीयतेला अतिशय महत्त्व आहे. कारण वसतिस्थानाच्या स्वरूपावरच मनुष्याच्या सामाजिक जीवनाचे स्वरूप अवलंबून असते. भूप्रदेशातील गोष्टींचा मनुष्याची राहणी, विचारसरणी, कृती इत्यादी जीवनाच्या विविध अंगावर सारखा परिणाम होत असतो व मनुष्याच्या

सामाजिक जीवनाच्या विकासाची दिशा भूप्रदेशातील परिस्थितीच्या अनुरोधाने ठरली जात असते. समान भौगोलिक परिस्थितीमुळे समान पर्यावरण (common environment) अस्तित्वात येत असल्याने त्या पर्यावरणात एकत्र राहणाऱ्या लोकांचे सामाजिक जीवन व सांस्कृतिक विकास विशिष्ट रीतीने होणे अपरिहार्य असते. म्हणून समान सामाजिक जीवनावर आधारलेल्या समुदायाला स्थानीयता असणे किंवा समान वसतिस्थान असणे आवश्यक असते.

## ( ब ) समुदाय-भावना

स्थानीयता हे जरी समुदायाचे आवश्यक अंग असले तरी फक्त समान वसतिस्थानाच्या आधारावर समुदायाची उभारणी होऊ शकत नाही. समान वसतिस्थानाबरोबरच समुदायातील लोकांमध्ये समुदाय-भावना किंवा एकत्वाची समान भावना देखील असावी लागते. मोठ्या शहराच्या एखाद्या वॉर्डात अगर विभागात राहणाऱ्या लोकांमध्ये परस्परांशी विशेष संपर्क येत नाहीत व त्यांचे हितसंबंध समान असत नाहीत. त्यामुळे वॉर्डातील लोकांमध्ये एकत्वाची किंवा परस्परांविषयी आत्मीयतेची भावना निर्माण होत नाही. म्हणून वॉर्डातील लोकांचा समुदाय बनू शकत नाही. याच्या उलट खेडेगाव, शहर, प्रांत, देश यासारख्या भूविभागातील लोकांमध्ये समुदाय-भावना असल्याने त्या लोकांचे समुदाय बनू शकतात. तेव्हा समुदाय अस्तित्वात येण्यासाठी स्थानीयतेबरोबरच लोकांमध्ये समुदाय-भावनासुद्धा असणे आवश्यक असते.

जेव्हा काही लोक इतरांपासून अलग होऊन एकमेकांच्या संपर्कात जीवन व्यतीत करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा त्यांच्यामध्ये समान सामाजिक प्रेरणा उत्पन्न होऊन त्यांना एकत्रित ठेवण्यास मदत करतात. अशा वेळी समुदाय-भावना निर्माण होऊ लागतात. आगबोटीवरील प्रवासी किंवा तात्पुरत्या वसाहतीतील लोक यांच्या अस्थायी स्वरूपाच्या समुदायात समुदाय-भावना निर्माण होण्यास सुरवात झालेली असते. स्थायी स्वरूपाच्या समुदायात समुदाय-भावना प्रकर्षाने वाढलेली आढळून येते. बराच कालपर्यंत समुदायातील लोक एकाच भूभागात राहिल्याने त्या प्रदेशाला व लोकांच्या परस्परसंबंधांना वेगळाच अर्थ प्राप्त होतो. त्या प्रदेशाला 'घर' ही संज्ञा मिळते व अन्योन्यसंबंधांना परंपरेचे स्वरूप येते. अशा परिस्थितीत स मुदाय-भावना तीव्रतेने जाणवते व सदस्यांना एकत्रित ठेवण्यास मदत करते.

सदस्यांमध्ये असलेली समुदाय-भावना वाढविता येते. समाजीकरणाच्या साहाय्याने आणि मुख्यत: विशिष्ट तऱ्हेचे शिक्षण देण्याने अशी वाढ करणे शक्य होते.

सदस्याच्या लहानपणापासूनच समुदाय-भावना त्याच्या मनावर बिंबविण्याचे खास प्रयत्न केले जातात. अशा रीतीने समुदाय-भावना प्रत्येक सदस्याच्या व्यक्तिमत्त्वाचा एक भाग बनते. म्हणून समुदाय-भावना कोणीतरी आपल्यावर बाहेरून मुद्दाम लादली आहे असे व्यक्तीला कधीही वाटत नाही. समुदाय-भावना ही आपल्या व्यक्तिमत्त्वाची आवश्यक बाब आहे असे समजूनच प्रत्येक सदस्य समुदायात वावरत असतो.

समुदाय-भावना संमिश्र (complex) स्वरूपाची आहे. समुदाय-भावनेचे विश्लेषण केले तर त्यात विविध भावना मिसळलेल्या आहेत असे दिसून येते अशा परस्परसंबंधित भावनांपैकी (१) आत्मीय-भावना ( we-feeling ) (२) कार्य-भावना (role-feeling) आणि (३) अवलंबन-भावना (dependency-feeling) या तीन भावना अगदी स्पष्टपणे ओळखता येतात.

(१) **आत्मीय-भावना:-** समुदाय-भावनेमध्ये आत्मीयतेची भावना अतिशय प्रबळ असते. समुदायातील प्रत्येक सदस्य इतर सदस्यांकडे आत्मीयतेच्या भावनेने पहात असतो व त्या दृष्टिकोणातून इतर सदस्यांशी वागत असतो. त्यामुळे त्याला समुदाय आपलाच आहे आणि समुदायाचे कार्य हे आपलेच कार्य आहे असे वाटत असते. आपण इतर सदस्यांपासून भिन्न आहोत ही कल्पनाच कोणत्याही सदस्याच्या मनात येत नाही. इतर सदस्यांविषयीची ही आपलेपणाची किंवा अनन्यतेची भावना समान हितसंबंध असलेल्या कोणत्याही समूहात दिसत असली तरी ती भावना स्थानीय हितसंबंध असलेल्या समुदायामध्ये जास्ती स्पष्ट रीतीने आढळून येते.

(२) **कार्य-भावना:-** समुदायाच्या प्रत्येक सदस्याला समुदायामध्ये आपल्याला विशिष्ट स्थान (place) आहे असे वाटत असते. तसेच त्या स्थानानुसार आपल्याला समुदायात विशिष्ट कार्य केले पाहिजे किंवा विशिष्ट भूमिका पार पाडली पाहिजे अशी त्याची धारणा असते. सामाजिक जीवनात त्याने इतरांसाठी जसे कार्य केले पाहिजे तसे इतरांनीही त्याच्यासाठी काही केले पाहिजे अशी त्याची अपेक्षा असते. ही कार्य-भावना सदस्यांच्या मनामध्ये शिक्षणाच्या योगाने निर्माण करता येते. व्यक्तीच्या मनात अशी भावना निर्माण झाली व त्याप्रमाणे वर्तन होऊ लागले म्हणजे त्या व्यक्तीला आपणास समुदायाचे सदस्यत्व मिळाले आहे असे वाटू लागते. तेव्हा आपण करावयाचे कार्य हे समुदायाच्या कार्याचाच एक ाग आहे ही कार्य-भावना समुदाय-भावनेचे महत्त्वपूर्ण अंग आहे.

(३) **अवलंबन-भावना** :– स्वतःच्या जीवनासाठी व व्यक्तिमत्त्वाच्या विकासासाठी समुदायावर विसंबून राहण्याची अवलंबन–भावना कार्य–भावनेशी अत्यंत निगडित असते. आपल्या भौतिक व मानसिक गरजा भागविण्यासाठी व्यक्तीला समुदायावर अवलंबून राहावे लागते. जीवनाला लागणाऱ्या भौतिक गोष्टी मनुष्याला समुदायात उपलब्ध होतात. तसेच मनुष्याला एकटेपणाचे जीवन नको असते. एकटेपणात त्याला मानसिक समाधान लाभत नाही. तेव्हा मानसिक समाधान मिळण्यासाठी देखील मनुष्याला समुदायाचा आधार घ्यावा लागतो. म्हणून समुदायावरती अवलंबून राहण्याची ही भावना समुदाय–भावनेतील प्रमुख भावना आहे.

समुदाय–भावनेत अंतर्भूत असलेल्या आत्मीय–भावना, कार्य–भावना व अवलंबन–भावना या तीन भावनांची तीव्रता व त्यांचे प्रमाण सदस्याच्या दृष्टीने सर्व समुदायांत सारखे असत नाही. एखाद्या सदस्याला ग्राम–समुदायाविषयी वाटणारी आत्मीय-भावना प्रदेश-समुदायाविषयी वाटणाऱ्या आत्मीय-भावनेपेक्षा जास्ती तीव्र असणे शक्य आहे. तसेच समुदायातील सामूहिक जीवनामुळे या तिन्ही भावना सदस्यांच्या मनात आपोआप निर्माण होतात. पण काही वेळेला त्यांतील एखादी भावना विशेष तीव्रतर करण्याचे खास प्रयत्न केले जातात. राष्ट्र-समुदायावरची अवलंबन–भावना वाढविण्याची खटपट नेहमी केली जाते.

समुदायाचे सदस्य विवक्षित प्रदेशात समान जीवन व्यतीत करीत असल्या–मुळे त्यांच्यामधील प्रभेदक साम्य (distinctive likeness) दाखविणाऱ्या अनेक गोष्टी निर्माण होतात. तसेच या गोष्टी सदस्यांची समुदाय-भावना व्यक्त करण्यास व ती दृढतर बनविण्यास विशेष मदत करतात. समुदाय–भावना स्पष्ट रीतीने व्यक्त करणाऱ्या गोष्टींमध्ये समुदायातील लोकरूढी (community folkways) प्रमुख आहेत. कोणत्याही समूहातील सदस्यांमध्ये प्रचलित असलेल्या वर्तन-प्रकारांना (modes of behaviour) लोकरूढी असे म्हणतात आणि प्रत्येक समुदायात कितीतरी वैशिष्टयपूर्ण लोकरूढी आढळून येतात. कोणत्याही समुदायाच्या सदस्यांमध्ये भाषा, पोशाख, जेवण–खाण, आदर-सत्कार इत्यादी बाबतींत विशिष्ट लोकरूढी असतात व अशा लोकरूढींच्या साहाय्याने आपल्याला विभिन्न समुदाय ओळखता येतात. मराठी भाषेतील शब्दप्रयोग, वाक्प्रयोग, म्हणींचा उपयोग, भाषाशैली, शब्दोच्चाराची पद्धत, बोलण्याची लकब यांसारख्या गोष्टींवरून बोलणारा मनुष्य कोणत्या ग्राम-समुदायाचा अगर नगर–समुदायाचा अगर प्रदेश–समुदायाचा आहे हे आपण समजू शकतो. भाषेप्रमाणे इतर लोकरूढींवरून समुदायाची प्रभिन्नता

प्रत्ययास येते. साहजिकच समुदायातील लोकरूढी समुदाय–भावना दृढ करण्यास मदतरूप होतात. तसेच, स्थानीय जीवनात लक्ष घालण्याच्या प्रमाणावरून देखील सदस्यांची समुदायभावना व्यक्त होत असते. समुदायातील सदस्य भौतिक व मानसिक दृष्टचा परस्परांना अतिशय जवळचे वाटतात. इतकी निकटता इतर समुदायांतील सदस्यांविषयी असत नाही. अशा निकटतेचे अनेक पुरावे आपणास सांपडतात. आपण समुदायातील सदस्यांविषयी अगदी मोकळेपणाने बोलतो आणि त्यांच्या साध्या कार्याची इतरांनी केलेल्या मोठ्या कार्यापेक्षा जास्ती वाखाणणी करतो. मामुली स्वरूपाच्या स्थानिक घडामोडींना इतरत्र घडणाऱ्या घटनांपेक्षा जास्ती महत्त्व देतो आणि त्यासाठी स्थानिक वृत्तपत्रे विशेष आवडीने वाचतो. स्थानिक भागात निर्माण झालेल्या वस्तू उत्कृष्ट असतात अशी आपली खात्री असते. आपल्या समुदायातील सदस्याने मिळविलेल्या यशाबद्दल–विशेषतः त्याने अन्य समुदायात जाऊन मिळविलेल्या यशाबद्दल–आपल्याला मोठा अभिमान वाटतो. तेव्हा स्थानीय जीवनाची आवड ही समुदाय–भावना व्यक्त करणारी दुसरी प्रमुख गोष्ट होय.

समुदाय-भावना ही विशिष्ट समुदायाशी निगडित असल्याने तिची तीव्रता बऱ्याच गोष्टींवर अवलंबून असते. आधुनिक समाजात कितीतरी प्रकारचे समुदाय आहेत आणि आपण एकाचवेळी अनेक समुदायांचे सदस्य असतो. जसे आपण ग्राम अगर नगर-समुदायाचे सदस्य असतो तसे आपण त्याचवेळी प्रदेश-समुदाय, राष्ट्र–समुदाय यांसारख्या विशाल समुदायांचे देखील सदस्य असतो. परंतु या सर्व समुदायांविषयीच्या भावनांची तीव्रता समप्रमाणात असत नाही. भावनांची तीव्रता समुदायानुसार बदलत असते. ज्या समुदायाविषयी आपणास विशेष महत्त्व वाटते त्या समुदायासंबंधी आपल्या भावना फार तीव्र असतात तसेच एखाद्या समुदायाविषयीच्या आपल्या भावनांची तीव्रता तशीच टिकून राहात नाही. कालानुसार ती बदलत असते. अलीकडील काळात विशिष्ट हितसंबंधांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी खास संघ अगर मंडळे कार्य करीत असल्याने आणि संदेशव्यवहाराच्या साधनांत खूप वाढ झाली असल्याने मनुष्याची अशा संघांकडे जास्ती लक्ष देण्याची प्रवृत्ती वाढत आहे. साहजिकच मनुष्याची समुदाय-भावनेची तीव्रता त्यामानाने कमी होत आहे.

## ३. *ग्राम समुदाय*

विशिष्ट भू–भागात एकत्रित राहून समान जीवन व्यतीत करणाऱ्या लोकांचा समुदाय निर्माण होतो. समुदायातील लोकांचे समग्र जीवन समुदायातच सामावलेले

असल्याने त्यांच्यामध्ये एकात्मतेची भावना उत्पन्न होऊन परस्परांना ते फार निकटचे वाटू लागतात. बराच काल समग्र जीवन एका भू-भागात गेल्याने त्यांची समुदायाविषयींची एकात्मतेची भावना सुदृढ होत जाते आणि प्रत्येकजण आपल्या समुदायाशी समरस होऊन जातो. प्रत्येक व्यक्तीचा समुदायाशी निकटचा संबंध येत असल्याने व्यक्तीवर समुदायाचा परिणाम होणे अपरिहार्य असते. ज्याप्रमाणे समुदायाचे स्वरूप असेल त्याप्रमाणे समुदायाचा सदस्यांच्या जीवनावर परिणाम होणार हे उघड आहे. समुदाय ज्या निश्चित भू-भागावर आधारलेला असतो त्या भू-भागाच्या वैशिष्ट्यानुसार समुदायाचे स्वरूप मुख्यतः ठरत असते. ग्रामीण भू- भाग (rural area) आणि नागरी भू-भाग (urban area) असे दोन प्रकारचे विशिष्ट भू-भाग फार पुरातन कालापासून प्रचलित असून त्या दोघांत मूलभूत फरक आहेत. ग्रामीण भू-भागातील लोकांवर नैसर्गिक पर्यावरणाचा (natural environment) पगडा असतो तर नागरी भू-भागातील लोकांचा मानव-निर्मित पर्यावरणाशी (man-made environment) विशेष संबंध येतो. पर्यावरणाचा लोकांच्या जीवनावर व संस्कृतीवर दूरगामी परिणाम होत असल्याने ग्रामीण व नागरी भू-भागांतील लोकांच्या जीवनात व संस्कृतीत मूलभूत तफावत दिसून येते. साहजिकच ग्रामीण भू-भागावर आधारलेल्या लोकांचा ग्राम समुदाय (village or rural community) व नागरी भू-भागावर आधारलेल्या लोकांचा नगर समुदाय (city or urban community) यांत महत्त्वपूर्ण फरक आहेत. तेव्हा समुदायातील लोकांच्या समान जीवनाची कल्पना येण्यासाठी ग्राम व नगर समुदाय यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

ग्राम समुदायांचा आकार ( size ) नगर समुदायांच्या मानानें कितीतरी लहान असतो. ग्राम समुदायात थोडया लोकांचाच समावेश होतो आणि त्यांची नैसर्गिक व इतर साधनसामुग्रीही विशिष्ट स्वरूपाची व मर्यादित असते. या गोष्टींचा ग्राम समुदायाच्या सामाजिक जीवनावर ठसा उमटल्याखेरीज राहात नाही. सामाजिक जीवनाच्या दृष्टिकोणातून ग्राम समुदायाची खालीलप्रमाणे मुख्य लक्षणे प्रत्ययास येतात.

### १. कुटुंब-प्रभाव :

ग्राम समुदायात कुटुंब या सामाजिक समूहाला विशेष महत्त्व आहे. व्यक्तीच्या आर्थिक व सामाजिक गरजा बऱ्याच प्रमाणात भागविण्याचे कार्य कुटुंब करीत असते. कित्येकदा अर्थोत्पादनाच्या कामासाठी कुटुंबाला समुदायापासून दूर व स्वतंत्रपणे राहावे लागते. एक घटक म्हणूनच कुटुंबाचा इतरांशी संबंध येतो.

व्यक्तीचे जीवन पुष्कळ अंशी कुटुंबातच व्यतीत होत असल्याने कुटुंबातील व्यक्तींच्यामध्ये तीव्र संसक्ती (intense cohesion) प्रकर्षाने आढळून येते. साहजिकच कुटुंबाचा त्यातील लहान-थोर व्यक्तींवर सर्व दृष्टींनी विशेष प्रभाव पडतो. विवाह-संबंध, धर्मपालन, अर्थोत्पादन, राजकारण, मनोरंजन आदी जीवनाच्या विविध क्षेत्रांतील व्यक्तींच्या आचार-विचारांवर कुटुंबाचे नियंत्रण असते. प्रत्येक व्यक्तीवर कुटुंबाच्या मतांचा व रूढींचा पगडा असतो. सर्वसाधारण-पणे मालमत्ता वैयक्तिक मालकीची न समजता कुटुंबाच्या मालकीची समजली जाते. कोणतीही व्यक्ती आपल्या कुटुंबात इतकी सामावलेली असते की त्या व्यक्तीचा सामाजिक दर्जा तिच्या कुटुंबावरून ठरविला जातो. अशा रीतीने ग्राम समुदायात कुटुंबाचा प्रभाव पदोपदी प्रत्ययास येतो.

### २. प्राथमिक संबंधांचे बाहुल्य :

ग्राम समुदाय केव्हाही आकाराने लहान असतो. समुदायातील लोकांचे एकमेकांशी प्रत्यक्ष संबंध नेहमी येतात. व्यक्तीचा बराचसा वेळ कुटुंबात जात असल्याने कुटुंबातील सर्व व्यक्तींशी प्रत्येकाचे घनिष्ठ संबंध प्रस्थापित होतात. तसेच व्यक्तीचे शेजार-पाजारच्या व्यक्तींशी अगदी जवळचे संबंध येतात. साहजिकच ग्राम समुदायाला प्राथमिक समूहाचे स्वरूप येते आणि त्यातील व्यक्तींच्यामध्ये प्राथमिक संबंध जास्ती प्रमाणात आढळून येतात.

### ३. निसर्ग-प्रभाव :

ग्राम समुदायातील व्यक्तींचा निसर्गाशी निकटचा संपर्क नेहमी येत असतो. व्यक्तींचा उदरनिर्वाह निसर्गावर अवलंबून असतो आणि निसर्गाचा जास्तीत जास्त उपयोग कसा करून घ्यावा याची विवंचना त्यांना सारखी लागलेली असते. उप-जीविका मिळविण्याच्या कामात त्यांना निसर्गाची जशी मदत होते तशी आडकाठी देखील येते. मित्र आणि शत्रू या दोन्ही रूपांनी निसर्ग त्यांच्या समोर उभा असतो. तेव्हा जीवनाच्या धडपडीत निसर्गाचा मित्र म्हणून उपयोग करून घ्यावा अशी त्यांची प्रबळ इच्छा असते. पण निसर्गाच्या शक्तींवर नियंत्रण ठेवणे व इष्ट कार्य साध्य करून घेणे त्यांच्या आवाक्याबाहेर असते. इतकेच नव्हे तर निसर्गातील शक्तीची यथार्थ कल्पनाच त्यांना करता येत नाही. साहजिकच अगम्य अशा निसर्गाशी मिळते घेण्याचा त्यांना प्रयत्न करावा लागतो व त्यासाठी निसर्गाला शरण जाण्याखेरीज त्यांना गत्यंतर असत नाही. अशा रीतीने ग्राम समुदायातील लोकांच्या जीवनावर निसर्गाचा प्रभाव पडलेला दिसून येतो. म्हणूनच ग्राम समुदा-यातील लोक धर्म, परंपरा व श्रद्धा या गोष्टींना जास्ती मान देत असतात.

### ४. शेती-प्राधान्य :

ग्राम समुदायातील लोकांचे शिकार करणे, मासे मारणे, शेती करणे यासारखे निसर्गावर अवलंबून असलेले व्यवसाय असतात. अशा व्यवसायांमध्ये शेतीच्या व्यवसायाला प्रमुख स्थान असते. धान्योत्पादन व पशुपालन या दोन्ही गोष्टींचा शेतीच्या व्यवसायात अंतर्भाव होतो. ग्राम समुदायातील लोकांच्या जीवनात शेतीच्या व्यवसायाला प्राधान्य मिळत असल्याने लोकांच्या आचार-विचारांवर शेती व्यवसायाचे दूरगामी परिणाम झालेले आढळून येतात. ग्रामीण लोकांची निसर्गाधीनता वाढते व विचारसरणी दैववादी बनत जाते. संपत्तिनिर्मितीचे प्रमुख साधन म्हणून जमीनीला अतिशय महत्त्व येते व जमीनधारकाला मानमान्यता मिळते. जमीन ही प्रमुख मालमत्ता समजली जाते आणि जमीनीवरील आपले मालकी अगर इतर हक्क सुरक्षित राहावेत अशी लोकांची अविरत धडपड चालू असते. जमीनीवरील हक्कांना अगर हितसंबंधांना धक्का पोचेल असा समाज-व्यवस्थेतील कोणताही फेरबदल स्वीकारण्यास जमीन-मालक तयार होत नाहीत. तसेच प्रचलित समाज-व्यवस्थेत ज्यांना जमीन-मालकीचे हक्क नाहीत असे लोक समाज-व्यवस्था बदलण्याची धडपड करण्यास प्रवृत्त होतात.

### ५. विशिष्टीकरणाचा अभाव :

ग्राम समुदायातील लोकांचे काम विशिष्ट स्वरूपाचे (specialised) असत नाही. त्यांना विविध प्रकारची कामे करावी लागतात. शेती हा त्यांचा प्रमुख व्यवसाय असला तरी या एका व्यवसायात त्यांना अनेक तऱ्हेची कामे करावी लागतात. जमीन नांगरणे, बी पेरणे, बांध घालणे, पाणी देणे, खत घालणे, तण काढणे, कापणी करणे, भुस्सा वेगळा करणे अित्यादी कामे पार पाडावी लागतात. तसेच शेतकऱ्यांना शेती व्यवसायाखेरीज सुतारकाम, लोहारकाम, बांधकाम आदी कामांची चांगली माहिती असावी लागते. शेतीमध्ये यांत्रिक उपकरणांचा उपयोग होऊ लागल्यापासून तंत्रविद्येचे थोडेफार ज्ञान असणे आवश्यक झाले आहे. शेतकऱ्यांच्या स्त्रियांना देखील शेतीसंबंधित विविध कामांची माहिती असते आणि त्या आपले घरकाम सांभाळून शेतीच्या कामात पुरुषांना बरीच मदत करतात. अशा रीतीने विशिष्टीकरणाचा अभाव ( absence of specialisation ) ग्राम समुदायात नेहमी आढळून येतो.

### ६. साधे जीवन :

ग्राम समुदातील लोकांच्या जीवनात सर्वत्र साधेपणा दिसून येतो. शेती व्यवसाय हे त्यांच्या आजीविकेचे प्रमुख साधन असते. पण शेती व्यवसाय

तितकासा किफायतशीर असत नाही आणि विशेषत: लहान शेतकऱ्यांना तो केव्हाही फायद्याचा ठरत नाही. शेतकरी नेहमी कर्जबाजारी असतात. काही वेळेला त्यांना फायदा होतो पण त्यांना कर्जमुक्त करण्याइतपत फायदा भरीव असत नाही. म्हणून शेतकऱ्यांना मितव्ययी व्हावे लागते व साधे जीवन अनुसरावे लागते. शहरातील लोकांप्रमाणे ते दिखाऊपणाच्या किंवा चैनीच्या वस्तूंवर खर्च करीत नाहीत. कारण तसे करणे ग्रामीण लोकांना शक्य असत नाही व त्याची जरूरी देखील भासत नाही. ग्रामीण लोकांजवळ तितकासा पैसा नसतो म्हणून त्यांना शोभेच्या वस्तू घेणे परवडत नाही. तसेच ग्राम समुदायातील लोकांना एकमेकांविषयी पुष्कळ माहिती असल्याने प्रदर्शनीय वस्तू खरेदी करून स्वतःचा मोठेपणा दाखविण्याची आवश्यकता वाटत नाही.

## ४. नगर समुदाय

नागरी भू-भागातील परिस्थिती ग्रामीण भू-भागातील परिस्थितीपेक्षा कितीतरी भिन्न असते. त्यामुळे नगर समुदाय व ग्राम समुदाय यांमध्ये अनेक बाबतींत महत्त्वपूर्ण फरक आढळून येतात. आकाराने नगर-समुदाय ग्राम समुदायापेक्षा मोठे असतात आणि विशाल नगर समुदायांची संख्या आधुनिक काळात सारखी वाढत चालली आहे. जास्ती लोक लहान जागेवर एकत्रित राहिले म्हणजे त्यांच्या परस्परसंबंधांवर कायमचे परिणाम होणे अपरिहार्य असते. प्राथमिक संबंधांच्या ऐवजी दुय्यम संबंधांना नगर समुदायात विशेष महत्त्व येते आणि कुटुंबाचा लोकांवर तितकासा प्रभाव पडत नाही. तसेच मानव-निर्मित पर्यावरणात नगर समुदायातील लोकांचे जीवन मुख्यत: जात असल्याने त्यांच्यावर निसर्गाचा प्रभाव दिसून येत नाही व शेती व्यवसायाशी त्यांचा संबंध देखील येत नाही. ग्राम समुदायातील लोकांना विविध व्यवसायांचे ज्ञान असावे लागते तर नगर-समुदायातील लोकांचे काम-धंद्याच्या दृष्टीने विशिष्टीकरण झालेले असते. विवक्षित धंद्यावर किंवा त्याच्या एखाद्या भागावर नगर समुदायातील लोकांचा निर्वाह अवलंबून असतो. काम-धंद्यांच्या विविधतेमुळे व ते आचरण्यास सर्वांना मुभा असल्यामुळे नगर समुदायातील लोकांमध्ये स्पर्धा चालू असते आणि स्पर्धेला महत्त्व मिळाल्यामुळे लोकांच्या कर्तृत्वाला भरपूर वाव असतो. अर्थोत्पादन नगर समुदायात मोठ्या प्रमाणावर चालू असते व त्यामुळे लोकांची आर्थिक स्थिती सुधारण्यास बरीच मदत होते. साहजिकच नगर समुदायातील लोकांची राहणी पार बदलून जाते आणि साधेपणाच्या ऐवजी दिखाऊपणाला महत्त्वाचे स्थान मिळते.

या सर्व गोष्टींचे नगर समुदायातील लोकांच्या सामाजिक जीवनावर दूरगामी परिणाम झाले आहेत. सामाजिक जीवनाच्या दृष्टिकोणातून नगर समुदायाची खालील प्रमाणे प्रमुख लक्षणे प्रत्ययास येतात.

## १. सामाजिक विविधता :

मोठ्या लोकसंख्येचे लहान भू–भागात केन्द्रीकरण झाल्याने नगर समुदायांत सामाजिक विविधता ( social heterogeneity ) निर्माण होते. शहरात नाना देशांचे, वंशांचे व संस्कृतींचे लोक येऊन वसती करतात. धर्म, जात, भाषा, व्यवसाय इत्यादी बाबतींत शहर-वासीयांत भेद असतात. त्यांच्यातील या फरकांमुळे ते परस्परांना उपयोगी होऊ शकतात. जितके शहर मोठे तितकी विविधता अधिक अशी परिस्थिती असते. म्हणून वैयक्तिक आवडी–निवडी, आचार–विचार, रीति–रिवाज इत्यादी बाबतींत नगरवासीयांमध्ये आढळून येणारी विविधतेची कक्षा ग्राम–वासीयांत केव्हाही पाहण्यात येत नाही.

## २. दुय्यम साहचर्य ( secondary association ) :

आकारांच्या दृष्टीने विचार करता नगर समुदाय प्राथमिक समूहांच्या सदरात मोडत नाही. नगर समुदाय हा दुय्यम समूहाचा एक प्रकार आहे. शहरामध्ये लोकांशी संबंध येतात व त्यांच्याशी व्यवहार करावे लागतात. पण संबंध येणारे पुष्कळसे लोक अगदी अपरिचित असतात. त्यामुळे त्यांच्या संबंधांत घनिष्ठता अगर आत्मीयता असत नाही तर उलट तटस्थता अगर औदासिन्य ( indifference ) असते. याचा अर्थ त्यांच्यामध्ये शिष्टाचाराचे नियम पाळले जात नाहीत किंवा ते एकमेकांची सोय बघत नाहीत असा नाही. ते सर्व शिष्टाचार पाळतात. पण हे सर्व वरकरणी असते, अगदी यांत्रिक स्वरूपाचे असते. वागणुकीत आपलेपणाची भावना असत नाही. म्हणून नगर समुदायात इतर लोक मनुष्यप्राणी आहेत असे न समजता ते सजीव वस्तूंच्या सारखे आहेत असे समजण्याची प्रवृत्ती बळावत जाते.

## ३. सामाजिक सहिष्णुता :

नगर समुदायातील लोकांमध्ये विविधता असते आणि त्यांचे परस्परांशी नेहमी संपर्क येत असतात. म्हणून आपल्यापेक्षा अगदी भिन्न वृत्तींच्या व चालीरीतींच्या लोकांविषयी सहिष्णुता दाखविणे आवश्यक होते. परस्परविरोधी मतांचे व हित–संबंधांचे, अतिशय श्रीमंत व अत्यंत गरीब, फार शिकलेले व शिक्षणाचा गंध नसलेले

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम.................... दि: ....................
क्रमांक ....................
नोंद दि: ....................

यांसारखे विरुद्ध टोकाचे लोक पाहून नगरवासीयांना कसलेही आश्चर्य वाटत नाही. अशा सर्व प्रकारच्या लोकांमध्ये मिसळून नगरवासीयांना काम करावे लागत असल्यामुळे त्यांच्यामध्ये तटस्थतेची अभिवृत्ती ( attitude of indifference ) उत्पन्न होते व त्यांना कित्येक गोष्टी सहन कराव्या लागतात.

### ४. दुय्यम समूहांचे नियंत्रण :

ज्यांच्याशी नात्यागोत्याचे संबंध नाहीत, ज्यांच्याशी प्रत्यक्ष व्यक्तिगत संपर्क येत नाही व ज्यांच्याविषयी भावनेचा ओलावा नाही अशा अपरिचित लोकांमध्ये शहरवासीयांना राहावे लागते. परस्परांशी अपरिचित व भिन्न हितसंबंधांचे लोक एकत्र राहू लागले म्हणजे इतरांना लुबाडून स्वतःचा फायदा करून घेण्याची प्रवृत्ती त्यांच्यामध्ये बळावत जाते. समाजहिताच्या दृष्टीने ही प्रवृत्ती अतिशय अनिष्ट असल्याने तिच्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असते. पण कुटुंब, मित्रपरिवार यासारखे प्राथमिक समूह लोकांवर अशा दृष्टीने नियंत्रण ठेवण्यास असमर्थ ठरतात. म्हणून पोलीस खाते, स्थानिक स्वराज्य खाते यासारख्या दुय्यम समूहांकडे परस्पर-शोषणाच्या प्रवृत्तींवर व कृतींवर नियंत्रण ठेवण्याचे काम सोपविले जाते. अर्थात जितके शहर मोठे असेल तितके हे नियंत्रणाचे काम अवघड बनत जाते हे उघड आहे.

### ५. सामाजिक गतिशीलता :

नगर समुदायात सामाजिक गतिशीलता मोठ्या प्रमाणात आढळून येते. शहर-वासीयांना आपला दर्जा ( status ) वाढविण्याची संधी मिळते व संधीचा ते उपयोग करून घेतात. समाजात दोन प्रकारचे दर्जे असतात; एक शारीरिक गोष्टीं-मुळे दिलेला किंवा मिळालेला दर्जा ( ascribed status ) आणि दुसरा स्वकर्तृ-त्वाने मिळविलेला दर्जा ( achieved status ). लिंग, वय, वंश यासारख्या शारीरिक बाबींमुळे मिळालेल्या दर्जाचा व्यक्तिनिरपेक्ष संबंध ठेवणाऱ्या व स्पर्धेला महत्त्व देणाऱ्या शहरी वातावरणात मनुष्याला काही फायदा होत नाही. कारण शहरात मनुष्याचा दर्जा त्याच्या कर्तृत्वावर आधारलेला असतो. मनुष्याला स्वतःच्या कर्तृत्वावर आपला दर्जा कितीही वाढविता येतो. तसेच त्याच्या गुणांनी त्याचा दर्जा खालीही जाऊ शकतो. बुद्धिमत्तेचा उपयोग करून, विद्वत्ता संपादन करून, अगर अन्य समाजमान्य मार्गांनी मनुष्याला उच्च दर्जा मिळविता येत असल्याने नगर-समुदायात सामाजिक गतिशीलता प्रत्ययास येते.

### ६. ऐच्छिक मंडळांची विपुलता :

नगर समुदायात लोकांची संख्या मोठी असते,त्यांच्यात भरपूर विविधता असते, ते एकमेकांपासून फार दूरवर राहात नाहीत आणि ते परस्परांशी सुलभतेने संपर्क ठेवू शकतात. त्यामुळे ऐच्छिक मंडळांच्या ( voluntary associations) स्थापनेला अनुकूल परिस्थिती शहरात अस्तित्वात असते. साहजिकच विविध प्रकारच्या ऐच्छिक मंडळांची विपुलता शहरात आढळून येते. कोणत्याही वयाच्या, लिंगाच्या, वंशाच्या, धर्माच्या, व्यवसायाच्या, देशाच्या, छंदाच्या ( hobby ) लोकांना आपल्याला हवे तसे लोक मिळणे कठीण जात नाही. समान हितसंबंधांचे व प्रवृत्तींचे लोक असले म्हणजे कोणत्याही प्रकारच्या ऐच्छिक मंडळांची स्थापना होण्यास वेळ लागत नाही. म्हणून नगर समुदायात कामगार संघ, सांस्कृतिक समित्या, राजकीय पक्ष, क्लबस् यासारख्या ऐच्छिक मंडळांची रेलचेल दिसून येते.

### ७. व्यक्तीकरण ( individuation ) :

शहरात खूप लोक एकत्रित राहात असले तरी नगर समुदाय लोकांच्या व्यक्तित्वविकासाला विघातक ठरत नाही. उलट नगर समुदायात व्यक्तित्वाचा विकास करून घेण्यासाठी भरपूर वाव असतो. शहरी जीवनात विविध हितसंबंधांना जपणारी अनेक ऐच्छिक मंडळे असतात, सामाजिक संबंधांचे क्षेत्र अतिशय व्यापक असते, विकासाची बहुविध साधने उपलब्ध असतात आणि सामाजिक गतिशीलता भरपूर प्रमाणात आढळून येते. या सर्व कारणांमुळे व्यक्तीला स्वतःच्या आवडी–निवडीनुसार आपल्या आयुष्याचे नियोजन करता येते. स्वतःचे भवितव्य स्वतः ठरविण्याची संधी व त्याप्रमाणे स्वतःची उन्नती करून घेण्यासाठी साधनसामुग्री या गोष्टी नगर समुदायात व्यक्तीला उपलब्ध होतात. म्हणून नगर समुदायात व्यक्तित्व-विकासाला नेहमी प्रोत्साहन मिळत असते.

### ८. क्षेत्रीय वियोजन ( spatial segregation ) :

नगर समुदायातील विविध प्रकारच्या व संख्येने सारख्या वाढणाऱ्या लोकांना मर्यादित भू-भागात राहावे लागत असल्याने त्यांच्यामध्ये राहण्यासाठी किंवा कामधंद्यांसाठी जागा मिळविण्याकरिता स्पर्धा लागणे अपरिहार्य असते. साहजिकच समुदायातील विविध समूहांचे, उद्योगधंद्यांचे व व्यवसायांचे शहराच्या विभिन्न भागांत वियोजन होते. यालाच क्षेत्रीय वियोजन असे म्हणतात. शासकीय कार्यालये, नगरपालिकेची कार्यालये, बँका, पतपेढ्या, विमा कंपन्या यासारख्या सर्व

शहराच्या मूलभूत गरजा भागविणाऱ्या महत्त्वाच्या संस्था शहराच्या मध्यवर्ती भागात केन्द्रित झालेल्या असतात. त्याचप्रमाणे वेगवेगळे व्यापार विभाग आणि डॉक्टर, सर्जन, इंजिनियर, आर्किटेक्ट, वकील, ऑडिटर यासारख्या श्रेष्ठ तज्ञ व्यावसायिक लोकांची कार्यालये शहराच्या मध्यवर्ती विभागात आढळून येतात. त्यामुळे शहराच्या मध्यवर्ती विभागातील जागांना इतकी मागणी असते व त्यांच्या किमती इतक्या वाढलेल्या असतात की त्या जागांचा राहण्यासाठी उपयोग करणे लोकांना शक्य होत नाही. म्हणून शहराचा मध्यवर्ती विभाग सोडून इतर विभागांत व शहराच्या आसपासच्या भागांत लोकांची वसतिस्थाने आढळून येतात. अशा वसतिस्थानांमध्येही विभागणी झालेली असते. वेगवेगळया धर्माचे, जातीचे, भाषेचे, व्यवसायाचे, वंशाचे, आर्थिक वर्गाचे लोक शहराच्या विशिष्ट विभागांत वसती करून इतरांपासून वेगळे राहात असलेले दिसून येतात. अर्थात त्यांच्या राहण्याच्या जागांचे स्वरूप त्यांच्या सामाजिक दर्जावर अवलंबून असते. उच्च सामाजिक दर्जा असलेल्या लोकांची वसतिस्थाने सर्व सुखसोयींनी व सौंदर्यगुणांनी युक्त अशी असतात. विशेष म्हणजे एखाद्या विभागात राहणाऱ्या लोकांचा दर्जा साधारणपणे समान असल्याने त्यांच्या आचार-विचारांत बरेचसे साम्य दिसून येते. साहजिकच विविध विभागांत राहणाऱ्या लोकांच्या आचार-विचारांत स्पष्ट तफावत आढळून येते. जन्म, मृत्यु, गुन्हेगारी, घटस्फोट, आत्महत्या, वेडेपणा, शिक्षण, व्यसने इत्यादी सामाजिक वर्तनाशी संबंधित अशा गोष्टींचे प्रमाण शहराच्या विभागानुसार बदलत असल्याचे प्रत्ययास येते. त्यामुळे शहराच्या सामाजिक जीवनाची यथार्थ कल्पना येण्यासाठी शहरांच्या क्षेत्रीय वियोजनाचे स्वरूप समजावून घेणे आवश्यक आहे.

नगर समुदायाच्या सामाजिक जीवनातील या ठळक लक्षणांचा लोकांच्या समुदाय-भावनेवर परिणाम झाल्याखेरीज राहात नाही. शहरवासीयांची समुदाय-भावना तीव्र असत नाही. ग्रामीण लोकांमध्ये मात्र प्रखर समुदाय-भावना आढळून येते. समुदाय-भावनेत अंतर्भूत असलेल्या आत्मीय-भावना, कार्य-भावना व अवलंबन-भावना या तिन्ही भावनांच्या तीव्रतेच्या बाबतींत हा फरक स्पष्टपणे जाणवतो. संमिश्र समाज, वाढते श्रमविभाजन, विविध हितसंबंधांचे संरक्षण व संवर्धन करणाऱ्या ऐच्छिक मंडळांची विपुलता, इत्यादी कारणांमुळे शहरवासीयांना समुदायाबद्दल आत्मीयतेची भावना वाटत नाही. त्यांचा ओढा समुदायापेक्षा मंडळांकडे जास्त असतो. तेव्हा सर्व समुदाय आपला आहे अशी त्यांची धारणा असत नाही. आत्मीय-भावनेप्रमाणे कार्य-भावनेवर देखील विपरीत परिणाम झालेला दिसून येतो. शहराच्या जीवनात आपले व इतरांचे नेमके काय काम आहे व त्यांचे

महत्त्व काय आहे याची शहरवासीयांना कल्पना येत नाही. म्हणून त्यांच्यामध्ये कार्य-भावना अगदी अस्पष्ट असते. अवलंबन–भावनेचीही तीच गत आहे. भौतिक व मानसिक दृष्ट्या आपण एखाद्या विवक्षित समुदायावर अवलंबून आहोत असे शहरवासीयांना वाटत नाही. एक नगर समुदाय सोडून दुसऱ्या नगर समुदायात ते सहज जाऊ शकतात. त्यामध्ये त्यांना कसलाही मानसिक ताण जाणवत नाही. तेव्हा या सर्व कारणांमुळे शहरवासीयांत ग्रामीण लोकांइतकी तीव्र व स्पष्ट समुदाय-भावना असत नाही.

# १५

# सामाजिक संस्था

## १. सामाजिक संस्थेचे स्वरूप

सामाजिक नियमनांचा विचार करताना आपण हे पाहिले पाहिजे की माणसाच्या दैनंदिन जीवनातील विविध गरजा सुव्यवस्थितपणे भागविण्यासाठी लोकरूढी (folkways), लोकनीती ( mores ) व कायदे ( laws ) यासारखी सामाजिक नियमने (social norms) अस्तित्वात येतात. नियमनांना समाजाची मान्यता असते आणि सामाजिक वारसा ( social heritage ) म्हणून समाजात ती रूढ असतात. त्यामुळे समाजातील लोकांच्या वर्तनाला विशिष्ट वळण लागते. शिवाय सामाजिक नियमनांमध्ये परस्परावलंबन असते आणि विशिष्ट गरजेशी अगर कार्याशी संबंधित असलेली नियमने एकत्र आणता येतात. अशा रीतीने विशिष्ट कार्याला पूरक असलेल्या नियमनांच्या संचाला संस्था असे म्हणतात. म्हणून " एक किंवा अधिक कार्यांच्या भोवती रचलेल्या व एकजीव झालेल्या लोकरूढी, लोकनीती व कायदे यांचा सच म्हणजे संस्था होय " अशी संस्था या शब्दाची व्याख्या केली जाते. साहजिकच कोणत्याही कार्याच्या पूर्तीसाठी आवश्यक समजल्या जाणाऱ्या नियमनांचा संच तयार झाला आणि विशिष्ट वर्तन-प्रकार ( patterns of behaviour ) निर्माण झाले म्हणजे संस्था अस्तित्वात येते. मानवी जीवनातील सर्व कार्ये समान दर्जाची असत नाहीत. मनुष्याच्या काही गरजा मूलभूत स्वरूपाच्या असतात आणि सामाजिक जीवन व्यवस्थितपणे पार पडण्यासाठी त्या गरजा भागविणे

आवश्यक असते. अशा सामाजिक दृष्टचा महत्त्वपूर्ण असलेल्या कार्यांच्या पूर्तीसाठी निर्माण झालेल्या वर्तन–प्रकारांच्या संचाला किंवा साच्याला सामाजिक संस्था ही संज्ञा लावण्यात येते " मूलभूत सामाजिक कार्यांच्या पूर्तीसाठी माणसांच्या आच–रणांचे संघटित रूप प्रस्थापित करणारे सामाजिक साचे म्हणजे सामाजिक संस्था होत " अशी सामाजिक संस्थेची व्याख्या **मेरिल व एल्डरेज** या अमेरिकेतील **समाजशास्त्रज्ञांनी** केली आहे.[1] सामाजिक कार्यांचे स्वरूप सर्व समाजांमध्ये संपूर्णपणे समान असत नाही. पण सर्वसाधारणपणे प्रजोत्पादन आणि शिशुसंगोपन व शिशुसंवर्धन करणे, उपजीविका मिळविणे, पारलौकिक शक्तींचे आराधन करणे आणि समूहातील सदस्यांवर नियंत्रण ठेवणे ही कार्ये लोकांच्या अस्तित्वाला व सातत्याला अत्यंत आवश्यक असल्याने सर्व प्रकारच्या समाजांमध्ये मूलभूत समजली जातात आणि त्यांच्या पूर्तीसाठी क्रमशः कुटुंब, अर्थ, धर्म व राज्य या सामाजिक संस्था समाजामध्ये आढळून येतात.

सामाजिक संस्थेच्या व्याख्येवरून हे प्रतीत होते की सामाजिक कार्ये आणि ती साध्य करून घेण्यासाठी लागणारे प्रस्थापित वर्तनप्रकार ही कोणत्याही सामाजिक संस्थेची दोन प्रमुख अंगे आहेत. म्हणूनच एकोणिसाव्या शतकातील प्रसिद्ध अमेरिकन समाजशास्त्रज्ञ **डॉ. विल्यम सम्नर** यांनी " कोणत्याही संस्थेचे संकल्पना व रचना असे दोन भाग असतात " ( " An institution consists of a concept and a structure. " ) असे प्रतिपादन केले आहे. संस्थेच्या मुळाशी असलेले विचार, भावना, मते व हेतू यांचा संकल्पनेत समावेश होतो आणि रचनेत मांडणी किंवा यंत्रणा अभिप्रेत असते. संकल्पना व रचना हे दोन्ही भाग सामाजिक संस्थेच्या अस्तित्वाला आवश्यक आहेत आणि ते एकमेकापासून अलग करता येत नाहीत अर्थात संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्यासाठी निर्माण झालेली यंत्रणा अगर रचना सर्वत्र समान असत नाही. वेगवेगळ्या समाजांत सामाजिक संस्थेची वेगवेगळी रचना आढळून येते. उदाहरणार्थ, प्रजोत्पादन आणि शिशुसंगोपन व बालसंवर्धन या उद्देशांच्या पूर्तीसाठी कार्य करणाऱ्या कुटुंबसंस्थेची रचना विशाल संयुक्त कुटुंबापासून अगदी लहानशा विभक्त कुटुंबासारखी विविध तऱ्हेची असते. मानव आणि अतिभौतिक शक्ती यांचा योग्य संपर्क प्रस्थापित करण्याचा हेतू असलेल्या धर्मसंस्थेची रचना जशी अतिशय साधी असते तशी ती अत्यंत क्लिष्ट देखील असते.

---

1. " Social institutions are social patterns that establish the organized behaviour of human beings in the performance of basic social functions. " —Merrill and Eldredge

काही धर्मांत धार्मिक विधी मनुष्याला स्वतः करता येतात तर काही धर्मांत ते करण्यासाठी मध्यस्थांची जरूरी असते. समूहांतील सदस्यांवर नियंत्रण ठेवणे हा राज्यसंस्थेचा प्रमुख उद्देश असतो पण त्या उद्देशाला मूर्त स्वरूप देण्यासाठी केलेली राज्यसंस्थेची रचना मात्र अनौपचारिक लोकशाहीपासून नियंत्रित सर्वाधिकारशाहीपर्यंत विविध स्वरूपाची असते. उपजीविकेची साधनें सदस्यांना मिळवून देण्याचा हेतू असलेल्या अर्थसंस्थेची रचना देखील अनेक प्रकारची असते.

सामाजिक संस्थांना जसे निश्चित हेतू अगर उद्देश आणि यंत्रणा असतात तसे सामाजिक संस्थांची वेगवेगळी प्रतीकात्मक लक्षणे अगर चिन्हे ( symbolic traits ) देखील असतात. विवाहाच्या वेळची आंगठी, विशिष्ट पोशाख, कुलागत वस्तू ( heirlooms ) इत्यादी गोष्टी कुटुंबसंस्थेची प्रतीकात्मक लक्षणे असतात मूर्ती, मंत्र, स्वस्तिक किंवा ओंकार दाखविणारी चिन्हे आदी धर्मसंस्थेची प्रतीकात्मक लक्षणे आहेत. राज्यसंस्थेच्या प्रतीकात्मक लक्षणांत राष्ट्रध्वज, राष्ट्रमुद्रा, राष्ट्रगीत राष्ट्रीय पोशाख अशा गोष्टींचा समावेश होतो तर व्यापार चिन्हासारख्या ( trademark ) गोष्टी अर्थसंस्थेची प्रतीकात्मक लक्षणे दर्शवितात.

सामाजिक संस्थांना प्रतीकात्मक लक्षणांप्रमाणे काही भौतिक लक्षणे ( physical or material traits ) देखील असतात. घर आणि घरातील वस्तू या कुटुंबसंस्थेची भौतिक लक्षणे होत तर देऊळ व मठ यांचा धर्मसंस्थेच्या भौतिक लक्षणांत समावेश होतो. सार्वजनिक इमारती व सार्वजनिक बांधकाम ही राज्यसंस्थेची भौतिक चिन्हे आहेत. त्याचप्रमाणे यंत्रे, कारखाने, सामानगृहे (stores), कार्यालये (offices) इत्यादी गोष्टी अर्थसंस्थेची भौतिक लक्षणे होत.

व्यक्तींच्या दृष्टिकोणांतून विचार केला तर असे दिसून येते की सामाजिक संस्था या पुष्कळ अंशी ऐच्छिक स्वरूपाच्या असत नाहीत. व्यक्तींचा त्रिविध सामाजिक संस्थांमधील प्रवेश जन्माधिष्ठित असल्याने त्यामध्ये व्यक्तींना निवड करण्याची संधी असत नाही. ज्या कुटुंबात आणि राष्ट्रात मनुष्याचा जन्म होतो त्या कुटुंबसंस्थेचा व राज्यसंस्थेचा सदस्य म्हणून त्याला जवळ जवळ कायमचे राहावे लागते. तसेच ज्या धर्मसंस्थेत मनुष्य जन्माला येतो त्याच धर्मसंस्थेत तो सर्वसाधारणपणे आपले आयुष्य काढतो. या संस्थांच्या मानाने अर्थसंस्था ऐच्छिक स्वरूपाची असते कारण मनुष्याला आपल्या आवडीप्रमाणे व्यवसाय अगर धंदा निवडता येतो. पण यात देखील समाजमान्य आर्थिक वर्तनप्रकारांच्या विरुद्ध व्यवहार कोणत्याही व्यक्तीला करता येत नाहीत. म्हणून समाजातील प्रत्येक व्यक्ती कोणकोणत्या सामाजिक संस्थांत सहभागी होते हे बव्हंशी आगाऊच ठरलेले असते.

तेव्हा समाजातील हेतू व उद्देश सफल करून घेण्यासाठी सामाजिक संस्था अस्तित्वात येतात. अर्थात कोणत्याही समाजातील सामाजिक संस्थांची संख्या मर्यादित असत नाही. उद्देशांची संख्या व स्वरूप यावर सामाजिक संस्थांची संख्या अवलंबून असते. तसेच समाजात विविध सामाजिक संस्था असल्या तरी त्या अनेक रीतींनी परस्परावलंबी असतात. म्हणून समाजाच्या अस्तित्वाच्या व सातत्याच्या दृष्टींनी विचार करता अर्थ संस्थेसारखी एखादी सामाजिक संस्था इतर सामाजिक संस्थांपेक्षा जास्ती महत्त्वाची असते असे म्हणता येणार नाही. आर्थिक, धार्मिक, राजकीय आदी प्रकारच्या सामाजिक संस्था सारख्याच महत्त्वाच्या असतात कारण या ना त्या रूपाने त्या समाजस्थैर्याला उपकारक असतात. शिवाय प्रत्येक व्यक्तीचा या विविध सामाजिक संस्थांशी अगदी निकटचा संबंध येतो आणि व्यक्तीचे वर्तनप्रकार अशा संस्थांनी घडविलेले असतात. म्हणून कोणत्याही समाजाचा अगर सामाजिक जीवनाचा अभ्यास करताना त्यातील सामाजिक संस्थांचा अभ्यास करणे अपरिहार्य असते. यासाठी समाजशास्त्रात सामाजिक संस्थांच्या अभ्यासाला विशेष महत्त्व आहे. आपण कुटुंबसंस्था या सामाजिक संस्थेचा समाजाच्या दृष्टीकोणातून विचार करू या.

## २. *कुटुंबसंस्थेची वैशिष्ट्ये*

विविध सामाजिक समूहांमध्ये कुटुंब एक मूलभूत व प्राथमिक स्वरूपाचा सामाजिक समूह आहे. "ज्या सामाजिक समूहात एक किंवा अधिक पुरुष आणि एक किंवा अधिक स्त्रिया आपल्या अगर दत्तक घेतलेल्या मुलांसह – निदान मुले मोठी होईपर्यंत – एकाच घरात राहातात त्या सामाजिक समूहाला कुटुंब असे म्हणतात" अशी कुटुंबाची व्याख्या डॉ. किम्बाल यंग यांनी केली आहे.[1] आई–बाप व मुले मिळून कुटुंब होत असल्याने कुटुंबात कमीत कमी दोन पिढ्यांचे लोक असतात. विशेष म्हणजे ज्या समूहाला कुटुंब ही संज्ञा प्राप्त होते त्या समूहाला समाजाची मान्यता असते. याचा अर्थ असा की कुटुंब निर्माण करणारे एक किंवा अधिक पुरुष आणि एक किंवा अधिक स्त्रिया – म्हणजे पती व पत्नी–यांच्यातील लैंगिक संबंधांना समाजाची मान्यता असते व ते साधारणपणे दीर्घकालीन स्वरूपाचे असतात आणि कुटुंबातील व्यक्तींचे हक्क व कर्तव्ये समाजाने संमत

1. " Family may be defined as a social group consisting of one or more men living with one or more women, in the same household, and their own or adopted children, at least during their early years. " — Kimball Young.

केलेली असतात. तेव्हा कुटुंबातील व्यक्तींच्या लैंगिक संबंधांच्या स्वरूपाला आणि अशा संबंधांतून जन्माला येणाऱ्या अपत्यांचे संगोपन व संवर्धन करण्याच्या त्या व्यक्तींवरील जबाबदारीला जास्त महत्त्व दिले जाते. म्हणून "अपत्यांचे प्रजनन व संवर्धन करण्यासाठी पर्याप्तपणे निश्चित व दीर्घकाल टिकणाऱ्या लैंगिक संबंधांवर आधारलेला समूह म्हणजे कुटुंब होय" अशी कुटुंबाची व्याख्या अमेरिकेतील प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ मॅकआयव्हर आणि पेज यांनी केली आहे.[1] कुटुंबामध्ये दूरच्या व जवळच्या नातलगांचा समावेश देखील होऊ शकतो, पण पती-पत्नी व त्यांच्याजवळ राहणारी त्यांची अपत्ये हे कुटुंबाचे आवश्यक लक्षण आहे.

मानवसमाजात कुटुंबाचे अनेक प्रकार आढळून येतात.

(अ) कुटुंबात किती लोक एकत्र राहातात यावरून कुटुंबाचे दोन प्रमुख प्रकार होतात. पती-पत्नी व त्यांची लहान मुले एवढेच लोक एकत्र राहात असलेल्या कुटुंबाला केंद्र कुटुंब ( nuclear family ) किंवा प्रारंभिक कुटुंब ( elementary family ) किंवा अव्यवहित कुटुंब (immediate family ) असे म्हणतात. मानव समाजात जवळजवळ सर्वत्र केन्द्र कुटुंबव्यवस्था आढळून येते. याच्या उलट काही कुटुंबात पती-पत्नी, त्यांची लग्न झालेली मुले, लग्न झालेली नातवंडे आणि लग्न न झालेली मुले व नातवंडे एकाच घरात राहातात. अशा कुटुंबाला संयुक्त कुटुंब ( joint family ) असे म्हणतात. साहजिकच तीन किंवा काही वेळेला चार पिढ्यांचे लोक एकत्र राहात असलेले संयुक्त कुटुंबात पाहावयास मिळतात तेव्हा केन्द्र कुटुंब व संयुक्त कुटुंब यांतील प्रमुख भेद असा की केन्द्र कुटुंबातील मुलगे ( अगर मुली ) लग्न झाल्यावर स्वतंत्र कुटुंबाची स्थापना करतात तर संयुक्त कुटुंबातील मुलगे ( अगर मुली ) लग्न झाल्यावर वेगळे न राहाता आपल्या बायका ( अगर नवरे ) यांसह त्याच कुटुंबात आपल्या पित्याच्या ( अगर मातेच्या ) म्हणजे कुटुंबप्रमुखाच्या देखरेखीखाली राहातात. कुटुंबप्रमुखाच्या मृत्यूनंतर संयुक्त कुटुंबाचे वेगवेगळ्या केन्द्र कुटुंबात विभाजन होते किंवा संयुक्त कुटुंबातील लोक प्रचलित रीतिरिवाजाप्रमाणे जमेल तितके दिवस त्याच कुटुंबात एकत्र राहातात आणि जमले नाही तर कालांतराने विभक्त होऊन केन्द्र कुटुंबांची स्थापना करतात.

(ब) कुटुंबात औपचारिक सत्ता ( formal authority ) कोणत्या व्यक्तीकडे केंद्रित झालेली असते यावरून कुटुंबाचे दोन प्रकार पडतात. ज्या कुटुंबात

---

1. " The family is a group defined by a sex relationship sufficiently precise and enduring to provide for the procreation and upbringing of children. "—MacIver and Page.

सर्व अधिकार पित्याकडे असतात व सर्व लोकांवर पित्याचे वर्चस्व असते त्या कुटुंबाला पितृसत्तात्मक किंवा पितृप्रधान कुटुंब ( patriarchal family ) असे म्हणतात पितृसत्तात्मक कुटुंबात कुटुंबाचे नेतृत्व करण्याचे काम पित्याचे असते विशेष म्हणजे पितृसत्तात्मक कुटुंबात वंशपरंपरा (descent) पुरुष-क्रमाने (through male line, म्हणजे पित्याच्या द्वारे मोजली जाते आणि मालमत्ता व अधिकार देखील पित्याकडून मुलाकडे या पद्धतीने दिले जातात. म्हणून अशा कुटुंबाला पितृ-वंशिक कुटुंब (patrilineal family) असेही म्हणतात. तसेच पितृप्रधान कुटुंबात पितृस्थानिक निवासाची (patrilocal residence) प्रथा असते. म्हणजे विवाहानंतर स्त्री आपल्या पतीच्या घरा राहावयास येते व तेथेच पतीच्या नातलगांसमवेत राहाते. साहजिकच या सर्व गोष्टींमुळे अशा प्रकारच्या कुटुंबाला पितृमूलक कुटुंब (father-right family) असेही म्हणतात. याच्या अगदी विरुद्ध प्रकार देखील प्रचलित आहे. ज्या कुटुंबात सर्व अधिकार मातेकडे असतात व सर्व लोकांवर मातेचे वर्चस्व असते त्या कुटुंबाला मातृसत्तात्मक किंवा मातृप्रधान कुटुंब ( matriarchal family ) असे म्हणतात. मातृसत्तात्मक कुटुंबात कुटुंबाचे नेतृत्व करण्याचे काम मातेचे असते विशेष म्हणजे मातृसत्तात्मक कुटुंबात वंशपरंपरा स्त्री-क्रमाने ( through female line, म्हणजे मातेच्या द्वारे मोजली जाते आणि मालमत्ता व अधिकार देखील मातेकडून मुलीकडे या पद्धतीने दिले जातात. म्हणून अशा कुटुंबाला मातृ-वंशिक कुटुंब ( matrilineal family ) असेही म्हणतात. तसेच मातृप्रधान कुटुंबात मातृस्थानिक निवासाची ( matrilocal residence ) प्रथा असते म्हणजे विवाहानंतर पुरुष आपल्या पत्नीच्या घरी राहावयास येतो व तेथेच पत्नीच्या नातलगांसमवेत राहातो. साहजिकच या सर्व गोष्टींमुळे अशा प्रकारच्या कुटुंबाला मातृमूलक कुटुंब ( mother-right family ) असेही म्हणतात.

(क) कुटुंबातील पति-पत्नींच्या विवाहाच्या स्वरूपावरून एकविवाही कुटुंब ( monogamous family ) व बहुविवाही कुटुंब (polygamous family) असे कुटुंबाचे दोन प्रकार केले जातात. एकविवाही कुटुंबात एक पती व एक पत्नी आपल्या मुलाबाळांसह एकत्र राहातात. बहुविवाही कुटुंबात बहुपत्नीप्रथा ( polygynous marriage ) अगर बहुपतिप्रथा ( polyandrous marriage ) प्रचलित असते. म्हणून बहुविवाही कुटुंबाचे बहुपत्नीप्रथात्मक कुटुंब (polygynous family) आणि बहुपतिप्रथात्मक कुटुंब (polyandrous family ) असे दोन उपप्रकार होतात. बहुपत्नीप्रथात्मक कुटुंबात एक पती आपल्या अनेक पत्नी व आपली मुलेबाळे यांसह एकत्र राहातो. याच्या उलट

बहुपतिप्रथात्मक कुटुंबात एक पत्नी आपले अनेक पती व आपली मुळेबाळे यांच्या सनवेत एकत्र राहाते.

कुटुंबाचे प्रकार अनेक असले तरी त्या सर्व प्रकारांतून कुटुंबसंस्थेची ठळक लक्षणे दिसून येतात.

(अ) **विवाहबंधन :** ( marriage bond ) कुटुंबातील व्यक्तींच्यापैकी दोन अगर अधिक व्यक्ती विवाहबंधनामुळे एकत्रित आलेल्या असतात. त्यांच्यांतील विवाहबंधन कायमचे असू शकते अगर ते तोडताही येते. कित्येक समाजांतून घटस्फोटाची प्रथा असल्याने विवाहबंधन तोडण्याची मुभा असते. तसेच पति-पत्नी यांच्यापैकी कोणाचा मृत्यु झाल्यास त्यांच्यातील विवाहबंधन नाहीसे होते. तेव्हा प्रत्यक्ष व्यवहारात विशिष्ट समयी विवाहबंधनांनी युक्त नसलेल्या व्यक्तींचे कुटुंब असू शकते. उदाहरणार्थ, पिता व मुलेबाळे यांचे कुटुंब अगर माता व मुलेबाळे यांचे कुटुंब. पण अशी परिस्थिती नेहमी असत नाही. म्हणून कुटुंब हे विवाहबंधनावर आधारलेले असते.

ब) **रक्त – संबंध :** ( blood bond ) कुटुंबातील व्यक्ती रक्तसंबंधाने जोडल्या गेलेल्या असतात. माता–पिता व त्यांची अपत्ये यांमध्ये रक्ताचे संबंध असल्याने अपत्यांचे परस्परांशी रक्ताचे संबंध प्रस्थापित होतात तसेच माता–पित्याचे ज्यांच्याशी रक्तसंबंध आहेत त्यांच्यांशी अपत्यांचे रक्तसंबंध आपोआप प्रस्थापित होतात. तेव्हा कोणत्याही कुटुंबातील व्यक्तींच्यामध्ये खरे रक्तसंबंध दिसून येतात. पण काही अपवाद या गोष्टीला आहेत. माता–पिता व दत्तक मुले, सावत्र बाप व मुले आणि सावत्र आई व मुले यांमधील रक्तसंबंध खरे नसून ते गृहीत धरलेले असतात.

(क) **समान–निवास** ( common residence ) कुटुंबाचे विशेष लक्षण हे की त्यातील व्यक्तींचे निवासस्थान समान असते. कुटुंबातील व्यक्तींची राहण्याची जागा सहसा एका ठिकाणी असते व काही वेळेला तो अनेक ठिकाणी देखील असू शकते. अर्थात अशा वेळी कुटुंबातील व्यक्ती कोणत्याही निवासस्थानी एकत्र राहतात हिंदु कुटुंबातील लोकांची एकत्र निवासपद्धती प्रसिद्धच आहे.

कोणत्याही समाजात कुटुंबसंस्थेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण समाजातील दुसऱ्या कोणत्याही समूहापेक्षा कटुंबाचा समाजजीवनावर दूरगामी परिणाम होतो. अनेक रीतींनी कुटुंबाचा समाजावर प्रभाव पडत असतो व तो प्रभाव

या ना त्या स्वरूपात सारखा चालू असतो. म्हणून समाजातील विविध सामाजिक समूहांमध्ये कुटुंबाला अद्वितीय स्थान आहे. वर उल्लेख केलेल्या लक्षणांखेरीज इतर समूहांत दिसून न येणारी कितीतरी वैशिष्टये कुटुंबात आढळून येतात. कुटुंबाची अनन्यता खालील वैशिष्टयांवरून प्रतीत होते.

१. **सार्वत्रिकता** ( Universality ) : इतर कोणत्याही समूहापेक्षा कुटुंब जास्तीत जास्त सर्वव्यापक स्वरूपाचे आहे. मानव विकासाच्या सर्व अवस्थांमध्ये आणि सर्व समाजांमध्ये कुटुंबाचे अस्तित्व असते. मानवेतर अशा विविध प्राण्यांच्या अनेक अवस्थांमध्ये जशी कुटुंबसंस्था दिसून येते तशी ती मानवांच्या सर्व ठिकाणी पसरलेल्या विविध समाजांमध्ये पाहावयास मिळते. प्रत्येक मनुष्यप्राणी कोणत्या ना कोणत्या कुटुंबाचा सदस्य असतो किंवा पूर्वी तरी तो असला पाहिजे.

२. **भावात्मकता** ( Emotionality ) : कुटुंबात अत्यंत गहन अशा मानवी भावनांचा प्रकर्षाने आविष्कार झालेला पाहावयास मिळतो. मनुष्यस्वभावातील या संकुल भावनांवर कुटुंबाची उभारणी होते. अशा भावनांमध्ये लैंगिक संबंध, प्रजोत्पादन, मातृभाव व मातृ-पितृ-वात्सल्य यांना प्रधान स्थान आहे. या प्रमुख भावनांबरोबर प्रेमासक्ती, वंशाभिमान, आर्थिक स्थैर्याची इच्छा, वस्तूंवरील वैयक्तिक स्वामित्व प्रस्थापित करण्याची वृत्ती आणि संततीच्या रूपाने शाश्वततेची हाव अशा साहाय्यक भावना देखील कुटुंबाच्या मुळाशी असतात.

३. **अग्रता** (Priority) : मनुष्य व इतर विकसित प्राणी यांचे कुटुंब हेच सर्वांत पहिले सामाजिक पर्यावरण असते. मनुष्याचा जन्म कुटुंबातच होतो व त्याचे पालनपोषण कुटुंबातच होते. मनुष्यावर पहिला प्रभाव कुटुंबाचाच होतो. म्हणून मनुष्याचा शारीरिक व मानसिक पिंड बनविण्यामध्ये व मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करण्यामध्ये कुटुंबाला अग्रक्रम दिला जातो. अर्थात कुटुंबबाह्य परिस्थितीचा मनुष्याच्या जीवनावर परिणाम होत नाही अशातला भाग नाही. पण त्या परिस्थितीचा परिणाम होण्यास नंतर सुरूवात होते. म्हणून मनुष्याच्या जीवनाचा पाया कुटुंबातच रचला जातो. यासाठीच सर्व समूहांमध्ये कुटुंबाला अग्रतेचे स्थान असते.

४. **आकारलघुता** (Limited Size) : सामाजिक समूहांमध्ये आकाराने कुटुंब सर्वांत लहान समूह आहे. कुटुंबाचा आकार जीवशास्त्रीय परिस्थितीमुळे

बहुपतिप्रथात्मक कुटुंबात एक पत्नी आपले अनेक पती व आपली मुळेबाळे यांच्या समवेत एकत्र राहाते.

कुटुंबाचे प्रकार अनेक असले तरी त्या सर्व प्रकारांतून कुटुंबसंस्थेची ठळक लक्षणे दिसून येतात.

(अ) **विवाहबंधन :** ( marriage bond ) कुटुंबातील व्यक्तींच्यापैकी दोन अगर अधिक व्यक्ती विवाहबंधनामुळे एकत्रित आलेल्या असतात. त्यांच्यांतील विवाहबंधन कायमचे असू शकते अगर ते तोडताही येते. कित्येक समाजांतून घटस्फोटाची प्रथा असल्याने विवाहबंधन तोडण्याची मुभा असते. तसेच पति-पत्नी यांच्यापैकी कोणाचा मृत्यु झाल्यास त्यांच्यातील विवाहबंधन नाहीसे होते. तेव्हा प्रत्यक्ष व्यवहारात विशिष्ट समयी विवाहबंधनांनी युक्त नसलेल्या व्यक्तींचे कुटुंब असू शकते. उदाहरणार्थ, पिता व मुलेबाळे यांचे कुटुंब अगर माता व मुलेबाळे यांचे कुटुंब. पण अशी परिस्थिती नेहमी असत नाही. म्हणून कुटुंब हे विवाहबंधनावर आधारलेले असते.

ब) **रक्त – संबंध :** ( blood bond ) कुटुंबातील व्यक्ती रक्तसंबंधाने जोडल्या गेलेल्या असतात. माता–पिता व त्यांची अपत्ये यांमध्ये रक्ताचे संबंध असल्याने अपत्यांचे परस्परांशी रक्ताचे संबंध प्रस्थापित होतात तसेच माता–पित्याचे ज्यांच्याशी रक्तसंबंध आहेत त्यांच्यांशी अपत्यांचे रक्तसंबंध आपोआप प्रस्थापित होतात. तेव्हा कोणत्याही कुटुंबातील व्यक्तींच्यामध्ये खरे रक्तसंबंध दिसून येतात. पण काही अपवाद या गोष्टीला आहेत. माता–पिता व दत्तक मुले, सावत्र बाप व मुले आणि सावत्र आई व मुले यांमधील रक्तसंबंध खरे नसून ते गृहीत धरलेले असतात.

(क) **समान–निवास** ( common residence ) कुटुंबाचे विशेष लक्षण हे की त्यातील व्यक्तींचे निवासस्थान समान असते. कुटुंबातील व्यक्तींची राहण्याची जागा सहसा एका ठिकाणी असते व काही वेळेला तो अनेक ठिकाणी देखील असू शकते. अर्थात अशा वेळी कुटुंबातील व्यक्ती कोणत्याही निवासस्थानी एकत्र राहतात हिंदु कुटुंबातील लोकांची एकत्र निवासपद्धती प्रसिद्धच आहे.

कोणत्याही समाजात कुटुंबसंस्थेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. कारण समाजातील दुसऱ्या कोणत्याही समूहापेक्षा कुटुंबाचा समाजजीवनावर दूरगामी परिणाम होतो. अनेक रीतींनी कुटुंबाचा समाजावर प्रभाव पडत असतो व तो प्रभाव

या ना त्या स्वरूपात सारखा चालू असतो. म्हणून समाजातील त्रिविध सामाजिक समूहांमध्ये कुटुंबाला अद्वितीय स्थान आहे. वर उल्लेख केलेल्या लक्षणांखेरीज इतर समूहांत दिसून न येणारी कितीतरी वैशिष्टये कुटुंबात आढळून येतात. कुटुंबाची अनन्यता खालील वैशिष्टयांवरून प्रतीत होते.

१. **सार्वत्रिकता** ( Universality ) : इतर कोणत्याही समूहापेक्षा कुटुंब जास्तीत जास्त सर्वव्यापक स्वरूपाचे आहे. मानव विकासाच्या सर्व अवस्थांमध्ये आणि सर्व समाजांमध्ये कुटुंबाचे अस्तित्व असते. मानवेतर अशा विविध प्राण्यांच्या अनेक अवस्थांमध्ये जशी कुटुंबसंस्था दिसून येते तशी ती मानवांच्या सर्व ठिकाणी पसरलेल्या विविध समाजांमध्ये पाहावयास मिळते. प्रत्येक मनुष्यप्राणी कोणत्या ना कोणत्या कुटुंबाचा सदस्य असतो किंवा पूर्वी तरी तो असला पाहिजे.

२. **भावात्मकता** ( Emotionality ) : कुटुंबात अत्यंत गहन अशा मानवी भावनांचा प्रकर्षाने आविष्कार झालेला पाहावयास मिळतो. मनुष्यस्वभावातील या संकुल भावनांवर कुटुंबाची उभारणी होते. अशा भावनांमध्ये लैंगिक संबंध, प्रजोत्पादन, मातृभाव व मातृ-पितृ-वात्सल्य यांना प्रधान स्थान आहे. या प्रमुख भावनांबरोबर प्रेमासक्ती, वंशाभिमान, आर्थिक स्थैर्याची इच्छा, वस्तूंवरील वैयक्तिक स्वामित्व प्रस्थापित करण्याची वृत्ती आणि संततीच्या रूपाने शाश्वततेची हाव अशा साहाय्यक भावना देखील कुटुंबाच्या मुळाशी असतात.

३. **अग्रता** (Priority) : मनुष्य व इतर विकसित प्राणी यांचे कुटुंब हेच सर्वांत पहिले सामाजिक पर्यावरण असते. मनुष्याचा जन्म कुटुंबातच होतो व त्याचे पालनपोषण कुटुंबातच होते. मनुष्यावर पहिला प्रभाव कुटुंबाचाच होतो. म्हणून मनुष्याचा शारीरिक व मानसिक पिंड बनविण्यामध्ये व मनुष्याच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करण्यामध्ये कुटुंबाला अग्रक्रम दिला जातो. अर्थात कुटुंबबाह्य परिस्थितीचा मनुष्याच्या जीवनावर परिणाम होत नाही अशातला भाग नाही. पण त्या परिस्थितीचा परिणाम होण्यास नंतर सुरूवात होते. म्हणून मनुष्याच्या जीवनाचा पाया कुटुंबातच रचला जातो. यासाठीच सर्व समूहांमध्ये कुटुंबाला अग्रतेचे स्थान असते.

४. **आकारलघुता** (Limited Size) : सामाजिक समूहांमध्ये आकाराने कुटुंब सर्वांत लहान समूह आहे. कुटुंबाचा आकार जीवशास्त्रीय परिस्थितीमुळे

आपोआप मर्यादित होत असतो. मनुष्य आपल्या इच्छेला येईल त्याप्रमाणे कुटुंब मोठे करू शकत नाही कारण पति–पत्नी व त्यांची मुले यांचा समावेश असलेल्या कुटुंबाची सदस्यसंख्या जीवशास्त्रीय नियमानुसार निर्धारित होत असते. तेव्हा समाज–रचनेत अंतर्भूत असलेल्या विविध समूहांमध्ये कुटुंबाचा आकार (size) सर्वांत लहान असतो.

५. **सदस्यांची उत्तरदायिता** : ( Responsibility of the members) : कुटुंबातील सदस्यांची उत्तरदायिता इतर कोणत्याही समूहातील सदस्यांच्या उत्तरदायित्वापेक्षा कितीतरी पटीने अधिक असते. मनुष्याला आपल्या कुटुंबाविषयी जितकी जबाबदारी जाणवते तितकी त्याला इतर समूहांविषयी वाटत नाही. युद्धकाळी किंवा संकटकाळी मनुष्य आपल्या देशासाठी तन-मन-धन अर्पण करावयास तयार होतो. पण मनुष्य आपल्या कुटुंबासाठी वाटेल ते परिश्रम जीवनभर करण्यास उद्युक्त असतो. कुटुंबातील सदस्य केवळ स्वतःसाठी जगत नसतात तर सर्वांसाठी जगत असतात. म्हणून कुटुंबातील पुरुष–आणि विशेषतः स्त्रिया–सर्व सदस्यांसाठी अतिशय कष्टाची कामे सतत करीत असतात आणि कोणतीही जबाबदारी स्वीकारीत असतात. तेव्हा कुटुंब आपल्या सदस्यांकडून जितक्या विविध जबाबदारीच्या कार्यांची सतत अपेक्षा करते तशी अपेक्षा दुसरा कोणताही समूह आपल्या सदस्यांकडून करीत नाही. या जबाबदारीच्या जाणीवेचा मनुष्याचा आचार–विचारांवर आयुष्यभर परिणाम होत असतो.

६. **सामाजिक नियंत्रण** ( Social Regulation ): समाजाचा इतर समूहांच्या मानाने कुटुंबाकडे पाहण्याचा दृष्टिकोण अगदी वेगळा असतो. सामाजिक प्रतिबंध आणि कायद्यातील तरतुदी यांनी कुटुंबाचे संरक्षण केले जाते एवढेच नव्हे तर कुटुंबाचे स्वरूप तसेच कायम राहील हे कठोरपणे पाहिले जाते. यासाठी कुटुंबाच्या विविध अंगांचे खास नियंत्रण केले जाते. विवाह हा एक करार असतो हे खरे; पण इतर करारांच्यापेक्षा तो जास्त काटेकोरपणाने ठरविला जातो. हा करार करणाऱ्या लोकांना आपल्या मनाप्रमाणे कराराच्या अटी नक्की करण्याची किंवा त्या बदलण्याची मोकळीक असत नाही. तसेच कोणत्याही समाजात विवाह–कराराची प्रचलित पद्धत टिकविण्याची विशेष दक्षता घेतली जाते. कुटुंब हा एक असा समूह आहे की ज्यामध्ये व्यक्तींना आपल्या इच्छेनुसार प्रवेश करता येतो पण आपल्या इच्छेनुसार अगर परस्परांच्या संमतीने त्यातून बाहेर पडता येत नाही अगर तो समूह मोडता येत नाही.

## ३. कुटुंबसंस्थेची कार्ये

समाजात प्रत्येक सामाजिक समूहाला विशिष्ट दर्जा असतो आणि त्याला विशिष्ट सामाजिक कार्ये करावी लागतात. कुटुंब हाही एक सामाजिक समूह असल्याने काही विशिष्ट कार्ये कुटुंबसंस्थेने पार पाडावीत अशी समाजाची अपेक्षा असते. कुटुंबसंस्थेने करावयाच्या विवक्षित कार्यांमध्ये ( specific functions ) विविध समाजांत जरी थोडीशी भिन्नता असली तरी कुटुंबसंस्थेने सर्वसाधारणपणे करावयाच्या कार्यांत समानता असते. अशा कार्यांपैकी खालील कार्ये प्रमुख आहेत.

### १. प्रजोत्पादन आणि प्रजापोषण

स्त्री-पुरुषांच्या लैंगिक संबंधांवर कुटुंबाची उभारणी झालेली असते. पण कुटुंबातील लैंगिक संबंधांचे उद्दिष्ट इतर लैंगिक संबंधांहून सर्वथैव भिन्न असते. प्रजोत्पादन आणि बालसंगोपन व बालसंवर्धन हे कुटुंबातील लैंगिक संबंधांचे स्पष्ट उद्दिष्ट असते. इतर लैंगिक संबंधांपासून मुले होतात आणि त्यांच्या पालनपोषणाची काळजी घेतली जाते हे खरे असले तरी प्रजोत्पादन हे अशा संबंधांचे निर्देशित उद्दिष्ट असत नाही. म्हणून प्रजनन आणि शिशुसंगोपन व शिशुसंवर्धन ही कुटुंब-संस्थेची निर्देशित कार्ये आहेत.

### २. सदस्यांचे शरीर-संरक्षण

कुटुंबाने आपल्या सदस्यांची शारीरिक काळजी घेतली पाहिजे असा दण्डक सर्वत्र आढळून येतो. सदस्यांची शारीरिक काळजी घ्यावयाची म्हणजे त्यांना अन्न, वस्त्र व निवारा या गोष्टींची तरतूद करून दिली पाहिजे. तसेच सदस्यांना शारीरिक इजा पोचू नये व आजार येऊ नये याची दक्षता घेतली पाहिजे. साहजिकच आजाऱ्यांची शुश्रूषा करणे, बाळंतपणात आई-मुलांची काळजी घेणे व शारीरिक व्यंग असलेल्यांचे पालन करणे अशी रक्षणात्मक कार्ये देखील कुटुंबाला अंगीकारावी लागतात.

### ३. संस्कृतीचे संक्रामण

आपल्या मुलांना संस्कृतीच्या विविध अंगोपांगांची ओळख करून देण्याचे महत्त्वाचे कार्य प्रत्येक कुटुंब करीत असते. मुले अगदी लहान असल्यापासून सुरू झालेले हे कार्य मुलांच्या मोठेपणी देखील चालू असते. मुलांवर प्रथम संस्करा

करण्याचे कार्य प्रत्येक कुटुंबामार्फतच होत असते आणि सर्व प्रकारच्या कुटुंबांमधून हे कार्य अव्याहतपणे आजतागायत चालू आहे. आधुनिक काळात कुटुंबव्यवस्थेच्या स्वरूपात अनेक बदल झाले असले तरी खाणे, पिणे, बोलणे, पोशाख करणे, स्वच्छता राखणे, मान देणे, इत्यादी बाबतींत शिक्षणाचे पहिले धडे कुटुंबातच दिले जातात. म्हणून एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संस्कृतीचे संक्रामण (transmission of culture) करण्याची जबाबदारी कुटुंबसंस्थेवर असते.

### ४. व्यक्तिमत्त्वाचे विकसन

कुटुंब एक समूह असल्याने व त्यातील सदस्य एकत्र राहात असल्याने त्यांच्यामध्ये आंतरक्रिया सारखी चालू असते. सदस्यांचे परस्परांशी सदैव संबंध येतात व सदस्यांनी एकमेकांशी कसे वागावे याचे शिक्षण कुटुंबातच मिळते. माता-पित्यांचे मुलांशी संबंध येतात व मुलांचे एकमेकांशी संबंध येतात. त्यामुळे मुलांना वागणुकीच्या व परस्परसंबंधांच्या बाबतींत योग्य वळण लावण्याचे कार्य कुटुंब करीत असते. याचा अर्थ असा की मुलांच्या मानवीकरणाच्या प्रक्रियेत (humanizing process) कुटुंबाचा अतिशय महत्त्वाचा वाटा असतो. कुटुंबामुळेच नवजात अर्भकाचे मानवीकरण करणे सुलभ जाते. साहजिकच मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास पुष्कळ अंशी कुटुंबसंस्थेवरच अवलंबून असतो. म्हणून व्यक्तिमत्त्वाचे विकसन करण्याच्या कुटुंबसंस्थेच्या या कार्याला समाजशास्त्रीय व सामाजिक मानसशास्त्रीय अभ्यासात विशेष महत्त्वाचे स्थान दिले जाते.

### ५. आर्थिक क्रियांचे संपादन

प्रत्येक कुटुंबाला आर्थिक घडामोडींत भाग घेऊन कुटुंबाला आर्थिक स्थैर्य प्राप्त करून देण्याचे प्रयत्न करावे लागतात. एक घटक (unit) म्हणून कुटुंब आर्थिक क्षेत्रात कार्य करीत असते आणि या घटकामार्फतच वस्तूंचे उत्पादन (production) आणि उपभोग (consumption) या क्रिया चालू असतात. मुलांचे पालनपोषण व संवर्धन करण्याची जबाबदारी असल्याने आर्थिक क्रियांचे संपादन (performance of economic activities) करणे कुटुंबाला आवश्यक असते. म्हणून लिंगानुसार आणि वयोमानानुसार कुटुंबातील सदस्यांमध्ये श्रमविभाजन झालेले असते. तसेच जमीन, घर, दुकान यासारख्या मालमत्तेची मालकी अगर नियंत्रण सामान्यपणे कुटुंबाकडे असते. मालमत्तेवर नियंत्रण ठेवावयाचे म्हणजे मालमत्तेवरील वारसाहक्क ठरवावे लागतात. तेव्हा आर्थिक क्षेत्रातील सर्व क्रियांचे निष्पादन करण्याचे आवश्यक व जबाबदारीचे कार्य लहान अगर मोठ्या कोणत्याही कुटुंबाला करावे लागते.

### ६. धार्मिक क्रियांचे पालन

प्रत्येक कुटुंबाने आपल्या धर्माने घालून दिलेल्या क्रियांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक असते. पूजा--अर्चा, होम--हवन, व्रत--वैकल्ये, उत्सव--समारंभ यासारख्या धार्मिक क्रियांत कुटुंबातील सर्व व्यक्तींनी भाग घ्यावयाचा असतो. सामुदायिक प्रार्थना करण्याची प्रथा जवळ जवळ सर्वत्र आढळून येते. पवित्र ग्रंथांचे व वस्तूंचे संरक्षण करण्याची जबाबदारी कुटुंबावर असते. तसेच धर्मप्रणीत विविध संस्कार ( Sacraments ) कुटुंबातील सर्व सदस्यांवर ठराविक वेळी व ठराविक पद्धतीनुसार करण्याची जबाबदारी कुटुंबावर असते. तेव्हा कुटुंबात सर्व धार्मिक क्रियांचे यथासांग पालन होत असल्याने सदस्यांना धर्मशिक्षण देण्याची सोय आपो-आप होत असे.

### ७. सदस्यांचे सामाजिक संरक्षण

प्रत्येक कुटुंब आपल्या सदस्यांना सामाजिक बाबतीत अनेक रीतींनी साहाय्य करीत असते व त्यांना शक्य तितके संरक्षण देण्याचा प्रयत्न करीत असते. पहिली गोष्ट ही की कुटुंबामुळे व्यक्तीला सामाजिक दर्जा प्राप्त होतो. व्यक्तीचा ज्या कुटुंबात जन्म होतो त्या कुटुंबामार्फत व्यक्तीला समाजात स्थान मिळते कारण कुटुंबावरून व्यक्तीची समाजात ओळख पटत असते. तेव्हा समाजात दर्जा मिळवि-ण्याचे कुटुंब एक साधन आहे. समाजात व्यक्तीला दर्जा मिळवून देणारे अनेक समूह असतात पण त्यांमध्ये कुटुंबाला अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. कुटुंब समूह सर्वत्र आढळून येतात आणि प्रत्येक व्यक्ती कुटुंबाची सदस्य असते. साहजिकच व्यक्तीचा समाजातील दर्जा तिच्या कुटुंबाच्या दर्जावर अवलंबून असतो. दुसरी गोष्ट ही की कुटुंब आपल्या सदस्यांच्या विविध क्षेत्रांतील वागणुकीवर नियंत्रण ठेवीत असते. सदस्यांच्या विवाहविषयक घडामोडींत कुटुंब नेहमी लक्ष घालीत असते. सदस्यांनी कोणाशी लग्न करावे, कोणाशी करू नये, केव्हा करावे, कोणत्या पद्धतीने करावे इत्यादी बाबतींत कुटुंबाने दण्डक घालून दिलेले असतात व त्यांचे कटाक्षाने पालन करणे सदस्यांना अपरिहार्य असते. तसेच राजकीय, धार्मिक, आर्थिक इत्यादी क्षेत्रांतील व्यक्तींचे वर्तन कुटुंबाबाहेर घडत असले तरी देखील त्याच्यावर कुटुं-बाचे नियंत्रण असते. तिसरी गोष्ट ही की कुटुंब आपल्या सदस्यांना सामाजिक संरक्षण देते. कुटुंबातील सदस्याचा कोणी अपमान करू नये व त्याची बेअब्रू होऊ नये अशी दक्षता कुटुंब सदैव घेत असते. तसेच सदस्याचे दिवाळे निघण्याची वेळ आली तर कुटुंब त्याच्या मदतीस असते. तेव्हा सदस्यांच्या सामाजिक इभ्रतीला इतरां-कडून कसलाही धक्का पोहोचू नये याची खबरदारी कुटुंबाला हमेशा घ्यावी लागते.

## ४. कुटुंबसंस्थेचे बदलते स्वरूप

कुटुंबसंस्थेची परंपरागत कार्ये एकोणिसाव्या शतकापर्यंत अव्याहतपणे चालू होती. तोपर्यंत कुटुंबसंस्थेच्या स्वरूपात देखील फरक झाला नव्हता. पण एकोणिसाव्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीचे कुटुंबसंस्थेवर दूरगामी परिणाम झाले. आर्थिक व सामाजिक परिस्थितीत झालेल्या महत्त्वपूर्ण बदलांचे कुटुंबसंस्थेवर परिणाम होणे अपरिहार्य होते. अर्थात कुटुंबसंस्थेतील बदलांचे प्रमाण देशातील बदलत्या परिस्थितीवर अवलंबून असते. औद्योगिक क्रांतीतून झपाट्याने पार पडलेल्या इंग्लंड, अमेरिका, जर्मनी यांसारख्या पाश्चिमात्य देशांत कुटुंबसंस्थेचे स्वरूप कितीतरी बदलून गेल्याचे दिसते. तसेच अशा देशांतील शहरी विभागांत कुटुंबसंस्थेतील बदल फार स्पष्टपणे जाणवतात.

कुटुंबसंस्थेच्या विविध कार्यांत बदल झालेले दिसून येतात. प्रजोत्पादनाचे कार्य सर्व कुटुंबांतून चालू आहे; पण शिशुसंगोपनाचे कार्य मात्र हल्ली कुटुंबाबाहेरील तज्ञांकडे सोपविले जाते. पूर्वी कुटुंबात आर्थिक स्वयंपूर्णता आणण्याचा प्रयत्न केला जात असे आणि उपभोग्य वस्तूंचे शक्य तितके जास्ती उत्पादन कुटुंबात केले जात असे. पण आता पुष्कळशा उपभोग्य वस्तूंचे उत्पादन कुटुंबाबाहेरच केले जाते. लोकांना धार्मिक शिक्षण आता कुटुंबात मिळत नाही. चर्चसारख्या संस्था धार्मिक शिक्षण देण्याचे काम करतात. धार्मिक शिक्षणासारखीच लौकिक शिक्षणाची स्थिती झाली आहे. पूर्वी मुलांचे लौकिक शिक्षण पुष्कळ अंशी कुटुंबातच होत असे, पण आता ते सर्वस्वी कुटुंबाबाहेरच होते. पूर्वी लोकांना मनोरंजन, काव्यशास्त्रविनोद व इतर गोष्टींतून आनंद उपभोगणे आपल्या कुटुंबातच शक्य होत असे. पण आता कुटुंबाबाहेरील साधनांकडून लोकांचे मनोरंजन होऊ शकते.

कुटुंबसंस्थेविषयीच्या लोकांच्या अभिवृत्तींत बदल झाले आहेत व त्या प्रमाणात लोकांच्या वर्तनांत फरक पडले आहेत. प्रत्येकाला भरपूर प्रमाणात संतती असणे पूर्वी आवश्यक समजले जात असे तर आता मर्यादित संतती होऊन कुटुंब लहान असावे असे लोकांना वाटू लागले आहे. जास्ती मुले झाली म्हणजे तीं स्वतःच्या विकासाच्या आड येतात अशी लोकांची समजूत झाली आहे. तसेच कुटुंबव्यवस्थेत आपल्यालाही काही अधिकार असावा असे व्यक्तीला वाटू लागल्याने कुटुंबातील पितृसत्तात्मक अधिकारशाहीचे उच्चाटन होऊन त्या जागी लोकशाही स्वरूपाची अधिकारयंत्रणा स्थापन

झाली आहे. त्यामुळे कुटुंबात आपल्यालाही कांही स्थान आहे याची जाणीव लोकांना होऊ लागली आहे. शिवाय कुटुंबातील सर्व व्यक्तींना राहाण्यासाठी मोठे घर असावे अशी वृत्ती पूर्वी होती. आता मोठ्या घराची प्रथा मोडत चालली असून लोकांना लहान घरात अगर मोजक्या जागेत राहाणे आवडू लागले आहे कारण मोठी जागा राहावयास मिळणे ही गोष्ट आर्थिक व इतर कारणांनी अतिशय कठीण झाली आहे. त्याचप्रमाणे काम-जीवनाकडे ( sex-life ) पाहाण्याच्या लोकांच्या दृष्टिकोणात कितीतरी फरक पडला आहे. पूर्वी कामविषयक लोक-नीतींमध्ये ( sex-mores ) विशुद्धतेवर बराच भर दिला जात असे, आचार-नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेतली जात असे, आणि पद्धतशीर लैंगिक शिक्षण दिले जात नसे. पण या बाबतींत हल्ली बराच प्रागतिक दृष्टिकोण आढळून येतो. कामविषयक लोकनीतींना आवश्यक तितके महत्त्व दिले जाते, स्त्री-पुरुषांना एकमेकांपासून सारखे अलग न ठेवता त्यांना मोकळेपणाने मिसळ-ण्याची संधी दिली जाते व मुलां-मुलींना लैंगिक ज्ञान देण्याची व्यवस्था केली जाते.

कुटुंबसंस्थेची कार्ये व तिच्याविषयीच्या अभिवृत्ती याखेरीज इतर अनेक बाबतींत कुटुंबसंस्थेत बदल झालेले दिसून येतात. आर्थिक व्यवहारासाठी लागणारी उपकरणे व सामानसुमान पूर्वी प्रत्येक कुटुंबात आढळून येत असे. आर्थिक व आहार-विषयक कामे घरीच होत असल्याने पुष्कळसे सामान घरीच ठेवावे लागत असे. स्त्रिया व मुले यांचे कार्यक्षेत्र पुष्कळ अंशी घरापुरतेच मर्यादित असल्याने स्वयं-पाक, शिवणकाम, विणकाम इत्यादी नेहमीच्या कामासाठी लागणारे सामान घरीच ठेवणे भाग पडत असे. पण आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. अलीकडे आर्थिक व्यवहार फारसे घरात होत नाहीत, स्त्रिया व मुले यांचा घराबाहेर बराच वेळ जातो आणि घरकाम अतिशय मर्यादित झाले आहे. कुटुंबातील लोकांचे बरेचसे खाणे-पिणे घराबाहेर होते व खाण्यापिण्याच्या तयार वस्तू बाजारात सुलभतेने मिळतात. म्हणून घरात उपकरणांची अगर जास्ती सामानसुमानाची गरज भासत नाही. शिवाय घरकामात श्रमाची व वेळेची बचत करणारी अनेक साधने उपलब्ध झाल्याने स्त्रिया व मुले यांना घराबाहेर कामधंदा करण्यास सवड मिळू लागली.

कुटुंबसंस्थेत झालेल्या या अभूतपूर्व बदलांचे कुटुंबसंस्थेच्या स्वरूपावर दूरगामी परिणाम झाले आहेत. कुटुंबाचे सामूहिक स्वरूप नष्ट होऊ लागले आहे. कुटुंब एक समूह असल्याने त्यातील सदस्यांनी समूहाशी समरस होऊन आपल्या-

## ४. कुटुंबसंस्थेचे बदलते स्वरूप

कुटुंबसंस्थेची परंपरागत कार्ये एकोणिसाव्या शतकापर्यंत अव्याहतपणे चालू होती. तोपर्यंत कुटुंबसंस्थेच्या स्वरूपात देखील फरक झाला नव्हता. पण एकोणिसाव्या शतकात झालेल्या औद्योगिक क्रांतीचे कुटुंबसंस्थेवर दूरगामी परिणाम झाले. आर्थिक व सामाजिक परिस्थितीत झालेल्या महत्त्वपूर्ण बदलांचे कुटुंबसंस्थेवर परिणाम होणे अपरिहार्य होते. अर्थात कुटुंबसंस्थेतील बदलांचे प्रमाण देशातील बदलत्या परिस्थितीवर अवलंबून असते. औद्योगिक क्रांतीतून झपाट्याने पार पडलेल्या इंग्लंड, अमेरिका, जर्मनी यांसारख्या पाश्चिमात्य देशांत कटुंबसंस्थेचे स्वरूप कितीतरी बदलून गेल्याचे दिसते. तसेच अशा देशांतील शहरी विभागांत कुटुंबसंस्थेतील बदल फार स्पष्टपणे जाणवतात.

कुटुंबसंस्थेच्या विविध कार्यांत बदल झालेले दिसून येतात. प्रजोत्पादनाचे कार्य सर्व कुटुंबांतून चालू आहे; पण शिशुसंगोपनाचे कार्य मात्र हल्ली कुटुंबाबाहेरील तज्ञांकडे सोपविले जाते. पूर्वी कुटुंबात आर्थिक स्वयंपूर्णता आणण्याचा प्रयत्न केला जात असे आणि उपभोग्य वस्तूंचे शक्य तितके जास्ती उत्पादन कुटुंबात केले जात असे. पण आता पुष्कळशा उपभोग्य वस्तूंचे उत्पादन कुटुंबाबाहेरच केले जाते. लोकांना धार्मिक शिक्षण आता कुटुंबात मिळत नाही. चर्चसारख्या संस्था धार्मिक शिक्षण देण्याचे काम करतात. धार्मिक शिक्षणासारखीच लौकिक शिक्षणाची स्थिती झाली आहे. पूर्वी मुलांचे लौकिक शिक्षण पुष्कळ अंशी कुटुंबातच होत असे, पण आता ते सर्वस्वी कुटुंबाबाहेरच होते. पूर्वी लोकांना मनोरंजन, काव्यशास्त्रविनोद व इतर गोष्टींतून आनंद उपभोगणे आपल्या कुटुंबातच शक्य होत असे. पण आता कुटुंबाबाहेरील साधनांकडून लोकांचे मनोरंजन होऊ शकते.

कुटुंबसंस्थेविषयीच्या लोकांच्या अभिवृत्तींत बदल झाले आहेत व त्या प्रमाणात लोकांच्या वर्तनांत फरक पडले आहेत. प्रत्येकाला भरपूर प्रमाणात संतती असणे पूर्वी आवश्यक समजले जात असे तर आता मर्यादित संतती होऊन कुटुंब लहान असावे असे लोकांना वाटू लागले आहे. जास्ती मुले झाली म्हणजे तीं स्वतःच्या विकासाच्या आड येतात अशी लोकांची समजूत झाली आहे. तसेच कुटुंबव्यवस्थेत आपल्यालाही काही अधिकार असावा असे व्यक्तीला वाटू लागल्याने कुटुंबातील पितृसत्तात्मक अधिकारशाहीचे उच्चाटन होऊन त्या जागी लोकशाही स्वरूपाची अधिकारयंत्रणा स्थापन

झाली आहे. त्यामुळे कुटुंबात आपल्यालाही कांही स्थान आहे याची जाणीव लोकांना होऊ लागली आहे. शिवाय कुटुंबातील सर्व व्यक्तींना राहाण्यासाठी मोठे घर असावे अशी वृत्ती पूर्वी होती. आता मोठ्या घराची प्रथा मोडत चालली असून लोकांना लहान घरात अगर मोजक्या जागेत राहाणे आवडू लागले आहे कारण मोठी जागा राहावयास मिळणे ही गोष्ट आर्थिक व इतर कारणांनी अतिशय कठीण झाली आहे. त्याचप्रमाणे काम-जीवनाकडे ( sex-life ) पाहाण्याच्या लोकांच्या दृष्टिकोणात कितीतरी फरक पडला आहे. पूर्वी कामविषयक लोक-नीतींमध्ये ( sex-mores ) विशुद्धतेवर बराच भर दिला जात असे, आचार-नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घेतली जात असे, आणि पद्धतशीर लैंगिक शिक्षण दिले जात नसे. पण या बाबतींत हल्ली बराच प्रागतिक दृष्टिकोण आढळून येतो. कामविषयक लोकनीतींना आवश्यक तितके महत्त्व दिले जाते, स्त्री-पुरुषांना एकमेकांपासून सारखे अलग न ठेवता त्यांना मोकळेपणाने मिसळ-ण्याची संधी दिली जाते व मुलां-मुलींना लैंगिक ज्ञान देण्याची व्यवस्था केली जाते.

कुटुंबसंस्थेची कार्ये व तिच्याविषयीच्या अभिवृत्ती याखेरीज इतर अनेक बाबतींत कुटुंबसंस्थेत बदल झालेले दिसून येतात. आर्थिक व्यवहारासाठी लागणारी उपकरणे व सामानसुमान पूर्वी प्रत्येक कुटुंबात आढळून येत असे. आर्थिक व आहार-विषयक कामे घरीच होत असल्याने पुष्कळसे सामान घरीच ठेवावे लागत असे. स्त्रिया व मुले यांचे कार्यक्षेत्र पुष्कळ अंशी घरापुरतेच मर्यादित असल्याने स्वयं-पाक, शिवणकाम, विणकाम इत्यादी नेहमीच्या कामासाठी लागणारे सामान घरीच ठेवणे भाग पडत असे. पण आता तशी परिस्थिती राहिलेली नाही. अलीकडे आर्थिक व्यवहार फारसे घरात होत नाहीत, स्त्रिया व मुले यांचा घराबाहेर बराच वेळ जातो आणि घरकाम अतिशय मर्यादित झाले आहे. कुटुंबातील लोकांचे बरेचसे खाणे-पिणे घराबाहेर होते व खाण्यापिण्याच्या तयार वस्तू बाजारात सुलभतेने मिळतात. म्हणून घरात उपकरणांची अगर जास्ती सामानसुमानाची गरज भासत नाही. शिवाय घरकामात श्रमाची व वेळेची बचत करणारी अनेक साधने उपलब्ध झाल्याने स्त्रिया व मुले यांना घराबाहेर कामधंदा करण्यास सवड मिळू लागली.

कुटुंबसंस्थेत झालेल्या या अभूतपूर्व बदलांचे कुटुंबसंस्थेच्या स्वरूपावर दूरगामी परिणाम झाले आहेत. कुटुंबाचे सामूहिक स्वरूप नष्ट होऊ लागले आहे. कुटुंब एक समूह असल्याने त्यातील सदस्यांनी समूहाशी समरस होऊन आपल्या-

वरील पिता, माता, भाऊ, बहीण, मुलगा, मुलगी इत्यादी नात्यांनी येणारी जबाबदारीची कर्तव्ये निष्ठापूर्वक पार पाडली पाहिजेत अशी सर्वांची भूमिका होती. इतकेच नव्हे तर कुटुंबाचा जाज्वल्य अभिमान सदस्यांमध्ये दिसत असे आणि कुटुंबाची एकता चिरस्थायी करण्याकडे सदस्यांची प्रवृत्ती स्पष्टपणे दिसून येत असे. अनेक मार्गांनी कुटुंबाची सामूहिकता सर्व सदस्यांना जाणवत असे. घरातील दिवाणखाना अगर प्रमुख खोली कुटुंबाच्या वैभवाचे प्रतीक असे आणि सर्व सदस्यांचा अभिमान जागृत करणारी बाब असे. कटुंबातील व्यक्तींची वंशावळ ( genealogy ) काळजीपूर्वक ठेवली जात असे आणि कुटंबाचा विस्तृत इतिहास लिहिला जात असे. कुटुंबातील पवित्र मानल्या गेलेल्या वस्तूंचे संरक्षण केले जात असे व सामुदायिक रीतीने धर्मप्रार्थना म्हटल्या जात असत. कुटुंबातील पूर्वी होऊन गेलेल्या प्रसिद्ध व्यक्तींची छायाचित्रे सन्मानाने ठेवली जात असत व सदस्यांची सामूहिक छायाचित्रे घरात व विशेषतः दिवाणखान्यात लावली जात असत. अशा रीतींनी कुटुंबाच्या सामूहिक स्वरूपावर पूर्वी विशेष भर दिला असल्याने कुटुंबातील सर्व सदस्यांचे कुटुंबाशी तादात्म्य ( identification ) झालेले प्रतीत होत असे. पण आता हे तादात्म्य अतिशय कमी प्रमाणात जाणवते. अलीकडे समूहापेक्षा स्वतःकडे जास्ती लक्ष देण्याची प्रवृत्ती कुटुंबातील सदस्यांमध्ये स्पष्टपणे दिसून येते. सदस्यांचे कार्यक्षेत्र आता कुटुंबापुरते मर्यादित राहिले नसून सदस्यांच्या कुटुंबा-बाहेरील भूमिकांना व कार्यांना प्राधान्य दिले जात आहे. साहजिकच कुटुंबातील सदस्यांना कुटुंबसंस्थेविषयी आत्मीयता वाटेनाशी झाली आहे.

कुटुंबसंस्थेच्या स्वरूपात झालेल्या या बदलांना अनेक कारणे जबाबदार आहेत. त्यापैकी (अ) आर्थिक कारणे, (ब) सामाजिक कारणे व (क) वैचारिक कारणे प्रमुख आहेत.

### (अ) आर्थिक कारणे :

अगदी सुरुवातीपासून आर्थिक क्षेत्रात एक स्वयंपूर्ण घटक म्हणून कुटुंबाला समाजात वैशिष्टयपूर्ण स्थान होते आणि औद्योगिक क्रांती होईपर्यंत कुटुंबाचे हे स्थान कायम होते. अन्नसंचय करणे, शिकार करणे, पशुपालन करणे अगर शेती करणे यासारख्या प्रमुख उद्योगावर अधारलेल्या अर्थ-व्यवस्थेमध्ये कुटुंब एक घटक म्हणून वावरत असे. या विविध अर्थव्यवस्थांमध्ये मालमत्ता सामाजिक स्वरूपाची म्हणजे कुटुंबाच्या मालकीची असे. मध्ययुगीन काळात लहान लहान उद्योगधंदे

आणि व्यवसाय यांना अर्थव्यवस्थेत महत्त्व येऊ लागले. पण हे उद्योगधंदे व व्यवसाय देखील कुटुंबामार्फतच चालवले जात असत. तेव्हा आर्थिक वस्तूंचे उत्पादन व त्यांचा उपभोग या बाबतींत प्रत्येक कुटुंब एक स्वतंत्र घटक असे. ही गृहकेंद्रित उत्पादन-पद्धती ( domestic system of production ) औद्योगिक क्रांती होईपर्यंत प्रचलित होती व या पद्धतीवर आधारलेल्या अर्थव्यवस्थेत कुटुंबाला महत्त्वाचे स्थान होते.

पण आधुनिक काळात औद्योगिक क्रांती झाल्यानंतर कारखाना-केंद्रित उत्पादन-पद्धती ( factory system of production ) अस्तित्वात आली आणि या पद्धतीवर आधारलेल्या आधुनिक अर्थव्यवस्थेचे कुटुंबाच्या आर्थिक जीवनावर आणि कुटुंबातील सदस्यांवर दूरगामी परिणाम झाले. कुटुंबाच्या आर्थिक कार्यांचे महत्त्व हळूहळू कमी होऊ लागले. स्वतंत्र कारखाने निघाल्यामुळे घरोघरी होणारे उत्पादन बंद पडले व अर्थोत्पादनातील एक घटक म्हणून कुटुंबाला काही स्थान राहिले नाही. यंत्राचा वापर सुलभतेने सर्वत्र होऊ लागल्याने घरकामाच्या कित्येक बाबी खास निर्माण झालेल्या बाह्य साधनांकडून (external agencies) करवून घेण्यात येऊ लागल्या. शिवणकाम, स्वयंपाक, आजाऱ्यांची शुश्रूषा, कपड्यांची धुलाई यासारखी अनेक कामे आता घरात केली जात नाहीत. अशा रीतीने स्त्रियांवरील घरकामाचा बोजा कितीतरी कमी झाला व त्यांना इतर कामे करण्यास वेळ मिळू लागला. शिवाय नवीन अर्थव्यवस्थेत कारखान्यात, कचेरीत, दुकानात किंवा अन्यत्र स्त्रियांना करता येतील अशी असंख्य कामे उपलब्ध झाल्याने व ती कामे पत्करण्यास स्त्रियांना पुरेसा वेळ मिळत असल्याने स्त्रिया आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र होऊ लागल्या. आर्थिक स्वतंत्रतेमुळे स्त्रियांच्या कुटुंबातील इतर सदस्यांशी येणाऱ्या संबंधांत खूप फरक पडले. परावलंबनाची अवस्था संपल्याने स्त्रिया आपल्या व्यक्तिमत्त्वाचा स्वतःच्या इच्छेनुसार विकास करून घेऊ लागल्या. साहजिकच कुटुंबाच्या परंपरागत सामूहिक स्वरूपाला जोरदार तडा गेला. कुटुंबातील स्त्रिया व पुरुष स्वतंत्रपणे घराबाहेर अर्थार्जन करू लागले आणि आपल्या आवडीनिवडीप्रमाणे खर्चही करू लागले. त्यामुळे कुटुंबाला व्यक्तींच्या एकत्र निवास करण्याच्या ठिकाणाचे रूप आले.

कारखाना-केंद्रित उत्पादन-पद्धतीचा कुटुंबातील मुलांवर अतिशय विपरीत परिणाम झाला. पूर्वीच्या गृहकेंद्रित उत्पादन-पद्धतीत घरातील प्रचलित उद्योग-धंद्याचे अगर व्यवसायाचे ज्ञान मुलांना त्यांच्या वडीलधाऱ्या मंडळीकडून सहजा-

सहजी मिळत होते आणि मुलांना इतरांच्या बरोबर घरी काम करून कुटुंबाच्या अर्थोत्पादनाच्या कार्यात मदत करता येत असे. पण आता तशी परिस्थिती राहिली नाही. मुलांना वयात येईपर्यंत किंवा प्रौढ होईपर्यंत कसलाही कामधंदा करता येत नाही व आपल्या वडिलांना आर्थिक मदत करता येत नाही. मुले प्रौढ झाली म्हणजे ती स्वतंत्र कुटुंबे स्थापन करण्याच्या मार्गाला लागतात. तेव्हा मुलांचा त्यांच्या वडिलांना काही उपयोग होत नाही व मुलांचे देखील घरात लक्ष असत नाही. त्यामुळे पुष्कळदा कुटुंबाला एखाद्या वसतिगृहाचे रूप येते.

### (ब) सामाजिक कारणे :

आधुनिक कुटुंबात दिसून येणाऱ्या बदलांना अनेक सामाजिक कारणे साहाय्यभूत झाली आहेत. पूर्वी राहते घर कुटुंबाच्या मालकीचे असे. पण या बाबतीत परिस्थिती झपाट्याने बदलत चालली आहे. अलीकडे बऱ्याचशा कुटुंबांना भाड्याच्या घरांत राहाणे भाग पडते आणि मोठ्या शहरांतून तर ही स्थिती प्रकर्षाने जाणवते. कुटुंबातील लोकांना राहावयास स्वतःच्या मालकीचे घर अगर जागा असत नाही या गोष्टीचे कुटुंबसंस्थेवर व कौटुंबिक जीवनावर विपरीत परिणाम झाले आहेत. राहावयाचे घर कुटुंबाच्या मालकीचे असले म्हणजे कुटुंबातील लोक कौटुंबिक घडामोडींमध्ये जास्ती लक्ष घालतात, त्यांना आपल्या कुटुंबाच्या वेगळ्या अस्तित्वाची जाणीव होते आणि त्यांच्या मनांत कुटुंबाबद्दल एक प्रकारची आसक्ती ( attachment ) निर्माण होते. साहजिकच या गोष्टींमुळे कुटुंबसंस्थेला स्थिरता ( stability ) प्राप्त होते. पण अलीकडे कुटुंबातील लोकांना भाड्याच्या घरात राहावे लागत असल्याने त्यांना वरचेवर घर बदलणे भाग पडते. त्यामुळे एखाद्या जागेशी निगडित असलेल्या भावना कुटुंबातील लोकांमध्ये उत्पन्न होत नाहीत व त्यांना कुटुंबाबद्दल तितकीशी आसक्ती वाटत नाही. तसेच कुटुंबातील लोकांचे काही जणांशी निर्माण झालेले मैत्रीचे घनिष्ट संबंध त्याच स्वरूपात कायमचे टिकत नाहीत. वरचेवर घर बदलावे लागल्याने नवनवीन संपर्क साधत असले व अनुभवांची कक्षा विस्तृत होत असली तरी वाढत्या वयाच्या मुलांच्या दृष्टींनी हे अपायकारक ठरते कारण त्यांचे स्थिर व्यक्तित्व ( stable character ) विकसित होण्यात नक्की बाधा येते. अशा रीतींनी कुटुंबसंस्थेत विस्कळितपणा येण्यास कुटुंबाला स्वतःच्या मालकीचे घर नसणे ही सामाजिक गोष्ट कारणीभूत होते.

कृत्रिम साधनांनी संतति-नियमन करण्याची प्रथा सुरू झाल्यापासून आधुनिक कुटुंबात वैशिष्ट्यपूर्ण बदल झालेले दिसून येतात. आधुनिक काळातील स्वैर विचारसरणीला मान्य होणारी ही प्रथा असल्याने तिचा पुढारलेल्या देशांत—विशेषतः

पाश्चिमात्य देशांत-झपाट्याने प्रसार झाला. पाश्चिमात्य देशांतील बऱ्याच लोकांनी संततिनियमनाचा हा मार्ग अवलंबल्याने त्या देशांतील जननप्रमाण (birth rate) कमी होऊ लागले व अजून त्या प्रमाणात सुधारणा आढळून येत नाही. कित्येक कुटुंबांतून लहान मुलांची संख्या कमी होऊ लागली आणि कितीतरी कुटुंबांत मुलांचा अभाव दिसू लागला. यामुळे अशा कुटुंबांतून व्यष्टिनिष्ठ दृष्टिकोण (individualistic outlook) बळावू लागला, लोकांचा एकलकोंडेपणा वाढला आणि त्यांच्यामध्ये अनेक प्रकारच्या मानसिक विकृती निर्माण झाल्या. कुटुंबात लहान मुले असती तर असे विपरीत परिणाम झाले नसते.

### (क) वैचारिक कारणे :

आर्थिक व सामाजिक कारणांबरोबरच लोकांच्या स्वतंत्र विचारप्रवृत्तींचा देखील कुटुंबसंस्थेच्या स्वरूपात बदल होण्यास हातभार लागलेला आहे. आधुनिक काळातील स्वतंत्र विचार-प्रवाहांचा विविध क्षेत्रांत प्रभाव पडला आहे. कोणत्याही क्षेत्रातील मूलभूत गोष्टींविषयी स्वतंत्रपणे विचार करण्याचा उदारतावादी दृष्टिकोण अलीकडील काळात लोकांनी अंगिकारला आहे. धार्मिक क्षेत्रात मूलभूत असलेली श्रद्धाच लोकांनी का मानावी हा प्रश्न उपस्थित केला जात आहे आणि धर्मशास्त्राच्या सिद्धान्तांविरुद्ध लोकांनी जवळ जवळ बंडच केले आहे. वैज्ञानिक क्षेत्रात अशीच क्रांती झाली आहे. कोणत्याही वैज्ञानिक तत्त्वांची आलोचना केल्याखेरीज ती ग्राह्य मानावयास लोक तयार नसतात. जुन्या वैज्ञानिक सिद्धांतांची समालोचना नेहमी चालू असल्याने व त्यांत नवीन विचारांची नेहमी भर पडत असल्याने ते सिद्धान्त त्याच स्वरूपात किती काळ टिकतील हे सांगणे कठीण झाले आहे. जीवनाच्या सर्व क्षेत्रांत हल्ली ही समालोचनात्मक वृत्ती आढळून येते. जुन्या विचारप्रणालीबद्दल शंका घेणे व नवीन विचार शोधून काढणे ही प्रवृत्ती सर्वत्र बळावत चालली आहे. कुटुंबसंस्थेच्या बाबतीत देखील ही प्रवृत्ती दिसून येते. लोकांमध्ये प्रचलित असलेल्या कुटुंबाच्या विविध प्रकारांचा अभ्यास करून कुटुंबसंस्थेच्या आवश्यकतेबद्दलच शंका घेण्यास सुरवात झाली आहे. मनुष्याला कुटुंबसंस्थेची जरूरी नसून कुटुंबसंस्थेला अवास्तव महत्त्व देऊ नये अशी वृत्ती वाढू लागली आहे. यालाच कुटुंबविरोधवाद (antifamilism) असे म्हणतात. या कुटुंबविरोधवादाचा प्रभाव वाढत असल्याने लोकांना कुटुंबसंस्थेबद्दल पूर्वीसारखी आस्था अगर आत्मीयता वाटेनाशी झाली आहे. साहजिकच या विचारसरणीचा कुटुंबाची कार्ये व कुटुंबातील लोकांचे परस्परसंबंध यावर दूरगामी परिणाम झाले आहेत.

करणे, आणि ( क ) आर्थिक, सांस्कृतिक व भावनिक समाधान देणारे गृहजीवन निर्माण करणे ही तीन कार्ये प्रमुख आहेत. ही तिन्ही कार्ये परस्परपूरक असल्याने ती कुटुंबाला एकत्रितपणे पार पाडणे सहज शक्य होते. किंबहुना ही कार्ये एकत्रित स्वरूपात पार पाडण्यावर कुटुंबसस्थेचे यश अवलंबून असते. लोकांच्या कामवासनांची तृप्ती विवाहांतर्गत अगर विवाहबाह्य लैंगिक संबंधांपासून होऊ शकते. पण कामवासनातृप्तीला जीवनात स्वतंत्र स्थान न देता विवाहरज्जूंनी एकत्रित आलेल्या लोकांनाच कामवासनातृप्तीची पूर्ण मुभा देऊन कुटुंबसंस्था लोकांना इतर समाधानाबरोबर लैंगिक समाधान देण्याचे कार्य करीत आहे. लोकांचे सर्वसामान्य प्रश्न सोडविण्याचा हा विशेष मार्ग आहे. कामवासनातृप्तीचा अनन्य आनंद लोकांना कुटुंबसस्थेच्या कक्षेत मिळू शकतो आणि यशस्वी किंवा आदर्श कुटुंबात तो चांगल्या रीतीने प्राप्त होतो. त्याचप्रमाणे बालसंवर्धनाचे कार्य देखील कुटुंबसंस्थेत विशेष व्यवस्थितपणे होऊ शकते. विविध प्रकारच्या अनुभवांवरून हे सिद्ध झाले आहे की सरकारी अगर खाजगी स्वरूपाच्या बाल-संगोपनाचे कार्य करणाऱ्या संस्थांपेक्षा कुटुंबसंस्थेमध्येच बालसंवर्धनाचे कार्य अगदी समाधानकारक होऊ शकते. कारण मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासाला आवश्यक असे पर्यावरण कुटुंबातच विशेष प्रमाणात उपलब्ध होऊ शकते. म्हणून यशस्वी किंवा आदर्श कुटुंबात बालसंगोपनाचे कार्य चांगल्या रीतींनी होत असते.

तेव्हा पूर्वीच्या आर्थिक व सामाजिक कार्यांपासून मुक्तता मिळाल्याने आधुनिक कुटुंबसंस्थेला या तीन आवश्यक कार्यांची पूर्तता करणे व त्यामध्ये सुसंबद्धता निर्माण करणे शक्य झाले आहे. अर्थात ही आवश्यक कार्ये किती सफलतापूर्वक पार पाडली जातात या गोष्टीवर कुटुंबसंस्थेचे भवितव्य अवलंबून आहे. विशेष समाधानाची गोष्ट ही की ही तिन्ही कार्ये आधुनिक कुटुंबसंस्था दिवसेदिवस चांगल्या रीतीने पार पाडीत आहे.

### (अ) प्रजनन आणि बालसंवर्धन :

मनुष्यप्राण्याचे सातत्य टिकविण्याचे कार्य पूर्वी मुख्यतः कुटुंबाकडे होते आणि आज देखील ते कुटुंबाकडेच आहे. किंबहुना ते कार्य आता पुष्कळ अंशी फक्त कुटुंबाचेच झाले आहे. अनौरस संततीचे जन्मप्रमाण पूर्वीच्या मानाने अलीकडील काळात अनेक समुदायांतून सारखे कमी होत आहे. या घटनेवरून असे स्पष्ट दिसून येते की प्रजोत्पादनाचे कार्य फक्त कुटुंबसंस्थाच सध्या करीत आहे. ' आर्यन् ' लोकांची संख्या झपाट्याने वाढावी या हेतूने प्रेरित होऊन लोकांनी

विवाहेतर संबंधांपासून प्रजोत्पादन करण्याच्या योजनेला जर्मनीतील नाझी राज्यकर्त्यांनी शासकीय संमती दिली होती व या योजनेला प्रोत्साहनही दिले होते. पण ही योजना सरकारी पाठिंबा मिळून देखील अल्पजीवी ठरली. तसेच अवैध रीतीने होणाऱ्या प्रजोत्पादनाला सोव्हिएट रशियाने शासकीय मान्यता दिली होती व तसे प्रजनन करण्यास लोकांना उत्तेजन दिले होते. परंतु हा प्रयोग सुद्धा यशस्वी झाला नाही. याचा अर्थ असा की प्रजननाचे महत्त्वपूर्ण कार्य कुटुंबाबाहेर होत नाही. तेव्हा मनुष्यप्राण्याचे अस्तित्व कायम ठवण्याचे काम अजूनही कुटुंबाकडेच आहे व ते कुटुंबाकडेच राहील असे दिसते.

शिवाय प्रजननाचे व बालसंवर्धनाचे हे कार्य पूर्वीच्या कुटुंबापेक्षा हल्लीचे कुटुंब जास्त प्रभावी रीतीने पार पाडीत आहे हे लक्षात ठेवले पाहिजे. आधुनिक कुटुंबात मुलांची जन्मपूर्व काळात, जन्मसमयी व जन्मानंतरही सतत विशेष काळजी घेतली जाते. बालसंगोपन व बालसंवर्धन व्यवस्थितपणे होण्यासाठी वैद्यकीय व इतर साधनांचा व ज्ञानाचा भरपूर उपयोग केला जातो. हे कार्य सफलतापूर्वक होत आहे याची साक्ष कमी होत जाणाऱ्या बालमृत्यूच्या व बालरोग्यांच्या प्रमाणावरून पटते. अर्थात हे कार्य सुलभ होण्यास दवाखाने, रुग्णालये, बालोपचार केंद्रे यांसारख्या संस्था आणि वैद्यकीय व मानसशास्त्रीय तज्ज्ञ यांची बहुमोल मदत होते. पण या विविध संस्था व सोयी यांचा योग्य वेळी उपयोग करून घेण्याची जबाबदारी सर्वस्वी कुटुंबावरच असते. जी गोष्ट मुलांच्या आरोग्याची तीच गोष्ट मुलांच्या शिक्षणाची. बाल–शिक्षणाच्या अनेक सोयी, संस्था व साधने सरकारी व खाजगीरीत्या उपलब्ध असली तरी त्यांचा उचित उपयोग करून घेऊन मुलांचे ज्ञान व व्यक्तिमत्त्व शक्य तो परिपूर्ण करण्याचे काम शेवटी कुटुंबावरच अवलंबून असते. तेव्हा बालसंवर्धनाचे अवघड कार्य जबाबदारीची जाणीव ठेवून आधुनिक कुटुंब करीत असते.

## (ब) कामवासनातृप्ती :

मनुष्यप्राण्याच्या कामवासनेचे समाधान करण्याचा पद्धतशीर प्रयत्न कुटुंब–संस्थेने केला आहे कारण इतर गरजांच्या हेतूपूर्तीप्रमाणे लैंगिक गरजा भागविण्यावर कुटुंबसंस्थेची उभारणी झाली आहे. कामवासनांची तृप्ती अनेक प्रकारे होऊ शकते. मनुष्याची शारीरिक भूक भागविण्यापासून जशी कामवासनांची तृप्ती होते तशी ती परस्परांविषयी स्थायी प्रेमभावना निर्माण होण्याने होते. अशा प्रकारे कामवासनांची तृप्ती करण्याचे कार्य परंपरागत कुटुंबापेक्षा आधुनिक कुटुंब

जास्ती सफलतापूर्वक करते. कामवासनातृप्तीचे कार्य चांगल्या रीतीने पार पाडण्यास आधुनिक कुटुंबाला दोन गोष्टींची विशेष मदत होत आहे. पहिली गोष्ट ही की आधुनिक कुटुंबव्यवस्थेची रचना पति–पत्नीच्या अगदी निकटच्या व्यक्तिगत संबंधांवर झालेली असते. हल्ली लग्नाचा जोडीदार निवडताना प्रत्येकाला बरीच मोकळीक मिळत असल्याने आधुनिक कुटुंबात पति–पत्नींना एकमेकांच्या गुण–विशेषांची सम्यक् कल्पना असते व त्यावर त्यांचे परस्पराकर्षण अवलंबून असते. तेव्हा वैयक्तिक पसतीवर कुटुंबाची उभारणी अलीकडील काळात होते म्हणून आधुनिक कुटुंबात स्त्री–पुरुषांची कामवासना पर्याप्तपणे तृप्त होण्याची जास्ती शक्यता निर्माण होते. दुसरी गोष्ट ही की आधुनिक कुटुंबातून संततिनियमनाच्या पद्धतीचा पुष्कळ अंशी स्वीकार झाला आहे. संततिनियमनाच्या प्रसारामुळे समाजा–पुढे काही जटिल प्रश्न निर्माण झाले आहेत हे खरे. पण संततिनियमनाच्या मार्गाचा अवलंब केल्यामुळे कामवासनेची तृप्ती सुलभ होण्यास मदत होते. संतति–नियमनांच्या साधनांचा वापर केल्यामुळे लैंगिक सुख व जननकार्य या दोन गोष्टी भिन्न झाल्या आहेत. कामवासनेच्या तृप्तीमध्ये या दोन्ही गोष्टी अंतर्भूत असतात. म्हणून पूर्वीच्या परंपरागत कुटुंबव्यवस्थेमध्ये मनुष्याला केवळ लैंगिक सुख मिळविण्यासाठी विवाहेतर अगर कुटुंबबाह्य संबंध ठेवावे लागत असत. त्यासाठी वेश्येशी अगर रखेलीशी संबंध ठेवावे लागत. परंतु आता संततिनियमनाच्या साधनांचा उपयोग केल्याने कुटुंबातच लैंगिक सुख मिळवून जननकार्य थोपविणे शक्य झाले आहे. आधुनिक कुटुंबात पत्नीला प्रणयिनीची भूमिका पत्करणे आता अवघड जात नाही. पतिपत्नींना प्रजननाचे भय न बाळगता कामसुख मिळविणे शक्य झाले आहे. तेव्हा लैंगिक सुख व प्रजनन या कामवासनातृप्तीतील दोन अंगांमध्ये संततिनियमनाच्या साधनांच्या वापराने सुसंवादित्व प्रस्थापित झाल्या–मुळे आधुनिक कुटुंबात पूर्वीच्या कुटुंबाच्या मानाने कितीतरी जास्ती प्रमाणात कामवासनातृप्ती संपादन करणे सुलभ झाले आहे.

### (क) गृहजीवनाची व्यवस्था :

विविध प्रकारचे समाधान देणारे गृहजीवन निर्माण करणे हे कुटुंबाचे महत्त्वाचे कार्य आहे. प्रत्येक मनुष्याला आपले घर असावे अशी प्रबल इच्छा असते. स्वतः निर्माण केलेल्या व अतिशय निकटच्या नातलगांच्या समवेत टिकाऊ संबंधांच्या वाता-वरणात शांतपणे जीवन व्यतीत करण्याचे स्थान असावे अशी प्रत्येकाला इच्छा असते. असे स्थान म्हणजे गृह होय. मग ती गरीबाची झोपडी असो, वंजाऱ्याचा तंबू असो, कामगाराची खोली असो, मध्यमवर्गीयाचा ब्लॉक असो, की श्रीमंताची हवेली वा

बंगला बसो ! दीर्घकाल टिकून राहाणाऱ्या व निकटच्या संबंधांवर आधारलेल्या गृहजीवनाची इच्छा सफल करून घेण्यासाठी मनुष्याला नेहमी लग्नाचे प्रबळ आकर्षण वाटत असते. अशा लग्नसंबंधाच्या पायावर कुटुंबांची उभारणी होते व कुटुंबात मनुष्याला गृहजीवनाचे सौख्य मिळते. गृहजीवनाची सुखे व सोयी लोकाना उपलब्ध करून देण्यासाठी हल्लीच्या संकुल (complex) संस्कृतीमध्ये हॉटेल्स व क्लब्स् यासारख्या संस्था निर्माण झाल्या आहेत हे खरे व अशा संस्थांची कुटुंब-संस्थेबरोबर स्पर्धा चालू आहे. पण या स्पर्धेमध्ये कुटुंबसंस्थाच विजयी ठरली आहे आणि कुटुंबाची जागा इतर संस्था घेऊ शकत नाहीत हे सिद्ध झाले आहे. गृहजीवनाची सौख्ये मनुष्याला कुटुंबात जास्ती चांगल्या रीतीने उपलब्ध होतात कारण कुटुंबात पती व पत्नी, माता-पिता व मुले यासारख्या जिव्हाळ्याचे संबंध असलेल्या व्यक्तींच्या निकटच्या व दीर्घकालीन सहवासात ती सौख्ये मिळत असतात.

गृहजीवनाचा आनंद देण्याचे हे कार्य आधुनिक कुटुंबात विशेष प्रभावीपण पार पाडले जाते. असे होण्याला आधुनिक कुटुंबातील दोन गोष्टी साहाय्यभूत झाल्या आहेत. पहिली गोष्ट ही की आधुनिक कुटुंबात स्त्रियांची कंटाळवाण्या घरकामांतून सुटका झाली आहे. पूर्वीच्या परंपरागत कुटुंबात अर्थार्जनांची कार्ये घरीच होत असल्याने स्त्रियांना घरच्या कामाबरोबर व्यवसायाच्या कामात देखील मदत करावी लागत असे. पण आता अर्थार्जन घराबाहेर होत असल्यामुळे स्त्रियांच्या त्या कामाचा बोजा कमी झाला आहे. तसेच यांत्रिक उपकरणांची मदत घरकामात सर्रास मिळत असल्याने स्त्रियांना पूर्वीइतका घरकामाचा ताण पडत नाही. शिवाय अलीकडे संततिनियमनाच्या साधनांचा वापर वाढू लागला आहे. त्यामुळे वरचेवर येणाऱ्या बाळंतपणाच्या व तदनुषंगिक त्रासांतून स्त्रियांची मुक्तता झाली आहे. दुसरी गोष्ट ही की आधुनिक कुटुंबात पुरुषाचे स्त्रीवरील वर्चस्व कितीतरी कमी झाले आहे. परंपरागत कुटुंबात सर्व बाबतींत स्त्रीला पुरुषांचे वर्चस्व मान्य करावे लागत असे. तिला वेगळे अस्तित्व असे नव्हतेच. पण हल्लीच्या व्यष्टिवादाच्या काळात ती परिस्थिती राहिली नाही. आता स्त्रीला आपल्या आवडी-निवडीप्रमाणे व मतानुसार वागण्याची मुभा मिळाली आहे. त्यामुळे गृहजीवनात समरस होऊन सर्वांना आनंद देण्याचे कार्य स्त्री आता चांगल्या रीतीने करू शकते. तेव्हा आधुनिक कुटुंबात दिसून येणाऱ्या या दोन फरकांमुळे गृहजीवनाची निर्मिती करण्याचे कार्य आधुनिक कुटुंब जास्ती परिणामकारकपणे करीत आहे. आधुनिक कुटुंब हे चांगल्या अर्थाने घर झाले आहे. कुटुंबातील सदस्यांची आर्थिक व इतर कामे कुटुंबाबाहेर होत असल्याने सदस्यांच्या कुटुंबाविषयीच्या अपेक्षा बऱ्याच कमी झाल्या आहेत हे

खरे पण ज्या अपेक्षा कुटुंबाकडून केल्या जातात त्या कमी महत्त्वाच्या असतात अशातला भाग नाही. किंबहुना त्या अपेक्षा जरी थोड्या असल्या तरी त्या विशेष महत्त्वाच्या असतात आणि अशा महत्त्वाच्या अपेक्षांमध्ये गृहजीवनाची अपेक्षा प्रमुख असते. म्हणून आधुनिक कुटुंबात सदस्यांना विविध प्रकारचे समाधान देणारे गृहजीवन निर्माण करण्याचे कार्य चालू असून ते प्रभावीपणे पार पडत आहे असे दिसून येते.

सारांश, प्रजोत्पादन करणे, बालसंवर्धन करणे, कामवासनांची तृप्ती करणे, आनंद देणारे गृहजीवन निर्माण करणे यांसारखी अत्यंत आवश्यक कार्ये कुटुंबसंस्था अजनही करीत आहे. इतकेच नव्हे तर ती कार्ये आधुनिक कुटुंब पूर्वीच्या परंपरागत कुटुंबापेक्षा विशेष सफलतापूर्वक पार पाडीत आहे. त्यामुळे लोकांना आपल्या कुटुंबाविषयी आस्था व आत्मीयता वाटत आहे. कुटुंबविरहित सुखी जीवन आपण जगू शकू व आपल्या आवश्यक गरजा भागल्या जातील अशी भावना अजून लोकांमध्ये सहसा दिसून येत नाही. तेव्हा कुटुंबसंस्था समाजातून नष्ट होईल ही भीती खरी वाटत नाही. अर्थात कुटुंबसंस्थेच्या स्वरूपात व कार्यात बदल झाले आहेत ही गोष्ट खरी आहे. पण हे बदल होणे अपरिहार्य होते. आधुनिक समाजाच्या जीवनात औद्योगिक क्रांतीमुळे प्रचंड प्रमाणावर उलथापालथ झाल्याने सर्व सामाजिक संस्थांना या बदलत्या परिस्थितीशी जुळते घेणे भाग होते. बदलत्या परिस्थितीशी समन्वय साधण्याचे कुटुंबसंस्थेचे कार्य सध्या चालू आहे त्यामुळे पूर्वीच्या परंपरागत कुटुंबव्यवस्थेमध्ये अनेक बदल झाले आहेत व त्यातून आधुनिक कुटुंबव्यवस्था निर्माण झाली आहे. ही समायोजनाची प्रक्रिया ( process of adjustment ) अजूनही चालू असल्याने आधुनिक कुटुंबसंस्थेची हल्लीची स्थिती अगदी तात्कालिक स्वरूपाची आहे. पण या स्थितीतही आधुनिक कुटुंबसंस्था आवश्यक अशी कार्ये विशेष परिणामकारकपणे पार पाडीत आहे हे विसरता कामा नये. म्हणून कुटुंबसंस्थेचे भवितव्य निराशाजनक खास नाही. मानवी समाजाच्या सुरवातीपासून असलेली आणि मनुष्यप्राण्याच्या मूलभूत गरजा भागविणारी अशी कुटुंबसस्था मानवी जीवनाचे शाश्वत लक्षण बनली आहे व ते लक्षण यापुढेही बदलत्या परिस्थितीत देखील कायम राहील यांत संदेह नाही. कुटुंबसंस्थेला पर्यायी अशी दुसरी संस्था अजून मानवाने निर्माण केलेली नाही आणि तशी ती निघेल असे मानवाच्या आजवरच्या इतिहासावरून वाटतही नाही.

१६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम ........................ दि: ............
क्रमांक ........................ नोंद दि ............

# सामाजिक नियंत्रण

## १. सामाजिक नियंत्रणाचे स्वरूप व प्रयोजन

समाजाचे अस्तित्व अबाधित राहण्यासाठी समाजात ऐक्यभाव (solidarity). असण्याची अत्यंत आवश्यकता असते. सामाजिक समैक्याची ही जाणीव **प्लेटो** व **ॲरिस्टॉटल** यांसारख्या सामाजिक तत्त्वज्ञान्यांना प्राचीन काळापासून होती. आधुनिक काळात देखील सामाजिक विचारवंतांना ही जाणीव तीव्रतेने होत आहे. अगदी वेगवेगळे हितसंबंध व अभिवृत्ती असलेल्या व्यक्ती आणि मुख्यतः विभिन्न संस्कृती असलेले समूह यांचे सामाजिक एकीकरण ( social integration ) कसे साध्य करावे हा प्रमुख प्रश्न आधुनिक सामाजिक विचारवंत व समाजशास्त्रज्ञ यांपुढे आहे. समाजात सामाजिक नियंत्रणाची व्यवस्था (system of social control) प्रस्थापित करून सामाजिक एकता (social unity) साध्य करण्याचे प्रयत्न केले जातात. अशा रीतीने समाजाचे सातत्य टिकविले जाते. म्हणून समाजशास्त्रात सामाजिक नियंत्रणाच्या अभ्यासाला विशेष महत्त्व आहे.

सामाजिक नियंत्रणाच्या समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या विविध व्याख्यांवरून सामाजिक नियंत्रणाच्या स्वरूपाची कल्पना येते. डॉ. **फेअरचाइल्ड** यांनी आपल्या ' समाजशास्त्रीय परिभाषा-कोष" (Dictionary of Sociology) या ग्रंथात सामाजिक

नियंत्रणाची अशी व्याख्या केली आहे. " ज्या प्रक्रियांमुळे समाज अगर समाजातील कोणताही समूह आपल्या घटकांकडून– मग ते घटक समूह असोत अगर व्यक्ती असोत– आपल्या अपेक्षांना अनुरूप असे वर्तन घडवून आणतो त्या प्रक्रियांचा समुच्चय म्हणजे सामाजिक नियंत्रण होय "[1] तसेच डॉ. किम्बाल यंग यांनी आपल्या " समाजशास्त्र " या ग्रंथात केलेली सामाजिक नियंत्रणाची व्याख्या अशी आहे. " निर्धारित किंवा अपेक्षित नियम अगर क्रिया यांचे प्रवर्तन किंवा कार्यवाही करण्यासाठी भौतिक बल अगर प्रतीकात्मक साधने यांचा उपयोग करणे म्हणजे सामाजिक नियंत्रण होय."[2] डॉ. जे. एल. गिलिन व डॉ. जे. पी. गिलिन या ग्रंथकारांनी आपल्या " सांस्कृतिक समाजशास्त्र " या ग्रंथात सामाजिक नियंत्रणाची विस्तृत व्याख्या केली आहे. त्यांच्या मते " सूचन, अनुनयन, संयमन आणि भौतिक बल– सहित कोणत्याही उपायांनी केलेले निग्रहण यांसारख्या साधनांच्या व्यवस्थेमुळे जेव्हा एखादा समाज आपल्या उपसमूहाचे वर्तन स्वीकृत वर्तनप्रकारानुरूप बनवितो किंवा एखादा समूह आपल्या सदस्यांच्या वर्तनांत एकसारखेपणा घडवून आणतो तेव्हा त्या साधनांच्या व्यवस्थेला सामाजिक नियंत्रण असे म्हणतात. "[3] इंग्लंड–मधील प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ डॉ. बॉटमोर यांनी आपल्या " समाजशास्त्र " या ग्रंथात 'सामाजिक नियंत्रण' या संज्ञेचे खालीलप्रमाणे वर्णन केले आहे. " जी मूल्ये व नियमने यांच्या योगाने व्यक्ति-व्यक्तीमधील आणि समूहा-समूहामधील ताण व

---

1. " Social control is the sum total of the processes whereby society, or any sub-group within society, secures conformity to expectation on the part of its constituent units, individuals or groups." — Fairchild.

2. " We define social control as the use of physical force or symbolic means to enforce or bring about the operation of prescribed or expected rules or actions." — Kimball Young.

3. " We shall define social control as that system of measures—suggestion, persuasion, restraint and coercion by whatever means including physical force—by which a society brings into conformity to the approved pattern of behaviour a sub-group, or by which a group moulds into conformity its members." — Gillin and Gillin.

संघर्ष विघटित करून अगर प्रकाशित करून एखाद्या मोठ्या समावेशक समहाची ऐक्यभावना टिकविली जाते त्या मूल्यांच्या व नियमनांच्या समुच्चयाला 'सामाजिक नियंत्रण' ही संज्ञा लावण्यांत येते, आणि तसेच ज्या व्यवस्थांमुळे ही मूल्ये व नियमने प्रसारित केली जातात व रुजविली जातात त्या व्यवस्थांना देखील 'सामाजिक नियंत्रण' ही संज्ञा लावण्यात येते."[1]

या व्याख्यांवरून सामाजिक नियंत्रणासंबंधीच्या काही गोष्टी स्पष्ट दिसून येतात.पहिली गोष्ट ही की सामाजिक नियंत्रणाच्या संकल्पनेमध्ये वर्चस्व अगर प्रावल्य (dominance) अंतर्भूत असते. मग ते वर्चस्व कोणत्याही प्रकारचे व कोणत्याही प्रमाणात असले तरी चालते. सर्वसाधारणपणे सामाजिक नियंत्रणात खालील प्रकारांचे वर्चस्व आवळून येते :–

(अ) विशाल समाजाचे अगर समुदायाचे त्यातील विविध समूहांवरील वर्चस्व
(ब) एका समूहाचे दुसऱ्या एक अगर अनेक समूहांवरील वर्चस्व,
(क) एखाद्या समूहाचे त्यातील सदस्यांवरील वर्चस्व, आणि
(ड) काही विशिष्ट व्यक्तींचे इतर व्यक्तींवरील वर्चस्व.

तसेच, दुसरी गोष्ट ही की समाजिक नियंत्रण मुख्यत:
(१) निग्रहात्मक नियंत्रण (coercive control) आणि
(२) अनुनयात्मक नियंत्रण ( persuasive control )
या दोन प्रकारचे असते. निग्रहात्मक नियंत्रणामध्यें बळाचा अगर दण्ड–शक्तीचा उपयोग केला जातो किंवा वेळप्रसंगी बळाचा उपयोग केला जाईल असा धाक घातलेला असतो. शासकीय नियंत्रण हे निग्रहात्मक स्वरूपाचे असते आणि गुन्हेगारीसारख्या वर्तनावर ताबा ठेवण्यासाठी निग्रहात्मक नियंत्रणाचा बहुधा उपयोग केला जातो. अनुनयात्मक नियंत्रणामध्ये धाकदपटशाचा अगर सक्तीचा उपयोग केला जात नाही तर सूचना करणे, स्तुती करणे, प्रशंसा करणें यांसारख्या शाब्दिक उपायांच्या साहाय्याने व्यक्तींना समाजाला योग्य वाटणारे

1. " The term ' social control ' may be regarded as referring to the aggregate of values and norms by means of which tensions and conflits between individuals and groups are resolved or mitigated in order to maintain the solidarity of some more inclusive group, and also to the arrangements through which these values and norms are communicated and instilled " — Bottomore.

वर्तन आचरणात आणण्यास उद्युक्त केले जाते. हल्लीच्या काळात निग्रहात्मक नियंत्रणाचा विस्तृत प्रमाणावर व प्रभावी रीतीने उपयोग केला जातो आणि राज्यशासन मुख्यतः याच उपायांचा अवलंब करते. असे असले तरी देखील अनुनयात्मक नियंत्रणाचे महत्त्व कमी होत नाही आणि विविध परिस्थितीत या नियंत्रणाचा सर्रास उपयोग केला जातो.

कोणत्याही समाजात सामाजिक नियंत्रणाची अत्यंत आवश्यकता असते. समाजात असलेल्या विविध भेदांमुळे सामाजिक नियंत्रणाची जरूरी भासते. समाजातील व्यक्ती-व्यक्तींमध्ये शारीरिक व मानसिक स्वरूपाचे कितीतरी भेद असतात. व्यक्तींचे शरीरबांधे, त्यांचे बौद्धिक सामर्थ्य, त्यांची भावनिक वैशिष्टये, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची ठेवण इत्यादी बाबतींत बरेच भेद असतात. तसेच कोणत्याही समाजातील व्यक्तींच्या सवयी, रूढी व परंपरा यांमध्ये फरक असल्याने त्यांच्या इतरांविषयीच्या दृष्टिकोणांमध्ये समानता असत नाही. साहजिकच या फरकांचा व्यक्तींच्या वर्तनावर परिणाम झाल्याखेरीज राहात नाही. शिवाय, समाजामध्ये विविध समूहांत सांस्कृतिक स्वरूपाचे भेद असतात. विविध समूहांच्या श्रद्धा, सामाजिक मूल्ये, धार्मिक मते व आचार इत्यादी बाबतींत स्पष्ट फरक दिसून येतात. तेव्हा समाजात आढळून येणारे वैयक्तिक व सांस्कृतिक स्वरूपाचे भेद जर अतिशय तीव्र झाले तर त्यांचा सामाजिक एकीकरणाच्या प्रक्रियेवर हमखास विपरीत परिणाम होतो.

समाजाची एकता कोणत्याही परिस्थितीत टिकविली पाहिजे या गोष्टीला प्रत्येक समाजात विशेष महत्त्व असल्याने समाजातील वैयक्तिक व सांस्कृतिक भेद विकोपाला जाणार नाहीत अशी दक्षता समाजाला नेहमी घ्यावी लागते. पशूंच्या समाजात देखील ही दक्षता घेतली जाते. पशूंच्या कळपातील एखाद्या पशूचे वर्तन जर इतरांपेक्षा खूप भिन्न असले तर त्या पशूला कळपातून हाकलून दिले जाते अगर ठार केले जाते. रानटी हत्तींच्या कळपामध्ये ही गोष्ट प्रकर्षाने आढळून येते. सामाजिक जीवन जगणाऱ्या पशूपक्ष्यांमध्ये ही प्रथा सर्वत्र दिसून येते. पक्ष्यांच्या थव्यामध्ये एखाद्या पक्ष्याने विशिष्ट सूचना दिली तर त्या सूचनेनुसार इतर पक्षी वर्तन करतात. मानव समाजात तर व्यक्तींच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्याचे काम जाणीवपूर्वक केले जाते. जगातील कोणत्याही अवस्थेतील समाजात अत्यंत विपरीत अगर समाजाला अमान्य असणारे वर्तन करणाऱ्या व्यक्तींना कडक शासन केले जाते. अगदी मागासलेल्या आदिवासी लोकांच्या टोळीत देखील विपरीत वर्तन करणाऱ्यांना टोळीतून हाकलून दिले जाते व त्यांच्या संरक्षणाची हमी घेतली

जात नाही. पुढारलेल्या समाजातून वेगवेगळ्या रीतींनी व्यक्तींच्या वर्तनावर नियंत्रण ठेवले जाते. असे नियंत्रण ठेवले नाही तर समाजाची एकता टिकणार नाही व समाजाचे सातत्य अबाधित राहणार नाही. म्हणून कोणत्याही समाजात सामाजिक नियंत्रणाचे प्रयोजन असते.

## २. सामाजिक नियंत्रणाची कार्ये व साधने

सामाजिक नियंत्रणाचे कार्य म्हणजे सामाजिक नियंत्रणाचा हेतू सफल करणे होय. कोणत्याही वस्तूच्या कार्याची हीच गत असते. औषधाचा हेतू सफल करणे हे औषधाचे कार्य असते व इंजिनाचा हेतू सफल करणे हे इंजिनाचे कार्य असते. त्याचप्रमाणे सामाजिक नियंत्रणाची उद्दिष्टे अगर हेतू पूर्ण करणे ही सामाजिक नियंत्रणाची कार्ये होत. या दृष्टीने समाजात अगर समूहात

(अ) अनुरूपता घडवून आणणे,
(ब) ऐक्यभाव निर्माण करणे आणि
(क) सातत्य टिकविणे ही तीन कार्ये सामाजिक नियंत्रणाची प्रमुख कार्ये आहेत कारण कोणत्याही समाजाची अगर समूहाची ती तीन प्रधान उद्दिष्टे असतात.

### (अ) अनुरूपता घडवून आणणे :

कोणत्याही समाजात विभिन्न समूह असतात आणि सर्व समूहांची मूल्ये, श्रद्धा, रुढी व आचार–विचार सर्वथैव समान असत नाहीत. त्यामुळे विविध समूहांच्या सदस्यांच्या वर्तनांत थोड्याफार प्रमाणात तफावत दिसून येते. परदेशातून येऊन स्थाईक झालेल्या लोकांचे समूह अगर विशिष्ट हेतू साध्य करून घेण्यासाठी स्थापन झालेले समूह यांमधील सदस्यांचे वर्तन समाजातील सामान्य लोकांच्या वर्तनाच्या मानाने भिन्न असणे साहजिक आहे. परंतु समाजातील सर्व लोकांच्या कृतींमध्ये अनुरूपता किंवा मेळ असणे अगदी आवश्यक असते. त्याखेरीज समाजातील लोकांमध्ये "सामाजिक अगर सामूहिक जाणीव" निर्माण होणार नाही व समाजाचे अस्तित्व टिकणार नाही. यासाठी नियंत्रणांची जरुरी असते. म्हणून समाजातील लोकांच्या वर्तनात अनुरूपता घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य सामाजिक नियंत्रण पार पाडीत असते.

### (ब) ऐक्यभाव निर्माण करणे :

समाजातील सर्व लोकांमध्ये ऐक्यभावना निर्माण करून ती टिकविण्याचा प्रयत्न करणे हे सामाजिक नियंत्रणाचे दुसरे प्रमुख कार्य आहे. समाजातील विविध

समूहांत सुदृढ ऐक्य असल्याखेरीज समाजाला स्वतंत्रपणे काम करता येणार नाही. त्यासाठी समाजाच्या वेगवेगळ्या घटकांमध्ये सामंजस्य निर्माण करावे लागते. समाज विघटित होणार नाही याची सदैव दक्षता घ्यावी लागते. स्पर्धेच्या या युगात समाजातील एखादा समूह इतर समूहांची या ना त्या मार्गाने पिळवणूक करून समाजाची घडी विस्कळित करणार नाही याची काळजी घ्यावी लागते. तेव्हा विभिन्न आणि विशेषतः परस्परविरोधी समूहांमध्ये संतुलन किंवा समतोलपणा ( equilibrium ) साधणे अत्यंत आवश्यक असते आणि सामाजिक नियंत्रणाचा तो एक प्रधान हेतू असतो. म्हणून समाजातील विविध समूहांमध्ये व लोकांमध्ये ऐक्यभाव निर्माण करणे हे सामाजिक नियंत्रणाचे विशेष उल्लेखनीय कार्य असते.

## ( क ) सातत्य टिकविणे :

समाजाचे अस्तित्व अबाधित राहिले पाहिजे व समाज चांगल्या रीतीने पुढील काळातही टिकला पाहिजे अशी प्रत्येक समाजाची इच्छा असते. ही इच्छा परिपूर्ण करण्यासाठी समाज अविरत प्रयत्न करीत असतो व सामाजिक नियंत्रणाचे हे एक उद्दिष्ट असते. लोकांच्या व समूहाच्या वर्तनावर योग्य ते नियंत्रण ठेवून समाज आपले सातत्य टिकविण्याची खटपट करीत असतो. तेव्हा सामाजिक नियंत्रणाच्या साहाय्याने समाज अविच्छिन्नपणे चालू राहील अशी दक्षता घेतली जाते. म्हणून समाजाचे सातत्य टिकविणे हे सामाजिक नियंत्रणाचे विशेष कार्य असते. सामाजिक नियंत्रणाच्या पद्धती समाजाच्या संस्कृतीचा अविभाज्य भाग बनतात आणि या पद्धती एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित केल्या जातात. यामुळे साहजिकच समाजव्यवस्था सुरळितपणे चालू राहण्यास मदत होते.

सामाजिक नियंत्रणाचे हेतू अगर उद्दिष्टे सफल करून घेण्यासाठी विशिष्ट साधनांचा (means of control) उपयोग करून घेतला जातो. अर्थात अधिकार असलेल्या व्यक्तींच्याकडून ही साधने वापरली जातात. सामाजिक नियंत्रणाची साधने

(१) प्रकट शक्तीचा उपयोग करणारी ( use of overt force ) आणि

(२) प्रतीकांचा किंवा संकेतांचा उपयोग करणारी ( manipulation of symbols )

अशा दोन प्रकारची असतात.

### (१) प्रकट शक्तीचा उपयोग करणारी साधने :

प्रकट बलाचा उपयोग करणारी सामाजिक नियंत्रणाची साधने निग्रहात्मक स्वरूपाची असतात. या ठिकाणी शक्तीचा उपयोग होत असल्याने लोकांवर दडपण पडत असते आणि बलप्रयोगाच्या भीतीने लोक समाजाला योग्य वाटणारे वर्तन करीत असतात. अशा साधनांत सक्तीचा अगर धाकदपटशाचा भाग प्रमुख असल्याने लोकांच्या मनात अशा साधनांच्याविषयी अप्रिय भावना वास करीत असतात. लोकांना या साधनांचा उपयोग दुःखदायक किंवा क्लेशकारक वाटत असतो. तसेच ही साधने नकारात्मक किंवा निषेधात्मक स्वरूपाची ( negative in character ) असतात. कारण या साधनांच्या उपयोगामुळे लोकांच्या वर्तनावर बंधने लादली जातात व विशिष्ट वर्तन-प्रकार निषिद्ध ठरविले जातात. शिवाय, निषिद्ध वर्तनप्रकार टाळण्यासाठी विविध रीतींनी प्रकट शक्तीचा उपयोग केला जातो. अर्थदण्ड ( fines ) लादणे, हद्दपार करणे, तुरुंगात घालणे, सक्त मजुरीची शिक्षा देणे, देहान्ताची शिक्षा देणे यांसारख्या प्रकारांनी प्रकट बलाचा वापर केला जातो.

### (२) प्रतीकांचा उपयोग करणारी साधने :

प्रतीकांचा किंवा संकेतांचा उपयोग करून देखील सामाजिक नियंत्रणाचे कार्य साधता येते. लोकांकडून अपेक्षित वर्तनप्रकार आचरणात आणण्यासाठी बलाचा उपयोग सर्रास केला पाहिजे अशातला भाग नाही. लोकांची स्तुती अगर प्रशंसा करून, त्यांचे अनुनयन ( persuasion ) करून, त्यांच्यामध्ये प्रचार करून, त्यांना शिक्षण देवून, त्यांना पुरस्कारांचे ( rewards ) आमिष दाखवून आणि यांसारख्या अन्य प्रकारांनी लोकांच्या योग्यवर्तनाचरणाचे उद्दिष्ट साध्य करून घेता येते. अशी साधने सकारात्मक किंवा निश्चयात्मक ( positive in character ) स्वरूपाची असतात कारण या साधनांनी लोक योग्य वर्तनप्रकार करण्यास उद्युक्त होतात. शिवाय अशा साधनांच्या भोवती प्रिय किंवा सुखकारक भावना ( pleasant emotions ) निगडित झालेल्या असतात.

कोणत्याही समाजात शक्तीचा आणि प्रतीकांचा उपयोग करणाऱ्या अशा दोन्ही प्रकारच्या साधनांचा विस्तृत प्रमाणावर वापर केला जातो. लोकांची स्तुती करण्यापासून ते त्यांना फाशी देण्यापर्यंत सर्व साधनांचा उपयोग सामाजिक नियंत्रणासाठी केला जातो.

## ३. सामाजिक नियंत्रणाचे प्रकार

सामाजिक नियंत्रणाचे हेतू सफल करून घेण्यासाठी विविध साधनांचा वेगवेगळया प्रमाणात उपयोग केला जातो. कोणत्या साधनांचा किती प्रमाणात उपयोग करावयाचा हे समाजाच्या किंवा समूहाच्या धारणेवर अवलंबून असते. काही समाजात प्रकट शक्तीचा उपयोग करणाऱ्या साधनांवर विशेष भर दिला जातो तर काही समाजात प्रतीकांचा उपयोग करणारी साधने प्रामुख्याने वापरली जातात. मागासलेल्या आदिवासी लोकांच्या समाजात जादूटोणा, आधिभौतिक शक्ती, परंपरा इत्यादी गोष्टींच्या साहाय्याने मुख्यतः सामाजिक नियंत्रण साधले जाते. आदिवासी लोकांवर या गोष्टींचा विशेष पगडा असल्याने त्यांच्या उपयोगांवर आधारलेले नियंत्रण फार प्रभावी ठरते. परंतु प्रगत लोकांच्या समाजात विविध सांस्कृतिक गोष्टी व प्रत्यक्ष अनुभवांवर आधारलेले ज्ञान या बाबींचा मुख्यतः उपयोग करून लोकांच्या वर्तनावर हवे तसे नियंत्रण ठेवले जाते. विद्यालये, वर्तमानपत्रे, रेडिओ, टेलिव्हिजन, पोलिस इत्यादी गोष्टींचा विकसित समाजात सामाजिक नियंत्रणाकरिता उपयोग केला जातो. ग्रामीण भागातील लोकांवर रीतिरिवाज, परंपरा, अंधश्रद्धा, भोळचा समजुती इत्यादी गोष्टींचे वर्चस्व असल्याने या गोष्टींचा लोकांच्या वर्तनावर हमखास परिणाम होतो. नागर भागातील लोकांवर या गोष्टींचे तितकेसे वर्चस्व असत नाही. म्हणून ग्रामीण समाजात या गोष्टींच्या आधारावर सामाजिक नियंत्रण केले जाते तर नागर समाजात या गोष्टींचा सामाजिक नियंत्रणासाठी तितकासा उपयोग होत नाही. तसेच कुटुंब, मित्रपरिवार, शेजारी राहणारे लोक यांसारख्या प्राथमिक समूहातील सदस्यांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रकट शक्तीच्या साधनांचा सहसा उपयोग करावा लागत नाही; प्रतीकांच्या साधनांचा उपयोग करून सामाजिक नियंत्रणाचे काम भागते. पण सर्व दुय्यम समूहात मात्र सामाजिक नियंत्रण साधण्यासाठी प्रकट शक्तीचा उपयोग करणाऱ्या साधनांवर भर द्यावा लागतो.

कोणत्या साधनांचा उपयोग करून सामाजिक नियंत्रणाचे कार्य साध्य केले जाते या गोष्टीवरून सामाजिक नियंत्रणाचे (अ) औपचारिक नियंत्रण (formal control) व (ब) अनौपचारिक नियंत्रण ( informal control ) असे दोन प्रकार होतात. राज्यसंस्थेने कायदा आणि प्रशासनिक उपाय ( administrative devices)या साधनांनी केलेले नियंत्रण किंवा धार्मिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक इत्यादी संघटनांनी आपल्या अंतर्गत व्यवस्थेसाठी अगर इतर संघटनांशी येणाऱ्या परस्पर-संबंधांचे नियमन करण्यासाठी केलेले नियंत्रण औपचारिक नियंत्रण

होय. औपचारिक नियंत्रण हे नेंहमी जाणीवपूर्वक केलेले असते व वेगवेगळ्या नियमांच्या साहाय्याने ते स्पष्ट केलेले असते. अर्थात औपचारिक नियंत्रणाचे काटे-कोरपणे पालन करण्याची सदैव दक्षता घेतली जाते व याचे उल्लंघन करणाऱ्यांना शासन करण्याची तरतूद केलेली असते. तेव्हा संघटनांनी आपल्या सदस्यांच्या वर्त-नावर विविध नियमांच्या द्वारे विवेकपूर्वक घातलेले नियंत्रण औपचारिक नियंत्रणाच्या सदरात मोडते. याच्या उलट परिस्थिती अनौपचारिक नियंत्रणामध्ये असते. रीति-रिवाज (customs), लोकरूढी (folkways), लोकनीती (mores) यांसारखी सामाजिक नियमने (social norms) अनौपचारिक नियंत्रणाच्या सदरात येतात. ही नियमने जाणूनबुजून केलेली असत नाहीत तर परिस्थित्यनुसार ती निर्माण होतात व हळूहळू दृढमूल होतात. ही नियमने जाणीवपूर्वक केलेली नसली व त्यांचे उल्लंघन करणाऱ्यांना कायदेशीर शासन होत नसले तरी त्यांच्यांतील नियंत्रणशक्ती प्रभावी असते. म्हणून अनौपचारिक नियंत्रणाचा सदैव उपयोग केला जातो. कोणत्याही समाजात धर्मश्रद्धा, नीतिकल्पना, लोकमत, कलाविषयक आदर्श किंवा कलात्मक मानक ( artistic standard ) आणि सर्वसाधारण प्रबोधन ( general state of enlightenment ) ही अनौपचारिक नियंत्रणे अत्यंत महत्त्वाची समजली जातात.

समाजात उपयोगात आणले जाणारे सामाजिक नियंत्रणाचे प्रकार तसेच कायम राहात नाहीत. त्यांच्यामध्ये हळूहळू बदल होत असतो. जेव्हा समाज आर्थिक दृष्टया अगदी मागासलेल्या अवस्थेत असतो व समाजरचना अगदी साधी असते तेव्हा अनौपचारिक सामाजिक नियंत्रण पुरेसे होते. परंतु समाजाची अर्थव्यवस्था कार्यविभाजनामुळे संमिश्र झाल्यानंतर व समाजरचना गुंतागुंतीची झाल्यानंतर अनौपचारिक सामाजिक नियंत्रणावर समाजाचे काम भागत नाही व समाजाला औपचारिक नियंत्रणाची आवश्यकता भासू लागते. आधुनिक युगाच्या कितीतरी शतकांपूर्वी मानवाने औपचारिक नियंत्रणाचा उपयोग करावयास सुरवात केली होती. ज्यावेळी लोकांसाठी आचारसंहिता तयार करून तिची अमलबजावणी करण्याचे काम विशिष्ट समूहांकडे सोपविले जाते आणि आचारसंहिता अविच्छिन्न-पणे चालू राहील अशी दक्षता घेतली जाते त्यावेळेपासून औपचारिक नियंत्रणाला सुरवात होते. मानवाच्या इतिहासात अशी सुरवात फार पूर्वीपासून झाली. पण राज्यसंस्था स्थापन झाल्यानंतर, भाषा लिपिबद्ध झाल्यानंतर व रीतसर कायदे करण्याची यंत्रणा अस्तित्वात आल्यानंतर मात्र औपचारिक नियंत्रणाची झपाट्याने वाढ झाली. याचा अर्थ असा नव्हे की औपचारिक नियंत्रणाची वाढ झाल्यानंतर अनौपचारिक नियंत्रणाचे काम उरत नाही. समाजात या दोन्ही प्रकारच्या नियंत्रणाची

जरूरी असते. आधुनिक समाजात देखील सामूहिक जीवनाच्या विविध क्षेत्रांत अनौपचारिक नियंत्रण जास्ती प्रभावी ठरते. तसेच वेगवेगळ्या प्रगत संघटनां-मध्ये औपचारिक नियंत्रणावर जास्ती भर दिलेला असला तरी तेथें अनौपचारिक नियंत्रण या ना त्या स्वरूपात असतेच. म्हणून सामाजिक नियंत्रणाचे औपचारिक व अनौपचारिक हे दोन्ही प्रकार एकमेकात मिसळलेले आढळून येतात.

सामाजिक नियंत्रणाच्या या दोन प्रकारांत रीतिरिवाज व कायदा आणि धर्म व नैतिकता यांच्या उपयोगाला समाजात महत्त्वाचे स्थान असल्याने त्यांचा विशेष विचार करणे आवश्यक आहे.

## ४. *रीतिरिवाज व कायदा*

सामाजिक नियमनांचा विचार करताना आपण हे पाहिले होते की सामाजिक नियमने लोकांच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यात अतिशय प्रभावी असतात. सामाजिक नियमने विविध प्रकारची असतात आणि त्यांची लोकरूढी ( folkways ), लोकनीती ( mores ) आणि कायदा ( law ) या तीन प्रमुख गटांत विभागणी केली जाते. रीतिरिवाजांतून ( customs ) लोकरूढी, लोकनीती व कायदे यांची वाढ होत असते. जे वर्तनविषयक रीतिरिवाज सर्वमान्य झालेले असतात व लोकांच्या प्रत्यक्ष आचरणात आलेले असतात त्यांना लोकरूढी असे म्हणतात. काही लोकरूढींचे लोकनीतींच्यामध्ये रूपांतर होते. ज्या लोकरूढी समाजाला उपकारक वाटतात व ज्यांना समाजमान्यता मिळते त्यांना लोकनीती असे म्हणतात. तसेच काही लोकनीतींचे कायद्यात रूपांतर होते. " जेव्हा लोकनीतींच्या अमलबजावणी-साठी एखादी खास संघटना अस्तित्वात येते तेव्हा त्या लोकनीतींना कायदे असे म्हणतात " अशी कायद्याची व्याख्या डॉ. किंग्जले डेव्हिस यांनी केली आहे.[1] अर्थात अशी विशेष संघटना किंवा यंत्रणा निर्माण करण्याचे काम समाजातील राज्यसंस्थेचे असते. समाजातील दुसरी कोणतीही संस्था नियमांची सक्तीने अमल-बजावणी करण्याचे कार्य शिरावर घेणार नाही कारण सक्ती करण्यासाठी लागणारी शक्ती अगर प्रभुत्व त्यांच्याकडे असत नाही. सक्तीच्या अमलबजावणीसाठी लागणारी सार्वभौम शक्ती फक्त राज्यसंस्थेकडेच असते. म्हणून " राज्याच्या न्यायालयांनी मान्य केलेल्या, अर्थ लावलेल्या आणि विशिष्ट स्थितींना लागू केलेल्या नियमांचा

1. " When mores come to have some special organization for their enforcement, we call them laws." — Kingsley Davis.

समुच्चय म्हणजे कायदा होय" अशी कायद्याची व्याख्या प्रा. मॅकायव्हर व प्रा. पेज या समाजशास्त्रज्ञांनी केली आहे.[1] याचा अर्थ असा की जेव्हा राज्यसंस्था आपल्या अधिकारक्षेत्रातील नागरिकांवर व रहिवाश्यांवर एखादा विशिष्ट नियम पालन करण्याचे बंधन लादते तेव्हा त्या नियमाचे कायद्यात रूपांतर होते.

कायद्याच्या या व्याख्यांवरून कायद्याची प्रभेदक लक्षणे स्पष्ट होतात. नियमांना कायद्याचे रूप देण्यासाठी अधिकृत व्यक्ती अगर मंडळ असते. अशा राजासारख्या व्यक्तीकडे अगर लोकसभा, विधानसभा यांसारख्या मंडळांकडे कायदे करण्याचे खास अधिकार दिलेले असतात आणि हे अधिकार राज्यसत्तेकडून दिले जातात. म्हणून कायद्याच्या पाठीशी राज्यसत्तेची किंवा सरकारची सर्वंकष शक्ती उभी असते. इतर मंडळांना देखील सामाजिक वर्तनासंबंधी नियम करण्याचे अधिकार असतात आणि त्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना शिक्षा सुद्धा देता येते हे खरे. पण या इतर मंडळांचे शिक्षा देण्याचे सामर्थ्य अगदी मर्यादित असते. कायद्याचे तसे असत नाही. कायद्याच्या पाठीशी असलेले सामर्थ्य अमर्यादित असते कारण ते सामर्थ्य राज्यसत्तेचे असते. म्हणून इतर मंडळांनी केलेले नियम त्या मंडळांच्या सदस्यांनाच तेवढे लागू होतात आणि त्या नियमांचे पालन न करणाऱ्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात येते अगर सदस्यत्वामुळे प्राप्त होणारे काही हक्क किंवा विशेष अधिकार कमी करण्यात येतात. पण राज्याने केलेले नियम अगर कायदे सर्व नागरिकांना लागू होतात आणि त्यांचे पालन नागरिकांना करावे लागते. तसेच, कायदे सर्वसमावेशक असतात. वर्तनाच्या कोणत्याही बाबीविषयी कायदे करता येतात आणि समाजाला वाटेल त्या बाबतीत हवे तसे वर्तन लोकांकडून करवून घेता येते. साहजिकच कायदे समाजाचे संरक्षक असतात. शिवाय, कायदे निग्रहात्मक (coercive) असतात. कायद्याची प्रेरणास्थाने विविध असू शकतात. रीतिरिवाजातून कायद्याचा विकास होऊ शकतो, नीतिनियमांवर कायदा आधारलेला असू शकतो, अगर धर्मशास्त्रप्रणीत नियमांवरही कायद्याची उभारणी होऊ शकते. कायद्याचा उगम कशातूनही झालेला असला तरी जोपर्यंत त्या नियमांना राज्यसत्तेची मान्यता मिळत नाही व ते नियम सक्तीने अमलात आणले जात नाहीत तोपर्यंत त्या नियमांना कायद्याचे स्वरूप प्राप्त होत नाही. तेव्हा कायद्याला नेहमी राज्यसत्तेचे पाठबळ असते. म्हणून राज्यसत्तेच्या अधिकारक्षेत्राखाली येणाऱ्या सर्व व्यक्तींना कायद्याचे सदैव पालन करावे लागते. कायदापालन सक्तीचे असते व ते कर्तव्यही असते.

---

1. "Law is the body of rules which are recognised, interpreted and applied to particular situations by the courts of the state." — MacIver and Page.

रीतिरिवाजांतून कायद्याची वाढ होत असते. असे असले तरी रीतिरिवाज व कायदा या दोहोंमध्ये मूलभूत फरक आहेत. राज्यसत्तेकडून कायदा तयार केला जातो आणि तो लागू केला जातो. राज्यसत्तेतर्फेच कायद्याचा अमल जारी होत असतो व त्यासाठी स्वतंत्र यंत्रणा असते. परंतु रीतिरिवाजाचे तसे नाही, समाजात प्रचलित असलेले रीतिरिवाज हळूहळू विकसित झालेले असतात. कोणत्याही विशिष्ट मंडळातर्फे रीतिरिवाज तयार केले जात नाहीत. तसेच रीतिरिवाजांचा अमल करण्यासाठी किंवा त्यांचे सरक्षण करण्यासाठी राज्यसंस्थेसारखी निश्चित स्वरूपाची व सर्वशक्तिमान सत्ता असत नाही. रीतिरिवाजांचे पालन यथायोग्य होते की नाही हे पाहण्यासाठी एखादे स्वतंत्र अधिकारीमंडळ देखील असत नाही. कायद्याप्रमाणे रीतिरिवाजांत पूर्वयोजना असत नाही. परंतु याचा अर्थ असा नव्हे की रीतिरिवाजांचा लोकांवर प्रभाव पडत नाही. रीतिरिवाजांचे सुद्धा लोकांवर निश्चित नियंत्रण असते. दोहोंमध्ये फरक एवढाच की नियंत्रण जारी करण्यासाठी रीतिरिवाजांना कायद्यासारखे राज्यसत्तेचे पाठबळ असत नाही. शिवाय, रीतिरिवाज हे जीवनाच्या नेहमीच्या सामान्य गोष्टींशी संबंधित असतात तर समाजाच्या दृष्टीने महत्त्वाच्या व आवश्यक अशा गोष्टींशी कायद्याचे संबंध येतात. भोजन, केशभूषा, वेशभूषा, अभिवादन इत्यादी सर्वसाधारण बाबतींत कोणते वर्तनप्रकार असावेत अशासारख्या सामान्य गोष्टी रीतिरिवाज ठरवीत असतात. याच्या उलट आर्थिक नियोजन, सामाजिक समता, शिक्षण–प्रसार, कल्याणकारी राज्य यांसारख्या समाजावर दूरगामी परिणाम करणाऱ्या महत्त्वपूर्ण गोष्टींविषयी योजनापूर्वक कायदे केले जातात. म्हणून कायद्यांना समाजात अनन्यसाधारण स्थान असते. तसेच, रीतिरिवाजांच्या मानाने कायद्याचा संबंध जास्ती लोकांशी येतो. विवक्षित रीतिरिवाज समाजातील ज्या लोकांत प्रचलित असतात त्या लोकांशीच त्यांचा संबंध येतो. पण कायद्याचा संबंध मात्र समाजातील सर्व लोकांशी येतो.

रीतिरिवाज व कायदा या दोहोंचाही सामाजिक नियंत्रणाचे कार्य प्रभावीपणे करण्यात खूप उपयोग होतो. पण सर्व समाजात त्यांचे समान प्राबल्य असत नाही. आदिवासी लोकांच्या समाजात रीतिरिवाजांचे प्राबल्य विशेष असते आणि तेथे स्वतंत्र कायद्याची तितकीशी जरूरी जाणवत नाही. आदिवासी समाजात सदस्य–संख्या अगदी मर्यादित असल्याने सदस्यांचे परस्परांशी प्रत्यक्ष व समोरासमोरचे (face–to–face) संबंध येतात. त्यामुळे कोणालाही इतरांना नकळत रीति–रिवाजांचे उल्लंघन करता येत नाही. लोकांचे सामाजिक जीवन अतिशय साधे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ............ दि: ..................
क्रमांक ..................



असल्याने व त्यात नवीन काही फारसे घडत नसल्याने रीतिरिवाज जीवनाच्या विविध बाबींवर सहज नियंत्रण ठेवू शकतात. लोकांनी कोणत्या प्रसंगी कसे वागावे, त्यांचे एकमेकांशी संबंध कसे असावेत, त्यांचे वैयक्तिक हक्क व कर्तव्ये कोणती, त्यांचे सामाजिक वर्तन कसे असावे इत्यादी गोष्टी रीतिरिवाजांनी घालून दिलेल्या असतात व परंपरेच्या दडपणामुळे त्या दृढमूल होतात. साहजिकच आदिवासी समाजात सामाजिक नियंत्रण करण्यास रीतिरिवाज समर्थ असतात. परंतु जसजसा समाज मोठा व संमिश्र बनत जातो आणि समाजजीवनात विविधता येते तसतसे समाजाच्या समग्र जीवनावर नियंत्रण ठेवण्याचे रीतिरिवाजांचे सामर्थ्य कमी कमी होत जाते आणि रीतिरिवाजांबरोबर इतर नियमांचा व विशेषतः कायद्याचा उपयोग करण्याची आवश्यकता विशेष स्पष्टपणे जाणवते.

आधुनिक समाजात सामाजिक नियंत्रणासाठी रीतिरिवाजांना कायद्याची जोड देण्याची जरूरी अनेक कारणांनी भासते.

(१) रीतिरिवाजांचे पालन योग्य प्रकारे होते की नाही हे पाहण्याची खास व्यवस्था रीतिरिवाजांत असत नाही. रीतिरिवाजांच्या पालनावरून लोकांत तीव्र मतभेद होणे व त्यातून संघर्ष निर्माण होणे शक्य असते. तसेच रितिरिवाजांचे काही लोकांकडून उल्लंघन होण्याची शक्यता असते. अशा परिस्थितीत लोकांतील संघर्ष कमी करण्याची अगर गुन्हेगारांना शासन करण्याची अधिकृत यंत्रणा रीति–रिवाजांत असत नाही. त्यामुळें आपल्यावर अन्याय झाला आहे असे वाटणाऱ्या व्यक्तींना अगर समूहांना दाद मागण्याची सवलत रीतिरिवाजांत असत नाही. अशी सवलत नसल्याने संबंधित व्यक्ती अगर समूह प्रतिहल्ला करतात अगर सूड उगविण्याचा प्रयत्न करतात. रीतिरिवाजांचे प्राबल्य असलेल्या ग्रामीण समाजात असे हल्ले प्रतिहल्ले मोठ्या प्रमाणावर घडत असल्याचे आढळून येते. साहजिकच असे हल्ले–प्रतिहल्ले नेहमी होत राहिल्यामुळे समाजजीवनात अस्थिरता निर्माण होते व समाजहिताला धोका पोहोचतो. तेव्हा ही परिस्थिती दूर करण्यासाठी आधुनिक समाजात रीतिरिवाजांच्या जोडीला कायद्याची सोय करणे आवश्यक असते कारण कायद्यामध्ये नियमपालन व्यवस्थित होत आहे की नाही हे पाहण्याची खास यंत्रणा असते.

(२) बदलत्या परिस्थितीशी झटपट अभ्यनुकूलन ( adaptation ) साधण्याची शक्ती रीतिरिवाजांत असत नाही. जेव्हा समाज विस्तृत व संमिश्र (complex) होतो, तेव्हा व्यक्तिगत संबधांपेक्षा व्यक्तिनिरपेक्ष (impersonal) संबंध जास्त प्रस्थापित होतात व लोकांवरील समाजाचे प्रत्यक्ष नियंत्रण कमी होत

जाते. अशा संमिश्र समाजात रीतिरिवाजांचे वर्चस्व कमी होत जाते. संमिश्र समाजाचे नियंत्रण केवळ रीतिरिवाज करू शकत नाहीत. नवीन परिस्थितीत जुने वर्तन-नियम लागू करता आले तरच रीतिरिवाज मार्गदर्शक ठरतात व नियंत्रण करू शकतात. परंतु नवीन तंत्रे किंवा क्रियाविधी ( techniques ) यांचा वापर सुरू झाल्यावर त्यांचा जुन्या वर्तन-प्रकारांशी संघर्ष निर्माण झाला तर मात्र त्या ठिकाणी रीतिरिवाजांचा नियंत्रणासाठी काही उपयोग होत नाही कारण रीतिरिवाज हळूहळू वृद्धिंगत होत असतात व ते एकदम बदलता येत नाहीत. अशा वेळी बदलत्या परिस्थितीला अनुरूप असे खास नवीन नियम तयार करावे लागतात. याचाच अर्थ असा की वेगळ कायदे करणे भाग पडते. उदाहरणार्थ, रस्त्यावरील रहदारीचे नियम पूर्वी रीतिरिवाजांत मोडत व ते प्रभावी ठरत. पण मोटारगाड्यांचे युग सुरू झाल्याने निर्माण झालेल्या नवीन परिस्थितीत केवळ रहदारीविषयक रीतिरिवाजांचा उपयोग होईनासा झाला व रस्त्यांवरील रहदारीचे नियंत्रण व्यवस्थित करण्यासाठी " रहदारीविषयक कायदे " ( traffic laws ) करणे भाग पडले. तेव्हा बदलणाऱ्या परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यास रीतिरिवाज असमर्थ ठरतात म्हणून आधुनिक समाजात रीतिरिवाजांबरोबर कायद्याची देखील आवश्यकता असते.

(३) रीतिरिवाज ज्या त्या समूहापुरते मर्यादित असतात व इतर समूहांवर त्यांचे नियंत्रण चालत नाही. आधुनिक संमिश्र समाजात अनेक प्रकारचे समूह असतात व त्यांचे रीतिरिवाज देखील वेगवेगळे असतात. परंतु जेव्हा भाषणस्वातंत्र्य, शिक्षणप्रसार, समाजकल्याण यासारखा एखादा नवीन नियम समाजात रूढ करण्याची आवश्यकता भासते तेव्हा त्यासाठी खास कायदा करण्याची जरूरी असते, कारण कायदा हा समावेशक (inclusive) असतो व समाजातील विविध समूहांना-त्यांचे रीतिरिवाज कोणतेही असले तरी-एकाच पद्धतीने लागू करता येतो. अशा प्रकारे कायद्याच्या साहाय्याने नवीन गोष्टी समाजातील सर्व समूहांत सारख्याच रीतीने अमलात आणता येतात. म्हणून आधुनिक समाजात कायद्यांची जरूरी असते.

आधुनिक समाजात कायद्याची वाढ फार मोठ्या प्रमाणात झाली आहे. कारण वर उल्लेखिलेल्या कारणांमुळे आधुनिक समाजात रीतिरिवाजांना पूरक असे कायदे करणे भाग पडले. अलीकडील काळात सर्व राज्यांमध्ये कायद्यांची इतकी वाढ झाली आहे की त्यांची विस्तृत संहिता (voluminous code) तयार झाली आहे. तसेच कायद्यांची वाढ करण्याचा हा क्रम सारखा चालू आहे. आधुनिक

युगात परिस्थितीत सदैव बदल होत असतो व विविध समस्या निर्माण होत असतात. तेव्हा या बदलत्या परिस्थितीला व नवीन समस्यांना तोंड देण्यासाठी वेगवेगळे कायदे करावे लागतात किंवा जुन्या कायद्यांची व्याप्ती वाढवावी लागते. अलीकडील काळात अतिशय झपाट्यानें होणाऱ्या औद्योगिक विकासामुळे राज्यांना उद्योगविषयक व कामगारविषयक नवीन कायदे करणे अत्यंत आवश्यक झाले. शिवाय, एकदा कायदे करण्याचा अधिकार मिळाला म्हणजे राज्यकर्त्यांना अधिकाधिक सत्ता आपल्याकडे असावी असे उत्तरोत्तर वाटू लागते आणि परिणामतः कायद्यांची संख्या वाढू लागते. या सर्व कारणांनी अनेक राज्यातून कायद्याची एवढी वाढ झाली आहे की त्यामुळे सामान्य माणूस अगदी गांगरून जातो व कायद्यांचा अर्थ लावण्यासाठी त्याला वकिलावर अगर कायदातज्ञावर अवलंबून राहावे लागते.

आधुनिक समाजात कायद्याची वाढ होत असली तरी कायद्याला काही मूलभूत मर्यादा आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे. जीवनाच्या अशा काही बाबी आहेत की ज्यांच्यावर कायदा नियंत्रण ठेवू शकत नाही. जीवनातील रीतिरिवाज व नीती यांचे स्थान कायदा कधीही परिणामकारक रीतीने घेऊ शकत नाही. कायदा मनुष्यावर धार्मिक व नैतिक श्रद्धा लादू शकत नाही किंवा असलेल्या श्रद्धा बदलू शकत नाही. मनुष्याची फक्त बाह्य वर्तणूक कायदा नियंत्रित करू शकतो ही कायद्याची मोठी मर्यादा आहे. म्हणून ज्या वर्तणुकीत तिच्या मागच्या भावनांना अगर मूल्यांना महत्त्व असते ती वर्तणूक कायद्याच्या द्वारे प्रभावी रीतीने नियंत्रित करता येत नाही. कायद्याची ही असमर्थता अनेक उदाहरणांवरून दृष्टोत्पत्तीस येते. हिटलर व मुसोलिनी यांच्या अधिपत्याखालील जर्मनी व इटली या देशांच्या सरकारांनी अमर्याद राज्यसत्तेच्या बळावर धार्मिक श्रद्धा व प्रचार यांसारख्या आंतरिक बाबींवर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न केले पण त्यात त्यांना अत्यंत अल्प प्रमाणात यश आले. सोव्हिएट रशियातही हीच गत झाली. तेथील सर्वाधिकारी कम्युनिस्ट सरकारने धर्माच्या प्रचारावर अतिशय कठोरपणे बंदी घातली होती. पण त्याचा विशेष उपयोग झाला नाही. रशियात धर्माचे उच्चाटन तर झाले नाहीच पण धर्मसंस्थेचे (church) पुनरुज्जीवनच झाले. तेव्हा कायद्याचे जसे सामर्थ्य असते तसे कायद्याला काही मर्यादा देखील असतात.

सारांश, आधुनिक समाजात कायद्याची दोन प्रमुख कार्ये आहेत. मनुष्याला स्थैर्य व विकासाची समान संधी देणाऱ्या मूलभूत समाजव्यवस्थेचे रक्षण करणे हे कायद्याचे पहिले कार्य आहे. तसेच कित्येकदा समाजातील व्यक्ती अगर समूह आपल्यातील हितांचा संघर्ष स्वतः मिटवू शकत नाहीत किंवा मिटविण्याचा प्रयत्न

करीत असताना इतरांच्या हितसंबंधांवर आक्रमण केल्याखेरीज राहात नाहीत. अशा वेळी विविध हितांचे समायोजन (adjustment) साधणे व संघर्ष कमी करणे हे कायद्याचे दुसरे कार्य आहे. ही दोन्ही कार्ये कायदा आधुनिक समाजात प्रभावीपणे पार पाडीत आहे. हल्लीच्या संमिश्र समाजात कायद्याचे क्षेत्र सारखे वाढत आहे व सामाजिक नियंत्रणाच्या कामात कायद्याचा उत्तरोत्तर जास्ती उपयोग होत आहे.

## ४. *धर्म व नैतिकता*

सामान्यतः धर्म आणि नैतिकता ( morality ) या दोन गोष्टी एकच आहेत अशी लोकांची समजूत असते. धर्म व नीती यांमध्यें काही फरक आहे असे लोक मानीत नाहीत. पण लोकांची ही समजूत वस्तुस्थितीला धरून नाही. धर्म व नीती एक नाहीत हे लक्षात ठेवले पाहिजे.

मानव आणि एखादी दिव्य शक्ती ( higher power ) यांच्या परस्परसंबंधांवर धर्माची उभारणी झालेली असते. दिव्य शक्तीच्या स्वरूपाविषयी जरी लोकांत मतभेद असले तरी त्या शक्तीच्या अस्तित्वाविषयी लोकांचे एकमत असते. सर्वसाधारणपणें ईश्वराच्या रूपाने ही दिव्य शक्ती ओळखली जाते. अर्थात ईश्वराच्या अंगी असलेल्या गुणसमुच्चयाविषयी लोकांत एकवाक्यता असत नाही. पण मानवापेक्षा ईश्वर असंख्य पटीने श्रेष्ठ आहे अशी सर्व लोकांची भावना असते आणि या भावनेवरच मानवाचे दिव्य शक्तीशी असलेले संबंध आधारलेले असतात. तेव्हा मानवाच्या दिव्य शक्तीशी असलेल्या संबंधाच्या कल्पनेला धर्मकल्पना असे म्हणतात व त्याला अनुलक्षून केलेल्या वर्तनाला धार्मिक वर्तन असे म्हणतात. अशा धार्मिक वर्तनाच्या नियमांचे व्यवस्थितपणें एकत्रीकरण केले की धार्मिक संहिता (religious code) तयार होते. विशेष म्हणजे धार्मिक संहिता फार विस्तृत असल्यानें मानवाच्या इतर मानवांशी येणाऱ्या संबंधांना देखील धार्मिक संहितेत स्थान असते. परंतु धर्माप्रमाणें नीतीची कल्पना असत नाही. मानवाच्या दिव्य शक्तीशी असलेल्या संबंधांच्या स्वरूपावर नीतिकल्पना आधारलेली असत नाही. मानवाचे इतर मानवांशी कोणत्या प्रकारचे संबंध असावेत याचा विचार नीतीत केलेला असतो आणि हे संबंध मानवी मूल्यांवर किंवा योग्यायोग्यतेच्या कल्पनेवर आधारलेले असतात. तेव्हा मानवांच्या एकमेकाविषयींच्या संबंधांच्या सारासार विचारावर आधारलेल्या कल्पनेला नीतिकल्पना असे म्हणतात व त्याला

अनुलक्षून केलेल्या वर्तनाला नैतिक वर्तन असे म्हणतात. अशा नैतिक वर्तनाच्या नियमांचे व्यवस्थितपणे एकत्रीकरण केले की नैतिक संहिता ( moral code ) तयार होते.

धर्म व नीती यांमध्ये फरक असल्याने धार्मिक व नैतिक नियमांचे पालन करण्याच्या मागची भूमिका समान असत नाही. ईश्वरासारख्या मानवेतर दिव्य-शक्तीशी यथायोग्य संबंध ठेवण्याची भावना धर्मपालनाच्या मागे असते. दिव्य-शक्तीच्या स्वरूपानुसार धार्मिक वर्तनाचे नियम केलेले असतात व त्यांचे लोकांकडून काटेकोरपणे पालन व्हावे अशी अपेक्षा असते. ईश्वराला काय आवडते, ईश्वराचा कोप कशाने होतो आणि ईश्वराचा कोप न होता त्याची कृपा संपादन करण्यासाठी कोणते वर्तन करावे ही भावना धार्मिक नियमांच्या पाठीशी असते. तेव्हा दिव्य-शक्तीशी सुयोग्य संबंध प्रस्थापित करणे हे धर्मपालनाचे ध्येय असते. परंतु नीति-पालनाच्या मागे ही भावना असत नाही. नैतिक नियम फक्त मानवामानवांमधील संबंधांना अनुसरून केलेले असतात व ते नियम मानवांच्या योग्यायोग्यतेच्या कल्पनांवर आधारलेले असतात. प्रत्येक व्यक्तीचा विकास व्हावा, मानवांचे परस्परांशी चांगले संबंध असावेत आणि समाजव्यवस्था सदृढ व्हावी या दृष्टि-कोणातून नैतिक नियमांची रचना केलेलीअसते. म्हणून धर्मपालन व नीतिपालन यांच्या मागे असलेल्या भावनेत तात्त्विक तफावत दिसून येते.

धर्मपालन व नीतिपालन यांच्या भूमिकेत मूलतः फरक असल्याने धार्मिक व नैतिक नियमांना असलेल्या मान्यतांमध्ये ( sanctions ) आणि धार्मिक व नैतिक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना दिल्या जाणाऱ्या शिक्षांच्या स्वरूपांमध्ये देखील फरक स्पष्टपणे आढळून येतात. धार्मिक नियमांना सर्वश्रेष्ठ अशा ईश्वराची किंवा दिव्यशक्तीची मान्यता असते. ईश्वराशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी व ईश्वराचा अनुग्रह संपादन करण्यासाठी धार्मिक नियम लोकांत रूढ झालेले असतात. साहजि-कच धार्मिक नियमांना दिव्यशक्तीचे पाठबळ आसते. धार्मिक नियमांचे योग्य प्रकारे पालन झाले नाही तर दिव्यशक्तीचा रोष होईल व त्यायोगे अनर्थ होईल अशी लोकांची प्रबळ भावना असते. म्हणून धार्मिक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना दिव्यशक्तीच्या अवकृपेमुळे या जन्मी नाही तर पुढील जन्मी भयानक त्रास भोगावा लागेल अशी भीती वाटत असते. तेव्हा धार्मिक नियमांना मान्यता देणाऱ्या दिव्यशक्तीच्या प्रचंड सामर्थ्याची कल्पना लोकांना असल्याने लोकांडून धार्मिक नियमांचे पालन होत असते. पण नैतिक नियमांच्या बाबतीत परिस्थिती वेगळी असते. नैतिक नियमांना मानवी शक्तीची मान्यता

असते. नैतिक नियम योग्यायोग्यतेच्या कल्पनेवर आधारलेले असल्याने त्यांचा दिव्यशक्तीशी संबंध येत नाही. नैतिक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांना समाजाकडून अगर मानवी शक्तीकडून शिक्षा होते. मानवी शक्तीपेक्षा दिव्यशक्ती श्रेष्ठ आहे अशी लोकांची धारणा असल्याने लोकांना दिव्यशक्तीचे भय नेहमीच जास्ती वाटते. तेव्हा धर्माला समाजातीत अशा शक्तीची मान्यता ( suprasocial sanction ) असते तर नीतीला समाजाची मान्यता ( social sanction ) असते. तसेच "दैवी कृपा" साध्य करून घेण्यासाठी धार्मिक नियम अस्तित्वात येतात तर मानवी उद्दिष्टें सफल करून घेण्यसाठी नैतिक नियम अस्तित्वात येतात. म्हणून धार्मिक नियमांचे उल्लंघन "पाप" या सदरात मोडते तर नैतिक नियमांचे उल्लंघन "गुन्हा" या सदरात मोडते. साहजिकच "पाप" करणाऱ्यांना दिव्यशक्तीकडून शिक्षा होते तर "गुन्हा" करणाऱ्यांना समाजाकडून शिक्षा होते.

समाजात धर्म व नीती यासंबंधीच्या कल्पनांच्या अस्तित्वाबाबत देखील विभिन्न परिस्थिती आढळून येण्याची शक्यता असते. कोणत्याही समाजात नीति-विषयक कल्पनांचे अस्तित्व हमखास दिसून येते. सामाजिक जीवन व्यतीत करण्यासाठी व समाजधारणेसाठी लोकांच्या वर्तनात 'योग्य' किंवा 'अयोग्य', 'चांगले' किंवा 'वाईट' असा भेद केला जातो आणि त्यानुसार नैतिक नियम बनविले जातात. साहजिकच लोकांनी समाजातील प्रचलित नैतिक नियमांबरहुकूम वर्तन करावे अशी अपेक्षा असते. तेव्हा प्रत्येक समाजात नैतिकता असतेच. पण काही समाजात धर्मविषयक कल्पनाच नसण्याची शक्यता असते. धर्मविरोधी किंवा नास्तिक लोकांच्या समाजात धर्माचे अस्तित्व असत नाही व असे काही समाज असण्याची शक्यता असते. परंतु नीतीचा विचार न करणारा असा एखादाही समाज आढळून येत नाही. म्हणून कोणत्याही समाजात निर्नैतिकता ( amorality ) असत नाही.

वरील विवेचनावरून हे स्पष्ट दिसून येईल की धर्म व नीती एक नाहीत. त्यांच्यामध्ये बऱ्याच बाबतींत तफावत आढळून येते. त्यांच्यांतील मुख्य भेद हा की धार्मिक संहितेला दैवी किंवा अलौकिक शक्तीची मान्यता असते तर नैतिक संहितेला समाजाची मान्यता असते. म्हणून दोघांनी घालून दिलेले नियम जरी समान असले तरी ते नियम पालन करण्यामागची भावना मात्र वेगळी असते. स्नान करणें आवश्यक आहे असा दोघांनी दण्डक घातला आहे. पण स्नान केल्याने आपण पवित्र होऊ व स्नान केले नाही तर आपण अपवित्र राहू या भावनेने केलेले वर्तन

हे धार्मिक वर्तन होय आणि शारीरिक स्वच्छतेसाठी व सामाजिक स्वास्थ्य टिकविण्यासाठी स्नान केले पाहिजे या भावनेने केलेले वर्तन हे नैतिक वर्तन होय. साहजिकच धार्मिक वर्तनाच्या मागे दैवी शक्ती काम करीत असते तर नैतिक वर्तनाच्या पाठीशी समाजमान्यता काम करीत असते.

धर्म व नीती यांच्या पाठीशी असलेल्या शक्तींच्या स्वरूपामध्ये जरी मूलभूत भेद असले तरी दोघांनी घालून दिलेल्या वर्तनविषयक नियमांत मात्र फारसा फरक असत नाही. धर्मप्रणीत व नीतिप्रणीत नियमांत पुष्कळदा समानता असते. सत्य बोलावे, चोरी करू नये, प्राणीमात्रांवर दया दाखवावी, प्रामाणिकपणा बाळगावा इत्यादी नैतिक नियम धार्मिक नियमांच्या सदरात देखील मोडतात. कित्येक सामाजिक व्यवहार व शिष्टाचार धार्मिक कर्मकांडासारखे गंभीर स्वरूपाचे असतात. बरेचदा धर्मप्रणीत नियम नैतिक नियमांसारखे असतात. मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्यदेवो भव यांसारखे धार्मिक नियम हे नैतिक नियम देखील आहेत. धार्मिक व नैतिक नियम यांमध्ये बरीच समानता असते. इतकेच नव्हे तर ते एकमेकांवर खूप प्रभाव पाडतात व अशा रीतीने ते नियम एकमेकांना पूरक ठरतात. नम्रता धारण करणे, वडीलधाऱ्यांची आज्ञा पालन करणे, वरिष्ठांना मान देणे यांसारखे नैतिक नियम धार्मिक नियम परिणामकारकपणे आचरणात आणण्यास मदत करतात. त्याचप्रमाणे समाजातील धार्मिक नियम नैतिक नियमांचे आचरण करण्यास साहाय्यभूत ठरतात. सर्वसाधारणपणे धार्मिक व नैतिक नियम परस्परपूरक असले तरी काही वेळेला ते परस्परविरोधी देखील असतात व त्यांच्यामध्ये संघर्ष उद्भवतो. पशुयज्ञ करावा, अस्पृश्यता पाळावी, बहुपत्नीप्रथा आचरावी यांसारखे धार्मिक नियम बऱ्याच वेळी लोकांच्या नीतिकल्पनांच्या विरुद्ध आहेत अशी लोकांची भावना होती. अर्थात धार्मिक व नैतिक नियमांमधला संघर्ष त्याच स्वरूपात कायम राहात नाही. नैतिक नियमांनुसार धार्मिक नियमांत बदल करून अगर नवीन पंथांची स्थापना करून संघर्ष मिटविण्याचा प्रयत्न केला जातो. सारांश सामाजिक गरजा लक्षात घेऊन धर्म व नीती या दोहोंमध्ये फेरफार केले जातात आणि तसे करणे आवश्यकही असते. नाहीतर समाजाचे अस्तित्व व सातत्य टिकणार नाही.

अशा रीतीने धर्म व नैतिकता यांचा लोकांच्या सामाजिक वर्तनावर खूप परिणाम होत असल्याने सामाजिक नियंत्रणाच्या कार्यात त्यांचा अतिशय महत्त्वाचा वाटा असतो.

# १७

# सामाजिक परिवर्तन

## १. सामाजिक परिवर्तनाचा अर्थ

मानव समाजाच्या इतिहासाचा विचार केला तर एक गोष्ट स्पष्टपणे प्रत्ययास येते की मानव समाज हा परिवर्तनशील समाज आहे. मानव समाजात परिवर्तनाची प्रक्रिया सदैव चालू असते. मानवांचे रीतिरिवाज, आचार, विचार, संस्था, संघटना, जीवनपद्धती इत्यादी बाबतींत सारखे बदल होत असतात. मानवाचे पूर्वीचे सामाजिक जीवन आज आढळून येत नाही आणि आजचे जीवन त्याच स्थितीत पुढील काळात पाहावयास मिळणार नाही. प्रत्येक मानवाचे आपल्याला स्थिरता ( stability ) प्राप्त व्हावी व आपल्याला सुरक्षितता किंवा निश्चितता ( security ) मिळावी म्हणून सारखे प्रयत्न चालू असतात आणि आपल्याला अक्षयता किंवा नित्यता ( permanence ) लाभावी अशी प्रत्येक समाजाची दृढ आशा असते. असे असले तरी मानव समाज केव्हाही स्थिर असत नाही. इतर गोष्टींप्रमाणे मानव समाजात देखील निरंतरपणे हमखास परिवर्तन होत असते.

मानव समाजाच्या सर्व अवस्थांमध्ये परिवर्तन सतत चालू असल्याने साहजिकच समाजातील बुद्धिमान लोकांचे परिवर्तनाच्या या घटनेचा सांगोपांग अभ्यास करण्याकडे फार पूर्वीपासून लक्ष गेले आणि आजतागायत तो अभ्यास सुरू आहे. सामाजिक परिवर्तनाचा निश्चित अर्थ काय आहे ? सामाजिक परिवर्तनाची

दिशा कोणती असते ? सामाजिक परिवर्तनाचा वेग कसा ठरविला जातो ? सामाजिक परिवर्तनाचे कोणते प्रकार संभवतात ? सामाजिक परिवर्तनाचा उद्गम कोणत्या गोष्टीत आढळून येतो ? सामाजिक परिवर्तनाला कोणती प्रबळ कारणे जबाबदार असतात ? सामाजिक परिवर्तनावर नियंत्रण ठेवता येते का ? यांसारखे अनेक प्रश्न सामाजिक परिवर्तनासंबंधी उद्भवतात आणि अशा प्रश्नांचा विचार अभ्यासकांकडून सारखा चालू आहे. परंतु या प्रश्नांचा अभ्यास करताना पुष्कळदा तत्त्वज्ञानविषयक दृष्टिकोण उपयोगात आणला जातो अगर समाजसुधारकाची भूमिका घेतली जाते. वैज्ञानिक दृष्टिकोणातून मात्र या प्रश्नांचा अजून व्हावा तसा अभ्यास झाला नाही. समाजशास्त्र हे विज्ञान असल्याने साहजिकच समाजशास्त्रात सामाजिक परिवर्तनाच्या घटनेचा वैज्ञानिक दृष्टिकोणातून अभ्यास केला जातो.

समाजशास्त्रीय अभ्यासांमध्ये 'सामाजिक परिवर्तन' ही संज्ञा निश्चित अर्थाने वापरली जाते. "मूलभूत अर्थाने, समाजरचनेतील बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन होय "[1] अशी सामाजिक परिवर्तनाची व्याख्या अमेरिकेतील समाज–शास्त्रज्ञ डॉ. हॅरी जॉन्सन यांनी केली आहे. समाजात बदल नेहमी होत असतात. पण समाजातील कोणताही बदल म्हणजे सामाजिक परिवर्तन नव्हे. समाजातील विशिष्ट बदलांनाच सामाजिक परिवर्तन म्हणतात. समाजातील ज्या बदलांमुळे समाजरचनेत ( social structure ) फरक होतो त्या बदलांना सामा–जिक परिवर्तन ही संज्ञा लावली जाते. मग ते बदल कोणत्याही प्रकारचे असले तरी चालते. मग ते बदल चांगले असोत वा वाईट असोत, योग्य असोत वा अयोग्य असोत, थोडे असोत वा जास्त असोत किंवा तात्पुरते असोत वा काय–मचे असोत. तेव्हा समाजरचनेत फरक करणाऱ्या कोणत्याही बदलाला सामाजिक परिवर्तन म्हणता येते. याचा अर्थ असा की सामाजिक परिवर्तन बदलाच्या विव–क्षित स्वरूपावर अगर प्रकारावर अवलंबून असत नाही. म्हणून सामाजिक परिवर्तन ही उदासीन संज्ञा ( neutral term ) आहे. सामाजिक परिवर्तन कोणत्याही प्रकारचे असू शकते; ते पुरोगामी वा वर्धमान ( progressive ) असेल किंवा प्रतिगामी वा ऱ्हासमान (regressive) असेल, ते स्थायी वा कायमचे (permanent) असेल किंवा अस्थायी वा हंगामी ( temporary ) असेल, ते योजनापूर्वक (planned) असेल किंवा योजनाविरहित (unplanned) असेल, ते एकदिशावर्ती

1. " In its basic sense, social change means change in social structure. "—Harry Johnson.

( unidirectional ) असेल किंवा बहुदिशावर्ती ( multidirectional ) असेल, अथवा ते उपकारक वा हितकारक (beneficial) असेल किंवा अपकारक वा हानीकारक (harmful) असेल. कोणत्याही बदलाने समाजरचनेत बदल झाला की सामाजिक परिवर्तन होते.

समाजरचनेतील बदलावर सामाजिक परिवर्तन अवलंबून असल्याने समाजरचनेत बदल कसा होतो हे लक्षात घेतले पाहिजे. " कोणत्याही वस्तूच्या विविध भागांमध्ये असलेले पुष्कळशा स्थिर स्वरूपाचे परस्परसंबंध म्हणजे त्या वस्तूची 'रचना' होय" असे 'रचने' चे वर्णन डॉ. हॅरी जॉन्सन यांनी केले आहे.[1] वस्तूचे नुसते अनेक भाग असून चालत नाही; तर त्या भागांमध्ये निश्चित स्वरूपाचे संबंध असावे लागतात व ते काही काळ तरी टिकणारे असावे लागतात. वस्तूच्या विविध भागांमध्ये असे परस्परसंबंध नसतील तर ती वस्तू स्वतंत्रपणे राहाणार नाही. दगड, विटा, चुना, लाकूड, खिळे यांसारख्या विविध भागांमध्ये विशिष्ट व स्थिर परस्परसंबंध प्रस्थापित झाले म्हणजे घर ही वस्तू तयार होते आणि कोणत्याही घराच्या विविध भागांतील असे स्थिर स्वरूपाचे परस्परसंबंध म्हणजे त्या घराची रचना होय. अशी विशिष्ट रचना झाली की घराला स्वतंत्र अस्तित्व प्राप्त होते. घराप्रमाणेच समाजाची परिस्थिती असते. व्यक्ती, समूह, संस्था यांसारखे समाजाचे विविध भाग असतात. पण केवळ हे भाग एकत्र असल्याने समाज बनत नाही. जेव्हा या भागांमध्ये विशिष्ट व्यवस्था प्रस्थापित होते किंवा या भागांमध्ये विशिष्ट व स्थिर संबंध प्रस्थापित होतात तेव्हा समाज अस्तित्वात येतो आणि अशा परस्परसंबंधांच्या एकत्रित व स्थिर स्वरूपाला समाजाची रचना असे म्हणतात. 'समाजशास्त्राचा शब्दकोश' या ग्रंथात समाजरचनेची अशी व्याख्या केली आहे. " कोणत्याही सामाजिक समूहाच्या अंतर्गत व्यवस्थेचा प्रस्थापित प्रकार म्हणजे समाज – रचना होय. समूहाच्या सदस्यांच्या परस्परांशी आणि खुद्द समूहाशी असलेल्या संबंधांच्या समुच्चयाच्या स्वरूपाचा समाजरचनेत अंतर्भाव होतो."[2] तेव्हा कोणत्याही समाजाच्या विविध भागांच्या परस्परसंबंधांच्या स्थिर स्वरूपावर त्या समाजाची रचना किंवा

---

1. "The 'structure' of anything consists of the relatively stable interrelationships among its parts. "–Harry Johnson.
2. " Social structure is the established pattern of internal organisation of any social group. It involves the character of the sum total of the relationships which exist between the members of the group with each other and with the group itself. " Floyd House.

व्यवस्था अवलंबून असते. साहजिकच समाजाच्या विविध भागांच्या परस्परसंबंधांच्या स्वरूपात बदल झाला की समाजरचनेत बदल घडून येतो व पर्यायाने सामाजिक परिवर्तन घडून येते. सामाजिक समूह अगर संस्था यासारख्या समाजाच्या भागांमध्ये जेव्हा असे बदल होतात तेव्हा सामाजिक परिवर्तन घडते. उदाहरणार्थ, जर समाजाच्या राज्यसंस्थेत एकाधिकारी राजसत्तेच्या जागी सर्वाधिकारी लोकसत्ता प्रस्थापित झाली किंवा समाजाच्या अर्थसंस्थेत भांडवलवादी अर्थव्यवस्थेच्या ऐवजी साम्यवादी अर्थव्यवस्था अस्तित्वात आली तर समाजातील लोकांच्या प्रचलित परस्पर–संबंधांच्या स्वरूपात बदल होऊन समाजरचनेत फरक पडतो व अशा रीतीने सामाजिक परिवर्तन घडून येते. म्हणून अशा स्वरूपाचे बदल सामाजिक परिवर्तनाला कारणीभूत होतात. तसेच, समाजाच्या प्रत्येक भागाची त्यातील व्यक्तींच्या दृष्टीने व संपूर्ण समाजाच्या दृष्टीने काही कार्य ( functions ) असतात. व्यक्ती, समूह, संस्था यासारख्या समाजाच्या प्रत्येक भागाला समाजात विशिष्ट भूमिका ( role ) असते आणि त्या भूमिकेशी निगडित अशी काही कार्ये असतात एखाद्या भागाने आपली कार्ये चांगल्या रीतीने केली म्हणजे त्या भागाने आपली भूमिका पार पाडली असे होते. साहजिकच कोणत्याही भागाच्या कार्यात बदल झाला तर त्याचे परिणाम समाजातील विविध भागांच्या परस्परसंबंधांवर होऊन समाजरचनेत फरक पडतो व पर्यायाने सामाजिक परिवर्तन घडून येते. उदाहरणार्थ, समाजाचा एक भाग असलेल्या विवाहसंस्थेला व्यक्तीच्या व समाजाच्या दृष्टीने काही विवक्षित कार्ये असतात. व्यक्तीच्या दृष्टीने कामवासनातृप्ती व प्रेमसंपादन यांसारखी हितकारक कार्ये विवाहसंस्थेला पार पाडावयाची असतात. तसेच प्रजोत्पादन व बालसंवर्धन यांसारखी आवश्यक कार्ये समाजाच्या दृष्टीने विवाहसंस्थेला पार पाडावयाची असतात. या कार्यात जर बदल झाला तर त्याचे परिणाम समाजातील विविध भागांच्या परस्परसंबंधांवर झाल्याखेरीज राहात नाहीत कारण समाजरचनेमुळे विविध भाग एकमेकांशी विशिष्ट तऱ्हेच्या व स्थिर स्वरूपाच्या संबंधांनी निगडित झालेले असतात तेव्हा विवाहसंस्थेच्या कार्यात फरक पडला तर त्याचे पर्यवसान सामाजिक परिवर्तनात होते. विवाह–संस्थेसारखी राज्य, धर्म, मालमत्ता यांसारख्या सामाजिक संस्थांची आणि कुल, जाती, मंडळ यांसारख्या सामाजिक समूहांची स्थिती असते. त्यांच्या विशिष्ट कार्यात बदल झाल्याने समाजरचनेवर परिणाम होऊन सामाजिक परिवर्तन घडून येते. म्हणून समाजातील विविध भागांच्या परस्परसंबंधांच्या स्वरूपात बदल झाल्याने आणि विविध भागांच्या कार्यांच्या स्वरूपात फरक पडल्याने समाजरचनेत बदल होतो व अशा रीतीने सामाजिक परिवर्तन घडून येते.

सामाजिक परिवर्तनाचा अर्थ स्पष्ट होण्यासाठी 'सामाजिक परिवर्तन' व 'सांस्कृतिक परिवर्तन' ( cultural change ) यांतील भेद लक्षात घेतला पाहिजे. सांस्कृतिक परिवर्तन ही अतिशय व्यापक संज्ञा आहे. वाङमय, विज्ञान, तंत्रविद्या, तत्वज्ञान, समाजरचना, अर्थव्यवस्था, धर्मकल्पना यांसारख्या संस्कृतीच्या कोणत्याही भागात बदल झाला म्हणजे त्या बदलास सांस्कृतिक परिवर्तन असे म्हणतात; आणि फक्त समाजरचनेत बदल झाला तर त्या बदलास सामाजिक परिवर्तन असे म्हणतात. समाजरचना हा संस्कृतीचा एक भाग असल्याने साहजिकच सामाजिक परिवर्तन हे सांस्कृतिक परिवर्तनाचा एक भाग असते. तेव्हा संस्कृतीच्या एखाद्या भागाच्या बदलामुळे जर समाजरचनेत फरक पडणार नसेल तर सांस्कृतिक परिवर्तन होईल पण सामाजिक परिवर्तन होणार नाही. उदाहरणार्थ, समाजाच्या प्रचलित भाषेच्या उच्चारणपद्धतीत बदल ( phonetic change in language ) झाला म्हणजे सांस्कृतिक परिवर्तन होते कारण भाषा ही संस्कृतीचा एक भाग आहे. पण या बदलाने समाजरचनेत कसलाही फरक पडत नसल्याने सामाजिक परिवर्तन घडून येत नाही. याच्या उलट त्या समाजात संघटित कामगारवर्गाचा उदय झाला तर मात्र या बदलाला सामाजिक परिवर्तन असे म्हणतात कारण या बदलाने समाजातील मालक व मजूर यांच्या परस्परसंबंधांत फरक पडून समाजरचनेत बदल घडून येतो. अर्थात संघटित कामगारवर्गाच्या उदयाने सामाजिक परिवर्तनाबरोबर सांस्कृतिक परिवर्तन देखील घडते. म्हणून सांस्कृतिक परिवर्तनाच्या मानाने सामाजिक परिवर्तनाची व्याप्ती अगदी मर्यादित असते. समाजरचनेत होणाऱ्या बदलांनाच फक्त सामाजिक परिवर्तन ही संज्ञा लावली जाते. सांस्कृतिक परिवर्तन व सामाजिक परिवर्तन यांमध्ये असा फरक असल्याने समाजशास्त्रज्ञ कोणत्याही सांस्कृतिक परिवर्तनाचा अभ्यास करीत नाहीत तर समाजरचनेशी संबंधित असलेल्या सांस्कृतिक परिवर्तनाचाच तेवढा अभ्यास ते करितात.

'सामाजिक परिवर्तन' व 'सामाजिक आंतरक्रिया' ( social interaction ) यांमधीलही भेद लक्षात घेतला पाहिजे. त्याखेरीज सामाजिक परिवर्तनाचा अर्थ स्पष्ट होणार नाही. कोणत्याही समाजाच्या व्यक्तींच्या मध्ये आंतरक्रिया सतत चालू असतात आणि त्या आंतरक्रिया वेगवेगळ्या प्रकारच्या असू शकतात. पण त्या आंतरक्रियांवर नियंत्रण ठेवणारी व्यवस्था–म्हणजे आंतरक्रियांचे स्वरूप व नियम यांची रचना – मात्र त्यामानाने दीर्घकाळ टिकते. जेव्हा आंतर–क्रियांची रचना अगर व्यवस्था बदलते तेव्हा सामाजिक परिवर्तन घडून येते; केवळ

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ........................ दि: ........................
क्रमांक ........................ नोंद दि: ........................



आंतरक्रियांच्या बदलाने सामाजिक परिवर्तन होत नाही. उदाहरणार्थ, समाजात एकविवाहाची प्रथा (monogamy) प्रचलित असताना कोणत्याही पुरुषाला अगर स्त्रीला एका वेळी एकाच स्त्रीशी अगर पुरुषाशी विवाह करता येतो. स्त्री-पुरुषांमधील आंतरक्रियांच्या या रचनेनुसार विवाहात एका वेळी फक्त एक पुरुष व एक स्त्री यांच्या संबंधांना अनुमती असते, पण विवाहाचे हेच जोडीदार कायम राहिले पाहिजेत असे बंधन असत नाही. पतीच्या अगर पत्नीच्या निधनाने किंवा घटस्फोट घेतल्याने विवाहाचे विवक्षित जोडीदार बदलू शकतात. अशा वेळी लग्नाचे जोडीदार बदलल्याने होणाऱ्या आंतरक्रियांच्या फरकाने सामाजिक परिवर्तन होत नाही कारण आंतरक्रियांची रचना कायम असते. पण एकविवाहाची प्रथा बदलून त्या जागी बहुविवाहाची प्रथा (polygamy) जर अस्तित्वात आली तर मात्र सामाजिक परिवर्तन घडते कारण बहुविवाहाच्या प्रथेमध्ये स्त्री–पुरुषांमधील आंतरक्रियांची रचनाच बदलते. तेव्हा सामाजिक आंतरक्रियेच्या फरकाला अनुलक्षून सामाजिक परिवर्तन हा शब्द वापरीत नहीत, तर सामाजिक आंतरक्रियांच्या नियमनात्मक व्यवस्थेतील बदलाला अनुलक्षून सामाजिक परिवर्तन ही संज्ञा उपयोगात आणली जाते.

सामाजिक परिवर्तनाचा विचार करतांना नेहमी कालावधी लक्षात घेतला पाहिजे कारण सामाजिक परिवर्तन कालसंबद्ध असते. कालावधी निर्देश केल्याचा खेरीज सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप स्पष्ट होत नाही. अमुक कालावधीत अमुक प्रकारचे सामाजिक परिवर्तन झाले असे प्रतिपादन केले म्हणजे सामाजिक परिवर्तनांचा अर्थबोध स्पष्ट होतो. विशेष म्हणजे सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करताना नेहमी दीर्घ कालावधी विचारात घेतला पाहिजे. पुष्कळदा असे होते की आज जो बदल महत्त्वाचा वाटतो तो काही कालानंतर अगदी तात्कालिक व मामुली स्वरूपाचा वाटणे शक्य असते. म्हणून सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करताना काही पिढ्या किंवा शतके यासारख्या बऱ्याच दीर्घ कालावधीच्या पार्श्वभूमीवर परिवर्तनाचा विचार करणे आवश्यक असते.

सामाजिक परिवर्तनाची सम्यक् कल्पना येण्यासाठी परिवर्तनाचा वैज्ञानिक दृष्टीने विचार करून परिवर्तनाचे विश्लेषण करणे अगत्याचे असते. सर्वसाधारणपणे सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास वर्णनात्मक स्वरूपाचा असतो; त्यामध्ये सामाजिक परिवर्तनाचे केवळ वर्णन केलेले असते पण त्याची कारणमीमांसा केली जात नाही. कित्येकदा सामाजिक परिवर्तनाच्या अभ्यासात फक्त सामान्यीकरण केलेले असते, म्हणजे परिवर्तनाच्या संबंधीचे सामान्य नियम प्रतिपादन केलेले

असतात पण त्या नियमांची सत्यासत्यता पडताळून पाहण्याचा प्रयत्न केलेला असत नाही. तेव्हा केवळ वर्णन ( description ) व केवळ सामान्यीकरण ( generalisation ) हे दोन्ही मार्ग सामाजिक परिवर्तनाच्या वैज्ञानिक अभ्यासात उपयुक्त ठरत नाहीत. म्हणून या दोन्ही मार्गांच्या मधील मार्ग काढणें आवश्यक असते. त्यासाठी सामाजिक परिवर्तनासंबंधीच्या घटना व्यवस्थितपणें संकलित करून त्यावर पडताळून पाहता येतील असे सैद्धान्तिक नियम प्रतिपादन केले पाहिजेत. याचा अर्थ असा की सामाजिक परिवर्तनाच्या घटनांचे वैज्ञानिक दृष्टिकोणातून विश्लेषण केले पाहिजे. त्याखेरीज सामाजिक परिवर्तनाचे योग्य आकलन होणार नाही.

## २. *सामाजिक परिवर्तनाची कारणे*

मानवाची जगण्यासाठी अव्याहतपणे धडपड चालू असते आणि त्याकरिता मानवाला आपल्या पर्यावरणाशी संबंध प्रस्थापित करणे अगदी आवश्यक असते. पर्यावरणावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करून व पर्यावरणात हवे ते फेरबदल करून मानव आपले जीवन व्यतीत करीत असतो. मानवाच्या पर्यावरणाशी येणाऱ्या या निकटच्या संबंधांत सामाजिक परिवर्तनाची बीजे आढळून येतात. सर्वसाधारणपणें असे म्हणता येईल की मनुष्याच्या आपल्या पर्यावरणाशी येणाऱ्या संबंधांतील प्रत्येक फरकाबरोबर त्याच्या इतर मनुष्यांशी येणाऱ्या संबधांत देखील काही तरी फरक पडतो. उदाहरणार्थ, मनुष्य आपल्या पर्यावरणाशी संबध ठेवीत असताना साध्या अवजारांच्या ऐवजी मोठ्या यंत्रांचा उपयोग करू लागला तर त्याचे पर्यावरणाशी असलेले संबंध बदलतात एवढेच नव्हे तर त्याचे इतर मनुष्यांशी असलेले संबंध सुद्धा बदलतात. साध्या अवजारांचा वापर करीत असताना मनुष्य एकटा अगर घरातील किंवा आश्रितांपैकी काही थोडचा लोकांबरोबर घरीच वस्तू निर्माण करीत असे. परंतु यंत्रांचा उपयोग सुरू झाल्यानंतर शेकडो माणसे एकत्र येऊन कारखान्यात काम करू लागली. यामुळे लोकांच्या परस्परसंबंधांत फरक पडला, श्रमविभाजनाचे तत्त्व अमलात आले, कामगार – वर्ग निर्माण झाला व नवीन उत्पादनव्यवस्था अस्तित्वात आली. बैलगाडी तयार करण्यासाठी थोडे लोक पुरतात पण मोटार, आगबोट किंवा विमान तयार करण्यासाठी विविध कामे करणारी शेकडो माणसे लागतात व त्यांचे परस्परांशी विशिष्ट संबंध असावे लागतात. तेव्हा पर्यावरणाशी येणाऱ्या संबंधांतील बदलामुळे सामाजिक परिवर्तन घडून येते.

मनुष्याच्या पर्यावरणाशी येणाऱ्या संबंधांमध्ये बाह्य परिस्थितीत बदल झाल्याने मनुष्याला सामाजिक परिवर्तन करावे लागते हे खरे. परंतु बाह्य परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यापुरतेच सामाजिक परिवर्तन मर्यादित असत नाही. नवीन परिस्थितीला अनुसरून मनुष्य आपल्या सामाजिक संबंधांत जाणीवपूर्वक बदल करून सामाजिक परिवर्तन घडवून आणीत असतो. बाह्य परिस्थितीत बदल झाल्याने यंत्रांचा प्रचार झाला तरी ती यंत्रे कशी वापरावयाची हे मनुष्य ठरवीत असतो. यंत्रे कोणालाही चालवता येतील पण तशी मुभा दिली जात नाही. यंत्रे चालविणाऱ्यांची वयोमर्यादा काय असावी, स्त्रियांनी अगर मुलांनी कोणती यंत्रे चालवू नयेत, यंत्रे ठेवलेल्या कारखान्याच्या जागेत कोणत्या सोयी असाव्यात इत्यादी बाबींविषयी हेतुपुरस्सर नियम केले जातात व यंत्रामुळे निर्माण होणाऱ्या लोकांच्या परस्परसंबंधांवर निर्बंध घातले जातात. तेव्हा पर्यावरणाशी येणाऱ्या संबंधांत साधनांचा उपयोग करण्याच्या बाबतीत जाणून बुजून निर्बंध करून सामाजिक संबंधांना वशिष्ट वळण देऊन, सामाजिक परिवर्तन घडविले जाते.

मनुष्याच्या पर्यावरणाशी येणाऱ्या संबंधांत प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष रीतीने झालेल्या बदलामुळे सामाजिक परिवर्तन सारखे घडून येत असते. पण सामाजिक परिवर्तनाच्या या कारणांखेरीज मानवाची सांस्कृतिक मूल्ये हेही सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी कारण आहे. प्रत्येक समाजाची काही मूल्ये असतात आणि या मूल्यांना अनुसरून बाह्य पर्यावरणाचा आपल्या गरजा भागविण्यासाठी योग्य रीतीने उपयोग करून घेण्याचे प्रयत्न केले जातात. यासाठी समाज आपल्या सर्व तांत्रिक साधनांचा विकास करून त्यांवर नियंत्रण ठेवीत असतो. अशा रीतीने सांस्कृतिक मूल्यांच्या प्रभावामुळे देखील सामाजिक परिवर्तन घडून येते.

सामाजिक परिवर्तन घडवून आणणाऱ्या कारणांची खालीलप्रमाणे विभागणी करता येईल. :—

(अ) भौतिक पर्यावरण ( Physical Environment ),

(ब) जैविक परिस्थिती ( Biological Conditions ),

(क) तंत्रविद्यात्मक व्यवस्था ( Technological Order ) आणि

(ड) सांस्कृतिक व्यवस्था ( Cultural Order ).

या कारणांचे स्वरूप व महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे.

### (अ) भौतिक पर्यावरण :

भौतिक पर्यावरणाचा मानवी जीवनावर सतत परिणाम होत असतो हे स्पष्ट आहे. पण या पर्यावरणातच विविध बदल होत असतात. भौगोलिक परिस्थितीमध्ये ज्वालामुखीचा उद्रेक होणे, प्रचंड पूर अगर वादळ येणे, यांसारखे आकस्मिक स्वरूपाचे बदल होत असतात. तसेच उष्णतामान, पर्जन्यमान इत्यादी बाबतीत सामयिक ( seasonal ) बदल होत असतात. शिवाय हिमयुगाची सुरवात होणे अगर त्याचा अस्त होणे, जमिनीचा पृष्ठभाग कायमचा पाण्याखाली बुडणे अगर पाण्याखालील जमीन वर येणे, नदीचा प्रवाह बदलणे यासारखे चमत्कारपूर्ण बदल देखील घडत असतात. या सर्व प्रकारच्या बदलांचा मानवावर परिणाम होणे अपरिहार्य असते. या बदलांना अनुरूप असे बदल आपल्या सामाजिक जीवनात मानवाला करावे लागतात.

भौतिक पर्यावरणाचा जसा मानवावर परिणाम होत असतो तसा मानवाचा देखील भौतिक पर्यावरणावर परिणाम होत असतो. मनुष्य आपले जीवन सुखावह होण्यासाठी भौतिक परिस्थितीवर ताबा मिळवून नैसर्गिक व इतर साधन-सामग्री आपल्याला हवी तशी उपयोगात आणण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यासाठी भौतिक परिस्थितीला अनुसरून गावे, शहरे अगर वसाहती स्थापन करीत असतो. परंतु भौतिक साधनसंपत्तीवर नियंत्रण मिळवीत असताना साधनांचा योग्य उपयोग करण्याची खबरदारी कित्येकदा घेतली जात नाही. जमिनीची सुपीकता टिकविण्याची काळजी घेतली जात नाही, नवीन झाडांची लागवड न करता जंगलांचा नाश केला जातो, महत्त्वाच्या खनिजद्रव्यांचा कसातरी उपयोग केला जातो, आणि विशेषतः साधनसंपत्ती टिकविण्याचे अगर पुनर्निर्माण करण्याचे पद्धतशीर प्रयत्न केले जात नाहीत. अशा परिस्थितीत मानवाने स्थापन केलेली गावे, वसाहती अगर राज्ये हळूहळू नामशेष होतात. प्राचीन व मध्ययुगीन इतिहासात अशा प्रकारची बरीच उदाहरणे सापडतात. या कारणांमुळेच मोहोंजदाडो व हराप्पा यांसारखी विशाल शहरे आणि बॅबिलोनिया व ॲसीरिया यासारखी राज्ये नष्ट झाली.

अशा रीतीने मानव समाज व भौतिक पर्यावरण यांचा एकमेकावर सारखा परिणाम होत असतो व त्यातूनच सामाजिक परिवर्तन घडत असते. मानवाने यंत्रयुगाला सुरुवात केली व त्याचा परिणाम मोठ्या प्रमाणावर सामाजिक परिवर्तन घडून येण्यात झाला. आता अणुयुगाला सुरुवात होत आहे आणि याही गोष्टीचे सामाजिक जीवनावर दूरगामी परिणाम झाल्याखेरीज राहाणार नाहीत.

(ब) जैविक परिस्थिती :

भौतिक पर्यावरणाप्रमाणे जैविक परिस्थितीमुळे देखील सामाजिक परिवर्तन घडून येण्यास मदत होत असते. पिढ्यानुपिढ्या मनुष्यजातीचे सातत्य टिकविणाऱ्या जैविक परिस्थितीमुळे किंवा आनुवंशिकतेच्या परिस्थितीमुळे सामाजिक परिवर्तन होत असते अत्यंत साधे जीव अगर प्राणी सोडून बाकीच्या सर्व प्राण्यांची उत्पत्ती नर व मादी यांच्या संकरणामुळे ( crossing ) किंवा अन्योन्य संमिश्रणामुळे ( intermixture ) होत असते. साहजिकच नवीन प्राण्यांमध्ये गुण व शक्ती यांचे प्रमाण समान असत नाही. म्हणून सख्ख्या भावंडांमध्ये सर्व दृष्टींनी समानता दिसून येत नाही आणि माता-पीता व त्यांची अपत्ये यांमध्ये देखील बरीच तफावत आढळून येते. कोणतेही मूल आपल्या आई-बापाशी संपूर्णपणे मिळते-जुळते असत नाही मनुष्यप्राण्यामध्ये संकरणाचा हा प्रभाव प्रकर्षाने जाणवतो. परिणामत: मनुष्यांची प्रत्येक पिढी विविध गुण व शक्ती यांच्या समुच्चयामध्ये पहिल्या पिढीपेक्षा भिन्न असते. शिवाय कनिष्ठ वर्गातील प्राण्यांप्रमाणे मनुष्यप्राण्याचे वर्तन सहजप्रवृत्तींवर ( instincts ) आधारलेले असत नाही; तर ते शिक्षणावर किंवा अनुभवावर आधारलेले असते. त्यामुळे मनुष्यप्राण्यांच्या गुणांत अगर वागणुकीत समानतेच्या ऐवजी तफावत दिसून येते. तेव्हा मनुष्य-प्राण्याच्या दोन पिढ्यांमध्ये अनेक दृष्टींनी भिन्नता दिसून येते. साहजिकच विभिन्न वर्गाच्या, वर्णाच्या व देशाच्या लोकांमध्ये संकर झाला तर भिन्नतेचे प्रमाण वाढत जाते आणि अलीकडील काळात अशा प्रकारच्या संकराची व्याप्ती सारखी वाढत आहे. म्हणून जैविक परिस्थितीतील आनुवंशिकतेच्या व संकराच्या तत्त्वांमुळे सामाजिक परिवर्तनास नेहमी साहाय्य होत असते. अर्थात कोणत्याही लहान व सजातीय समाजात ( homogeneous society ) या कारणांनी होणाऱ्या सामाजिक परिवर्तनास तितकासा वाव असत नाही, पण मोठ्या व संमिश्र समाजात ( complex society ) मात्र कितीतरी मोठ्या प्रमाणात वाव असतो.

संकरणाप्रमाणे इतर काही गोष्टींनी जैविक परिस्थितीत बदल होत असतो आणि सामाजिक परिवर्तन सुलभ होण्यास मदत होत असते. कोणत्याही समाजाच्या जनसंख्येत फरक पडत असतो आणि त्या समाजातील जन्म व मृत्य यांच्या प्रमाणांतील फरकांवर जनसंख्येतील फरक अवलंबून असतो. मृत्युप्रमाणापेक्षा जननप्रमाण जास्ती असणाऱ्या समाजाची जनसंख्या वाढत जाते आणि जननप्रमाणापेक्षा मृत्युप्रमाण जास्ती असणाऱ्या समाजाची जनसंख्या कमी होत जाते. अलीकडील काळात शास्त्रीय ज्ञानाचा व साधनांचा उपयोग करून जनन व मृत्यु

या दोहोंच्या प्रमाणांत कितीतरी वदल केला जातो. संततिनियमनाच्या कृत्रिम साधनांचा वापर करून जननप्रमाण कमी करण्यात येते आणि वाढत्या वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग करून व स्वास्थ्यरक्षणाचे उपाय योजून मृत्युप्रमाण कमी करण्यात येते. अकाली मृत्यूचे प्रमाण कमी झाल्याने माणसाचे आयुर्मान वाढते. तेव्हा जननप्रमाण व मृत्युप्रमाण या दोन्ही गोष्टींवर नियंत्रण ठेवता आल्याने समाजाच्या जनसंख्येच्या रचनेत ( composition of population ) बदल होत जातो आणि साहजिकच या बदलाचा सामाजिक परिवर्तनावर प्रभाव पडतो.

अशा रीतीने जैविक परिस्थिती देखील सामाजिक परिवर्तन घडविण्यास कारणीभूत होत असते.

### (क) तंत्रविद्यात्मक व्यवस्था :

भौतिक पर्यावरण व जैविक परिस्थिती यांचा जसा सामाजिक परिवर्तनावर प्रभाव पडतो तसा मानवाने केलेल्या कृतींतून अगर क्रियाकलापांतून (activities) निर्माण झालेल्या परिस्थितीचा देखील सामाजिक परिवर्तनावर परिणाम होत असतो. मनुष्य आपल्या गरजा भागविण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असतो आणि अशा खटपटीतून तंत्रव्यवस्था निर्माण करीत असतो. मनुष्याने उपयोगात आणलेल्या विविध प्रकारच्या तंत्रांमुळे (techniques) सामाजिक परिवर्तनाला चालना मिळत असते. अशा रीतीने सुरू झालेले सामाजिक परिवर्तन कित्येकदा अतिशय व्यापक व गहन स्वरूपाचे ठरते आणि ते मनुष्याच्या सामाजिक जीवनावर दूरगामी परिणाम करणारे ठरते. नवीन तंत्रांचा वापर सुरू करतांना मनुष्याला पुढे होणाऱ्या विशाल सामाजिक परिवर्तनाच्या व्याप्तीची पुसट कल्पना सुद्धा असत नाही पण गरजा भागविण्याच्या प्रयत्नांत नवीन तंत्रविद्या उपयोगात आणली की त्यातून सामाजिक परिवर्तनाला कल्पनातीत गती व व्यापकता प्राप्त होते. उदाहरणार्थ, स्वतःच्या काही गरजा भागविण्यासाठी मानवाने ज्यावेळी बाष्पयंत्राचा (steam engine) शोध लावून त्याचा वापर सुरू केला तेव्हा त्या यंत्राच्या संशोधकाला किंवा त्याचा उपयोग करणाऱ्या लोकांना यापासून प्रचंड सामाजिक परिवर्तन होईल अशी थोडी सुद्धा कल्पना नव्हती. पण वाफेवर चालणाऱ्या यंत्रांचा विविध कामासाठी उपयोग सुरू झाल्यापासून समाजाच्या अर्थव्यवस्थेत मूलभूत बदल झाले इतकेच नव्हे तर समाजातील जुन्या चालीरीती व प्रथा नामशेष झाल्या, जुन्या राज्यव्यवस्थेत फरक झाले आणि जुन्या धर्मकल्पना पार बदलून गेल्या. तसेच, मोटारगाडी, टेलिफोन, रेडिओ व टेलिव्हिजन यांसारख्या

तंत्रविद्येच्या शोधावर आधारलेल्या वस्तू उपयोगात आणावयास सुरवात झाली त्यावेळी या संशोधनांचा कुटुंबजीवनावर विस्तृत परिणाम होईल अशी थोडी देखील कल्पना नव्हती. पण या प्रत्येक वस्तूच्या उपयोगाचे मानवी जीवनावर अनेक दूरगामी परिणाम झाले आहेत. रेडिओचा वापर केल्यामुळे 'सकाळी व्यायाम करण्यास उत्तेजन मिळणे' यासारख्या साध्या गोष्टीपासून ते 'राष्ट्राराष्ट्रात संस्कृतीचा प्रसार होणे' यासारख्या गंभीर गोष्टीपर्यंत वेगवेगळे दीडशे परिणाम आपल्या सामाजिक जीवनावर झाले आहेत असे अमेरिकेतील प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ **प्रो. विल्यम ऑगबर्न** यांनी दाखवून दिले आहे.

तंत्रविद्येमुळे वापरात आलेल्या वस्तूंचे समाज–जीवनावर खोल परिणाम होत असले तरी अशा वस्तूंचे कोणत्याही परिस्थितीत तेच किंवा समान परिणाम होत नाहीत हे लक्षात ठेवले पाहिजे. ज्या पद्धतीने विविध सामाजिक परिस्थितींत तंत्रज्ञानावर आधारलेल्या वस्तू उपयोगात आणल्या जातात त्याच्यावर त्या वस्तूंमुळे होणारे परिणाम पुष्कळ अंशी अवलंबून असतात. रेडिओचा उपयोग करण्याच्या पद्धतीवरून असे स्पष्ट दिसून येते की जर योग्य रीतीने वापर केला तर रेडिओमुळे राष्ट्राराष्ट्रांत समजूतदारपणा व सहकार्य यांची वाढ होऊ शकते आणि युद्धपिपासू सत्ताधाऱ्यांनी आपल्या इच्छेप्रमाणे जर रेडिओचा उपयोग केला तर त्यामुळे राष्ट्राराष्ट्रांत वैमनस्य व शत्रुत्व निर्माण होते व वाढीस लागते. म्हणून तंत्रविद्येचा उपयोग करण्याच्या पद्धतीवर सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप अवलंबून असते परिवर्तनाचे स्वरूप कोणतेही असले तरी हे उघड आहे की तंत्रविद्येतील प्रगतीचे सामाजिक परिणाम हमखास होतात आणि ते परिणाम अतिशय दूरगामी व महत्त्वपूर्ण असतात. म्हणून कित्येक समाजशास्त्रज्ञ तंत्र-विद्येचा विकास हे सामाजिक परिवर्तनाचे मुख्य कारण आहे असे समजतात.

### (ड) सांस्कृतिक व्यवस्था :

तंत्रविद्येच्या विकासामुळे सामाजिक परिवर्तनाला सारखी चालना मिळत असते. तंत्रज्ञानात होणाऱ्या वेगवेगळ्या शोधांचा उपयोग सुरू केल्याने समाजातील लोकांचे रीतिरिवाज, जीवनपद्धती, परस्परसंबंध इत्यादी बाबतींत दूरगामी परिवर्तन होणे अपरिहार्य असते, म्हणून सामाजिक परिवर्तनाला साहाय्यभूत होणाऱ्या गोष्टींमध्ये तंत्रविद्येच्या उपयोगाला प्रमुख स्थान दिले जाते. पण तंत्र-विद्येचा उपयोग समाजात कसा करावयाचा हे तंत्रविद्येवर अवलंबून असत नाही तर ते समाजातील लोकांवर अवलंबून असते. समाजाची कांही मूल्ये असतात. त्याची

विशिष्ट विचारसरणी असते. समाजाचा जीवनविषयक विवक्षित दृष्टिकोण असतो. आपल्या मूल्यांना समाज अतिशय महत्त्व देत असतो आणि या मूल्यांना अनुसरूनच समाज तंत्रविद्येचा उपयोग करीत असतो. तेव्हा तंत्रविद्येचा वापर संस्कृतीतील मूल्यांवर आधारलेला असल्याने ती मूल्ये सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यास साहाय्यभूत होतात. अशा मूल्यांवरच सामाजिक परिवर्तनाचे स्वरूप अवलंबून असते. उदाहरणार्थ, औद्योगिक क्रांतीनंतर इंग्लंड, अमेरिका व रशिया या देशांनी एकाच प्रकारचे तंत्रज्ञान उपयोगात आणले. पण ते तंत्रज्ञान कशा प्रकारे उपयोगात आणावयाचे हे प्रत्येक देशाने आपल्या सांस्कृतिक मूल्यांच्या आधारे ठरविले. परिणामतः वेगवेगळ्या प्रकारचे सामाजिक परिवर्तन या देशांत घडून आले. इंग्लंड व अमेरिका या देशांत भांडवलवादी अर्थव्यवस्था अमलात आली तर रशियात साम्यवादी अर्थव्यवस्था रूढ झाली. तसेच, अणुशक्तीचे संशोधन व उत्पादन तंत्रज्ञानावर अवलंबून असते. पण अणुशक्तीचा उपयोग कसा करावयाचा हे समाजातील सांस्कृतिक मूल्ये ठरवीत असतात. भारतात अणुशक्तीचा उपयोग फक्त शांतता व मानवकल्याण ही ध्येये साधण्यासाठीच केला जातो तर चीनमध्ये संहारक कार्यासाठी त्याचा वापर केला जातो. साहजिकच अणुशक्तीच्या तंत्रज्ञानाचा या दोन देशांतील सामाजिक जीवनावर वेगवेगळा परिणाम होत आहे. उद्योगीकरण ( industrialization ) व नागरीकरण ( urbanization ) यांचीही तीच गोष्ट आहे. तंत्रज्ञानाचा उपयोग करण्याची जरूरी भासू लागल्याने विविध समाजात उद्योगीकरण व नागरीकरण करणे आवश्यक झाले. पण उद्योगीकरण व नागरीकरण यांचे स्वरूप मात्र सर्व समाजांत सारखे नाही. प्रत्येक समाजात उद्योगीकरण व नागरीकरण यांचा विकास त्या समाजातील मूल्यांच्या आधारे होत आहे. म्हणून संस्कृतीतील मूल्ये सामाजिक परिवर्तनास कारणीभूत होतात.

संस्कृतीतील ज्या मूल्यांच्या प्रभावामुळे सामाजिक परिवर्तन घडून येत असते ती मूल्ये नेहमी स्थिर असत नाहीत. संस्कृती मूलतः परिवर्तनशील असल्याने संस्कृतीतील मूल्ये सुद्धा सारखी बदलत असतात. जीवनातील बदलत्या अनुभवानुसार मूल्यांमध्ये फरक पडत असतो. प्रत्येक युगाची विशिष्ट मूल्ये असतात आणि ती मूल्ये त्या युगातील साहित्य, विचारप्रणाली व सामाजिक आंदोलन यांमधून व्यक्त होत असतात. तसेच समाजाच्या ललितकला, तत्त्वज्ञान, आदर्श इत्यादी गोष्टींतून देखील मूल्ये प्रतीत होतात. मूल्यांच्या या अभिव्यक्तींवरून हे स्पष्ट दिसून येते की मूल्ये सदैव बदलत असतात. एका पिढीतील मूल्ये पुढच्या पिढीतील लोकांना मान्य होत नाहीत. मातापित्यांना ज्या गोष्टी आवडतात त्या मुलांना आवडतीलच असे

होत नाही. शिवाय, समाजातील प्रचलित मूल्यांच्या संघर्षामुळे देखील मूल्यांमध्ये फरक पडत असतो. कोणत्याही संमिश्र समाजातील कुटुंब, वर्ग, उद्योगमंडळे, धर्ममंडळे यांसारख्या लहान व मोठ्या समूहांची मूल्ये एकमेकांपासून भिन्न असतात. एवढेच नव्हे तर परस्परविरोधी सुद्धा असतात. प्रत्येक समूह आपल्या मूल्यांचा प्रभाव कोणत्याही मार्गाने वाढावा म्हणून सतत खटपट करीत असल्याने विविध मूल्यांमध्ये संघर्ष निर्माण होतात. अशा संघर्षातून विशेष प्रभावी ठरलेली मूल्ये समाजात प्रस्थापित होत असतात. साहजिकच समाजातील मूल्ये फार काल स्थिर राहात नाहीत. तेव्हा समाजाच्या सांस्कृतिक व्यवस्थेत अशा रीतीने सारखा बदल होत असल्याने सामाजिक परिवर्तन चालू राहाणे अपरिहार्य असते.

## ३. *सामाजिक परिवर्तनातील अडथळे*

कोणत्याही समाजात सामाजिक परिवर्तनाला साहाय्यभूत गोष्टी जशा असतात तशा सामाजिक परिवर्तनात अडथळे ( obstacles ) निर्माण करणाऱ्या किंवा सामाजिक परिवर्तनाला प्रतिरोध ( resistances ) करणाऱ्या देखील काही गोष्टी असतात. सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रियेची योग्य कल्पना येण्यासाठी सामाजिक परिवर्तनात बाधा आणणाऱ्या खालील प्रमुख गोष्टी विचारात घेणे आवश्यक आहे.

### (अ) नवीन शोधांचा अभाव :--

परिवर्तन घडून येण्यासाठी नवीन गोष्टींची जरूरी असते. काही नवीन गोष्टींचा शोध आकस्मिक रीतीने लागण्याची शक्यता असते हे खरे. पण असे शोध फार थोडे असतात. शोध लावण्यासाठी विशेष संशोधन करावे लागते व मुद्दाम परिश्रम घ्यावे लागतात. अर्थात शोध लावण्याची पात्रता ज्या समाजातील लोकांमध्ये प्रकर्षाने आढळून येते त्या समाजात सामाजिक परिवर्तन घडून येणे सुलभ होते. तसेच नवीन शोध विज्ञान आणि तंत्रविद्या या क्षेत्रापुरतेच मर्यादित असत नाहीत. जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, राजनैतिक, वैचारिक, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रांत नवीन शोध लावता येतात. समाजवाद, साम्यवाद, लोकशाही, वर्गविरहित समाज, समता, यासारखे शोध लावल्याने वैज्ञानिक क्षेत्रातील शोधां-प्रमाणे परिवर्तनास मदत झाली आहे. तेव्हा ज्या समाजात शोधांचा अभाव असतो त्या समाजात परिवर्तनाला बाधा उत्पन्न होते.

### (ब) नवीन शोधांचा अस्वीकार :-

नवीन लावलेल्या शोधांचा जर समाजातील लोकांनी स्वीकार केला नाही तर त्या शोधांचा काही उपयोग होत नाही. पण सर्वसाधारणपणे असे दिसून येते की पुष्कळसे समाज नवीन शोधांचा सहजासहजी स्वीकार करीत नाहीत. एवढेच नव्हे तर नवीन विचारांना प्रखर विरोध दाखविला जातो व नवीन शोधांचा स्वीकार करण्यास तीव्र प्रतिकार केला जातो. अती उपयुक्त ठरणाऱ्या शोधांच्या बाबतीत देखील प्रतिरोध केला जातो. विविध उदाहरणांवरून ही गोष्ट प्रत्ययास येते. रोगनिर्मितीला जंतु कारणीभूत होतात हा डॉ. पाश्चर यांचा सिद्धांत आणि रक्ताभिसरणाचा डॉ. हार्वे यांचा सिद्धांत त्या काळच्या वैद्यक व्यवसायातील लोकांना देखील मान्य नव्हता व त्यांनी बराच काल स्पष्ट विरोध दर्शविला. ब्रिटिश नाविक दलात बाष्पशक्तीचा ( steam power ) उपयोग करू नये असे बिल ब्रिटिश पार्लमेंटमध्ये मांडले होते. आगगाडी, मोटारगाडी व तारायंत्र यांसारख्या नवीन उपयुक्त गोष्टी प्रथम प्रचारात आणण्यास अनेक समाजातील लोकांनी तीव्र प्रतिकार केला. सामाजिक क्षेत्रात देखील नवीन विचारांना व योजनांना बराच काल विरोध झाला आहे. स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळावा यासाठी चालू असलेल्या चळवळीला इंग्लंडमध्ये जवळ जवळ पन्नास वर्षे लोकांचा विरोध होत होता. कारखान्यांतील कामगारांच्या कामात सुधारणा होण्यास इंग्लंडमध्ये बरीच वर्षे लागली. अस्पृश्यतानिवारण, विधवाविवाह, आंतरजातीय विवाह, स्त्रीशिक्षण इत्यादी सामाजिक सुधारणाविषयींचे नवीन विचार आत्मसात करावयास हिंदूंचा कितीतरी वर्षे विरोध चालू होता. तेव्हा नवीन शोधांच्या व विचारांच्या अस्वीकाराने सामाजिक परिवर्तनात अडथळे निर्माण होतात.

### (क) परिवर्तनाविरोधी मनोवृत्ती :-

मनुष्य स्वभावतः सनातनी किंवा प्राचीनताप्रेमी ( conservative ) असतो आचार, विचार, रूढी व परंपरा यांचा जो सामाजिक वारसा मनुष्याला प्राप्त होत असतो त्याकडे तो आस्थेने व श्रद्धेने पाहात असतो. अशा प्रस्थापित रीतिरिवाजांविरुद्ध जाणाऱ्या नवीन गोष्टी आत्मसात करावयास तो सहसा तयार होत नाही. या मनोवृत्तीला बऱ्याच बाबी कारणीभूत आहेत. (अ) **सवयी** : मनुष्य हा सवयींचा गुलाम असतो त्यामुळे कोणतीही नवीन गोष्ट स्वीकार करण्याच्या आड त्याच्या सवयी येतात. ( ब ) **रूढीप्रियता** : विशेषतः वयस्कर किंवा वडील लोक सवयींच्या अगदी आधीन झालेले असल्याने ते नवीन गोष्टी विचारात घ्याव-यास देखील तयार असत नाहीत. त्यांना आपलेच आचार-विचार योग्य आहेत

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. - स्थलप्रत
अनुक्रम ............ दि: ............
क्रमांक ............


असे वाटत असल्याने त्या आचार–विचारांनाच चिकटून राहण्याची त्यांची बुद्धी बळावते. ( क ) **नवीनाची भीती** : तसेच मनुष्याला जशी जुन्या गोष्टींविषयी आत्मीयता असते तशी त्याला अगदी नवीन गोष्टींविषयी भीती सुद्धा असते. कोणतीही नवीन वस्तू कशी असेल व कसे काम देईल याविषयी मनुष्याच्या मनात नेहमी अनिश्चितता व साशंकता असते. विज्ञानाचा स्वीकार करण्याच्या बाबतीत ही वृत्ती दिसून आली. अजून देखील विमानाने प्रवास करण्याची भीती बाळगणारे कितीतरी लोक आहेत. पाश्चात्य वैद्यकातील ॲलोपथिक औषधे व इंजेक्शने घ्यावयास सुरवातीला भारतीय लोक नाखूष होते तेव्हा नूतन वस्तूंविषयी भीती मनुष्याच्या मनात वास करीत असते. (ड) **स्वार्थरक्षणाची काळजी** : प्रत्येक मनुष्याची आपल्या स्वार्थाचे रक्षण करण्याची धडपड चाललेली असते. सामान्यतः कोणत्याही प्रचलित परिस्थितीत ज्या लोकांना विशेष फायदे अधिकार अगर मानमरातब मिळत असतात ते लोक आपल्या हितसंबंधाना धक्का देणारी नवीन वस्तू अगर योजना मान्य करावयास केव्हाही तयार असत नाहीत. नवीन स्वयंचलित यंत्रांचा वापर सुरू केल्यास कामगारांची बेकारी वाढेल या भीतीने मजूरवर्ग अशा यंत्रांच्या विरुद्ध असतो. फायद्याचे प्रमाण कमी करणारे कोणतेही नवीन उपक्रम उद्योगपती सुरू करीत नाहीत. समाजवाद अगर साम्यवाद यांचा स्वीकार करू नये म्हणून भांडवलदार व जमीनदार वर्गाची सारखी खटपट चालू असते. स्वतःचे अधिकार व स्थान सुरक्षित राहावे यासाठी नवीन राजकीय व सामाजिक सुधारणांना संबंधित प्रतिष्ठित लोकांचा नेहमी कडवा विरोध होत असतो. जातिनिर्मूलन व अस्पृश्यतानिवारण या कार्यक्रमांना उच्चवर्णीय हिंदू लोक अनुकूल असत नाहीत. तेव्हा विभिन्न वर्गातील लोक स्वहितरक्षणदक्ष असल्याने त्यांची मनोवृत्ती परिवर्तनविरोधी असते.

### (ड) आर्थिक विषमता :-

समाजाची आर्थिक दुरवस्था देखील सामाजिक परिवर्तनाला बाधक ठरते. आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या समाजांना नवीन निघालेल्या तांत्रिक अगर सामाजिक शोधांचा स्वीकार करून त्यांची अंमलबजावणी करणे शक्य नसते कारण त्यासाठी लागणारे भरपूर आर्थिक बळ त्यांच्याजवळ असत नाही उद्योगधंद्यासाठी लागणारी अद्यावत पद्धतीची यंत्रसामग्री अतिशय महाग असते. 'राष्ट्रीय आरोग्य विमा योजना' ( National Health Insurance Scheme ) यासारखे नवीन सामाजिक उपक्रम अमलात आणणे अत्यंत खर्चाचे असते. अणुशक्तीचा उपयोग करावयास मोठ्या द्रव्यसाहाय्याची जरूरी असते. तेव्हा नवीन शोध लावण्यास, नवीन तंत्रांचा अवलंब करण्यास अगर सामाजिक सुधारणा घडवून आणण्यास आवश्यक

असणारा अमाप पैसा बऱ्याच समाजांत उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या सामाजिक परिवर्तनात बाधा उत्पन्न होते. भारत, ब्रह्मदेश, इंडोनेशिया यासारखे आग्नेय आशियातील देश आणि आफ्रिका व दक्षिण अमेरिका या खंडांतील देश हल्ली या परिस्थितीत असल्याने त्यांच्या सामाजिक परिवर्तनात अडथळे निर्माण होत आहेत.

(इ) शासकीय उणीवा :-

विशिष्ट राजकीय परिस्थिती सुद्धा सामाजिक परिवर्तनाला अपकारक ठरते. समाजात शांतता व सुव्यवस्था असल्याखेरीज नवीन शोध लावणे अगर नवीन उपक्रम प्रचारात आणणे शक्य होत नाही. लोकांना शांतता मिळ–ण्यासाठी सुस्थिर राज्यशासनाची आवश्यकता असते आणि अशा वाता–वरणात नवनवीन उपक्रम सुरू करणे सुलभ जाते. तसेच राज्यशासन नुसते स्थिर असून भागत नाही तर ते प्रगत असावे लागते. समाजातील सर्व शक्ती राज्यशासनात केंद्रित झालेल्या असतात. आपल्या जवळील अमर्याद सत्तेच्या बळावर नवीन कायद्यांची अमलबजावणी करून, नवीन उपक्रम सुरू करून अगर अन्य मार्गांनी राज्यशासन सामाजिक जीवनावर दूरगामी प्रभाव पाडू शकते. तेव्हा सुस्थिर व प्रगत राज्यशासन नसेल तर सामाजिक परिवर्तनात बाधा उत्पन्न होते. भारतातील राज्यशासन आग्नेय आशियातील इतर देशांच्या मानाने कितीतरी सुस्थिर व प्रगमनशील असल्याने स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारतात राजकीय परिस्थिती सामाजिक परिवर्तनाच्या आड आली नाही. भारतातील हल्लीचे राज्य-शासन सामाजिक सुधारणांना सर्वथैव अनुकूल आहे. म्हणून सामाजिक परिवर्तनात अडथळे निर्माण करणाऱ्या शासकीय उणीवा भारतात सध्या दिसून येत नाहीत.

## ४. सामाजिक परिवर्तनाची गती

कोणत्याही समाजात परिवर्तनाला अनुकूल अशा काही शक्ती अगर प्रेरणा ( forces ) असतात; तसेच परिवर्तनाला प्रतिरोध करणाऱ्या काही प्रेरणा देखील असतात हे आपण पाहिले. अशा प्रकारच्या परस्परविरोधी शक्ती प्रत्येक समाजात एका वेळी दिसून येतात. जेव्हा परिवर्तनानुकूल व परिवर्तनावरोधी शक्ती परस्परांचे निरसन करतात (cancel each other) तेव्हा समाजात स्थिरता (stability) नांदते. पण जेव्हा परिवर्तनानुकूल शक्ती जास्ती प्रभावी ठरतात तेव्हा परिवर्तनाला गती (rate) मिळते असे म्हणतात.

" परिवर्तनाची गती " (" rate of change ") हा शब्द दोन वेग–वेगळ्या संदर्भात वापरला जातो. संपूर्ण समाजाचे परिवर्तन किंवा सम आहेत

विविध भागांचे परिवर्तन अशा दोन विभिन्न संदर्भात परिवर्तनाची गती या शब्दाचा उपयोग केला जातो. पहिल्या संदर्भात गती या शब्दाने वेगवेगळ्या समाजांच्या परिवर्तनातील द्रुतता किंवा एकाच समाजाच्या वेगवेगळ्या कालातील परिवर्तनामधील द्रुतता हा अर्थ प्रतीत होतो. एकोणीसाव्या शतकात भारतापेक्षा इंग्लंडमध्ये जास्ती परिवर्तन झाले असे म्हणण्यात इंग्लंडमध्ये विशेष द्रुतगतीने परिवर्तन झाले हा अर्थ अभिप्रेत असतो. तसेच स्वतंत्र भारतात जास्ती परिवर्तन झाले या शब्दप्रयोगाने भारतात स्वातंत्र्योत्तर कालात स्वातंत्र्यपूर्व कालाच्या मानाने विशेष द्रुतगतीने परिवर्तन झाले हा अर्थ स्पष्ट होतो. दुसऱ्या संदर्भात गती या शब्दाने एकाच समाजाच्या वेगवेगळ्या भागांच्या परिवर्तनातील द्रुतता हा अर्थ प्रतीत होतो. अर्थात ही तुलना करताना विशिष्ट कालखंडाची मर्यादा घातली जाते. उदाहरणार्थ, भारतीय समाजातील परिवर्तनाचा विचार करताना ब्रिटिश अमदानीपासूनच्या काळात भारतीय समाजाच्या आर्थिक व राजकीय संस्थांमध्ये कुटुंब व धर्म या संस्थांपेक्षा जास्ती द्रुतगतीने परिवर्तन झाले असे म्हटले जाते.

वेगवेगळ्या समाजांमधील परिवर्तनाच्या गतींची तुलना करणे अतिशय कठीण असते. परंतु अशी तुलना जास्ती यथार्थ किंवा सप्रमाण ( valid ) असते कारण अशा तुलनेमध्ये एका समाजातील शासन, व्यवसाय, शिक्षण इत्यादी गोष्टींची दुसऱ्या समाजातील त्याच प्रकारच्या गोष्टींशी तुलना केलेली असते. अशा रीतीने विविध समाजांमधील परिवर्तनाच्या गतींची निश्चित कल्पना येते याच्या उलट एकाच समाजाच्या विविध भागांमधील परिवर्तनाच्या गतींची तुलना तितकीशी यथार्थ किंवा सप्रमाण असत नाही. कारण अशा तुलनेमध्ये तुलना करण्याकरिता आवश्यक असा समान आधार असत नाही. एका समाजातील राज्यशासनाची दुसऱ्या समाजातील राज्यशासनाशी तुलना करून परिवर्तनाच्या गतीची कल्पना करणे सोपे असते. पण एकाच समाजातील राज्यशासन, व्यापार, शिक्षण, दळणवळण यासारख्या कोणत्याही दोन भागांच्या प्रगतींची तुलना करून त्या समाजाच्या परिवर्तनाच्या गतीची कल्पना करता येत नाही.

## ७. *सामाजिक परिवर्तनाची दिशा*

सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करताना परिवर्तनाची दिशा विचारात घ्यावी लागते. सामाजिक परिवर्तन कोणत्याही दिशेने होऊ शकते. पण पुष्कळदा तंत्रांचा

असणारा अमाप पैसा बऱ्याच समाजांत उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या सामाजिक परिवर्तनात बाधा उत्पन्न होते. भारत, ब्रह्मदेश, इंडोनेशिया यासारखे आग्नेय आशियातील देश आणि आफ्रिका व दक्षिण अमेरिका या खंडांतील देश हल्ली या परिस्थितीत असल्याने त्यांच्या सामाजिक परिवर्तनात अडथळे निर्माण होत आहेत.

(इ) शासकीय उणीवा:-

विशिष्ट राजकीय परिस्थिती सुद्धा सामाजिक परिवर्तनाला अपकारक ठरते. समाजात शांतता व सुव्यवस्था असल्याखेरीज नवीन शोध लावणे अगर नवीन उपक्रम प्रचारात आणणे शक्य होत नाही. लोकांना शांतता मिळ–ण्यासाठी सुस्थिर राज्यशासनाची आवश्यकता असते आणि अशा वाता–वरणात नवनवीन उपक्रम सुरू करणे सुलभ जाते. तसेच राज्यशासन नुसते स्थिर असून भागत नाही तर ते प्रगत असावे लागते. समाजातील सर्व शक्ती राज्यशासनात केंद्रित झालेल्या असतात. आपल्या जवळील अमर्याद सत्तेच्या बळावर नवीन कायद्यांची अमलबजावणी करून, नवीन उपक्रम सुरू करून अगर अन्य मार्गांनी राज्यशासन सामाजिक जीवनावर दूरगामी प्रभाव पाडू शकते. तेव्हा सुस्थिर व प्रगत राज्यशासन नसेल तर सामाजिक परिवर्तनात बाधा उत्पन्न होते. भारतातील राज्यशासन आग्नेय आशियातील इतर देशांच्या मानाने कितीतरी सुस्थिर व प्रगमनशील असल्याने स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारतात राजकीय परिस्थिती सामाजिक परिवर्तनाच्या आड आली नाही. भारतातील हल्लीचे राज्य–शासन सामाजिक सुधारणांना सर्वथैव अनुकूल आहे. म्हणून सामाजिक परिवर्तनात अडथळे निर्माण करणाऱ्या शासकीय उणीवा भारतात सध्या दिसून येत नाहीत.

## ४. *सामाजिक परिवर्तनाची गती*

कोणत्याही समाजात परिवर्तनाला अनुकूल अशा काही शक्ती अगर प्रेरणा ( forces ) असतात; तसेच परिवर्तनाला प्रतिरोध करणाऱ्या काही प्रेरणा देखील असतात हे आपण पाहिले. अशा प्रकारच्या परस्परविरोधी शक्ती प्रत्येक समाजात एका वेळी दिसून येतात. जेव्हा परिवर्तनानुकूल व परिवर्तनावरोधी शक्ती परस्परांचे निरसन करतात (cancel each other) तेव्हा समाजात स्थिरता (stability) नांदते. पण जेव्हा परिवर्तनानुकूल शक्ती जास्ती प्रभावी ठरतात तेव्हा परिवर्तनाला गती (rate) मिळते असे म्हणतात.

" परिवर्तनाची गती " (" rate of change ") हा शब्द दोन वेग–वेगळ्या संदर्भात वापरला जातो. संपूर्ण समाजाचे परिवर्तन किंवा सम आहेत

विविध भागांचे परिवर्तन अशा दोन विभिन्न संदर्भात परिवर्तनाची गती या शब्दाचा उपयोग केला जातो. पहिल्या संदर्भात गती या शब्दाने वेगवेगळ्या समाजांच्या परिवर्तनातील द्रुतता किंवा एकाच समाजाच्या वेगवेगळ्या कालातील परिवर्तनामधील द्रुतता हा अर्थ प्रतीत होतो. एकोणीसाव्या शतकात भारतापेक्षा इंग्लंडमध्ये जास्ती परिवर्तन झाले असे म्हणण्यात इंग्लंडमध्ये विशेष द्रुतगतीने परिवर्तन झाले हा अर्थ अभिप्रेत असतो. तसेच स्वतंत्र भारतात जास्ती परिवर्तन झाले या शब्दप्रयोगाने भारतात स्वातंत्र्योत्तर कालात स्वातंत्र्यपूर्व कालाच्या मानाने विशेष द्रुतगतीने परिवर्तन झाले हा अर्थ स्पष्ट होतो. दुसऱ्या संदर्भात गती या शब्दाने एकाच समाजाच्या वेगवेगळ्या भागांच्या परिवर्तनातील द्रुतता हा अर्थ प्रतीत होतो. अर्थात ही तुलना करताना विशिष्ट कालखंडाची मर्यादा घातली जाते. उदाहरणार्थ, भारतीय समाजातील परिवर्तनाचा विचार करताना ब्रिटिश अमदानीपासूनच्या काळात भारतीय समाजाच्या आर्थिक व राजकीय संस्थांमध्ये कुटुंब व धर्म या संस्थांपेक्षा जास्ती द्रुतगतीने परिवर्तन झाले असे म्हटले जाते.

वेगवेगळ्या समाजांमधील परिवर्तनाच्या गतींची तुलना करणे अतिशय कठीण असते. परंतु अशी तुलना जास्ती यथार्थ किंवा सप्रमाण ( valid ) असते कारण अशा तुलनेमध्ये एका समाजातील शासन, व्यवसाय, शिक्षण इत्यादी गोष्टींची दुसऱ्या समाजातील त्याच प्रकारच्या गोष्टींशी तुलना केलेली असते. अशा रीतीने विविध समाजांमधील परिवर्तनाच्या गतींची निश्चित कल्पना येते याच्या उलट एकाच समाजाच्या विविध भागांमधील परिवर्तनाच्या गतींची तुलना तितकीशी यथार्थ किंवा सप्रमाण असत नाही. कारण अशा तुलनेमध्ये तुलना करण्याकरिता आवश्यक असा समान आधार असत नाही. एका समाजातील राज्यशासनाची दुसऱ्या समाजातील राज्यशासनाशी तुलना करून परिवर्तनाच्या गतीची कल्पना करणे सोपे असते. पण एकाच समाजातील राज्यशासन, व्यापार, शिक्षण, दळणवळण यासारख्या कोणत्याही दोन भागांच्या प्रगतींची तुलना करून त्या समाजाच्या परिवर्तनाच्या गतीची कल्पना करता येत नाही.

## ५. *सामाजिक परिवर्तनाची दिशा*

सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करताना परिवर्तनाची दिशा विचारात घ्यावी लागते. सामाजिक परिवर्तन कोणत्याही दिशेने होऊ शकते. पण पुष्कळदा

तंत्रांचा

असणारा अमाप पैसा बऱ्याच समाजांत उपलब्ध नसल्यामुळे त्यांच्या सामाजिक परिवर्तनात बाधा उत्पन्न होते. भारत, ब्रह्मदेश, इंडोनेशिया यासारखे आग्नेय आशियातील देश आणि आफ्रिका व दक्षिण अमेरिका या खंडांतील देश हल्ली या परिस्थितीत असल्याने त्यांच्या सामाजिक परिवर्तनात अडथळे निर्माण होत आहेत.

(इ) शासकीय उणीवा :-

विशिष्ट राजकीय परिस्थिती सुद्धा सामाजिक परिवर्तनाला अपकारक ठरते. समाजात शांतता व सुव्यवस्था असल्याखेरीज नवीन शोध लावणे अगर नवीन उपक्रम प्रचारात आणणे शक्य होत नाही. लोकांना शांतता मिळ—ण्यासाठी सुस्थिर राज्यशासनाची आवश्यकता असते आणि अशा वाता—वरणात नवनवीन उपक्रम सुरू करणे सुलभ जाते. तसेच राज्यशासन नुसते स्थिर असून भागत नाही तर ते प्रगत असावे लागते. समाजातील सर्व शक्ती राज्यशासनात केंद्रित झालेल्या असतात. आपल्या जवळील अमर्याद सत्तेच्या बळावर नवीन कायद्यांची अमलबजावणी करून, नवीन उपक्रम सुरू करून अगर अन्य मार्गांनी राज्यशासन सामाजिक जीवनावर दूरगामी प्रभाव पाडू शकते. तेव्हा सुस्थिर व प्रगत राज्यशासन नसेल तर सामाजिक परिवर्तनात बाधा उत्पन्न होते. भारतातील राज्यशासन आग्नेय आशियातील इतर देशांच्या मानाने कितीतरी सुस्थिर व प्रगमनशील असल्याने स्वातंत्र्योत्तर काळामध्ये भारतात राजकीय परिस्थिती सामाजिक परिवर्तनाच्या आड आली नाही. भारतातील हल्लीचे राज्य-शासन सामाजिक सुधारणांना सर्वथैव अनुकूल आहे. म्हणून सामाजिक परिवर्तनात अडथळे निर्माण करणाऱ्या शासकीय उणीवा भारतात सध्या दिसून येत नाहीत.

## ४. *सामाजिक परिवर्तनाची गती*

कोणत्याही समाजात परिवर्तनाला अनुकूल अशा काही शक्ती अगर प्रेरणा ( forces ) असतात; तसेच परिवर्तनाला प्रतिरोध करणाऱ्या काही प्रेरणा देखील असतात हे आपण पाहिले. अशा प्रकारच्या परस्परविरोधी शक्ती प्रत्येक समाजात एका वेळी दिसून येतात. जेव्हा परिवर्तनानुकूल व परिवर्तनावरोधी शक्ती परस्परांचे निरसन करतात (cancel each other) तेव्हा समाजात स्थिरता (stability) नांदते. पण जेव्हा परिवर्तनानुकूल शक्ती जास्ती प्रभावी ठरतात तेव्हा परिवर्तनाला गती (rate) मिळते असे म्हणतात.

" परिवर्तनाची गती " (" rate of change ") हा शब्द दोन वेग-वेगळ्या संदर्भात वापरला जातो. संपूर्ण समाजाचे परिवर्तन किंवा सम आहेत

विविध भागांचे परिवर्तन अशा दोन विभिन्न संदर्भात परिवर्तनाची गती या शब्दाचा उपयोग केला जातो. पहिल्या संदर्भात गती या शब्दाने वेगवेगळ्या समाजांच्या परिवर्तनातील द्रुतता किंवा एकाच समाजाच्या वेगवेगळ्या कालातील परिवर्तनामधील द्रुतता हा अर्थ प्रतीत होतो. एकोणीसाव्या शतकात भारतापेक्षा इंग्लंडमध्ये जास्ती परिवर्तन झाले असे म्हणण्यात इंग्लंडमध्ये विशेष द्रुतगतीने परिवर्तन झाले हा अर्थ अभिप्रेत असतो. तसेच स्वतंत्र भारतात जास्ती परिवर्तन झाले या शब्दप्रयोगाने भारतात स्वातंत्र्योत्तर कालात स्वातंत्र्यपूर्व कालाच्या मानाने विशेष द्रुतगतीने परिवर्तन झाले हा अर्थ स्पष्ट होतो. दुसऱ्या संदर्भात गती या शब्दाने एकाच समाजाच्या वेगवेगळ्या भागांच्या परिवर्तनातील द्रुतता हा अर्थ प्रतीत होतो. अर्थात ही तुलना करताना विशिष्ट कालखंडाची मर्यादा घातली जाते. उदाहरणार्थ, भारतीय समाजातील परिवर्तनाचा विचार करताना ब्रिटिश अमदानीपासूनच्या काळात भारतीय समाजाच्या आर्थिक व राजकीय संस्थांमध्ये कुटुंब व धर्म या संस्थांपेक्षा जास्ती द्रुतगतीने परिवर्तन झाले असे म्हटले जाते.

वेगवेगळ्या समाजांमधील परिवर्तनाच्या गतींची तुलना करणे अतिशय कठीण असते. परंतु अशी तुलना जास्ती यथार्थ किंवा सप्रमाण ( valid ) असते कारण अशा तुलनेमध्ये एका समाजातील शासन, व्यवसाय, शिक्षण इत्यादी गोष्टींची दुसऱ्या समाजातील त्याच प्रकारच्या गोष्टींशी तुलना केलेली असते. अशा रीतीने विविध समाजांमधील परिवर्तनाच्या गतींची निश्चित कल्पना येते याच्या उलट एकाच समाजाच्या विविध भागांमधील परिवर्तनाच्या गतींची तुलना तितकीशी यथार्थ किंवा सप्रमाण असत नाही. कारण अशा तुलनेमध्ये तुलना करण्याकरिता आवश्यक असा समान आधार असत नाही. एका समाजातील राज्यशासनाची दुसऱ्या समाजातील राज्यशासनाशी तुलना करून परिवर्तनाच्या गतीची कल्पना करणे सोपे असते. पण एकाच समाजातील राज्यशासन, व्यापार, शिक्षण, दळणवळण यासारख्या कोणत्याही दोन भागांच्या प्रगतींची तुलना करून त्या समाजाच्या परिवर्तनाच्या गतीची कल्पना करता येत नाही.

## ७. सामाजिक परिवर्तनाची दिशा

सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास करताना परिवर्तनाची दिशा विचारात घ्यावी लागते. सामाजिक परिवर्तन कोणत्याही दिशेने होऊ शकते. पण पुष्कळदा

तंत्रांचा

सामाजिक परिवर्तन एखाद्या विशिष्ट दिशेनें होत आहे असे गृहीत धरले जाते आणि समाजाचे उद्दिष्ट लक्षात घेऊन परिवर्तनाची दिशा ठरविली जाते. उदाहरणार्थ, आधुनिक समाजात उत्पादनवृद्धी हे एक उद्दिष्ट असतें आणि हे उद्दिष्ट साध्य करून घेण्याच्या हेतूने समाजातील तंत्रविद्येचा सतत उपयोग केला जातो. तेव्हा उत्पादन-वृद्धीच्या दिशेने परिवर्तन होत आहे असे म्हटले जातें. जर उत्पादनात वृद्धी न होता घट होऊ लागली तर परिवर्तन चालू असतें; पण ते परिवर्तन उलट दिशेने होत आहे असे म्हटले जाते. म्हणून परिवर्तनाच्या गतीचा विचार करताना परिवर्तनाची दिशा विचारात घेणे आवश्यक असतें. अर्थात सामाजिक परिवर्तनाची गती व दिशा यांचा विचार करताना विवक्षित कालावधी लक्षात घ्यावा लागतो हे उघड आहे.

सामाजिक परिवर्तनाच्या दिशेतून एक विशेष प्रश्न उद्‌भवतो की सामाजिक परिवर्तनाची दिशा कोणत्या प्रकारची असते. काही अभ्यासकांच्या मते सामाजिक परिवर्तन चक्राकार ( cyclical ) स्वरूपाचे असते तर काही अभ्यासकांच्या मते ते रेषाकार (linear) स्वरूपाचे असते. चक्राकार परिवर्तन व रेषाकार परिवर्तन अशी दोन एकांतिक मतें (extreme views) मांडली जातात. कोणत्याही घटनांची जेव्हा अगदी पूर्वीच्या सारखी परत परत आवृत्ती होतें तेव्हा चक्राकार स्वरूपाचे परिवर्तन घडतें. निसर्गात दिवस व रात्र आणि वसंत, ग्रीष्म, वर्षा, शरद, हेमंत व शिशिर यासारख्या घटना पूर्वीच्याच स्वरूपात व त्याच क्रमाने परत परत घडत असतात. सामाजिक घटनांचे स्वरूपही तसेच असते. उद्गम, विकास, ऱ्हास व नाश हा चक्राकार क्रम सामाजिक घटनांत देखील दिसून येतो. म्हणून सामाजिक परिवर्तन चक्राकार स्वरूपाचे असते अशी एक विचारसरणी आहे. याच्या अगदी विरुद्ध विचारसरणी रेषाकार परिवर्तनाची आहे. जेव्हा कोणत्याही घटनांचे एखाद्या विशिष्ट दिशनेच निरंतर परिवर्तन होत असते, या क्रमामध्ये कधीही फरक पडत नाही आणि घटना केव्हाही त्याच स्वरूपात आवृत्त होत नाहीत तेव्हा रेषाकार किंवा रेखात्मक परिवर्तन घडत असते. समाजातील कोणत्याही घटना याच क्रमाने घडत असल्याने सामाजिक परिवर्तन रेषाकार स्वरूपाचे असते अशी दुसरी विचारसरणी आहे.

चक्राकार परिवर्तन आणि रेषाकार परिवर्तन या दोन विचारसरणींपैकी कोणतीही एक विचारसरणी संपूर्णपणे यथार्थ किंवा ग्राह्य मानता येणार नाही. समाजात परिवर्तनाची प्रक्रिया विविध क्षेत्रांत निरंतरपणे चालू असते आणि हे परिवर्तन दृश्य व अदृश्य अशा दोन्ही प्रकारांचे असते. अर्थात फक्त दृश्य स्वरूपाच्या

परिवर्तनाचीच आपल्याला माहिती होत असते आणि ती माहिती देखील आपणास मर्यादित कालावधीचीच उपलब्ध असते. मानवाच्या कोटयावधी वर्षांच्या इतिहासापैकी कांही सहस्त्र वर्षांच्या इतिहासासंबंधीच आपणांस त्यामानाने संपूर्ण माहिती असते. तेव्हा मानवाच्या इतिहासाच्या एवढया तुटपुंज्या माहितीवरून सामाजिक परिवर्तन चक्राकार किंवा रेषाकार अशा एकाच स्वरूपाचे होत आहे व ते तसेच यापुढेही होत राहील असे ठामपणे प्रतिपादन करणे अतिशय कठीण आहे. तसा. सिद्धांत मांडावयास लागणारे आवश्यक ज्ञान भरपूर प्रमाणात आपणास नाही तेव्हा सामाजिक परिवर्तनाचे अंतिम स्वरूप काय आहे हा एक दार्शनिक प्रश्न होऊ शकेल. पण या प्रश्नाला सामाजिक विज्ञानात काही स्थान नाही कारण फक्त अनुभवाश्रित ज्ञानावरच विज्ञानाची उभारणी होत असते. म्हणून मानवाच्या ज्ञात इतिहासाचा विचार केला तर आपणास असे स्पष्ट दिसून येते की चक्राकार आणि रेषाकार या दोन्ही प्रकारचे सामाजिक परिवर्तन घडत आले आहे. मानवसमाजात परिवर्तनाचे चक्राकार व रेषाकार असे दोन्ही प्रकार सर्वत्र आढळून येतात. फक्त एकाच प्रकारे परिवर्तन घडून येत आहे ही विचारसरणी मान्य करता येण्यासारखी नाही.

## ६. *सामाजिक परिवर्तनाचा उगम*

सामजिक परिवर्तनाचे प्रमुख उगमस्थान (source) कोणते या विषयावर शास्त्रज्ञांमध्ये बऱ्याच कालापासून वादविवाद चालू आहे. विशेषतः सांस्कृतिक मानवशास्त्रज्ञ (cultural anthropologists) या वादात फार हिरीरीने भाग घेतात. त्यांचे दोन गट असून एक गट सामाजिक परिवर्तनाचा उगम प्रसारात (diffusion) आहे असे मानतो तर दुसऱ्या गटाचे मत सामाजिक परिवर्तनांचा उग्दम शोधात किंवा आविष्कारात (invention) सापडतो असे आहे.

प्रसारवादी शास्त्रज्ञांचे असे मत आहे की या जगात स्वतंत्र शोध फार क्वचित लागतात. म्हणून एखाद्या समाजातील प्रचलित असलेले संस्कृतीचे विविध भाग त्या समाजातील लोकांच्या आविष्कारामुळे निर्माण झालेले असत नाहीत तर ते भाग त्या समाजातील लोकांनी इतर समाजांतील लोकांपासून उचललेले असतात अशी प्रसारवाद्यांची धारणा आहे. संस्कृतीच्या भागांचा प्रसार फार पूर्वीच्या कालापासून चालू असून उसनवारीच्या मार्गाचा अवलंब करून कित्येक आदिवासी लोकांच्या समाजांनी आपली विशेष प्रगती करून घेतली आहे. न्यूझीलंड देशातील माओरी

टोळीच्या लोकांनी या मार्गाचा अवलंब करून जवळ जवळ एका शतकात स्वतःला सुसंस्कृत लोकांमध्ये स्थान मिळविले आहे. स्वतंत्र आविष्काराच्या मार्गाने प्रगतीचा पल्ला गाठण्यास प्रत्येक समाजाला जवळ जवळ हजार वर्षे लागतील. पण उसनवारीच्या मार्गाने हा कालावधी कितीतरी वर्षांनी कमी करता येतो. तेव्हा समाजातील परिवर्तनाचे मूलस्थान प्रसारात असते असा प्रसारवाद्यांचा ठाम विश्वास आहे.

पण प्रसारवाद्यांची ही भूमिका आविष्कारवाद्यांना बिलकुल मान्य नाही. संस्कृतीच्या सर्व गोष्टी लोकांनी उसनवारीनेच घेतल्या असतील हे संभवनीय वाटत नाही. दक्षिण अमेरिकेतील लोकांत आढळून येणाऱ्या संस्कृतीच्या सर्व गोष्टी संस्कृतीचे उगमस्थान समजल्या जाणाऱ्या इजिप्त देशातून हिंदुस्थान, जावा व पॉलिनेशिया मार्गे आलेल्या असल्या पाहिजेत हे प्रसारवाद्यांचे म्हणणे पटण्यासारखे नाही. स्वतंत्र शोध लावण्याची पात्रता लोकांमध्ये असते. म्हणून विविध समाजांमध्ये दिसून येणारे संस्कृतीचे विशेष त्या समाजातील लोकांनी स्वतंत्रपणे लावलेल्या शोधांतून निर्माण झालेले असतात. तेव्हा समाजातील परिवर्तनाचे मूलस्थान आविष्कारात असते अशी आविष्कारवाद्यांची धारणा आहे.

प्रसारवादी व आविष्कारवादी यांमधील हा वाद अगदी निरर्थक आहे. ज्याप्रमाणे व्यक्तिमत्त्वाच्या उभारणीविषयी पर्यावरणवादी ( environmentalists ) व आनुवंशिकतावादी ( hereditarians ) यांच्यामधील वादातून किंवा सामाजिक परिवर्तनाच्या दिशेसंबंधीच्या चक्राकार-परिवर्तनवादी व रेषाकार-परिवर्तनवादी यांच्यामधील वादातून कोणत्याही एका मताच्या बाजूने ठाम निर्णय लागत नाही त्याचप्रमाणे या सामाजिक परिवर्तनाच्या उगमस्थानाविषयीच्या वादातून देखील कोणतेही एक मत निर्णायक ठरत नाही. विविध आविष्कार कसे लागले व कोणी लावले याचा विचार केला तर असे स्पष्ट दिसून येते की अनेक लहान लहान शोध एकत्र करून एखादा मोठा शोध लागला जातो व तो शोध लावण्यास अनेक लोक कारणीभूत असतात. बाष्पयंत्र (steam engine)' दूरध्वनी ( telephone ), बिनतारी दळणवळण ( wireless ) इत्यादी अनेक शोधांचे जनकत्व नक्की कोणत्या शास्त्रज्ञाकडे जाते याविषयी वाद आहेत. अर्थात शोध अनेक शास्त्रज्ञांच्या परिश्रमाचे फळ असून शास्त्रज्ञांनी ते शोध लावताना बऱ्याच गोष्टी एकमेकांपासून घेतलेल्या असतात. तेव्हा कोणताही शोध पूर्णपणे स्वतंत्र असतो असे म्हणता येणार नाही. तीच गोष्ट प्रसाराची आहे. कोणत्याही वैशिष्ट्याचा प्रसार आहे तो आहे त्या स्वरूपात होत नाही. प्रत्येक तंत्र, कल्पना अगर

आचार एका समाजातून दुसऱ्या समाजाकडे जाताना त्याच स्थितीत राहात नाही. इतर समाजांकडून घेतलेल्या गोष्टींचा आपल्या समाजाच्या विशिष्ट वातावरणात योग्य उपयोग करता यावा म्हणून त्या गोष्टींत बदल केले जातात. तेव्हा आविष्कार व प्रसार या दोन्ही गोष्टी एकमेकात नेहमी बेमालूमपणे मिसळलेल्या असतात. म्हणून सामाजिक परिवर्तनाचा उगम या दोन्ही गोष्टीत सापडतो. कोणत्याही एका गोष्टीत तो असत नाही.

# १८

# सामाजिक नियोजन

## १. सामाजिक नियोजनाचे स्वरूप

" मनातील हेतू अगर उद्दिष्ट साध्य करण्यासाठी विवक्षित दिशेने होणारे सामाजिक–सांस्कृतिक परिवर्तन घडवून आणणारा कार्यक्रम म्हणजे नियोजन होय" अशी नियोजनाची व्याख्या अमेरिकेतील प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ डॉ. किम्बाल यंग यांनी केली आहे.[1] याचा अर्थ असा की नियोजन ही एक विशिष्ट प्रकारची क्रिया ( activity ) आहे आणि ती क्रिया सहेतुक किंवा विचारपूर्वक ( rational ) केलेली असते. नियोजनाच्या क्रियेमध्ये एखादे ध्येय साध्य करून घेण्याचा उद्देश प्रमुख असतो आणि तो उद्देश लवकर सफल होण्यासाठी विविध उपायांची आखणी केलेली असते. तेव्हा निश्चित ध्येय साध्य करण्याकरिता साधनांचा विशिष्ट रीतीने उपयोग करणारी सयुक्तिक क्रिया म्हणजे नियोजन होय. साहजिकच नियोजनाच्या क्रियेमध्ये बऱ्याच गोष्टी अंतर्भूत असतात. नियोजनामध्ये परिस्थितीचे योग्य आकलन करून घ्यावे लागते, दूरदर्शिता ( foresight ) असावी लागते आणि भविष्यकाल उज्ज्वल होण्यासाठी वर्तमान कालातील गरजांना मुरड घालण्याची नेहमी तयारी असावी लागते. या गोष्टी असल्याखेरीज नियोजन होऊ शकत नाही.

---

1. " Planning is a programme aimed at social-cultural change in a particular direction with a given aim or goal in mind." – Kimball Young.

विशेष म्हणजे या गोष्टी फक्त मानव प्राण्यांमध्येच आढळून येतात. सर्व प्राण्यांमध्ये या गोष्टी दिसून येत नाहीत कारण या गोष्टी सहजप्रेरित किंवा निसर्ग-प्रवृत्त ( instinctive ) असत नाहीत. या गोष्टी शिकून आत्मसात कराव्या लागत असल्याने त्या मानवप्राण्यांमध्येच दिसून येतात. म्हणून नियोजनाची क्रिया ही मानवप्राण्याची एक अत्यंत वैशिष्टचपूर्ण क्रिया आहे. नियोजन–प्रवृत्ती हे एक मानवाचे विशेषक लक्षण आहे. या नियोजन–प्रवृत्तीचे विवरण करताना अमेरिके–तील समाजशास्त्रज्ञ **डॉ. सम्नर व डॉ. केल्लर** यांनी आपल्या " समाज–विज्ञान " ( " The Science of Society " ) या प्रसिद्ध ग्रंथात असे म्हटले आहे की " ती ( नियोजन–प्रवृत्ती ) सहजप्रेरित नसलेल्या दूरदृष्टीतून विकसित झालेली असल्याने मनुष्याचे विभेदक लक्षण आहे. "[1]

समाजातील प्रत्येक व्यक्ती आपल्या आयुष्याचे नियोजन करीत असते. आपले ठरविलेले उद्दिष्ट साध्य करून घेण्यासाठी व्यवस्थितपणे प्रयत्नशील असते. कोणत्याही व्यक्तीने केलेल्या या प्रकारच्या क्रियांना वैयक्तिक नियो–जन ( individual planning ) असे म्हणतात. पण जेव्हा अनेक व्यक्ती एकत्र येऊन त्यांना मान्य असलेली उद्दिष्टे सफल करून घेण्यासाठी सहकारी वृत्तीने सुव्यवस्थितपणे कार्य करतात तेव्हा सामाजिक नियोजन ( social planning ) अस्तित्वात येते. म्हणून " संघटित दूरदृष्टीच्या योगाने आणि प्रचलित ज्ञान व कौशल्य यांच्या आधारे सर्वमान्य ध्येये सफल करण्याचा प्रयत्न करणे म्हणजे सामाजिक नियोजन होय " अशी सामाजिक नियोजनाची व्याख्या **डॉ. मेरिल व डॉ एल्डरेज** या समाजशास्त्रज्ञांनी केली आहे.[2] तेव्हा सामाजिक नियोजनामध्ये सामाजिक कार्यक्रम तयार करून तो अमलात आणणे हे महत्त्वाचे कार्य असते. अर्थात हा सामाजिक कार्यक्रम सर्वांशी चर्चा करून व त्यांची मते लक्षात घेऊन तयार केला जातो आणि मनुष्यांचे परस्परसंबंध सुधारावेत व त्यांच्या सामाजिक समस्या सुटाव्यात या उद्देशाने तो तयार केला जातो. कोणत्याही समाजातील व्यक्तींच्या परस्परसंबंधांची प्रचलित व्यवस्था कित्येकदा त्यातील लोकांना तितकीशी समाधानकारक वाटत नाही. म्हणून ती व्यवस्था बदलून तिच्या जागी दुसरी एखादी व्यवस्था मुद्दाम प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जातो. साहजिकच ही नवी

---

1. " It is the development of non–instinctive foresight that distinguishes the man. " – Sumner and Keller

2. " Social planning is merely organized foresight aimed at accepted goals and based on existing knowledge and skills." – Merril and Eldredge.

व्यवस्था निश्चित स्वरूपाची असते व विशिष्ट उद्देश पुढे ठेवून तयार केलेली असते. समाजातील व्यक्तींच्या परस्परसंबंधांत इष्ट ते परिवर्तन घडून यावे व सर्वांच्या सहकार्याने व्यक्तींच्या परस्परसंबंधांची नवी व्यवस्था अस्तित्वात यावी असा निश्चित दृष्टिकोण सामाजिक नियोजनाच्या मागे असतो आणि या दृष्टिकोणाला अनुलक्षून केलेले विस्तृत कार्यक्रम अमलात आणण्याचे प्रयत्न केले जातात. या सर्व प्रक्रियेला सामाजिक नियोजन असे म्हणतात. म्हणून "मानवांच्या संबंधांची व्यवस्था निर्माण करणारी आणि अन्वेषण, विवेचन व अनुमती यावर आधारलेली आंतरक्रियात्मक प्रक्रिया म्हणजे सामाजिक नियोजन होय" अशी सामाजिक नियोजनाची व्याख्या केली जाते.[1]

सामाजिक नियोजन व सामाजिक सुधारणा ( social reform ) यांची कित्येकदा गल्लत केली जाते. पण या दोन्ही संकल्पना भिन्न आहेत. सुधारणा ही नेहमी उपचारात्मक ( remedial ) असते, तर नियोजन हे निरोधक ( preventive ) असते. एखादी तापदायक समस्या निर्माण झाली म्हणजे तिची तीव्रता कशी कमी करता येईल इकडे सुधारणा लक्ष देते, तर ती समस्या निर्माण कशी होणार नाही यावर नियोजन भर देते. तसेच सुधारणा ही मूलतः दोषनिवारक ( corrective ) असते, तर नियोजन हे रचनात्मक ( constructive ) असते. लोकांमध्ये असलेले दोष काढून टाकण्याकडे सुधारणांची प्रवृत्ती असते, तर दोषविरहित नवीन गोष्टी करण्याची विधायक भूमिका नियोजन स्वीकारते. म्हणून सामाजिक नियोजन व सामाजिक सुधारणा यांमध्ये मूलभूत भेद आहेत.

सामाजिक नियोजनाची व्याप्ती ठराविक असत नाही. नियोजन विस्तृत प्रमाणावर केले जाते किंवा ते अगदी मर्यादित प्रमाणावर केले जाते. समाजाच्या आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक, तंत्रविषयक, कुटुंबविषयक, शैक्षणिक, राजकीय, नैतिक इत्यादी विविध क्षेत्रांत संपूर्ण पुनर्रचना करण्याच्या उद्देशाने अतिशय मोठ्या प्रमाणावर सामाजिक नियोजन केले जाते. तसेच सामाजिक जीवनाच्या एखाद्या भागावरच लक्ष केंद्रित करून त्या भागात इष्ट ते परिवर्तन घडवून आणण्यासाठी लहान प्रमाणावर सामाजिक नियोजन केले जाते. सामाजिक नियोजन ही एक प्रक्रिया असल्याने ती संपूर्ण समाजाला किंवा समाजाच्या ठराविक

1. " Social planning is the interactional process-investigation, discussion, agreement— of projecting order upon human relationships." – Dictionary of Sociology.

भागांना लागू करता येते. सर्वसाधारणपणे आर्थिक क्षेत्रात नियोजन करण्यावर जगातील विविध समाजांनी विशेष भर दिला असल्याने त्याच क्षेत्रात तेवढे नियोजन होऊ शकते अशी लोकांची समजूत झालेली असते. पण ही समजूत योग्य नव्हे हे उघड आहे कारण समाजाच्या कोणत्याही एक किंवा अनेक क्षेत्रांत आणि लाहान किंवा मोठ्या प्रमाण वर सामाजिक नियोजन करता येते.

सामाजिक नियोजनामध्ये जसे नियोजनाचे क्षेत्र निश्चित करावे लागते तशी नियोजनाची कालमर्यादा निश्चित करावी लागते. सामाजिक नियोजनाच्या प्रक्रियेत कालावधीचा विचार करणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे नियोजनाचे उद्दिष्ट ठरवावे लागते त्याप्रमाणे नियोजनाला लागणारा कालावधी देखील ठरवावा लागतो. नियोजन दीर्घ मुदतीचे करावयाचे की अल्प मुदतीचे करावयाचे हे आगाऊ निश्चित करावे लागते. अर्थात कोणत्याही कालमर्यादेपर्यंत नियोजन करता येते. काही शतके चालेल इतक्या दीर्घ मुदतीचे नियोजन आखणे शक्य असते. परंतु इतक्या लांब पल्ल्याचे नियोजन करणे व ते कार्यवाहीत आणणे अतिशय कठीण असल्याने अशा प्रकारच्या नियोजनाचा सहसा उपयोग होत नाही. मनुष्याच्या दृष्टीची झेप मर्यादित असल्याने त्याने अल्प कालावधीचे केलेले नियोजन यशस्वी होण्याची शक्यता जास्ती असते. म्हणून सामान्यतः सामाजिक नियोजन अल्प कालापुरतेच आखलेले असते. साधारणपणे नियोजन पंचवार्षिक किंवा दशवार्षिक असते. परंतु ही कालमर्यादा पुढे वाढविता येते. जशी नियोजनाच्या क्षेत्रांची व्याप्ती वाढविता येते तसे उत्तरोत्तर दीर्घ काल चालणारे नियोजन आखणे शक्य असते.

सामाजिक नियोजन सुसंघटित असावे लागते. विस्तृत सामाजिक योजना तयार करण्यासाठी अधिकारी व्यक्तींची आवश्यकता असते. तसेच ती योजना अमलात आणण्यासाठी वेगवेगळ्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची जरूरी असते. शिवाय नियोजन यशस्वी होण्यासाठी योजना कार्यवाहीत आणणाऱ्या लोकांना योग्य ती सत्ता देणे अगत्याचे असते. या सर्व गोष्टी करण्याकरिता सुसूत्र संघटना असावी लागते. ज्याप्रमाणे सैन्याला कार्यक्षम संघटना असावी लागते त्याचप्रमाणे नियोजन प्रभावी होण्यासाठी खास संघटनेची जरूरी असते. अर्थात अशा संघटनेचे स्वरूप ठराविक असत नाही. नियोजनासाठी लागणारी संघटना लोकशाही स्वरूपाची असू शकते किंवा ती हुकूमशाही स्वरूपाची देखील असू शकते. साहजिकच सामाजिक नियोजनाचे एकूण स्वरूप ते नियोजन तयार करून कार्यवाहीत आणणाऱ्या संघटनेच्या स्वरूपावर अवलंबून असते. म्हणून सामाजिक नियोजन लोकशाही किंवा हुकूमशाही स्वरूपाचे असते.

## २. सामाजिक नियोजनातील अडचणी

सामाजिक नियोजनाला अलीकडील काळात विविध देशांमध्ये विशेष प्राधान्य मिळालेले असले तरी सामाजिक नियोजनाची संकल्पना काही नवीन नाही. सामाजिक नियोजनाचा नवीन शोध लावला अशातला भाग नाही. मानव समाजाच्या अगदी सुरवातीपासून या ना त्या स्वरूपात सामाजिक नियोजन अस्तित्वात आहे. विशिष्ट ध्येये साध्य करण्यासाठी उपलब्ध साधनांचा योग्य रीतीने उपयोग करण्याची पद्धत फार पुरातन कालापासून मानव समाजात प्रचलित असलेली दिसून येते. सामाजिक नियोजन लोकांना पूर्वीपासूनच माहीत आहे. अलीकडील काळात मात्र वेगवेगळया क्षेत्रांत नियोजनाचा पद्धतशीर अवलंब करण्यात येत आहे. आर्थिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक आदी क्षेत्रांत नियोजनाचा फार मोठ्या प्रमाणावर उपयोग केल्याचे आढळून येते. तेव्हा नियोजन करावयाचे की नाही हा प्रश्नच उद्‌भवत नाही. सामाजिक नियोजन कोणकोणत्या क्षेत्रांत करावयाचे व किती प्रमाणात करावयाचे हा प्रश्न कोणत्याही समाजापुढे असतो आणि प्रत्येक समाज आपल्या पुरता निर्णय घेऊन नियोजन करीत असतो.

प्रत्येक समाज जरी सामाजिक नियोजन करीत असला तरी हे नियोजनाचे कार्य सोपे असत नाही. अलीकडील काळात

(अ) समाजाची समिश्रता ( complexity of society ),
(ब) सामाजिक परिवर्तनाची द्रुतता (rapidity of social change) व
(क) समाजातील लोकसंख्येची विशालता ( number of people )

या तीन परस्परसंबंधित कारणांमुळे सामाजिक नियोजनाच्या कार्यात अडचणी निर्माण होतात.

### (अ) समाजाची संमिश्रता

आधुनिक तंत्रज्ञानावर आधारलेला समाज अतिशय संकीर्ण झाला आहे. राजकीय, आर्थिक, सामाजिक आदी संस्थांचे परस्परांशी आणि प्रत्येक संस्थेचे त्यांच्या सभासदांशी इतके विविध तऱ्हेचे संबंध येतात की समाजाच्या कोणत्याही एखाद्या भागात बदल झाला तर त्याचे परिणाम समाजाच्या वेगवेगळ्या भागांवर झाल्याखेरीज राहात नाहीत. तंत्रज्ञानात सुधारणा होऊन मोटरगाडीचा शोध लागल्याने आर्थिक क्षेत्रात बरेच परिणाम झाले इतकेच नव्हे तर इतर क्षेत्रांत

...ग्रंथालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम .................. विः ..................
क्रमांक .................. नोंद दि ..................



देखील दूरगामी परिणाम घडून आले. मोटरगाडीचा उपयोग सुरू झाल्याने नगर-रचनेत बदल करावे लागले आणि राज्यशासनापुढे रहदारीचे नियंत्रण, दरोडेखोरांचा प्रतिबंध यांसारख्या नवीन समस्या निर्माण झाल्या. कुटुंबसंस्थेवर देखील मोटर-गाडीचे परिणाम झाले. मोटरगाडीमुळे प्रवासाविषयीच्या पद्धतीत बराच बदल झाल्याने कुटुंबातील सदस्य मनोरंजनासाठी कुटुंबाबाहेर जाऊ लागले आणि लोकांच्या काम-नीतिविषयक कल्पनांत ( sex mores ) कितीतरी परिवर्तन झाले. साहजिकच कुटुंबसंस्थेची रचना व कार्ये यावर परिणाम झाले. अशा रीतीने समाजाच्या एका भागात झालेल्या बदलाचे विविध सामाजिक संस्थांवर व सामाजिक मूल्यांवर महत्त्वाचे परिणाम होतात. तेव्हा आधुनिक समाजातील संमिश्रतेमुळे सामाजिक नियोजन करणे कठीण जाते.

### (ब) सामाजिक परिवर्तनाची द्रुतता

आधुनिक समाज संमिश्र आहे इतकेच नव्हे तर त्या समाजात परिवर्तनाची द्रुतता मोठ्या प्रमाणावर आढळून येते. अलीकडील काळात सामाजिक परिवर्तनाचा वेग अतिशय वाढला आहे. सामाजिक जीवनाच्या विविध क्षेत्रात सारखे बदल होत असतात. परिवर्तनाच्या प्रक्रियेची विशेष गोष्ट ही की एखाद्या क्षेत्रात झालेल्या परिवर्तनाचे परिणाम त्या क्षेत्रापुरते मर्यादित राहात नाहीत तर इतर क्षेत्रांवर देखील झालेले दिसून येतात. तंत्रज्ञानात फरक झाले की त्याचे परिणाम आर्थिक, राजकीय व सामाजिक संस्थांवर होतात आणि शेवटी सामाजिक मूल्यांवर सुद्धा परिणाम झाल्याखेरीज राहात नाहीत. जुनी जीवन-पद्धती आज उपयोगी पडत नाही. पूर्वीच्या स्वरूपातील संस्थांचा त्यांत बदल केल्याखेरीज उपयोग होत नाही. अलीकडील काळात तंत्रज्ञानात फार झपाट्याने बदल होत असल्याने सामाजिक परिवर्तनाची गती वेगाने वाढत आहे. अशा अस्थिर परिस्थितीत सामाजिक नियोजन करणे कठीण जाते.

### (क) समाजातील लोकसंख्येची विशालता

पूर्वीच्या समाजातील लोकांची संख्या लहान असे व उपलब्ध साधनसामग्री त्या मानाने भरपूर असे. त्यामुळे अशा समाजांचे नियोजन करण अवघड जात नसे. पण अलीकडील काळात मोठ्या आकारांचे समाज अस्तित्वात येत आहेत. जगातील कित्येक समाजांची लोकसंख्या गेल्या अर्ध शतकात कितीतरी वाढलेली आढळून येते. तसेच लोकसंख्यावाढीचा वेग देखील वाढत आहे. आशिया व आफ्रिका खंडांतील अविकसित देशांची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे आणि त्या

देशांतील समाजांचे आकार विशाल होत आहेत. साहजिकच अशा द्रुतगतीने वाढणाऱ्या लोकसंख्येच्या समाजांची उपलब्ध साधनसामग्री त्या मानाने वाढत नसतांना नियोजन करणे अवघड जाते. शिवाय, देशातील नागर समाज ( urban societies ) देखील संख्येने व आकाराने मोठे होत आहेत. दहा लाखाहून जास्त लोकवस्ती असलेल्या नागर समाजांच्या पाणी व वीज पुरवठा, आरोग्यरक्षण, वाहातूक व्यवस्था, शैक्षणिक सोयी इत्यादी आवश्यक गरजा भागविणे कठीण असते. तेव्हा अलीकडील काळात समाज आकाराने सारखे विशाल होत असल्याने त्यांचे नियोजन करणे अवघड जाते.

सारांश, आधुनिक समाजांत नियोजनाचे कार्य सारखे चालू आहेच. पण आधुनिक समाज विशेष संमिश्र असल्याने, त्यांतील परिवर्तनाची गती सारखी वाढत असल्याने व ते उत्तरोत्तर आकाराने विशाल होत असल्याने त्यांचे नियोजन करणे कठीण जाते. तेव्हा या अडचणी लक्षात घेऊन आधुनिक समाजांत सामाजिक नियोजन करावे लागते व तसे करण्याचे प्रयत्न विविध समाजांत केले जातात.

## ३. *सामाजिक नियोजनाचे उद्देश व तंत्र*

सामाजिक नियोजन सहेतुक आणि विचारपूर्वक करावे लागते. विशिष्ट ध्येये अगर उद्देश साध्य करून घेण्यासाठीच सामाजिक नियोजनाचा मार्ग अवलंबिला जातो. तेव्हा कोणत्या उद्देशांसाठी सामाजिक नियोजन केले जाते हा प्रश्न उद्भवतो. अर्थात या प्रश्नाचे संपूर्णपणे सर्वमान्य उत्तर सापडत नाही. पण सर्वसाधारणपणे असे म्हणता येईल की नियोजनाचा केन्द्रबिन्दु व्यक्ती असते आणि व्यक्तीचे सर्वतोपरी कल्याण ( well-being ) व्हावे या उद्देशाने नियोजनाची कास विशेषतः लोकशाही समाजात धरली जाते. व्यक्तीचे कल्याण हा समान उद्देश जरी नियोजनाचा असला तरी व्यक्तीचे कल्याण नक्की कशात सामावलेले आहे या प्रश्नाविषयी मात्र समान मते आढळून येत नाहीत. संपन्न व सर्वांगपरिपूर्ण व्यक्तिमत्त्व निर्माण करणे हे सामाजिक नियोजनाचे प्रधान ध्येय असले पाहिजे कारण त्यामुळे व्यक्तीचे खरे कल्याण साधेल असे मत समाज–तत्त्वज्ञ ( social philosopher ) व समाज–वैज्ञानिक ( social scientist ) **लेविस् मम्फर्ड** यांनी दिले आहे. तसेच सामाजिक मानसशास्त्रज्ञ (social psychologist) **लिओनार्ड डूब** यांनी असे प्रतिपादन केले आहे की व्यक्तीला कमीत कमी नैराश्य ( minimum frustration ) आणि जास्तीत जास्त परितुष्टी (maximum gratification) मिळेल असे नियोजनाचे उद्दिष्ट असले पाहिजे. प्रसिद्ध समाजवैज्ञानिक **रॉबर्ट लिंड**

यांनी आपल्या "ज्ञान कशासाठी ?" ("Knowledge for what ?") या ग्रंथात सामाजिक नियोजनाच्या उद्दिष्टांची एक यादीच दिली आहे.

या सर्व मतांच्या आधारे अमेरिकेतील समाजशास्त्रज्ञ **मेरिल व एल्डरेज** यांनी विविध संस्कृतीचे लोक ज्यांना महत्त्व देतात अशा समान मूल्यांची एक यादी तयार केली असून ती मूल्ये साध्य करून घेणे हे सामाजिक नियोजनाचे उद्देश असावे असे सुचविले आहे. त्यापैकी प्रमुख मूल्ये अशी :–

१. **भौतिक मूल्ये** : अन्न, वस्त्र, निवारा, विश्रांती व विषयवासनातृप्ती.

२. **सांस्कृतिक मूल्ये** : प्रजनन, शिक्षण, मनोरंजन, कलाविकास, तंत्रविद्या-प्रगती, व शांततामय सामाजिक परिवर्तन.

३. **सामाजिक मूल्ये** : सुरक्षा, सहयोग व स्पर्धा.

या मूल्यांपैकी कोणत्या विवक्षित मूल्यांना विशेष महत्त्व द्यावयाचे हे प्रत्येक समाज ठरवीत असतो. इंग्लंड, अमेरिका आदी देशांतील समाजात स्पर्धेला विशेष महत्त्व दिले जाते तर रशिया, चीन आदी देशांत सहयोगावर विशेष भर दिला जातो. साहजिकच कोणत्याही समाजाचे सामाजिक नियोजन करताना त्या समाजाची प्रचलित मूल्ये व त्यांना दिले जाणारे महत्त्व या गोष्टी अवश्य विचारात घेतल्या पाहिजेत. समाजातील मूल्यांचे सम्यग् आकलन न करता केलेले नियोजन यशस्वी होत नाही. तेव्हा संस्कृतीतील पारंपरिक मूल्यांच्या आधारावरच सामाजिक नियोजनाची उभारणी केली जाते.

सामाजिक नियोजनाचा नुसता विचार करून भागत नाही तर ते अमलात आणावे लागते. सामाजिक नियोजनाची प्रत्यक्ष अमलबजावणी झाल्याखेरीज त्या नियोजनाला काही अर्थ राहात नाही. म्हणून नियोजनाची पद्धती किंवा तंत्र (technique) असते. हे तंत्र सोपे वाटते पण ते प्रत्यक्षात उतरविणे अतिशय कठीण असते. नियोजनाच्या प्रक्रियेला खालील प्रमुख अवस्थांतून अगर टप्प्यांतून जावे लागते.

१. नियोजनाचे उद्देश नक्की ठरविणे.

२. या उद्देशांच्या अनुरोधाने विशिष्ट समस्यांचे सामाजिक, सांस्कृतिक आदी दृष्टिकोणांतून विश्लेषण करणे.

३. उपलब्ध कौशल्य व साधनसामग्री यांच्या आधारे त्या समस्या सोडविण्याच्या विविध उपायाची ( solutions ) तपासणी (exploration) करणे.

४. तपासणीनुसार विवक्षित धोरण ( policy ) निश्चित करणे.

५. त्या धोरणाची अमलबजावणी ( execution ) करण्यासाठी विस्तृत योजना (scheme) तयार करणे.

६. ती योजना प्रत्यक्ष कार्यवाहीत आणण्यासाठी एखादी संघटना किंवा यंत्रणा निर्माण करणे.

या अवस्थांतून गेलेले नियोजन प्रत्यक्ष अमलात आल्यानंतर कालांतराने त्यात फेरबदल करण्याची तरतूद करावी लागते. सामाजिक व तंत्रज्ञानविषयक परिस्थिती सारखी बदलत असल्याने परिस्थितीनुसार नियोजनात वेळोवेळी दुरुस्ती करणे आवश्यक असते. असे समयानुरूप फेरफार नियोजनात केल्याखेरीज नियोजन यशस्वी होणार नाही. अर्थात हे फेरबद्दल योजनेच्या कार्यवाहीसंबंधीचे असतात व कार्यवाहीच्या अंगोपांगांत करावयाचे असतात.

## ४. *सामाजिक नियोजनाची प्रगती*

पूर्व योजनेनुसार सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे कार्य सामाजिक नियोजन करीत असते. निश्चित दिशेने व ठराविक कालावधीत सामाजिक जीवनाच्या विवक्षित क्षेत्रात अगर संपूर्ण समाजात इष्ट परिवर्तन घडवून आणण्या-साठी सामाजिक नियोजनाचा उपयोग अलीकडील काळात विविध देशात करण्यात येऊ लागला आहे. सामाजिक नियोजनाचे तंत्र उत्तरोत्तर प्रगत होत आहे आणि वेगवेगळ्या क्षेत्रांत सामाजिक नियोजन करण्याची प्रवृत्ती वाढत आहे. सुधारलेल्या देशांप्रमाणे विकासशील (developing) देशांमध्ये देखील सामाजिक नियोजनाला महत्त्व मिळत आहे. आवश्यक वाटणारे कायदे करणे, शासनयंत्रणेतर्फे सक्ती करणे योग्य शिक्षण देणे लोकांचे मतपरिवर्तन करणे, इत्यादी साधनांचा (instruments) उपयोग करून सामाजिक नियोजन करण्याचे प्रयत्न आधुनिक समाजात चालू आहेत. लोकांच्या सहकार्याने पुष्कळ अंशी ते प्रयत्न यशस्वी होत आहेत. उदाहरणार्थ, अनेक देशांत सामाजिक नियोजनामुळे जनतेचे स्वास्थ्य (health) सुधारत आहे, साथीच्या रोगांचे निर्मूलन होत आहे, बालमृत्यूचे प्रमाण कमी होत आहे, लोकांचे आयुर्मान वाढत आहे व लोकसंख्येवर नियंत्रण ठेवण्यात येत आहे. या सर्व गोष्टींमुळे सामाजिक नियोजनाची जाणीव समाजाच्या सर्व थरांतील लोकांमध्ये दृढमूल होत आहे.

पुढील काळात सामाजिक नियोजन विशेष प्रभावी होण्यासाठी काही गोष्टी घडून येण्याची आवश्यकता आहे.

**१. समान जीवन–ध्येये निश्चित करणे** : समाजातील जास्तीत जास्त लोकांना मान्य होतील अशी जीवनातील ध्येये निश्चित केली पाहिजेत व या समान ध्येयांना अनुसरून सामाजिक धोरणांची किंवा कार्यप्रणालींची ( social policies ) आखणी केली पाहिजे. हल्लीची परिस्थिती मात्र तशी आढळून येत नाही. समाजातील लोकांची जीवनाच्या विविध क्षेत्रांत लिंग, वय, व्यवसाय इत्यादी बाबींवरून जशी विभागणी झाली आहे तशी त्यांच्या जीवन–ध्येयांवरून देखील विभागणी झाली आहे. लोकांच्या जीवन–ध्येयांचे लिंग, वय, व्यवसाय इत्यादी बाबींना अनुसरून प्रभेदन किंवा शकलीकरण ( segmentation ) झालेले दिसून येते. तेव्हा समावेशक स्वरूपाच्या ( inclusive ) म्हणजे सर्वांना मान्य होतील अशा प्रकारच्या जीवन–ध्येयांची नितांत आवश्यकता आहे. साहजिकच अशा समान ध्येयांवर आधारलेल्या कार्यप्रणालीनुसार होणारे सामाजिक नियोजन विशेष प्रभावी झाल्याखेरीज राहाणार नाही. अर्थात जीवनातील कोणती समान ध्येये सर्व लोकांनी निश्चित करावीत हे ठरविण्याचे काम समाजशास्त्राचे नाही. धर्म, नीतिशास्त्र किंवा तत्त्वज्ञान यांच्या आधारे लोकांची समान जीवन–ध्येये निश्चित झाली म्हणजे सामाजिक नियोजन परिणामकारक रीतीने करणे सुकर जाते

**२. समाजाचे यथार्थ आकलन करून घेणे** : सामाजिक नियोजन जास्ती प्रभावी होण्यासाठी संपूर्ण समाजाचे योग्य आकलन ( understanding ) होणे आवश्यक आहे त्यासाठी मानवी वर्तन व सामाजिक संबंध या विषयावर विशेष संशोधन व्हावयास हवे. मानवांच्या वागणुकींचे व त्यांच्या परस्पर–संबंधांचे बरेच ज्ञान समाजशास्त्रीय व इतर अभ्यासांमुळे आपणांस उपलब्ध झाले आहे हे खरे. पण त्या ज्ञानात अजून भर टाकण्याची आवश्यकता आहे लोकांच्या सामाजिक संबंधांची प्रचलित स्थिती कशी निर्माण झाली आणि या स्थितीच्या अनुरोधाने भावी काळात लोकांच्या वर्तनाची दिशा कोणत्या स्वरूपाची असेल अशा दोन दृष्टींनी संशोधन करून मानवांच्या वर्तनासंबंधीच्या आपल्या ज्ञानात भर टाकणे शक्य आहे. अशा रीतीने विशेष ज्ञान उपलब्ध झाले म्हणजे लोकांच्या वर्तनप्रकारांवर नियंत्रण ठवणे सोपे जाईल व परिणामतः सामाजिक नियोजन प्रभावी होईल.

**३. सामाजिक नियोजनाच्या साधनांचे मूल्यमापन करणे** : सामाजिक नियोजन करण्यासाठी कायदे, शासनयंत्रणा, शिक्षण, लोकमतावर परिणाम करणाऱ्या गोष्टी इत्यादी साधनांचा उपयोग करता येतो. परंतु या साधनांपैकी थोड्या साधनांचाच उपयोग केला जातो आणि तोही अगदी मर्यादित प्रमाणात. तेव्हा सामाजिक नियोजनाच्या वेगवेगळ्या साधनांविषयी सखोल विचार केला पाहिजे,

attachment– आसक्ती
attitude– अभिवृत्ती
Axiology– मूल्यमीमांसा

basis– मूलाधार
behaviour pattern–वर्तन-प्रकार
beneficial– उपकारक, हितकारक
Biology– जीवशास्त्र
biological– जीवशास्त्रीय
biological characteristics– जैव लक्षणे
biological drives– जीवसंबंधी प्रेरणा
biological evolution– जैविक विकासवाद
biological nature– जैव स्वरूप
biological potentiality– जैविक क्षमता
bio–social– जैव–सामाजिक
birth rate– जननप्रमाण, जननदर
birth rate, high– उच्च जननप्रमाण
birth rate, low– निम्न जननप्रमाण
blood bond– रक्तसंबंध
body cells– जीवपेशी
Botany– वनस्पतिविज्ञान

capacity– क्षमता
caste– ज्ञाती, जात
change– परिवर्तन
childhood– बाल्यावस्था
Church– धर्मशासन

clan– कुल
class– वर्ग
classification– वर्गीकरण
code– संहिता, नियमावली
coercion– निग्रहण
coercive– निग्रहात्मक
coherence– सुसंगतता
cohesion– संसक्ती
collection– संचय
common values– सर्वसामान्य मूल्ये
communication– संदेश व्यवहार
Communism समाजसत्तावाद
community– समुदाय
community, rural– ग्राम समुदाय
community, urban - नागर समुदाय
companion– सहचर
comparative method– तौलानिक पद्धती
competition– स्पर्धा, प्रतियोगिता
complex– संकीर्ण, संमिश्र
complicated– जटिल
compound– संयुक्त
concentration– केंद्रीकरण
concept– संकल्पना
conclusion– निष्कर्ष
condition– कारण
conditioning– अनुकूलन
conflict– संघर्ष
conservative– प्राचीनताप्रेमी
constant feature– स्थिर लक्षण
constructive– रचनात्मक

contact– संपर्क
continuity– सातत्य
continuum– सातत्यक
contract– करार
control– नियंत्रण
convention– प्रथा
co–operation– सहयोग, सहकारिता
co–ordination– समन्वय
corporate character– संस्थापित स्वरूप
corrective– दोषनिवारक
covert– अप्रकट
craze– वेड
Criminology– अपराधविज्ञान
criticism– आलोचना
crossing– संकरण
crowd– झुंड, जमाव
cumulative– संचित स्वरूपाचे
curative– परिहारक
custom– रीतिरिवाज
cyclical– चक्राकार

death rate– मृत्युप्रमाण, मृत्युदर
death rate, high– उच्च मृत्युप्रमाण
death rate low– निम्न मृत्युप्रमाण
decoration– प्रसाधन
descent– वंशपरंपरा
definite– निश्चित स्वरूपाचे
Demography- लोकविज्ञान
density– घनता
description– वर्णन
determinant– निर्धारक
determinism– निर्धारणवाद
dichotomy– द्विधाकरण
Dictatorship– हुकूमशाही
differentiation– विभेदन
diffusion– प्रसार
diffusionists– प्रसारवादी
direct– प्रत्यक्ष
discipline– अनुशासन
discomfort– अस्वस्थता
discrimination– विभेद
discussion– विवेचन
disintegration– विघटन
dissociation– वियोजन
distinctive– प्रभेदक
distinctiveness– प्रभिन्नता
doctrine– सिद्धान्त
dominance– वर्चस्व, प्राबल्य
drives– प्रेरणा
dynamic– गतिमान, गतिशील

Ecology– परिस्थितिविज्ञान
Ecology, Animal– पशु–परिस्थितिविज्ञान
Ecology, Human– मानव–परिस्थितिविज्ञान
Ecology, Plant– वनस्पति–परिस्थितिविज्ञान
Ecology, Social– समाज–परिस्थितिविज्ञान
efficiency– कार्यक्षमता
elements– घटक

elimination– लोप, निरास
emigrants– उत्प्रवासी
emotion– भावना
emotionality– भावात्मकता
empirical– अनुभवाश्रित
end– साध्य
enforcement– अमलबजावणी
enlightenment– प्रबोधन
entity – अस्तित्व
environment– पर्यावरण
environment, biological– जीवविषयक पर्यावरण
environment, composite– संमिश्र पर्यावरण
environment, cultural– सांस्कृतिक पर्यावरण
environment economic– आर्थिक पर्यावरण
environment, external– बाह्य पर्यावरण
environment, geographical– भौगोलिक पर्यावरण
environment, internal– आंतर-पर्यावरण
environment, natural– नैसर्गिक पर्यावरण
environment, physical– भौतिक पर्यावरण
environment, social– सामाजिक पर्यावरण
environmentalists– पर्यावरणवादी
Epistemology– ज्ञानमीमांसा
equilibrium– संतुलन, समतोलपणा
esprit de corps– संघभाव
ethnocentrism– स्वसमूहश्रेष्ठतावाद
Ethnology– मनुष्यजातिविज्ञान
etiquette– शिष्टाचार
evaluation– मूल्यमापन
Evolution– विकासवाद
exact– यथार्थ
exactitude– काटेकोरपणा
execution– अमलबजावणी
experiment– प्रयोग
explanation– विवरण
exploration– तपासणी
extent– सीमा, विस्तार

face to face– समोरासमोरचे
fact– घटना
fad– नाद
family– कुटुंब
family, broken– भग्न कुटुंब
family, elementary– प्रारंभिक कुटुंब
family, father-right– पितृमूलक कुटुंब
family, immediate– अव्यवहित कुटुंब
family, joint– संयुक्त कुटुंब
family, matriarchal– मातृसत्तात्मक किंवा मातृप्रधान कुटुंब
family, matrilineal– मातृवंशिक कुटुंब

family, monogamous- एकविवाही कुटुंब
family, mother-right- मातृमूलक कुटुंब
family, nuclear- केंद्र कुटुंब
family, patriarchal- पितृसत्तात्मक किंवा पितृप्रधान कुटुंब
family, patrilineal- पितृवंशिक कुटुंब
family, polyandrous- बहुपतिप्रथात्मक कुटुंब
family, polygamous- बहुविवाही कुटुंब
family, polygynous- बहुपत्नीप्रथात्मक कुटुंब
fertility- जन्मसंख्या
fines- अर्थदण्ड
folkways- लोकरूढी
force- शक्ती
foresight- दूरदर्शिता
formal- औपचारिक
formulation- सूत्रण
frustration- नैराश्य
function- कार्य
fusion- एकरूपीकरण

genealogy- वंशावळ
generality- व्यापकता
generalisation- सामान्यीकरण
Genetics- जननशास्त्र
goal- उद्देश
gratification- परितुष्टी
greetings- अभिवादन
group- समूह
guess- तर्क

harmful- अपकारक, हानीकारक
hereditarians- आनुवंशिकतावादी
hereditary- आनुवंशिक
heredity- वंशदाय, आनुवंशिकता
heterogeneity- विविधता, विजातीयता
hierarchy- उत्क्रम
homogeneity- एकविधता, सजातीयता
humanization- मानवीकरण
humanizing process- मानवीकरणाची प्रक्रिया
hypothesis- अभ्युपगम

identification- तादात्म्य
identity- अनन्यता
immaterial- अमूर्त, अभौतिक
immigrants- आप्रवासी
impartial- निःपक्षपाती
imperative- आज्ञात्मक
impersonal- व्यक्तिनिरपेक्ष
impulse- आवेग
inborn- जन्मजात
incest- कुटुंबांतर्गत व्यभिचार
inclusive- समावेशक
indirect- अप्रत्यक्ष
individualism- व्यष्टिवाद
individualistic- व्यष्टिनिष्ठ
individuality- व्यक्तित्व
individuation- व्यक्तीकरण

industrialization– उद्योगीकरण
inexact– अयथार्थ
infancy– स्तनंधयावस्था
informal– अनौपचारिक
in–group– अंतःसमूह
instinct– सहजप्रवृत्ती
instinctive– सहजप्रेरित
institution– संस्था
instrument– साधन
integration– संकलन, एकीकरण, संघटन
interaction– आंतरक्रिया
inter-relation– आंतरसंबंध
interest– हितसबंध, अभिरुची
interest group– हितसंबंधी समूह
intermixture– अन्योन्य संमिश्रता
intimacy– निकटता
invention– आविष्कार, शोध
inventionists– आविष्कारवादी
investigation– अन्वेषण
involuntary group– अनिवार्य समूह
isolation– विविक्ती, संपर्करा.हित्य

junior– अवर
Jurisprudence– विधानशास्त्र, न्यायशास्त्र
juristic– न्यायशास्त्रीय

key factor– प्रमुख घटक
kinship– आप्तसंबंध

law– कायदा
law, commou– सामान्य कायदा
law, customary– प्रथागत कायदा
law, enacted– अधिनियमित कायदा
learning capacity– शिक्षाग्रहणक्षमता
legitimacy– न्याय्य
linear– रेषाकार
locality– स्थानीयता
locus– स्थान

Macro Sociology– बृहत् समाजशास्त्र
mammals– सस्तन प्राणी
marital status– वैवाहिक स्थिती
marriage bond– विवाह–बंधन
mass phenomena– सामूहिक घटना
mass repetition– सामूहिक आवृत्ती
material– मूर्त
mating– स्त्रीपुरुषसमागम
matrilocal– मातृस्थानीय
means– साधने
means of communication– व्यवहारसाधने
mechanism– यंत्रणा
Medicine– औषधिविज्ञान
mentality– मनोवृत्ती
mentifacts– अमूर्त वस्तू
metaphysical– तात्त्विक
Methodology– रीतिविधान
Micro Sociology– सूक्ष्म समाजशास्त्र
migration– स्थानांतरण

militaristic– युद्धप्रिय
monogamy– एकविवाह
monopoly– एकाधिकार
morality– नैतिकता
mores– लोकनीती
Morphology– स्वरूपशास्त्र, आकारशास्त्र
mortality– मृत्युसंख्या
motivation– प्रेरणा
multidirectional– बहुदिशावर्ती

negative– निषेधात्मक, नकारात्मक
neurosis– मज्जाविकृती
neutral term– उदासीन संज्ञा
normative– आदर्शक
normative order– आदर्शवादी व्यवस्था, नियमनात्मक व्यवस्था
norms– नियमने
norms, private– व्यक्तिगत नियमने
norms, social– सामाजिक नियमने

obligation– कर्तव्य
observation– निरीक्षण
obstacles– अडथळे
old age– वृद्धावस्था
opinion– मत, अभिप्राय
organization– संघटन, संघटना
others group– इतरांचा समूह
out-group– बहि:समूह
overlapping– परस्परव्यापक
overt– प्रकट

parasitic– परजीवी
partial– आंशिक
particularism– विशिष्टीकरण
passive– क्रियाशून्य
Pathology– विकृतीशास्त्र
patrilocal– पितृस्थानिक
pattern– प्रकार
Penology– दण्डशास्त्र
permanence– स्थायित्व, नित्यता
permanent– स्थायी
personal– व्यक्तिगत, व्यक्तिसंबद्ध
personality– व्यक्तिमत्त्व
personnel management– कर्मचारीवर्ग-नियंत्रण
persuasion– अनुनयन
phenomenon– घटना
physical– भौतिक
Physics– पदार्थशास्त्र
Physiology– शरीरशास्त्र
plan– योजना
planned– योजनापूर्वक
planning– नियोजन
policy– धोरण
polyandry– बहुभर्तृत्व
polygamy– बहुविवाह
polygyny– बहुपत्नीत्व
population– लोकसंख्या, जीवसंख्या
population, density of– लोकसंख्येची घनता
population, distribution of– लोकसंख्येची विभागणी

population, dynamics of– लोकसंख्येची गतिशीलता
population, quality of– लोकसंख्येचे स्वरूप
population, quantity of– लोकसंख्येचे परिमाण
population, stationary– स्थिर लोकसंख्या
positive– निश्चयात्मक, सकारात्मक
possible– संभाव्य
predatory– परभक्षी
prediction– पूर्वकथन
predisposition– पूर्ववृत्ती
prejudice– पूर्वग्रह
prestige– प्रतिष्ठा
prevention– प्रतिबंध
preventive– निरोधक
primary– प्राथमिक
primate– द्विहस्तक सस्तन प्राणी
priority– अग्रता
problem– समस्या
process– प्रक्रिया
procreation– प्रजनन
progressive– पुरोगामी
propensity– प्रवृत्ती
proposition– प्रस्ताव
provisional– अनन्तिम
proximity– सान्निध्य, सामीप्य
puberty rites– यौवनारंभ विधी

quality– स्वरूप
quantity– परिमाण
quasi-group– समूह-कल्प

race– वंश
rapidity– द्रुतता
rate– गती
rational– सहेतुक, विवेकपूर्वक
reaction– प्रतिक्रिया
reciprocal– अन्योन्य, पारस्परिक
reciprocity– पारस्परिकता
reform– सुधारणा
regressive– प्रतिगामी
regularity– नियमितता
regulation– नियमन
rejection– परित्याग
relationship– संबंध
remedial– उपचारात्मक
reproduction– जनन
Reproductive Physiology– जननक्रियाविज्ञान
resistance– प्रतिरोध
responsibility– उत्तरदायित्व
restraint– संयमन
result – निष्पत्ती
reward– पुरस्कार
rights– अधिकार, हक्क
role– भूमिका

sacrament– संस्कार
salesmanship– विक्रयकला
sanction– मान्यता
scheme– योजना
science– विज्ञान
science, cumulative– संचितस्वरूपाचे विज्ञान
science, empirical– अनुभवाश्रित विज्ञान

science, exact– यथार्थ विज्ञान
science, general– सामान्य विज्ञान
science, inexact– अयथार्थ विज्ञान
science, natu al– नैसर्गिक विज्ञान
science, normative– आदर्शक विज्ञान
science, physical– भौतिक विज्ञान
science, positive– वास्तविक विज्ञान
science, social– सामाजिक विज्ञान
science, special– विशिष्ट विज्ञान
science, synoptic– साररूप विज्ञान
science, theoretical– सैद्धान्तिक विज्ञान
seasonal– सामयिक
secondary– दुय्यम
secular– धर्मनिरपेक्ष
security– सुरक्षितता
segmentation– प्रभेदन, शकलीकरण
segregation– वियोजन
selection– वरण, चयन
selectivity– चयनात्मकता
self–sufficient– स्वयंपूर्ण
senior– प्रवर
sentiment– मनोभाव
sequence– क्रम
sex-life– कामजीवन
sex–ratio स्त्रीपुरुषप्रमाण
sex–mores– कामविषयक लोकनीती
sexual behav.our– कामवृत्ती
sexuality– कामुकता
situation– स्थिती
skills– कौशल्य
social awareness– सामाजिक चेतना
social change– सामाजिक परिवर्तन
social differentiation– सामाजिक भेदीकरण
social distance– सामाजिक अंतर
social disturbance– सामाजिक क्षोभ
social efficiency– सामाजिक कार्यक्षमता
social evolution– सामाजिक विकासवाद
social facts– सामाजिक वस्तू अगर घटना
social group– सामाजिक समूह
social integration– सामाजिक एकीकरण
Socialism– समाजवाद
socialization– समाजीकरण
social maladjustment– सामाजिक विषमायोजन
social milieu– सामाजिक वातावरण
social mobility– सामाजिक गतिशीलता

social policy– सामाजिक धोरण अगर कार्यप्रणाली
social problem– सामाजिक समस्या
social species– सामाजिक स्वरूपाचे प्राणी
social stratification– सामाजिक स्तररचना
social structure– समाज–रचना
social thought– समाजविषयक विचार
social welfare– समाजकल्याण
social work– समाजकार्य
societal needs– समाजविषयक गरजा
society– समाज
socio–economic structure– समाज–अर्थ–रचना
solidarity– ऐक्यभाव
source– उगमस्थान
spatial– क्षेत्रीय
specialization– विशिष्टीकरण
species– प्राणिवर्ग
spiritual– अध्यात्मिक
spontaneous– स्वतःप्रेरित
stability– स्थिरता
standardized– समस्वरूपी
standard of living– जीवनमान
statement– विधान
static– स्थिर
Statistics– संख्याशास्त्र
status– दर्जा
status, achieved– मिळविलेला दर्जा
status, ascribed– मिळालेला दर्जा
status, social– सामाजिक दर्जा
stimulus– उद्दीपन
structure– रचना
subjective– मानसिक
substitution– प्रतिनिवेशन
suggestion– सूचन
supernatural– अतिभौतिक, अलौकिक
supra social– समाजातीत
survey– पाहणी
survival– टिकाव
symbiotic– अन्योन्यपोषक
symbol– संकेत, प्रतीक
symbolic– सांकेतिक
synoptic– समालोचक
synthesis– संयोजन
system– व्यवस्था

taboos– वर्ज्यवस्तू, निषिद्धवस्तू
technique– तंत्र, क्रियाविधी
technology– तंत्रविद्या
temperament– स्वभावधर्म, प्रकृतिधर्म
temporary– अस्थायी
tendency– प्रवृत्ती
tension– ताण
tentative– तात्पुरते
term– संज्ञा
theological– आधिदैविक
theoretical– सैद्धान्तिक
theory– सिद्धान्त

therapeutic– चिकित्सात्मक
topography– भूप्रकृती
totality– समष्टी
tradition– परंपरा
traditional– परंपरागत, पारंपरिक
trait– लक्षण
transferable– संक्रमणीय
transitory– क्षणिक
transmission– संक्रामण, संचारण
transmutation– रूपांतरकरण
traumatic– आघातजन्य
tribe– टोळी
typical– प्रातिनिधिक

ultimate values– चरम मूल्ये
understanding– आकलन
unidirectional– एकदिशावर्ती
uniform– समान
unique– अनन्य
unity– एकता
universal– सार्वत्रिक
universality– सार्वत्रिकता
unplanned– योजनाविरहित
urban– नागर
urbanization– नागरीकरण

variation– परिवर्तन
verification– पडताळा
volume– परिमाण
voluntary group– ऐच्छिक समूह

we–feeling– आत्मीय भावना
we–group– आमचा समूह
well–being– कल्याण

zone–wise– विभागवार
Zoology– प्राणिविज्ञान

परिशिष्ट २

# पारिभाषिक शब्दसंग्रह

## मराठी – इंग्रजी

अग्रता– priority
अडथळे– obstacles
अतिभौतिक– supernatural
अधिकार– rights
अध्यात्मिक– spiritual
अनन्तिम– provisional
अनन्य– unique
अनन्यता– identity
अन्योन्य– reciprocal
अन्योन्यपोषक– symbiotic
अन्योन्य संमिश्रता– intermixture
अन्वेषण– investigation
अनिवार्य समूह– involuntary group
अनुकूलन– adaptation, conditioning
अनुकूलनीयता– adaptability
अनुनयन– persuasion
अनुभवाश्रित– empirical
अनुमती– agreement
अनुशासन– discipline
अनौपचारिक– informal
अपकारक– harmful
अपराधविज्ञान– Criminology
अप्रकट– covert
अप्रत्यक्ष– indirect

अभ्यनुकूलन– adaptation
अभ्युपगम– hypothesis
अभिप्राय– opinion
अभिरुची– interest
अभिवादन– greetings
अभिवृत्ती– attitude
अभौतिक– immaterial
अमलबजावणी– enforcement, execution
अमूर्त– immaterial
अमूर्त वस्तू– mentifacts
अयथार्थ– inexact
अर्थदण्ड– fines
अलौकिक– supernatural
अवर– junior
अस्तित्व– entity
अस्थायी– temporary
अस्वस्थता– discomfort

आकलन– understanding
आकारशास्त्र– Morphology
आकांक्षा– aspirations
आघातजन्य– traumatic
आत्मीय भावना– we–f eling
आदर्शक– normative
आदर्शवादी व्यवस्था– normative order

आधिदैविक– theological
आनुवंशिक– hereditary
आनुवंशिकता– heredity
आनुवंशिकतावादी– hereditarians
आप्तसंबंध– kinship
आप्रवासी– immigrants
आमचा समूह– we-group
आर्थिक– economic
आलोचना– criticism
आविष्कार– invention
आविष्कारवादी– inventionists
आवेग– impulse
आसक्ती– attachment
आज्ञात्मक– imperative
आंतरक्रिया– interaction
आंतरसंबंध– interrelation
आंशिक– partial

इच्छाधीन– arbitrary
इतरांचा समूह– others group

उगमस्थान– source
उच्च– high
उत्क्रम– hierarchy
उत्तरदायिता– responsibility
उत्प्रवासी– emigrants
उदासीन संज्ञा– neutral term
उद्दीपन– stimulus
उद्देश– goal
उद्योगीकरण– industrialization
उपकारक– beneficial
उपचारात्मक– remedial
उपमानव– anthropoid

एकता– unity
एकदिशावर्ती– unidirectional
एकरूपीकरण– fusion
एकविधता– homogeneity
एकविवाह– monogamy
एकाधिकार– monopoly
एकीकरण– integration

ऐक्यभाव– solidarity
ऐच्छिक समूह– voluntary group

औपचारिक– formal
औषधिविज्ञान– Medicine

अंग– aspect
अंगीकार– assimilation
अंतःसमूह– in-group

करार– contract
कर्तव्य– obligation
कर्मचारीवर्ग–नियंत्रण– personnel management
कल्याण– well-being
काटेकोरपणा– exactitude
कामजीवन– sex-life
कामविषयक लोकनीती– sex mores
कामवृत्ती– sexual behaviour
कामुकता– sexuality
कायदा– law
कायदा, अधिनियमित– enacted law

कायदा, प्रथागत– customary law
कायदा, सामान्य– common law
कारण– condition
कार्य– function
कार्यक्षमता– efficiency
कुटुंब– family
कुटुंब, अव्यवहित– immediate family
कुटुंब, एकविवाही– monogamous family
कुटुंब, केंद्र– nuclear family
कुटुंब, पितृप्रधान– patriarchal family
कुटुंब, पितृमूलक– father–right family
कुटुंब, पितृवंशिक– partilineal family
कुटुंब, पितृसत्तात्मक– patriarchal family
कुटुंब, प्रारंभिक– elementary family
कुटुंब, बहुपतिप्रथात्मक– polyandrous family
कुटुंब, बहुपत्नीप्रथात्मक– polygynous family
कुटुंब, बहुविवाही– polygamous family
कुटुंब, भग्न– broken family
कुटुंब, मातृप्रधान– matriarchal family
कुटुंब, मातृमूलक– mother–right family
कुटुंब, मातृवंशिक– matrilineal family
कुटुंब, मातृसत्तात्मक– matriarchal family
कुटुंब, संयुक्त– joint family
कुटुंबांतर्गत व्यभिचार– incest
कुटुंबविरोधवाद– antifamilism
कुल– clan
केंद्रीकरण– concentration
कौशल्य– skills
क्रम– sequence
क्रिया– activity
क्रियाप्रवण– active
क्रियाविधी– technique
क्रियाशून्य– passive

गतिमान– dynamic
गतिशील– dynamic
गती– rate
ग्राम समुदाय– rural community

घटक– elements
घटना– fact, phenomenon
घनता– density

चक्राकार– cyclical
चयन– selection
चयनात्मकता– selectivity
चरम मूल्ये– ultimate values
चिकित्सात्मक– therapeutic

जटिल– complicated

जनन– reproduction
जननक्रियाविज्ञान– Reproductive Physiology
जननप्रमाण– birth rate
जननशास्त्र– Genetics
जन्मजात– inborn
जन्मसंख्या– fertility
जमाव– crowd
जात– caste
जीवनमान– standard of living
जीवपेशी– body cells
जीवशास्त्र– Biology
जीवशास्त्रीय– biological
जीवसंख्या– population
जीवसंबंधी प्रेरणा– biological drives
जैव लक्षणे– biological characteristics
जैव सामाजिक– bio–social
जैव स्वरूप– biological nature
जैविक विकासवाद– biological evolution
जैविक क्षमता– biological potentiality

झुंड– crowd

टिकाव– survival
टोळी– tribe

तपासणी– exploration
तर्क– guess
ताण –tension
तात्पुरते– tentative
तात्त्विक– metaphysical
तादात्म्य– identification
तौलनिक पद्धती– comparative method
तंत्र– technique
तंत्रविद्या– technology

दर्जा– status
दर्जा, मिळविलेला– achieved status
दर्जा, मिळालेला– ascribed status
दर्जा, सामाजिक– social status
दुय्यम– secondary
दूरदर्शिता– foresight
दोषनिवारक– corrective
दंडशास्त्र– Penology
द्रुतता– rapidity
द्विधाकरण– dichotomy
द्विहस्तक सस्तन प्राणी– primate

धर्मनिरपेक्ष– secular
धर्मशासन– Church
धोरण– policy

नकारात्मक– negative
नागर– urban
नागर समुदाय– urban community
नागरीकरण– urbanization
नाद– fad
निकटता– intimacy
निग्रहण– coercion
निग्रहात्मक– coercive

नित्यता– permanence
निम्न– low
नियमन– regulation
नियमनात्मक व्यवस्था– normative order
नियमने– norms
नियमने, व्यक्तिगत– private norms
नियमने, सामाजिक– social norms
नियमावली– code
नियमितता– regularity
नियोजन– planning
नियंत्रण– control
निरास– elimination
निरीक्षण– observation
निरोधक– preventive
निर्धारक– determinant
निर्धारणवाद– determinism
निर्नैतिकता– amorality
निश्चयात्मक– positive
निश्चित स्वरूपाचा– definite
निषिद्ध वस्तू– taboos
निषेधात्मक– negative
निष्कर्ष– conclusion
निष्पत्ती– results
निःपक्षपाती– impartial
नैतिकता– morality
नैराश्य– frustration
न्यायशास्त्र– Jurisprudence
न्यायशास्त्रीय– juristic
न्याय्य– legitimacy

पडताळा– verification
पदार्थशास्त्र– Physics
परजीवी– parasitic
परभक्षी– predatory
परस्परव्यापक– overlapping
परितुष्टी– gratification
परित्याग– rejection
परिमाण– quantity, volume
परिवर्तन– change, variation
परिस्थितिविज्ञान– Ecology
परिहारक– curative
परंपरा– tradition
परंपरागत– traditional
पर्यावरण– environment
पर्यावरण, आर्थिक– economic environment
पर्यावरण, आंतर– internal environment
पर्यावरण, जीवविषयक– biological environment
पर्यावरण, नैसर्गिक– natural environment
पर्यावरण, बाह्य– external environment
पर्यावरण, भौगोलिक– geographical environment
पर्यावरण, भौतिक– physical environment
पर्यावरण, सामाजिक– social environment
पर्यावरण, सांस्कृतिक– cultural environment
पर्यावरण, संमिश्र– composite environment
पर्यावरणवादी– environmentalists

पशु-परिस्थितिविज्ञान- Animal Ecology
पात्रता- ability
पारस्परिक- reciprocal
पारस्परिकता- reciprocity
पारंपरिक- traditional
पाहणी- survey
पितृप्रधान- patriarchal
पितृमूलक- father-right
पितृवंशिक- patrilineal
पितृसत्तात्मक- patriarchal
पितृस्थानिक- patrilocal
पुरस्कार- reward
पुरातत्त्व- Archaeology
पुरोगामी- progressive
पूर्वकथन- prediction
पूर्वग्रह- prejudice
पूर्ववृत्ती- predisposition
प्रकट- overt
प्रकार- pattern
प्रकृतिधर्म- temperament
प्रक्रिया- process
प्रजनन- procreation
प्रतिक्रिया- reaction
प्रतिगामी- regressive
प्रतिनिवेशन- substitution
प्रतिबंध- prevention
प्रतियोगिता- competition
प्रतिरोध- resistance
प्रतिष्ठा- prestige
प्रतीक- symbol
प्रत्यक्ष- direct

प्रथा- convention
प्रबोधन- enlightenment
प्रभिन्नता- distinctiveness
प्रभेदक- distinctive
प्रभेदन- segmentation
प्रमुख घटक- key factor
प्रयोग- experiment
प्रवर- senior
प्रवृत्ती- propensity, tendency
प्रशासनिक- administrative
प्रसाधन- decoration
प्रसार- diffusion
प्रसारवादी- diffusionists
प्रस्ताव- proposition
प्राचीनताप्रेमी- conservative
प्राणिवर्ग- species
प्राणिविज्ञान- Zoology
प्रातिनिधिक- typical
प्राथमिक- primary
प्राबल्य- dominance
प्रेरणा- drives, motivation
प्रौढावस्था- adulthood

बहि:समूह- out group
बहुदिशावर्ती- multidirectional
बहुपत्नीप्रथा- polygyny
बहुपत्नीत्व- polygyny
बहुपतिप्रथा- polyandry
बहुभर्तृत्व- polyandry
बहुविवाह- polygamy
बाल्यावस्था- childhood
बाह्य- external

बृहत् समाजशास्त्र– Macro Sociology

भावना– emotion
भावात्मकता– emotionality
भूप्रकृती– topography
भोगत्याग– abstinence
भौतिक– physical

मज्जाविकृती– neurosis
मत– opinion
मनुष्यजातिविज्ञान– Ethnology
मनोभाव– sentiment
मनोवृत्ती– mentality
मातृप्रधान– matriarchal
मातृमूलक– mother–right
मातृवंशिक– matrilineal
मातृसत्तात्मक– matriarchal
मातृस्थानिक– matrilocal
मानव–परिस्थितिविज्ञान– Human Ecology
मानवशास्त्र– Anthropology
मानवशास्त्र, आर्थिक– Economic Anthropology
मानवशास्त्र, भाषिक– Linguistic Anthropology
मानवशास्त्र, शारीरिक– Physical Anthropology
मानवशास्त्र, सामाजिक– Social Anthropology
मानवशास्त्र, सांस्कृतिक– Cultural Anthropology
मानवीकरण– humanization
मानवीकरणाची प्रक्रिया– humanizing process
मानसिक– subjective
मान्यता– sanction
मूर्त– material
मूर्त वस्तू– artifacts
मूलाधार– basis
मूल्यमापन– evaluation
मूल्यमीमांसा– Axiology
मृत्युप्रमाण– death rate
मृत्युसंख्या– mortality
मंडळ– association

यथार्थ– accurate, exact
युद्धप्रिय– militaristic
योजना– scheme, plan
योजनापूर्वक– planned
योजनाविरहित– unplanned
यौवनारंभविधी– puberty rites
यंत्रणा– mechanism

रक्तसंबंध– blood bond
रचना– structure
रचनात्मक– constructive
रीतिरिवाज– custom
रितिविधान –Methodology
रूपांतरकरण– transmutation
रेषाकार– linear

लक्षण– trait
लोकनीती– mores
लोकरूढी– folkways
लोकविज्ञान– Demography
लोकसख्या– population

लोकसंख्येची गतिशीलता– dynamics of population
लोकसंख्येची घनता– density of population
लोकसंख्येची विभागणी– distribution of population
लोकसंख्येचे परिमाण– quantity of population
लोकसंख्येचे स्वरूप– quality of population
लोप –elimination

वनस्पति–परिस्थितिविज्ञान– Plant Ecology
वनस्पतिविज्ञान– Botany
वयस्संघटना– age composition
वयोगट– age period
वरण– selection
वर्ग– class
वर्गीकरण– classification
वर्चस्व– dominance
वर्ज्यवस्तू– taboos
वर्णन– description
वर्तनप्रकार– behaviour pattern
विकृतीशास्त्र– Pathology
विक्रयकला– salesmanship
विघटन– disintegration
विजातीयता– heterogeneity
विधान– statement
विधानशास्त्र– Jurisprudence
विभागवार– zone–wise
विभेद– discrimination
विभेदन– differentiation
वियोजन– dissociation segregation

विवरण– explanation
विवाहबंधन– marriage bond
विविक्ती– isolation
विविधता– heterogeneity
विवेकपूर्वक– rational
विवेचन– discussion
विशिष्टीकरण– particularism, specialization
विश्लेषण– analys s
विस्तार– extent
विज्ञान– science
विज्ञान, अनुभवाश्रित– empirical science
विज्ञान, अयथार्थ– inexact science
विज्ञान, आदर्शक– normative science
विज्ञान, नैसर्गिक– natural science
विज्ञान, भौतिक– physical science
विज्ञान, यथार्थ– exact science
विज्ञान, वास्तविक– positive science
विज्ञान, विशिष्ट- special science
विज्ञान, सामाजिक– social science
विज्ञान, सामान्य– general science
विज्ञान, साररूप– synoptic science
विज्ञान, सैद्धान्तिक– theoretical science
विज्ञान, संचित स्वरूपाचे– cumulative science

विज्ञापन– advertisement
वृद्धावस्था– old ege
वेड– craze
वैवाहिक स्थिती– marital status
वंश– race
वंशदाय heredity
वंशपरंपरा– descent
वंशावळ– genealogy
व्यक्तिगत– personal
व्यक्तित्व– individuality
व्यक्तिनिरपेक्ष– impersonal
व्यक्तिमत्त्व– personality
व्यक्तिसंबद्ध– personal
व्यक्तीकरण– individuation
व्यवस्था– system
व्यवहारसाधने– means of communication
व्यष्टिनिष्ठ– individualistic
व्यष्टिवाद– individualism
व्यापकता– generality

शकलीकरण– segmentation
शक्ती– force
शरीरशास्त्र– Physiology
शिष्टाचार– etiquette
शिक्षाग्रहणक्षमता– learning capacity

सकारात्मक– positive
सजातीयता– homogeneity
समतोलपणा– equilibrium
समन्वय –co-ordination
समस्या– problem
मस्वरूपी –standardized
समष्टी– totality
समाज– society
समाज–अर्थ–रचना– socio–economic structure
समाजकार्य– social work
समाज–परिस्थितिविज्ञान– Social Ecology
समाजरचना– social structure
समाजवाद– Socialism
समाजविषयक गरजा– societal needs
समाजविषयक विचार– social thought
समाजसत्तावाद– Communism
समाजातीत– supra social
समाजीकरण– socialization
समान– uniform
समायोजन– adjustment
समालोचक– synoptic
समावेशक– inclusive
समुच्चय– aggregation
समुदाय– community
समूह– group
समूह–कल्प– quasi-group
समोरासमोरचे– face–to–face
सर्वसामान्य मूल्ये– common values

सस्तन प्राणी– mammals
सहकारिता– co-operation
सहचर - associate, companion
सहजप्रवृत्ती– instinct
सहजप्रेरित– instinctive
सहयोग– association, co–operation

सहेतुक– rational
सातत्य– continuity
सातत्यक– continuum
साधन– agency, instrument
साधने– means
साध्य– end
सान्निध्य– proximity
सामयिक– seasonal
सामाजिक एकीकरण– social integration
सामाजिक अंतर– social distance
सामाजिक कार्यप्रणाली– social policy
सामाजिक कार्यक्षमता– social efficiency
सामाजिक गतिशीलता– social mobility
सामाजिक घटना– social facts
सामाजिक चेतना– social awareness
सामाजिक धोरण– social policy
सामाजिक परिवर्तन– social change
सामाजिक भेदीकरण– social differentiation
सामाजिक समस्या– social problem
सामाजिक समूह– social group
सामाजिक स्तररचना– social stratification
सामाजिक स्वरूपाचे प्राणी– social species
सामाजिक वस्तू– social facts
सामाजिक वातावरण– social milieu
सामाजिक विकासवाद– social evolution
सामाजिक विचार– social thought
सामाजिक विषमायोजन– social maladjustment
सामाजिक क्षोभ– social disturbance
सामान्य– common
सामान्यीकरण– generalization
सामीप्य– proximity
सामूहिक आवृत्ती– mass repetition
सामूहिक घटना– mass phenomena
सार्वत्रिक– universal
सार्वत्रिकता– universality
साहचर्य– association
सिद्धान्त– doctrine, theory
सीमा– extent
सुधारणा– reform
सुरक्षितता– security
सुसंगतता– coherence
सूचन– suggestion
सूत्रण– formulation
सूक्ष्म समाजशास्त्र– Micro Sociology
सैद्धान्तिक– theoretical
संकरण– crossing
संकलन– integration
संकल्पना– concept
संकीर्ण– complex
संकेत– symbol

संक्रमणीय– transferable
संक्रामण– transmission
संख्याशास्त्र– Statistics
संघटन– integration, organization
संघटना– organization
संघभाव– esprit de corps
संघर्ष– conflict
संघात– assemblage
संचय– collection
संचारण– transmission
संचित स्वरूपाचे– cumulative
संतुलन– equilibrium
संदेश व्यवहार– communication
संपर्क– contact
संपर्कराहित्य– isolation
संबंध– relationship
संभाव्य– possible
संमिश्र– complex
संयमन– restraint
संयुक्त– compound, joint
संयोजन– synthesis
संसक्ती– cohesion
संस्कार– sacrament
संस्कृती– culture
संस्था– institution
संस्थापित स्वरूप– corporate character
संहिता– code
संज्ञा– term
सांकेतिक– symbolic
स्तनंधयावस्था– infancy
स्त्रीपुरुषप्रमाण– sex ratio
स्त्रीपुरुषसमागम– mating
स्थान– locus
स्थानांतरण– migration
स्थानीय– local
स्थानीयता– locality
स्थायित्व– permanence
स्थायी– permanent
स्थिती– situation
स्थिर– static
स्थिरता– stability
स्थिर लक्षण– constant feature
स्पर्धा– competition
स्वतःप्रेरित– spontaneous
स्वभावधर्म –temperament
स्वयंपूर्ण– self–sufficient
स्वरूप– quality
स्वरूपशास्त्र– Morphology
स्वसमूहश्रेष्ठतावाद– ethnocentrism

हक्क– rights
हानीकारक– harmful
हितकारक– beneficial
हितसंबंध– interest
हितसंबंधित समूह– interest group
हुकूमशाही– Dictatorship

क्षणिक– transitory
क्षमता– capacity
क्षेत्रीय– spatial

ज्ञाती– caste
ज्ञानमीमांसा– Epistemology

परिशिष्ट ३

# समाजशास्त्रावरील उपयुक्त ग्रंथ


Bottomore, T. B. : *Sociology– A Guide to Problems and Literature* ( London, 1962 ).

Broom and Selznick : *Sociology* ( Maruzen Asian Edition, Tokyo, 1958 ).

Davis, Kingsley : *Human Society* (New York, 1961).

Duncan Mitchell : *Sociology–The Study of Social Systems* ( London, 1959 ).

Fairchild, H. P. ( ed. ) : *Dictionary of Sociology* ( London, 1958 ).

Gillin and Gillin : *Cultural Sociology* ( New York, 1954 ).

Ginsberg, Morris : *Sociology* ( London, 1955 ).

Gisbert, Pascual : *Fundamentals of Sociology* ( Bombay, 1957 ).

Green, Arnold : *Sociology—An Analysis of Life in Modern Society* ( New York, 1960 ).

Inkeles, Alex : *What Is Sociology ? An Introduction to the Discipline and Profession* ( Englewood Cliffs, 1964 ).

Johnson, Harry : *Sociology—A Systematic Introduction* ( London, 1962 ).

Jones, Marshall : *Basic Sociological Principles* ( New York, 1949 ).

Lundberg, Schrag and Larsen : *Sociology* ( New York, 1954 ).

MacIver and Page : *Society – An Introductory Analysis* ( London, 1953 ).

Merrill and Eldredge : *Culture and Society– An Introduction to Sociology* ( New York, 1953 ).

Ogburn and Nimkoff : *Handbook of Sociology* ( London, 1960 ).

Rumney and Maier : *The Science of Society–An Introduction to Sociology* ( London, 1953 ).

Sprott, W. J. H. : *Sociology* ( London, 1961 ).

Young, Kimball : *Sociology – A Study of Society and Culture* ( New York, 1949 ).

# सूची


अधिनियमित कायदा, ११७–१८
अनिवार्य समूह, १९५
अनुकूलन :
  स्वरूप, ५६
  प्रकार, ८३
  क्रियाशून्य अ. ८३–८४
  क्रियाप्रवण अ, ८४
  व रीतिरिवाज, २६५
अनुशासन व समाजीकरण, १६०
अनौपचारिक नियंत्रण, २६०–६१
अपराधविज्ञान, १३
अभिवृत्ती, १७२–७३
अभ्युपगम, ४०–४१
अर्थशास्त्र, ४७–४८
अवलंबनभावना, २१७
अव्यवहित कुटुंब, २३२
अस्थायी समह, १९६, २११
ॲरिस्टॉटल, १८, २५२

आकांक्षा व समाजीकरण, १६१
आत्मीय भावना, २१६
आदर्शक विज्ञान, ३५
आदर्शकाची संकल्पना, ७३
आदर्शवादी व्यवस्था, १०७, १०८
आनुवंशिकता, ६९–७०, २८१
आनुवंशिक संक्रामण, १६२
आप्तसंबंध :
  संज्ञा, १३५
  व सामाजिक दर्जा, १३५–३६
आमचा समूह, १९७–९९
आर्थिक विषमता, २८७–८८
आविष्कारवादी, २९२–९३
ऑग्बर्न व निमकॉफ, ४, १९१
आंतरक्रिया :
  व्याख्या, १४१
  स्वरूप, १४२
  प्रकार, १४२
  प्रत्यक्ष आं., १४३
  सांकेतिक आं., १४३
  महत्त्व, १४३–४५

इतरांचा समूह, १९७–९९
इतिहास, ५६–५८
इंकेल्स, अलेक्स, ४

उद्देशांचा उत्क्रम व व्यक्तिमत्त्व, १७९–८०

एकविवाहप्रथा, २७७
एकविवाही कुटुंब, २३३

ऐच्छिक समूह, १९५, २२५

औपचारिक नियंत्रण, २६०–६१

अंतःसमूह, १९७–९९

कामवृत्ती नियमन, ७१–७२
कायदा :
व लोकनीती, ११६–१७, २६२
व्याख्या, ११६, २६२–६३
प्रकार, ११७
प्रथागत का., ११७
अधिनियमित का., ११७–१८
समाजातील महत्त्व, ११८
प्रभेदक लक्षणे, २६३
व रीतिरिवाज, २६४–६६
वाढ, २६६–६७
मूलभूत मर्यादा, २६७
प्रमुख कार्ये, २६७–६८
कार्यभावना, २१६
कार्यविभाजन :
व समाज, ६७–६८, ७१
व लिंगभेद, १३०–३१
कॉंत, आगुस्त, १९–२०
कुटुंब :
सदस्यांचे परस्परसंबंध, १४१
व जैविक क्षमतेचा विकास, १९३
अनिवार्य समूह, १९५
व ग्रामसमुदाय, २१९
कुटुंबविरोधवाद, २४५
कुटुंबसंस्था :
व्याख्या, २३१–३२
प्रकार, २३२–३४
लक्षणे, २३४
वैशिष्ट्ये, २३५–३६
कार्ये, २३७–३९
बदल, २४०–४१
बदलाचे परिणाम, २४१–४२
बदलाची कारणे, २४२–४५
व नवीन अर्थव्यवस्था, २४२–४४
व मालकीचे घर, २४४
व संततिनियमन, २४४–४५, २५०
व नवीन विचारप्रवाह, २४५
भवितव्य, २४६–५२
अस्थिरता, २४७
असंबद्ध कार्ये, २४७
आवश्यक कार्ये, २४७–५२
व कामवासना तृप्ती, २४९–५०
व गृहजीवनाची व्यवस्था, २५०-५२
कूले, चार्लस, १९९–२००
केंद्र कुटुंब, २३२

गर्भपात, ८९
गार्डनर, मर्फी, ५३
गिडिंग्ज, एफ्. एच्., १९५
गिन्सबर्ग, मॉरिस, ४, १०, ६४
गिलिन व गिलिन, २५४
गिस्बर्ट, पी., ७६
गेडिस, पेट्रिक, २६
ग्रामसमुदाय :
हितसंरक्षण, १९६
स्वरूप, २१८–१९
आकार, २१९
लक्षणे, २१९–२२
व सामाजिक नियंत्रण, २६०

घुर्ये, गो. स., २६

चक्राकार परिवर्तन, २९०–९१

जन्मसख्या :
जन्म–दर, ८८
मर्यादित करण्याचे उपाय, ८८–९०
वाढविण्याचे मार्ग, ९०
प्रमाण, ९०–९१
भारत, १००
जॉन्सन, हॅरी, ४, १०६, २७३, २७४
जीवशास्त्र, ५५–५६, १५७
जव–सामाजिक समाज, ६९–७०
जैविक परिस्थिती व परिवर्तन, २८१–८२
जोन्स, मार्शल, ४, ७६

झुंड, १९७

टायन्बी, अर्नोल्ड, ८, ५६

डुरखाइम, एमिल, ७–८, ९, २३, ५९
डूब, लिओनार्ड, ३००
डेव्हिस, किंग्जले, १०–११, ११६, ११९, २६२

तत्त्वज्ञान, ५८–५९
तौलनिक पद्धती, ५७
तंत्रविद्या व परिवर्तन, २८२–८३

दर्जा :
व्याख्या, १२४
व प्रतिष्ठा, १२४
व व्यक्ती, १२४
व बाह्य प्रतीके, १२४–२५
व हक्क व कर्तव्ये, १२५
व भूमिका, १२५–२६
दर्जाचे एकीकरण, १२६–२७
विवक्षित दर्जा, १२६
देण्याची पद्धत, १२९–३६
व लिंगभेद, १२९–३१
व वयोमान, १३१–३५
व आप्तसंबंध, १३५–३६
मिळविण्याची पद्धत, १३६–३८
मिळविता येण्याची क्षेत्रे, १३७
मिळविण्यासाठी लागणारे गुण, १३८
व नगरसमुदाय, २२४.
दुय्यम समूह :
स्वरूप, १९९–२००
व प्राथमिक समूह, २०६–०८, २१०
संबंधांचे स्वरूप, २०६
आकार, २०६–०७
सान्निध्य, २०७
सदस्यत्व, २०७
दृष्टिकोण, २०७
करारप्राधान्य, २०८
व्यवहारसाधने, २०८
व्यक्तिमत्त्वावरील परिणाम, २०८
संख्या, २०८–०९
महत्त्व, २०९
नवीन प्रवृती, २०९
व सामाजिक जीवन, २१०
व नगर समुदाय, २२३, २२४
व सामाजिक नियंत्रण, २६०
दूरवर्ती समूह, १९९

धर्म :
धर्मकल्पना, २६८

धार्मिक वर्तन, २६८
धार्मिक संहिता, २६८
धर्मपालनामागची भूमिका, २६९
धार्मिक नियमांची मान्यता, २६९-७०
धर्मकल्पनांचे अस्तित्व, २७०
धार्मिक व नैतिक नियम, २७१
धर्मक्रियापालन, २३९
धर्म व नीती, २६८–७१
धर्मसंस्था :
हेतू, २२९
रचना, २३०
प्रतीके, २३०

नगर-समुदाय :
हितसंबंध, १९६
स्वरूप, २२२
आकार, २२२
लक्षणे, २२३–२६
व समुदाय भावना, २२६–२७
व सामाजिक नियंत्रण, २६०
निकटवर्ती समूह, १९९
नियमनात्मक व्यवस्था, १०७, १०८, १२५
नियमने :
संकल्पना, १०५
व्याख्या, १०६
व वर्तन, १०६
व्यक्तिगत नि., १०६
सामाजिक नि., १०६–०९
नियोजन :
व्याख्या, २९४
क्रिया, २९४
प्रवृत्ती, २९५
व्यक्तिगत नि., २९५
सामाजिक नि., २९५
क्षेत्र, २९६
कालावधी, २९७
कार्यवाही, २९७
ध्येय, ३००–०१
प्रक्रिया, ३०१–०२
अमलबजावणी, ३०२
प्रगती, ३०२–०४
निरीक्षण, ३८–३९
नीती :
नीतिकल्पना, २६८
नैतिक वर्तन, २६८
नैतिक सहिता, २६८–६९
नीतिपालनामागची भूमिका, २६९
नीतिनियमांची मान्यता, २६९–७०
नीतिकल्पनांचे अस्तित्व, २७०
नैतिक व धार्मिक नियम, २७१

परावलंबन, मानवांचे, १५८
परिवर्तन :
स्वरूप, २७३–७४
कारणे, २७९–८४
अडथळे, २८५–८८
गती, २८८–८९
चक्राकार., २८९–९१
रेषाकार, २८९–९१
व शोध, २९१–९३
व प्रसार, २९१–९३
परिवर्तनविरोधी मनोवृत्ती, २८६–८७
पर्यावरण :
स्वरूप, ७४–७५

व्याख्या, ७५
वर्गीकरण, ७६–७७
भौतिक प., ७७–८०, २८०
सामाजिक प., ८०–८२
बदलते महत्त्व, ८२–८३
अनुकूलन, ८३–८४
व परिवर्तन, २७८
'पर्सनॅलिटी', १६८–६९
पशु–परिस्थितिविज्ञान, ५६, ७५
पार्क व बर्गेस, १६९
पार्सन्स, टाल्कट, २४, २५
पिअर्सन, कार्ल, ३३
पितृप्रधान कुटुंब, २३३
पितृमूलक कुटुंब, २३३
पितृसत्तात्मक कुटुंब, २३३
पितृस्थानिक निवास, २३३
पितृवंशिक कुटुंब, २३३
पूर्वकथन, ४२
प्रजापोषण, २३७, २४९
प्रजोत्पादन, २३७, २४८–४९
प्रथागत कायदा, ११७
प्रयोग, ३६, ३९
प्रसारवाद, २९१–९३
प्राणिविज्ञान, ७५
प्राथमिक समूह :
स्वरूप, १९९–२०१
आवश्यक भौतिक गोष्टी, २०१-०२
प्राथमिक संबंधांची वैशिष्टचे, २०२–०४
अस्तित्व, २०४–०५
कार्य, २०६
व दुय्यम समूह, २०६–०८, २१०
व सामाजिक जीवन, २१०
व ग्राम समुदाय, २२०
व सामाजिक नियंत्रण, २६०
प्रारंभिक कुटुंब, २३२
प्रिचर्ड, इव्हान्स, ७
प्रेरणा १५७
प्रौढावस्था, १३३
प्लेटो, १८, २५२

फेअरचाइल्ड, हेन्री, ४, २५४

बर्नार्ड, एल्. एम्., ७६
बहि:समूह, १९७–९९
बहुतांशी असंघटित समूह, १९६
बहुपतिप्रथा, २३३
बहुपतिप्रथात्मक कुटुंब, २३३
बहुपत्नीप्रथा, २३३
बहुपत्नीप्रथात्मक कुटुंब, २३३
बहुविवाहप्रथा, २७७
बहुविवाही कुटुंब, २३३
बालगुन्हेगारी, ३८
बालसंवर्धन, २४९
बालहत्या, ९०
बाल्यावस्था, १३३
बॉटमोर, टी. बी., १९०, २५५
बेनेडिक्ट, रूथ, ७
बोआस, फ्रान्झ, ७
ब्राऊन, रॅडक्लिफ, ७, २५
ब्रूम व सेल्झनिक, १२५, १९१

भारताची लोकसंख्या :
प्रमाण, ९८
वाढ, ९९–१००
जन्म–दर, १००

मृत्यु–दर, १००
वयस्संघटना, १०१
स्त्रीपुरुषप्रमाण, १०२–०३
प्रदेशवार विभागणी, १०३
भाषाक्षमता, मानवाची, १५८–५९
भाषेचा उपयोग, ७२–७३
भूमिका :
व्याख्या, १२५
व व्यक्ती, १२६
व दर्जा, १२६
विवक्षित भूमिका, १२६–२७
व परिवर्तन, २७५
भौतिक पर्यावरण :
स्वरूप, ७७
व जनसंख्या, ७८
व व्यवसाय, ७९
व सामाजिक जीवन, ७८–७९
बदल, ७९–८०
प्रभाव, ७७–८०
बदलते महत्त्व, ८२

मनुष्यजातिविज्ञान, २२,५१
मम–भावना, २०१
मम्फर्ड, लेविस, ३००
मर्टन, आर्. के., २५
मॅकायव्हर, रॉबर्ट, ४, २५, ७६, २१२, २३२, २६३
मॅलिनोस्की, बी., २५, १८४
मातृप्रधान कुटुंब, २३३
मातृमूलक कुटुंब, २३३
मातृसत्तात्मक कुटुंब, २३३
मातृस्थानिक निवास, २३३
मातृवंशिक कुटुंब, २३३
मानव-परिस्थितिविज्ञान, १५, ५६, ७५
मानव प्राणी :
अनन्यता, २, १५६
प्रवृत्ती, ४३, ४५, २८१
प्रकार, ५५, ७१
सामाजिक प्रतिक्रिया, ७०
भाषेचा परिणाम, ७२-७३
शिकण्याची क्रिया, १५५-५६
जैव लक्षणे, १५७–६०
व समाजीकरण, १६३–६५
शारीरिक लक्षणं व व्यक्तिमत्त्व, १७४–७५
वैयक्तिक अनुभव व व्यक्तिमत्त्व, १७५–७६
सांस्कृतिक अनुभव व व्यक्तिमत्त्व, १७६–७८
समूहांची आवश्यकता, १९३
मानवीकरण, १९४
मानवशास्त्र :
व्याख्या, ५०
शाखा, ५०–५१
व समाजीकरण, १५७
मानव समाज :
अभ्यास, २, ७– ८, ६०, ७३
संस्कृती, २
विकासाच्या अवस्था, २०
वैशिष्टचे, ७१–७३
व परिवर्तन, २७२
मानवीकरण :
प्रक्रिया, १९४
व कुटुंबसंस्था, २३८
मानवेतर प्राण्यांचे समाज, ६९–७०
मानसशास्त्र, २४, १५७

मानस-विकृती :
स्वरूप, १८३
व सामाजिक आशय, १८३-८५
मार्क्स, कार्ल, २१, २४, ८१
मॉर्गन, एल्. एच्, २४
मीड, मार्गारेट, ७
मूल्यमीमांसा, ५८
मृत्यु-संख्या :
मृत्यु-दर, ९१
प्रमाण, ९१-९२
भारत, १००
मेरिल व एल्डरेज, ४, १९०, २२९, २९५, ३०१
मंडळ :
हितसंरक्षण, १९५
व समुदाय, २१२

यथार्थ विज्ञान, ३५
यौवनारंभ विधी, १३३
यंग, किंबाल, ३, ६४, ७५, २३१, २५४, २९४

रक्तसंबंध, २३४
रहदारीविषयक कायदे, २६६
राज्यशास्त्र, ४८-४९
रॉस, इ., ७५
रिव्हर्स, डब्ल्यू., एच् आर., ७
रीतिरिवाज व कायदे :
फरक, २६४
आदिवासी समाज, २६४-६५
आधुनिक समाज, २६५-६६
रेषाकार परिवर्तन, २९०-९१
" लांडग्याची मुले, " १६३
लिंगभेद :
स्वरूप, १२९-३०, १३२
व सामाजिक दर्जा, १३०-३१
लिंटन, राल्फ, १२४
लिंड, राबर्ट, ३००
लुंडबर्ग, श्राग व लार्सन, १६९
ले प्ले, ८०
लोकनीती :
स्वरूप, ११२-१३
व्याख्या, ११३
लक्षणे, ११४
प्रकार, ११४
महत्त्व, ११४
सामर्थ्य, ११५
कायद्यात रूपांतर, ११६
व नियंत्रण, २६१
लोकरूढी :
व्याख्या, ११०
लक्षणे, ११०-१२
महत्त्व, ११२
व समुदायभावना, २१७
व नियंत्रण, २६१
लोकसंख्या व समाज :
अभ्यासाचे महत्त्व, ८५, ८७
लोकसंख्येचे परिमाण, ८६
लोकसंख्येचे स्वरूप, ८६
प्रदेशवार विभागणी, ८६
अभ्यासाचे स्वरूप, ८७
गटवार विभागणी, ९४-९५
भारतातील परिस्थिती, ९८-१०४
लोकसंख्येची गतिशीलता :
जन्म-संख्या, ८८-९१

मृत्यु–संख्या, ९१–९२
स्थानांतरण–संख्या, ९२–९३
व सामाजिक परिस्थिती, ९३–९४
लोकसंख्येची घनता, ९७
लोकसंख्येची रचना :
वयस्संघटना, ९५–९६
स्त्रीपुरुष–प्रमाण, ९६
वैवाहिक स्थिती, ९६–९७
भारतातील परिस्थिती, १०१–०३
व सामाजिक परिवर्तन, २८१–८२
लोकसंख्येची विभागणी :
प्रदेशवार विभागणी, ९७
ग्रामीण व नागर भागात विभागणी, ९७–९८
भारतातील परिस्थिती, १०३–०४
लोकविज्ञान, ८५

वनस्पति-परिस्थितिविज्ञान, ५६, ७५
वनस्पतिविज्ञान, ७५
वयस्संघटना, ९५–९६, १०१
वयोमान :
स्वरूप, १३१–३२
व सामाजिक दर्जा, १३१–३५
वयोगट, १३२–३४
वर्ग, १९६
वर्गीकरण, ३९
वार्ड, लेस्टर, १९५
विवाहबंधन, २३४
विशिष्ट हितसंबंधित समूह, १९५
विशिष्टीकरण, ४५, २२१
विशेष संघटित समूह, १९६
विज्ञान :
व्याख्या, ३३–३४
वर्गीकरण, ३४
वैशिष्टचे, ३४–३५
अभ्यासपद्धती, ३७–४२
नियम, ४१
कार्य, ४३
वीझ, व्हॉन, ५
वृद्धावस्था, १३३–३४
वेबर, मॅक्स, २४
वेस्टरमार्क, विल्यूम, ७
वंश, अनिवार्य समूह, १९५
वंशपरंपरा, २३३
व्यक्तिमत्त्व :
व दर्जाचे संकलन, १२७
व आनुवंशिक संक्रामण, १६२
व सामाजिक संक्रामण, १६२
व पर्यावरण १६२–६३
स्वरूप, १६८–७१
व्याख्या, १६९, १७०
लक्षणे, १७०
प्रमाण, १७०
मानसिक बाजू, १७१
घटक, १७१–७४
व सामाजिक अभिवृत्ती, १७१–७२, १७८
सामाजिक मूल्य, १७२–७३, १७८
व स्वत:विषयीची जाणीव, १७३–७४, १७८
जडणघडण, १७४–७८
व शारीरिक लक्षणे, १७४–७५
व वैयक्तिक अनुभव, १७५–७६
व सांस्कृतिक अनुभव, १७६–७८
संकलन, १७८–८२

विघटन, १८२–८५
निर्धारक गोष्टी, १८५–८७
व संस्कृती, १८७–८८
विकसन, २३८
व्यक्तीकरण, २२५

शारीरिक लक्षणे व व्यक्तिमत्त्वाचा विकास, १७४–७५
शारीरिक सातत्य व व्यक्तिमत्त्व, १७९
शासकीय उणीवा, २८८
शिक्षणक्षमता :
मानवाची, १५८–५९
व समाजीकरण, १६४
शेरिफ व शेरिफ, ५२
शोध व परिवर्तन, २९१–९३
शोधांचा अभाव, २८५
शोधांचा अस्वीकार, २८६

समस्या–सूत्रण, ३७–३८
समाज :
व व्यक्ती, ११
अभ्यास, २१, ६०
वर्गीकरण, २२
स्वरूप, ६१–६६
व्याख्या, ६१, ६३, ६४
स्वतंत्र अस्तित्व, ६३-६४, ६५-६६
व समुच्चय, ६३
वैशिष्टये, ६४–६६
मूलभूत गरजा, ६६–६९
प्रकार, ६९
संमिश्रता, २९८–९९
परिवर्तनाची द्रुतता, २९९
विशालता, २९९–३००
समाज-कार्य, १७, ५४–५५
समाज-परिस्थितिविज्ञान, ७५
समाज–रचना :
अभ्यासविषय, १०
संकल्पना, २५
आकलन, १२०, १८९
व्याख्या, २७४
बदल, २७४–७५
समाज–व्यवस्था, १५, २५
समाजशास्त्र :
स्वरूप, १–१७
पशूंचे स., १
मानव स., १
व्याख्या, ३–४, १५, २१–२२
अभ्यासविषय, ५–८, १५-१७, २३, २४, २५, २६, ६९, १४०, १५७, १८९, २११, २३१, २५३, २७३
अभ्यासाचे स्वरूप, ११, २२
व्याप्ती, ८–११
शाखा, ११–१५
सामान्य स., ९
राजकीय स., १२
औद्योगिक स, १२
नागर स., १२
ग्रामीण स., १२
धर्माचे स., १३
कुटुंबाचे स., १३

जीवशास्त्रीय स., १४
शैक्षणिक स., १४
मानसशास्त्रीय स., १४
कायद्याचे स., १४
कलेचे स., १४
ज्ञानाचे स., १४
आक्षेप, १५-१७
व समाजकार्य, १७, ५४-५५
व समाजवाद, १७
स्वतंत्र अस्तित्व, १५-१७, २३
प्रथम उल्लेख, २०
बृहत् स., २३
सूक्ष्म स., २३
व मानसशास्त्र, २४
समाजशास्त्र व
अर्थशास्त्र, ४७-४८
इतिहास, ५६-५८
जीवशास्त्र, ५५-५६
तत्त्वज्ञान, ५८-५९
सामाजिक मानसशास्त्र, ५२-५४
सामाजिक मानवशास्त्र, ४९-५१
राज्यशास्त्र, ४८-४९
समाजशास्त्र व विज्ञान :
वैज्ञानिक स्वरूप, ३३-३७
सामाजिक विज्ञान, ३४
अनुभवाश्रित विज्ञान, ३४
सैद्धान्तिक विज्ञान, ३४
संचित स्वरूपाचे विज्ञान, ३५
वास्तविक विज्ञान, ३५
साररूप विज्ञान, ३५
अयथार्थ विज्ञान, ३५-३७
वैज्ञानिक अभ्यासपद्धती, ३७-४२
वैज्ञानिक विचारसरणी, ४३-४५
विशिष्ट सामाजिक विज्ञान, ४७-४९
सामान्य सामाजिक विज्ञान, ४७-४९
समाजशास्त्राचा विकास :
उदय, १९-२०, ५८
एकोणिसावे शतक, २०-२३
विसावे शतक, २३-२६
समाजशास्त्राची उपयुक्तता, २७-२९
समाजशास्त्राचे उद्देश, २६-२८
समाजशास्त्राचे कार्य, ३०-३२
समाजशास्त्रीय अभ्यास :
प्रगती, २३-२६
जर्मनी, २३-२४
अमेरिका, २४-२५
इंग्लंड, २५-२६
भारत, २६
निष्पत्ती, ३०-३२
अपेक्षा, ३२
विशेष गोष्टी, ३५-३७
समाजशास्त्रीय सिद्धांत, २४-२५
समाजशास्त्रीय संकल्पना, २६
समाजीकरण :
व्याख्या, १५६
स्वरूप, १५६
महत्त्व, १५६-५७, १६५
अभ्यास, १५७
प्रक्रिया, १५७-६०, १७१
उद्देश, १६०-६२
व व्यक्तित्वाचा विकास, १६२-६५
साधने, १६५-६७
व अधिकारी व्यक्ती, १६५-६६
व समानधर्मी व्यक्ती, १६६-६७
व शैक्षणिक संघटना, १६७

समान-निवास, २३४
समावेशक हितसंबंधित समूह, १९५, २११

समुदाय :
हितसंरक्षण, १९५
कालावधी, १९६
व्याख्या, २११-१२
लक्षणे, २१२-१३
व मंडळ, २१२
विश्व समुदाय, २१३
लहान समुदाय, २१३-१४
मूलाधार, २१४- १८
ग्राम समुदाय, २१८-२२
नगर समुदाय, २२२-२७

समुदाय - भावना :
आवश्यकता, २१५
निर्मिती, २१५
वाढ, २१५-१६
संमिश्रता, २१६-१८
व्यक्त करणाऱ्या गोष्टी, २१७-१८
तीव्रता, २१८
व नगर-समुदाय, २२६-२७

समूह :
व्याख्या, १८९-९०
आवश्यक गोष्टी, १९१-९२
सीमा, १९२
गतिशीलता, १९२
सदस्यांवर नियंत्रण, १९२-९३
आकार, १९४-९५
संमतीची जरूरी, १९५
हितसंरक्षण, १९५-९६
कालमर्यादा, १९६
संघटना, १९६
व्यक्तिगत दृष्टिकोण, १९७
संपर्काचे स्वरूप, १९९-२००
निकटतेचे प्रमाण, १९९-२००
व कायदे, २६६
समूह-कल्प, १९२
सम्नर, विल्यम, २४, ११२, ११३, ११५, १९७, २२९, २९५

सहयोग :
व्याख्या, १५२,
स्वरूप, १५२
उद्देश, १५३
महत्त्व, १५३
संघटनात्मकता, १५३

सामाजिक अभिवृत्ती, १७१-७२

सामाजिक आकारशास्त्र, ९, १०

सामाजिक आंतरक्रिया :
स्वरूप, १४१-४२
प्रकार, १४२-४३
महत्त्व, १४३-४५
व सामाजिक प्रक्रिया, १४५
संघर्ष, १४५-४९
स्पर्धा, ४७, १४९-५२
सहयोग, १५२-५३
प्रकारांचे परस्परावलंबन, १५४
व सामाजिक परिवर्तन, २७६-७७

सामाजिक कार्ये, १०
सामाजिक गतिशीलता, २२४
सामाजिक तत्त्वज्ञान, ५८-५९

सामाजिक दर्जा :
स्वरूप, १२३-२६

अभ्यासाचे महत्त्व, १२३
एकीकरण, १२६–२७
प्रकार, १२८–२९
देण्याची पद्धत, १२९–३६
व मृत व्यक्ती, १३४–३५
मिळविण्याची पद्धत, १३६–३८
दोन्ही पद्धतीचे स्वरूप व महत्त्व, १३८–३९
व व्यक्तिमत्त्व–संकलन, १८१–८२
सामाजिक धोरण, २८, २९
सामाजिक नियमने :
स्वरूप, १०५–०९
लक्षणे, १०७–०९
प्रकार, १०९–१८
परस्परसंबंध, ११९–२१
व समाज, १२१–२२
महत्त्व, १२१–२२
अभ्यास, १२२
व व्यक्तिमत्त्वसंकलन, १८०–८१
व नियंत्रण, २६१
सामाजिक नियोजन :
व समाजशास्त्राचे उद्देश, २८
व्याख्या, २९५
स्वरूप, २९५–९६
व सामाजिक सुधारणा, २९६
व्याप्ती, २९६–९७
कालमर्यादा, २९७
व संघटना, २९७
प्रसार, २९८
अडचणी, २९८–३००
उद्देश, ३००–३०१
तंत्र, ३०१–०२
प्रगती, ३०२
भवितव्य, ३०२–०४
सामाजिक नियंत्रण :
अभ्यास– विभाग, १०
अभ्यास– हेतू, २९
व्याख्या, २५३–५५
व वर्चस्व, २५५
निग्रहात्मक नियंत्रण, २५५–५६
अनुनयात्मक नियंत्रण, २५५–५६
आवश्यकता, २५६–५७
कार्ये, २५७–५८
साधने, २५८–५९
प्रकार, २६०
सामाजिक परिवर्तन :
अभ्यास– विभाग, ११
व्याख्या, २७३
उदासीन संज्ञा, २७३
प्रकार, २७३–७४
स्वरूप, २७४–७५
व सांस्कृतिक परिवर्तन, २७६
व सामाजिक आंतरक्रिया, २७६–७७
कालसंबद्धता, २७७
वैज्ञानिक विश्लेषण, २७७–७८
व भौतिक पर्यावरण, २७९–८०
व जैविक परिस्थिती, २८१–८२
व तंत्रविद्यात्मक व्यवस्था, २८२–८३

व सांस्कृतिक व्यवस्था, २८३–८५
बाधा आणणाऱ्या गोष्टी, २८५–८८
गती, २८८–८९
दिशा, २८९–९१
उगम, २९१–९३
द्रुतता, २९९
सामाजिक पर्यावरण :
स्वरूप, ८०
प्रभाव, ८१–८२
बदलते महत्त्व, ८३
सामाजिक प्रक्रिया :
अभ्यास– विभाग, १०
संघर्ष, १४५–४९
स्पर्धा, ४७, १४९–५२
सहयोग, १५२–५४
संघटनात्मक प्रक्रिया, १५२
विघटनात्मक प्रक्रिया, १५२
सामाजिक भूगोल, १४
सामाजिक भूमिका :
व्याख्या, १२५
व समाजीकरण, १६१
सामाजिक मानवशास्त्र,, ४९–५१
सामाजिक मानवशास्त्रज्ञ, ७, २५
सामाजिक मानसशास्त्र, ५२–५४
सामाजिक मूल्ये, १७२–७३
सामाजिक समस्या, २८, २९, ३१, ४४, ४५
सामाजिक समूह :
अभ्यास, ४, ६, ७, १५, १८९
व्याख्या, १९०–९१
अस्तित्वासाठी आवश्यक गोष्टी, १९१–९२
विशेष अंगे, १९२–९३
आवश्यकता, १९३–९४
वर्गीकरण, १९४–२००
व समुदाय, २११
व परिवर्तन, २७५
सामाजिक वर्तन :
अभ्यास, ५–६, १५४
नियम, १९
व नियमने, १०५
व दर्जा, १२३
व समाजीकरण, १६३–६४
व सहजप्रवृत्ती, २८१
सामाजिक विकासवाद, २१–२२
सामाजिक विकृतीशास्त्र, १०
सामाजिक विविधता, २२३
सामाजिक सहिष्णुता, २२३
सामाजिक संक्रामण, १६२
सामाजिक संख्याशास्त्र, १५, ८५
सामाजिक संपर्क, १९३
सामाजिक संबंध :
व समाजशास्त्र ३, ४, ५, ९, २१, २४
स्वरूप, ६१
प्रकार, ६१–६२, १४१–४२
कक्षा, ६२, १४०–४१
आवश्यकता, ६३
व्यवस्था, ६३–६४
अभ्यास, १४०
जटिलता, १४०–४१
महत्त्व १४३–४५
परिवर्तन, २७५
सामाजिक संरक्षण, २३९

सामाजिक संस्था :
व्याख्या, २२८–२९
संकल्पना, २२९
रचना, २२९–३०
प्रतीकात्मक लक्षणे, २३०
भौतिक लक्षणे, २३०
व्यक्तींचा प्रवेश, २३०
संख्या, २३१
अभ्यास, २३१
कुटुंब संस्था, २३१–५२
व परिवर्तन, २७५
सामाजिक–सांस्कृतिक समाज, ६९
सामाजिक स्वरूपशास्त्र, ९, १०
सामान्यीकरण, ४१–४२
सिमेल, जॉर्ज, ५, २४, १९४
सोरोकिन, पी. ए., २५
संकरण, २८१
संक्रामण :
व्याख्या, १६२
प्रकार, १६२
प्रक्रिया, १६२
संस्कृतीचे, २३७–३८
संघर्ष :
व्याख्या, १४५–४६
उद्देश, १४६
स्वरूप, १४६
प्रक्रिया, १४६
व्याप्ती, १४६
मूळ कारण, १४६
लोप, १४७–४८
प्रतिबंध, १४८–४९
व मानव समाज, १४९
विघटनात्मकता, १५२
संतति–नियमन, ८९
संयुक्त कुटुंब, २३२
संस्कृती :
मानव समाजाची, २, ३, ७०
परिणाम, ८१
संस्था :
संकल्पना, ११९
व्याख्या, ११९
रचना, ११९–२०
कार्य, १२०
महत्त्व, १२०
अभ्यास, १२०–२१
सांस्कृतिक मूल्ये व परिवर्तन, २८३-८५
स्तनंधयावस्था, १३३
स्त्री–पुरुष प्रमाण, ९६, १०२–०३
स्त्री–पुरुषसमागम निबंध, ८९
स्त्री–पुरूषसंपर्क निबंध, ८९
स्थानांतरण :
प्रक्रिया, ९२
कारणे, ९२–९३
अभ्यास, ९३
स्थानीयता, २१४–१५
स्थायी समूह, १९६, २११
स्पर्धा :
व्याख्या, १४९
उद्देश, १४९
स्वरूप, १४९
प्रक्रिया, १४९
नियमबद्धता, १५०

व्याप्ती, १५०
गुण, १५०–५१
दोष, १५१
मर्यादितता, १५१–५२
विघटनात्मकता, १५२
स्पेन्सर, हर्बर्ट, २१, २२, २५
स्मृती व व्यक्तिमत्त्व, १७९
स्वतःविषयीची जाणीव, १७३–७४
स्वसमूहश्रेष्ठतावाद, ४३,१४७, १९८

हंटिंग्टन, एल्सवर्थ, ८०
हाऊस, फ्लाइड, २७४
हॉबहाऊस, एल्. टी., ८, २५

क्षेत्रीय वियोजन, २२५–२६

ज्ञानमीमांसा, ५८

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम
क्रमांक .......... वि: ..........
.......... नोंद दि ..........
REFBK-0015140
REFBK-0015140
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१४९६०

# शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| ९ | १३ | सजाजाचे | समाजाचे |
| ९ | १४ | प्रश्नांचाच | प्रश्नांचेच |
| १६ | २०–२१ | assemblge | assemblage |
| २० | २–३ | पार्श्वभमी | पार्श्वमूमी |
| ६० | १४ | वचार | विचार |
| १२८ | १० | व्यक्तिला | व्यक्तीला |
| १२८ | १३ | ठेरतील | ठरतील |
| १३७ | २१ | क्षेत्र | क्षेत्रे |
| १४२ | १२ | आसल्यामुळे | आल्यामुळे |
| १५५ | १ | असल्यान | असल्याने |
| १५६ | १२ | व्यक्तीमत्त्वाचे | व्यक्तिमत्त्वाचे |
| १६० | १९ | discipines | disciplines |
| १७१ | २४ | मूल्य | मूल्ये |
| १८९ | ११ | समहांच्या | समूहांच्या |
| २३७ | २६ | प्रत्येल | प्रत्येक |
| २५१ | १ | बसो | असो |